
# बल्पूरचा संस्थानिक



न. चिं. केळकर.

पुणे नगर वाचन मंदिर
019071
19071
863.3
Kel

# नवलपूरचा संस्थानिक

[ राजकारणविषयक कादंबरी ]

लेखक

न. चिं. केळकर

सन १९३४

---

किंमत १। रुपया

प्रकाशक
न. चिं. केळकर,
केसरी-कचेरी, नं. ५६८
नारायण पेठ, पुणें शहर
* * *

* * *
मुद्रक
धोंडो वासुदेव विद्वांस,
केसरी छापखाना, नं. ५६८
नारायण पेठ, पुणें शहर.

# प्रस्तावना

यंदा केसरीकरितां कादंबरी लिहिण्याचें ठरविल्यावर संस्थानी राजकारण हा विषय पसंत केला; परंतु या कादंबरींतील कौटुंबिक कथानकाचें बीज माझ्या मनांत वीस वर्षांपूर्वींच रुजलें होतें. ही कादंबरी ध्येयवादी आहे हें सांगावयास नकोच. ती लिहितांना कोणतीहि एक संस्थानिक व्यक्ति माझ्या डोळ्यापुढे नव्हती. तिच्यांतील अनेक मर्मस्थानें हीं ऐकीव माहितीवरच आधारलेलीं आहेत. मला कोणत्याहि संस्थानांतील राजचरित्राचा प्रत्यक्ष अनुभव नाही.

कादंबरी प्रसिद्ध होत असतां जीं पत्रें मला आलीं, त्यांवरून अक्षरानअक्षर वाचणाऱ्या अनेक, बारीक नजरेच्या, वाचकांच्या दृष्टीखालून ती जात होती हें मला उघड दिसून येत होतें. त्यामुळे मनाला समाधान वाटे. पत्रांत चुका दाखविल्या जात, व बोधप्रद सूचनाहि केल्या जात. त्या सर्वांबद्दल मी पत्रलेखकांचा आभारी आहें.

संस्थानिकाने प्रजेला स्वराज्यदान करणें हें अद्भुत होय. मी तें कथानकांत घडवून आणलें आहे. तथापि, प्रजेकडून होणारा स्वराज्याचा उपभोग हा विषयहि इतर एका दृष्टीनें तितकाच अद्भुतरम्य वाटतो. यामुळे, कांही वाचकांच्या सूचनेप्रमाणे, या कादंबरीचा उत्तरार्ध लिहिण्याची स्फूर्ति झाल्यास त्याकरितां वरील विषय कदाचित् घेईनाहि.

कादंबरींत प्रथम चित्रें घालावीं असा विचार होता; आणि त्याप्रमाणें येथील चित्रकार रा. गोडबोले यांनी तयार करून दिलीं तीं एक दोन घातलींहि. पण पुढे तो आठवड्याचा नित्यक्रम अडचणीचा वाटला, व जागाहि अडूं लागली. यामुळे तो विचार सोडून दिला. रा. गोडबोले यांनी जीं चित्रें दिलीं त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

पुणें, तारीख
६।७।३४.

न. चिं. केळकर.

# अनुक्रमणिका


| अ. नं. | प्रकरण | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | मित्रांच्या जुन्या आठवणी ... ... | १–१२ |
| २ | महाराज नवलराय ... ... ... | १३–२३ |
| ३ | महाराजांचा मित्रलाभ ... ... ... | २४–३४ |
| ४ | टपालवाला कीं गुप्त पोलीस ! ... ... | ३५–४६ |
| ५ | पत्राने उडविलेला गोंधळ ... ... ... | ४७–५८ |
| ६ | प्रेमळ बाप–लेकींचें भांडण ... ... ... | ५९–६९ |
| ७ | चांडाळ चौकडीच्या गुजगोष्टी ... ... | ७०–८० |
| ८ | भाऊसाहेबांचें भूत भविष्य ... ... ... | ८१–९१ |
| ९ | विक्रम कीं हरून–अल् रशीद ! ... ... | ९२–१०१ |
| १० | डबीरांची विमला ... ... ... | १०२–११२ |
| ११ | एका बारांतून किती गोळ्या उडाल्या ! ... ... | ११३–१२३ |
| १२ | अज्ञातवासांतलें आत्मचरित्र ... ... | १२४–१३४ |
| १३ | 'अन् या कार्ट्याला माझा भाऊ करणार तुम्ही !' ... | १३५–१४५ |
| १४ | प्रभाकराचा नृसिंहावतार ... ... ... | १४६–१५६ |
| १५ | न्यायदेवतेचा निद्राभंग ... ... ... | १५७–१६७ |
| १६ | माशाने माणिक गिळलें ! ... ... ... | १६८–१७८ |
| १७ | भावाच्या सुटकेचा उद्योग ... ... ... | १७९–१८९ |
| १८ | मनोहराची नाजुक कारवाई ... ... | १९०–२०० |
| १९ | आता कथानक धावूं लागलें ! ... ... | २०१–२१२ |
| २० | माशाचें पोट चिरणारी सुरी ! ... ... | २१३–२२३ |
| २१ | मेरीचा 'सुव–र–राज्या'ला विरोध ! ... ... | २२४–२३४ |
| २२ | न्हाव्याच्या घोकटींतील शकुनवंती ! ... ... | २३५–२४६ |
| २३ | नवलरायाचा नवलकारक जाहीरनामा ... | २४७–२५७ |
| २४ | स्वराज्यदानाचा नजराणा ... ... ... | २५८–२६८ |
| २५ | पाळीव पोपटाला स्वातंत्र्यदान ... ... | २६९–२७९ |
| २६ | 'सत्य संकल्पाचा दाता भगवान' ... ... | २८०–२९० |
| २७ | संस्थानी स्वराज्याची पहिली मजल ... ... | २९१–३०४ |




## प्रकरण पहिलें

# मित्रांच्या जुन्या आठवणी

या नवलपूर नगराला 'नवलपूर' हें नांव मूळ ठेवतांना तें कोणी कोणत्या नवलाला उद्देशून ठेवलें असेल ठाऊक नाही. पण तें ठेवल्या-नंतरच्या इतिहासांत एक नवल घडलें खरें. आणि त्या नवलाचीच गोष्ट आम्हीं आता वाचकांना सांगणार आहों.

वास्तविक नवल हें दृष्टींत असतें, सृष्टींत नसतें. प्रतिभावान माणसाला पाहावें तिकडे नवलच दिसेल. नाही तर श्रीकृष्णाने अर्जुनाला दाखविलेलें विश्वरूप पाहूनहि एखादा खमंग दगड म्हणावयाचा "देवा! हेंच का तुम्ही मोठ्या नवलाचें म्हणून दाखविलें तें! लहान मुलें अशीं विक्षिप्त चित्रें रोज पाटीवर काढतात!"

जिची चर्चा झाली नाही अशी गोष्ट जगांत नाही. या नगराच्या नांवाचीहि चर्चा अलीकडे एकदा झाली तेव्हा एक नागरिक म्हणाला "आज ओळीने पांच पिढ्यांचा जुलमी राजसत्तेचा छळ सोसून लोकांनी हें संस्थान कसें उरूं दिलें हें नवल"! दुसरा म्हणाला "आज पांच पिढ्यांनी तरी माणुसकीच्या शीलाची आशा दाखविणारा राजा या नगराच्या लोकांना

लाभला हेंच नवल " ! नवलपूर नगराभोंवतालचें सृष्टिसौंदर्य खरोखरच नवल वाटण्यासारखें होतें. पण नगरच्या लोकांनी केलेली नगराच्या अंतःस्वरूपाची घाण व दुर्दशा हीं देखील नवल करण्यासारखीच होती. तथापि असल्या नवलांविषयी आपण बोलत बसूं तरी कोठवर ! तेव्हा या नगरांत आज काय प्रत्यक्ष घडत होतें तेंच पाहूं या चला !

आमच्या संस्थानिक लोकांची राजधानी म्हटली म्हणजे तिची रचना कोठेंहि बहुधा ठरलेलीच असावयाची. राजवाड्याच्या मुख्य दरवाजासमोर, लांबच लांब व खूप रुंद असा एक रस्ता. त्याच्या दोहों अंगांना मधून मधून शहराचे मुख्य मानकरी व शेठ–सावकार यांच्या हवेल्या. त्यांतच एखादें पाण्याचें कारंजें. गांवांतलें मुख्य देऊळ त्यांतच. परका मनुष्य गांवच्या दुसऱ्या टोकाने या रस्त्यांत शिरला, आणि कांही वेळ चालला, म्हणजे त्याला वाटेल कीं हें केवढें मोठें शहर असलें पाहिजे. पण हा राजरस्ता सोडून तो जरा बाजूला गेला म्हणजे शहराचें खरें स्वरूप लक्षांत यावयाचें ! मुख्य रस्ता पन्नास फूट रुंद असला, तर त्याला येऊन मिळणारे रस्ते पंधरा फुटीहि नसावयाचे. घोड्यांच्या दोन गाड्या एकीजवळून एक जावयाच्या नाहीत. आणि दोन रगेल बैल समोरासमोर आले कीं बहुधा टक्करच जुंपावयाची! राजरस्ता तेवढा झाडलेला असावयाचा. आडरस्त्यांत कचरा तुडवीत, घाण टाळीत, मोऱ्यांचे ओहोळ ओलांडीत, नाकाला पदर लावून जावयाला पाहिजे. या भागाच्या पलीकडे गेलें म्हणजे तर मुळी रस्तेच नाहीत. नुसते बोळ; वाटेल तशीं वेडीं–वांकडीं बांधलेलीं घरें. त्यांच्या निमुळत्या कोपऱ्यांनी बनलेल्या गुंफांतून किंवा चक्रव्यूहांतून कशी तरी वाट काढावयाची. आणि यांतून बाहेर पडलें कीं मग निवडुंगच निवडुंग ! संस्थानी राजधानीच्या एकाच छोट्या आवारांत विलायतेंतली रॉलस रॉइस मोटार, झुलत चालणारा गजराज, सहकुटुंब उकीरडा फुंकणारा डुकर, आणि महाराष्ट्राचा आवडता निवडुंग यांचा समावेश कसा बिनबोभाट सुखाने सख्ख्या–चुलतभावंडांप्रमाणे झालेला असतो !

बाहेर नगराच्या पूर्वांगाला मात्र एक रम्य व शोभिवंत अशी विस्तीर्ण उद्यानभूमि होती. तींत दोनहि प्रकार होते. एक गर्द झाडी असलेली राई. हिच्यांत आपोआप उगवलेले अनेक उंच वृक्ष असून भरदोनप्रहरींहि तींत सूर्य-

किरणें महत्प्रयासाने शिरत. तसेच राईच्या पलीकडे कांहीं अंतरावर एक जंगी सपाट मोकळें मैदान होतें. यांत गांवचीं शेंकडो लहानमोठीं मुलें सर्व प्रकारचे खेळ खेळत; व घरचीं घोडीं असलेले तरुण घोडदौडी करीत. राई व मैदान यांच्यामध्ये माळ्याने बनविलेला लहानच पण सुंदर बगीचा असून, त्यांत नवीं जुनीं सर्व प्रकारचीं फुलझाडें लावलीं होतीं, तीं अशा बेताने कीं कोणत्याहि महिन्यांत सौंदर्य व सुगंध यांची वाण न पडावी. बागेच्या मध्यावर एक जुनाट शंकराचें देऊळ होतें. त्याच्या प्राकारांतील एका बुरुजा-सारख्या उंच जागेवर चौरस फरसबंद ओटा होता. त्यावर संध्याकाळची हवा घेणारे हौशी लोक बसून गप्पागोष्टी करीत. तात्पर्य, हा दहावीस बिघ्यांचा भूप्रदेश गांवच्या लहानथोर स्त्री-पुरुषांना सर्व दृष्टींनी प्रिय असा होता. यामुळे पहाटेपासून चार-दोन घटका रात्रीपर्यंत या भागाकडे लोकांची रहदारी कायमची टिके.

आज या ओट्यावर बसून दोघे तरुण हलक्या आवाजाने गोष्टी बोलत होते. सूर्य मावळून चंद्रप्रकाश पडूं लागला होता. हवेंत ऊष्मा बराच होता. तथापि जी एखादी वाऱ्याची झुळूक मधून मधून येई तिजबरोबर, बागेंतल्या निशीगंधाचीं आणि रातराणीचीं नुकतींच उमलणारीं फुलें यांचा मादक सुगंध येऊन मनाला आल्हाद होई. त्या तरुणांपैकीं एकजण म्हणाला:—
" बन्या, आज तुझी माझी गांठ आपल्या या आवडत्या जागीं पडल्याबरोबर मला बाळपणच आठवलें रे सगळें ! "

**बन्या**—" मलाहिपण तेंच आठवलें, शंकरभाऊ ! पण आपली आठवण तेवढी उरली आणि बाळपण गेलें याचें तुला वाईट नाही का वाटत ? "

**शं. भा.**—" आठवण मनांत आहे तोंपर्यंत तितक्यापुरतें तें बाळ-पणच नव्हे का ? हें पाहा मला या क्षणीं मनःचक्षूंना असें दिसतें आहे कीं, तूं आणि मी घरच्या देवांना पुडाभर फुलें तोडून नेण्याकरिता असे संध्याकाळीं या शेजारच्या बागेंत आलों आहों."

**बन्या**—" आठवणीच म्हणशील, तर मीहि तुझ्या जोडीला आणि भरतीला कांहीं सांगूं शकेन. तुझी ऐट नको.

**शं. भा.**—" सांगा बरें. "

**बन्या**—"आपण फुलें तोडावयाला आलों आहों, पण फुलें तोडण्याचें दोघांच्याहि वांटणीचें गरीबसें काम मी एकटा करीत असता, झाडांत दड-लेलीं पक्ष्यांचीं गवती घरटीं आणि आंब्यावरच्या कैऱ्या, माळ्याची नजर चुकवून तोडण्याचें धाडसाचें काम दोघांच्या वांटणीचें तूं एकटा करीत आहेस—"

**शं. भा.**—"पण त्या तोडून झाल्यावर तुझ्यांतलीं निम्मीं फुलें तूं मला देत आहेस आणि माझ्यांतल्या निम्म्या कैऱ्या मीं तुला देत आहें—"

**बन्या**—"आणि माळ्याने संशयाने दटावल्याबरोबर, धीटपणाने तूं त्याच्या अंगावर दुप्पट जोराने ओरडून, "मी खासगी कारभारीसाहेबांना सांगून तुझी खोड मोडीन" असें तोंडाने म्हणत असतांना, हाताने खिशांतल्या कैऱ्या हळूच चाचपून पहात आहेस !"

**शं. भा.**—"अलबत ! सरकारी बागेंतल्या आंब्याच्या झाडावरच्या कैऱ्या चोरण्याचा प्रत्येक लहान मुलाला हक्कच असतो. त्या चोरीचें मला आज मोठेपणींहि वाईट वाटत नाही."

**बन्या**—"अरे, पण तेव्हा तरी शेवटीं ती चोरी ठरली कोठे ? तुला नाही कां आठवत कीं, तूं आणि मी माळ्याबरोबर भांडत तंडत होतों, इतक्यांत अवचित खरोखरच खासगी कारभारी साहेब बागेच्या तोंडाशीं आले—"

**शं. भा.**—"होय रे होय, आणि त्यांच्याबरोबर खुद्द यजमानसाहेबहि होते ! आम्ही त्यांच्या ओळखीचे म्हणून त्या दोघांनीहि आमचे कौतुक केलें.

**बन्या**—"पण गुप्त पोलिसाप्रमाणे "आज किती कैऱ्या पाडल्या मेहरबान," असा नेमका सवालहि तुला मला त्यांनी केला! मग काय विचा-रतां ! त्या लुच्च्या माळ्याने पगडी फिरविली; आणि यजमानसाहेबांना मुजरा करतांना काय म्हणाला "पोराची जात ! अजून त्यांचें दात कैऱ्या खाऊन-शेनी आंबत न्हाइता ना ! तवा त्येनीच कैऱ्या कराकरा खाव्या ! आणि चोराव्या बी ! आमा म्हाताऱ्यांस्नी आता कुणी कैऱ्या दिल्या हटकून तरी खाववतात कुठ, सरकार ? "

**शं. भा.**—"मग ते सर्वजण हंसले ! आणि आम्हीहि मोठ्या संभावितपणाची ऐट आणून यजमानसाहेबांना नमस्कार करून ते लांब गेल्यावर त्यांना हंसत निघून गेलों नव्हे का ? "

**बन्या**—" अरे हो, बरोबरच आहे. यजमान झाले तरी काय ! संभावितपणाची नुसती ऐट आणणारेच होते कीं नाही ! केवढें त्यांचें तें कुंभाराच्या चाकाएवढें भलें मोठें पेशवाई पागोटें— "

**शं. भा.**—" कपाळावर केवढा तो गंधाचा टिळा—"

**बन्या**—" आणि केवढे ते कल्ले आणि गुलमिशा! अरे बाप रे ! "

**शं. भा.**—"अरे, तेव्हाचें तें वैभव केशसंवर्धनांत होतें. आता कल्पना पालटल्या हें दे सोडून. हल्लीच्या यजमानांच्या तोंडावर कधीं एक तरी केस दिसतो का? आणि तुझ्या माझ्या तरी ? "

**बन्या**—" तसेंच तो इतर थाट ! यजमानसाहेबांच्या पुढे चालणाऱ्या हुजऱ्याच्या कंबरेला खऱ्या जरीचा शेला आणि हातांत रुप्याचीच पण सोन्याच्या मुलाम्याची छडी !—"

**शं. भा.**—" आणि उजेडाकरिता आणलेली दिवटी तीहि रुप्याची. तशीच तेलाची बुदली देखील—"

**बन्या**—" पण खरेंच सांग हं ! आता आपण या दिमाखदार वैभवाची चेष्टा करूं वाटेल तर पण तेव्हा तें वैभव पाहून आमचे डोळे किती दिपत ! आणि आश्चर्यानें आमच्या भिवया दोन बोटें कशा वर चढत ! "

**शं. भा.**—" बाळपणीं दृष्टीचें मापच असें लहान असतें. जो अनुष्य आज आपणाला ठेंगू वाटेल तो तेव्हा दोन पुरुष उंचीचा वाटत असतो. "

**बन्या**—" शिवाय राजवैभवाची आपली कल्पनाहि लहानपणीं वेगळी असते.'

**शं. भा.**—"अगदी बरोबर ! मला तर तेव्हा, संस्थानचा यजमान म्हणजे पुराणांतलें वर्णन ऐकलेला स्वर्गीचा इंद्रच वाटे. "

**बन्या**—" आणि आता काय तो पाताळचा राक्षस वाटतो ? "

**शं. भा.**—" नाही तसेंहि नाही. तो माणसांतला माणूसच–पण तो सामान्य माणसाहून थोडा अधिक वरच्या दर्जाचा माणूस वाटतो यांत मात्र शंका नाही. "

**बन्या**—" ना विष्णुः पृथिवीपतिः " हें वचन तुझ्या डोक्यांतून अजून अगदी पार निघून गेलेसें दिसत नाही ! "

**शं भा.**—" तें निघून गेलें आहे. पण " शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते " या वचनावरचा विश्वास सर्वस्वी उडालेला नाही हें मात्र खरें. आपल्या हिंदु तत्त्वज्ञानांतला कर्मविपाकाचा सिद्धांत मला पुष्कळसा खरा वाटतो. आणि म्हणूनच असेंहि वाटतें कीं, केवळ जन्मानें राजपद मिळणें हें पूर्वार्जित सत्कर्माचें फळ आहे. आणि दत्तक होऊन राजपद मिळणें तर त्याहून अधिक ! एरवीं जगांत राजपदापेक्षा गरीबांचींच घरटीं हजारों लाखोपटीनें अधिक असतात; आणि ' थिअरी ऑफ चान्स ' म्हणजे ' संभव सिद्धांता 'प्रमाणें राजपद मिळण्यापेक्षा गरीबाचा वारसा मिळणें हाच संभव हजारों लाखोपटीनें अधिक प्रबळ ठरत नाही काय ? "

**बन्या**—" पण राजपदावरच्या लोकांचीं चरित्रें पाहिलीं म्हणजे, 'योगभ्रष्ट' हें स्तुतिवचन न वाटतां मला तर तो निंदास्पदच शब्द वाटतो. योग हा पूर्वीचा शब्द विसरून जाऊन भ्रष्ट येवढाच शब्द त्यांच्या संबंधानें माझ्या लक्षांत राहतो. आणखी असेंहि वाटतें कीं या भ्रष्ट योग्यांची पुरी दुर्दशा व्हावी म्हणूनच कीं काय, अनेक कुकर्मे करण्याची संधि ईश्वर त्यांना राजपदावर बसवून देतो. "

**शं. भा.**—" पण त्यांच्या कुकर्मांचा गवगवा व्हावा, निंदा व्हावी, याला फक्त त्यांचें मोठेपण हेंच कारण नव्हे का ? संस्थानिकांच्या प्रजाजनांत राजांसारखे दुष्ट-नष्ट कुकर्मी लोक आढळत का नाहीत ? "

**बन्या**—" पण, आपल्या कुकर्मावरून लोकांचें लक्ष जावें, म्हणजे सामान्य प्रजाजनासारखीच आपल्या कुकर्मांची उपेक्षा त्यांच्याकडून व्हावी असें जर राजेलोकांना वाटत असेल तर त्यांनीं राजपदाचा त्याग करून सामान्य प्रजाजनांत मिसळावें कीं ! त्यांना नको कोण म्हणतो ? राजपदाचा त्याग करावयाला कोणाचा प्रतिबंध आहे ! पण राजपद, त्या पदाचें ऐश्वर्य व वैभव हें सर्व लाभावें, आणि फिरून त्याच राजपदामुळे लोकनिंदा मात्र टळावी हीं दोनहि कशीं रे साधतील ? "

**शं. भा.**—" पण, बाबा, राजधर्माप्रमाणेच प्रजाधर्म म्हणूनहि कांही आहे कीं नाही ? स्वतः प्रजा तो पाळील तर मग राजाला नांवें ठेवावयाला प्रजेला अधिकार येईल. धर्म हा दुतर्फी मामला आहे. राजा काय, प्रजा काय,

दोनहि एकाच खाणींतली माती नव्हे काय ! 'पॉट कॉलिंग धी केटल ब्लॅक' ही म्हण प्रसिद्धच आहे. राजे लोकांना नांवें ठेवणाऱ्या महाशयांपैकीं एखाद्या राजेश्रींना आउट घटकेची शिराळशेटी, उसनें राजपद, देऊन पाहा. म्हणजे कळेल राजा होणें हें किती अवघड आहे तें."

**बन्या**—"पण राजवैभव भोगणें सोपें व तेवढें काम मात्र राजे लोक चोखपणें बजावतात असेंच ना !"

**शं. भा.**—"येऊन जाऊन त्यांच्या वैभवाचा हेवा ! हेंच कीं नाही ? आपलें वैभव मात्र कोणी सोडावयास तयार नाही. भावी पिढीच्या जिवावर सगळे आर्थिक आणि राजकीय प्रयोग ! आपण मेल्यावर जगाचें कांही कां होईना ! पण आपण जिवंत असूं तोंपर्यंत व्यक्तिशः प्रजाजनांना मात्र आपलें वैभव आणि आपली संपत्ति भोगतां आली म्हणजे झालें !"

**बन्या**—"चला कीं, आपल्याला कशाला राजे लोकांच्या रिकाम्या उठाठेवी ? देवाने तुला आणि मला राजा केलें नाही किंवा भोगण्यासारखें वैभवहि दिलें नाही. भाकरी मिळवावी आणि खावी. खरें सुख यांतच आहे!"

**शं. भा.**—"ठीक बोललास, मास्तरकी हें राज्य आणि सुटी हा मोक्ष याच मताचा मीहि आहें. आणि तोच मोक्ष भोगायला यंदा गांवीं आलों आहे. असो, चला, यंदा तरी सुटींत तुझी माझी गांठ येथे बरी पडली म्हणावयाची ! आणि त्यालाहि कारण मला वाटतें हेंच कीं, माझ्याप्रमाणे तुलाहि यंदा आपल्या गांवीं सुटी घालविण्याची अभावित इच्छा आज इतक्या वर्षांनी झाली. नेहमीप्रमाणे मला यंदाहि माझ्या शिकवणींतिल राजकुमाराबरोबर महाबळेश्वरला जाण्याचें निमंत्रण आलें होतें. पण तें टाकून मला इकडे यावें असें राहून राहून वाटलें. कारण आपल्या जन्मभूमीचा लळा कांही वेगळाच आहे. महाबळेश्वरच्या शीतळ सुखालाहि तो हार जात नाही !"

**बन्या**—"तुला दरवर्षी महाबळेश्वराला जाण्याचें निमित्त तरी असतें. मला तसलें कांही निमित्त तर नाहीच इकडे न येण्याला पण उलट हे वर्षा-अखेरचे दिवस मला, केलें तर, भरगच्च घरकामाचे जमिनीच्या. जाळभाजी, उरला सुरला वसूल, नव्या कबुलायती, या सगळ्या कामीं आमच्या वृद्ध काकांना माझी मदत फार हवी असते. पण माझ्या मनाने या शहरीं येण्याची जी लाज

अलीकडे घेतली आहे तिजमुळे, घरचें थोडेंबहुत नुकसान झालें, किंवा काकांनी स्वछंदी म्हणून मला बोल लावला, तरी यावेसें वाटत नाही. काय करूं."

शं. भा.—" मग यंदाच कसें यावेसें वाटलें ?

बन्या—" तुझ्यासारखेंच जन्मभूमीच्या प्रेमाने हें तर खरेंच. पण शिवाय इकडे येण्याविषयी वाटणारी व मनाला सतत खात राहणारी लाज मला सोडून देईल असा जो कांही प्रयत्न करावा असें नेहमी वाटे, तो यंदा सफळ होण्याचा योग आला असें दिसलें. म्हणून मी आनंदाने आलों."

शं. भा.—" याविषयी तूं मला पूर्वी कांही सांगितलें होतेंस कारे कधी, बन्या ? सांगितलें असलेंस तरी तें आता चांगलेसें आठवत नाही. म्हणून विचारावेसें वाटतें. पण तें सांगण्यासारखें असलें तरच हो ! नाही तर माझा कांही आग्रह नाही. तुझ्यासारखीच नवलपूर ही माझीहि जन्मभूमि असली तरी तुझ्या–माझ्यांत फरक आहे. तो असा कीं, जन्मभूमीच्या स्मरणाशिवाय या गांवीं माझ्या मनाला प्रेमबंधन असें कांहीच नाही. तुझें घरदार, गोतावळा सगळें कांही येथे आहे. आणि मनाला लज्जा वाटण्याचें कारण आपले आपण असो, वा इतर कोणी असोत, गोतावळा जेवढा मोठा तेवढा तो स्वाभिमानी मनुष्याला लज्जेच्या दृष्टीने अधिकच अडचणीचा होतो."

बन्या—" शंकरभाऊ, तुला माझें कारण मीं कधी नीट सांगितलेंच नव्हतें, मग तें कसें आठवणार ? पण तें न सांगितलें याचा अर्थ तूं कदाचित् मनांत समजतोस तसा मात्र नव्हे. मला आपल्या गांवीं येण्याची जी लाज वाटते म्हणून म्हटलें, ती माझ्या कोणा कुटुंबीय स्त्रीपुरुषांच्या दुष्कृत्यामुळे नव्हे; तर स्वतः माझ्याच हातून घडलेल्या कांही दुष्कृत्यांमुळे ! "

शं. भा.—" काय, तुझ्यासारख्याच्या हातून दुष्कृत्य ! मला तर तें खरेंच वाटत नाही. तूं कांही तरीच सांगतों आहेस झालें ! "

बन्या—" दुष्कृत्यच नव्हे तर काय ! तें मी कोणत्याहि स्वार्थीपणाने केलें नाही. जें काय घडलें तें बालपणाच्या अजाणतेपणानेच ! आणि त्यांतूनहि प्रत्यक्ष माझ्या वडिलांच्याच सांगणीने व आग्रहाने ! हें सर्व खरें. पण त्या माझ्या कृत्याने या नवलपूरच्या एका कुटुंबाचा नाश झाला ! हे मला तेव्हा चांगलेसें कळत नव्हतें. पण आता मी मोठा झाल्यावर तें चांगलेंच कळतें,

मनाला जाणवतें, आणि दुःख देतें. माझें दुष्कृत्य दुसरें–तिसरें कांही नव्हतें, फक्त खोटी साक्ष देण्याचें होतें. आता ती साक्ष मी दिली नसती तरीहि जें व्हावयाचें तें त्या परिस्थितींत झालेंच असतें, राहिलें नसतें. पण मी निमित्त-मात्र तरी झालोंच कीं नाही ? खोटी साक्ष दिल्याने मी तर बदनाम झालोंच, पण माझ्याच वयाचा एक तरुण निरपराधी मुलगा–याच नवलपूरचा एक उमदा नागरिक–न्यायकोर्टांत काळेपाण्याच्या शिक्षेला पात्र झाला. बरींच वर्षें सगळा गांव माझ्याकडे, माझ्या वडिलांकडे, व माझ्या घराकडे निंदा करण्याच्या बुद्धीने बोट दाखवी. त्यांत त्यांच्याकडे तरी काय दोष ! मात्र पुढे पुढे खरा प्रकार सर्वच्या सर्व हळुहळू लोकांना कळून आला ! लोकांनी आमची निंदा करण्याचें सोडलें. माझेहि वडीलहि निवर्तले. मी बरेच दिवस गांवीं आलों नाही. अशा रीतीने विस्मरणाला मदतच झाली. तथापि जन-निंदा हटली तरी मननिंदा कशी हटणार ! ”

**शं. भा.**—“ कां बरें ? लोकांनी तुला निर्दोषी ठरविलेंच कीं नाही ! त्यांनी तुझ्यावरचा आरोप काढून घेतलाना ! मग ! ”

**बन्या**—“ अरे, लोकांना सत्य कळून आलें तें इतकेंच कीं, माझ्या हातून झाली गोष्ट ती स्वार्थी बुद्धीने झाली नाही. पण जें खोट्या साक्षीचें कृत्य घडलें तें राहिलेंच कीं नाही ? शिवाय त्याचे दुष्परिणाम दुरुस्त होते तरी मग सर्वच कांही ठीक होतें. पण डबीरांचा प्रभाकर, ज्याला आणि ज्याच्याबरोबर मला दोषी ठरवून कोर्टाने काळेपाण्याची शिक्षा दिली, तो अजून आहेच कीं नाही फरारी ? मला लवकरच माफी देण्यांत येऊन तुरुंगांतून सोडलें; कारण; दरबारचा खरा राग प्रभाकारावरच होता. त्याला गुन्हेगार ठरवावयाला कोणा तरी समवयस्क मुलाची साक्ष सरकाराला हवी होती. ती त्यांनी मजकडून घेतली व मला शिक्षा दिल्याचें नाटक करून लवकरच सोडून दिलें. अशा रीतीने अखेरीस माझें प्रत्यक्ष नुकसान असें कांहीच झालें नाही. पण बिचारा प्रभाकर घरा–दाराला मुकला कीं नाही ! आणि माझ्या साक्षीच्या निदान निमित्ताने ! ”

**शं. भा.**—“ बन्या, मला कल्पना नव्हती कधी कीं, असला वाईट प्रसंग तुझ्यावर आला असेल म्हणून ! ”

बन्या—" कशाने कल्पना येणार तुला ! तूं त्या वेळीं या शहरीं बहुधा नव्हतास; आणि त्यानंतरहि आणि तुझी माझी गांठच आज किती तरी दिवसांनी पडत आहे ! बरं, माझी जबानी खोटी होती हें मी कुणाकडे सांगावें ? आणि सांगितलें तर त्याचा उपयोग काय ? अशी स्थिति आजवर होती. म्हणून आपल्या मनाशींच दुःख करीत बसलों होतों झालें !"

शं. भा.—" मग आता यंदा सुटींत नवलपुराला आलास तो कोणत्या आशेवर ? "


बन्या—" आशा हीच कीं नवे यजमान गादीवर येणार, त्यांना मुखत्यारी मिळणार, तेव्हा संस्थानच्या कारभारांत फेरफार होऊन हा नष्टदुष्ट दिवाण दिवाणपदावरून निघाला म्हणजे कदाचित् नवा मनु अवतारावयाचा ! आणि प्रजेला सुखाचे दिवस लाभण्याचा संभव ! "

शं. भा.—" पण तुझ्या जबानीने ज्या खटल्यांत प्रभाकर डबीराला काळे-पाण्याची शिक्षा झाली त्याची कांही दुरुस्ती होईल अशी आशा वाटते का तुला ? "

बन्या—" आज प्रत्यक्ष तशी आशा कांही वाटत नाही हें खरें. कारण तसा कोणताहि प्रयत्न व्हावयाचा म्हटले तर खुद्द प्रभाकर डबीर जागेवर पाहिजेना ? तो तर अजून फरारीच आहे. पण यंदा चारसहा महिन्यांची रजाच काढून आलों आहें घरीं. काका आता अगदी थकले, तेव्हा घरच्या कारभाराची कांही व्यवस्था करीन म्हणतों. आणि नवे यजमान स्थानापन्न झाल्यावर या नाही त्या रीतीने खरी घडलेली हकीकत त्यांच्या कानावर घालीन ! मग त्यांतून कांही निघो वा न निघो. पण तसें करीन तर खास माझ्या मनावरचा भार तरी हलका होऊन मी सुखी होईन! नवे यजमान तुझ्या-माझ्या वयाचे असून तरतरीत व होतकरू दिसतात. मग पाहावें शेवटीं कसे काय निघतात ते म्हणा ! "

या दोघा मित्रांचें असें बोलणें होतें तों इतक्यांत एक उमदा घोडा खिंकाळत फुरफुरत देवळाच्या बाहेरच्या दरवाजाशीं आला. त्यावरून नवलपूरचे नवे यजमानच रपेट करून आले होते ते खाली उतरले. जवळच्या एका हुजऱ्याचे हातांत रेशमाची काढणी होती ती त्याने लगामाला लावून

घोडा आपल्या हातीं घेतला. दुसऱ्या हुजऱ्याचे हातांत भालेदार काठी व मेणबत्तीचा चौकोनी मोठा कंदील होता, त्याच्या उजेडाने नवे यजमान, घोड्या-



च्या पाठीवर शाबासकीची थाप मारून, मुजरे व नमस्कार घेत घेत देवदर्शना-करिता देवळांत शिरले,आणि देवदर्शन व प्रदशिणा करून तसेच पायीं राजवाड्या-कडे गेले. बन्या व शंकर हे बुरुजाच्या ओट्यावर उभे राहून यजमानसाहेबांच्या या हालचाली पाहत होते. यजमान निघून गेल्यावर शंकरभाऊ म्हणाला—

**शं. भा.**—“ बन्या, कांही म्हण, पण हें नवें पाणी कांही वेगळेंच दिसतें आहे. मग नवलपूर संस्थानाच्या प्रजेच्या नशिबांत काय असेल तें असो.”

**बन्या**—“ मी तरी याच आशेवर आज इतक्या दिवसांनी गांवाचें तोंड पाहायचें धाडस केलें आहे ! आता मुखत्यारीचा समारंभ लवकरच होणार. तो झाला म्हणजे कारस्थानाचीं चाकें हलूंफिरूं लागतील गरगरा. मग माझें प्रकरण कोठे कसें लागतें धसाला तें पाहतां येईल. बिचारा प्रभाकर डबीर जिवंत आहे का मेला त्याचा पत्ताहि नाही. तेव्हा त्याचा न्याय कसा होईल तो होवो. पण माझ्यापुरतें तरी मला पाहतां येईल आणि तें मी पाहणारच.

मी माफी मागून तुरुंगांतून सुटलों. पण ती सुटका माझ्या अंगीं कधीच लागली नाही. पोटांतला रोग संभाळून माणसाने बाहेर वागावें तसें माझें चाललें आहे तेव्हापासून. कटाचा खोटा आरोप माझ्यावर घातल्याने अन्याय झाला तो मला! आणि फिरून माफी मीच मागावयाची! पण प्रभाकराचा बाप तो तसा, आणि माझे वडील हे असे. म्हणजे काय ! संस्थानी अधिकाऱ्यांच्या सत्तेने दिपलेले आणि राजनिष्ठेच्या खोट्या कल्पना उराशीं बाळगणारे. असो. चला आता उशीर झाला !"

इतकें बोलून बन्या सहज झटक्याने उठला, त्याबरोबर त्याचा मित्रहि उठला; आणि दोघेहि प्राकाराच्या पायऱ्या उतरून देवळाच्या महाद्वारांतून बाहेर पडले.

---

## प्रकरण दुसरें

# महाराज नवलराय

आम्ही जी गोष्ट लिहीत आहों तिच्या वेळेच्या सुमारास नवलपूर संस्थानाचें राजकारण शिजून खदखदावयाच्या बेताला आलें होतें. जुने महाराज मृत्यु पावून कांही वर्षें झालीं. त्यांच्या पश्चात् हल्लीच्या महाराजांना दत्तक घेतल्यावर एक वर्षाच्या आंत राणीसाहेबहि वारल्या. नवे महाराज अज्ञान असल्यामुळे राजकुमार कॉलेजांत शिकत होते. अर्थात् सर्व कारभाराची मुखत्यारी दिवाणसाहेबांकडे होती. वर पोलिटिकल एजंटसाहेब सर्वसाधारण देखरेख करीत. पण दिवाणसाहेबांनी आपल्या अधिकाराचा इतका दुरुपयोग चालविला होता कीं, लोक त्रस्त होऊन नवी कारकीर्द केव्हा सुरू होते याची वाट पाहत होते. पण नव्या राजेसाहेबांचें एकविसावें वर्ष संपून त्याबरोबर राजकुमार कॉलेजांतील शिक्षणहि संपतांच त्यांनी परदेशचा प्रवास करण्याची परवानगी मागितली आणि चांगला तीन वर्षांचा कार्यक्रम आंखला.

तीन वर्षांनी महाराज प्रवासाहून परत आले. राजकुमार कॉलेजाच्या मुख्याध्यापकाचा रिपोर्ट, महाराजांचा अभ्यास हुषारी व वर्तन या सर्वांसंबंधाने, फारच स्तुतिपूर्ण होता. यामुळे सरकाराने त्यांना कुलमुखत्यारी देण्याला काढली. पण फिरून त्यांनी वर कळविलें कीं, आपणाला "थोडा कारभाराचा अनुभव मिळाल्यावर मग सोळा आणे पक्की मुखत्यारी घेऊं, तूर्त कच्ची मुखत्यारीच पुरे. मात्र उरलासुरला अधिकार मी मागेन तेव्हा मला मिळावा अशी तजवीज व्हावी." तेव्हा फिरून दिवाणसाहेबांच्या नोकरीची मुदत वाढली व लोकांची निराशा झाली. बरें, "आता तरी लग्न करणार काय" अशी विचारणा पो. एजंटाकडून झाली. त्यालाहि महाराजांनी कळविलें कीं, "आणखी कांही दिवस अविवाहित राहण्याचा माझा विचार आहे." इतकेंच नव्हे तर नव्या महाराजांची राहणी-

सुद्धा नेहमीच्या राजे-लोकांसारखी डामडौलाची नाही असेंहि लोकांच्या प्रत्ययाला येऊं लागलें. वास्तविक या साध्या राहणीपासून लोकांना कांहींच त्रास नव्हता. पण जो राजा इतका साधा राहतो, तो वेडसर, विक्षिप्त किंवा फाजील लहरी निघून, फिरून दिवाण व जुनें कारभारीमंडळ यांचीच कारकीर्द चालू राहते कीं काय, व त्यांचे हात खंबीर होतात कीं काय अशी भीति त्यांना वाटूं लागली. लोक म्हणूं लागले कीं "पहा! कुणीकडून झालें तरीहि प्रजेचें दुर्दैव कांही संपत नाही असें दिसतें. वाईट वाईट म्हणून आणि चांगलें चांगलें म्हणून!"

संस्थानी प्रजेची मनःस्थिति खालसांतल्या प्रजेला कधीच बरोबर कळावयाची नाही. खालसा रियासत मोठी. पण तींत देशी अधिकारी किंवा प्रजा यांच्या वांट्याला येणाऱ्या सर्व गोष्टी मर्यादित असतात. संस्थानांत याच्या उलट प्रकार असतो. कल्पना करा कीं, संस्थानी राज्य हजार–पंधराशें मैल क्षेत्रफळाचें, एक–दोन लक्ष लोकसंख्येचें आणि दहा–पांच लक्ष रुपये उत्पन्नाचें एवढेंच असलें तरी, कनिष्ठ प्रजाजनांपासून सर्वश्रेष्ठ राजसत्तेपर्यंत सर्व प्रकारचे अधिकार, वैभव व अनुभव, यथाप्रमाण, संस्थानाच्या लोकांना भोगतां येतात. पिंड ब्रह्मांड न्यायाचा खरा प्रयोग हिंदुस्थानांत संस्थानी रियासत व खालसा रियासत यांच्या सान्निध्याने चांगलाच दृष्टोत्पत्तीस येतो. ब्रह्मांडांत एका टोकाला घडतें तें दुसऱ्या टोकाला कधी कळतहि नाही. पण लहानशा पिंडांतच जर ब्रह्मांडांतल्या सर्व गोष्टी घडूं लागल्या, तर त्यांचें ज्ञान पिंडांतल्या प्रत्येक कणापरमाणूला सहजच होणार!

संस्थानी राजाला सर्वच बाबतींत ईश्वराखालोखाल कर्तुं अकर्तुं सत्ता असते. मनांत आलें तर तो वाटेल त्या प्रजाजनाला एकदम श्रीमंत करील; वाटेल त्या श्रीमंताला एकदम अठरा विश्वे दारिद्र्यांत लोटील! तो वाटेल त्यावर आपली मुलगी लादून त्याला जावई करील, तर वाटेल त्याची मुलगी पळवून नेऊन लग्न लावून स्वतः त्याचा जावई होऊन बसेल! केव्हा अन्यायी रीतीने प्रजोत्पादन व प्राणदान करील, तर केव्हा अन्यायी रीतीने प्रजाजनांचे प्राण हरण करील! कोणाहि सावकाराच्या हवेलीवर गाढवाचा नांगर फिरवील, तर बैलांचा नांगर फिरलेल्या कोणाहि शेतकऱ्याने प्राण

म्हणून जतन केलेल्या जमिनीचें हरण करून त्यावर आपली हवेली उभारील! वेड्या दिवाण्यावर कृपा झाली तर त्याचा दिवाण करील, आणि दिवाणावर अवकृपा झाली तर त्याला छळून दिवाणा करून सोडील! तात्पर्य, मुंबईच्या सट्टेबाजारांत एका दिवसांत श्रीमंती व दारिद्र्य यांची जशी अदलाबदल एकसारखी होत असते, त्याप्रमाणे संस्थानी राज्यांत प्रजाजनांच्या सुखदुःखाची अदलाबदल होत असते. ब्रह्मांडांतली घालमेल आणि या पिंडांतील घालमेल ही एकाच स्वरूपाची असते, फक्त तिचें प्रमाण लहान असतें!

अशा लहानशा राज्यांत प्रजाजनांना ज्याप्रमाणे सुख मिळावें अशी इच्छा असते, त्याप्रमाणेंच 'राजवैभव' पाहावयास मिळावें अशीहि इच्छा असते हें मात्र कांही खोटें नाही. वैभव भोगणार राजाच. पण वैभव पाहणाऱ्या प्रजेला तें नुसतें पाहिल्याने आपणहि थोडेसें भोगलें असा भास होत असेल. सणावारी राजाची थाटाने मिरवणूक निघावी; फाटका का होईना जरीपटका फडफडावा; धार्मिक उत्सवांत राजाने येऊन लोकांबरोबर भाग घ्यावा; दरबार भरून नगारे चौघडे झडावे व शिंगें वाजावीं; फुसकेच का होईनात पण तोफांचे बार व्हावे; जुनाटच का होईनात पण बंदुकीच्या फैरी झडाव्या; बेगडीच कां होईनात पण रंगीबेरंगी पोषाखांत शिपायांच्या कवायती व्हाव्या; हरिदासीच का होईनात पण आयत्या वेळीं सजविलेले चार घोडेस्वार उगीच इकडून तिकडे दौडलेले दिसावे; रासवट अन्नाच्याच का होईनात पण गांवजेवणाच्या समाराधाना व्हाव्या; म्हाताऱ्या कळवंतिणीचेच का होईनात पण गाण्याबजावण्याचे दरबारी जलसे व्हावे;—अशी संस्थानी प्रजेची हौस असते. आणि ती लहानसान संस्थानांतूनदेखील भागतेहि.

पण खालसा रियासतींत तें कांही नाही. सर्व रुक्ष कारभार! अधिकारी (म्हणजे अर्थात् सर्वश्रेष्ठ अधिकारी) आधी सहसा प्रजाजनांच्या दृष्टीस पडावयाचे नाहीत. आणि पडले तरी, त्यांच्या अंगाला जुन्या चालीचें वैभव कांहीच चिकटलेलें दिसावयाचें नाही. खालसा राज्यकारभाराचाहि संसार आहे; पण तो सारा खरोखरीच 'संन्याश्याच्या संसारा' सारखा! प्रजेपुरतें तरी वैभव साहेबांच्या 'विभूती'चें म्हणजे 'पांढुरक्या भस्मा'चें! उलट संस्थानाच्या प्रजेला सुख हवें, पण तें राजाच्या हातून मिळालेलें हवें. त्यांना राजाबद्दल

आपलेपणा वाटतो तो मनोवासनेंतील संक्रामित वैभवाच्या आपलेपणामुळे वाटतो हें खरें असेल काय?

या दृष्टीने नवलपूरच्या नव्या महाराजांनी प्रजेचा फार विरस केला! राजवाड्याला अंतःपूरच नाही. राजवाड्यांत वाटेल तिकडे फेरी मारून येण्याला कुणालाहि प्रतिबंध नाही. आणि फेरी मारणाराला यदाकदाचित् महाराज दृष्टीस पडले तर ते सामान्य माणसापासून वेगळे ओळखून काढतां यावयाचे नाहीत. अंगांत एक साधा धुवट सदरा, डोक्याला एक साधी टोपी किंवा छोटासा फेटा. अंगावर सोनें नाही. जोड्याला कलाबतू नाही. तोंडांत विडा नाही. काठीला सोन्यारुप्याची विडी नाही. कोणालाहि अरेतुरे नाही. कोणी एका हाताने मुजरा केला तर त्याला हे दोन हातांनी नमस्कार करावयाचे. कोणी दोन हात जोडून नमस्कार केला तर त्याला हे मान लववून कोपरापासून नमस्कार करावयाचे. कोणी भेट मागितली तर नकार नाही. भेटीला आलेल्याने आपणच बोलणें पुरे म्हणून उठावें! हे रस्त्याने चालले तर स्त्रियांकडे डोळे उघडून पाहावयाचेहि नाहीत! महाराजांच्या संसाराच्या एका अंगाची ही कथा. आणि लग्न नाही म्हणून दुसऱ्या अंगाबद्दल बोलावयाचेंच कारण उरलें नव्हतें. हा राजवाडा आहे कीं एखादा मठ आहे असें लोकांना चुकल्याचुकल्यासारखें वाटावयाचें! बरें, राज्यकारभारांत लोकोत्तरपणा दिसावा तर अजून मुखत्यारी कच्ची, पुरी पक्की नाही! तात्पर्य, नव्या महाराजांना बरें म्हणावें कीं वाईट म्हणावें या शंकेंतच प्रजाजन अजून गर्क होते.

दिवाणसाहेबांची स्थिति तंतोतंत याच्या उलट होती. ज्याला 'राजयोग' म्हणतां येईल तो सगळाच्या सगळा संस्थानाच्या यजमानावरून उठून दिवाणसाहेबांच्या अंगावर चढून बसला होता. ते शरीराने उंच व धिप्पाड होते. वय पंचावन वर्षांचेंच असतांहि डोक्याचे व तोंडावरचे सर्व केंस पिकलेले होते, पण रोजच्या रोज काळा कलप लावून ते तरतरीत तारुण्याचा आभास उत्पन्न करीत. मिशा मोठ्या व पीळदार असून त्यांनी गालावर कल्ले राखले होते व मानेवर त्यांचा संजाप लोळलेला दिसे. रोज दाढीची हजामत, सुगंधी तेल लावून स्नान, व कपाळावर अर्धेलीयेवढा केशरी गंधाचा टिळा! कानांत जुन्या चालीची टपोऱ्या दोन मोत्यांची भिगबाळी! डोळ्यांना सोनेरी

घराचा चष्मा, सोनेरी सांखळीने खिशांत अडकवलेला ! डोक्याला झुळ-मुळ्यांची लाल रेशमी पगडी, डोळ्यांत सुरमा, कानाच्या पाळींत अत्तराचा फाया, तोंडांत लालभडक विडा, अंगांत रेशमी लांब कोट, वरून बाजीराव-कांठी रेशमी उपरणें, हातांत सोनेरी मुठीची काठी, मनगटांत सोनेरी रिस्टवॉच, बोटांत हिऱ्याची आंगठी, पायांत करकरीत हिरव्या रंगाचा दिल्लीशाही चढाव ! तात्पर्य, महाराष्ट्रांतील जुन्या खानदानी संस्थानी पद्धतीचें जें जें म्हणून बाह्य वैभव मनाने कल्पितां येईल तें सर्व दिवाणसाहेबांच्या अंगावर दिसून पडे. वैभवांतील एकच गोष्ट आणखी सांगण्याची उरली. ती म्हणजे जिभेवरील अभद्र खांडगाळी शिव्या !

महाराज नवलराय यांना मिळणारी मुखत्यारी कच्ची होती. तरी थाट झाला तो बराचसा पक्क्या मुखत्यारीसारखाच झाला. कारण मुखत्यारी कच्ची असली तरी राज्यारोहण पक्केंच होतें. आणि नाही नाही म्हटलें तरी राज्या-रोहणाला समारंभाचें स्वरूप आल्याशिवाय कसें भागेल ? पण या समारंभा-संबंधाची हौस म्हणून असली तरी ती स्वतः राजाची नसून इतरेजनांची होती.

या इतरेजनांत पोलिटिकल एजंटसाहेबांच्या मडमसाहेब मिसेस मॅकस्विनी या पहिल्या होत्या. साहेबमजकूर कलेक्टराच्या दर्जाचे. आजपर्यंत त्यांना येऊन–जाऊन संस्थान असें हेंच काय तें वहि-वाटीला मिळालें होतें हाताखाली. पूर्वी ते नवलपूरला भेट देत, तेव्हा दिवाणसाहेब अर्थातच त्यांचा सत्कार व बडेजाव करीत. कारण दिवाणसाहे-बांना तरी विशेष रीतीने मिरवावयाला, ख्यालीखुशाली करावयाला, तोच एक उजळ माथ्याचा प्रसंग असे. पण जोंपर्यंत घरचा मालक राजा गादीवर नाही तोंपर्यंत दिवाणसाहेबांनी एजंटसाहेबांचा सत्कार केला तरी, तो धर्मशाळें-तील रखवालदाराने द्रव्यलोभाने एखाद्या मातबर पाहुण्याचा करावा इतकीच त्याची किंमत ! शिवाय एजंटसाहेब हे लवकरच जिल्हा व पोलिटिकल एजंटाचे अधिकार सोडून परजिल्ह्यांत बदलून जावयाचे असल्यामुळे, अधिकार-दानाचें, राज्यारोहणाचें, शुभ आनंददायक परोपकाराचें काम आपल्या नवऱ्याच्या हातून व्हावें अशी इच्छा मडमसाहेबांना सहजच होती. असल्या समारंभांत कलेक्टरीचा रुक्षपणा सहज सारा झाडून निघावयाचा ! खालसा

मुलखांतल्या अधिकाऱ्यांना बसायला हत्ती हवासा वाटला तर तो संस्थानांत मिळावयाचा; आणि शिकारीचा थाटहि संस्थानांतच चांगला होतो.

मडमसाहेबांची दृष्टिहि राजवाड्यांतल्या चारदोन देखण्या वस्तूंवर पूर्वीच्या एका भेटींत पडली होती. त्यांच्याविषयीचें गुणवर्णन त्यांजकडून दिवाणसाहेबांच्यापुढे करून झालें होतें, पण फुकट गेलें होतें. कारण त्या वस्तु आपल्या हाताने उचलून नजर करण्याला दिवाणसाहेबांना अधिकार नव्हता. पण स्वतः संस्थानिकच मुखत्यार झाले म्हणजे कच्च्या मुखत्यारींतहि त्यांना राजवाड्यांतली वस्तु आपल्या हाताने उचलून देण्याचा अधिकार पूर्णपणें असतो. अर्थात् आपण व आपला नवरा राज्यारोहणाकरिता, म्हणजे संस्थानिकांवर उपकार करण्याकरिता, गेलों म्हणजे राजेसाहेबांनाहि कांही प्रत्युपकार करण्याची बुद्धि होणारच ! आणि त्यांतल्या त्यांत कोणत्या देखण्या वस्तूंविषयी मडमसाहेबांनी गुणग्रहणबुद्धि प्रकट केली होती हें दिवाणसाहेबांकडून यजमानांना कळलें असलें, म्हणजे मग "देणग्या दिल्या" असें न म्हणतांहि त्या वस्तु प्रत्यक्ष देण्याची क्रिया करण्याचे राजमार्ग मोकळे असतातच. एका भेटींत मडमसाहेबांना दरबाराच्या जवाहिरखान्यांतली मोत्यांची एक एकदाणी फारच आवडलेली दिसली होती. दुसऱ्या भेटींत एका हस्तीदंती चवरीची त्यांनी स्तुति केली होती. तिसऱ्या भेटींत जडिताचें काम केलेली एक अत्तरदाणी पाहून त्यांनी तिच्या कारागिरीवर स्तुतिवर्षाव केलेला दिवाणसाहेबांनी हेरून ठेवला होता. तात्पर्य, आपले पतिराज बदलून जाण्यापूर्वी राज्यारोहणसमारंभ व्हावा अशी मडमसाहेबांची तर फारच इच्छा होती.

समारंभावर होणारा खर्च व कार्यक्रम ठरविण्याचा अधिकार एजंटसाहेबांचा. त्यांत यजमानांना कोण विचारतो ? कारण मुखत्यारी मिळण्यापूर्वीची ती गोष्ट. पण इतर कार्यक्रमांबरोबर देणग्यांची देकारांची यादी दिवाणसाहेबांना यजमानापुढेच ठेवावी लागली. कारण तो देकार त्यांच्या मालकीच्या वस्तूंचा व त्यांच्याच हातून व्हावयाचा. यजमानसाहेबांनी प्रत्येक बाबतींत आपलें मत सांगितलें. पण अधिकार गाजविण्याचा तो पहिलाच प्रसंग म्हणून बेताने घ्यावें याकरिता कोणत्याहि गोष्टींत फारसा आग्रह धरला नाही.

त्यांनीं मुखत्यारीचा खलिता वाचण्याचा दरबाराचा समारंभ कार्य-क्रमांत राहूं दिला. पण त्यांतील नायकिणीचें गाणें रद्द करून पुरुष गवयाचें गाणें ठेवलें. या बाबतींत दिवाणसाहेबांनी जुना दाखला सांगितला; व आणखी असेंहि सुचविलें कीं, असले नाच एजंटसाहेब व मडमसाहेब यांना फार आवडतात. त्यावर महाराज म्हणाले, " न आवडतील तर काय झालें ! बाजारबसव्यांचा, निदान वंशपरंपरा खानदानीने विश्वयोषितांचा धंदा करणारणींचा, राजदरबारी वर्ग हिंदुस्थानांत आहे हें आयतें विलायतेंत सांगून आम्हा राजेरजवाड्यांची निंदा खुसखुशीत करावयाला साहेब लोकांना मिळते, ती ते कां सोडतील ! मडमसाहेबांना म्हणा कीं, "खुद्द राजे-साहेबांबरोबर, म्हणजे माझ्याबरोबर, जर बॉलांतल्याप्रमाणे नाचायची आपली तयारी असली तर ती व्यवस्था करवितों. विलायतेंत जाऊन सभ्य स्त्रियांशीं कसें वागतात हें मीं शिकून आलों आहें."

तसेच दरबारानंतर हत्तीवरची मिरवणूकहि महाराजांनी रद्द केली; व थट्टेने म्हणाले, " पुढे माझें लग्न होईल तेव्हा माझ्या वरातीचीच मिरवणूक आपण अधिक थाटाने काढूं. आज माझ्या मिरवणुकींत एजंटसाहेबांना अंबारींत बरोबर घेऊन बसायला मडमसाहेब आहेत. मीं पोरकाच कीं नाही बिचारा त्या बाबतींत ! मला कोण आहे ? " महाराजांनी हा भावी लग्न–वरातीचा हवाला इतक्या थट्टेने दिला, व त्यांत निरपेक्षताहि इतकी दिसून आली कीं, एखाद्याला वाटावें हा तरुण अविवाहित राजा बोलत नसून एखादा संन्याशी-च बोलतो आहे कीं काय ! दरबारानंतर दारूकाम निघालें त्याविषयी महाराज म्हणाले " तोच पैसा जर गोरगरिबांना अन्नदान करण्यावर खर्च कराल तर मला अधिक आवडेल ! " यांत एजंटसाहेबांच्या शिफारशीचा प्रश्नच नव्हता.

नंतर देणग्या देकाराचा प्रश्न निघाला, तेव्हा दिवाणसाहेबांनी इकडे तिकडे पाहत कानोसा घेतला; आणि तोंडाला पदर लावल्यासारखें करून ते म्हणाले " तुमच्या यजमानांना मुखत्यारी देण्याचें काम दैवाने लाभलें म्हणून आम्ही दोघे स्वतःला धन्य मानतों असें मडमसाहेब मजजवळ तीन–तीनदां म्हणाल्या !" त्यावर महाराज म्हणाले, " त्यांना असें वाटणें हा त्यांचा

थोरपणा आहे. मीं त्यांचे अवश्य आभार मानीन. शिवाय प्रत्येक सत्कृत्य ईश्वराघरीं रुजू असतेंच. तेथेहि त्यांच्या नांवानें तें जमा होईलच." पण हा पोकळ परलोकचा हवाला न पटून दिवाणसाहेब अगदी म्हणणार होते कीं, "तरीहि अभिनंदनाची खूण म्हणून त्यांना कांही देणगी द्यावयाची ठरली तर नोंदून ठेवीन आज्ञेप्रमाणे " हे शब्द त्यांच्या जिभेवर आले; पण तसा सरळ सल्ला न देतां दिवाणसाहेब म्हणाले "मडमसाहेबांनी पूर्वी एक–दोन वेळा सर्व राजवाडा हिंडून पाहिला. तेव्हा जवाहिरखान्यांत त्यांनी एक मोत्यांची एक-दाणी आरशापुढे उभ्या राहून गळ्यांत घालून पाहिली; आणि एक हस्तिदंती चवरी आणि रत्नजडित अत्तरदाणी यांच्या कलाकौशल्याची फार तारीफ केली असें मला स्पष्ट दिसलें."



नव.—" त्या वस्तूंच्या कारागिरांची त्यांनी फारच वाखाणणी केली म्हणतां ? "

दिवा.—" होय, सरकार. "

नव.—" मग असें करा. समारंभाला मडमसाहेब आल्या म्हणजे त्या

त्या कारागिरांच्या नांवचें एकेक चांगलेसें सर्टिफिकीट लिहून घ्या त्यांच्या खुद्द हातचें. म्हणजे तें आपण पाठवूं त्या त्या कारागिरांना आपल्या खर्चानें. होईल त्या बिचाऱ्यांचा भाग्योदय त्या शिफारशीनें. माझ्याबरोबर त्यांचेंहि राज्यारोहणच!"

दिवा.—"पण गुणवर्णन करतांना त्यांनी एकदाणी गळ्यांत घालून आरशांत पाहून हास्य केलें होतें.चवरीने वारा घेऊन "पलंगावर पडल्या पडल्या या चवरीनें माशा चांगल्या वारल्या जातील, नव्हे का दिवाणसाहेब!" असें त्या म्हणाल्या होत्या. आणि ही अत्तरदाणी टेबलावर ठेवण्यासारखी वस्तु आहे असेंहि त्या म्हणाल्या होत्या."

नव.—" अस्सें का ? बरें आहे ! या तीनहि वस्तूंची योग्य किंमत किती होईल असें तुम्हाला वाटतें, दिवाणसाहेब ! "

दिवा.—" फार कांही नाही, पण होईल सुमारें दहा हजार."

नव.—" इतकीच ! मग फार थोडी म्हणावयाची ! "

दिवाणसाहेबांना वाटलें कीं, आता पुढे महाराज बहुधा म्हणतील कीं, " मग घालून द्या तर या तीन वस्तु देकारांच्या यादींत. " पण महाराज तसें न म्हणतां, म्हणाले, " पण मडमसाहेब या वस्तु घ्यायला तयार आहेत कीं नाही याची केली आहे का कांही चौकशी तुम्ही ! "

दिवा.—" हो ! त्या नाही होय म्हणत म्हणत घेतील कीं !"

नव.—" नाही होय म्हणण्याचें कारण ह्यांना त्या वस्तूंची किंमत भारी वाटत असेल हेंच कीं नाही ? मग आपण तरी त्या विकायला खुषी नाही असें कां म्हणूं नये ? जुलूम नको त्यांच्यावर त्या विकत घेण्याचा ! "

दिवा.—" मी किंमत घेऊन त्या वस्तु विकत द्यावयाच्या अशा अर्थानें नाही बोललों, महाराज ! "

नव.—" मग कोणत्या अर्थानें तें सरळच सांगाना, दिवाणसाहेब ! गूढ कशाला ? "

दिवा.—" मला वाटलें कीं, साहेब आपल्याला गादी देऊन हातांत मुखत्यारीचा खलिता देणार, आणि आपलें अभिनंदनहि करणार ! तेव्हा गोड बोलणारांचें तोंडहि उलट गोड करावें अशी रीत आहे ! "

**नव.**—" पण आपली उत्तम मिठाई फार गोड म्हणूनच युरोपिअन लोकांना ती आवडत नाही म्हणतात ! " हें उत्तर ऐकून दिवाणसाहेब फिरून स्तब्ध झाले. महाराज नवलराय म्हणाले, " कां हो, असे गप्प कां ? तोंड गोड करावें म्हटलेंत, म्हणून मिठाई सुचविली ! "

**दिवा.**—" तें लाक्षणिक अर्थानें म्हटलें थोडेसें, महाराज "!

**नव.**—" पण मग तेवढेंहि लाक्षणिक बोलण्याचें सोडून अगदी स्पष्टच कां बोलाना ? आपण व्यवहार बोलतों आहों, काव्यांतले अर्थालंकार हुडकून काढण्याचे खंडे का लावीत आहों एकमेकांवर ? "

**दिवा.**—" छेः छेः तसें कसें होईल ? नाही मीं म्हटलें, या तीन वस्तु साहेबांच्या देकारांत घालाव्या समारंभानिमित्त. "

**नव.**—"अस्सं, आता आलें माझ्या लक्षांत ! पण एजंटसाहेब पडले सरकारी नोकर ! त्यांना देणग्या घेण्याची मनाई असते हें नाही का तुम्हाला माहीत, दिवाणसाहेब ? "

**दिवा.**—" होय, तें माहीत आहे. म्हणूनच त्या वस्तु मडमसाहेबांना द्याव्या. वस्तुहि अशाच आहेत कीं, त्या बायकांना द्यावयालाच शोभतील!"

**नव.**—" पण एजंटसाहेब सरकारी नोकर, तशाच मडमसाहेब स्वाभिमानी, संभावित इंग्रज स्त्री ! त्या कशा बरें घेतील अशा देणग्या उघड आमच्याकडून ? शिवाय तुम्ही किंमत दहा हजारहि कमी म्हटली, पण ती काय थोडी आहे ?"

**दिवा.**—" पण अशा देणग्या, उघड देणग्या म्हणून द्यायच्याच नसतात! त्या देण्याचे मार्ग आहेत. त्या मार्गानें दिल्या म्हणजे काम होतें."

**नव.**—" मग सांगा पाहूं या देणग्या देण्याचें तुम्ही कसें काय योजलें आहे मनांत तें ? "

**दिवा.**—"तें अगदी सोपें काम आहे ! मडमसाहेबांना मोत्यांची जी एकदाणी माळ द्यायची ती त्यांच्या गळ्यांत घालायच्या फुलांच्या हारांत बसवावयाची. इकडचा हार तिकडे होऊं नये म्हणून मडमसाहेबांच्या हाराला तांबडी फीत रिबन गांठवावयाची, लहान युरोपियन मुली केसांना बांधतात तशी. हार घालायचें काम कुणाकडे आलें तरी ती खूणच ! मडम-

साहेब बंगल्यावर गेल्यावर हटकून हार उलगडून घेतील अशी सूचना मीं त्यांना देईन ! आणि मोत्यांची माळ फुलांच्या माळेबरोबर सहज गेली ही चूक त्यांच्या लक्षांत येईल."

**नव.**—" आणि आमच्या चुकीची ते क्षमा करतील ! चूक आमच्या नजरेला आणून आमचा अपमान करणार नाहीत. चूक आमच्या गळ्यांत न बांधतां आपल्याच गळ्यांत बांधून घेतील म्हणतां ? बरें, चवरीचें काय ? "

**दिवा.**—" घोड्याच्या गाडींत साहेब मंडळी बसली म्हणजे हस्तिदंती चवरी त्यांचा पट्टेवाला मागे उभा राहील त्याच्या हातांत डोक्यावर वारायला द्यायची. आणि त्याला हळूच कानांत सांगायचें कीं, चवरी बंगल्यावरच राहायची आहे, ती ठेव, परत पाठवूं नको."

**नव.**—" बरें, जडावाच्या अत्तरदाणीचें कसें ?"

**दिवा.**—" साहेब लोक अत्तर अंगाला लावूं देत नाहीत ! तेव्हा एका रुप्याच्या तबकांत–अर्थात् लहानशा तबकांत–एक रुप्याची गुलाबदाणी आणि ही अत्तरदाणी पुढे केली म्हणजे मडमसाहेब तबकाला हात लावतील. मग तेंच तबक त्यांच्याकडे पाठवून द्यावयाचें."

**नव.**—" आणि तबकासकटच त्यांनी ते जिन्नस ठेवून घ्यावयाचे असेंचना ? दिवाणसाहेब, अत्तरदाणी तीन हजारांची असली तरी ती घालून देण्याचें रुप्याचें तबक सांगतांना तुम्ही मुद्दाम 'अर्थात् लहानशा तबकांत' म्हटलेंत हें संस्थानाच्या हिताच्या दृष्टीचें काटकसरीचें तुमचें धोरण माझ्या लक्षांत आलें नाही असें नका समजूं ! असो. तुमच्या या काटकसरी धोरणाचा सल्ला मलाहि शिकला पाहिजे. म्हणून सांगतों कीं, हें देकाराचें कलमच अजीबात वगळून टाका पाहूं समारंभाच्या यादींतून ! "

दिवाणसाहेबांना आपले सारे श्रम, सारी मुत्सद्देगिरी, सारें शहाणपण, आणि सारे मनोरथ यांचा व्यूह ढासळल्यासारखा होऊन पाण्यांत ढेकूळ विरघळावें असें झालें. आता मडमसाहेबांना काय वाटेल याचा बाऊ त्यांच्या डोळ्यांपुढे मूर्तिमंत उभा राहिला. पण करतात काय !

---

## प्रकरण तिसरें

# महाराजांचा मित्रलाभ

ठरल्याप्रमाणे राज्यारोहण–समारंभ तर पार पडला. पण वर दर्शविलेल्या पद्धतीने ! झाला समारंभ तो संस्थानाचा, संस्थानाच्या गादीचा, स्वतः-च्या व्यक्तीचा नव्हे, अशी एक प्रकारची उदासीन वृत्ति महाराजांनी ठेविली होती.

दरबारांत मुखत्यारीचा खलिता वाचून दाखवून एजंटसाहेबांनी नेहमीप्रमाणे भाषण केलें. त्याला महाराजांनी उत्तर दिलें तें मात्र नेहमी राजे–लोक भाषण करतात तसें नव्हतें. त्यांनी सरकाराचे म्हणून आभार मानले ते एका शब्दांत, व अगदी औपचारिक दिसावे असे! एजंटसाहेबांचा व्यक्तिशः उल्लेख त्यांनी भाषणांत मुळींच केला नाही. दोन राजांच्या कार-कीर्दींच्या दरम्यान दिवाणसाहेबांनी कारभार केला त्यासंबंधाने आभार-प्रदर्शक असें तर कांहीच बोलले नाहीत; उलट सर्वांना सावधगिरीची सूचना द्यावी त्याप्रमाणे असें म्हणालेः–" चार्ज देतां–घेतांना खजिन्याची रक्कम मोजून देण्याघेण्याचें काम थोडें व सोपें असतें; आणि तें कारकुनांकडूनहि करवून घेतां येतें. पण कारभार व न्यायदान यांची गोष्ट तशी नाही. म्हणून मी गेल्या बारा वर्षांतल्या कारभाराची चौकशी सुरू केली आहे ती पुरी करून, दप्तरें तपासून, लोकांच्या तक्रारी कैफियती काय असतील त्या ऐकून घेऊन, नंतरच मी दिवाणसाहेबांच्याकडून चार्ज घेतला असें समजेन आणि म्हणेन. याकरिताच मी आज फक्त कच्ची मुखत्यारी स्वीकारतों. तसेच मी पक्की मुखत्यारी हातीं घेईपर्यंत दिवाणसाहेब कामावरच राहतील, व मला मदत करतील. अशा प्रसंगीं देणग्या देण्याची, तुरुंगांतील कैदी बंधमुक्त करण्याची, मामुली रीत आहे हें मींहि जाणतों. पण मीं मनांत योजिल्याप्रमाणे जुन्या कारभाराची निरनिराळ्या बाजूंनी छाननी झाली, म्हणजे कोणाचें काय नुकसान झालें, कोणाला काय अन्याय झाला हें समजलें म्हणजे मला

र्ता येतील त्याच पैशाच्या देणग्या खऱ्या, व मग मी कैदी सोडीन किंवा शिक्षा कमी करीन त्याच न्यायाच्या देणग्या खऱ्या ! मी आज चौकशी-शिवाय कुणाला बरें म्हणूं इच्छित नाही, व कुणाला वाईट म्हणण्याचेंहि धाडस करीत नाही. मनुष्यमात्र हा चुकीला पात्र आहे असें मी माझ्या-सकट सर्वांबद्दलच म्हणतों. पण राज्याधिकाराला खरोखर 'ईश्वरी' म्हणण्या-इतकें गंभीर स्वरूप आहे असा माझा दृढ विश्वास आहे. म्हणून मी वरवर सजविलेले कागदी घोडे नाचवूं इच्छित नाही इतकेंच काय तें ! आणि या-बद्दल, वर ब्रिटिश सरकारापासून खाली लहानांत लहान अशा माझ्या नोकरांपर्यंत, व कनिष्ठांतल्या कनिष्ठ प्रजाजनांपर्यंत, सर्वजण मला क्षमा करतील अशी आशा आहे."

रात्रीं मेजवानी झाली तेव्हा एजंटसाहेबांनी महाराजांच्या भाषणाची स्तुति केली. पण त्याच रात्रीं, वरिष्ठ सरकाराकडे जें नेहमी खासगी गुप्त पत्र एजंट लोकांकडून जावयाचें असतें, तें गेलें त्यांत त्यांनी असें लिहिलें:– "हा नवलपूरचा संस्थानिक मला तरी मोठा नवलाचा वाटतो. त्याच्या बरे-वाईटपणाची निश्चित दिशा आज नक्की कळत नाही. पण सरकाराला त्याच्या कारभारावर बारीक नजर ठेवून मधून मधून निमताना घेणें जरूर आहे. पौर्वात्य लोकांच्या पुराणांतून व दंतकथांतून अशा गोष्टी ऐकावयाला येतात कीं, एका देशचा जुना राजा मेला, गादीला वारस उरला नाही, तेव्हा हत्तिणीच्या सोंडेंत प्रधान–मंडळाने माळ दिली व तिला बाहेर पिटाळली. तेव्हा तिला एक प्रकारची दिव्य स्फूर्तिच होऊन, नगराच्या वेशीबाहेरून रगटीं पांघरलेला कोणी एक फकीर येत होता त्याच्या गळ्यांत तिने ती माळ घातली; व प्रधान–मंडळाने त्या फकिराला गादीवर बसाविलें. पुराणें हा इतिहास नसल्यामुळे या फकिराने राजा या नात्याने पुढे राज्य कसें केलें हें तीं पुराणें लिहीत नाहीत ! पण मीं सांगितला इतका चुटका पुरे. नवल-पूरचे हल्लीचे राजे उत्तम शिक्षण घेतलेले आहेत. बहुश्रुत दिसतात. मनहि सुसंस्कृत दिसतें. हलक्या किंवा दिखाऊ गोष्टींचा तिरस्कार करतात असा भास होतो. गरीब घराण्यांतून गरीबींतून दत्तक घेतले गेल्यामुळे गर्भ–श्रीमं-तीचा रुबाब जसा त्यांचे अंगीं नाही, तसेच गर्भश्रीमंतींत चिकटणारे दुर्गुण-

हि त्यांच्या अंगीं दिसत नाहीत. सांगण्यासारखी विशेष गोष्ट म्हणजे हा कीं, ते आज लग्न करण्याच्या वयाचे सहज होऊन गेले तरी, लग्नाची गोष्ट निघाल्यास तिला सरळ होकार किंवा रुकार देत नाहीत किंवा सरळ नकारहि देत नाहीत. अर्थात् असा तरुण अविवाहित राजा गादीवर असणें हें नवलपूरच्या उपवर कुमारिकांचें सुदैव फळाला आलें म्हणावें कीं, राज्यांतील एकंदर स्त्रीवर्गाचें दुर्दैव ओढवलें म्हणावें, हें कालांतरानेच कळून येणार आहे! तूर्त सरकाराने यांच्या कारभारासंबंधीं तटस्थ वृत्तीचें धोरण ठेवावें हेंच मला बरें दिसतें."

मडमसाहेबांच्या वृत्तींत मात्र हा तटस्थपणाहि नव्हता. यजमान अविवाहित यामुळे राजवाड्यांत त्यांचा सत्कार अखेर पुरुषांनीच करण्याची पाळी आली होती. आणि युरोपियन स्त्रियांना पुरुषांत मिसळण्याची बोलण्याचालण्याची संवय असली तरी, कालिदासाने शांकुतलांत म्हटल्याप्रमाणे "सर्वः संगधेषु विश्वसति" हेंच खरें. इंग्रजी येत असलेली संस्थानी यजमानीण भेटली, तर युरोपियन स्त्रियांचें रहस्य चांगलेंच जमतें. पण अशिक्षित यजमानिणीशीं गांठ पडली तर निदान स्वतःची प्रौढी मिरविण्याचें तरी सुख त्यांना लाभतें. देशी यजमानिणीच्या त्या कोपरापर्यंत भरलेल्या बांगड्या; खाली एका दिवसाकरिता पायांत चढविलेले म्हणून न झेपणारे बूट स्टॉकिंग; तो कुंकवाचा मोठा टिळा; नाकांतली ती मोत्यांची वेसण; न वापरतां येणारे, पण कंबरेला उगीच खोवलेले, उंची रंगीबेरंगी हातरुमाल; इंग्रजी येत नसतां विनाकारण एखादा शब्द कळलासा बहाणा करणारें तें अज्ञानाचें भोळें खुळें हास्य; मध्यस्थ दुभाष्य इकडचें भाषांतर तिकडे करून सांगत असतांना चाललेली निरर्थक मानडोल व हुंकार; टेबलावर बसून चहा घेण्याची वेळ आली असता धर्मभ्रष्टतेच्या भीतीने करूं कीं न करूं या भ्रमाने उडालेला गोंधळ;—असलें करमणुकीचें साधन मिळालें तरी राजवाड्यांत जाणाऱ्या युरोपियन मडमा खूष असतात. कारण मौज तरी पाहावयाला मिळते! पण या मडमसाहेबांना नवलपुरांत हेंहि नाही व तेंहि नाही असें झालें. यामुळे त्यांची महाराज नवलराय यांजवर स्वाभाविक नाखुषी होतीच ती वाढली. आणि दुसरे दिवशीं जेव्हा मोकळ्या

रिकाम्या हातांनी मोटारींत बसून परत निघण्याची वेळ आली, तेव्हा तर महाराजांशीं त्यांनी नुसता ओझरता 'शेकहँड' तरी केला, पण दिवाणसाहेबांकरिता हातहि पुढे केला नाही. आणि त्यांचेकडे रागारागाने पाहत त्या चालल्या झाल्या !

राजधानीच्या लोकांचीहि अशीच निराशा झाली ! त्यांच्या मनांत दरबाराची शिळी कुरवंडी होईल ! झाला असा समारंभ थोडाच. पण तोहि आणखी कांही दिवस परोपरीने साजरा करीत बसावें अशी इच्छा त्यांची होती. भात शिळा असला तरी फोडणी घालून तो स्वादिष्ट करतां येतो. तसे प्रकार समारंभाचे कांही व्हावे असें त्यांना वाटे. कोणा दरबारी सल्लागारांना राजघराण्यांतल्या कुलाचाराची आठवण झाली. कारण गोंधळाच्या निमित्ताने मुरळ्या नाचवितां येतात. आणि पोवाडे संपले म्हणजे गोड चालीच्या लावण्या म्हणवून घेतां येतात. कोणाला कीर्तनसप्ताह सुचला. कारण ऋणानुबंधी हरिदासाला बिदागी मिळवून देतांना मध्यस्थांचाहि हात थोडाबहुत ओला होऊं शकतो. तसेच कोणी कुस्त्यांच्या फडाची दंगल सुचविली. पण महाराजांनी सर्व गोष्टींना एकसारखा नकारच दिला. वरती असा हुकूमहि सोडला कीं, " मुखत्यारीच्या समारंभाच्या खाणाखुणांपैकीं एकूणएक पुढच्या चोवीस तासांत नाहीशा झाल्या पाहिजेत ! " त्याप्रमाणे अंमलबजावणी होऊन दोन दिवसांत शहराला अगदी मामुली स्वरूप आलें. कित्येकांना असें वाटत होतें कीं, पहिल्या समारंभानंतर लगेच दोन हातांचे चार हात करण्याचीहि कांही योजना असेल. आणि तसें झालें तर समारंभाकरिता उभारलेल्या कमानी व तोरणें हीं आयतींच त्याहि समारंभाला उपयोगी पडतील. पण राजेसाहेबांनी तीहि आशा ठेवली नाही !

कच्च्या मुखत्यारीचा समारंभ झाल्यावर कांही दिवसांनी संध्याकाळीं पांच वाजता एक सरकारी मोटार राजवाड्याच्या दाराशीं येऊन उभी राहिली. तिच्यांतून देशी पद्धतीचा प्रवासी पोषाक केलेला एक तरुण गृहस्थ हातांत काठी व छोटी बॅग घेऊन खाली उतरला. लगेच एक पाहरेवाला हात जोडून त्याला म्हणाला " महाराजसाहेब वर आपलीच वाट पाहत बसले आहेत मगाचपासून. सामानसुमानाची काळजी आपण कांहीएक करूं नका. तें सारें मीं आपल्या राहण्याच्या खोलींत व्यवस्थित नेऊन ठेवतों. "

पाहुणा व पाहरेकरी जिना चढून जातात तों स्वतः महाराज नवलराय हे तेथे उभेच होते. पाहरेवाल्याने मुजरा करतांच महाराजांनी त्याला " जा खाली. यांच्या सामानाची व्यवस्था नीट कर. आणि वर आमचा चहा पाठवून द्यायला सांग" असें म्हणून लावून दिलें; पाहुण्याचा हात धरून त्याला आपल्या दिवाणखान्यांत नेलें; त्याला एकदम कडकडून आलिंगन दिलें; आणि ते सद्गदित कंठाने त्याला म्हणाले " मनोहर, किती वर्षांनी भेटलास बरें!"

**मनो.**—" झालीं कीं सुमारें तीन वर्षें."

**नव.**—" माझ्या मुखत्यारीच्या समारंभाला येशील म्हणून किती तरी वाट पाहिली. आणि अखेर आला नाहीस तेव्हा किती वाईट वाटलें म्हणून सांगूं!"

**मनो.**—"तें सांगितल्याशिवाय मला कळत का नाही! मलाहि उलट तसेंच वाईट वाटलें. पण करणार काय? तो समारंभ पाहून डोळ्यांचें पारणें फेडायचें माझ्या नशिबांत नसलें तर मी तरी कसा वेळेवर येणार? पण असो. आता त्या वाईट वाटण्याचें आपण दोघे मिळून चांगलें उट्टें काढूं! यापुढे मुखत्यारीचा नसला तरी इतर अनेक समारंभ होणारच. यजमानसाहेबांचें वैभव आहे! माझे डोळे आहेत! पाहून घेऊं. मी नेहमी नवलपुरासच नसलों तरी जवळच आहे. फार तर एका रात्रीचा प्रवास!"

**नव.**—"काय म्हटलेंस? माझें वैभव आणि तुझे डोळे? परदेशीं जाऊन हेंच शहाणपण शिकून आलास वाटतें! तूं माझ्या या समारंभांत मजजवळ नव्हतास त्याचें मला वाईट वाटलें म्हटलें, तें काय माझें वैभव पाहण्याला तुझे दोन डोळे कमी पडले म्हणून कीं काय? माझी ही तूं चांगलीच परीक्षा केलीस म्हणायची! पण तें असो. मी कोणत्याहि दिखाऊ वैभवाचा कितपत भोक्ता आहें हें वास्तविक तुला माहीतच आहे. आणि फाजील दिखाऊ प्रकार, मुखत्यारीच्या समारंभांतूनहि काढून टाकून, मीं शेंकडों लोकांचा कसा विरस केला हें तुला कुठे माहीत आहे? मुखत्यारीच्या दिवसापर्यंत मीं परावलंबी होतों. म्हणून मी नाही नाही म्हणत असतां समारंभांत माझ्या अंगावर थोडेसें वैभव चढलें तें पोलिटिकल

एजटसाहेबांच्या हुकुमावरून. पण तें आता फिरून कुणाला यापुढे दिसणार नाही हें खास. तुझ्याहि डोळ्यांना गैरहजेरीबद्दल तीच शिक्षा! शिवाय माझें वैभव पाहायला तुला मिळो वा न मिळो; पण यापुढे एका रात्रीच्या प्रवासाचीहि दगदग तुला उरू न देण्याचा मी निश्चय केला आहें. "

**मनो.**—" वाः! म्हणजे मला पुनः नवलपूरला यायचें केव्हा आमंत्रणच देणार नाही वाटतें आपण, राजेश्री ! "

**नव.**—" तसें नव्हे रे. तर तुला यापुढे या नवलपुरांत माझ्याजवळच नेहमी ठेवून घेऊन. मग प्रवास कशाला ? माझें वैभव पाहण्याच्या निराशेचें दुःख भोगीत तुला यापुढे या शहरांतच सर्व आयुष्याचा काळ कंठावा लागणार ! "

**मनो.**—" म्हणजे याचा अर्थ मी नाही समजलों ! "

**नव.**—" कृति घडो म्हणजे झालें. अर्थ कळून काय करायचें आहे ? "

**मनो.**—" तुमच्या मुखत्यारी-अखत्यारीचा जुलूम करायला तुम्हाला एरवी प्रजा आता कांय थोडी लाभली आहे म्हणून माझ्यावर असा हा जुलूम करणार ? "

**नव.**—" वाः! प्रेमाच्या माणसांवरच जुलूम करण्यांत गोडी असते. प्रेमाचीं माणसेंच जुलूम सोसून घेतात. इतर त्याचा गवगवा करतात ! "

**मनो.**—" पण हा जुलूम सोसून इथे राहून मीं काय करणार ? "

**नव.**—" आजवर तूं मिळविलेल्या विद्येचा, विशेषतः व्यावहारिक शहाणपणाचा अन् अनुभवाचा फायदा मला आणि माझ्या प्रजेला करून होणार, दुसरें काय ? "

**मनो.**—"तो कोणत्या नात्यानें बुवा ? "

**नव.**—" माझा प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून !"

**मनो.**—" म्हणजे संस्थानी दरबारांतील सगळ्या कामांत अवघड असें काम तुम्ही मला सांगणार ? "

**नव.**—" सगळ्या कामांत हें काम अवघड तें कसें ? "

**मनो.**—" तें असें. लोकांनी मनांत समजावें कीं, आपल्या राजाच्या हातून जें जें कांही वाईट काम झालें त्याचा सल्ला प्रायव्हेट सेक्रेटरीने

दिला! आणि इकडे त्याने जीव तोडून कितीहि चांगला सल्ला दिला तरी राजाने तो ऐकूं नये!"

नव.—"लहानपणीं आपण शाळेंत खेळगडी असतांना माझ्या हातून होणाऱ्या सर्व अपराधांचा दोष तूं आपल्यावर घेत होतास, तसेच आता या कामांतहि कर म्हणजे झालें! तूं लहानाचा मोठा झालास त्याबरोबर माझ्यावरचें तुझें बंधुप्रेम आणि स्वभावाचा उदारपणा हींहि मोठीं झालीं असतीलच, वाढलीं असतीलच!"

मनो.—"आणि तुम्ही लहानाचे मोठे झालां त्याबरोबर खोड्या आणि अपराध करण्याचा तुमचा पराक्रमहि वाढला असें मी समजावयाचें कीं काय? आणि तुम्हाला तसें म्हणावयाचें आहे काय?"

महाराज हंसून म्हणाले, "अलबत्! राजा व्हावयाचें तें मग एरवी कशाला? आपल्या लहरींची हौस पुरवून घ्यायची तर अशी सोन्यासारखी जागा आणि संधि एरवी कोठे कशी लाभणार?"

मनोहर आठवलेसें करून निःश्वास टाकून म्हणाला, "दिखाऊ वैभवाची हौस तुम्हाला नाही तशीच ती मलाहि नाही हें तुम्हाला ठाऊकच आहे. पण आज जर एक माणूस जिवंत असतें तर तुमचा हा वैभवहीन रुक्ष का होईना, पण मुखत्यारीचा समारंभ पाहून ज्याला मात्र आनंद गाजवावयाला जग थोडें झालें असतें तें माणूस जिवंत नाही याचें मला वाईट वाटतें."

नव.—"तें कोण?"

मनो.—"माझी आई!"

महाराज सद्गदित स्वराने उसळून म्हणाले, "खबरदार 'माझी' असें म्हणशील तर! 'आमची' असें म्हण! मनोहर! तिने तुला जन्म दिला पण खरें पुत्रप्रेम माझ्यावर केलें. तूं आज मुद्दाम तिची आठवण काढलीस तें ठीकच केलेंस. पण तूं आठवण करून देण्यापूर्वी, किंबहुना तूं येण्यापूर्वीच, मी 'आमच्या' आईची आठवण निरंतर जागती ठेवण्याकरिता काय केलें आहे हें दाखवितों तुला म्हणजे कळेल."

असें म्हणून नवलरायाने मनोहराचा हात धरून त्याला आपल्या आंतल्या खोलींत नेलें. त्या ठिकाणीं रंगीत भिंतीला सुंदर लांकडी चौकट ठोकून तिजमध्ये

एकाशेजारीं एक असे तीन मोठे फोटोग्राफ टांगले होते. त्यांत मध्यभागीं मनोहराच्या मृत आईचा फोटो असून, शेजारीं एका बाजूला मनोहराचा व एका बाजूला नवलरायाचा असे होते. आणि या मधल्या फोटोवर ताज्या खऱ्याखुऱ्या फुलांची माळ टांगली होती. त्या फोटोपुढे डोकें टेकून गहिवर येऊन महाराज नवलराय म्हणालेः—

नव.—" मनोहर, या माउलीचा आशीर्वादच आजचें माझें स्थान आणि माझें वैभव याचें खरें कारण आहे असें मी तरी समजतों. माझी जनक-आई मला स्मरतहि नाही. माझे बाबाहि तिच्या मरणानंतर लागलेच मेले. अशा त्या माझ्या पोरक्या असहाय स्थितींत जिने माझा संभाळ केला, जेवूंन्हाऊं घातलें, तीच माझी आई आणि अधिष्ठात्री देवता खरी ! मीं दत्तक होऊन या संस्थानाचा धनी झालों त्याच्या आदल्या दिवशीं, तिचें अंतःकरण भावनेनें इतकें कांही उचंबळून गेलें होतें कीं सारी रात्र ती देवा-पुढे बसून भजन करीत होती. अशी आनंदानें स्फुंदत होती आणि माझें नशीब उगवलें म्हणून आनंदाने अशी हंसत होती, कीं मी तिच्यापासून कायमचा दूर जाणार म्हणून दुःखाने रडत होती, हेंच कळेना ! मनोहर, त्या माउलीचे उपकार मीं कसे फेडूं ? माझें भाग्य फुलाफळाला आलेलें पाहावयाला ती कां बरें जगली नाही ? राजपदावर येऊन मीं तिचा त्याग केला म्हणून ती माझ्यावर रुसून तिने माझा त्याग केला का रे ? तिनें माझ्यावर असें प्रेम करावें याला ईश्वरी सूत्राशिवाय काय बरें कारण असावें ? ती आज जिवंत असती तर, तिला मीं खास तिच्याकरिता लहानसें देऊळ बांधून दिलें असतें, फुलबाग लावून दिली असती, पुराण–पोथीची व्यवस्था करून दिली असती, आणि रोज तिच्या पायावर फूल वाहून मग भोजन केलें असतें. पण ती गेल्यावर तूं तरी हाताला लागलास त्या तुला मी आता सोडीन असें कां वाटतें ? तें कांही नाही. तुला यापुढे नवलपुरांतच राहिलें पाहिजे. अगदी माझ्याजवळ. तुझें तरी तुझ्या गांवीं काय ठेवलें आहे ? आणि तुला त्या कुग्रामवस्तींत मुळींच करमायचें नाही. बरें, मुंबईसारख्या शहरीं राहून तरी एखादा दवाखानाच काढणारना ? मग तो इथेच कां काढीनास ? मी त्याची इथे सगळी तजवीज करून देतों. तुला पोटाकरिता धंदा करण्याचें कारण

नाही. लहानपणीं जशी एकच भाकरी आपल्या आईच्या हातची घेऊन मोडून तूं मी दोघांनीं मिळून खाल्ली तशीच आताहि खाऊं. परोपकाराचें म्हणशील तर मुंबईच्या लोकांना औषधोपचार केल्यांतच परोपकार आहे असें नाही. बाहेरगांवींदेखील दुःखितांना सुखी केल्यापासून तेंच पुण्य लाभेल. बरें, प्रत्यक्ष माझा प्रायव्हेट सेक्रेटरी व्हावयाचें कोणत्याहि कारणाने तुला आवडत नसेल तर नसो. पण खासगी सल्लामसलत देण्याचें जें काम तें स्वतंत्र लौकिकवान स्नेही डाक्तर म्हणून तुला अधिक चांगलें करतां येईल! मग काय, आहे कबूल? बोल, म्हणजे उद्यापासून वाड्याजवळच पण तुझ्या स्वतंत्र बिऱ्हाडाची सोय करून देतों."

अशा रीतीनें जुन्या प्रेमळ आठवणी आळवून, व्यवहाराच्या शंका स्वतःच उत्पन्न करून त्यांचीं उत्तरें मनोहराकरिता नवलरायाने स्वतःच दिल्यावर मग मनोहर तरी काय बोलणार? अशा अस्सल जातिवंत प्रेमाचा पाश मनोहराला तरी तोडावासा कां वाटेल? शेवटीं मनोहराने रुकार दिल्यावर, हा प्रश्न समाधानकारक रीतीने सुटल्याची खूण म्हणून, नवल-रायाने मनोहराला पुनः एकदा कडकडून आलिंगन दिलें. आणि दुसऱ्या दिवसापासून मनोहर स्वतंत्र डाक्तर व नवलरायाचा खासगी सल्लागार व हवा तेव्हा प्रायव्हेट सेक्रेटरी, या नात्याने नवलपूरचा कायम रहिवासी बनला.

या जगांत मित्रलाभ हा कोणाहि मनुष्याला खराच मोठा लाभ होय. पण त्या लाभाची किंमत सामान्य मनुष्यापेक्षा राजे लोकांनाच अधिक पटणारी आहे. मित्राची व्याख्या एका सुभाषितांत अशी केलेली आहे—

'ददाति प्रतिगृह्णाति, गूढमाख्याति पृच्छति
भुंक्ते भोजयते चैव षड्विधं मित्रलक्षणं'

पण या सहांपैकीं किती लक्षणें राजमित्राचीं असूं शकतील? तो राजापासून वाटेल तें घेईल किंवा लुबाडीलहि. पण जो स्वतः राजा नाही असा राजमित्र आपल्या मित्रराजाला काय देणार? राजा हा लोकांना आपल्या पंक्तीला रोज जेवावयाला कसा घेणार? आणि घेईल तेव्हाहि त्याच्या आणि इतर लोकांच्या मानमरातबांतलें अंतर न लोपूं देण्याची खबरदारी राजाच्या अभिमानाने त्याचे लोभी परिचारक घेतात.

मग स्वतः राजाची इच्छा नसेना का ! बरें, राजाच्या पंक्तीला जेवणारे लोक राजाला आपल्या घरीं आपल्या पंक्तीला कसे बोलावणार ? राजाचा मान-मरातब आपल्या घरीं कसा राहील, त्यांत चूकबीक कांही होईल का, या काळजींतच बोलावणारा चूर असतो. जुन्या काळीं राजा कोणाच्या घरीं जेवावयाला जावयाचा झाला तर स्वयंपाकी, वाढपे, आश्रित हे सगळे खास राजाच्या पदरचे तेथे आगाऊ जात. याचें बाहेरचें दिखाऊ कारण राजाची रोज सेवा करणाराशिवाय इतरांच्या हातून ती बिनचूक होऊं शकत नाही हें असलें, तरी अंतस्स्थ कारण राजाला विषप्रयोगादिकांची बाधा होऊं नये हेंच होय असें जुने लोक सांगतात. आणि बोलावणारालाहि तें बरेंच वाटतें. कारण आपल्या घरीं राजाच्या जेवणांत कांही विषारी किंवा विकारी पदार्थ गेला, तर ती गोष्ट चुकून झाली असें न म्हणतां लोक ती जाणूनबुजून केली असाच संशय घ्यावयाचे ! आता शेवटीं उरलें मित्रलक्षण. मित्राला विश्वासांत घेऊन गुप्त गोष्टी ऐकण्या-सांगण्याचें. पण राजासंबंधाने ही गोष्टदेखील अडचणीचीच ठरते. राजाने आपल्या विश्वासांत इतरांना घेण्यांत त्याला धोका असतो. कारण त्या विश्वासाचा प्रायः दुरुपयोग होतो. उलट राजाला आपल्या विश्वासांत घेण्यासारखें सामान्य माणसाजवळ काय असणार ? आता मनुष्यस्वभावाप्रमाणे राजालाहि आपल्या विश्वासांत कोणी असल्याशिवाय बरें वाटत नाही. म्हणून तो कोणाला विश्वासांत घेतो. पण ते घरचे नोकर लोक, तोंडपुजे, हांजी-हांजीखोर, खुषमस्करे असेच असतात. किंवा राजा व्यसनी असला तर अशा लोकांशिवाय त्याचीं इष्ट कार्यें घडूं शकत नाहीत म्हणून त्यांच्याशिवाय त्याला गतिच नसते. "भूप सखा भूपाचा धनिकाचा धनिक चोर चोराचा" अशा मित्रांच्या जोड्या कवि मोरोपंताने लावल्या आहेत खऱ्या. पण एका राजाला दुसरा राजा नित्याचा मित्र म्हणून कसा लाभणार ? दोघांना आपापल्या राज्यांचें बंधन सारखेंच असतें.

महाराज नवलराय यांचे आतापर्यंतचे दिवस राजकुमार कॉलेजांत व परदेशच्या प्रवासांत गेले असल्यामुळे, खऱ्या व योग्य मित्राची गरज भासण्यासारखी जबाबदारी त्यांच्या अंगावर अद्यापि पडली नव्हती. कारण कॉलेजांत जबाबदारी कसली ? अभ्यास करावा, त्याला खास ट्यूटर असतो. आणि क्रीडां-

गणावर खेळणें हाच काय तो महत्त्वाचा विषय! महाराज परदेशच्या प्रवासाला गेले ते अगदी एकटे. तशी त्यांनी मुद्दाम परवानगीच मागितली होती व ती त्यांना देण्यांत आली होती. आणि परदेशांतहि एकाच ठिकाणीं फार दिवस न राहिल्याने, व त्यांची वृत्ति हिंडणें फिरणें पाहणें या सर्व गोष्टी स्वतंत्रपणें करण्याची असल्यामुळे, त्यांनी तिकडेहि कोणाला जवळ केलें नव्हतें. परत येऊन नवलपुरास स्थिर झाल्यावर आणि मुखत्यारी मिळाल्यावर त्यांना मित्रसंगतीची गरज भासूं लागली; ती भासूं लागली त्याच वेळीं मनोहर परदेशाहून आल्यामुळे महाराजांना अतिशय आनंद झाला; आणि असा सख्ख्या भावासारखा मिळालेला मित्र हातचा जाऊं नये म्हणून त्यांनी त्याला, पूर्वी सांगितल्याप्रमाणे, नवलपुरांत आपल्याजवळ कायमचें ठेवून घेतलें.

---

## प्रकरण चवथें

# टपालवाला कीं गुप्त पोलीस ?

नवलपूर शहरच्या मुख्य रस्त्याच्या मध्यभागीं एका दुचौकी दुमजली वाड्यांत भाऊसाहेब डबीर राहत. वाडा अगदीं पेटीसारखा बंदिस्त होता. पुढचा दरवाजा एकदा लावून घेतला कीं मग पहारी चालवून कोणी भिंतीच पाडील तेव्हा घरांत प्रवेश होईल. दिवसांदखील सबंध दरवाजा कधीं उघडा नसावयाचा. एका टेंगण्या दिंडींतून प्रवेश. आंत जाता येता मान लवविलीच पाहिजे आणि कंबर दुमडलीच पाहिजे. पण आंत गेल्यावर मात्र मन प्रसन्न होऊन दिंडीप्रवेशाचा शीण जाई. कारण जिकडे पाहावें तिकडे स्वच्छता व टापटीप हीं मूर्तिमंत दिसत. प्रत्येक दगड गुळगुळीत आणि लाकडाचा तुकडा तुळतुळीत. जसा कांही आताच कोणी तरी फडक्याने पुसून घेतला आहे! चौकाच्या प्रत्येक खणांत एकेक तारेची कुंडी लोंबकळत असून तिच्यांत निरनिराळ्या फुलांचा एकेक वेल लावून सोडला होता. चौकांत प्रवेश केल्याबरोबर समोरच दोन मोठ्या तसबिरी टांगलेल्या दिसत. पैकीं एक इंग्लडच्या विद्यमान राजेबादशहांची, व तिच्या जोडीला नवलपूर संस्थानचे माजी अधिपति राजेसाहेब यांची. तसेंच डोळ्यांना प्रमुखपणें दिसणारी दुसरी गोष्ट म्हणजे कोपऱ्यांत टांगलेली जुन्या काळची पालखी, अबदागिरी, तलवार व बंदुक. वैभवाचीं हीं चिन्हें पाहणाराला नव्याजुन्या काळांची आठवण एकदम होऊन दैवलीलेची कल्पना मनांत चमकून जाई.

सकाळचे आठ वाजले होते. भाऊसाहेब डबीर हे नित्यनियमाप्रमाणें स्नान–संध्या आटोपून, अंगावर शालजोडी घेऊन, माडीच्या दिवाणखान्यांत लोढाला टेकून गादीवर बसले होते. त्यांनी घड्याळाकडे पाहिलें, डोळ्यांना चाळशी चढविली, तोंडांत चिरूट धरून काडी ओढली. इकडे-तिकडे नजर फेकून कोणी दिसत नाही असें पाहून ते थोडे चकित झाले. कारण यावेळीं त्यांचा गडी दौलती, गादीवर टपालाचे कागद ठेवून, बाजूला मारुतीराया-

प्रमाणें धन्याच्या आज्ञेची वाट पाहात कोपऱ्यांत उभा असावयाचा. पण आज टपालाचे कागद गादीवर नाहीत आणि दौलतीहि .कोपऱ्यांत उभा नाही. तेव्हा क्षणभर थांबून उंच आवाज करून भाऊसाहेबांनी गड्याला हाका मारण्याला सुरुवात केली.

भा.—" दौलती, ए दौलती, दौल्या, अरे लेका कान फुटले की काय? मी इकडे घसा फोडून ओरडतों आणि तूं तिकडे करतोस तरी काय! "

तिसऱ्या हाकेबरोबर दौलती वर आला व हात जोडून कोपऱ्यांत उभा राहिला. त्याला पाहतांच भाऊसाहेब स्वर किंचित् उतरवून तरी पण मोठ्यानेच म्हणाले

भा.—" दौलती "!

दौ.—" जी "

भा.—" अरे, नुसतें जी काय? तूं काय करीत होतास?"

दौ.—" पलीकडच्या दालनांतल्या खुर्च्या पुशीत होतों धनिसाब "!

भा.—" खुर्च्या पुसायला तुला हीच वेळ होती वाटतें. घड्याळाकडे पहा अन् सांग बरें किती वाजले ते ? "

दौ.—" आठ वाजले जणुं "

भा.—" आणि त्याच्यावर सबंध सात मिनिटें झालीं तीं दिसत नाहीत वाटतें तुला ? "

दौ.—" व्हय धनी साब. मला काय कळतया गरिबाला घड्याळ ! पण व्हय, जरा वखुत झाला जगूं. "

भा.—" काय पहा ! हा आपला खुशाल होय म्हणतो ! अरे, मी म्हटलें आठ वाजून आगखी सात मिनिटें वर झालीं तेव्हा आजचीं ताजीं पत्रें आणि वर्तमानपत्रें कोठें आहेत ? "

दौ.—" वरतमान पतर व्हय! टपाल न्हाइकी आल अजून धनीसाब."

भा.—" काय करावें या शिंचाला ! अरे पत्रें आलीं नाहीत तेव्हा टपाल आलें नाही हें कळलें. पण टपाल कां नाही आलें ? "

दौ.—" त्ये मला काय ठाव धनीसाब ? "

**भा.**—“ मग तुला नाही तर काय गांवच्या पाटलाला विचारूं होय ! जा जा चौकांत आधी, आणि पहा फिरून टपाल आलें कीं नाही तें. वेळेची कुणाला म्हणून किंमत असेल तर शपथ—”

‘ जा ’ या शब्दाबरोबर दौलती आधीच निघून गेला होता. पण भाऊसाहेबांचें भाषण कांही त्याला उद्देशून कांही आत्मगत असें पुढेंहि सुरूच होतें.

**भा.**—“ काय म्हणे इंग्रजी राज्य म्हणजे अगदीं वक्तशीरपणाचा नमुना ! होय ना ! घ्या म्हणावें नमुना ! दहा मिनिटें म्हणजे कांहीच उशीर नाही वाटतें, टपालाला ! उगाच यांच्या बढाया. जुन्या काळीं असाच बेतालपणा होता. पण फुकाची ऐट तरी मिरवीत नव्हते ! ” इत्यादि.

भाऊसाहेबांचें आत्मगत भाषण कांही वेळ असेंच चालू होतें. त्यांच्या वेळापत्रकांत यावेळीं टपालचीं पत्रें व वर्तमानपत्रें वाचणें याशिवाय दुसरें कलमच नव्हतें. तेव्हा ते तरी या रिकाम्या वेळाचें दुसरें काय करतील ? पण पाण्याच्या प्रवाहाला एखादा खडक आडवा आला म्हणजे तें आपोआप वेगळें वळण घेतें. त्याप्रमाणे भाऊसाहेबांच्या आत्मगत भाषणाची गोष्ट झाली.

खालून ‘ सुभेदार भेटायला आले आहेत ’ अशी वर वर्दी आली. तिच्या मागोमाग “ भाऊसाहेब आहेत का माडीवर ! म्हटलें मी येऊं का वर” ! अशी मोठ्या मऊ अदबशीर हेल काढलेल्या शब्दांनी स्वतः सुभेदारांनी मारलेली हाक ऐकू आली. आणि हाकेपाठोपाठ, उलट उत्तराची किंवा परवानगीची वाट न पाहता, स्वतः सुभेदारच वर आले. अर्थात् भाऊसाहेबांना त्यांना ‘ या बसा ’ म्हणणें प्राप्तच झालें. त्यांनी पत्रें व वर्तमानपत्रें यांची आशा सोडून देऊन चाळशी काढून ठेवली. आत्मगत भाषणाच्या जागीं संभाषण सुरू झालें. पण सुभेदारांना भाऊसाहेबांच्या वेळापत्रकाची माहिती असल्यामुळे, भाषणाला प्रारंभ करण्याला कांही तरी निमित्त लागतें म्हणून टपालाचाच प्रश्न सहजासहजीं त्यांनी काढला. यामुळे भाऊसाहेबांच्या विचारप्रवाहाला फिरून पूर्वीचेंच वळण प्राप्त झालें.

सु.—" म्हटलें, आज स्वारी निवांतशी दिसते आहे ! अजून टपाल नाही वाटतें आलें ! "



कांही कांही भाविक कर्मठ लोकांची रीत अशी असते कीं, स्तोत्रपाठ म्हणतांना कांही व्यत्यय आला तर खंड पडलेलें स्तोत्र ते पुन: पहिल्यापासून म्हणूं लागतात. भाऊसाहेबांनी फिरून टपाल खात्या-च्या अवक्तशीरपणाला शिव्या देण्याला सुरुवात केली.

भा.—" हें पहा सुभेदार, या दिवसांत ताळतंत्र म्हणून कशाला राहिलाच नाही. आठाचे सव्वाआठ झाले ! इतका वेळ लागावा ही काय टपालाची रीत झाली ! "

सु.—" कसली रीत आणि काय ! टपालाचा शिपाई खांद्यावर पिशवी टाकून निघाला असेल मगाशींच. पण वाटेंत बसला असेल कुणाशीं तरी बोलत. त्या लेकाला काय ! उशीर झाल्याने इकडे टिपणबाज वक्तशीर वाग-णाऱ्या लोकांचीं तंत्रें बिघडतात त्याचें ! कुत्रें काशीला निघालें पण पोचतय कुठें ! वाटेंत भेटेल त्या कुत्र्याच्या तोंडाशीं तोंड दे, दिसेल त्या चांगल्याशा दगडावर लघुशंका कर ! असे हे आमचे टपालचे शिपाई. मीं तर म्हणतों कीं,

पिकांत कुळवाला जुंपलेल्या, किंवा खळ्यावर कणसें तुडवायला लावलेल्या, बैलाच्या तोंडाला जसें मुसकें घालतात, तसें या टपालवाल्या शिपायांच्या तोंडाला टपालखात्याच्या साहेबानें मुसकें घातलें पाहिजे. किंवा मीं सांगतों, भाऊसाहेब, पोष्टाच्या शिपायाचाहि कांही दोष नसेल बिचाऱ्याचा यांत. अहो ! पोष्टमास्तर तरी लेकाचे काय कमी ! बाहेर टपालाचीं पोतीं येऊन पडलीं यांच्या उरावर तरी यांचें माजघरांतलें काम संपायला पाहिजे ना ! त्यांची चहा ढोसायची वेळ, रडक्या मुलांना खेळवायची वेळ, लाडक्या बायकांशीं गुलगुल गोष्टी बोलण्याची वेळ हीच असते. आंत बिऱ्हाड आणि बाहेर हफीस अशी जोड सोय म्हणून टपालखातें आपणांकडून करतें, त्यानेंच खरोखर तुमच्या आमच्या सारख्यांची गैरसोय होते."

फिरून घड्याळाकडे नजर टाकून भाऊसाहेब म्हणाले, "अहो सुभेदार, तसेंहि नसेल. मी सांगतों. आठ वाजून सतरा मिनिटें झालीं. आज टपालाच्या शिपायाचा दोष नाही, पोष्टमास्तराचा दोष नाही, पण कांही तरी अपघात झाला आहे खास. मग वाटेंत टपालाची मोटार उलथली असो, कीं टपालावर दरोडा पडला असो, कीं आगगाडीची टक्कर झाली असो. पण प्रकरण कांही सामान्य नाही. आज कांही तरी वेगळें आहे खास. आणि सुभेदार, तुम्हांला सांगतों कीं, चहूकडेच हा असा बेसुमारपणा वाढला आहे अलीकडे. दिवस सुनका कसा तो जातच नाही. जें वर्तमानपत्र उघडावें त्यांतहि आपलें कांहीना कांही अघटितच वाचायला सांपडतें. या जगाचें काय होणार आहे कांही कळत नाही."

सु.—"पण मला वाटतें—माझी आपली पोरबुद्धि म्हणा हवी तर—वर्तमानपत्रेंच वाचावयाचें सोडून दिलें तर बरें नाही का होणार कुणाचेंहि!"

भा.—"छेः छेः असें करून कसें चालेल !"

सु.—"माझेंच पाहाना. माझ्या वहींत वर्तमानपत्राच्या खातीं एक पै कधीं खर्ची पडत असेल तर शपथ."

भा.—"स्वतःचे पैसे खर्च केले तरच वर्तमानपत्रें वाचावीं असें शास्त्र थोडेंच आहे ! कोणी आपण विकत घेतलीं नाही तर भिकेच्या हक्कानें निर्लज्जपणानें दुसऱ्याच्या घरचीं गोळा करून नेतो. मिळून एकच."

भाऊसाहेब बोलले सहज! पण लोकांचीं वर्तमानपत्रें दडपून गोळा करून नेऊन फुकट वाचावयाची सवय स्वतः सुभेदारांनाच होती. म्हणून भाऊसाहेबांचें बोलणें सुभेदारांच्या मर्मीच लागलें थोडेसें. पण तो कसला बस्ताद गडी, निधड्या छातीचा! तो बाजू अशी अंगावर घेतो?

सु.—"वाचलींच तर वर्तमानपत्रें फुकट वाचावीं हें तर माझें तत्त्वच ठरून गेलें आहे. वर्तमानपत्रें वाचणें हें कीं नाही एक प्रकारचें व्यसन आहे."

पण हें बोलणें भाऊसाहेबांना झोंबेल असें लक्षांत येऊन लगेच जीभ चावून सुभेदार म्हणाले—"आपणासारख्या विद्वान लोकांचें तें एक प्रकारचें व्यसनच आहे. पण व्यसन परस्पर बिन खर्चीं भागेल तितक्या-पुरतें तें ठेवलें म्हणजे बेतांत तरी राहतें. असें आपलें आमच्या सारखे लोक पाहतात! बोलून चालून रोग, म्हणजे काय, हृद्रोग. मग तो विकत तरी कां घ्या? आपणच आता म्हटलें ना? कीं जें वर्तमानपत्र उघडावें त्यांत कांही तरी अघटित अनर्थच वाचायला सांपडतो म्हणून?"

भा.—"होय. तें खरें. पण वर्तमानपत्रें आपण न वाचलीं, किंवा वर्तमानपत्रांनी अनर्थाच्या बातम्या न देण्याचें ठरविलें, तरी अनर्थ चालले आहेत ते तरी होतातच ना? ते कुठे राहिले आहेत व्हावयाचे? म्हणून वर्त-मानपत्रांत ते वाचले म्हणजे आपण जगाबरोबर चाललों आहों थोडे असें तरी वाटतें. जगांत अनर्थ काय थोडे आहेत? कुठे आग, कुठे धरणीकंप, कुठे महापूर–" सुभेदारांनी आपली नांव हळूच या पुरांत ढकलली.

सु.—"कुठे एखादा खून, एखादा दरोडा"

भा.—"कुठे आत्महत्या, कुठे घटस्फोट"

सु.—"कुठे बंड, कुठे राज्यक्रांती—हें चाललेंच आहे. पण मला वाटतें भाऊसाहेब, आमच्यासारख्या मध्यम वयाच्या लोकांना मनाचे हे आघात एकवेळ सोसवतील. मात्र आपण तरी या वयांत ते सोशीत जाऊं नये. आपलें आता झालें पुरें वय. आता आपण आपल्यापुरतें पाहायला पाहिजे. आणि जगाची काळजी करण्याचें सोडून दिलें पाहिजे, असें मी तरी निदान म्हणतों."

पोटांत शिरून काढलेल्या सुभेदारांच्या या उद्गारांनी भाऊसाहेबांच्या

मनावर थोडासा परिणाम झाला. आचळाला हात लावला म्हणजे गाय जशी पान्हवते त्याप्रमाणें, कांही लोक ममतेच्या भाषणांनी पान्हवतात. पण कांही गाई पान्हवल्या तरी तहान भागण्याइतकें दूध देत नाहीत. फक्त हाताला ओलावा लावून दुधाची आशा उत्पन्न करतात, व पुढे ती निष्फळ करतात, हा अनुभव सुभेदारांना लवकरच आला.

भाऊसाहेब म्हणाले—"मीं जगाची काळजी करून काय होणार ? ज्यानें जग निर्माण केलें तोच त्याची काळजी करणार ! आणि जगाचीच काय पण माझी मी काळजी केली तरी माझ्या हातीं काय आहे ! सांगाना बरें ! माझ्या हातीं असतें तर असें कां झालें असतें ?

सु.—'हूं.-ऊं-' सुभेदारांनी एकदम पडका चेहरा करून वर आकाशाकडे पाहून एक मिनिटभर ओसरावयाला लागेल इतका दीर्घ सुसकारा टाकून दुःखप्रदर्शन केलें. उपरण्याचें टोक घेऊन आपले डोळेहि पुसले. डोळ्यांतून पाणी कांही निघालें नाही. पण डोळ्यांत घातलेल्या गहिऱ्या सुरम्याची एक रेघ उपरण्यावर उमटून निघाली ! सुभेदार आपला दीर्घ सुसकारा बोलका करण्याकरितां म्हणाले—

"मनुष्याच्या हातीं फारसें नाही खरें. पण आहे तितकें तरी करावयाला पाहिजे ना ? भाऊसाहेब, आपला कर्तासवरता बरोबरीचा मुलगा बाळ प्रभाकर घरीं असता तर आपल्याला कशाला घरची काळजी करावयाला लागली असती ! पण दैव देतें आणि कर्म नेतें म्हणतात तेंच खरें !

भा.—"दैव असो नाहीतर कर्म असो. मला तर तो मेला असें समजूनच आतां चालणें प्राप्त आहे, नव्हे काय ! "

सु.—"हो हो. आणि तो मेला असें समजून पुढची व्यवस्था करणेंहि प्राप्तच आहे."

भा.—"व्यवस्था ती काय करायची आहे म्हणा ! "

सु.—"असें कसें बरें बोलतां भाऊसाहेब ? या संस्थानाबरोबरच आपली तैनातहि उत्पन्न झाली. ती गमावून कसें चालेल ? आणि ती राखावयाची तर आपलें नांव पुढे चाललें पाहिजे. आणि नांव पुढे चालायचें तर पुरुष संतान पाहिजे. आणि औरस नसेल तर दत्तक घेतला पाहिजे.

खासगी संसार वहिनीसाहेब चालवायला समर्थ आहेत; पण दुर्दैवाने स्त्रियांकडे तैनात चालत नाही! नोकरी पुरुषच करणार. त्याला काय करावें? संस्थानांतून दिवस मोठे कठिण येत चालले. मागच्या महाराजांपर्यंत तैनाती कशा तरी टिकल्या. पण आता नवे संस्थानिक गादीवर---"

भा.—"मग ते गादीवर आले म्हणून काय होईल ?"

सु.—"वा! आपण ऐकलें नाही वाटतें कीं दत्तक संस्था बुडविण्याचा त्यांचा विचार आहे? अहो, ते सुधारक आहेत!"

भा.—"पण ते स्वतःच दत्तक आहेत त्याची वाट?"

सु.—"कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ म्हणतात तो हा असाच! स्वतः दत्तक असणारानेच दत्तकसंस्था बुडविली नाही तर मग मौज ती काय? पण त्यांचें स्वतःचें दत्तविधान सशास्त्र होतें कोठे? सरकाराने अधिराजाचा अधिकार चालवून आधी त्यांना गादीवर बसविलें. आणि मग जुन्या राणी-साहेबांच्या भोळ्या समजुतीखातर त्यांना आपलें उगीच नांवाला मांडीवर दिलें! असो; पण त्यांचें कसें कां असेना, भाऊसाहेब, कृपा करा आणि घरचें दत्तविधान एकदाचें उरकून टाका कसें? तुम्हांला तुमच्या घराण्याची काळजी नसली तरी इतरांच्या घराण्यांची काळजी करा. तैनात बुडाल्याचा दाखला पडूं देऊं नका. म्हातारी मेल्याचें दुःख नाही पण काळ सोकावतो. तैनाती-ची ही गोष्ट झाली. पण आपणाला आपल्या पिंडोदकक्रियेची तरी कांहीं तजवीज करायाला नको का? आपण धर्मनिष्ठ आहां, श्रद्धाळू आहां. निपुत्रि-काला नरकवास घडतो ही गोष्ट मी आपल्याला सांगायला पाहिजे असें नाही. आपण दत्तक घेण्याने स्वार्थ-परार्थ-परमार्थ सर्व कांही गोष्टी साधणाऱ्या आहेत."

भा.—"पण मी दत्तक घेतला तर तैनात चालू होईलच कशावरून?"

सु.—"त्याचा सगळा बंदोबस्त आहे. आपण काडीचीहि काळजी करूं नका. दिवाणसाहेब तैनात चालू करण्याच्या हुकुमावर सही करायला हातांत लेखणी घेऊन बसले आहेत. दत्तविधान होऊन आपला अर्ज जायचा अवकाश कीं, हुकुमावर सही झालीच म्हणून समजा. आपल्या तैनातींची आपणापेक्षा दिवाणसाहेबांना अधिक काळजी वाटते. ते पडले मुत्सद्दी.

प्रजेच्या कल्याणाच्या दृष्टीनें त्यांना दूरवर पाहावें लागतें."

भा.—"पण मी दत्तविधान करायचें मनांत आणलें तरी मुलगा ताबडतोब मिळाला पाहिजेना ! आणि मुहूर्त !

सु.—मुहूर्त मी पाहून ठेवला आहे. कारण यजमानसाहेबांना पक्की मुखत्यारी मिळण्याच्या आधी हा बार उडाला पाहिजे असें दिवाणसाहेबांनी मला चार चार वेळ बजावून आपणाला मुद्दाम कळवायला सांगितलें आहे. मुलगा आपण वाटेल तो पसंत करा. गोत्रांतला कुळांतला असला तर चांगलें हें तर शास्त्रानेंच सांगितलें आहे. आम्ही व आपण एकाच शाखेचे डबीर ऊर्फ सुभेदार! मुलगा माझ्या बाजीरावासारखा लहान वयाचा असावा हें सांगायलाच नको.

सुभेदार अशा रीतीनें खळ पडूं न देतां बोलत होते. बिचाऱ्या भाऊसाहेबांना मधून मधून हुंकार देण्यापलीकडे वावच उरत नव्हता. पण अखेर त्यांची सोडवणूक अकल्पित रीतीनें झाली. कारण दौलती टपाल घेऊन वर आला आणि टपाल दिसतांच इतर सर्व विषय भाऊसाहेब विसरून जात. दौलतीनें पुढे केलेलें टपाल त्यांनी उतावळेपणानें हातांत घेतलें; पण पत्रांवरचीं पाकिटें आणि वर्तमानपत्रावरच्या पत्त्यांच्या चिठ्या फाडण्याला थोडासा वेळ लागला तेवढ्यांत त्यांनी टपालखात्याची पुन्हा हजेरी घेतली.

भा.—"कोण अवक्तशीरपणा हा. काय रे दौलती ! काय म्हणाला टपालचा शिपाई? इतका उशीर कां झाला कांही बोलला का? टपालच्या आगगाडीला अपघात झाला असेल असें मला वाटलें तें खरें का?"

दौ.—"टपाल येळवरच आल म्हण. पण टपालवाल्याची अन् माझी जरा वाईच चुकामुक झाली धनीसाब. मी त्येला चौकांत पगत व्हतों तवर त्यो इकडच टपाल वाटायाला निघाला बी व्हता. आपल्या मागच्या गल्लीन जातांना त्येन आमच्या बाईसाहेबास्नी त्येंच पत्र दिल, आन् असा पुढच्या रस्त्याला आला तवर मी गांठलच त्येला आन् आणलं ह्ये टपाल."

हे शब्द ऐकून भाऊसाहेब जवळ जवळ दचकण्याइतके आश्चर्यचकित झाले ! टपाल फोडून पत्रांच्या घड्या उकलण्यांत गुंतलेला त्यांचा हात

क्षणभर स्तब्ध झाला; व ते दौलतीच्या तोंडाकडे टक लावून भिवया चढवून बसले. त्यांच्या तोंडून क्षणभर एक शब्दहि निघेना. पण शेवटीं चिकित्सेने आश्चर्याला जिंकले. ते म्हणाले—

भा.—"काय म्हणालास दौलती! मागच्या गल्लीने येऊन टपालवाल्याने कुणाला पत्र दिलें!"

दौ.—"बाइसाबासनी धनीसाब!"

भा.—काय म्हणतोस? आमच्या घरीं! आमच्या हिला! आमच्या हिला पत्र दिलें! टपालवाल्याने दिलें! मागच्या गल्लीने आणून दिलें!"

दौ.—"व्हय, अशी खर धनीसाब."

हें ऐकतांच भाऊसाहेबांचा चेहरा किंचित् लाल झाला. भुवया वर चढलेल्याच होत्या. पण दृष्टि अधिक एकाग्र झाली. सुभेदारांच्या मार्गांत हें अवचित विघ्न आलें. म्हणून पुनः घडी बसविण्याच्या हेतूने त्यांनी मध्ये तोंड घातलें. दौलतीने सांगितलेल्या हकीकतीनें त्यांनाहि आश्चर्य वाटलेंच होतें, व एक प्रकारची कुत्सित विचारसरणी त्यांच्या मनांत सुरू झाली होती. पण संभावितीचा झोक आणून ते म्हणाले—

"असें केव्हा केव्हा होतच असतें. टपालवाला बिचारा कोणीकडून तरी आपली सोय पाहतो. चार पावलें चालायचें कमी पडलें तर तितकेंच सही. मागची गल्ली काय पुढचा रस्ता काय? आणि ज्याचें नांव पत्राच्या पाकीटावर असेल त्यालाच जातीने पत्र द्यावें अशी टपालवाल्यांना साधारण नेहमीची सूचनाच असते म्हणे त्यांच्या वरिष्ठाकडून."

भा.—"बायकामाणसाच्या नांवचीं पत्रें असलीं तरी घरच्या पुरुषांच्या टपालाबरोबर द्यायला काय हरकत? कुणी त्यांचीं पत्रें चोरतो कीं काय? म्हणे वरिष्ठांची सूचनाच असते! टपालच्या हपीसांत पत्रें असतात तोंपर्यंत वरिष्ठांचा अंमल. पण लोकांच्या घरीं कोण चालूं देईल? घरीं पुरुषच वरिष्ठ, सगळ्या कारभाराचे. घरीं पुरुषांचीच सत्ता. लुच्चा लेकाचा टपालवाला! पाय मोडले असते जसे कांही त्याचे, पुढच्या दाराने टपाल वांटलें असतें तर! पण कुणी सांगावें त्याच्याचकडे सगळा दोष आहे म्हणून!"

झालें. सुभेदारांचा सामोपचार फुकट गेला. उघडलेलीं पत्रें

वाचण्याकडेहि भाऊसाहेबांचें लक्ष रागामुळे लागेना. मग सुभेदारांनी काढले-ल्या दत्तकाच्या आगांतुक विषयाकडे कसें लागणार? ते पत्रें व वर्तमानपत्रें उगीच उलथीं-पालथीं करूं लागले. सुभेदारांनी आता निघून जावें अशा अर्थाची ती त्यांना एक प्रकारची सूचनाच होती; पण अशा नाजुक खुणेवरून बोध घेणारे ते गृहस्थ नव्हते. त्यांनी पुनः एकवार लगट करून पाहिली. ते म्हणाले—

सु.—“ मग मघाशीं सांगितलेल्या दत्तकाचें काय करावयाचें ? मुलगे शोधावयाच्या कामीं मी आपणाला मदत करतों. पण मुहूर्त कांही-केल्या टाळावयाचा नाही. शोध केला तर मुलगा मिळणारच नाही असें नाही. पण दुसरा नच मिळाला तर मी पोटचा गोळा द्यायला तयार आहें. माझा बाजीराव आहे आपला गरीबाच्याच पोटीं आलेला, एकुलता एक. आणि ईश्वराच्या दयेने त्याला माझ्या घरीं कांही कमी नाही. तरी कुळाचें नांव राखायला हवें असेल, आपला डबीर-सुभेदार घराण्याचा वंश चालवायचा असेल, तैनात राखायची असेल, तर त्या पोराला आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या ओटींत घालायला हा सुभेदार कधींहि माघार घेणार नाही.”

सुभेदारांनी अशी ही चर्पटपंजरी आपणाकडून चालविली होती. पण भाऊसाहेबांचें तिकडे लक्षच नव्हतें. ते विचार करीत तोंडाने आपल्याशींच पुटपुटत होते. आणि हाताने कागदांची उलथापालथ करीत होते. इकडे सुभेदारांनी दत्तकाच्या गोष्टी चालविल्या होत्या, पण भाऊसाहेबांच्या डोळ्यांपुढे त्या टपालवाल्याचेंच चित्र अजून उभें होतें. इतक्यांत एक नवी कल्पना सुचल्यासारखें वाटून ते अर्धवट आपल्याशीं व अर्धवट सुभेदारांना उद्देशून म्हणाले—

भा.—“ सुभेदार, मला वाटतें तो टपालवाला नसून गुप्त पोलीस असावा—एरवी लोकांच्या घरच्या मागच्या दारांतून राबता ठेवण्याची बुद्धि त्याला कां व्हावी ? तोच तो गुप्त पोलीसच तो. पण—त्याच्या जवळ टपालचीं पत्रें कशीं यावीं ? मला वाटतें टपालवाल्यांनाच सरकार गुप्त पोलिसाचें काम सांगत असेल. होऊं नये तें प्रकरण माझ्या मुलाच्या हातून झालें खरें. पण त्याला आता किती तरी दिवस झाले ? असें असून हे गुप्त पोलीस माझ्या घराचा पिछा सोडीत नाहीत, काय करावें ! ”

सुभेदारांनी पुनः एक प्रयत्न करून पाहिला. ते म्हणाले, "छेः छेः, आपल्याला भलतीच शंका आली. तो गुप्तपोलीस खचित नव्हे, टपालवालाच असावा. त्यांत काय विशेष आहे!"

पण या आश्वासनाने भाऊसाहेबांच्या कल्पनातरंगांना फिरून पूर्वीचीच दिशा मिळाली. ते हातांतले कागदपत्र खाली ठेवून उभे राहिले आणि म्हणाले, "तर मग खाली जाऊन तिलाच पत्राबद्दल विचारावें म्हणजे खुलासा होईल."

झालें. भाऊसाहेब उठल्यावर सुभेदारांना बसून काय उपयोग! ते दत्तकासंबंधाने आणखी पुढे बोलणार तों भाऊसाहेबांनी त्यांना नमस्कार सुद्धा केला; व ते मागच्या माडीकडे जायला निघाले. तेव्हा सुभेदारांनीहि त्यांच्या मागोमाग पुढच्या माडीच्या जिन्याची वाट धरली.

प्रकरण पाचवें

# पत्राने उडविलेला गोंधळ

मागील प्रकरणांतल्या हकीकतीपूर्वी पांच दहा मिनिटें भागीरथीबाई ऊर्फ माईसाहेब या अंग धुऊन मागील दारीं तुळशीला प्रदक्षिणा घालीत होत्या. इतक्यांत भाऊसाहेबांच्या घराचें मागील दार कोणीसें ठोठावलें. या दाराने येजा सहसा नसे. म्हणून त्यांनी प्रथम तिकडे लक्षच दिलें नाही. गल्लींत खेळणाऱ्या एखाद्या मुलाने सहज गमतीने दारावर थाप मारली असेल असेंच त्यांना वाटलें. पण पुनः कोणी तरी दार ठोठावलें, इतकेंच नव्हे तर "दार उघडा दार" अशी मोठ्याने हाकहि मारली. तेव्हा माईसाहेबांनी प्रदक्षिणा थांबविली, व गोठ्याकडे कुणबीण काम करीत होती तिला हाक मारून त्या म्हणाल्या, "गहिने, बघ ग दार उघडून कोण हाका मारतें आहे तें." गहिनीने दार उघडलें तों टपालचा शिपाई आंत आला आणि म्हणाला, "माफ करा हां बाईसाहेब! मी मागच्या गल्लींतलीं पत्रें वांटीत चाललों होतों, त्यांत या घरच्या धनीणसाहेबांचें पत्र निघालें. तेव्हा म्हटलें इकडच्या इकडेच देऊन पुढे जावें. म्हणून सहज हाक मारून पाहिली. तों माझें कामच झालें! रावसाहेबांचींहि पत्रें आहेत. पण ही गल्ली संपवून पुढच्या तोंडाला गेलों म्हणजे तीं त्यांना देईनच. होता होईतों ज्याचें पत्र त्याच्याच हातीं द्यावें असा आम्हाला वरून हुकूम असतो. तसेंहि झालें आयतें. मी घेतों बरें दार ओढून जाताना! माफ करा." इतकें बोलून गहिनीच्या हातांत पत्र टाकून टपालवाला चटदिशीं दाराबाहेर पडला व त्याने दार लोटून घेतलें.

पण त्यामुळे गहिनीचे श्रम थोडेच वांचणार. कारण तिला दारापर्यंत जाऊनच कडी घालावी लागली. परत येऊन ती म्हणाली "कुठ ठेवू लखुटा बाईसाब?" माईसाहेबांनी खुणेने तुळशीकट्टयाचा कोपरा दाखविला तेथे तिने तें पत्र नीट ठेवलें; व उडून जाऊं नये याकरितां त्यावर

एक दगड ठेवला. माईसाहेबांच्या अजून दहा प्रदक्षणा पुऱ्या व्हावयाच्या होत्या म्हणून त्यांनी तें पत्र उचलून घेतलें नाही. पण त्यांना मनांतून त्या पत्राचें इतकें आश्चर्य वाटत होतें कीं, त्यांची प्रदक्षिणा त्या कोपऱ्यापर्यंत आली म्हणजे त्या निमिषार्ध थांबून त्याकडे पाहून मगच पुढे जात. प्रदक्षिणा पुऱ्या झाल्याबरोबर मात्र त्यांना राहवलें नाही. त्यांनी चटदिशीं सूर्याला अर्घ्य दिला, फूल वर उडविलें, आचमन करून डोळ्याला पाणी लावलें आणि गडबडीने पूजासाहित्य तबकांत भरून ठेवून आधी पत्र हातांत घेतलें. पत्ता वाचण्यांत त्यांचा थोडासा वेळ गेला. पण प्रत्यक्ष वस्तुज्ञानच जेथे होणारें तेथे तर्क कशाला ! असें वाटून त्यांनी उभ्या उभ्या पाकीट फोडलें आणि आतलें पत्र त्या वाचूं लागल्या. पहिल्या ओळीचा अर्थ नीट लागेना म्हणून त्यांनी पान उलटून पाहिलें. तेव्हा त्यांच्या सर्व अंगाला धक्का बसल्यासारखा झाला. मग फिरून आंतल्या आणखी दहा पाच ओळी त्यांनी वाचल्या. इतक्यांत भाऊसाहेबांचा आवाज ऐकलासा वाटून त्यांनी तें पत्र ओच्यांत दडविलें, आणि पूजेचें तबक व फुलपात्र घेऊन त्या तडक घरांत निघून गेल्या.

मागोमाग भाऊसाहेब परसांत आले. आधी त्यानी सैपाक घरांत माजघरांत कुटुंबाचा शोध केला होता; व तेथे त्या नाहीत असें पाहूनच ते इकडे आले. पण इतक्यांत माईसाहेब दुसऱ्या बाजूने आंत गेल्या ! अशी ही पाठशिवणी सुरू झाली. पण अखेर माईसाहेबांची पाठशिवण त्यांच्या खास बसावयाच्या खोलींत भाऊसाहेबांना पुरी करतां आली. एखाद्या गुप्त व आश्चर्यजनक गोष्टीचा स्फोट आपापसांत करावयाचा असतां कोणा दोघांची जी स्थिति होते, तीच भाऊसाहेब आणि माईसाहेब यांची झाली. भाऊसाहेब मनांतून रागावले होते, तरी पत्राबद्दलची माहिती युक्तीयुक्तीने काढून घेण्याची गरज म्हणून त्यांना गोडी–गुलाबीचा आव आणावयाचा होता. माईसाहेबांना आपण निरपराधी आहों अशी पक्की जाणीव होती; पण त्यांना कांही तरी गुपीत राखावयाचें होतें म्हणून कपटाचा शरमिंधेपणा त्यांच्या तोंडावर आला होता. भाऊसाहेब बायकोच्या बसावयाच्या खोलींत कधीं सहसा न यायचे ते आज आले. पण माईसाहेबांना त्यांना बसायला खुर्ची पुढे कर-

येना. कारण त्यांना बसवून घेण्याची इच्छाच त्यांच्या मनांत या वेळीं नव्हती. तेव्हा भाऊसाहेब आपण होऊनच खुर्ची पुढे ओढून बसले, व संभाषण सुरू झालें.

भाऊ.—" झाल्या का तुळशीप्रदक्षिणा पुऱ्या ? "

माई—" हो न व्हायला काय झालें ? "

भाऊ.—" नाही, म्हटलें, थोडें विघ्न मध्ये आले असावें असें वाटलें, म्हणून आपलें विचारलें झालें."

माई—" छेः, विघ्न कसलें ? आणि प्रदक्षिणा तरी काय अशा शेंपांचशें घालतें ? येऊन जाऊन पन्नास ! "

भाऊ.—" नाही म्हटलें, दौलती म्हणाला, टपालवाल्याने तुझ्या नांवचें एक पत्र आणून दिलें, म्हणून विचारलें. खरेंच का आलें आहे पत्र ! केव्हा आलें ? कुठून आलें ? कुणाकडून आलें आहे ? काय लिहिलें आहे त्यांत ! " प्रश्नांच्या या सरबत्तीने ती बिचारी खरोखरच गोंधळली. तिच्या तोंडून कोणतेंहि उत्तर म्हणून निघेना. भाऊसाहेबांनी योजलेला मायाळूपणाचा बेत-हि क्षणांतच फुकट गेला. ते एकदम रागावून म्हणाले—

" तूं बोलत नाहीस ! चमत्कार आहे ! मी भिंतीला का विचारतों आहें ! मी काय मूर्ख म्हणून विचारतों होय ? विचारल्याबद्दल फडाफडा तोंडांत मारून घेतों पाहिजे तर ! "

प्रकरण एकदम हातघाईवर आलेलें पाहून माईसाहेबांनी अगदी मऊ-पणा पत्करला.

माई—" असें काय करायचें तें अगदी ! मी सांगत नाही असें का म्हटलें आपल्याला ? "

भाऊ—"मग सांग तर. कुठलें पत्र आलें ? कुणी लिहिलें आहे ? काय लिहिलें आहे त्यांत ?"

फिरून माईसाहेब स्तब्धच. विचारीने यत्न केला, पण उत्तर कसें तें सुचेचना!

भाऊ.—" सांगतें म्हणतेस आणि सांगत नाहीस !"

माई—" कोण नाही सांगत ! आणि न सांगायला काय झालें ? पण आधी मला इकडे असें विचारावेंसें वाटतें कीं, मला जर चुकून एकादें पत्र

आलें तर लागलीच त्याचा एवढा गवगवा तो कशाला करायला हवा? हें चांगलें दिसतें का?"

भाऊ.—हें मात्र चांगलें दिसत नाही, आणि तुला परस्पर पत्रें यावीं आणि तीं तूं मला सांगूं नयेस हें—मी विचारतों— हें मात्र चांगलें दिसतें का?"

माई—"इश्श! पत्रें पत्रें तीं किती? साऱ्या जन्मांत एक तर आलें. आणि त्याला तरी येऊन कांही चार दोन दिवस थोडेच झाले, आपणाल ा सांगितलें नाही असें म्हणावयाला! आता परस्पर आलें त्याला मी बरें क ाय करूं? मी का कांही सांगावयाला, गेलें होतें टपालवाल्याला कीं 'बाबा, इकडे न [illegible] पत्र आणून मला दे' म्हणून?"

भाऊ.—"[illegible] गेलीस सांगायला; पण तो जो नेहमी पुढच्या दाराने येतो तो [illegible] पत्र देण्यापुरता कां ग आला आज मागच्या दाराने?"

माई—"तें [illegible] सांगू बरें?"

भाऊ.—"बरें तें [illegible] असो. पण खरेंच कुणाचें पत्र आलें आहे? काय लिहिलें आहे [illegible]?"

माईसाहेब पुनः [illegible]ल्या. पण इतक्यांत त्यांना कांही तरी सुचल्यासारखें वाटून त्यांनी [illegible] उत्तर दिलें—

"पत्र कीं नाही, [illegible] एका मामेमावसबहिणीकडून आलें बरें का; फारा दिवसांनी!"

भाऊ.—"ही पत्र लिहि[illegible] कुणी नवीनच दिसते मामेमावसबहीण?"

माई—"नवीच नाही कांही, पण आपण कधी पाहिली नव्हती एवढें मात्र खरें!"

भाऊ.—"बरें. पण तिने पत्रांत असें लिहिलें तरी काय आहे? सांग ना! कधीं पत्र न येणारें तुला म्हणूनच [illegible]लें कौतुकाने विचारतों जरा. बाकी कांही नाही."

माई—"लिहिली आहेन् खुश[illegible]ची बातमी. दुसरें काय? तिला तिकडे लांब भागानगराला जाऊन पुष्कळ [illegible]र्षे झाली. तेव्हा लिहिली आहेन् झालें सहज इकडची तिकडची हकीकत."

भाऊ.—"अस्सें का? असो. [illegible] कांही विशेष नाही. पण पाहूं दे काय

लिहिलें आहे तें तरी! भागानगर तें! बोलूनचालून मोगलाईचें राज्य! तेव्हा हकीकत असेलच बहुधा मनोरंजक."

**माई**—"इश्श! ती कसली असणार! वर्तमानपत्रांतल्या बातम्यांपेक्षा का ती मनोरंजक असणार? हो खरेंच. आपलीं वर्तमानपत्रें होतीं टपालवाल्याच्या हातांत. मिळालीं का तीं आपल्याला!"

माईसाहेबांना आपल्या नवऱ्याचा वर्तमानपत्रें वाचण्याचा नाद पुरा माहीत होता. त्या ज्ञानाचा त्यानी उपयोग केला. पण तोच थोडासा अंगावर आला. वर्तमानमत्रांचा उल्लेख करून आपलें मन दुसरीकडे गुंतविण्याचा हा बायकोचा प्रयत्न भाऊसाहेबांच्याहि लक्षांत येऊन, कुणी आपलें एखादें वर्म काढावें त्याप्रमाणे वाटून, भाऊसाहेब चिडले आणि म्हणाले—

"समजलों समजलों. पण असा विषय नको बदलूं. मी किती झालें तरी अनुभविक पेनशनर आहें! असा फसायचा नाही म्हटलें तुझ्या झुकांडीने! हं. हं. दे तें पत्र इकडे. पाहूं दे तरी भागानगरची काय हकीकत आहे ती! बायका झाल्या तरी वर्णन लिहिण्यांत मोठ्या मार्मिक आणि पटाईत असतात हो!"

भाऊसाहेबांवर उलट रागावण्याची ही संधि माईसाहेबांना आयतीच मिळाली. तिचा त्यांनी बरोबर फायदा घेतला. स्त्रियांच्या शिक्षणाचें व बुद्धिमत्तेचें असलें स्तुतिपर वर्णन कधी नव्हे तें भाऊसाहेबांच्या तोंडून निघणें म्हणजे, स्त्रिया अज्ञानी असतात असें म्हणून त्यांचें वर्म काढणेंच होय हें उभयतांच्या मनाला पूर्णपणें माहीत होतें. म्हणून त्या रागाचा आविर्भाव आणून म्हणाल्या—

"उगाच कांही तरी बोलायचें झालें! बायकांच्या लिहिण्यावाचण्याची गोष्ट एरवी केव्हा निघाली म्हणजे मेलें नाही नाही तें वाईटसाईट बोलायचें. सगळा जन्म गेला बायकांच्या शिक्षणाची निंदा करण्यांत. आणि आजच कधी नाही तें कुठलें आलें कौतुक कुणाला ठाऊक! काय म्हणे बायका वर्णन करण्यांत मार्मिक अन पटाईत! गेला त्यांचा मार्मिकपणा चुलींत!"

भाऊसाहेबांना बाजू अंगावर आलीशी वाटली. तेव्हा त्यांनी फिरून साळसूदपणा स्वीकारला; व नेमक्या मुद्दयावर येऊन प्रांजलपणाच्या आविर्भावाने ते म्हणाले—

" जाऊं देना तो आपला नेहमीचा वाद. पण खरेंच सांग ना पत्रांत काय—नव्हे काय काय—लिहिलें आहे तें."

**माई.**—"पण मला आधी आपल्यालाच विचारावेसें वाटतें कीं, बायकोमाणसाने बायकोमाणसाला लिहिलेलें पत्र. त्यांत पुरुषांनी लक्ष न घातलें तर नाही का सेंऽ चालणार!"

**भाऊ.**—" काय म्हटलेंस ? मी लक्ष न घातलें तर नाही का चालणार! हो चालेल. न चालायला काय झालें! पण मीहि उलट विचारतों कीं मी लक्ष घातलें तरी कोणी परका का आहें ? तूंच सांग बरें. तोंडाने हकीगत सांगतां येत नसेल तर पत्रच दाखीव. मी मजकूर नीट लावून वाचीन."

पत्रांतला मजकूर सांग म्हणतां म्हणतां आता पत्रच दाखीव असें म्हणण्याची पाळी आली! नवऱ्याचा हा संशयी उतावळेपणा पाहून माईसाहेबांच्या डोळ्यापुढें प्राणसंकट उभें राहिलें. अगदी ओच्यांत पत्र! पण तें फाडलें असें म्हणून एकदम मोकळें व्हावें अशी धाडसी कल्पना त्यांना सुचली; आणि प्राणसंकटांत स्त्रिया धाडसी ठरतात त्याप्रमाणें माईसाहेब धाडस करून मोकळ्या झाल्या. पण या धाडसाकरितां त्यांना कधीं नव्हे तो पराकाष्ठेचा मायवीपणा अंगीं आणावा लागला. अगदीं मऊंतला मऊ, आर्जवींतला आर्जवी, स्वर काढून त्या म्हणाल्या " असें काय करायचें तें बरें अगदीं! कींनही, मी तें पत्र वाचून फाडून सुद्धा टाकलें हो! मेली बोटभर चिटी निवळ खुशालीची. ती वाचून झाल्यावर ठेवून काय करायची? खरेंच मी सांगतें, अगदी शपथ घेऊन वाटेल तर सांगतें, कीं पत्रांत भागानगरचें वर्णन असें कांही एक नव्हतें. फार वर्षांत गांठ पडली नव्हती. फार काय पण ती मेल्याची अवाईहि मी ऐकली होती. ती खोटी आहे आणि लिहिणार जिवंत आहे इतकेंच त्या पत्रावरून कळण्यासारखें होतें. तें कळलें म्हणून पत्र फाडून टाकलें बरें का! खरंच सांगतें. दुसरें तिसरें कांही नाही. मला काय बरें माहीत कीं तें पत्र आपल्याला वाचायला हवेंच असेल म्हणून ! मग आता तरी झालें ना ! "

**भाऊ.**—" असें काय ? मला प्रथम आशा दाखवून शेवटीं असें खड्ड्यांत लोटलेंस काय ? पत्र फाडून टाकलें असें म्हणून टाकून फसवूं पाहतेस का

मला ! पण बरें नव्हे, मी कोतवालीचें काम केलें आहे. साहेबाचा शिरस्तेदार होतों दहा वर्षें. लपंडावाच्या उत्तरांनी मला फसवायला तूं पाहूं नकोस. ठीक आहे पाहून घेईन. या माझ्या उतारवयांत असें कपट करायला लागलीस का माझ्याशीं ! बरें आहे, बरें आहे—"

इतकें बोलून भाऊसाहेब माईसाहेबांच्या खोलींतून तडक बाहेर पडले. आणि आपल्याशीं पुटपुटत त्यांनी माडीचा जिना गांठला. माईसाहेबांना एका संकटांतून मुक्त झाल्यासारखें वाटलें. पण संकटांत असल्याच्या वेळेपेक्षां संकटमुक्त झाल्यावरच मनुष्याला रडें कोसळतें. तसेंच त्यांचेंहि झालें. भाऊसाहेब लांब गेले असें पाहून त्यांनी दार लावून घेतलें. खुर्चीवर बसून ओच्यांतलें पत्र काढून चारचारदा वाचलें. आणि शेवटीं रडें अनावर झाल्यामुळे, तें कोणाला ऐकूं जाऊं नये म्हणून दाराला कडी घालून, पलंगावर आडव्या होऊन, फुगीर उशींत तोंड खुपसून त्यांनी ती उशी आपल्या अश्रूंनी भिजवून सोडली.

आज योगायोगांनी जणूं काय पाठशिवणीचा खेळच आरंभला होता. अश्रूंनीं भिजलेले माईसाहेबांचें तोंड अजून उशींत खुपसलेलेंच होतें, इतक्यांत "माई–अ–अ. ए माई ! आज कुठे दडून बसलीस अशी अगदी बाजूला ? घरभर शोधली कींग माई !" अशा शब्दांनी मारलेली हाक माईसाहेबांच्या कानीं आली. लगेच त्यांनी पदराने डोळे कोरडे करून तोंड पुसलें. आणि उलट हाक मारून म्हणाल्या "कोण तें विमल ! आलें अं. थांब कडी काढतें."

अशा अवेळीं माईसाहेब बसायच्या खोलींत कडी लावून गुप्त झालेल्या पाहून विमलला आश्चर्य वाटलें होतें, तें त्यांच्या आश्वासनपर हाकेनेहि कमी झालें नाही. दार उघडताच ती एकदम जाऊन पलंगडीवर बसली, आणि माईसाहेबांचा हात घट्ट धरून तिनें त्यांना अगदी आपल्या शेजारीं बसवून घेतलें. तिची पहिली कल्पना आजारीपणाची. म्हणून ती म्हणाली, "कां ? आज पुन्हा घेऱ्या येऊं लागल्या कीं काय ?" पण उत्तर मिळण्यापूर्वीच तिची दृष्टि माईसाहेबांच्या तोंडाकडे गेली. तेव्हा घेऱ्यांचे दुखणें नसून आपल्या आईला रडविण्यासारखा



दुसराच कांही तरी एखादा प्रकार झाला असावा असें तिने तेव्हाच ताडलें. आणि माईसाहेबांना प्रेमळपणाने मिठी मारून ती म्हणाली, " माई, सांग ना, काय झालें तें सगळें नीट. असें ग काय करतेस! रडून रडून तुझा

पदर सगळा भिजलेला दिसतो. खचित बाबा तुला कांही तरी टाकून बोलले! त्यांनी तुझा अपमान केला असला पाहिजे. होय ना? तुला घेऱ्या आल्या नाहीत, तर बाबांना वेडाची लहर आली! पण त्यांचा स्वभाव तुला माहीत असतां असें कां बें करतीस? ते काय करतील बिचारे! त्यांना लहर आली म्हणजे आवरतच नाही." इतकें बोलून तिने आईला पुनः एकदा घट्ट वेंग मारिली.

क्षणांत माईसाहेबांचें दुःख हलकें झालें; व त्या शांत मनाने बोलूं लागल्या. "बाळ, तूं समजतेस तसेंच कांही नाही सारें आज-सलाहि स्वभाव माहीत झाला आहे नेहमीचा; म्हणून त्यांचें बोलणें मी फारसें मनावर घेत नाही. पण मला आज रडूं कां आलें याचें कारण हें पहा. आनंद, दुःख आणि चिंता एकदम उत्पन्न करणारें असें हें पत्र पहा म्हणजे तुला सारें कांही समजून येईल."

असें म्हणून माईसाहेबांनी पत्र काढून विमलच्या हातीं दिलें. आणि ती तें पत्र वाचीत असताच त्या पुढे म्हणाल्या—"तूंच सांग बरें, हें पत्र मी तिकडच्या हातीं एकदम देऊं तरी कसें? आणि न देऊं तरी कसें? एकीकडे आड आणि एकीकडे विहीर म्हणतात तो ही अशी झाली. स्वभावाप्रमाणें तिकडून नाही नाही त्या शंका उत्पन्न करून वाटेल तें बोलणें झालें. पण तो तोंड दाबून मिळालेला बुक्क्यांचा मार मी मुकाट्याने सहन केला. इतकेंच नव्हे तर कधी नव्हे तें थोडें कपट, थोडी प्रतारणाहि केली. आणि हें सगळें मनाला सोसलें नाही म्हणून रडूं आलें, दुसरें काय? बरें झालें. पण आता तूं आलीस. माझें सगळें दुःख हलकें झालें. माझी चिंता संपली. तूं जवळ असल्यावर मग मला कशाची चिंता वाटत नाही." विमल आईचें सर्व बोलणें एका कानाने ऐकत होती; व स्वतःच मोठ्याने वाचतांना उच्चारलेले पत्रांतील शब्द दुसऱ्या कानाने ऐकत होती. माईसाहेबांचें बोलणें थांबतांच ती म्हणाली, "माई कळलें का तुला हें पत्र कुणी पाठविलें तें! लक्षांत आलेंच असेल म्हणा तुझ्याहि, पण आपलें उगीच विचारलें."

माई—"होय, लक्षांत बहुतेक आलें; पण तूं होय म्हटलेंस म्हणजे तर्क पक्का खरा ठरेल. वाच ना सगळेंच पत्र एकदा."

इतकें बोलून माईसाहेबांनी दरवाजाची कडी नीट लावली. विमलनेहि घड्या घातलेला पत्राचा कागद साफ केला व तें पत्र ती वाचूं लागली. पत्र असें होतें—

" तो कांहीं राम नाहीं; पण त्याने बारा वर्षें वनवास भोगला. तूं कांहीं कैकेयी नाहीस; पण तुझ्यावर मात्र सावत्रपणाचा खोटा आळ आला. रामचंद्राने वनवासाच्या शेवटीं शत्रूंचें निर्दालन केलें, तसेंच वनवास भोगण्याच्या पुण्याईने इतरांनाहि आता करता येण्याला काल अनुकूल दिसतो. पांडवांनी तेरा वर्षें घराबाहेर काढलीं त्यापेक्षा बारा कमीच कीं नाहीं? दिसतें आहे बरें, पण शेवटीं बनेल तें खरें. जिवंत असशील तर दर्शन देशील! आशीर्वादहि मिळेल. साधू लोक अमावास्येच्या पर्वणीलाच दर्शन देतात. अनुसूयेपुढे जटाधारी दत्तात्रय उभा राहिला तेव्हा ती कांहीं त्याला भ्याली नाहीं."

हें पत्र एकदा वाचून विमलचें समाधान झालें नाहीं. " माई, ऐकलेंस का " असें आईला म्हणावें, आणि एकदा एक भाग मग दुसरा भाग असें वाचवाचून तिने जशी कांहीं पत्राचीं पाठांतरें किंवा गुंडिकाच केल्या. माईसाहेब देखील कुठे कळल्यासारखें कुठे न कळल्यासारखें वाटून ऐकत होत्या. मग विमलनेच बोलण्याला सुरुवात केली.

**विमल**—" पत्र म्हटलें तर गूढ आहे. म्हटलें तर स्पष्ट आहे. अक्षर कांहीं माझ्या ओळखीचें दिसत नाहीं; पण चांगलें वळणदार आहे, नाहीं ? "

**माई**—"अक्षर तुझ्या ओळखीचें कुठून असणार ! तो नाहींसा झाला तेव्हा तूं लहान होतीस. पण तें अक्षर माझ्या चांगल्या ओळखीचें आहे. कारण मी हौसेने पण चोरून त्याच्याजवळ लिहावाचायला शिकत होतें. तेव्हा तो मला हाताने धडे लिहून देई. त्यामुळे मला तें अक्षर अजून डोळ्यापुढे दिसतें आहे. चांगली तुझ्या आजच्या वयाची मी होतें त्या वेळीं. "

**विमल**—" खरेंच माई, मला तुझा हेवा वाटतो. कारण त्याने तुझ्याबद्दल किती प्रेम दाखविलें आहे या पत्रांत. "

**माई**—" एकाच वयाची आम्हा मायलेकांची जोडी. आणि इकडच्या तऱ्हेवाईक तापट स्वभावामुळे प्रभाकराचा मला मोठाच आधार वाटे ! "

**विमल**—" तुझ्यावर सावत्रपणाचा खोटा आळ आला असें पत्रांत म्हटलेन तें उगीच का ? "

**माई**—" तो त्याचाच थोरपणा. कर्त्या होऊ घातलेल्या मुलग्याने सावत्र आईवर सख्या आई सारखें प्रेम करावें हा तिच्यापेक्षा त्याचाच गुण अधिक खरा. तुझ्यावर सुद्धा त्याची फार ममता होती हें मला माहीत आहे. पण त्याचा पुष्कळसा वेळ घरच्यापेक्षा बाहेरच्या लोकांच्या कामांतच जाई. आणि त्यांतल्या त्यात वृत्ति गंभीर. म्हणून मुलांच्यारीतीने तो फार खळत नसे. प्रभाकराला तुझी आठवण असली तरी तसा संबंध कमी आलेला. म्हणून तुझा उल्लेख त्याने पत्रांत केला नसावा. पण आता तर तू त्याच्यावर कडी केली आहेस. शहाणपणांत, विद्येंत, परोपकारांत, लोकांच्या कारभारांत! उद्या तो परत आला, आणि बाकी गोष्टी निभावल्या, तर पाहाशील तुझें तो किती किती कौतुक करील तें! तुझा त्याला किती पण अभिमान वाटेल! पण मला भीतीच वाटते त्याच्या येण्याची. "

**विमल**—" खरेंच माई, आता आपण पुढच्या तरतुदीला लागलें पाहिजे. तो कदाचित् अमावास्येच्या रात्रीच्या वेळीं येणार असें पत्रावरून दिसतें. कोणच्या वेषाने येणार याची सूचना त्याने केलीच आहे. ठीकच आहे. एकदम कोणी ओळखूं नये याला युक्ति अशीच हवी. पण आल्यावर तो केव्हा तरी लवकरच प्रगट झाल्याशिवाय राहायचा नाही असें दिसतें. वनवासाला कंटाळला आहे. न कंटाळेल तर काय होईल? म्हणून प्रगट होऊन सोक्षमोक्ष काय तो पुरा करून घ्यावा असा त्याने निश्चय केला असावा. त्याचा आत्मविश्वास खंबीर दिसतो, नाही माई ? "

**माई**—" तो होताच–आहेच–तसा मनाचा बळकट. बारा वर्षांपूर्वी प्रकरण मोठें झालें. प्रभाकर एक दिवस अचानक नाहीसा झाला. मी तर लहान. सारा प्रकार पाहून गोंधळून गेलें. मग एक दिवस ऐकलें कीं, सरकाराने त्याला जन्मठेपीची शिक्षा त्याच्या-मागेंच दिली. मला जन्मठेप म्हणजे काय हें देखील कळत नव्हतें. पण प्रभाकर गेला तो आता पुन्हा परत येणार नाही, भेटणार नाही, इतकें कळून मी चार दिवस रात्रंदिवस रडत होतें. पण अगदी

चोरून हां ! उघडपणें रडायचीहि मला भीति वाटे तेव्हां यांच्यापुढें."

विमल—"मग आता काय अशी मोठी धीट झाली आहेस वाटतें ? मी आलें तेव्हा अशीच खोलीला कडी लावून बसली होतीस कीं नाही रडत–बाबांना भिऊन !"

माई—"बाळ, अशी भिऊन वागलें आजवर म्हणूनच दिवस निभले अन् अब्रु संभाळली गेली बरें ! तुझी गोष्ट वेगळी आहे. तूं आहेस मुलगी आणि मी पडलें बायको ! तुझ्यावर त्यांचें प्रेमच आहे तसें. त्यांतून तू शिकली-सवरलेली. सभेंत जाऊन बोलतीस, भांडतीस, ती घरीं कां भिशील हें झालें म्हणून यांना ? पण बाळ, मीं तुझा नाही हो हेवा करीत. देवानें असेंच तुला धैर्य अन् शहाणपण द्यावें, अन् वाढवावेंहि ! प्रभाकर गेला, पण तुझ्या आधारा-वरच मीं दिवस काढतें बरें. मला घरचें माहेर नाही: मला तूंच माहेर वाटतेस. आजच पाहाना ! हें प्रभाकराचें पत्र असलें यायला आणि तूं घरीं यायला गाठ पडली ती देवानेच पाडली ! नाही तर बाई मीं गोंधळून गेलें असतें आणि रडण्याशिवाय मला कांही सुचलें नसतें. पण आता तूं आलीस तेव्हां सगळें कांही निस्तारशील, संभाळशील."

विमल आईला प्रेमाने घट्ट मिठी मारून म्हणाली, "दादा मला तुझ्या सारखाच बारा वर्षांनी दिसणार तर ! पण तो अजूनहि प्राणसंकटांतच आहे म्हटलें तरी चालेल. आपण बायका माणसें झालों तरीं त्याला धीर देऊन बचावाची युक्ति आपणालाहि सुचविता सांगतां येईल. आणि तुला वाटतें तसें जर बाबा माझें कांही ऐकण्याचा संभव असेल तर तिकडूनहि कांही करतां आलें तर बरेंच नाही कां ? चल तर आतां, आपण सहज तिकडे गेल्यासारखें करून परसांत जाऊं. बंगलीच्या तळघराची जागा कशी काय आहे तें पाहून घेऊं. चांगली बंदिस्त आहे. ती नीट झाडवून घेऊन निजाबसावयाची सोय करूं म्हणजे झालें."

दोघीहि बाहेर आल्या, आणि प्रभाकराच्या स्वागताच्या तयारीला लागल्या.

प्रकरण सहावें

# प्रेमळ बाप–लेकींचें भांडण

असो. मागील प्रकरणांत सांगितलेल्या हकीकतीनंतर विमल आपल्या आईकडून निघाली ती भाऊसाहेबांच्या माडींत आली.

रिकामपण असलें कीं भाऊसाहेब बहुधा चिरूट ओढीत बसायचे. तसेंच आताहि ते बसले होते. आणि वाचावयाला वर्तमानपत्रें नसलीं म्हणजे इतर कांही न करतां, नुसता चिरूट ओढीत, तासानुतास त्यांना स्वस्थ लोडाशीं टेकून बसून काढतां येत असत. तसेच ते आताहि अगदी स्वस्थ बसले होते. विमल वर आलेली पाहून त्यांना फार आनंद झाला. त्यांनी हातांतला चिरूट टाकून दिला, व तिचा हात धरून आपल्याशेजारीं तिला बसवून घेतलें. अगदी वाईट स्वभावाच्या माणसांतहि कांही लोकोत्तर गुण असे असतात कीं, केवळ त्या गुणांखातर त्यांचे सर्व दोष जगाने विसरून जावे आणि त्यांच्यावर प्रेम करावें. भाऊसाहेबांच्या अंगीं आपल्या मुलीवरील प्रेम हा असा गुण होता कीं, त्यामुळे त्यांच्या लोभी संशयी भोळ्या पण स्पष्ट दुराग्रही स्वभावाची कोणीहि त्यांना क्षमा करावी. त्यांनी, तिची जनक आई मृत्यु पावल्यापासून, मुलगी अगदी सुखांत ठेवली होती. तिने धरलेल्या इच्छा तर त्यांनी पुरवाव्याच, पण आपल्याकडून मुद्दाम आठवून आठवून तिचे लाड सुचवावे व पुरवावे. तिच्या कारणीं पैसा किती खर्च करावा हा हिशेबच त्यांच्याजवळ नव्हता. तिच्या लहानपणी तिला शिक्षक वगैरे ठेवून तर त्यांनी शिकविलेंच; पण पुढे स्वतःचें शिक्षण टाकून देऊन तिने 'शारदा मठ' नांवाची मुलींच्या शिक्षणाची संस्था काढायचें ठरविलें, तेव्हा त्यांनी जागा खरेदी करण्यापासून सर्व खर्च स्वतः करून लहानशी इमारत बांधून दिली, सामान खरेदी करून दिलें व शाळा फीशिवाय चालवायची म्हणून शिक्षकांचे पगार देतां येतील येवढी रक्कम बँकेंत व्याज़ ठेवली. शिवाय दर सणावारी तिला ते कांही तरी रक्कम देणगीदाखल देतच.

विमल आलेली पाहून त्यांना आनंद झाला व ते तिच्या पाठीवरून हात फिरवन म्हणाले—बाळ, तूं मुंबईहून केव्हा आलीस ? आणि कळविलें नाहीस आधी तें ?

**विमल**—तुमच्याकडे कोणी लोक येत–जात होते म्हणून आईशींच बोलत बसलें होतें.

**भाऊ.**—बरें, कसें काय चाललें आहे तुझ्या शारदा मठांतल्या मुलामुलींचें?

**विमल**—कसें काय चालायचें? ठीक आहे, आहे तें. लहान मुलें शिकणार किती आणि काय? पण शिकण्याइतकीच खेळायचीहि सोय केली आहे मी त्यांची. यामुळें सगळा वेळ त्यांचा आनंदांत जातो, बाबा ! मग शिकणें काय पदरांत पडतें तें देव जाणें ! कळून येईल पुढेमागे ! पण बाबा, तुम्हीं मला मागे दोनशें रुपये दिलेतना एक रकमेने, त्यांचीं मी निरनिराळीं गमती–गमतीचीं खेळणीं घेतलीं तेव्हा-पासून मुलें घरीं जायलाच नाखूष असतात. खूष आहेत अगदी माझ्यावर !

**भाऊ.**—पुरे पुरे मुलांचें कौतुक. कुठलीं चार घरचीं चार जमविलीं आहेत; आणि बसली आहे त्यांतलीच आपणहि एक होऊन. शिंगें मोडून वासरांत शिरलेल्या गायीसारखी ! मी दोनशें रुपये तुला खाऊला म्हणून दिले ते असे उधळलेस काय !

**विमल**—असें बोलाल बाबा तर मी रागावेन बरें का तुमच्यावर, सांगून ठेवतें. घरोघरीं आनंद काय तो खरा मुलांचाच असतो. आणि इतकीं मुलें मला एक ठिकाणीं करून खेळायला मिळतात, मग माझा आनंद केवढा मोठा असेल बरें ? मी तुम्हाला नेहमी बोलावतें शाळेंत एकदा येऊन जा बघा म्हणून. पण तुम्हीं मुळीं येतांच कुठे ? तुम्ही मला दोनशें रुपये खाऊला दिले. ती मी आता खाऊ खायला कुक्कुबाळच असेन कीं नाही ? आणि तीं सगळीं झालीं तरी खाऊ खाऊन किती खातील ? आणले होतेना त्यांतल्या पांच रुपयांचे पेढे आणि ते वाटले त्यांना, आणि मीहि खाल्ले बरें का त्यांच्याबरोबर अगदी पोटभर! मग म्हटलें उरल्या रुपयांचें काय करूं ? मला दागिन्यांची हौस नाही हें पाहतांच तुम्हीं; आणि तुम्ही तरी मला करावयाचा असा एखादा तरी दागिना शिल्लक ठेवला आहेत का? भरली

आहे तिजोरी माझ्या आणि माईच्या दागिन्यांनी. मग मुली-मुलें म्हणालीं 'बाई, आम्हाला विलायती खेळ आणा की हो नवे नवे !' म्हणून मग तोच विचार कायम केला. कांही परदेशी आणले, आणि कांही गांवच्या कारागिरांकडून करून घेतले. पण बाबा, तुम्हांला विचारू का हो राग येणार नाही तर ?

भाऊ.—विचार विचार बाळ. तुझ्यावर मी कधी रागावेन का ?

**विमल**—मी असें म्हणतें, तुम्हाला मुलींचें शिक्षण आवडत नाही तें कां ? मुलींनीच असें काय पाप केलें आहे कीं त्यांना लिहावाचायचा आनंद मिळूं नये ?

**भाऊ.**—अगदी खरेंच सांगूं का ? आमच्या लहानपणीं ज्या गोष्टी आम्ही कधी पाहिल्या नाहीत त्या मोठेपणीं दिसल्या कीं सगळ्या भलत्या बेसुमार वाटतात. आणि तूंच सांग बरें, शिकून बायकांना पोटें का भरावयाचीं आहेत ?

**विमल**—वा:, पोटें भरण्याकरितांच काय तें येऊनजाऊन शिकायाचें वाटतें ? आनंद नाहीच का मुळीं त्यांत ? तुम्ही कशालाहो, बाबा, इतकी वर्गणी भरून आणून वर्तमानपत्रें वाचतां तीं रोज ? तुम्हाला तीं वाचून पोटच भरायचें असेल जसें कांही ?

**भाऊ.**—समजलों ! समजलों ! येऊनजाऊन तुम्हा सर्वांचा कटाक्ष माझ्या वर्तमानपत्रांवर ! अग तीं वाचलीं म्हणजे आपण जगांत आहों असें वाटतें, दुसरें काय ?

**विमल**—मग आम्ही बायका काय जगाबाहेरच्या आहों किंवा आलों वाटतें ? आम्हालाहि जग कसें चाललें आहे हें कळायला नको वाटतें ? बरें, बाबा, मग मुलींनी शिकणेंसवरणें हें जर असें वाईट, तर मला काहो तुम्ही घरच्या घरीं अगदी पगारी मास्तर ठेवून शिकवलेंत तें ? जशी मी तुमची मुलगी तशाच दुसऱ्या दुसऱ्यांच्या ! आता घरीं पगारी मास्तर ठेवून मुलींना शिकवायला त्यांच्याजवळ पैसे नाहीत तें वेगळें. मग हा काय त्या बापांचा किंवा त्या मुलींचा दोष ? आपलीं मुलें काय, लोकांचीं काय, एकच ! देवदयेनें आपल्याजवळ चार पैसे आहेत ते लोकांकरिता खर्च झाले तर त्यांत वाईट काय ? आईला शिकवायलाहि

तुम्ही मास्तर ठेवायला पाहिजे होता. तिला तरी विचारीला वेळ जायला वाचण्याशिवाय दुसरी काय करमणूक ? आता ती आपली तुम्हाला चोर-चोरून माझ्या दादाजवळ शिकली हें निराळें ! पण तिच्यावर तुमचा त्याकरितां केवढा राग ? मी जशी तुमची मुलगी तशीच ती झाली तरी दुसऱ्या कुणाची मुलगीच कीं नाही ?

यावर भाऊसाहेबांना कांहीच उत्तर सुचेना. म्हणून केवळ विषय बदलण्याकरिता ते म्हणाले:—

" बरें, इकडची तिकडची कांही बातमी सांगशील कीं नाही ? "

या प्रश्नाचा फायदा घेऊन प्रभाकराच्या गोष्टीचें सूतोवाच करावें असें तिच्या मनांत प्रथम आलें. पण तें बोलणें जरा जोखमीचें म्हणून आधी बापाला थोडेसें खुषींत आणून मग तो विषय काढावा असें तिने ठरविलें. आणि म्हणाली—

विमल—" हें हो काय, बाबा ? मुलांच्या शाळेंत कसल्या बातम्या ? वर्तमानपत्रांत खऱ्या. तुम्हीच सांगाना बातमी ! खरेंच सांगा बातमी ! "

विमलने खरोखरच थोडेसें लाडकीपणाचें नाटक मुद्दाम केलें. म्हणजे लहान मुलें ' आम्हाला गोष्ट सांगा, गोष्ट सांगा ' असें म्हणून आजाच्यामागे छंद घेऊन लागतात तसाच कांहीसा प्रकार तिने केला. भाऊसाहेबांनाहि आपल्या मनांत डाचणारी गोष्ट बाहेर बोलायला बरी संधि आहे असें वाटून ते म्हणाले:—

भाऊ.—" नवलाच्या बातम्या वर्तमानपत्रांतच असतात असें नाही कांही! एरवीसुद्धा, ऐकायलाच काय, पण अनुभवालाहि येतात बरें का, विमल !"

विमल—" मग अनुभवाला आलेलीच एखादी अद्भुत बातमी सांगणार असलां तरी सांगा !"

भाऊ.—" अद्भुतच नव्हे तर काय ग ? ही घरांत प्रभाकराजवळ चोरून लिहा–वाचायला शिकली असें तूंच मघाशी म्हणालीसना ? त्या चोरीकडे मी तेव्हा कानाडोळा केला. पण त्याचें फळ मिळाल्याशिवाय राहिलें नाही !"

विमल—" म्हणजे मी नाही समजलें, बाबा, काय तें ? चोरी काय म्हणतां तें कळलें. पण फळ काय मिळालें आणि तें कुणाला ? "

भाऊ.—" अग, चोरीकडे कानाडोळा करणारालाच तें बक्षीस मिळा-यचें हें ठरलेलेंच आहे. मी तिच्या लिहिण्याच्या चोरीकडे दुर्लक्ष केलें तेव्हा तें बक्षीस मलाच मिळालें!"

विमल—"असें नका हो, बाबा, कडू कडू बोलूं. सांगा ना सरळ काय तें."

भाऊ.—" तिला पत्रें येतात चोरून ! "

विमल—" तिला म्हणजे ?"

भाऊ.—" घरांत तिला ! तुझ्या आईला ! "

विमल—" मला वाटतें तुम्ही थट्टा आरंभली आहे माझी. आईला पत्रें कधी आलीं आणि किती ? "

भाऊ.—" अगदी आजचीच गोष्ट ! लांबची थोडीच आहे ! "

विमल—" अस्सें. बरें आणखी कधी आलीं ? "

भाऊ.—" आणखी कधी तें नाहीं आठवत विशेष !"

विमल—" हात्तेच्या रे ! मग आजच्या पत्राची गोष्ट तिने मला सांगितली! आणि म्हणे तुम्हालाहि तिने सांगितली. नुसतें पत्र आल्याची बातमीच काय पण त्यांत काय मजकूर होता तें सुद्धा. काय बरें होतें असें त्या पत्रांत ? माझ्या मामेमावसमावशीची खुशाली आली होती भागानगराकडून. कुठे भागानगर आणि कुठे नवलपूर? मींहि तिला कधी पाहिली नाही. आईनेसुद्धा एक दोनदाच पाहिलेली लहानपणीं. पण भागानगरांत वारव्याचा उपद्रव मनस्वी झाल्याची बातमी जगभर झाली. म्हणून तिने खुशाली कळविली असेल! जुन्या पिढीच्या बायका साऱ्या जन्मांत असें एखादें पत्रच लिहितात. म्हणून पूर्वी कधीं फारसें आलें नसेल, आणि आलें असलें तरी तुम्हांला ती कशी सांगेल ? आणि तुमच्या तरी तें असें काय लक्षांत राहील ? "

भाऊ.—" बरें तेंहि असेल, पण पत्र फाडून टाकण्याचें तिला काय कारण ? तें काय खायला मागत होतें ? आणि सहज मला दाखविलें असतें तर काय बिघडलें असतें ? "

विमल—" बाबा, आतां बोलू का थोडें तुम्हाला ? तुम्हाला आहे का कधी सवय आईशीं मोकळ्या मनाने बसून बोलायचालायची ? तशी असती तर गोष्टीवरन गोष्ट निघाली असती, आणि हौसेने तें पत्र तिने तुमच्या नजरेला

सहजच घातलें असतें. पण व्यवहाराशिवाय तिच्याशीं तुम्ही कधी बोलतां बरें! तिची मावसमावस बहीण खरा; पण तिची खुशाली तुमच्यापर्यंत येण्याचा काय बरें संबंध? शिवाय त्या जुन्या पद्धतीच्या भागानगरी बाईनें जन्माच्या कर्मात तें कितवें पत्र लिहिलें असेल देवाला ठाऊक! कुत्र्या-मांजराचे पाय! आईला तें पत्र तुम्हाला दाखवायला लाजच नाही का वाटायची! बायकांची लाज बायकाच राखू जाणत!"

भाऊ.—"बरें बरें, तिचा कैवार तूं घेणारच! पण खरेंच सांग, या पत्राचें नाही कांही वाटत चमत्कारिक तुला?"

विमल—"खरेंच नाही बाबा!"

भाऊ.—"शिक्षणानें तुझी मजल बरीच पुढे गेली आहे म्हणावयाची पोरी!"

विमल—"तसें नव्हे बाबा! पण संशयाने तुमचीच मजल पुढे गेली असली पाहिजे यांत शंका नाही. या पत्रामुळे तुमच्या मनांत काय काय येऊन गेलें असेल आईविषयीं त्याचा उच्चारसुद्धा करवत नाही मला!"

भाऊ.—"अग हें असेंच व्हायचें म्हातारपणीं! मीं कशाला या तिसऱ्या लग्नाच्या भानगडींत पडलों कुणाला ठाऊक? अब्रूंत राहून डोळे मिटले एकदाचे म्हणजे मिळविली."

हे शब्द ऐकताच विमल ताडकन् उठून दूर गेली. आणि परत येऊन बसली ती बापाच्या हाताजवळ न बसतां तोंडासमोर बसली त्यांच्याकडे भेदक नजर रोखून! तिचा स्वरहि जरा आपोआपच चढला, आणि ती बापाला ठासून म्हणाली—

विमल—"शिव शिव शिव. बाबा, तुमच्या तोंडून असले अभद्र शब्द निघतात तरी कसे? मी लहान तोंडीं मोठा घास घेऊं इच्छित नाही म्हणा; पण आईसारख्या शुद्ध पवित्र स्त्रीसंबंधानें असा संशय घेता, तेव्हा तुम्हाला काय म्हणावें हेंच कळत नाही."

मुलीचे हे शब्द ऐकून भाऊसाहेब जरा सरदले; आणि जसा कांही कोणी अपराधी आपला अपराध लोकांना कळला असें वाटून केविलपणानें बोलतो तसा स्वर काढून म्हणाले—

भाऊ.—"अग तसें नव्हे ग–अग तसें नव्हे–पण आपलें म्हटलें." पण

विमलने बापाची कींव केली नाही. आईच्या प्रेमाने एखाद्या निष्ठुर न्यायाधीशाच्या आवेशाने खेकसून ती त्यांना म्हणाली—

**विमल**—" तसें नव्हे तर कसें ? बाबा मी तुमची मुलगी आहे आणि नातहि शोभेन. आणि असल्या कामांत तुम्ही मला बिनमुरवतखोर म्हटलेंत तरी चालेल. पण सरळ दिसेल तें बोलल्याशिवाय माझ्यानें राहवतच नाही. तुमचा आम्हा बायकांच्या शिकण्यासवरण्यासंबंधानें किती कटाक्ष आहे हें माहीत का नाही मला ? माझें आपलं तुम्ही चालू देतां म्हणजे काय, तें एक माझ्यावरच्या निस्सीम प्रेमामुळे. माझी वेडेपणाची हौस हट्ट म्हणून तो तुम्ही पुरवतां. "

हें बोलताना विमलचा कंठ भरून आला. तिच्यानें बोलवेना, व ती आपोआपच प्रेमाच्या उद्वेगानें उठून फिरून बापाच्या बाजूला जाऊन चिकटून बसली आणि म्हणाली—

**विमल**—" पण मी म्हणते बाबा—मी तुमची मुलगी आणि माझी माई तुमची बायको झाली म्हणून काय झालें ? बायकोलाहि वागविण्यांत कांही सीमा—मर्यादा आहेच कीं नाही ? कीं तिची अब्रू अशी अविचाराच्या केरसुणीनें तुम्ही झाडून टाकावी ! मी स्पष्टच म्हणतें, माझ्या माईचें आचरण इतकें पवित्र आहे कीं, तिच्या पायाचें तीर्थ घ्यावें नित्य सकाळीं उठून. पण सत्तेची बायको म्हणून तुम्हाला मात्र तिची किंमत नाही ! "

मात्रा चांगलीच लागू पडली. भाऊसाहेब निरुत्तर, इतकेंच नव्हे, तर खजीलहि झाले. आता विमलचें बोलणें थांबतें तरी कसें असें त्यांना झालें. पण म्हाताऱ्याच्या डोक्याला युक्ती सुचली थोडी.

**भाऊ.**—"बरें बरें राहिलें माझें. चुकलें माझें. बाळ, तूं रागावूं नको. तुझ्या शहाणपणाचें मला किती कौतुक वाटतें म्हणून सांगूं ? माझी विमल बालिस्टर झाली असती तर साहेबालाहि गप्प बसायला लावती. मग सांग बरें आता, मी तुम्हा बायकांच्या शिक्षणाचा खरा मनांतून शत्रू का आहे तो ! अग, पण आम्ही हीं आपलीं जुन्या पिढीचीं माणसें. कशाबद्दल काय कसें बोलावें हें तरी कळतें कुठें नीट आम्हाला तुमच्यासारखें ? बरें तें सर्व राहूं दे.

मी तुला बातमी म्हणून सांगायला गेलों त्याचें हें असें रामायण झालें. आता तुझी बातमी सांग पाहूं."

विमललाहि सूर बदलायला निमित्त हवेंच होतें. म्हणून वादाचा विषय संपला असें दर्शविण्याकरितां किंचित् हसण्याची प्रस्तावना करून ती खेळीमेळीच्या स्वरानें बापाला म्हणाली—

**विमल**—"तुमच्या बातमीचें झालें रामायण! तसें मी बातमी सांगितली तर माझ्या बातमीचें भारत न होवो म्हणजे झालें. पण खरेंच गमतीची गोष्ट. सांगतेंच झालें. हें पहा, बाबा, काल पहाटे कीं नाही एक अगदी अद्भुत अशी गोष्ट घडली."

**भाऊ.**—"हं! हं! काय काय ती सांग बरें!

**विमल**—"गोष्ट अशी कीं—प्रभाकर–दादा"

**भाऊ.**—"कोण प्रभाकर दादा!"

**विमल**—"हें काय बाबा! दादा म्हणजे माझाच दादा! प्रभाकर-तुमचा मुलगा बरें!"

**भाऊ.**—"मग–मग त्याचें काय!"

**विमल**—"तो–काल–रात्रीं–आला–आणि–माझ्या–समोर–उभा–राहिला–प्रभाकर–दादा–जसा कांही–एखाद्या सुक्या खांबासारखा!"

तिनें हे सारे शब्द कसे अगदीं सावकाश सावधपणानें उच्चारले. जसा कांही एक एक मणी घेऊन माळ ओवावी. आणि शेवटचे 'जसा कांही' हे शब्द तर तिनें असें कांही शिताफीनें उच्चारले कीं, ते प्रभाकर या शब्दाला लागावे किंवा आला, समोर उभा राहिला, या शब्दांनाहि लागावे. आधीं प्रभाकर येणें हेंच अद्भुत, आणि आला तरी असा समोर उभा राहणें हें अद्भुत. मिळून बाप थोडासा घोटाळ्यांत पडावा, आणि प्रभाकरासंबंधानें त्याचे तोंडून स्वाभाविक उद्गार नकळत बाहेर पडावे.

आणि ही युक्ति साधलीहि. कारण प्रभाकर हें नांव फिरून कानीं पडताच भाऊसाहेब दचकले व अविश्वासदर्शक स्वरानें ते म्हणाले—

**भाऊ.**—"काय! म्हणतेस तरी काय! प्रभाकर तुझ्यापुढे येऊन उभा राहिला! खुळी! तुला वेडबिड तर नाही लागलें! हो, वेड नाही तर काय!

इतकीं वर्षें नाहीसा झाला, तो म्हणे आला! हिंदुस्थानांतल्या तुरुंगांतहि नसेल तो एखाद्या, कीं उडी मारून पळून येईल! कदाचित् अंदमान बेटांत त्याला सरकारानें पाठविला देखील असेल. तो काय तेथून समुद्र पोहून येणार हिंदुस्थानाला? म्हणूनच म्हटलें पोरीला वेड लागलें खरेंच"!

बाप वेडच लागलें म्हणतो आपल्याला, तर मग त्या वेडांत आणखीहि थोडें पुढें जावें, म्हणजे मग प्रभाकर दादाबद्दल आज तरी बापाला काय वाटतें हें नीट कळेल, या हेतूनें विमलनें आपलें अद्भुत पुराण थोडेंसें आणखी वाचलें. ती किंचित् हंसून पण खरोखर मनांतून भीत भीत, पुनः एकेक शब्द ओढून उच्चारित म्हणाली—

विमल—"माझें आपलें वेड म्हणा, पण बाबा मी म्हणतें कीं, समजा, तो समुद्र पोहून येवो—नाही तर—आभाळांतून—उडून येवो, मी म्हणतें—आलाच तर—

भाऊ.—"आलाच तर! होय आलाच तरी तो पूर्वींचाच असेल तर मला नको. वर्तनानें पूर्वींसारखाच असेल तर मीं त्याला थारा देणार नाही, त्याचें तोंडहि पाहणार नाही."

झालें. विमलची निराशा झाली. तिला डोंगरावरून कोणी खाली फेकून द्यावें असें भासलें. तिच्यानें मनाचा उद्गार दडपून ठेवतां येईना. ती स्फुंदतच म्हणाली—

विमल—"हरहर! माझी आशा समूळ खुंटली. बारा वर्षें होत आलीं तरी देखील, बाबा, तुमचा दादावरचा राग कमी होत नाही ना? काय! प्रभाकरदादाचें तोंडहि पाहणार नाही तुम्ही, तो परत आला तरी? असा त्यानें तुमचा अपराध तरी काय केला बाबा? सरकारचा एक असेल, पण मी म्हणतें तुमचा अपराध त्यानें काय केला?"

भाऊ.—"अपराध नव्हे तर काय ग? संस्थानच्या दरबारचा अपराध तोच माझाहि अपराध असें मी समजतों. अग, तूं तेव्हा लहान होतीस! तुला काय कळत होतें त्यांतलें? आता सांगितलें तर थोडें कळेल, म्हणून सांगतों हवें तर. परोपकाराच्या नसत्या फंदांत पडूं नको म्हणून सांगत होतों कानीं–कपाळीं ओरडून! पण तें न जुमानतां विनाकारण दरबारीं राजकारणांत पडला.

राजकारणांत फिरून राजद्रोह ! आणि कलेन काय तर खुद्द दिवाण साहेबांच्या खुनाचा कट व प्रयत्न ! विमले, सांग बरें, तुझ्या बापाने सारा जन्म नोकरींत घालविला. खालसा सरकारची केली, संस्थानी दरबारची केली. राजनिष्ठेचें व्रत घेतलें आणि तें पार पाडलें. सर्टिफिकीटें, पोषाख मानाचे मिळविले. चार पैसेहि देवदयेने मिळाले. अशा स्थितींत माझे काळ्याचें पांढरें होत आले अन् मी पेन्शन घेणार तों यानें, माझ्याच प्रत्यक्ष मुलाने, असें राजद्रोही खुनी बनावें हें, विमल तूंच सांग बरें, केवढें मला लांछन झालें असेल ! दिवाणसाहेबांच्या खुनाचा खटला भरण्यापूर्वीच तो पळून गेला म्हणून बरें. नाही तर मला आपण होऊन सरकारच्या स्वाधीन करावा लागला असता त्याला ! झालें ! खरें काय खोटें काय हें शाबीद करायला तो स्वतः नाही. एक दोन साथीदारांच्या बरोबर त्याचाहि इनसाफ झाला. त्याच्या गैरहजेरींत त्याला जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा झाली. तो सापडेल तेव्हां चौकशी न करतां त्याला अंदमान बेटांत पाठवावे असा हुकूम झाला आहे सरकारी; आणि कुठें सापडला असला तर त्याची रवानगीहि झाली असेल."

विमल—"पण बाबा, मी विचारतें तें सांगा हं, न रागावता. दादाने दिवाण साहेबाच्या खुनाचा प्रयत्न केला असा आरोप असेल; पण तो खरा खोटा याची तुम्हीं स्वतः खात्री करून घेतली होती का ?"

भाऊ.—"अग, खात्री काय करायची ? तो पळून गेला, फरारी झाला, याहून त्याच्या गुन्ह्याचा वेगळा पुरावा तो काय लागतो ? शिवाय त्याचा स्वभाव किती तापट होता, तो कसा अगदी माथेफिरू बनला होता, याची काय कल्पना तुला येणार ? तूं विचारतेस कीं, तो आला तर काय कराल म्हणून ? काय कराल ? जें पूर्वी केलें असतें तेंच आताहि करीन. माझ्या दरबारी अब्रूची किंमत असल्या मुलापेक्षा मला अधिक वाटते, समजलीस ! कुसंतानापेक्षा निसंतान पुरवलें !"

झालें ! कडेलोटच आला ! तेव्हां आतां गाडी अशीच पुढें नेण्यांत अर्थ नाही, ती दुसऱ्या रूळावर घेणेंच योग्य, असें ठरवून विमल म्हणाली,—

विमल—"बरें जाऊं द्या कीं बाबा, उगीच कशाला नसता वाद ?"

पण असले अप्रिय व तीव्रतेला पोंचलेलें संभाषण शेवटीं कांही तरी

हास्यविनोदाशिवाय संपवितां कामा नये; तसें झालें नाही तर मनाची रुखरुख जायची नाही व इतर संभाषण पुढें होणें कठीण; म्हणून विमलेनें थोडी युक्ति केली. पूर्वीं रामायण भारत हे योजलेले अलंकारिक शब्द तिला आठवले. तेव्हा लगेच एक उसासा टाकून चडीभावना ओसरवून ती म्हणाली—

विमल—" बाबा, बघा ना! मी मघाशीं तुम्हांला म्हटलें तसेंच अगदीं झालें कीं !"

भाऊ.—" तें काय बाळ ! "

विमल—" तें असें कीं, तुम्ही आम्ही एकमेकांना कांही तरी अद्भुत बातमी सांगणार होतों. तुम्ही सांगितलीत तिचें रामायण झालें असें तुम्ही म्हणाला. तेव्हा मी माझी बातमी सांगितली तर तिचें महाभारत न होवो असें मी म्हटलें. पण शेवटीं खरोखर तसेंच झालें कीं नाही बाबा ?"

भाऊ.—"अस्सें. तें कसें बरें."

विमल—" तें असें कीं, प्रभाकर दादा आला; माझ्या पुढें उभा राहिला जसा कांही, इतकें शब्द मीं बोललें. पण पुढे आणखी शब्द बोलणार इतक्यांत तुम्ही रागावून उसळला तेव्हा तें तसेंच राहून गेलें."

भाऊ.—" ते शब्द कोणते ? "

विमल—" दादा येऊन माझ्या पुढे उभा राहिला–जसा कांही–आणि इतकें पाहून मी जागीं झालें! पहाटेचीच वेळ होती. आणि आपलें असलें स्वप्न मला पडलें कीं हो! अद्भुत नव्हे कां? पहाटेचीं स्वप्नें खरीं होतात का-हो बाबा ? "

भाऊ.—" हात्तेच्या रे! एकूण स्वप्नच ना? चल तर एकूण माझीच बातमी खरी, अन् तुझी खोटी !"

असें म्हणून म्हातारा प्रेमळपणानें मुलीच्या पाठीवर हात फिरवून मोठ्यानें खो खो हंसला.

प्रकरण सातवें

# चांडाळचौकडीच्या गुजगोष्टी

आज पो. ए. साहेबांच्या कचेरीच्या मंडळींना दिवाणसाहेबांची मेजवानी होती. ही कचेरी नवलपूर संस्थानाच्या राजधानीला हटकून वर्षांतून एकदा यावयाचीच. भेटींत वार्षिक तपासणी हें काम मुख्य. पण त्याच्या अनुषंगाने इतर किती तरी कामांचा उलगडा कांहीं प्रकट रीतीने कांहीं गुप्त रीतीने या भेटींत होत असे. खुद्द खासे यजमान व खासे एजंटसाहेब यांच्या भेटी-परतभेटी आणि एक बडा दरबार व बडा खाना झाला म्हणजे सरकारी काम जवळ जवळ संपलें. पण निमसरकारी व खासगी, व फारच खासगी म्हणजे गुप्त, अशीं कामें अनेक असत. आणि खुद्दांच्या खाशांच्या कामाला एक दिवस पुरला तर अवांतर कामांना दोनतीन दिवस लागत. या कामांची मनांतून ओळख संस्थानिक व पो. ए. या दोघांनाहि असे. पण यांच्यादेखत तीं कामें होण्याला सहजच लाज व चोरी. म्हणून या दोन दिवसांत संस्थानिक व एजंट बाहेर कोठे तरी शिकारीला जावें अशी जुनी रीत असे.

पण नव्या संस्थानिकांनी या रीतींत पुष्कळच फरक केला. त्यांनी भेटी-परतभेटी ठेवल्या; पण दरबार अगदी मामुली केला. खान्याला बाहेरचे दहापांच लोकहि बोलावले नाहीत. भाषणांवर बहिष्कार घालून फक्त रीतीचा तेवढा बादशहाच्या नांवचा एक टोस्ट ठेवला, आणि शिकारीला तर अजीबात फाटा दिला. यामुळे पो. एजंट दुसरे दिवशींच परतले. पण शिरस्तेदारांची कचेरी एक दिवस मागे राहिली. अर्थात् दिवाणसाहेबांच्या घरची मेजवानी उकळावयाची राहिली होती. कारकून पट्टेवाले यांच्या बिदाग्या व बक्षिसें उकळण्याचें काम दिवसभर सुरू होतें. संध्याकाळीं सार्वजनिक मेजवानी व बैठकीचें गाणें झाल्यावर अगदी निवडक शेलकी खाशी चार मंडळी दिवाणसाहेबांच्या तिमजली दालनांत ख्याली खुशाली करीत होती. खाण्याचे प्रकार खालच्या माडींत होऊन गेले होते. पिण्याचे प्रकार वरच्या दालनांत सुरू होते. यामुळे संभाषण रंगांत आलें असल्यास नवल काय!

इतक्यांत सुभेदार येऊन दाखल झाले. त्यांना दिवाणसाहेबांच्या अंतरंगांत केव्हाहि प्रवेश असेच. सुभेदारांची डाळ भाऊसाहेबांजवळ फारशी शिजली नव्हती. पण सुभेदारांचा मुलगा भाऊसाहेब डबीरांच्या मांडीवर दत्तक जाण्यापासून दिवाणसाहेबांचाहि फायदा होता. म्हणून या कामीं जें जें होईल तें तें त्यांना फुगवून व सजवून कळविलेंच पाहिजे होतें.

दिवा.—" का, सुभेदार, तुमची शिकार कोठवर आली ?"

सुभे.—" शिकार प्रत्यक्ष साधेल तेव्हा खरी. भाऊसाहेबांशीं दत्तकाचें बोलणेंचालणें केलें आहे.

दिवा.—" भाऊसाहेब काय म्हणाले ?"

सुभे.—" माझ्या जिभेची मोहनी कुणावर पडल्याशिवाय राहील असें का वाटतें आपल्याला ? दिवाणसाहेब, एक सांगून ठेवतों आपणाला. मनुष्य म्हतारें झालें म्हणजे त्याचें मन भित्रें आणि कमकुवत होतें. आणि तसें झालें म्हणजे त्याला धर्मवेडाने पछाडलेंच म्हणून समजावें."

दिवा.—" पण भाऊसाहेब आणि धर्म या दोन शब्दांचा उच्चार तरी एका जिभेने करावा कीं नाही याची शंकाच वाटते मला. अगदीच आताचें मला फारसें माहीत नाही. पण पूर्वाश्रमींच्या भाऊसाहेबांचें चरित्र ज्यांना माहीत आहे त्यांना हें तुमचें बोलणें कसेंसेंच वाटेल. मला वाटतें कीं, जगांत असें कोणतेंच पातक नसेल कीं जें भाऊसाहेबांच्या हातून घडलेलें नाही."

सुभे.—" अहो, पण मनुष्यस्वभावाची गंमतच ही आहे कीं जितकें पूर्वीचें पापाचरण अधिक तितकें त्यावर धर्माचरण अधिकच खुलतें. मी तरी असे एकदोन नव्हे पण दहापांच पेन्शनर पाहिले आहेत कीं तरुणपणीं त्यांनी पूर्वी ज्या गिंडींतून मनसोक्त मद्यप्राशन केलें त्याच गिंडींतलें गंगाजळ हातावर पडल्याशिवाय पुढे ते आपोशणीच घेत नव्हते पानावर ! पूर्वी अभक्ष्यभक्षण करून झालेल्या अजीर्णावर उतारा म्हणून त्यांनी अलीकडे उपोषणावर उपोषणांची झोड उठविली आहे. पेन्शनच्या अर्जावर सही करतांना बोटांतून जें धर्मवेड अंगांत शिरतें तें मग कांही केल्या बाहेर निघतच नाही."

दिवा.—" वाः तर मग मला आता जपूनच राहायला पाहिजे. कारण पुढच्या वर्षी मी पेन्शन घेणार. आणि आपला तर निश्चय आहे कीं इतर चावट म्हाताऱ्यांसारखा आपण धर्मवेडाला थारा नाही देणार. "

सुभे.—" आपली गोष्ट कशाला! मी बोललों तर स्तुति होण्याऐवजीं निंदा भासेल. मी सांगतों कीं, धर्माचा प्रत्यक्ष बाप आला तरी त्याचे पाश आपणावर कधीहि पडावयाचे नाहीत. खंबीर कणखर मनाची गोष्टच वेगळी."

दिवा.—" बरें, भाऊसाहेब काय म्हणाले हें सांगावयाचें तुमचें राहिलें तसेच!"

सुभे.—"हो, भाऊसाहेबांच्या मानसिक दृष्टीपुढे मी जेव्हा का धर्म-शास्त्राची दुर्बिण धरली आणि परलोकांत निपुत्रिकांकरितां वाढून ठेवलेला नरक त्यांना दाखविला, तेव्हा ते लगेच म्हणाले, ठीक आहे, करतों विचार. माझा मुलगा दत्तक घेण्याची कल्पना त्यांना पटलीशी दिसली. अहो, आम्हीं एकाच गोत्राचे पडलोंना! झालें तर! हें सगळें झालें. पण—

इतकें बोलून आपण कांही अद्भुत गोष्ट सांगणार याचा सुभेदारांनी फारच मजेचा नाटकी आविर्भाव केला. भिवया चढविल्या. अंगाला पिळे दिले. इकडे तिकडे दोन–दोनदा पाहिलें. कानोसा घेतल्यासारखा केला. खाकरवसा काढला. आवंढा गिळला. आवाज खालच्या सप्तकांत नेला. हें पाहून दिवाणसाहेबांना म्हणावेंच लागलें कीं—

दिवा.—"पण काय? मध्येच माशी शिंकली कीं काय? बरोबरच आहे. म्हाताऱ्या माणसाचें मन जितकें धर्मवेडें असतें तितकेंच चंचळहि असतें!"

सुभे.—" छेः, आपण नाही बुवा भाऊसाहेबांना चंचल म्हणून दोष देणार. कारण मला तशीच घटकाभर आणखी मिळती त्यांच्याशीं, तर काम तिथेच फत्ते झालें असतें. पण इतक्यांत बातमी आली माडीवर कीं खाली घरांत टपालवाल्याने मागील दाराने बाईसाहेबांना एक पत्र आणून दिलें म्हणून! मग काय विचारता? स्वारी एकदम बिथरली. आणि मलाहि मग तिथून पाय काढावा लागला."

दिवा.—" हंः, आलें लक्षांत. बाईसाहेबांना पत्र आलें! तर मग तुमच्याहि लक्षांत आलेंच असेल भाऊसाहेब का बिथरले असतील तें?"

अगदी बुद्धिमंदतेचें ढोंग करून सुभेदार शुद्ध नंदीबैलासारखी मान हलवून म्हणाले—

**सुभे.**—" छे, आपल्या नाही बुवा लक्षांत आलें काय तें."

**दिवा.**—" अहो, यजमानसाहेब जाणार लवकरच बाईसाहेबांना सोडून त्यांच्या अशा अल्पवयांत. तेव्हा मागे राहणाऱ्या बाईसाहेबांनाहि नको पाहायला आपल्याला एखादा आधार! त्याचीच असेल ही तयारी! उगीच भाऊसाहेब विथरतात वाटतें? मी म्हणतों, परस्पर पत्रव्यवहार करूनच बाईसाहेब थांबतात. घरीं कोणी स्नेहीसोबती नाही आणीत भाऊसाहेबांच्या देखत हें भाऊसाहेबांचें भाग्यच समजायचें."

फिरून सुभेदारांनी बावळ्याचें सोंग आणून म्हटलें.

**सुभे.**—" छेः छेः, आपण नाही बुवा अशी कोणाची निंदा करणार."

**दिवा.**—" तर तर! तुम्हाला कुणाची निंदा करायची माहीतच नसेल जशी कांही!

**सुभे.**—" पण आपला तर्क काय चालतो तें नाही सांगितलेंत?"

**दिवा**—" तर्क काय सांगायचा? अहो, हें पत्र त्यांच्या कोणा प्रियकराकडून आलें असलें पाहिजे. आणि हा सोदा टपालवाला कुटण्या असून खासगी द्यायचें पत्र टपालांतून आलें असें सांगून बाईसाहेबांना आणून देत असेल. टपालांतून पत्र आलें म्हणजे तें परगांवच्या माणसाचें असणार असें अनुमान सहजच व्हावें आणि पत्राचा संशय न यावा अशी ही बतावणी दिसते सर्व. पण भाऊसाहेबांना याचा चांगला सुगावा असेल आणि म्हणूनच ते असे खवळले असतील! खासा रोजगार. एकंदरीने काय तरी हें मासलेवाईक कुटुंब!"

**सुभे.**—" तें कसें काय बुवा!"

**दिवा.**—" तें कसें? बापानें नोकरींत लांडयालबाड्या करून लाच खाऊन लाखों रुपये मिळविले. आणि आता त्याच्या व्याजावर नैवेद्यवैश्वदेव आणि धर्मकृत्यें चालविलीं आहेत. एकुलता एक मुलगा तो निघाला बदमाष राजद्रोही गळेकापू! बायकोची हकीकत तर ही आपण आतां बोलतोंच आह्मों. आणि मुलीने तर आडपडदाहि ठेवला नाही."

सुभे.—“ तें काय बुवा! तिने असें तें काय केलें ? ”

दिवा.—“ अहो बायकांची शाळा आणि वसतिगृह काढलेंन ना! झालें तर. शाळेंत मुलींना लिहायवाचायला शिकवावें, आणि मग त्यांनी त्या लिहिण्याचें चीज काय तें प्रियकरांना पत्रें लिहून करावें हेंच कीं नाही ? या शाळा म्हणजे कुंटणखान्याच्या तालमी असें मी तरी समजतों. एकूण काय! सुभेदार तुमच्या या डबीरांचें घराणें असें सारें किडी केंच आहे, समजलांत ?

सुभे.—“ पण एकच आडनांव अन् गोत्र झालें म्हणून त्यांतलीं सगळीं कुटुंबें सारखींच नसतात कांही. भाऊसाहेबांचें औरस घराणें निर्वंश होऊन जाईल. पण मी माझा मुलगा दत्तक देऊन त्यावर कलम कसें छान बांधतों पहा! माझा बाजीराव कांही भाऊसाहेब डबीरांच्या घराण्याच्या शाखेंत जन्माला आलेला नाही. झालें तर! त्यांच्या घराण्याचकीड मी काढून झाडून टाकणार.”

दिवा.—“ किती परोपकारी तुम्ही सुभेदार! आणि भाऊसाहेबांच्या संग्रहीं असलेल्या लाखों रुपयांचीहि कीड तुम्हीच धुऊन काढणार म्हणायचें!”

सुभे.—“ तें मात्र नाही हां तसें! ती कीड माझ्या एकट्याच्या हातून धुऊन निघायची नाही. त्या कामांत मला आपली मदत लागणार आणि ती मीं घेणार! माझा बाजीराव उद्या भाऊसाहेबांचा दत्तक मुलगा तर होऊं द्या, मग पहा कशी पैशाची कीड धुवून टाकतों ती. त्या पैशाला बाहेरचें ऊन्ह दिसलें म्हणजे कीड जाईल.”

दिवा.—“ अस्सें. हा इमारतीचा नकाशा तर ठीक झाला. पण तिचा पाया भरण्याची काय व्यवस्था केलीत ? कारण तुम्हांला माहीतच आहे कीं, दत्तविधानाला यजमानसाहेब प्रतिकूल आहेत. तैनात चालायची तर दरबारची परवानगी पाहिजे. यजमानसाहेब ती नाही म्हणाले तर वर पोलिटिकल एजंटाकडे जावें लागेल. तिकडे जायचें म्हणजे दरबारखर्च अंतस्थ करायला हवा. शिरस्तेदारसाहेबांना प्रसन्न करून घेतलें पाहिजे. पांच हजारांची तयारी पाहिजे. मारवाडी गांठून ठेवा.”

सुभे.—“ रतनचंदाला गांठून ठेवला आहे. अन् त्याला आपणाकडे पाठविला होता त्याच्या कामानिमित्त. मग तो कांही बोलला का आपणाशीं मला कर्ज देण्यानिमित्त ! ”

दिवा.—“ बोलला, पण तुम्हाला कर्ज द्यायला कचरतो जरासा. म्हणतो कसा ! रकम तयार आहे, पण थोडथोडकी नाही. आणि असामी तर म्हणे अशी! ”

सुभेदारांची अशी परस्पर कुचेष्टा करायला सापडल्यावर दिवाणसाहेब काय म्हणून सोडतील ! सुभेदारांना ती थट्टा झोंबली. पण दिवाणसाहेबांच्या ऐवजीं मारवाड्यावरच घसरून त्यांनी आपलें समाधान करून घेतलें. ते रागाचा आवेश आणून म्हणाले,

सुभे.—“ असामी तर अशी असें म्हणतो का हा तीन शेंड्या भामटा ! बरें म्हणावें, तर दाखवितोच तुला ही असामी कशी काय आहे ती !

पण कुचेष्टेंतून कुचेष्टा काढण्याच्या हेतूने सुभेदार म्हणाले—

दिवा.—“ पण मी एक असो, आपली तर भलावणी त्याला पटण्यासारखी आहे ना ! . ”

दिवा.—“ मी भलावणी देईन, पण ती तोंडीं. मी पडलों दिवाण, मला अशा कामांत लेखाने गुंततां येत नाही हें तुम्ही जाणतांच. मी तोंडीं त्याला काय सांगावयाचें तें सांगितलेंच आहे, त्याची नको काळजी ! ”

सुभे.—“म्हणजे सावज गांठावें मी अन शिकारहि मीच करावी ! ”

दिवा.—“ वाः तें काय म्हणून ! बंदूक भरून तुमच्या हातांत द्यायला मी सदा तयार आहेच ना ! झालें तर. शिवाय मुलगा श्रीमंताच्या घरीं दत्तक जायचा तो तुमचा आहे सुभेदार, माझा नव्हे. औरस मुलगा प्रसवण्याचे श्रम जसे जनक आईला करावे लागतात, तसे औरस मुलगा श्रीमंताच्या घरीं दत्तक द्यायचे श्रम जनक बापाला करावे लागतात. बारशाप्रमाणें दत्तविधानाच्या मेजवानीला हजर राहून लाडू खायचेच काम तिऱ्हाइताकडे असतें तें करावयला मी केव्हां नाही म्हटलें आहे सांगा बरें ! ”

दिवाणसाहेबांनी अगदीं काडीनेच काडी झाडल्यासारखें केलेलें पाहून

सुभेदारांना मनांतून खूपच राग आला. पण करतात काय? म्हणून तो गिळून त्यांनी लाघवीपणाचा प्रयत्न पुन्हा केला.

सुभे.—"दत्तविधान होऊं तर द्या! मग लाडूंना काय कमी? पण सर्वतोपरी कर्तुमकर्तुं आपल्याकडे आहे. मी दुबळा माणूस काय करणार? रतनचंदाला भीड आपणच घातली पाहिजे. आणि सरकारदरबारीं दत्तकाच्या परवानगीचें कामहि आपणच पार पांडू शकणार पो. एजंटसाहेबांपर्यंत. दिवाणसाहेब, मी सर्वस्वी तुमचा आहे. पदरांत घ्या!"

असें म्हणून सुभेदारांनी दिवाणसाहेबांचे प्रत्यक्ष पायच धरले. मात्र मनांत म्हणाले—'अडला हरि—गाढवाचे पाय धरी'!

असो. मग इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर संभाषणाची म्हणजे कुत्सित टीकेची संक्रांत खुद्द नव्या महाराजांवरच वळली. शिरस्तेदार म्हणाले—"पण काय हो दिवाणसाहेब! यंदांच्या आमच्या सत्काराचा थाट कांहीं वेगळाच दिसतो तुमच्या संस्थानच्या दरबारीं!

दिवा.—"अहो, इतका तरी थाट आहे हें भाग्य समजा. आहे हाच क्रम पुढे असा चालू राहिला तर पो. ए. साहेबांची नवलपूरला भेट चटश्राद्धाप्रमाणें तडकाफडकी उरकली जाईल. माझें काय म्हणा! मी एक वर्षानें दिवाण राहतों कुठें! पण तुमची शिरस्तेदारीचीं अजून पांच तरी वर्षें जायचीं आहेत!"

शिरस्तेदार डोळा मिचकावून हलक्या आवाजाने म्हणाले, "तुम्ही जाता कीं तुमचे यजमानसाहेबच जातात, म्हणजे अधिकारभ्रष्ट होतात, हें कुणी सांगावें?"

सुभे.—"खरें खरें तें! दिवाणसाहेब या संस्थानाच्या दिवाणगिरीला असे चिकटले आहेत कीं, जसा कांहीं सोन्याला डाकच! ते कसचे निघतात? उलट नवे यजमान मात्र तारेवर कसरत करणाऱ्या डोंबाऱ्यासारखे वाटतात. केव्हा उलथून खालीं पडतील याचा नियम नाही."

शिर.—"पण नव्या यजमानासंबंधाने गांवांत लोकमत तरी कसें काय आहे?"

दिवा.—“ तें काय तें सुभेदारच तुम्हाला सांगतील. त्यांना त्याचें चांगलें वर्णन करतां येतें.”

शिर.—“ काय हो सुभेदार, आपले यजमानसाहेब कसे काय आहेत? ”

सुभे.—“ अगदीं असायचे तसे! नाकडोळे जिथल्या तिथे ठीक आहेत.”

शिर.—“ लोक तर त्यांची स्तुति फार करतात. ”

सुभे.—“ करायचेच ! तरणें पोर. बरें गोंडस दिसतें. पोषाक साधा पण नीटनेटका करतें. तेव्हा लोक वाखाणणारच. ”

शिर.—“ कोणी म्हणतात, नवे यजमानसाहेब फार विद्वान आहेत !”

सुभे.—“ हो! विद्वान तर! भोवती पुस्तकांचे डोंगर रचून मध्ये अदृश्य होऊन बसतात खरे. मग काय वाचतात कीं झोंप घेतात कुणाला ठाऊक !”

शिर.—“ कोणी म्हणतात, नवे यजमानसाहेब फार उद्योगी आहेत !”

सुभे.—“ अहो उद्योगी कसचे? तिडतिडे म्हणा पाहिजे तर! एका ठिकाणीं कधी बूड टिकेल तर शपथ. काबाडकष्ट करून बाळपण गेलें. रिकामें बसवतें कुठे ? म्हणून हाताला येईल तो कारभार ओरबाडीत सुटतात झालें.”

शिर.—“ कोणी म्हणतात नवे यजमानसाहेब मोठे मर्यादशील आहेत.”

सुभे.—“मर्यादशील? हं: शिळपट हवें तर म्हणा! अहो, इंग्रज सरकारच्या कृपेमुळे कुणालाहि संस्थानची गादी मिळेल. पण श्रीमंतीचा थाट व मोठेपणा उपजतच अंगचा असावा लागतो ! भिकाऱ्याच्या पोरांनी ऐट आणि उन्मत्तपणा अंगीं उसना आणायचा म्हटला तरी तो कसा येणार ?”

शिर.—“ कोणी म्हणतात, नवे यजमान मोठे उदार आणि खर्चिक सढळ हाताचे आहेत ?”

सुभे.—“ फुकटचा पैसा उधळायला त्यांच्या काकाचें काय जाणार ?”

शिर.—“ कोणी म्हणतात, नवे यजमान भिकाऱ्यांचाहि नीट परामर्ष घेतात ? ”

सुभे.—“ होय. सजातीयांवर त्यांचें प्रेम आहेच तसें!”

शिर.—“ म्हणे, कोणाला नाही म्हणून म्हणतच नाहीत!”

सुभे.—“ नाही म्हणायला अंगांत धैर्य लागतेंना?”

शिर.—“ त्यांचा अंमल करडा होणार म्हणे ? ”

या ठिकाणीं मात्र दिवाणसाहेबांना मध्ये तोंड घातल्याशिवाय राहवेना. ते मिशांवर हात फिरवीत म्हणाले—" अरे जा ! माझ्यासारखा फर्डा दिवाण असल्यावर करडा अंमल करण्याची गोष्टच बोलायला नको ! फारच झालें तर तेरड्याचा रंग तीन दिवस टिकेल. अधाशासारखें हें याचें काम पाहूं, कीं त्याच्या कामाची चौकशी करूं, कीं त्याला शिस्त लावूं, असं चार दिवस करतील. आणि मग सहजच कारभाराचें अजीर्ण होऊन पडतील एखाद्या डोंगरावर जाऊन थंड हवा खात महिन्यानमहिने. मग इकडे आम्ही आहों आणि कारभार आहे. पाहून घेऊं. आणि ही तीन दिवस तरी कारभाराची हांव कां तें सांगूं ? "

शिर.—" सांगा पाहूं ? "

दिवा.—" अहो, अद्यापि लग्न झालें नाही म्हणून ! लग्न झालेल्या कांही संस्थानिकाना राणीसाहेबांचा समाचार घ्यायला दिवसाचे चोवीस तासहि पुरत नाहीत ! "

शिर.—"मला वाटतें, दिवाणसाहेब, यजमानसाहेबांकरिता एखादी मुलगी पाहाना चांगलीशी ! म्हणजे तुमच्यामागचा हा त्रास चुकेल थोडासा. "

सुभे.—" अहो शिरस्तेदारसाहेब, यांना मुलींना काय तोटा ? पण यजमानसाहेब बाशिंग बांधून घ्यायला तयार व्हायला पाहिजेतना ? आजवर कोणी संस्थानिक इतक्या वयाचा लग्नाशिवाय राहिलेला पाहिला आहांत काय?"

शिर.—" आमचा एजंटसाहेब तर मनांत आश्चर्यच करून राहिला आहे. मला हळूच एकीकडे तोंड करून काय म्हणतो लेकाचा—" काय शिरस्तेदार ? हा कोण कॅथॉलिक मंक का पोप तुमच्या नवलपूरच्या गादीवर बसला आहे ? लग्न न करण्याच्या शपथेने बांधल्यासारखा ? "

सुभे.—" आमच्या इथे तोंडची शपथ घेतलेली दिसत नाही. पण ब्रह्मदेवांनेच मुळांत घातलेली असली तर कुणाला ठाऊक ? मला वाटतें, यांचा जन्म असाच लग्नाशिवाय जाणार! बरें, यापुढे लग्न करायला निघाले तर यांच्याजोगी घोडनवरी यांना कुठली मिळणार ? "

दिवा.—" कां बरें ? भाऊसाहेब डबीरांची मुलगी विमल आहेना अजून अविवाहित " ?

सुभे.—" होय बुवा, एखादा आय. सी. एस. किंवा संस्थानिक मिळावा म्हणून जन्मापासून गौरीहर पूजित बसल्यासारखी दिसते खरी. पण ती शेवटीं लग्न करून आपली स्वतंत्रता गमवायला तयार होईल कीं नाही कुणी सांगावें ? "

शिर.—" आणि झाली म्हणजे मग यजमान विद्वान आणि यजमानीन बाई विदुषी ! मग काय थाट विचारावा ? कुठेहि जायचें तर अगदी उघड्या गाडींत जोडप्याने असेंच ना ? "

दिवा.—" अहो, हे कसचे थाट करणार ? थाट करणाराचें तोंड आताच दिसतें आहे. भिजास बादशहाची पण नांदणूक कैकाड्याची ! अगदी असा प्रकार आहे या आमच्या इथे. थाट पाहावा असा आमच्या जुन्या यजमानांचा ! त्यांच्या थाटाची का सर यांच्या थाटाला येणार आहे कधी!"

शिर.—" मी नाही पाहिले कधी तुमचे जुने यजमान ! त्यांचा थाट या कामीं कसाकाय होता, बुवा, सांगाना ! "

दिवा.—" असें पाहा. नवे यजमानसाहेब येऊनजाऊन एकटी एक यजमानीन मिरवणार अन् नाचविणार जिथे तिथे. पण आमच्या जुन्या यजमानांचा जनानखाना म्हणजे तो दरबारचा एकोणिसावा कारखानाच होता म्हणाना ? जातील तिथे नवी यजमानीन ! त्यांच्या अंतःपुराचें वैभव काय वर्णावें ? पोशिंदा अन् भोक्ता खरा ! यांच्या नांवाने स्त्रियांनी कुंकू लावतां लावतां सर्वत्र डबी संपायची एकाच बैठकींत! दसऱ्याच्या सणाला त्यांची स्वारी निघाली म्हणजे हत्ती–हत्तिणींच्यामागें जनानखान्यांतल्या पालख्यांची रांग लागायची. ती संपतां संपत नसे. जसा कांही तारकांतून चंद्र चालला आहे ! तें इंद्राचें ऐश्वर्य खरें. आमचे नवे यजमान म्हणजे तट्टाणीवर स्वार झालेले शामभट !"

शिर.—" बरें, यांनी लग्न न केलें म्हणजे फिरून आली दत्तकाची वेळ असेंच ना !"

दिवा.—"पण ऐकतों कीं यांना दत्तक संस्थाच नापसंत आहे म्हणे ! कायदा करणार दत्तकाविरुद्ध !"

शिर.—"सरकारचें आयतें बरेंच होईल. हे मेल्यावर यांचेंच उदाहरण

सांगून यांचाच कायदा दाखवून सरकार म्हणेल करा संस्थान खालसा. आणि यांनी लग्नच न केलें तर दत्तक कुणाच्या मांडीवर द्यायचा, तुमच्या कीं माझ्या? आणि दत्तकाचा अर्ज करणार कोण? संस्थानी प्रजेला कांही तो अधिकार पोंचत नाही. प्रजेला सरकार सांगेल—"तुमचा बाप गेला. आता त्याचे बाप आम्ही आलों त्याच्या जागेवर. कर भरा. स्वस्थ राहा. राजा कुणीका असेना? राज्य चालूच आहे!"

असो. अशा रीतीने अनेकांची अनेक प्रकारची नालस्ती करून झाल्यावर मदिरामदाने तिघांनाहि आपल्या ताब्यांत घेतलें, व मग त्या स्थितींत त्यांच्या तोंडून काय प्रलाप निघूं लागले व त्यांच्या हातून कशा प्रकारच्या चेष्टा घडूं लागल्या याचें वर्णन न करणेंच बरें! पोटांत कांहीच न ठरण्यासारखी स्थिति प्राप्त झाली म्हणजे सत्यवक्तेपणा, काव्य व वक्तृत्व या गुणांत मद्यपी मनुष्यावर कोणीहि ताण करूं शकत नाही!

प्रकरण आठवें

# भाऊसाहेबांचें भूत-भविष्य

पोष्टांतून आलेल्या पत्राचा सुगावा बायकोनें लागूं दिला नाही, तें पत्र फाडलें म्हणून मोकळी झाली, ही गोष्ट भाऊसाहेबांच्या मनाला लागून राहिली. भागानगरच्या कोणा मामेमावसबहिणीकडून खुशालीचें पत्र आलें होतें असें सांगितलें, यावर भाऊसाहेबांचा विश्वास न बसावा हें अगदीं साहजिक होतें. त्यांचा स्वभाव आधीच संशयी होता. आपल्या बायकोच्या वर्तनांत कधी कांही गैरशिस्त असें त्यांना पूर्वी आढळून आलें नव्हतें तरी, आपल्या स्त्रीच्या चारित्र्याविषयी पुरुषाच्या मनांत केव्हा कसा संशय शिरेल हें सांगवत नाही. नळराजाच्या पायाच्या टांचेंत पाणी न लागलेला राईएवढा भाग उरला, त्यांतून कलीनें त्याच्या अंगांत प्रवेश केला. परीक्षिति सर्पाच्या भयानें पाण्यांत बंगला बांधून राहिला, तरी साळणीच्या पाटींतल्या बोरांतून अळीच्या रूपानें तक्षकानें बंगल्यांत शिरून परीक्षितीला दंश केलाच कीं नाही? स्त्रियांच्या वागणुकीसंबंधाचा पुरुषांचा संशय हा असाच असतो. कली किंवा तक्षक यांच्या सारखा हा संशय पुरुष द्वेषबुद्धीनें मुद्दाम उत्पन्न करीत नाही हें खरें. पण त्याची भूमिका सहजासहजीच इतकी तयार असते कीं, निमित्त पुरण्याचा अवकाश! त्या पौराणिक अळीप्रमाणें तो संशय विषारी सर्पाचें रूप तेव्हाच धरतो, किंवा कापसाच्या राशीवर पडलेल्या ठिणगीप्रमाणें तो एकदम ज्वाळांच्या रूपानें भडकतो.

मनुष्याला रिकामपण असलें म्हणजे त्याला भ्रमाची बाधा फार होते. भाऊसाहेबांना वर्तमानपत्रांखेरीज दुसरें कांहीएक वाचण्याचा नाद नव्हता. एखादे दिवशीं वर्तमानपत्रें कमी असलीं म्हणजे ते सरकारी नोकरीच्या वेळचे कागदपत्रच चाळीत बसावयाचे.

आज भाऊसाहेब हेच कागदपत्र पाहत बसले होते. तों फिरून सुभेदारांची स्वारी आली. दत्तकप्रकरणीं बोलणें पूर्वी शिल्लक राहिलें तें आज पुढे

चालू करावें असा त्यांचा बेत होता. सुभेदार हे भाऊसाहेबांच्याच घराण्यांतले व एक प्रकारें आप्त. यामुळे सुभेदारांशीं ते गप्पागोष्टी बोलत असत. विशेष रहस्य नाही, पण विशेष तिरस्कारहि नाही. सुभेदारांच्या लाघवीपणामुळे भाऊसाहेबांच्या तोंडून एखादें काम निघालें कीं लगेच तें सुभेदारांनी उचलावें, करण्याची तयारी दाखवावी, यामुळे तें त्यांच्यावर केव्हा केव्हा सोपविलेंहि जाई. आज कागदपत्र चाळतांना हवें होतें तें पुडकें भाऊसाहेबांना आढळेना म्हणून आयत्याच आलेल्या सुभेदारांना ते म्हणाले—

" सुभेदार, चढा हो त्या स्टुलावर जरा, आणि त्या सिसवी फळीवर तांबड्या रेशमाच्या फडक्यांत कागद असतील ते खाली घ्या जरा. "

भाऊसाहेबांचें काम करण्याची संधि ही सुभेदारांना पर्वणीच वाटली. त्यांनी ' हो, हो ' म्हणून चटदिशीं स्टुलावर चढून ते कागद काढले, व भाऊसाहेबांपुढे ठेवले. आणि भाऊसाहेब ते चाळायला सुरुवात करणार तोंच सुभेदार म्हणाले–

सुभे.—" आपण कशाला तसदी घेतां ! धुरळ्याचा हात लागून चष्मा खराब व्हायचा. मीच चाळतों आणि सांगतों कसले कसले कागद आहेत ते. "

अशा युक्तीने भाऊसाहेबांच्या घरच्या कागदपत्रांत आपला प्रवेश झाला तर तो सहजच सुभेदारांना इष्ट होता. पण सुभेदारांनी जें कारण म्हणून पुढे केलें तेंच बिचारें थोडें आडवें आलें. भाऊसाहेबांच्या घरांत! आणि हाताला लागण्यासारखा कोणच्याहि सामानावर धुरळा ! काय बिशाद ! हा धुरळा म्हणजे तो सामानावर नव्हे तर आपल्या अब्रूवर उडणारा केर, असें या संसारदक्ष म्हाताऱ्याला वाटत असे; म्हणून त्याच भावनेने तो सुभेदारांना म्हणाला !—

भाऊ.—" काय म्हटलेंत सुभेदार ! माझ्या घरीं सामानावर केर ! गोष्ट होणार नाही. पाहा हात लावून पाहा, पैज लावीन, दंड देईन, धुरळ्याचा एक कणहि मिळेल तर. "

सुभेदारांनी त्याच स्वच्छतेच्या कौतुकाचें निमित्त केलें. " वः याचें नांव स्वच्छता " असें म्हणून ते भराभर कागद चाळूं लागले. पांच–चार कागद होतांच ते म्हणाले–

**सुभे.**—" हें तर आपल्या सर्टिफिकीटांचें पुडकें आहे. ? "

**भाऊ.**—" ठीक ठीक. तर मग हवें होतें तेंच पुडकें सांपडलें. आज जरा रिकामपण होतें. तेव्हा सर्टिफिकीटें काढून चाळून निवडून त्यांचें एक छोटेसें पुस्तक छापावें असें मनांत आलें होतें म्हणून पाहात होतों. "

**सुभे.**—" वः, ही तर फारच चांगली योजना होईल. जुन्या आठवणी या, ज्याच्या त्यालाच काय पण विषयपरत्वें इतरानाहि मनोरंजक होऊं शकतात. आणि इतिहास बनवितात ते अशाच आठवणींच्या सहाय्यानें. आपल्या नोकरीचा अनुभव म्हणजे तो एका काळचा इतिहासच म्हणाना ! मी वाचूं का एकेक सार्टीफिकीट काढून? म्हणजे त्यासंबंधाची अवांतर माहिती आपण मला सांगूं शकाल. "

स्तुतीचे शब्द आपले आपण वाचून आनंद होतोच; पण ते दुसऱ्याच्या हातचे तिसऱ्यानें वाचून आपणाला ऐकविले तर त्याचें सुख त्रिगुणित होतें ! यामुळे सुभेदारांना हवी होती ती परवानगी सहजच मिळाली. त्यांनी एकेक सर्टिफिकीट काढावें व वाचावें असा क्रम सुरू झाला.

**सुभे.**—" हें पहा पहिलें सर्टिफिकीट ! खाली अरंडेल कीं एरंडेल अशा सहीचीं अक्षरें दिसतात. "

**भाऊ.**—" होय. एरंडेलसाहेबाचें सर्टिफिकीट ! एरंडेलसाहेब म्हणजे पराकाष्ठेचा गोड माणूस. काय लिहितो बरें त्यांत ? "

**सुभे.**—" भाऊसाहेब डवीर हा माझा शिरस्तेदार होता. तेव्हा दोन गाडवांवर लादून येणाऱ्या टपालाचा हा एकटा फडशा करी ! भाषा जरा संदिग्ध दिसते नव्हे का ? "

**भाऊ**—" छेः छेः, साहेब लोक शब्द संदिग्ध किंवा वेळीं वाईटहि वापरतील, पण त्यांचा हेतु मात्र स्पष्ट व स्तुत्य असतो हो! तें सर्टिफिकीट छापायचेंच. त्यांत माझ्या कामाच्या तरतरीबद्दलचा, उरकाबद्दलचा दाखला आहे. हं. बरें तें दुसरें ? "

**सुभे.**—" शिवन-खान अशा कसल्याशा सहीवर आहे तें."

**भाऊ.**—"आठवलें. आमच्या खानसाहेबांसारखा सुस्वभावी अधिकारी

मिळायचा नाही कुठें. कुत्र्यासारखा वेळीं अंगावर ओरडेल. पण दांत लावायचा नाही. काय लिहितो बरें तो त्या कागदांत? ”

सुभे.—“ आमच्या मडमसाहेब विलायतेला गेल्या, घरीं कोणी पाहणारें नव्हतें. तेव्हा मिस्टर डबीर यांनी मला कांही कमी पडूं दिलें नाही. माझी सर्व प्रकारची सरबराई त्यांनी अगदी उत्तम प्रकारें ठेवली. सरबराई अशी करावी त्यांनीच. ”

भाऊ.—“ ठीक. हें सर्टिफिकीट मला अगदीं न मागतां दिलें बरें का? जो स्वतःची किंवा लोकांची सरबराई उत्तम ठेवूं शकत नाही तो अंमलदार कसचा! ठीक हें छापायचें. बरें पुढचें!”

सुभे.—“ तें कोणा फेअरहॅड साहेबाचें दिसतें. अक्षर मात्र किती किचकट आहे हें! शाळेंत मास्तराने कधीं पुस्तीवर खरड्यावर घातला नव्हता जसा कांही. ”

भाऊ.—“ छेः छेः! साहेब लोकांच्या अक्षराची मौजच अशी असते. किचकट. पण तेंच मोठें वळणदार! कोणी म्हणेल कुत्र्या—मांजराचे पाय. पण तेच पाय कसे अगदी ठेक्यावर पाऊंडावर पडायचे! जशी कांही लष्करी जवानांची परेडच. लेफ्ट तर लेफ्ट राईट तर अगदी राइटच! दोनदां लेफ्ट किंवा दोनदां राईट एकामागून एक पडायचेंच नाही कसें तें! हं—काय लिहितो आमचा फेअरहॅडसाहेब? सर्टिफिकीट बहुधा शांतापूरच्या दंग्याच्या वेळचें असावें!”

सुभे.—“ मिस्टर डबीर याच्यासारखा धोरणी मनुष्य मिळायचाच नाही. दुष्काळाच्या सालीं त्यानें वाटेल त्या तऱ्हेनें धान्य मिळवून चार दिवसपर्यंत स्वस्त दराचें दुकान बाजारांत लावलें त्यामुळे मोठें काम झालें. काय काम झालें भाऊसाहेब? ”

भाऊ.—“ अहो काम कसचें? एका स्वस्त दराच्या दुकानानें का कोठें गांवचा दुष्काळ निभावतो? पण त्या दुकानचे स्वस्त भाव सहीनिशीं लिहून घेऊन साहेबाला सरकारकडे रिपोर्ट करतां आला कीं, दुष्काळच्या गप्पा बऱ्याच खोट्या आहेत म्हणून! झालें. रिपोर्ट टपालांत पडल्याबरोबर ज्या वाण्यांकडून धान्य आणलें होतें त्यांना मी म्हटलें “ स्वस्त

दरांचें तुमच्यावरचें संकट टळलें. वर रिपोर्ट केला दुष्काळ नाही म्हणून. आता चालूं देत तुमचे जुने महागाईचे दर. फक्त स्वस्त दराचें दुकान लावण्याकरिता तुमच्याकडून धान्य नेलें त्याचे पैसे मात्र मजजवळ मागायचे नाहीत."

**सुभे.**—"अरे होय कीं ! खरें धोरण तें हेंच. आम्हच्यासारखा माणूस गडबडून जायचा. पण हें सर्टिफिकीटहि छापणारच का ?"

**भाऊ.**—"कां नाही ? खरें धोरण संकटाच्या वेळींच दिसायचें.

**सुभे.**—हे हें सर्टिफिकीट निघालें–कुणाचें ? 'डफर' अशी सही आहे खाली स्वच्छ."

**भाऊ.**—"वः डफर म्हणजे केवढा बुद्धिमान साहेब होता म्हणतां ! "

**सुभे.**—तो लिहितो. "मिस्टर डबीर कोतवालीचें काम करीत होता. तेव्हा चोऱ्या मनस्वी होत. परंतु फिर्याद म्हणून सहसा पुढे येत नसे. इतका त्याचा अंमल करडा असे." छेः, भाऊसाहेब. याचा अर्थ लोक नीटसा करणार नाहीत. मला वाटतें हें सर्टिफिकीट छापूं नये. "

**भाऊ.**—"अहो, लोकांच्या अर्थाशीं मला काय करायचें आहे ! अंमल करडा होता यांत काय ती खरी स्तुति आहे. तें सर्टिफिकीट छापायचेंच."

असो; अशाच रीतीने इतरहि सर्टिफिकीटें वाचून झालीं. पण त्यांतलें एकहि छापण्याच्या दृष्टीने भाऊसाहेबांनी नापास केलें नाहीं. रेशमी रुमाल परत बांधून झाल्यावर सुभेदार म्हणाले—

**सुभे.**—"भाऊसाहेब, आपल्या अंमलदारीची कीर्ति मीं पुष्कळ ऐकली होती. पण हीं सर्टिफिकीटें वाचायला मिळालीं नव्हतीं कधीं. हें पहा, आपलीं हीं सार्टिफिकीटें म्हणजे आपल्या एकट्या व्यक्तीचें भूषण नसून आपल्या डबीर सुभेदार घराण्याचें भूषण आहे. तेव्हा माझी विनंति अशी आहे कीं, हीं सार्टिफिकिटें मी आपल्या खर्चाने सुंदर छापून काढून त्यांचें पुस्तक बनविणार. मला तुमची परवानगी असावी. "

भाऊसाहेब खूष झाले. त्यांची कळी उमलली. ते म्हणाले—

**भाऊ**—"हें पहा. नोकरपेशाचें खरें बक्षीस म्हणजे सर्टिफिकीटेंच होत. पैसे काय मिळाले आणि खर्च झाले ! पण सर्टिफिकीटांतला गौरव

हीच काय ती टिकाऊ वस्तु आणि मौल्यवान मिळकत असें मी तरी समजतों. मग तुम्हांला काय वाटेल तें वाटो !"

सुभेदारांनी या शेवटच्या वाक्याने काळजाला अगदी सर्पदंश झाल्याप्रमाणे उसळी मारली. सात्त्विक रागच तो ! मग उसळी कां न येईल ? सर्टिफिकीटें आपल्या खर्चाने छापण्याचा उदारपणा या महात्म्याने नुकताच प्रगट केला. आणि असें असून पुन्हा भाऊसाहेब म्हणतातच कीं, "तुम्हांला काय वाटायचें तें वाटो !" काय हा अन्याय किंवा उलटा न्याय ? अगदीं दुखवट्याच्या स्वराने डोळ्यांत अश्रु आणून सुभेदार म्हणाले—

**सुभे.**—"क्षमा करा भाऊसाहेब. हें बोलणें आपणांला शोभतें का ? आपल्या सर्टिफिकिटांचें मीं मघाशींच वर्णन केलें ना ! मग आपणांला फिरून शंका कां आली ? मला त्यांची किंमत वाटण्याची ! ज्या गृहस्थाला अशीं सर्टिफिकीटें लाभलीं, म्हणजे ज्याने नोकरीसारख्या कठिण कामांत असें यश मिळविलें, म्हणजे ज्याची कर्तव्यबुद्धि इतकी लोकोत्तर आहे, म्हणजे जो बाप म्हणून मुलांच्या पुढें आदर्श असा म्हणून ठेवण्यासारखा आहे, त्याच्या मांडीवर मुलगा दिल्याशिवाय मीं राहणार नाही हीच माझी शपथ ! कृपा करा आणि मला दत्तविधानाची तिथि ठरवून सांगा. दत्तविधानाचा ईश्वरी योग असल्याशिवाय काय माझ्या मनांत ही अशी स्फूर्ति पुनः पुनः होत आहे ? आपण व मी दोन असें मी मुळींच मानीत नाही. माझ्या मुलाच्या नशिबांत हा योग आहे हें मला ज्योतिषाने सांगितलेंच. मग आपल्याला त्या शास्त्राबद्दल काय वाटत असेल तें वाटो ! आपला प्रभाकर जीवंत असता तर माझा हा स्वार्थत्याग वांचला असता. असो, तो काळ्या पाण्यावर गेल्याचें आपलें दुःख, आणि माझ्या बाजीरावाला तुमच्या मांडीवर देतांना "हा यापुढें माझा नाही तुमचाच मुलगा झाला" असें म्हणतांना मला होईल तें दुःख सारखींच समजा !"

इतकें बोलून सफाईदार नटाप्रमाणे सुभेदारांनी आपलें "निष्क्रमण" केलें.

सुभेदार निघून गेल्यार भाऊसाहेब एकटेच आपल्याशीं विचार करीत बसले होते. हा गृहस्थ कारण नसतां माझीं सर्टिफिकीटें आपल्या खर्चानें छापून सुंदर बुक काढतों म्हणतो. यावरून आपल्यावरचा त्याचा लोभ अगदीं

उघड दिसतो याविषयीं त्यांना शंका उरली नाही. आणि ते कागद त्याच्या स्वाधीन करण्याच्या निश्चयाने त्यांनी आपल्या गड्याला माडीवर हाक मारली. एक चिटी लिहिली. आणि त्याबरोबर सर्टिफिकीटांचें पुडकें देऊन तीं दोनहि "सुभेदारांच्या जवळ नीट नेऊन देऊन उत्तर आण" असें सांगून त्याची रवानगी केली.

इतक्यांत एक जटाधारीबुवा खाली आल्याची वर्दी वर आली. आणि परवानगी मिळतांच त्या बुवाला आणून पोचवून गडी सांगितल्या कामाला निघून गेला.

जटाधारी बुवांनी अंगावर फक्त एक शालजोडी घेतलेली असून खांकेंत एक पोथी, हातांत एक रुद्राक्षांची माळ, कपाळाखाली बनारसी पद्धतीचा शेंदराचा टिळा, असा त्यांचा थाट होता.

या वसा वगैरे झाल्यावर बुवांनी न बोलतां भाऊसाहेबांकडे बराच वेळ नुसतें रोखून पाहिलें व सामुद्रिक पाहण्याकरिता बेधडक त्यांचा हात मागितला. मागितला काय ! पण जवळ जवळ तो आपणच ओढून हातांत घेतला म्हणावयला हरकत नाही.

ज्योतिषी व सामुद्रिक वेत्ते यांना अशा प्रकारचा अतिप्रसंग बहुधा क्षम्य असतो. फीचा करार आधी पटेल तेव्हा मग कागदांना हात लावणाऱ्या वकीलासारखी बुवांची गोष्ट नसते. ब्रह्मचर्य, निःस्पृहता, व गूढ विद्येचें ज्ञान यांच्या बळावर जगाला कस्पटाप्रमाणें मानण्याचा हक्क कोणालाहि सहजच येणार! या प्रत्येकांतलें खरें किती याची परीक्षा पुढें काय होईल ती होवो किंवा न होवो. पण डोक्यावरच्या जटा, हातांतली रुद्राक्षांची माळ, अंगावरील शालजोडी आणि कपाळावरची शाक्तपंथी शेंदराची टिकली ही, वरील गुण गृहीत घेऊन चालण्याविषयीं, प्राथमिक भलावणी देतात व जामीनकी पटवितात यांत शंका नाही. मौज ही कीं ज्यांचा ज्योतिषावर विश्वास असतो त्यांचा त्याबरोबर दुसराहि एक विश्वास असतो. तो हा कीं, दैवांत तसा योगच असतो किंवा ईश्वरेच्छेची विशिष्ट प्रेरणाच असते म्हणूनच, ज्योतिष्याला आपल्याकडे त्याच्या पायांनी, बोलावणें न पाठवितां, चालून येण्याची बुद्धि होते. आणि वरती हें कीं, तो आला असता आपली गांठ

पडते ! रानांत वाघाची आणि त्याच्या भक्ष्याची गांठ पडण्याचीहि अशीच मीमांसा करतां येणार नाही काय ? ज्योतिषी नुसता हातच ओढून घेतो. पण वाघ बैलाचा गळाच पकडतो. कसेंहि असलें तरी योगायोगाची उपपत्ति एकच ! ज्योतिषीबुवांनी हात ओढून घेतांच वाघापुढच्या बैलाप्रमाणे भाऊसाहेब स्तंभितच झाले.

थोड्या वेळानें संभाषण सुरु झालें. " बुवासाहेब कुठून आले " ?

या प्रश्नाला बुवासाहेबांनी उत्तर दिलें तें फक्त एक संस्कृत श्लोक देवनमनाचा म्हणून. अर्थ न कळणारा संस्कृत श्लोक म्हणजे भ्रमाचें वातावरण उत्पन्न करण्याला जसा कांही देवळाच्या बंद गाभाऱ्यांत घातलेला धूपच !

भाऊ—" काय बुवासाहेब, म्हटलें आपण कुठचे ? आज इकडे कुठून आलां " ?

'जरा थांबा' असें म्हणण्याकरिता नुसती मान हालवून बुवासाहेबांनी आणखी एक संस्कृत श्लोक ठेवून दिला.

भाऊ—" नाही, म्हटलें, आपलें कोणत्या शास्त्राचें अध्ययन झालें आहे!"

बुवांनी पाहिलें कीं श्लोकांच्या तोफांची सरबत्ती पुरेशी झाली. आता लाघवी भाषणाचें पायदळ पुढे ढकलायला हरकत नाही.

ज्यो.—" कसचें शास्त्र आणि कसचें अध्ययन ! शास्त्र हें मनुष्यजीवितापेक्षा अधिक मोठें आहे. आणि अध्ययन म्हटलें कीं, त्याला विघ्नं फार. आता विचारतांच तर सांगतों कीं, या ईश्वरी घरच्या प्राण्यानें ज्योतिषाचा व सामुद्रिकाचा अभ्यास केला आहे थोडासा. "

असें म्हणून हात पाहतां पाहतां गुरुमाउली गुरुमाउली असा मंत्र म्हणण्याचा सपाटा बुवांनी चालविला. सामुद्रिक पाहत असतां जें ज्ञान होत होतें तें बुवांना विस्मयकारक वाटत असावें असें अनेक लक्षणांनी त्यांनी दर्शविलें. केव्हा खेद तर केव्हा आश्चर्य, केव्हा आनंद तर केव्हा दुःख, केव्हा आशा तर केव्हा निराशा! अशा परस्परविरोधी विकारांचें तुमुल युद्धच त्यांच्या मनोभूमीच्या समरांगणावर चालू असावें ! कांही वेळानें सामुद्रिक फलावरून भाऊसाहेबांचें भूतभविष्य त्यांना सांगण्याचें बाजूला ठेवून, बुवांना आपलें आत्मचरित्र भाऊसाहेबांना सांगण्याची स्फूर्ति झालीशी दिसली.

पण तें ऐकतांना कंटाळून भाऊसाहेब उतावळे झाले व म्हणाले—

भाऊ.—"पण आपण माझा हात पाहिला त्याचें सांगायचें राहिलेंच आहे."

ज्यो.—"वः, तें मी कसें विसरेन? आपणाला कुलदीपक मुलगा लाभणार आहे."

हें ऐकून भाऊसाहेब विचारांत पडले. तें पाहून बुवा म्हणाले,—

ज्यो.—" महाराज, विचार कसला करता ? ईश्वराने आपल्या संपत्तीला अमर संततीची जोड दिली नाही हें मी जाणत का नाही ? आपला औरस पुत्र असावा, पण त्याचा जन्मभर वियोग व्हावा, असाच योग दिसतो. तसेंच आपल्या पोटीं यापुढे पुत्र-संतति नाही हेंहि दिसतेंच आहे.

भाऊ.—" हेंहि नाही आणि तेंहि नाही. म्हणून म्हणतों कीं, कुलदीपक पुत्र लाभणार म्हणतां तो कसा हें कळत नाही."

ज्यो.—" आपणाला पुत्र लाभणार तो दत्तक घेऊन ! आणि त्याचा योगहि शीघ्र दिसतो. मी येऊं आता ?"

ज्योतिषीबुवा सर्वस्वी निरपेक्ष दिसले, व त्यांना कांही द्यावें असें भाऊसाहेबांच्याहि मनांत नव्हतें. पण शिष्टाचाराच्या बहाण्याने भाऊसाहेब बुवांना क्षणभर अधिक बसवून घेण्याकरिता म्हणाले—

भाऊ,—" बुवासाहेब, मलाहि या तुमच्या शास्त्राचा थोडासा नाद आहे बरें का. "

ज्यो.—" समजलों समजलों ! व्यासंग आहे ! योग्यच आहे !"

भाऊ—"छेःछेः व्यासंग कसचा म्हणा. थोडासा नाद आहे आणि तोहि अलीकडेच लागला."

ज्यो.—"वृद्धपणीं दृष्टि अंतर्मुख होते. यामुळे अतींद्रिय गोष्टींचें ज्ञान लवकर व बिनचूक होऊं लागतें."

भाऊ--" पेन्शन घेण्यापूर्वींहि मला नाद होता. पण तो वेगळा. तें ज्योतिष थोडें वेगळ्या प्रकारचें होतें."

विश्वास उत्पन्न झाला म्हणजे थोडा विनोद सुचतो. कारण मन खुलें व प्रसन्न होतें.

**ज्यो.**—“ तो वेगळ्या प्रकारचा नाद म्हणजे पण शास्त्राचाच यांत काय शंका ! ”

**भाऊ**—“ म्हणजे असें. तुमच्या ज्योतिषशास्त्राला नऊ ग्रह लागतात. पण मी नोकरींत असेपर्यंत फक्त दोनच ग्रह जाणत होतों.”

**ज्यो.**—“ ते कोणते ? ”

**भाऊ**—“ सूर्य आणि चंद्र ”—

**ज्यो.**—“वः,ते तर ज्योतिष शास्त्रांतले मुख्यच ग्रह.त्यांचें ज्ञान अवश्य हवें.”

**भाऊ**—“ पण माझा सूर्य कोणता होता हें माहीत आहे का ? ”

**ज्यो०**—“ मला गरीबाला काय माहीत ? ”

**भाऊ**—“ माझा सूर्य म्हणजे कचेरींतल्या साहेबाचा चेहरा. त्या चेहऱ्याकडे पाहून मी शुभाशुभ योग शकुन सगळें कांहीं ठरवीत होतों. त्याच ग्रहापासून माझ्या संसारसुखाला लागणारी ऊष्णता मिळत असे. तें तोंड नेहमीसारखें गोरेंगोमटें फटफटीत असलें म्हणजे माझे ग्रह अनुकूल. मग माझ्यावर सौख्य वृष्टि. पण तो चेहरा रागानें लाल झाला म्हणजे सारे ग्रह बाराव्या स्थानीं ! सौख्याचा उन्हाळा ! माझें दिनमान आणि ऋतुमान त्या सूर्यावर अवलंबून असे. ”

**ज्यो**—“ हः हः हः आपण म्हणतां यांत विनोद आहेच. पण सत्यांहि नाहीं असें नाहीं. बरें आपला चंद्र कोणता ? ”

**भाऊ**—“ अहो, सरकारी नोकरांचा चंद्र म्हणजे त्यांच्या प्रिय पत्नीचा चेहरा! कचेरींत झालेला सर्व त्रास पीडा घरीं कुटुंबाच्या चेहऱ्याकडे पाहून निवावयाचीं दुसरें साधन काय ? बरें, आपणाला थोडे प्रश्न विचारावेसे वाटतात. विचारूं का ? ”

**ज्यो**—“ विचारा विचारा ! गुरुस्मरण करून सुचेल तें सांगेन. ”

पण प्रश्न विचारले जाण्याच्या आधीं आगाऊच थोडी भानगड उत्पन्न करून ठेवावी म्हणजे उत्तरांत संशयाचा फायदा घेऊन थोडीफार फिरवाफिरव करतां येते. या हेतूनें बुवाजी म्हणाले—

**ज्यो.**—“ आपला प्रश्न त्रिप्रश्नाधिकारांतला आहे कीं पंचप्रश्नाधिकारांतला आहे ? ”

भाऊसाहेबांनी आधीं या प्रश्नाचें उत्तर द्यावें तेव्हा मग आपला प्रश्न विचारावा! असें झाल्याने त्यांना मोठी अडचणच पडली. पण अगदी अज्ञान तर दिसू नये म्हणून, त्रिप्रवर पंचप्रवर यासारखी दिसणारी ही भानगड टाळण्याकरिता विनय स्वीकारून ते म्हणाले—

**भाऊ.**—"आपल्यासारख्या ज्योतिषापुढे माझा कसला अधिकार? मला ज्योतिषाचा नाद असला तरी एका प्रश्नांत तीन तीन पांच पांच प्रश्न विचारण्याइतका माझा अधिकार नाही. म्हणजे माझा तितका अभ्यासच नाही. मला सुचेल तसा एकेरीच प्रश्न विचारीन."

**ज्यो.**—"तरीहि ठीक आहे."

**भाऊ**—"मला किती भार्यांचा योग आहे?"

बुवांनी तर्काच्या गणिताला मनांत सुरवात केली. समोर भिंतीवर भाऊसाहेब व त्यांचें कुटुंब यांचा फोटो होता. त्यांत भाऊसाहेब उतारवयाचे व कुटुंब तरुणवयाचें दिसत होतें. तेव्हा द्वितीय कुटुंब सांगून टाकावें असें त्यांनी ठरविलें व म्हणाले—

**ज्यो.**—"आपला हा द्वितीय भार्यायोग असावा असें दिसतें."

**भाऊ**—"छेः थोडें चुकलें. माझी हल्ली तिसरी बायको आहे!"

**ज्यो.**—बरोबर. मग चुकलें कसें? आमच्या ज्योतिषशास्त्रांत असा नियमच आहे मुळी कीं, भार्या योग पाहतांना एक कुटुंब मुळीं सोडायचेंच. कारण पुरुषाचें पहिलें लग्न व्हायचेंच! म्हणून एक भार्यायोग म्हटला म्हणजे दुसरी बायको समजावी, आणि द्विभार्या योग म्हटला म्हणजे तिसरी बायको समजावी! मी आपल्याला याच अर्थानें द्विभार्यायोग सांगितला!"

इतक्यांत माजघराच्या माडीतून "बाबा, बाबा मी येऊं का"? अशी उतावळेपणाची जोराची व थोडीशी रागाचीहि हाक ऐकूं आली. तिला "ये बरं बाळ." असें उत्तर मिळालें.तेव्हा भाऊसाहेब व ज्योतिषीबुवा दोघेहि उठले. बुवांनी घाई घाईने जिना गांठला, व त्यांना जिन्यापर्यंत पोंचवून भाऊसाहेबहि गादीवर येऊन बसले व त्यांनी चिरूट शिलगावला.

———

## प्रकरण नववें

# विक्रम कीं हरून-अल्-रशीद ?

आज श्रावण वद्य अमावास्या होती. अमावास्या ही काळोख्या रात्रीची परमावधी! पण तीच एका अर्थाने पुढच्या चांदण्या रात्रींची प्रस्तावना असते. रोग अमावास्येच्या मध्यरात्रीपर्यंत बळावून मृत्यू आणतात. पण त्या मध्यरात्रींपर्यंत जो रोगी वांचला तो तेथपासून पुढे बरा होण्याच्या मार्गाला लागतो म्हणतात. म्हणून अमावास्या हा एका युगांतराचा संधिकाल होय. आमच्या नवलपूरच्या या कथानकांतहि आजची अमावास्या अशीच युगांतर करणारी ठरली !

आज सकाळीं ते दोघे मित्र बोलत बसले असतां महाराज नवलराय मनोहरावर रागावून त्याला म्हणाले—

**नव.**—" मनोहर, मीं तुला पूर्वी पन्नास वेळां सांगितलें असेल तेंच फिरून आज आणखी एक वेळ सांगतों. तुझ्या माझ्यांत कांही फरक मानायचा नाही. बाळपणचे मित्र हेंच आपलें नातें. मला तूं महाराज म्हणतोस 'अहो जाहो', 'आपण' अशा शब्दांनी बोलतोस तें मला बिलकूल आवडत नाही."

**मनो.**—" नसेल. पण तुमच्या राजपदाची वाट काय ? "

**नव.**—" त्या राजपदामुळे प्रेमळ मित्रव्यवहाराचें सुख जर नष्ट होईल तर तें राजपद सुद्धा सोडून द्यायला मीं तयार होईन. केवळ राजा म्हणून मला कुणाशीं मन मोकळें करून बरोबरीच्या नात्याने बोलायचालायला बंदी, तर मी आणि माझ्या कैदखान्यांतले बंदीजन दोनहि सारखेच म्हणायचें !"

**मनो.**—" राजेसाहेब, भलताच आग्रह धरण्यांत काय अर्थ ? तुमच्याशीं लहानपणासारखें अगदीं सलगीने खेळीमेळीने वागावें असें मलाहि नसेल कां वाटत ? पण तुमची मर्यादा तुमच्याकरितां नसली तरी लोकांकरितां तरी मला संभाळलीच पाहिजे. आणि लोकांत असतांना हातून चुकून

अमर्यादा होऊं नये, म्हणून खासगी वागणुकींतहि त्या मर्यादेची सवय मला लावून घ्यायला पाहिजे. तुम्ही मनाने कितीहि उदार, आपपरभाव न मानणारे, उच्चनीचभाव न मानणारे असलां, तरी आता राजपदावर आहां. संस्थानिक आहां. तुमची मर्यादा बाळपणचा मित्र म्हणून मीं न ठेवली तर लोक हसतील ना ! तुम्हांला म्हणतील वेडे आणि मला म्हणतील मूर्ख आणि उन्मत्त. आमच्या आईच्या चित्राची तुम्ही आपल्या खोलींत देवतेसारखी पूजा करतां, कबूल. पण समजा, आई आज जिवंत असती तर ती तरी तुम्हाला चार लोकांदेखतां अरे जारे म्हणाली असती काय ? ती व तुम्ही अगदीं एकटे असतां तिने कदाचित् तुम्हाला प्रेमाने अरे जारे म्हटलें असतें एखादे वेळीं. नाही, एखादे वेळीं तुमचा कान पिळला असता किंवा गालगुच्चाहि घेतला असता, थट्टेच्या रागाने. पण लोकांत नव्हे ! दुसऱ्या कोणाहि माणसासमोर तिला तुम्हाला महाराज हाच शब्द योजल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. बहुमान करणें हें व्यक्तीपेक्षा स्थानमहात्म्याकरिता असते. दिलीप राजाने अजाला आपल्या हाताने सिंहासनावर बसविलें, पण तसें केल्याबरोबर त्याने आपल्या मुलालाच राजा म्हणून नमस्कार केला. शंकराचार्य जेव्हा संन्यासातला उपसंन्यास घेऊन आपल्या एखाद्या शिष्याला आपल्या जागीं गुरुपीठावर बसवितात, तेव्हा त्या शिष्याला गुरु म्हणून एकवार अभिवादन करतात. राज्य हवें तर महाराज म्हणवून घेतलेंच पाहिजे राजाने, प्रत्यक्ष आईकडूनहि. आता याचा सूड म्हणून तुम्ही जर उलट मला नुसतें मनोहर असें न म्हणतां मनोहरपंत म्हटलें तर ती अडचण मीहि सोशीन कशी तरी. एरवी तुम्हांला आधीच सुधारक असें लोक समजतात असा मला संशय येतो, त्यांतच विक्षिप्त व व्यवहारशून्य या विशेषणांची आणखी भर पडायची ! तुमचें दत्तविधान झालें तेव्हा तुम्ही व मी दोघे जाणते असलों तरी राज्य म्हणजे काय हें खरें कळण्याइतके मोठे नव्हतों. पण आता तुम्हाला भाग्यवान् कां म्हणावें याचें मर्म कळण्याइतका मी मोठा झालों आहे, आणि तें भाग्य कसें हें कळण्याइतके तुम्ही मोठे झाला आहां. आपली आई कांही ज्योतिर्विण नव्हती, पण ती नेहमीं म्हणे कीं, नवलरायाच्या डोळ्यांत मला राजयोग दिसतो. ”

**नव.**—" पण आजचा माझा वेष आणि वर्तन पाहून ती काय म्हणाली असती, मनोहर ? "

**मनो.**—" तुमचा साधेपणा पाहून तिला वाईट वाटलें असतें असें कां म्हणतां ? नाही. पण ती इतकेंच म्हणाली असती " मुलानें आपलें नांव खरें केलें. मुलगा नवलाचा खराच. कारण एवढें राज्य मिळून फिरुन तो आपला साधा तो साधाच ! "

**नव.**—" पण मी यापुढें आणखी ज्या कांही गोष्टी करणार आहें त्या पाहून मात्र तिला असें कौतुक न वाटतां कदाचित् वाईट वाटलें असतें."

मनोहर आश्चर्यानें म्हणाला, " म्हणजे असें करण्याचें तरी काय योजलें आहांत महाराज ! "

**नव.**—" जुन्या पिढीचीं माणसें प्रेमळ आणि उदार मनाचींहि असत. पण राजानें उदारपणा दाखविण्याच्या त्यांच्या कल्पना आणि माझ्यासारख्या नव्या पिढीच्या राजाच्या कल्पना जुळणें कठीण आहे. आपली आई भाविक धार्मिक स्वभावाची होती. मीं ब्राह्मणभोजनें घातलीं, किंवा रुद्रस्वाहाकार केले, किंवा कोटी लिंगार्चनें करविलीं, आणि त्यांत हजारों रुपये खर्चून दानधर्म करविला तर तो तिला पटला असता; पण माझी राज्य–दान करण्याची कल्पना तिला पटली नसती. "

**मनो.**—" आणि ती चांगली कळल्याशिवाय मला तरी ती पटेल असें कशावरून ? मलाहि ती कल्पना ऐकावीशीच वाटते. सांगा पाहूं."

**नव.**—" जुन्या पिढीच्या लोकांना राज्य हें ज्या अर्थानें आपलें असें वाटत असे तो अर्थ नव्या युगांत टिकणारा नाही. राज्य याचा अर्थ जुन्या काळीं केवळ एकटा राजा असा होता. या नव्या युगांत राज्य याचा अर्थ राजा व प्रजा दोनहि मिळून असाच होतो. आणि तसा अर्थ जे राजे न मानतील ते लवकरच त्याचें प्रायश्चित्त भोगतील."

**मनो.**—" अहो महाराज, हा समतावाद दिसण्यांत ठीक आहे. पण युरोप अमेरिकेकडे पाहा. ते लोक स्वतंत्र असता लोकसत्ता गवसणींत घालायला तयार झाले आहेत. त्या मूर्खांच्या बाजाराचा त्याना कंटाळा आहे. लंगडीच्या खेळांत पाय दमले म्हणजे आपल्याकरिता धावायला गडी मागून घेतात त्याला

'नवरा' म्हणतात. पाश्चात्य देशांतली दमलीभागलेली लोकशाही डिक्टेटररूपी नवरा आपल्यावर राज्य करायला मागत आहे. आणि तुम्ही पाहावें तर समानतेचा तंबोरा गवसणींतून काढून लोकशाहीचें रडगाणें गायला सिद्ध झाला आहां! हा उलटा रोजगार नव्हे काय? मुसोलिनी हिटलर यांना तुरुंगवास सोसून जो अधिकार मिळाला, तो तुम्हाला फक्त या कुशीचे त्या कुशीवर वळून मिळाला. असें असतां त्यांच्याप्रमाणे, अर्थात् राज्याच्या अंतिम हिताकरितां, तो एकतंत्रीपणाने बजावायचा सोडून लोकशाहीच्या नसत्या फंदांत पडायची अवदसा तुम्हाला कां आठवली?'

**नव.**–"अरे, पण तुला हें माहीत नाही कीं, मुसोलिनी. हिटलर यांच्या अंगचें बळ हें स्वतः त्यांचें नाही. ते प्रजेचेंच. फक्त त्यांच्या अंगांत संक्रमित झालेलें आहे. हे डिक्टेटर शिकारी कुत्रे, बहिरी, चित्ते, टकरी एडके, बकरें यांसारखे बेफाम दिसतात. पण त्यांना विरडें खोलून सोडणारे, किंवा शिकारीचा खेळ पुरा झाला म्हणजे आवरून मागें घेणारे, शिकारी दुसरेच असतात. जुन्या काळचे जुलमी राजे हेहि एकप्रकारचे डिक्टेटरच होते. पण त्यांचें जुलमी बळ हें केवळ स्वतः त्यांचेंच होतें. देशांतल्या जनतेचा त्यांना पाठिंबा नव्हता. म्हणून पदच्युत झालेल्या सर्व राजांना परदेशांत जाऊन परक्यांच्या आश्रयाला राहावें लागलें. उलट हल्लींचे डिक्टेटर उद्या अधिकारभ्रष्ट झाले तरी खुशाल स्वदेशांत आपल्या घरीं निर्भय राहतील आणि लोकांना म्हणतील, "अधिकाराचे धनी तुम्ही. दिलात तो अधिकार तुमच्या कल्याणाकरितां गाजविला. आता काढून घेतला तरीहि ठीकच. तो दुसऱ्या कोणालाहि द्या. मीं स्वस्थ राहून तुमची गंमत बघत बसेन. तुझ्या मुसोलिनी हिटलरसारखें मला माझ्या प्रजेने डिक्टेटर नेमलें तर होईन, कां नाही होणार, त्यांचा मुखत्यार! पण ती मुखत्यारी त्यांनी होऊन मला दिली पाहिजे."

**मनो.**—"युरोप–अमेरिकेचे लोक कुणीकडे आणि संस्थानची प्रजा कुणीकडे! आधी आपल्या प्रजेचीं स्थिति नीट पहा, आणि मग करा विचार त्यांना मोठेपणा देऊन त्यांच्याकडून मुखत्यारी घेण्याचा!"

**नव.**—"बरोबर, अगदी कसें अगदीं माझ्या मनचें बोललास. माझ्या प्रजेची स्थिति पाहावी म्हणून मीं रात्रीं नगरांत घस्त घालण्याला मधून-

मधून जाण्याचा बेत केला आहे, आणि आज रात्रींच मीं पहिली घस्त घालणार ! बोल तुझा सल्ला काय आहे तो. ”

**मनो.**—“ चांगला मुहूर्त काढलांत कीं अमावास्येचा ! मला विचाराल तर तो बेत तुम्ही सोडून द्यावा हें बरें.”

**नव.**—“ तें कां ? ”

**मनो.**—“ एक तर शहरच्या रस्त्यांतून अपरात्रीं फिरणें तुम्हाला धोक्याचें आहे. शिवाय अपरात्रीं तुम्हाला कोणी रस्त्यांतून फिरतांना पाहिलें म्हणजे तुमच्यावर भलतेसलते आरोप घ्यायला लोक कमी करणार नाहीत. संस्थानिकाजवळचे लोक मोठे घातक असतात. भोंवती त्यांचा गराडा जितका अधिक तितकी संस्थानिकांची बदनामी अधिक ! ”

**नव.**—“ पण आपण स्वतः सदाचारी असलों म्हणजे झालें ! लोकापवादाला भिण्याचें काय कारण ? ”

**मनो.**—“ बः, मी तर याच्या उलट म्हणेन राजेलोकांसंबंधानें ! लोकापवाद त्यांनी संभाळला पाहिजे आधी. मग एक वेळ राजेलोक प्रत्यक्षांत सदाचारी नसले तरी हरकत नाहीं. ”

**नव.**—“ बः, असें कसें हें उलटें गाडें ? ”

**मनो.**—“ असेंच आहे तें. राजे लोकांचें गाडें हें असें उलटेंच असायचें. पण मला सांगा कीं, घस्तीला जायची तुम्हांला एवढी हौस कां वाटते ?”

**नव.**—“ सांगतों ऐक. नेहमी असें होतें कीं मी शहरांत अमकीकडे जाणार ही वर्दी मिळाली कीं तेवढेच रस्ते झाडून साफसूफ करतात ! ”

**मनो.**—“ मोठें आश्चर्यच म्हणावयाचें ! तर मग काय राजेसाहेबांची स्वारी जिकडे जायची असें कळेल त्या रस्त्याला सगळ्या गांवचा केर आणून लोकांनी टाकावा कीं काय ? आणि लोक न टाकतील तर शहर कामगारांनी तशी व्यवस्था मुद्दाम करावी कीं काय ? ”

**नव.**—“ भलतेंच कांही तरी ! तसेंच मी ज्या रस्त्यानें हिंडायला निघेन त्या रस्त्याची रहदारी सगळी बंद करतात. तें पाहून मला वाटतें कीं, मीं काय राजधानींतून चाललों आहे कीं एखाद्या ओसाड रानांतून ! कीं स्मशानांतून ! ”

मनो.—" वः, तर मग काय? लोकांनी तुमच्या रस्त्यावर खेचून इतकी गर्दी करावी कीं पायघड्या घातल्याप्रमाणे तुमची गाडी किंवा मोटार अगदी पावला–पावलाने चालावी ? आणि चालायला घटका लागायची तिथे तास तास लागावे ? "

नव.—" बोलला फिरून शहाणा ! तसेच रस्त्यांत उगीच कुणावर नजर गेली कीं पुरे, दिसेल त्याने राम राम आणि नमस्कार यांची अशी कांही झोड उठवावी कीं, मला उलट राम राम नमस्कार करतां करतां स्वतःचें नाक खाजवायलाहि उसंत मिळूं नये ! "

मनो.—"खरेंच, लोकांची ही केवढी चूक ! रस्त्यांत राजेसाहेब दिसले तरी कोणी प्रजाजनाने त्यांना मुजरा करूं नये, इतकेंच नव्हे, तर स्वतःचें नाक खाजलें तरी खाजवायला हात वर करूं नये ! कारण तो तुम्हाला मुजरा वाटायचा ! किंवा आपल्या नशिबाला बोल लावण्याकरिता कोणी आपल्या कपाळाला हात लावूं नये ! कारण तो तुम्हाला राम राम वाटायचा ! "

नव.—" तूं आपला कांही म्हण ! पण माझी तक्रार फिरून सांगतों. माझ्या वाटेवर सगळ्या गांवचा केर येऊन पडावा असें मीं म्हणत नाही. पण मी अमकीकडून जाणार असें कळलें, तर रस्त्यावरून केर स्वाभाविकपणें किती पडलेला असतो गांवांतून जिकडे तिकडे, याची कल्पना मला बरोबर येत नाही. मीं येणार म्हणून माझ्या रस्त्यावरची रहदारी बंद व्हावी हा लोकांना अन्याय नव्हे काय ? राजरस्ता म्हणजे तो एकट्या राजाकरिता राखून ठेवलेला रस्ता असा अर्थ नव्हे, तर ज्यावरून लोकांबरोबर राजाहि जातो, जाऊं शकतो, असा रस्ता. मला जो भेटेल त्याने सलाम केला तर त्यांत कृत्रिमपणा नाही काय ? ज्याच्या मनांत माझ्याविषयी खरा आदर असेल त्याने नमस्कार केला तर तो खरा. तात्पर्य काय ? मी राजा या नात्याने दिवसा बाहेर पडतों, गाडी-घोडा, मोटार,शिपाईप्यादा अशा थाटाने हिंडतों फिरतों, यामुळे सगळा नाटकी थाट माझ्या दृष्टीला पडतो. राजनिष्ठेच्या कवायतीचीं हीं छापील चित्रें डोळ्याला सुख देत नाहीत, मनाला आनंद देत नाहीत, बुद्धीला बोध करूं शकत नाहीत. "

मनो.—" मग याला युक्ति तरी काय काढली आहे आपण ? ज्या गोष्टी

तुम्हाला आवडत नाहीत, त्या लोकांनी करूं नयेत असे खासगी हुकूम द्यावे ! नाहीं तर उघड जाहिराती लावाव्या."

नव.—" त्यांनी उलट गैरसमज होईल. आणि भागायचेंहि नाही. कारण दिवसा मी दिसलों कीं लोक मला ओळखणारच.—म्हणूनच रात्रीच्या प्रहरीं मधून मधून घस्त घालावी असें मी योजिलें आहे. त्यांत लोकांच्या संरक्षणापेक्षाहि लोकस्थिति स्वाभाविकपणें असेल तशी दिसावी किंवा ऐकूं यावी असें कांहीं घडेल. भलत्या लोकांत भलत्या वेळीं वावरलें मधून मधून, म्हणजे लोकस्थितीचें खरें चित्र डोळ्याला दिसेल. जें चित्र अव्याज तेंच खरें मनोहर! "

मनो.—"'मनोहर' असें आपण म्हणालां तें मला उद्देशून कीं चित्राला!"

ही कोटी ऐकून राजेसाहेबांना हंसू आलें आणि ते म्हणाले—

नव.—" अलबत दोनहि अर्थांनी. "

मनो.—" मग मी त्याचें उत्तर देतों. ऐका. रात्रीं शहरांत काय मनोहर चित्र तुम्हाला दिसेल तें हा मनोहर तुम्हाला सांगतों. रस्त्यांत बहुधा सर्वत्र अंधार असेल. रोषनाई कामगाराने तेलाचे पैसे स्वतः खाऊन आपली उपासमार केली, म्हणून कंदिलांतील वातीच्या ज्योति दुःखाने कृश व उदास होऊन गेलेल्या असतील. दिवसा रस्त्यांत केर आणि घाण पाणी टाकायचीं आणि बहिर्दिशेला बसायची लोकांना लाज वाटते ती रात्रीं वाटत नाहीं. यामुळे तुम्ही जातां तिकडे रस्ते झाडून साफ करतात ही तुमची तक्रार दूर होईल. पण घाणींत पाय भरून चालावें लागेल. रस्ता डोळ्यांना चांगलासा न दिसला म्हणजे तो प्रयत्नाने पाहून तपासून चालावें लागेल, यामुळे उंच सखलीचा व वळणांचा चांगला परिचय होईल. पण त्यांतच क्वचित् पावलें मुरगाळतील आणि डोक्याला टेंगळें येतील. शांतताप्रिय लोक घराचे दरवाजे लावून कड्या घालून बसले निजले असतील ते तुम्हाला दिसणार नाहीत. मग ते बिचारे आपलें सुखदुःख तुम्हाला कसें सांगणार, कळविणार ? उलट जे लोक रात्रीं अपरात्रीं रस्त्यावर आढळतील ते चंगीभंगी मगरूर बदमाष असेच असावयाचे. त्यांची गाठ पडली तर त्यांच्यापासून तुम्हाला काय बोध मिळणार ! यथेच्छ दारूपाणी करूनच

स्वतःचें दुःख ज्यांना विसरून जावें लागतें, ते तें दुःख तुम्हाला कसें सांग-णार? उलट ही तुमची प्रजा चैनी म्हणून सुखी असाच तुमचा खोटा ग्रह होणार? जे कोणी निशा न करतां शुद्धींत हिंडत असतील यांचेहि विचार लोकांना नसतें दुःख कसें उत्पन्न होईल याविषयीं असावयाचे. पण असे लोक तोंडापेक्षा हातावर भिस्त अधिक ठेवतात. यामुळे त्यांचे विचार तुम्हाला कळायचे नाहीत. उलट त्यांच्यासारखाच सावधपणानें रात्रीं रस्त्याने चालणारा मनुष्य हा त्यांना शत्रूसा वाटतो. म्हणून ते नुसत्या कज्जेदलालीला प्रवृत्त होतात! त्यांच्यासारखा ––– जीव राजाने कां धोक्यांत घालावा ? येऊन–जाऊन उनाड कुत्रीं तुमच्यापुढे तोंड उघडून तुमच्याशीं बोलतील. पण त्यांचें भुंकणें हें देहस्वभावाचें निश्-र्शक असतें, इतर कशाचेंहि नसतें. यामुळे त्यांच्यापासूनहि तुम्हाला फारसा बोध होणार नाही. बरें, शहरांत चोऱ्या होताहेत, दरोडे पडताहेत, असें कांही असतें तर एक असो; पण हल्ली तसाहि कांही प्रकार घडत असल्याचें ऐकिवांत नाही."

नव.—"तूं कितीहि मोडून काढलेंस तरी माझा बेत बदलणार नाही. तूं वर्णन केलेली स्थिति ही मनोहर नसली तरी ती आपल्यापरीने बोधप्रद नाही काय ? म्हणून ती पाहिलीच पाहिजे."

मनो.—"तुमचा बेत मी बोलून बदलूं शकेन अशी उमेद मी कधीच बाळगली नाही. आपला सल्लाच विचारलात म्हणून सांगितला इतकेंच. पण तो स्नेही म्हणून, प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून नव्हे. कारण प्राय-व्हेट सेक्रेटरीने अभिप्राय द्यायचा तो राजेसाहेबांचा कल पाहून तसाच दिला पाहिजे. नाही तर दुसरे दिवशीं चंबुगबाळेंच आवरायला पाहिजे त्याला ! असो, खूप केली राजेसाहेब. मला वाटतें बगदादचा बादशहा हरून–अल्–रशीद किंवा अवंतीचा विक्रम राजा यांचें चरित्र वाचून सुचला असला पाहिजे हा बेत आपणाला ! आली झालें हुकी त्यांच्या अद्भुतरम्य लीलांचें लहरीचें अनुकरण करण्याची आपणाला."

असें म्हणून मनोहर हंसत हंसत जागेवरून उठला, आणि नाटकी आविर्भावाने राजेसाहेबांपुढे वांकून मुजरा करून म्हणाला, "बंदगी खलीफ

साहेब, बंदगी! आणवा आता खोट्या दाढ्या, आणि निघूं द्या जुन्या अरेबियन नाइटची नवी आवृत्ति आमच्या या नवलपूर राजधानींत.!"

नव.—"खोट्या दाढ्या रे कशाला? मी काय चोर आहें?"

मनो.—"अर्धवटपणा तो यालाच म्हणतात. घस्तीला जायचें तें नेहमीच्या तुमच्या साध्या पोषाकांत कसें होणार? त्याला वेषांतर अवश्य हवें. हें कसें नाहीं तुमच्या लक्षांत! "मी काय चोर आहे घस्त घलणारा?" असें विचारतां तर त्याचें उत्तर होय, असेंच मीं देतों. प्रजेची स्थिति खरी कळायला पाहिजे ती चोरूनच पाहिली तर दिसेल. नाहीं तर तुम्हाला पाहून लोक रस्ते कसे साफ करतात, गर्दी कशी मोडतात, मुजरे नमस्कार करून तुम्हाला त्रास कसा देतात याचें वर्णन तुम्हीं नुकतेच केलेंत कीं! घस्त घालणारा राजा आणि चोरी करणारा चोर यांची रात्रीच्या संचाराची तयारी सारखीच असावी लागते. खोट्या दाढ्या, चोर-कंदील, काळे पोषाक, पंचहत्यारी सरंजाम, सगळे कांहीं हवें. आणि किल्ल्यांचीं जुडगींहि घ्या कांहीं बरोबर."

नव.—"तीं रे कशाला!"

मनो.—"कुलुपें काढायला लोकांच्या घरांचीं! न जाणों, लोकस्थिति पहायला आपण जाणार आणि ती असली एखादी दाराच्या आड लपून तर!"

नव.—"कर, कर माझी चेष्टा कर वाटेल तेवढी."

मनो.—"यांत चेष्टा कसली! बरें पण, घस्त घालायला जाणार तर आता मी खऱ्या मनाने विचारतों हां, शिपाई नेणार कीं नाहीं बरोबर, हत्यारबंद?"

नव.—"हां असें सरळ बोला, म्हणजे सरळ उत्तर देईन. होय, एखादा हत्यारबंद शिपाई अवश्य बरोबर नेईन. एरवीं जाणें धोक्याचें आहे. तसें मी काय म्हणून करीन!"

मनो.—"काय म्हणून हें काय? एकटें गेलें तर धाडस मोठें! धाडस मोठें तेवढा पुरुषार्थ मोठा! पुरुषार्थ मोठा तेवढें भूषण मोठें! भूषण मोठें तितकें राजेसाहेबांचें राजेपण मोठें! हो. 'रोमान्स'च्या शास्त्राप्रमाणे अशी चढती भांजणी लागावयाची तुमची एखादी. काय नेम त्याचा!"

नव.—"ठीक, एकूण तूं मला अगदीं लहरी ठरविलेंस!"

**मनो.**—" मग त्यांत काय वाईट? लहरीपणा हा राजे लोकांचा मोठा गुणच आहे. आणि तो हक्कहि आहे त्यांचा!"

यावर नवलराय हंसला व म्हणाला " राजे लोक लहरी असोत वा नसोत, पण त्यांचें प्रत्येक कृत्य विकृत करून त्याची निंदा करणारे लोकहि कांही कमी नाहीत.'

मनोहराला या घस्तीच्या उपक्रमाची खरोखर मोठी चिंता वाटली. दिवाणसाहेब आधीच वाइटावर. शिवाय शहर म्हटलें म्हणजे रात्रीं रस्त्या-वर गल्ली–कुचींतून बदमाष लोकांचा अम्मल. दिवसा महाराज ओळखतां येतात, तेव्हा जो शिष्टाचाराचा फाजील प्रकार होतो म्हणून महाराजांनी तक्रार केली, त्याच्या अगदी उलट प्रकार रात्रीं व्हावयाचा. कारण पाहणारे कोणी नाही. शिवाय महाराज वेष बदलून हिंडणार. या सर्व गोष्टींचा विचार करून मनोहराने घरीं गेल्यावर पागेंतील विश्वासू रिसालदाराला बोलावून महाराजांच्या गुप्त संरक्षणाची योग्य ती तजवीज केली. मात्र ही तजवीज कळली तर महाराजांना आवडणार नाही. त्यांच्या रोमान्सचा विरस होईल, म्हणून त्या व्यवस्थेचा सुगावा त्यांना लागू देऊ नको असें त्याला बजावलें.

असो. इकडे याच अमावास्येच्या दिवशीं भाऊसाहेब डबीरांच्याहि घरीं कांही विशेष प्रकारची योजना घडत होती, व ती काय होती हें पुढील प्रकरणांत कळून येईल.

---

## प्रकरण दहावें

# डबीरांची विमला

विमलने जोराने व उतावीळपणाने हाक मारली त्याबरोबर भाऊसाहेब व ज्योतिषीबुवा दोघेहि उठले. पैकीं ज्योतिषीबुवा निघून गेले आणि भाऊसाहेब फिरून आपल्या गादीवर स्थानापन्न झाले, इतक्यांत विमल आंत आली. पण तिने हाक मारल्यासारखें कांहीं बोलणें काढावें तें काढलेंच नाही. ती रागांत तर होतीच; पण नक्की काय बोलावें याविषयीहि कदाचित् तिच्या मनाचा निश्चय होत नसावा.

ती पुढच्या माडीशीं आंतल्या बाजूच्या माडींतून प्रथम वर आली, तेव्हा भाऊसाहेब व सुभेदार यांचं बोलणें चाललें होतें. तें तिने आड उभीं राहून बहुतेक सर्व ऐकलें. सुभेदार खाली उतरून जाण्याचे सुमारास पुनः ती आली तेव्हा ज्योतिषीबुवा आले होते. त्यांचेंहि संभाषण तिने आड उभी राहून ऐकलें. हीं दोनहि भाषणें ऐकून तिला फार वाईट वाटलें. आडून ऐकलेल्या दोनही संभाषणांतून दत्तकाचा विषय तिच्या कानावर प्रथमच आला यामुळे तिला बरेंच आश्चर्यहि वाटलें. कारण भाऊसाहेब जुन्या विचार-परंपरेचे यामुळे त्यांना दत्तकाची कल्पना सुचणें कदाचित् स्वाभाविक होतें. पण आजपर्यंत ती कल्पना त्यांच्या तोंडून निघालेली तिने कधी ऐकली नव्हती. तशीच माईसाहेबांच्याहि तोंडून.

याचें एक कारण असें असावें कीं, प्रभाकराला जरी जन्मठेपेची शिक्षा झाली असली तरी, जन्मठेपेचे सगळे कैदी कैदेंतच मरतात असें होत नाही. कांही वर्षे कैद भोगल्यावर प्रभाकर परत येण्याची आशा त्यांनी कां न धरावी ! किंवा राज्यारोहण झालें, राजाला मुलगा झाला अशा आनंदाच्या प्रसंगीं कैदी सुटतात तशाच एखाद्या कारणाने प्रभाकरहि कदाचित सुटेल असें त्यांना कां न वाटावें ! ही विचारसरणी अगदी स्वाभाविक होती. प्रभाकरावर जरी भाऊसाहेबांचा राग होता तरी, तो

केव्हाच परत येऊं नये, किंवा फरारीच मरावा, असें वाटण्याइतकी त्या रागाची मजल जाणें शक्य नाही असेंच त्या दोघींना वाटे. पुष्कळ लोकांना दत्तक घ्यावासा वाटला तरी आपला मृत्यु अगदीं जवळ येऊन ठेपेपर्यंत ते त्याचा विचार करीत नाहीत. प्रभाकराबद्दल निराशा झाली होती म्हटलें तरी, भाऊसाहेबांना कुटुंब व मुलगी हे दोन वारस होतेच. आणि मुलीवर तर त्यांचें मुलग्याप्रमाणें प्रेम असे. किंबहुना जास्तीच. यामुळेंहि दत्तकाची कल्पना भाऊसाहेबांच्या मनांत न येणेंहि संभवनीय होतें.

तात्पर्य, कसाहि विचार केला तरी दत्तकाची कल्पना आज कानावर आली ती नवीन आहे अशी तिची खात्री झाली. शिवाय आड उभी राहून ऐकलेल्या दोनहि भाषणांत या दत्तकाच्या कल्पनेचा पुरस्कार होत होता तो भाऊसाहेबांकडून नसून, सुभेदार व ज्योतिषीबुवा यांच्याकडूनच झाला, ही गोष्टहि तिच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाही. यामुळे ती खरोखरच मोठ्या विस्मयांत पडली. तिला एक वेळ वाटलें कीं या बाबतींत प्रथम आपल्या आईकडून भाऊसाहेबांशीं बोलवावें. पण थोड्या विचाराअंतीं तिला फिरून वाटलें कीं ती गरीब गाय. या विचारांत घेण्याइतकें महत्त्व तिला आपले वडील देतात कुठें !

तात्पर्य, दत्तकाच्या विषयावर आताच कोणाहि जवळ कांही बोलूं नये अशा विचाराने, तिने बापाशीं उगाच रिकामटेकड्या एकदोन गोष्टींची चौकशी केली, जवळ वर्तमानपत्रें पडलीं होतीं त्यांतलीं एक दोन चाळल्यासारखें केलें, तुम्हांला कांही दूधबीध आणूं का असें विचारलें, व भाऊसाहेबांनी 'नको आतां दूध' असें म्हणतांच 'बरं तर' असें ओझरतें म्हणून ती चटकन आंतल्या माडींत निघून गेली. 'इतक्या घाईने हाक मारीत आलीस तर काय काम होतें' असें भाऊसाहबांनीहि तिला विचारलें नाही !

विमल खालीं जाते तों माईसाहेब सोमवतीची तयारी करीत होत्या असें तिला दिसलें. त्यांनी ओळखीच्या एका माळ्याकडून एकशेंआठ कमळें आणलीं होतीं. तीं साफसूफ करून तबकांत रचण्याचें त्यांचें काम सुरू होतें. अर्थातच तीहि बसली व आईला पण मदत करूं लागली.

माईसाहेब सहज म्हणाल्या, " बरा आपला भिवा माळी सांगितल्या

कामाला चांगला उपयोगी पडतो. आज सोमवती अमावास्या, त्यांतून श्रावणी सोमवार. म्हणून सहज वाटलें कीं कमळेंच वहावीं देवाला.तीं आणून दिलीं त्याने सांगतांक्षणीं." हें ऐकून ओल्या पंचाने कमळें पुशीतपुशीत विमल म्हणाली—

**विम.**—" माई, मला हवें तर तूं नास्तिक म्हण, पण देवाला वहायला कमळें आणून दे असें म्हणतांच तुला भिवा माळी जसा कामाला आला, तसाच, तूं तीं कमळें अर्पण करून देवाला एखादी प्रार्थना केलीस तर त्यानेंहि ती मान्य करावी कीं नाही ग ! "

**माई**—" हो. करील कीं ! नाही करणार कशावरून ? पण ती प्रार्थना भलतीच किंवा आपस्वार्थी असली, नाहीतर लोकांना दुःख देण्याची असली, तर ती त्याने काय म्हणून मान्य करावी ? "

**विम**—बरोबर आहे. मग सांग बरं. प्रभाकरदादाचें पत्र आल्यानंतर आजची पहिली अमावास्या. त्या पत्रांत दर्शविल्याप्रमाणे तो आज सुखरूप घरीं परत यावा अशी प्रार्थना, कमळें वाहून झाल्यावर, तूं तुझ्या देवाला केलीस तर ती त्याने सफळ करावी कीं नाही ? या प्रार्थनेंत कुणा इतराचें कांही तरी नुकसान आहे का ? आणि तुझा स्वार्थ असला तरी त्याच्या मुळाशीं केवळ आईचें प्रेमच नाही काय ? शिवाय दादाने झालें तरी बारा वर्षें दुःख सोसलें असेल तें पुरे नाही का? तुझ्यासारख्या पुण्यवान आत्म्याची निःस्वार्थी प्रार्थना तो न ऐकेल तर त्याला मी बोल कां लावूं नये ? "

विमल म्हटलें तर जुन्या स्त्रियांत आणि म्हटलें तर नव्यांत मोडणारी होती. ' पोषाखांत जुन्याकडे आणि विचारांत नव्याकडे' असा तिचा दुहेरी कल असे. चांगला आंगभर पदर काढून ती लुगडें नेसे पण तें उंची असे. आणि नव्या धुलाईची तुकतुकी त्याच्यावर केव्हाहि दिसे. ती चांगला रेशमी पोलका घाली. पण तो लांब पदराने झांकून गेलेला असे व त्याची किनार साधी असे म्हणजे तिला झालर नसे. ती हातरुमाल बाळगी आणि रबरी चपला घाली. पण केव्हा उघड्यापायाने ती बाहेर पडणारच नाही, कुणाला तशी दिसणारच नाही, असें मात्र नव्हतें. घरापासून कांही अंतरावर देवालय होतें त्याला रोज जातांना ती अनवाणी चाललेली दिसावयाची; पण बाजारांत, मंडईंत किंवा दूर हवा खाण्याकरिता हिंडायला

जायचें तर ती बूटहि घाली. तिच्या हातांत सोन्याचे गोट, पाटल्या व बिलवर घातलेले असत, पण त्याबरोबर बिलोरी बांगड्याहि. कपाळाला कुंकू लावी तें छानदार मोठ्या चंद्रकोरेसारखें. टिकलीसारखें बारीक नसे. रोज तेल लावल्यामुळें तिचे काळेभोर केस नेहमीं स्निग्ध तुकतुकीत असत. आणि ते इतके गच्च व भरदार होते कीं, कपाळावर त्यांचें फारसें आक्रमण होऊं नये म्हणून ते चांगले विंचरून दाबून डोक्यावर बसवावे लागत. केस कुरळे नसल्यामुळें एखादीच वांकडी बट कपाळावर येण्याची, आणि वरचेवर परतविण्याकरितां हाताचा चाळा करण्याची आपत्ति नसे; व तशी येण्याचा ती मुद्दाम प्रयत्नहि करीत नसे! केसांचा आंबाडा बांधणें हा ब्राह्मण-धर्म नव्हे, स्वतः मात्र मोटारींत बसून हिंडणाऱ्या, शंकराचार्यांचा अप्रयोजक दंडक, तिला मान्य नव्हता. यामुळे ती घाईत असली तर आपल्याच हाताने केस विंचरून वळवून आंबाडा बांधी. पण स्वतः तिला वेळ असला आणि आईचा हात मोकळा दिसला, तर ती मुद्दाम आईपुढे जाऊन बसे आणि तिच्या हातची वेणी घालून घेई. त्यांत तिच्या मनांतलें एक कारण असें असे कीं, वेणी घालण्याच्या वेळीं आईबरोबर चार गोष्टी बोलायला सहजच सांपडतात. गृहसर्वस्व अशी ही मुलगी वेणी घालून घ्यावयाला पुढे बसली म्हणजे आईलाहि प्रेम वाटे. आणि वेणी घालून संपून शेवटच्या आगवळाला गांठ द्यावयाच्या वेळीं आई मुलींच्या पाठीवर दोन्ही हातांनी शाबासकीची थाप जोराने मारी ती ऐकूं जाण्यासारखी! एक दिवस विमल विनोदाने आईला म्हणाली "कां ग बाई? मारतेसशी! मीं काय तुझा गुन्हा केला?" तेव्हा आईहि तिच्यासारखाच हेल काढून म्हणाली "वः गुन्हा नाही तर काय? माझा वेळ मोडलास ना येवढा?" मग विमल म्हणाली—"वेणी घालण्याची सोडून असा गोष्टी वेल्हाळपणा करीत बसायला मी नव्हतें कांही सांगितलें तुला." आई म्हणाली "अग एरवी कुठली सांपडावयाचीस तूं अशी स्वस्थपणात? नेहमीं धांदलींत! म्हणून लावतें वेणीला जरा मुद्दाम वेळ. आणखी असे सुंदर केसाचें पेड हातांत आले म्हणजे कुणाला नाही वाटणार, वेणी घालायचें आपलेंहि कौशल्य दाखवावावें म्हणून! वेणीच्या वेणी झाली आणि चार गोष्टींच्या गोष्टीहि

झाल्या! वेणी घालणारणीला वेणी घालून घेणारीने नमस्कार करावयाचा असतो. तो वेणी घालून उठतांना विमल दुबार करीत तोंडाने म्हणे, 'माई, एक नमस्कार वेणीचा झाला, आणि दुसरा तुझ्या प्रेमाचा बरं का! लक्षांत ठेव!"

घरीं ईन मीन माणसें तीन. पैकीं वडील आपली माडी, माडीवरची गादी, आणि हातांतला चिरूट कधी सोडायचे नाहीत. आईचा वेळ दिवसा ओंवळ्यापेक्षा सोवळ्यांतच अधिक जावयाचा, म्हणून विमल घरीं असली म्हणजे, आल्यागेल्याशीं बोलणेंचालणें करणें, पाहुण्यांचा परामर्ष घेणें, तसेंच घरीं असेल नसेल तें पाहून बाजारचा जिन्नस आणविणें, गड्या कुणबिणकिडून घर, मागचीं पुढचीं अंगणें, नीट वेळच्या वेळीं झाडून सारवून घेणें, आणि मधून मधून घरांतलें निरनिराळें सामान पुसवून घेणें हें काम विमलकडेच येई. आणि तें सर्व ती मेहनतीने व हौसेने करी. घरांत स्वच्छता ठेवण्याच्या बाबतींत मात्र तिचें आणि तिच्या वडिलांचें मत बरोबर जुळे, व झालाच तर या कामीं आईशींच मतभेद होई. माईसाहेबाची काळजी घेण्याची नजर पोंचे ती फक्त मागील अंगणांतला तुळशी कट्टा आणि माजघर, स्वयंपाकघर यापर्यंत. आणि तेवढे सगळे जिन्नस मात्र त्या स्वच्छ ठेवीत. तात्पर्य, एक एकाच्या आणि दुसरें दुसऱ्याच्या हौसेने, मिळून या टोकापासून त्या टोकापर्यंत हें घर इतकें स्वच्छ, निर्मळ व प्रसन्न दिसे कीं त्यासारखें दुसरें घर सगळ्या नवलपुरांत सांपडावयाचें नाहीं अशी कोणीहि पैज देखील मारली असती!

विमल आपलें लिहिणेंवाचणें तर आपण करीच, पण भाऊसाहेबांची चिट्टीचपाटीहि ती पुढे होऊन लिही. आणि ती जें करील तें बिनचूकच असणार अशी तिच्या आईप्रमाणे तिच्या बापाचीहि खात्री असे. दुर्दैवाने विमलचें शहाणपण सर्व कांहीं उपयोगांत येण्यासारखा घरचा प्रपंच विस्तृत नव्हता. घरचा मुलगा घरीं असता तर एव्हा त्याचें लग्न होऊन दोन मुलेंहि घरीं खेळावयाचीं. पण तो परागंदा! आणि आईबापांना सोडून जावयाचें नाहीं म्हणून विमलनेहि लग्न केलें नाहीं, मग संसार वाढणार कसा! पण आहे त्यांतल्या त्यांत घरचा सर्व कारभारीपणा विमलकडेच आला होता

व ती तो मोठ्या दक्षतेने करी. घरांत आईने वोडण भरण्याला सवाष्णी बोलावल्या किंवा सत्यनारायण करविला, तर त्याची तयारी करून द्यायला जशी ती तयार, तशीच कोणी सुशिक्षित आप्त नातेवाईक पुरुष पाहुणा घरीं आला तर, त्याच्याशीं मोकळेपणानें बसून बोलून त्याचें आदरातिथ्य करण्यालाहि तिची तयारी असे. तिला पुष्कळ बोलायचालायला हवें असे. यामुळें दुसरें कोणी वेळेवर नाही तर घरचा म्हातारा गडी व कुणबिणी यांना घेऊन ती गप्पा मारीत बसे आणि त्यांच्याशीं हास्यविनोद करी.

पण उरला वेळ जायचें तिचें मुख्य साधन म्हणजे तिनें स्वतःच काढलेलें लहान मुलांमुलींचें छात्रालय. स्वतःची मुलें नसतांहि मुलांचें मानसशास्त्र तिला उपजत बुद्धीनेच जसें कांही कळे. आणि त्यांच्याशीं हंसण्याखेळण्यांत, खोटें-खोटें भांडण्यांत, त्यांना शिकविण्यांत, जो तिचा वेळ जाई तो फार सत्कारणीं लागला, असें तिला वाटे. या कामीं खर्चावयास लागणारा पैसा आपण मिळवीत नाही, तर बापच आपल्याला देतो, ही गोष्ट तिला जाण-वत असली तरी तिचें तिला वाईट मात्र वाटत नसे. एखादे वेळीं ती बापाला किंवा आईला थट्टेने भांडून म्हणेहि, "माझें लग्न झालें नाही तोंपर्यंत मी घरचा मुलगा आहें. माझ्या वांट्याचा खर्चाचा पैसा मुलाच्या बरोबरीने मला मिळालाच पाहिजे. मी विलायतेला गेलें असतें शिकायला तर नसता का पैसा लागला मला दहाबारा हजार ! त्याचेंच व्याज मी खर्चतें." तिच्या शाळेंत मुलामुलींचें शिक्षण होई तें पुस्तकी नव्हतें तर किंडर गार्डन पद्धतीचें खेळण्याचें. आणि या खेळांत करमणूक करण्याचे नवे नवे प्रकारहि तिला सुचत. यामुळें तिला हौस वाटून मुलेंहि मोठ्या आनंदांत असत. मात्र हें छात्रालय तिने अगदीं खासगीसारखें ठेवलें होतें. सरकारी संस्थांनी अधिकाऱ्याला बोलवणें नाहीच; आणि चहाटळ अशा इतर कोणालाहि तर ती त्याच्या जागेंत पाय घालूं देत नसे.

विमलनें मॅट्रिक्युलेशन परीक्षा दिल्यावर तिच्या मनांत कॉलेजांत जावें असें प्रथम आलें. पण तसें केलें तर आईबापांपासून सातआठ महिने दर-वर्षी दूर राहावें लागणार आणि घरची स्थिति तर ही अशी! यामुळें तिने घरच्याघरीं बसून हायकोर्ट वकिलीचा अभ्यास केला आणि ती परीक्षा

पासहि झाली. पण तिने कायद्याचा अभ्यास केला तो वकिलीचा धंदा करण्याच्या दृष्टीने नव्हे, तर केवळ हौसेने. तिला नवळपूर सोडून जावयाचें नव्हतें; आणि संस्थानच्या न्यायाधीशापुढे जाण्याची तिची इच्छा नव्हती. ती परीक्षा पास झाल्यावर भाऊसाहेब एक दिवस तिला म्हणाले, " कां विमल-ताई, आता किती रुपयांची सनद काढावयाची ? पांच रुपयांची कीं पांचशेंची ? म्हणशील त्याला आपली तयारी आहे. "

विमल म्हणाली " तुमची तयारी असेल बाबा. पण माझी तयारी पाहिजे ना ? मीं कोणतीच सनद काढूं इच्छीत नाही. हातांत सनद असणें हें मोहाचें कारण आहे. सनद तयार असली म्हणजे सहज वाटूं लागायचें कीं, बसल्या बसल्या वकिलीचा धंदा करावा. पण या संस्थानी अधिकाऱ्यापुढे जाणें म्हणजे आपल्या हाताने आपला अपमान करून घेणें आहे. शिवाय माझें ध्येय मुलांमुलींचें शिक्षण हेंच मीं ठेवलें आहे. आणि त्याला तुमची हवी तेवढी पैशाची मदत आहेच !! "

तेव्हा भाऊसाहेब म्हणाले "मग तुझ्या कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग काय ?"

विमल—" वः, उपयोग समोर दिसल्याशिवाय कोणतेंहि ज्ञान मिळवूं नयेच वाटतं ? ज्ञानाकरिताच ज्ञान मिळवावें हें अधिक बरें नव्हे का ? "

भाऊसाहेब म्हणाले " अग, हे तुझे नव्या युगांतले विचार ! आमच्या जुन्या पिढीचा विचार म्हटला म्हणजे तो असा कीं, एका हाताने ज्ञान मिळवावें आणि दुसऱ्या हाताने त्याचा बाजार करावा. तरी हें बघ, वकिलीच्या ज्ञानाने हवा तर पैसा मिळवूं नये कुणी, पण त्या ज्ञानाने गोर-गरीबांचें काम तर व्हावें ना ? "

विमल म्हणाली, " हें मात्र अगदीं ठीक बोललांत बाबा ! गोरगरीबांचेंच काय म्हणून? श्रीमंतांचेंहि कां होऊं नये ? कायद्याच्या ज्ञानाचा हाच उपयोग कीं अन्याय होत असेल तर तो वांचवावा. मग श्रीमंतांनाहि होणार ! उलट अन्यायाच्या कामीं गरीबालाहि मदत करूं नये ! "

या तिच्या मताप्रमाणे तिच्या कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग होण्याची संधि तिला कधींहि घराबाहेर आली नव्हती. पण बिनसनदी वकिली करण्याचा प्रसंग तिला घरीं पुष्कळ वेळा वाढून ठेवलेला

असे. या प्रसंगीं तिचा बाप फिर्यादी, तिची आई आरोपी, असा प्रकार होई. माईसाहेबांच्या हातून येवढेंसें कांही चुकलें, मनासारखें झालें नाही, म्हणजे भाऊसाहेब रागावत. तेव्हा आईकडून घडल्या हकीकतीची समजूत घेऊन बापाशीं युक्तिवाद करण्याचें काम विमलकडे येई; व आपल्या व्यवहारचातुर्यांत व बुद्धिमत्तेंत प्रेमाच्या जिव्हाळ्याची भर घालून ती आपली वकिली कशी यशस्वी करी हें वाचकांनी पूर्वींच्या एका प्रकरणांत पाहिलेंच आहे.

असो. आज तिसरे प्रहरीं माईसाहेबांच्या खोलींत बसून मायलेकींच्या गुजगोष्टी चालल्या होत्या. भाऊसाहेबांशीं विमलचें बोलणें पूर्वी झालें होतें तें तिने आपल्या आईला फिरून सांगितलें. "खडा टाकून बाबांच्या अंतःकरणाचा ठाव पाहिला. पण प्रभाकरदादाविषयीं त्यांचें मन जें बारा वर्षांपूर्वी एकदा कलुषित झालें तें अजून तसेंच आहे." असा झालेला आपला ग्रह सांगून, तिने त्यावर अशी टीका केली कीं, "म्हाताऱ्या माणसाचे ग्रह बदलणें मोठें कठिण. त्यांचें वय होत जातें तसतसा त्यांचा दुराग्रह वाढतो.फेर विचार करायला जी विवेचक शक्ति लागते ती त्यांच्या अंगीं नसते."

माईसाहेबांनाहि हा अनुभव होताच. पण विमलच्या या अभिप्रायाला दुजोरा देण्यापलीकडे जाऊन त्यांना कांही करतां येण्यासारखें नव्हतेंच. दोघींनीहि इतकेंच ठरविलें कीं, प्रभाकराच्या निनांवी पत्रांत दर्शविल्याप्रमाणे, आज अमावास्येचा दिवस म्हणून घडतें कीं काय याची वाट पाहावी. तो न आला तर दुर्दैवाने तूर्त तो प्रश्नच संपला. प्रभाकराने आशा दाखविली पण खरी केली नाही इतकेंच म्हटलें, आणि सुस्कारा टाकला, म्हणजे काम संपलें. पण तो खरोखरच लिहिल्याप्रमाणे आला,तर पुढे काय करावें हा पेंचच अधिक भारी होता! आशा हेंच दुःख, निराशा हेंच सुख, म्हणतात तें हें अशा दृष्टीनेहि खरेंच कीं नाही ? प्रभाकर परतून यावा ही इच्छा. पण ती सफल झाली म्हणजे पुढची एक अडचण वाढून ठेवलेलीच होती.

अमावास्येचें टिपण दोघींच्याहि मनांत बिंबलें होतें. म्हणून रात्रीं काय करावें याची चर्चा दार लावून घेऊन त्या करीत होत्या. माईसाहेब केव्हा केव्हा

खाली विमलच्या खोलींत निजत. तसें झालें म्हणजे मग विमलने एखादें पुस्तक काढून मोठ्याने वाचावें, माईसाहेबांनी तें लक्ष लावून ऐकावें, मधून मधून भोळ्या मनाने समजूत पडण्यासाठी एखादुसरा प्रश्न विचारावा, त्याचा आनंद वाटून शिक्षकाने विद्यार्थ्याला शिकवावें त्या थाटाने लेकीने आईला मुद्दा समजावून द्यावा, अवांतर सुखदुःखाच्या गोष्टी व्हाव्या, हलक्या आवाजाने दोघींनीहि जुनीं गाणीं म्हणावीं व विमलने नव्या कविता म्हणाव्या, हास्यविनोदहि कांही व्हावा, आणि दोघींनी बहिणी-बहिणीप्रमाणें शेजारीं शेजारीं पलंगड्या जोडून निजावें, अशा रीतीने मायलेकी एकमेकींना सुखी व आनंदित करीत.

त्याप्रमाणे आज रात्रीं दोघींहि एकत्र बसून रात्र काढावी, किंवा आळीपाळीने निजून आळीपाळीने जागावें, असें त्यांनी ठरविलें. कारण प्रभाकर आला तर चोरून व कदाचित् अपरात्रींहि येईल. म्हणून त्याची चाहूल लागतांच हांक ऐकतांच गुपचूप मागील किंवा पुढील-दाराची कडी काढली पाहिजे! या दोनहि दारांच्या किल्ल्या माजघरांत खुंटीला टांगलेल्या असावयाच्या. ती जागा आईने मुलीला दाखवून ठेवली.

प्रभाकर आला तर त्याला प्रथम बागेंतल्या तळघरांत ठेवणेंच प्राप्त. पण पुढे तेथेंच ठेवावा कीं नाही याविषयी त्यांनी चर्चा केली. तळघरांत एक सोय तर एक गैरसोय. म्हणून "वाटल्यास शारदा मठांत मीं व्यवस्था करूं शकेन" असें विमल आईला म्हणाली. पण तिला तिच्या आईने मोडून काढलें. ती म्हणाली "घरींच काय व्हायचें तें होऊं दे. तुझ्या शारदा मठाला उगीच उपद्रव नको. परका पुरुष या घरांत दिसला तर भरलेलें घर. कोणाच्या डोळ्यांवर येणार नाही. निदान पाहुणा म्हणून म्हणतील. पण तुझ्या शाळेंत तो दिसला तर तर्कवितर्काला ना शेंडा ना बुडखा. तेथे तो विनाकारण सहजच एखाद्याच्या नजरेला पडायचा. तें कांही नको. त्याची व्यवस्था आपणच ठेवूं."

विमलने ही गोष्ट कबूल केली. प्रभाकर आल्यावर ज्या कोणत्या रीतीने प्रगट व्हावयाचें ठरेल त्याप्रमाणें तो प्रकट झाला म्हणजे मग इतर काय व्हावयाचें तें होवो. पण त्याला छपविण्याची अडचण तरी

संपली. पण तो प्रकट होईपर्यंत एक विशेष अडचण ही कीं, भाऊसाहेबांचें गुप्त पोलिसाच्या संशयाचें वेड अलीकडे वाढत चाललें होतें. त्यामुळे ते कानेकोपरे धुंडाळीत त्याचें काय करावें?

'तें कसें काय? काय करतात बाबा?' असें विमलनें विचारलें तेव्हां माईसाहेब म्हणाल्या—

"सांगतें ऐक एक एक प्रकार. परवां एकदा रात्रीं भटजी आले घरीं श्रावणी केव्हा सुरू करायची म्हणून विचारायला. पाऊस पडत होता म्हणून त्यांनी घेतली होती बनातीची टोपी डोक्यावरून. तर हे त्यांच्याशीं एक शब्दहि बोलेनात. टोपी बाजूला काढून ठेवून अगदी उजेडांत कंदिलापुढे तोंड अस्सें पुढे आणीपर्यंत! तें एक असो. पण एकदा सई कुणबिणीचाच काय संशय आला यांना कुणाला ठाऊक! ती जराशी पाठमोरी बसली होती मर्यादेने, परसाच्या बोळाच्या तोंडीं. तर हे आपले थेट तिच्यासमोर जाऊन खाली तोंड करून निरखून पाहूं लागले तिच्या तोंडाकडे. ती बिचारी भ्याली! आणि मी घरांत भाजी चिरीत बसलें होतें तिथे येऊन हुंदके दे देऊन रडूं लागली. कारण विचारलें तर तिला सांगायला किती तरी अवघड झालें. सांगावें तरी कठीण, न सांगावें तरी कठिण. शेवटीं मी खोदून खोदून विचारलें तेव्हा तिने सर्व सांगितलें. मी अंदाजाने ओळखलेंच आणि गुप्त पोलिसाच्या भीतीने संशयाने हे काय काय चाळे मधून मधून करतात तें सांगितलें तेव्हा तिचा जीव भांड्यांत पडला. क्षणभराने हे स्वतःच माजघरांतून ओटीवर गेले तेव्हा तोंडाने आपल्याशीं पण मोठ्यांदा म्हणतच होते.—"गुप्त पोलीस ते! काय काय सोंगें घेतील तेवढीं थोडीं." सईने जेव्हा हे शब्द स्वतःच्याच कानांनी ऐकले तेव्हा मग तिची अगदी खात्रीच झाली. म्हणून म्हणतें तीहि एक अडचण लक्षांत घेतली पाहिजे."

मुलगा प्रभाकर फरारी झाल्या दिवसापासून भाऊसाहेब मनाने अस्वस्थ झाले होते खरेच. त्याच्यावर राजद्रोहाचा खटला झाल्यापासून आपल्यामागे गुप्त पोलीस असतात असा भ्रम त्यांच्या डोक्यांत शिरला होता. कारणाकारणांनी तो मधून मधून बळावत असे. त्या भ्रमामुळे त्यांनी आपल्या वाड्याच्या भिंतीहि

पक्क्या संगीन बांधवून मागच्या दाराला अडसर कुलूप यांची व्यवस्था केली होती. आणि पुढच्या दरवाजाची फक्त दिंडी तेवढी उघडी राहावी असें ठरविलें होतें. गुप्त पोलिसाच्या जुन्या संशयांत कुटुंबाच्या आचरणाविषयींच्या भ्रमाची भर पडली. एकाच वेळीं डोक्यांत अनेक भ्रम असले तर ते परस्पर नातें जोडतात व त्यापासून संयुक्त भ्रम निर्माण होतो. त्याप्रमाणें भाऊसाहेबांना वाटूं लागलें कीं गुप्त पोलीसच आपल्या बायकोला वश असावा, आणि पत्रें वांटण्याचें निमित्त उघड माथ्यानें करतां येतें म्हणून फक्त पोस्टमन असल्याचा बहाणा केला म्हणजे झालें! यामुळे भाऊसाहेबांच्या मनांत अशी सांखळी तयार झाली कीं आपल्या बायकोचा प्रियकर हा खरोखर आपणावर पाळत ठेवणारा गुप्त पोलीस असून तोच आळीचीं पत्रें वांटणारा पोस्टमन होऊन येत असावा! स्वतः पोलिससाहेबाचे अधिकार नोकरींत त्यांच्याकडे होते त्यामुळें गुप्तपोलिसांचें चरित्र व चमत्कार त्यांना चांगले माहीत होते!

असो; शेवटीं विमल हंसून पण निर्धाराचे स्वरांत म्हणाली—

"आई, अडचणी तर सगळ्याच आहेत. त्या कधीच संपावयाच्या नाहीत. आणि काळजी करून करून माणूस ती करणार तरी किती! चला, आपण आता देवाचें नांव घेऊन आपल्या योजनेला लागूं."

इतकें म्हणून दोघींनींहि एकवार बागेंतल्या तळघराकडे खेप घातली. आणि परत येऊन आपापल्या इतर कामाला त्या लागल्या.

---

## प्रकरण अकरावें

# एका बारांतून किती गोळ्या उडाल्या !

रात्रीं बाराचे ठोके पडले. सगळें कांही सामसूम होतें. पाऊस किंचित झिमझिम असा येत होता. मायलेकी खोलींत दिवा हलका करून नुकत्याच अंथरुणावर लवंडल्या होत्या. पण लवकरच दोनतीन गोष्टी अगदी एकदम मुद्दाम कोणी घडवाव्या तशाच जणुं कांही घडल्या !

प्रथम मागील दारावर एकामागून एक, पण थोड्या अंतरानें, अशा दोन-तीन थापा पडल्या. आणि दर वेळीं 'समर्थाचिया सेवकां वक्र पाहे असा सर्व भूमंडळीं कोण आहे' हा रामदासी श्लोकाचा चरण, मध्यम उंच स्वराने, कुणीसा म्हटलेला स्पष्ट ऐकू आला. माईसाहेब व विमल जागयाच होत्या. त्यांना दिवसभर मनांत घोळत असलेल्या विषयाची एकदम आठवण होऊन दोघीहि अंथरुणावरून उठल्या. विमलने माजघरांत जाऊन मागील दाराच्या कुलपाची किल्ली आणली. पण ती घेऊन माईसाहेब एकट्याच मागील दाराचें कुलूप काढण्याला गेल्या. जातांना त्या विमलला म्हणाल्या "बाळ, तूं बैस इथेच, मींच पुढें होतें. कारण तुझ्यापेक्षा माझा चेहरा प्रभाकराच्या ओळखीचा अधिक आहे. तो मला तेव्हाच ओळखील. पण तुला पाहून एकदम न ओळखल्याने कदाचित् भांबावेल." विमल 'ठीक आहे' असें म्हणून खोलींतच बसून राहिली. मात्र तिचें लक्ष बाहेर मागील दरवाजाकडेच होतें. माईसाहेबांनी दरवाजाचें कुलूप काढलें व कंदील पुढे केला तों एक जटाधारी दाढीवाला तरुण मनुष्य आंत आला. त्याला पाहातांच "कोण प्रभाकर ! आलास एकदांचा सुखरूप" असें म्हणून माईसाहेबांनी ओळख देतांच, त्या मनुष्यानेहि "माई, आलों बरें परत तुझ्या आशीर्वादाने" असें म्हणून तिचे पाय धरले.

त्याच क्षणीं घराच्या एका बाजूच्या बोळांतून भाऊसाहेब हातांत कंदील व काठी घेऊन, गुप्त पोलीस हुडकून काढण्याची अवचित लहर

आल्यामुळे, मागील दाराशीं आले. आपली बायको तेथे उभी आहे, मागील दार उघडें आहे, उघडलेल्या दारांतून आलेला कोणी जटाधारी दाढीवाला तरुण मनुष्य तिचे पाय धरीत आहे, तिने आपला हात त्याच्या डोक्याकडे नेला आहे—हें दृश्य पाहतांच त्यांच्या हातांतला कंदील व काठी दोनहि एकदम गळून खाली पडलीं. "घात रे घात. गुप्त पोलीस रे गुप्त पोलीस! काग चांडाळणी! हाच का तुझा—तो? टपालवाला पत्रें आणून देत होता तीं याचींच बरें, याचींच! नव्हे—नव्हे आपलीं स्वतःचींच! अरेरे, काय करूं—वाटतें कीं, धावून जाऊन इच्या याच्या नरडीचा घोट घ्यावा" असें ते मोठमोठ्याने ओरडूं लागले. आणि खरोखरच धावून जाणार तों मेंदूला जबरदस्त धक्का बसून घेरी येऊन ते खाली पडले व एकदम बेशुद्धच झाले!

ही गडबड ऐकतांच विमल आपल्या खोलींतून धावतच बाहेर आली. बापाच्या हातांतून उपडा पडलेला कंदील उचलून ठेवून ती त्याच्या जवळ बसली, व तिने त्याच्या मानेखाली हात दिला. प्रभाकर उठून उभा राहिला. पण तो भाऊसाहेबांपासून मुद्दाम दूरच उभा राहिला. माईसाहेबांना अगदी घेरीच अशी कांही आली नाही. पण एखादें चित्र किंवा पुतळा उभा करावा तशा त्या जागच्या जागीं अगदीं खिळल्या जाऊन तटस्थ राहिल्या! पण येवढ्याने भागलें नाही. आणि दैवाने होणार तें असेंच होतें! कारण बरोबर याच क्षणीं मागच्या सडकेने जाणारा एक फेटावाला दाढीवाला गृहस्थ ही गडबड ऐकून दाराशीं आला. दार उघडेंच होतें. त्याचा एक पाय बाहेर तर एक आंत अशा स्थितींत त्याने आपला चोर-कंदील पुढे करून त्याचा उजेड पाडला. आंतील चार माणसांची चार प्रकारची ही अशी स्थिति दृष्टीस पडल्यावर तोहि स्तब्ध व तटस्थ झाल्यास काय नवल?

अशा स्थितींत क्षण मात्र गेल्यावर विमलच सर्वांच्या आधीं देहभानावर येऊन पुढे झाली. तिला प्रभाकर कोणचा हें तेव्हाच अंदाजाने कळलें! अर्थात् दारांत उभा राहिलेला गृहस्थ हाच काय तो येथें खरा परका; बाकी कोणी कोणच्याहि स्थितींत असलीं तरी तीं घरचींच आहेत; म्हणून प्रथम

परक्या माणसाला बाहेर घालवून नंतर दार लावून कडी घातली म्हणजे मग आंतली सर्व व्यवस्था हवी तशी सावकाश करतां येईल, अशा पोक्त विचाराने ती दाराकडे गेली, आणि दारांत उभ्या असलेल्या गृहस्थाला जवळ जवळ दटावल्यासारखें करून म्हणाली, "आपण कोण अहां? स्पष्ट सांगा. या घरच्या मागच्या दाराने अशा अवेळीं आमच्या घरांत शिरण्याचा तुम्हांला काय अधिकार? लवकर बाहेर जा कसें. मला दार लावून कडी घालायची आहे !"

हे शब्द ऐकून दारांतला तो मनुष्य चकितच झाला. त्याची दृष्टि तिच्या तोंडाकडे खिळली ती निर्वेचना. तथापि अडखळत अडखळत तो म्हणाला, "मी शहरच्या कोतवालीचा एक अधिकारी आहे. शहरांत घस्त घालायला निघालों व तुमच्या घराजवळ आलों. तों हा दरवाजा उघडा असल्यामुळे, रस्त्यांतूनच मला कांही तरी चमत्कारिक प्रकार दिसला व ऐकूं आला. म्हणून पुढे आलों; आणि खरोखरच येथें कांही तरी चमत्कारिक अभावितपणें घडलेलें दिसतें. हे बुवाजी कोण? आणि या वृद्ध गृहस्थांना घेरी आलीशी दिसते ती कां? तेव्हा तुम्हांला कांही मदत हवी असेल तर ती मी देईन आनंदानें."

हे शब्द ऐकून विमलेने पहिला रागाचा व दटावण्याचा सूर बदलला; आणि ती किंचित् दुःखाच्या स्वराने म्हणाली, "आपण घस्तवाले अधिकारीच आहांत तर आपणाला आपलें कर्तव्य केलेंच पाहिजे. पण मी आपणाला निक्षून सांगतें कीं, यापुढे सरकारी कोतवालीच्या अधिकाऱ्याने लक्ष घालण्यासारखें इथल्या प्रकारांत खरोखर कांहीएक नाही. या बुवासुद्धा आम्ही सर्व याच घरचीं माणसें आहों. यांत परकें कोणीच नाही. माझ्या बाबांना घेरी आली आहे खरी; पण आम्हीच त्यांना घरांत घेऊन जात आहों व सगळी व्यवस्था करीत आहों. फक्त आपण बाहेर गेलां म्हणजे दार लावून कडी घालण्याचाच अवकाश आहे, आमच्या कामाला लागायला ! आपण मदत देऊं केली हा आपला थोरपणा आहे. आम्हीहि त्याबद्दल आपले आभारी आहों. पण आपणाला तसदी घेण्याचें कांहीच कारण नाही; आणि हें सर्व मी आपणाला खऱ्या मनानेंच सांगतें असें समजा !"

हा सविस्तर खुलासा ऐकून दारांतील गृहस्थाने चटदिशीं दाराच्या आंत टाकलेला आपला पाय बाहेर घेतला. चोरकंदिलाचें तोंड फिरवून घेतलें; आणि विमल दार लावण्याला पुढे येत होती तिच्या तोंडाकडे पहात पहात बाहेर पडून,त्यानेच आपल्या हाताने दार ओढूनहि घेतलें. विमलने चटदिशीं दाराला कडी घातली, व कुलूप लावून किल्लीची दोरी कडोसरीला खोवली!

आतां मात्र बाकीची तिघेंहिजण भाऊसाहेबांच्या जवळ येऊन बसलीं. भाऊसाहेब कोसळून पडलें होते तरी त्यांच्या अंगाला कोठें कांही लागलें नव्हते. विमलने त्यांच्या अंगावरून हात फिरविला आणि कानाला तोंड लावून "बाबा, बाबा, सावध व्हा. येथे गुप्त पोलीस नाही, परकेहि कोणी नाही, आपण सर्व घरचींच माणसें आहों, चलणार ना उठून घरांत!" असें एकदां लहान स्वरानें व नंतर थोडें मोठ्याने तिने म्हटलें. पण भाऊसाहेबांना खरोखरच गाढ बेशुद्धि आली होती, असें पाहून माईसाहेब म्हणाल्या "मला वाटतें आतां आपण सर्व घरांतच जाऊं." लगेच प्रभाकर पुढे झाला. त्याने भाऊसाहेबांना अल्लाद उचलून आपल्या खांद्यावर आडवें टाकलें. माईसाहेबांनी एक व विमलने दुसरा कंदील घेतला व थोडा मोठा केला. आणि सर्व मंडळी माजघरालगतच्या आजाऱ्यांच्या खोलींत गेली. या ठिकाणीं एक पलंग व मच्छरदाणी नेहमीचीच पाहुण्या स्त्रियांकरितां घालून ठेवलेलीं असत. माईसाहेबांनी चटदिशीं आंथरूण झटकून एक नवा पलंगपोस वर घातला. प्रभाकराने भाऊसाहेबांना अंथरुणावर निजविलें. विमलने कोलन वॉटरची बाटली आणून हातरुमालाची घडी भिजवून बापाच्या डोक्यावर ठेवली, व आपण त्याच्या शेजारी पलंगावरच बसली. इतर दोघे दोन खुर्च्या जवळ ओढून घेऊन त्यांवर बसलीं. तिघांच्याहि तोंडून एकदम एकच उद्गार निघाला, 'कोण हा कठिण प्रसंग'!

* * *

दुसरे दिवशीं, मनोहरपंत आपल्या राजमित्राच्या भेटीला नेहमीप्रमाणे गेला. पण राजेसाहेबांकडून त्याचें स्वागत नेहमीप्रमाणे झालें नाही. राजेसाहेबांनी दिवाणखान्याच्या खिडकीशीं खुर्ची ओढून घेतलेली असून, तिजवर बसून ते बाहेर दूरवर दिसणाऱ्या देखाव्याकडे पाहात होते.

बाहेर देखावा पाहण्यासारखा होता यांत शंकाच नाही. गांवाभोंवती उंच डोंगरांचीं रांग धनुष्याकार असून, पर्जन्याच्या समृद्धीमुळे तिच्यावर हिरवें चार गवत उगवलें होतें. यामुळे मखमलीनेच डोंगर झाकून काढले आहेत कीं काय असें वाटे. त्यावरून वाहणारे पाण्याचे शुभ्र प्रवाह चंचळ हलणार खरे. पण इतक्या दुरून त्यांच्या पाण्याची हालचाल कशी दिसणार ? यामुळे हत्तीच्या पाठीवरून सांडलेल्या रुप्याच्या सांखळ्यां-प्रमाणें ते निश्चल वाटत ! त्याच्या अलीकडे पाहावें तों, भाताचीं हिरवींगार शेतें यांचा जसा कांही अखंड गजामाचा पसरलेला असून, मधून मधून फुललेलीं रंगीबेरंगी झुडपें कुसरीप्रमाणे भासत. त्याच्याहि अलीकडे एक लहानशी पण सुंदर स्वच्छ नदी वळणावळणांनी गांवाला वळसा घालून वाहात होती, व गांवचीं मुलें त्यांत स्वच्छंदाने डुंबत होतीं. त्या अलीकडे, एका बाजूला राजवाड्यांतील बगीच्याच्या संरक्षणाकरिता मुद्दाम लावलेलीं कळकाचीं बेटें, आणि त्या शेजारी आपोआपच उगवलेलीं वड-पिंपळाचीं झाडें, उंच गेलेलीं असून, पलीकडच्या डोंगराच्या उंचीशीं स्पर्धा करताहेतसें वाटे. या झाडांतून पक्षांची येरझार व किलकिलाट एक-सारखा सुरू होता. आणि एखाददुसरा सुंदर रंगीत पक्षी राजवाड्याच्या तटावर थेट राजेसाहेबांच्या समोर येऊन बसून, आपला धीटपणा प्रगट करी. खिडकींतून येणारा वारा गार असून, खाली बगीच्यांत थुई–थुई उडणाऱ्या कारंजांतील फवाऱ्याचा एखादा तुषारहि त्यावरून वाहून त्यांच्या अंगावर येई.

पण केवळ हा सर्व देखावा पाहण्यांतच राजेसाहेब गढून गेले होते असें म्हणावें तर, मनोहरपंत अगदी जवळ आले व त्यांनी ‘काय राजेसाहेब’ अशी हाकहि मारली, तरी राजेसाहेबांची दृष्टि वळली नाही ! या-वरून त्यांचें मनच आज जाग्यावर नाही, व्यग्र आहे, असा त्यांच्या मित्राने तर्क केला व तोच खरा होता. तेव्हा या वेळीं मित्रत्वाच्या अधिकाराचा भरपूर उपयोग करून मनोहरपंतांनी नवलरायाच्या खांद्यावर हात ठेवला, आणि लहान मुलांचें लक्ष वेधण्याकरिता त्याच्या कानांत कुर्र करतात त्या-प्रमाणें केलें. तेव्हा नवलराय देहभानावर आला, व मग त्या उभयतांचें संभाषण सुरू झालें.

मनो.—" कां, आज स्वारीचें लक्ष कुठें आहे ! मन कुठें आहे ! "

नव.—"असायचें तिथेंच ! पण मनाची जागा फक्त शास्त्रज्ञांना माहीत असते. कोणी म्हणतात ती मेंदूंत आहे, कोणी म्हणतात ती हृदयांत आहे, कोणी म्हणतात ती पाठीच्या कण्यांत आहे."

मनो.—" पण मनाची जागा कुठेंहि असली तरी, घरटें सोडून तो पक्षी बाहेर उनाडावयाला जातो तेव्हा घरटें रिकामेंच नसतें काय ! तसेंच मी आलों तेव्हा राजेसाहेबांच्या मनोरूपी पक्ष्याचें झालें होतें खास ! "

नव.—"ठीकच आहे. पक्ष्याचीं अंडीं आणि पिलें चोरायला येणारे साप किंवा उनाड पोरें पक्षी घरट्यांत नाही असें पाहूनच, पण चाहूल न लागू देतां, फिरत असतात."

मनो.—" मी आलों तेव्हा घरट्यांत पिलें दिसत नव्हतीं. म्हणून तीं मला चोरतां आलीं नाहीत. आणि आता पिलांचा किलबिलाट सुरू झालेला ऐकतों, पण पक्षीहि येऊन बसला आहे घरट्यांत. मग तीं पिलें माझ्या हाताला कशी लाभणार ! "

नव.—" पक्षी घरट्यांत येऊन बसला म्हणून हात हलवीत परत जातील अशीं बिनपराक्रमी द्वाड मुलें जगांत नाहीतच मुळीं ! पक्ष्यासकट त्यांचीं पोरें पळवून नेण्याचीच तीं ईर्षा धरतात. शिवाय या माझ्या देहाच्या घरट्यां-तला पक्षी तरी, पिलांसकट स्वाधीन होण्याच्या इच्छेने, कोणी द्वाड उनाड मुलगा येतो आहे का अशी वाटच पाहत आज बसला होता ! "

मनो.—" अरेरे, पक्षी कधी नव्हे तो आज जिकीरीला आलेला दिसतो. एरवी पिलांच्या आणि आपल्या जिवावर तो असा उदार होताना ! पक्ष्याला कोणा पारध्याच्या गोफणींतला खडा वर्मी लागला कीं काय ! "

नव.—" हो, तसेंहि म्हटलें तरी कांही हरकत नाही. पण थट्टा राहू दे. तुझीच वाट पहात होतों, मनोहर. तुला कांही सांगायचें योजलें आहे सकाळपासून ! "

मनो.—" तें कशाबद्दल बुवा ! "

नव.—" काल रात्रीं घस्तीला गेलों तेव्हा जें पाहिलें त्याबद्दल ! "

मनो.—" पण तें जें काय पाहिलें त्यानेच जर आज तुमचें मन इतकें उद्विग्न झालें असेल, तर पहिलीच घस्त तुमच्या अंगावर आली म्हणावयाची ! असो. पण ऐकूं या काय आहे तें नीट !"

नव.—" घस्त अंगावर आली असें कां म्हणतोस ?"

मनो.—" कारण तिने तुम्हाला कधीं नव्हे तें असें चिंतेंत लोटलें म्हणून. आपण प्रजाजनांचे दुःख पाहण्याकरिता घस्तीला गेलां, आणि पहिल्याच घस्तींत पाहिलेल्या दुःखाने स्वतः चिंतासमुद्रांत बुडाला. तेव्हा आता बाकीच्या प्रजाजनांच्या दुःखाची आपण कशी चवकशी करणार !"

नव.—" थट्टा कसची करतोस रे मनोहर ? मी पाहिलेला प्रकार तूं आपल्या डोळ्यांनी पाहिला असतास म्हणजे तुलादेखील माझ्यासारखीच हुरहूर लागल्याशिवाय राहिली नसती अशी माझी पक्की खात्री आहे."

मनो.—" बरें, पण असा प्रकार तरी काय पाहिलात तें सांगाल कीं नाही !"

नव.—" ऐक. बारांचा ठोका पडल्यावर मोतीचौक सोडून देऊन उजव्या हाताच्या लहान रस्त्याने मी निघालों."

मनो.—" तुम्ही मोठा रस्ता सोडून लहान रस्त्याने चाललां हीच पहिली चूक झाली. राजमान्य घस्त फक्त मोठ्या राजमार्गाने घालावयाची, म्हणजे सगळी आबादीआबाद दिसते. दुःख किंवा हलाखी नजरेलाच पडत नाही."

नव.—" ऐक आधी, तुझी टीका राहूं दे. त्या लहान रस्त्याने कांहीसे दूर गेल्यावर एका मोठ्या हवेलीची पिछाडी दिसली.

मनो.—" लहान रस्त्याला लागून मोठी हवेली ! कोण हा अप्रयोजकपणा !"

नव.—" हवेलीच्या बाजूने फिरून एक बोळ होता; आणि बोळाच्या तोंडचें हवेलीचें मागील दार उघडें होतें. त्यांतून प्रथम दुरून पाहिलें तों एखाद्या नाटकांत मुद्दाम दाखवावा तसा देखावा दृष्टीस पडला."

मनो.—" ठीक. दिवसा आपण निघता तेव्हा नाटकी देखावे दिसतात म्हणून रात्रीं हिंडायला निघालां तरी तिथेंहि तुमच्या पुढे नाटकी देखावाच

वाढून ठेवला होताना ? एकूण या नाटकी देखाव्यांनी तुमची पाठच पुरविली म्हणावयाची. बरं, या देखाव्याचें वर्णन तरी ऐकूं या पुढें."

नव.—" या घराच्या पिछाडीचें दार आंतून कोणीसें उघडले होतें. एक वृद्ध मनुष्य घरांतून हातांत कंदील काठीं घेऊन एका बाजूने आला. त्याच क्षणीं दाढी वाढविलेला एक तरुण मनुष्य दुसऱ्या बाजूने आंत शिरला. त्याला पाहून जवळच उभ्या असलेल्या एका मध्यम वयाच्या स्त्रीने कांही शब्द उच्चारले. त्या दाढीवाल्या तरुणाला पाहतांच तो म्हातारा " अरे चोर रे चोर. गुप्त पोलीस रे गुप्त पोलीस, हाच का तो टपालवाला तुझा ! थांब तुझ्या नरडीचा घोट घेतो" असें ओरडून धावला; पण लगेच बेशुद्ध होऊन खाली पडला. इतक्यांत दुसरी एक स्त्री घरांतून बाहेर आली, आणि त्या सर्वांनी त्या म्हाताऱ्याला शुद्धीवर आगण्याचा प्रयत्न चालविला."

मनो.—" बरें, मग तुम्ही काय केलें ? एवढे घस्तीला गेलां होतां तें !"

नव.—" हा अकल्पित प्रसंग पाहून मीं तर प्रथम गांगरूनच गेलों ! पण लवकरच निश्चय करून मदत देण्याला म्हणून मी पुढे होणार तों इतक्यात मागाहून आलेल्या त्या सुंदर तरुण स्त्रीने पुढे येऊन मोठ्या धीटपणाने पण मर्यादशीलपणाने मला प्रतिबंध केला."

मनो—" हे पहा ! तरुण आणि सुंदर हें या स्त्रीचें वर्णन मुद्द्याला सोडून आहे बरें ! ती काय म्हणाली तेवढें सांगा. तेवढेंच पुराव्यांत ग्राह्य होईल."

नव.—" ती म्हणाली आपण कोण आहां ! "

मनो.—" मग तुम्ही काय सांगितलें त्या सुंदर–तरुण–धीट स्त्रीला ? "

नव.—" प्रथम मीं उत्तर देण्याचें टाळलें. पण मग कांही तरी उत्तर द्यायलाच पाहिजे म्हणून म्हणालों कीं, घस्त घालणारा मी एक सरकारी अधिकारी आहें. "

मनो.—" मग ती काय म्हणाली ?"

नव.—" ती म्हणाली–तुम्ही कोणीहि अधिकारी असा; पण ही आमच्या गृहप्रपंचाची गोष्ट आहे."

मनो.—" म्हणजे तुम्ही यांत लक्ष घालूं नका, एकदम चालते व्हा, असा अर्थ ! मग तुम्ही हो काय केलें ? "

नव.—" त्या साध्या पण गंभीर दटावणीमुळे मी मागच्या पायानें परतलों. खचित्, मनोहर, हें कांही तरी भानगडीचें प्रकरण दिसतें. आणि काय असेल तें असो, तेव्हापासून मला अगदीं सुचेनासें झालें आहे. तें कां कुणाला ठाऊक ! "

मनो.—" मीं सांगू त्याचें खरें कारण ! "

नव. " सांग पाहूं."

मनो.—" सुचेनासें होण्याचें कारण ती भानगड नव्हे, तर त्या ठिकाणीं पाहिलेली स्त्री–म्हणजे तुमच्याच भाषेनें बोलायचें म्हणजे ती तरुण व सुंदर स्त्री. एरवीं तुम्ही असें देहभानावरून गेला नसतां आणि असे सुसकारेहि टाकले नसते. तुमच्या डोळ्यांवरूनच मीं सांगतों कीं, तुम्हांला या भानगडीपेक्षा त्या स्त्रीचीच बाधा अधिक झालेली दिसते. कां ? असें मान खाली कां घालता राजेसाहेब ! ठीक महाराज! आपली पहिली घस्त भर अवसेच्या पण चांगल्या मुहूर्तावरच निघाली असली पाहिजे.

नव.—" भलतेंच बोलतोस मनोहर ! मी काल पाहिलेली स्त्री काय अविवाहित आहे असें मला माहीत होतें म्हणून माझें लक्ष तिच्याकडे जाईल ! "

मनो.—" भलतेंच कसें ! दुष्यंताने कधी शकुंतलेचा ठावठिकाणा विचारला होता, तिच्यावर प्रेम बसण्याच्या आधी ? पण " सतां हि संदेह-पदेषु वस्तुषु–प्रमाणमंतःकरणप्रवृत्तयः " या नीतिसूत्रावर त्याने आपलें समर्थन केलें आणि तें साधलेंच कीं नाही शेवटीं ? बाबा, तुम्हा प्रेमी राजे लोकांचा आद्यपूर्वज दुष्यंत. घराण्याचें वळण तुम्ही गिरविलें तर तुमची ती चूक कोण म्हणेल ? "

नव.—" तें जाऊं दे रे तुझें चऱ्हाट ! पण आधीं मला सांग कीं या प्रकरणाचा उलगडा करायला तूं मला मदत काय करणार ? "

मनो.—" काय म्हणाल ती. प्रथम त्या हवेलीचा पत्ता काढतों आणि मग तुम्हाला दटावणाऱ्या स्त्रीचा. नव्हे चुकलों त्या सुंदर व तरुण स्त्रीचा "

नव.—" पण एक कर हां मनोहर ! तिनें मला दटावलें म्हणून तूंहि नको हां तिला उलट दटावूं, अधिकार गाजवून ! "

**मनो.**—"छेः, गाजवायला अधिकारच नाही मजजवळ कसला. मी तुमचा प्रायव्हेट सेक्रेटरीहि नाही, फक्त खाजगी मित्र. राजाचा मित्र झाला म्हणून त्याला अधिकार नसतात! शिवाय तिला दटावीन असें कुठें म्हटलें मी? तुम्हाला एवढ्या धिटाईनें दटावणारी तरुण व सुंदर स्त्री, कोणाची कोण व अविवाहित आहे कीं काय, याचीच चौकशी करितों!"

**नव.**—"मनोहर काय करावें तुला! तूं भलतेंच समजतोस कांहीं तरी. मला शोध पाहिजे तो मी पाहिलेल्या सगळ्याच माणसांचा?"

**मनो.**—"होय, पण माणसा माणसांत फरक असतो ना? खरेंच पूर्वी घस्तीला जाण्याचा पहिला बेत तुम्ही केला त्या दिवशीं मी सहज तुम्हांला खलीफ हरून अलरशीद आणि राजा विक्रम यांची उपमा दिली ती आता सर्वांगांनी खरी ठरूं पाहत आहे कीं हो! खरोखर ती उपमा देण्याची स्फूर्ति मला झाली ती दिव्यच असली पाहिजे! अगदी मंत्रद्रष्टया ऋषींच्या स्फूर्तीसारखी! आपल्याच हातानें रोज दाढी तासून तोंड गुळगुळीत करणाऱ्या अस्मादिक सुधारकाचेंहि शब्द, दाढीमिशांचें जंगल वाढ विणाऱ्या प्राचीन ऋषींच्या तोंडून निघाल्याप्रमाणचे खरे होऊ शकतात तर! या कलियुगांतहि! एकूण जुन्या अरेबियन नाइटची नवी आवृत्ति खरीच निघणार! खलीफ घस्तीला गेला तो कोणा तिघा बहिणींच्या घरीं गेला. तिथें त्याने फारच अद्भुत प्रकार पाहिले. त्यांतली एक बहीण जुबेदी इने खलीफाला बजावलें होतें कीं, या ठिकाणीं जो चमत्कार पाहायला सांपडेल त्याच्या चिकित्सेच्या भानगडींत बाहेरच्या माणसाला पडायला मनाई आहे. आणि तुम्ही घस्तींत त्या मोठ्या हवेलीच्या मागच्या दारीं जो प्रकार पाहिला त्यासंबंधानेहि तुमच्या त्या तरुण व सुंदर स्त्रीने तुम्हांला नव्हतें का असेंच बजावलें कीं, "आमच्या गृहप्रपंचातली ही भानगड, यांत तुम्ही लक्ष घालूं नये तुम्ही कोणीहि असला तरी." पण शेवटीं खलिफाला राहावलें नाहीच, तुम्हाला आज राहावलें नाही तसेंच! त्याने दुसरे दिवशीं भानगडीची चौकशी केलीच, तुम्ही आता मला करायला सांगतां तशी! आणि शेवटीं खलिफाचें आणि तिघींतली एक बहीण जुबेदी यांचें लग्न

झालें! तसलें इथें होतें कीं काय हेंच आता पहावयाचें आहे! विक्रम राजानें घर्स्तीत शशिकलेनें केलेली आपली निंदा ऐकली आणि लगेच दुसऱ्या दिवशीं तिच्या बापाकडे मागणी घातली तिच्याकरितां. मग त्या दाखल्याप्रमाणें तुम्हांला काल दटावणारी स्त्री अविवाहित आहे असें चौकशींत कळलें तर तुमच्याकरितां तिला मागणी घालण्याचा अधिकार मला देणार कीं नाही या चौकशींत, तेवढें सांगा म्हणजे संपलें."

हें ऐकून राजेसाहेबांना हंसूं कोसळलें. त्यांची चिंतामग्न स्थिति होती ती सर्व पालटली, आणि मनोहराला विनोदाचा उलट अहेर करण्याकरितां ते म्हणाले—

नव—"अरे मनोहर, माझें लग्न जेव्हा केव्हा होईल त्या वेळीं माझ्याकडचा मुख्य व्याही तुझ्याशिवाय दुसरा कोण होणार ? तेव्हा माझ्या वधूकरितां मागणी घालण्याची वेळ येईल तेव्हा तो मान तुला सोडून मीं दुसऱ्या कोणाला कसा देईन? पण सुंदर आणि तरुण हीं विशेषणें त्या स्त्रीसंबधानें लावण्याची बुद्धि मला कुठून झाली कुणाला ठाऊक ! तीं घेऊन उगाळून पालुपदासारखीं नाचवून माझी चेष्टा करण्याचा हा जो चावटपणा तूं मघाचपासून चालविला आहेस तो भाई आतां कृपा करून पुरे करना ! मी काल घर्स्तीत पाहिलेला प्रकार सांगितला त्यांत तुला अद्भुत असें कांहीच वाटत नाही कीं काय ? इतका अरसिक केव्हापासून झालास ? असो. आता सांगितलेली कामगिरी तरी बजाव कसा ! तूं परत येऊन कांही खुलासा सांगेपर्यंत माझ्या मनाला स्वस्थता वाटणार नाही !"

असें म्हणून राजेसाहेबांनी चहा मागविला; आणि दोघांनीहि तो घेतल्यावर प्रेमाचे धक्के मारून राजेसाहेबांनी मनोहराला दिवाणखान्यांतून बाहेर काढून दिला !

## प्रकरण बारावें

# अज्ञातवासातलें आत्मचरित्र

अमावास्येच्या रात्रीच्या त्या प्रकारापासून भाऊसाहेब प्रथम बरेचसे बेशुद्धींत होते. तेथून पुढे ते अर्धेमुर्धे शुद्धींत आले. तथापि त्यांना आंथरुणावर उठून बसण्याची शक्ति नव्हती. तसेंच, बेशुद्धि नसली तरी मधून मधून भ्रमाची लहर येई, व त्या लहरींत त्या रात्रीच्या प्रकाराला उद्देशून गुप्त पोलीस आणि आपल्या बायकोचा काल्पनिक प्रियकर यांच्याविषयी ते कांहीं तरी बडबडत. दुसरें कोणी जवळ बसून बोलवूंच लागलें तर त्याच्याशीं तेवढा विषय ते बोलत. पण अगदीं एकटे असले म्हणजे भ्रमांतली त्यांची बडबड पुन्हा सुरू होई !

एका दृष्टीने भाऊसाहेबांची ही स्थिति माईसाहेब व विमल यांच्या किंचित् पथ्यावर पडली. भाऊसाहेबांचें घरातलें व घराभोंवतीचें परिभ्रमण थांबल्यामुळे, परसांतील बंगली व तळघर यांच्या आश्रयाने प्रभाकराला निर्वेध राहतां आलें. आणि प्रभाकराने कसें केव्हा प्रगट व्हावें याचा विचार सावकाशपणें करण्याला सर्वांना वेळ मिळाला. रात्रीं भाऊसाहेबांना झोंप लागली म्हणजे दौलतीला त्यांच्याजवळ बसवून हीं तिघेजणें एकत्र जमून स्वस्थपणें चर्चा करीत.

आज दिवसा झोंप फारशी न आल्याने, व औषधांत थोडेसें झोपेचें औषधहि घातल्याने, भाऊसाहेबांना रात्रीं नऊ वाजताच चांगली गाढ झोंप लागली. दौलतीनेहि दाराबाहेर आपली पथारी आंथरली. यामुळे बंगलींत बसून दोघी मायलेकींना प्रभाकराशीं मनमुराद बोलतां आलें. पुष्कळ वर्षांनी भेटल्याचा आनंद खरा; पण ग्रहण लागूनच उगवलेल्या चंद्राप्रमाणें त्या आनंदाला प्रारंभींच चिंतेनें ग्रासलें होतें. यामुळें त्या तिघांच्या संभाषणांत एक प्रकारची गंभीरता आली होती.

**माई**—" प्रभाकर, बाळ कुठे रे होतास इतकीं वर्षे, तूं नाहीसा झालास

तो एकदम ! आधी सूचनेचे दोन शब्दहि मला तूं बोलला नाहीस जाताना. त्यामुळे मीं पहिल्या दोन रात्रीं अलोचन जाग्रण करून काढल्या बघ. "

प्रभा.—" माई, तशी सवड मिळती तर तुझ्या पायावर डोकें ठेवून तुझा आशीर्वाद घेतल्याशिवाय मीं गेलों असतों का ? पण काय करूं ! पोलीस अधिकारी जमावाने घराकडे येतांना माडीवरून पाहिल्याबरोबर मी घाईघाईने कपडे घालून मागच्या दाराने बाहेर पडलों. रात्रीं कंकण-वाडींत माझ्या एका जिवलग मित्राच्या घरीं लपून राहिलों. तो पोलिसी नोकरींतच होता. त्याने घरीं आल्यावर दरबारांत माझ्याबद्दल काय काय कारवाई चालली याची हकीकत सांगितली. तेव्हा त्याच्याच सल्ल्याने पहाटे उठून मी थेट मोंगलाईची वाट धरली, आणि त्यानंतर काल पुन्हा घराला माझे पाय लागले ! "

माई—" तूं चटदिशीं निघून गेलास म्हणूनच त्यांना सांपडला नाहीस. पोलीस शिपाई जमावाने आले. त्यांनी सगळ्या घराची नाकेबंदी केली. हे घरांतच होते. त्यांनी पोलीस अधिकाऱ्याला खुर्चीवर बसवून हकीकत विचारून घेतली. आणि त्याने 'प्रभाकराला सरकारी हुकमाने आम्ही पकडायला आलों आहों' असें सांगितल्यावर यांची अशी कांही घाबरटपणाची स्थिति झाली कीं सांगतां पुरवत नाही. तुला कां पकडायला आले, तूं अपराध कोणचा केलास, हें कोणीच नीट खुलासेवार सांगेना; पण शिपाई आले तेव्हा तूं घरीं सांपडला नाहीस, आणि त्या रात्रीपासून पुढें घरीं परत आला नाहीस, यामुळे तुझें म्हणणें काय हें कळायलाहि कांही मार्ग उरला नाही. आणि तेव्हांपासून तुझें नांव निघालें कीं, रागावतात, जळफळतात, म्हणतात याने माझ्या तोंडाला काजळ फासलें, माझी सर्वस्वी बेअब्रू केली."

विम.—" खरेंच दादा, तूं पळून न जातां सरकारच्या स्वाधीन होऊन आपला बचाव केला असतास तर तें तुला आणि बाबांनाहि नसतें का अधिक बरें झालें, एकंदरीनें ! "

प्रभा.—" ताई, माझी तेव्हा पोरबुद्धि होती. शिवाय आधी वार्ता नसतां एकदम धरणें आलें हें पाहून मीं घाबरून गोंधळून गेलों. पण खरें बोलायचें तर बाबांचा मला खंबीर आधार आहे असा विश्वास मनां-

तून वाटत असता, तर मी खचित असा फरारी झालों नसतों. पण हें प्रकरण असें उपस्थित होण्यापूर्वीच बाबांचा आणि माझा स्वभाव न जुळल्याने आमचे खटके उडत असत."

विम.—" ते कशाबद्दल ! "

प्रभा.—" त्यांना दिवाणसाहेब हे अधिकारी या नात्याने आणि एरवीसुद्धा जें काय करतील तें बरोबरच वाटे. आणि मला सर्व प्रकारची जनवार्ता कानावर येई, लोकमत समजे, यामुळे मी लोकांची बाजू घेऊन दिवाणाना बाबांच्या देखतांहि स्नेह्यासोबत्यां जवळ नांवें ठेवीं. याकरितां पुढे पुढे माझ्या मित्रमंडळींनाहि आमच्या घरीं येण्याची बाबानी बंदी केली. आणि मला म्हणूं लागले कीं, " तुला हे राजकारणाचे आणि राजद्रोहाचे नसते चाळे लागले आहेत. आणि तूं माझें न ऐकलेंस याहिउपर तर तुला घरांतून घालवून देईन. तुझ्या चांगल्या वर्तनाबद्दल उद्या सरकाराने जाभिनकी मागितली तर दुसरा कोणी तर उभा राहणार नाहीच; पण मलादेखील जामीनगत पतकरतां येणार नाही. तुझा स्वभाव हा असा तापट उतावळा. तूं केव्हां आपल्या वळणावर जाऊन काय करशील याचा नियम नाही. मग तुझ्याकरितां हजारो रुपयांचा दंड मला सोसावा लागेल ! आणि फार तर हें एखादे वेळ मी करीन आणि सोशीनहि. पण वरचेवर तें कसें करणार ? आणि जामीन न मिळाला तर तुरुंगात राहावें लागेल. तेव्हां आपला विचार काय तो पाहा." एरवीसुद्धा जर अशा गोष्टी होत तर, प्रत्यक्ष पोलीस मला वारंटाने पकडायला आल्यावर बाबांनी माझी संभावना कशी केली असती याची कल्पना तुम्हाला सहजच करतां येईल. खुद्द बाबांच्याच मनांत माझ्याबद्दल संशय, मग माझा बचाव खरा कितपत झाला असता हें तुम्ही पाहातांच ! " पण त्याहूनहि मनुष्यस्वभावाची गोष्ट म्हणून सांगतों कीं, एकदां जें हातून झालें तेंच मनुष्य मग पुढे पुढे करीत जातो. त्याचें पाऊल सहसा मागें पडत नाही. परिणाम काय होणार हें नशिबावर अवलंबून राहतें."

माई—"बाळ, तूं केलेंस तेंच बरोबर. आम्ही तरी तुला दोष कसा द्यावा ? तुझ्या घरचीं माणसें ईन मीन तीन. त्यांतले तुझे वडील हेच कायते तुझ्या

संकटांत खरे उपयोगी पडणारे. त्यांची स्थिति तूं तोंडाने वर्णन करून सांगितलीसच; आणि ती खरीच तशी होती. उरलों आम्ही दोघी. पैकीं मीं तुझ्याच वयाची आणि तुझ्यापेक्षाहि पोरबुद्धीची. आणि विमल तर काय दहा वर्षांची पोर ! तिला हें आणि तें कांहींच कळत नव्हतें. "

**विम.**—" हें तेव्हांचें झालें. पण मग दादा आतां तुला परत यावें असें वाटायला काय कारण ? "

**प्रभा.**—"ताई, हें विचारलेंस तें बरें केलेंस. बारा वर्षांनी प्रत्येक गोष्टीची स्थिति बदलते असें म्हणतात. या बारा वर्षांच्या युगांतरावर माझा विश्वास आहे. मग तुम्हांला वाटलें तर मला भोळा म्हणा ! पांडवांना शिक्षा बारा वर्षांच्या वनवासाची. रामाचाहि वनवास बारा वर्षेंच टिकला. त्याअखेर त्यांचें सर्व कांहीं कार्य झालें.पण देवांप्रमाणे माणसांनाहि या बारा वर्षांच्या युगांतराचा अनुभव येतो. माझी वनवासांतलीं आणि अज्ञातवासातलीं बारा वर्षें पुरीं होण्याच्या वेताला, "आतां परत जावें, मग काय व्हायचें असेल तें होईल" अशी बुद्धीची प्रेरणाच होऊं लागली ! पण आणखीहि एक कारण सांगण्यासारखें घडलें. आपल्या संस्थानच्या गादीवर नवे संस्थानिक बसले, त्यांना कच्ची मुखत्यारी मिळाली, त्या वेळीं त्यांनी जें भाषण केलें तें एका वर्तमानपत्रांत मला सहज वाचायला मिळालें. त्यांत ते असें म्हणाले म्हणे कीं, मी दिवाणसाहेबांच्या कारकीर्दीत झालेल्या कारभारांची न्यायबुद्धीने तपासणी करीन, मगच पक्की मुखत्यारी घेईन, तोंपर्यंत दिवाणसाहेब राहतील. कोणाहि संस्थानिकाच्या तोंडून असले शब्द निघतील असें कुणाला तरी वाटलें असतें काय? पण तें वाचून मलाहि वाटलें कीं बारा वर्षांनी आता तरी आपल्या नवलपूर संस्थानच्या कारभाराचें चक्र बदलणार. या संधीचा फायदा घेऊन मला न्याय मिळाला तर पाहावा, फासा फिरून एकदा टाकावा, मग दान काय पडेल तें पडेल, अशा विचारानें परत येण्याचा निश्चय केला. आणि त्याबरोबर माईच्या नांवाने पत्र लिहून टपालांत टाकलें. पत्रांत केला याहून अधिक खुलासा करण्याला भीति वाटली. कारण न जाणो कुणाच्या हातांत पत्र पडतें कुणाला ठाऊक ! म्हणून पत्र असें संदिग्ध लिहिलें कीं, तिऱ्हाइताच्या हातांत तें पडलें तर, कोणा वेड्या

पिशाने कांहीं तरी निनावी लिहून उगाच पोष्टाचे पैसे खर्च केले असें वाटून तो तें फाडून टाकील. बाबांच्या हातीं तें पडलें तर नक्की काय होईल याचा मनाशीं निश्चय नव्हता. पण माई, तुझ्यापर्यंत पोचलें म्हणजे तूं मात्र तें बरोबर ओळखशील अशी खात्री होती."

**माई**—" होय बाळ, तुला हवें होतें तसेंच झालें. म्हणजे तिऱ्हाइताच्या तर हातीं तुझें पत्र पडलेंच नाही, पण यांच्या हातीं तें हटकून जायचेंच, नेहमींच्या रीतीने. असें असता तें कधीं न व्हावें त्या रीतीने नेमकें माझ्या हातांत येऊन पडलें. "

**विम.**—" पण दादा, तसें तें नेमकें माईच्या हातीं येऊन पडलें यामुळे एक कार्यभाग झाला खरा; पण त्याने आपला एक वेगळा गुण केल्याशिवाय मात्र सोडला नाही."

**प्रभा.**—" तें कसें काय बरें ! "

**विम.**—" तें असें. माईच्या हातांत परस्पर पत्र पडलें याचें बाबांना इतकें आश्चर्य वाटलें कीं, त्यामुळे त्यांच्या मनांत माईविषयी येऊं नयेत ते संशय आले. त्या संशयामुळे त्यांना अर्धवेड लागलें असेंहि म्हणायला हरकत नाही. तुझ्या-बद्दल त्याना तो तसा संशय आला. आणि माईबद्दल असा आला. आम्ही संसारांत माणसें चार ! आणि आमच्या संसारसुखाचें हें चित्र ! धन्य आहे कीं नाही आमची ! "

**प्रभा**—" ताई, संसार हा असाच आहे इथूनतिथून सगळा. मी बारा वर्षें संसारांतून निघून गेलों होतों, त्यापूर्वीं या संसारदुःखाला जें कारण होतें तें तर अजूनहि निघून गेलें नाही. आणि मीं परत येण्याच्या सुमाराला माझ्याचमुळे त्या संसारदुःखाला आणखी एक नवें कारण उत्पन्न झालें याबद्दल वाईट वाटतें. पूर्वीं मी एकट्या बाबांनाच त्रास-दायक होतों तर आता, माई, तुलाहि त्रासदायक झालों ना ! याबद्दल मात्र विशेष वाईट वाटतें ग ! "

**माई**—" प्रभाकर, बाळ, शपथ आहे तुला माझ्या गळ्याची असें बोल-शील किंवा मनांत आणशील तर पुन्हा ! तुझ्या पत्रामुळे इकडे भलता संशय आला खरा. पण खरें तेंच बोलायाचें तर, मीं आताच नव्हे तर माझें लग्न

झाल्यापासून बहुतेक जन्मभर यांच्या अशा संशयांतच काढला आहे, समजलास! तिसरेपणावर मला आईबापांनी द्यावी हें माझें दैव. त्याला दुसरें कोण काय करणार ? ”

विम.—“ दादा, माई म्हणते तेंच खरें. तूं आपल्या जिवाला मुळीच कांही लावून घेऊं नकोस. आपण तिघें एका जिवाभावाचीं आहों हें सुख का थोडें आहे ? या सुखाच्या बळावर आपणाला याहून मोठीं संकटें निभावतां येतील. आम्ही काय इथें सुखांत होतों. तूं मात्र बारा वर्षें वनवासाचें दुःख भोगलेंस, त्यांत तुला कांहींच हातभार लावतां आला नाही याबद्दल मात्र आम्हांला वाईट वाटतें.”

प्रभा.—“ ताई, तुम्हीं जशीं दुःखांत सुख मानून घेणारीं आहां तसाच मींहि पण आहें. बारा वर्षांत एक प्रकारचा वनवास होता खरा; पण त्याचें दुःख इतकेसें वाटलें नाही. अज्ञातवासाचें दुःख मात्र वाटत होतें खरें ! ताई, माई, तुम्ही महाभारत वाचलेंच आहे. त्यांत पांडवांना वनवासापेक्षा विराट नगरींतल्या अज्ञातवासाचेच दिवस अधिक जाचले नव्हे का ?”

माई—“ अज्ञातवास दुःखाचा हें तर खरेंच. पण वनवासांत तुला दुःख कसें नव्हतें ? तूं काय करीत होतास ? कुठें राहत होतास ? तुला जेवायखायला कोण घालीत होतें ? दुखण्यांत औषधपाणी कोण देत होतें ? ती सगळीच मोठी नवलकथा असली पाहिजे. सगळ्यांत आश्चर्य वाटतें तें हें कीं, तूं गेल्यापासून इकडे आम्हांला एकहि पत्र कसें पाठविलें नाहीस ? ”

प्रभा.—“तो सर्वस्वी माझा गुन्हा आहे. पण थोडक्यांत सांगायचें म्हणजे, माझ्या वयाचीं भावनावश अशीं तरुण मुलें जीं अलीकडे पाहायला सांपडतात त्यांचाच मीं एक अस्सल नमुना आहें म्हणेनास ! मीं नवलपूरची शीव बारा वर्षांपूर्वी ओलांडली त्याक्षणीं अशी शपथ घेतली कीं, या दुष्ट गांवाचें बारा वर्षें तोंड पाहायचें नाही. संस्थानाला सद्गुणी राजा नाही म्हणून बाप नाही. बरें, मला घरीं बाप आहे पण तोहि माझ्या विषयीं अन्यायी ! म्हणून हें गांव आणि हें घर दोनाहि मीं कायमचीं सोडून द्यायला तयार झालों. आणि ही बारा वर्षांची शपथ घेतली ती पार पाडली. तीं बारा वर्षें पुरीं होण्याला, आणि मघाशीं सांगितलें तें आमच्या

नव्या संस्थानिकांचें दरबारांतलें पाहिलें भाषण वाचावयास मिळायला एकच गांठ पडली. त्याच पहिल्या क्षणीं परत येण्याचा निश्चय केला. आणि पहिली गोष्ट केली ती माईला पत्र लिहिलें. आता वनवासांत मला फारसे कष्ट कसे काढावे लागले नाहीत, तें थोडक्यांत सांगतों, ऐका. मी नवलपूर सोडून मोंगलाईच्या रोखानें जाऊं लागतों तों आडवळणें घेत घेत गुप्तपणा संभाळीत पंधरा–वीस दिवसांनी मोंगलाईची शीव गांठली. मग थोडासा निर्धास्त झालों. आत्मरक्षणाचा दुसरा एक उपाय म्हणून मौनव्रत घेतल्याचा बहाणा केला. आधींच तरुणपणची हौस म्हणून डोक्याला केस राखले होते. ते तेलाचा स्पर्श सुटल्यामुळे जटांचें स्वरूप धारण करूं लागले, आणि दाढीहि हळूहळू वाढली. अशा रीतीनें मीं बुवा बनलों! आणि तिथून माझें जें एकदा बस्तान बसलें तें परत फिरेपर्यंत. मी इथें घरीं असतांना देखील मला दूध पिण्याची फार आवड होती हें माईला माहीतच आहे. सकाळसंध्याकाळ तालीम करून आलों कीं, माईचें पहिलें काम म्हणजे धारोष्ण दूध, स्वच्छ फडक्यानें गाळून भरून, माझ्याकरितां कपाटांत मुद्दाम ठेवलेली सबंध शेरभर दुधाची चरवी माझ्यापुढे करायची! सुदैवानें मोंगलाईत दूधदुभत्याला कांहीं कमी नाहीं. आणि मोंगलाईतली प्रजा मागसलेली असली तरी पाहुणचाराच्या कामीं फार अगत्यवादाची. म्हणून मला कोणत्याहि गांवीं रोज दोनअडीच शेर दुधाला कांहीं कमी पडलें नाहीं. मात्र याचें बरेंचसें श्रेय माझ्या बुवागिरीला द्यायला पाहिजे. कांहीं दिवसांनी मीं बेदर सुभ्याच्या अरण्यांत शिरून हिंडूं लागलों. तिथे केव्हा गाईचें तर केव्हा म्हशीचें तर केव्हा शेळीचें दूध मिळे. पण दुधाला म्हणून ऐन जिनसी कांहीं कधी कमी पडलें नाहीं. अशा रीतीनें एक वर्ष भ्रमण केल्यावर गंगनाथ नांवाच्या पहाडी गांवाजवळ एक जुनें शिवाचें स्थान मला आढळलें. आणि मग तिथे जो एकदा मुक्काम कायम केला तो इकडे परत फिरण्याच्या आधी चारसहा महिनेपर्यंत.”

**विम.**—“मग, दादा, बुवाजींची सगळी जीवनयात्रा बारा बर्षें दुधावरच चालली आणि निभावली का?”

**प्रभा.**—“वेडी आहेस झालें तूं, ताई. अग, बुवाजीपणाचें स्तोम अन्

वैभव शहर गांवापेक्षा आडगावीं अन् आडगांवापेक्षाहि आडरानांत फार फुगतें. याचा अनुभव घेतल्याशिवाय कळायचेंच नाहीं तें. हें देवस्थान थोडेसें आडरानांत होतें तरी आसपासच्या पांचपंधरा कोसांतल्या लोकांचें तेंच क्षेत्र होतें. त्यांत गरिबांप्रमाणे श्रीमंत लोकहि असत. माझ्या तुटपुंज्या विद्येच्या बळावर मीं त्यांचा गुरु बनलों. माझ्या शरीरसंपत्तीच्या बळावर मी त्यांचा मुख्य पहिलवान व शिपायी बनलों. उपयुक्ततेमुळे त्यांचा आप्त, मित्र व पुढारी बनलों. पवित्र आचरणाने ऋषि बनलों, आणि निःस्वार्थीपणाने त्यांचा देव बनलों. इकडच्या तालमींतल्या जोरबैठकी सोडून देऊन मी नमस्कार घालूं लागलों. घरींहि मी स्नानसंध्या करीत होतों, तीच तिथे थोडी वाढविली. काम नाहीं म्हणून जपानुष्ठानालाहि बसें. पोथी बरोबर नव्हती. पुराण मला सांगतां येत नव्हतें. आणि पुराण मीं सांगितलें असतें, तरी तें नीट कळणारे लोक तिथे कितीसें मिळणार? पण मला गोष्टी चांगल्या सांगतां येतात. त्यांचा मला तिथे फार उपयोग झाला. पंधरा कोसांतलीं मुलें मी चांगलीं तालीमबाज तयार केलीं. पाऊस काळांत नदींत पोहण्याच्या शर्यती करून बक्षिसें देई. तरुण मुलांना घेऊन लांब अरण्यांत शिकारीला जात असें. भाविक लोक येऊन मला इतकी शिधासामुग्री व मेवामिठाई देत कीं, ती मला इतर लोकांना वांटून टाकतां पुरेवाट होई. तात्पर्य, माझ्या सुखाला तिथें कांहीं कमी पडलें नाहीं. मात्र मनाची हुरहूर गेली नाहीं. ती शमविण्याला मला जपानुष्ठानाच्या एकांतवासाचा उपयोग करावा लागला. पण घेतलेली शपथ पाळण्यांत मला अभिमान चढे. म्हणून त्या द्वारेंहि मनाला खंबिरी वाटून हुरहूर कमी होई."

विम.—"दादा, तुम्हा शपथवाल्या लोकांशीं वागायचें म्हणजे तो कठिण प्रसंगच म्हणावयाचा! मग आता परत येतांना नाहीं ना अशीच कांहीं एखादी शपथ घेऊन आलास? नाहीं तर तुझ्या पुढच्या कार्यक्रमाचा विचार करण्याच्या कामांत आम्हांला लक्ष घालण्याची सोयच नाहीं उरणार!"

प्रभा.—"छेः छेः ताई, ती भीति कांहींच नाहीं. जातांना माईचाहि विचार घ्यायला मला सवड कशी मिळाली नाहीं हें तुम्हाला मघाशीं सांगितलेंच. आणि तूं तर काय तेव्हा अवघी दहा वर्षांचीच होतीस. तुला

मी बाहेर जातांना दिसलों असतों म्हणजे माझ्या गळां पडून मोठ्याने रडून 'मला ने कीं रे दादा बरोबर', असें म्हणत सगळी आळी गोळा केली असतीस. पण आतां–"

**माई**—" पण बाळ प्रभाकर, आता नाही बरें तो तसला पोरकट-पणा ताईजवळ ! तुला काय सांगूं ! आमची ताई म्हणजे आता एक प्रकरण झालें आहे. विद्येंत तुझीहि परीक्षा घेईल. वादांत नवलपुरांतल्या कुणाहि प्रौढ माणसाला हरवील. त्या आता मास्तरीणबाई झाल्या आहेत ! शाळा घातली आहे मुलांमुलींची. आणि कुणाचें दुखलें–खुपलें गांवांत दिवाण-साहेबांच्या हातून, म्हणजे तें मोकळ्या मनानें येऊन सांगायची जागा झाली आहे तुझ्यासारखीच आमची ताई ! मला भीति येवढीच वाटते केव्हा केव्हा कीं, असल्या गोष्टीबद्दल इकडचा राग तुझ्यावर झाला तसा तो या बिचारीवरहि होतो कीं काय एखादा ! पण त्या कामांत तिचें नशीब थोर दिसतें. तिला हवे ते अपराध माफ आहेत जसे कांही, त्यांच्याकडून."

**प्रभा.**—" अहाहा ताई, माईच्या तोंडून तुझें हें वर्णन ऐकून मला किती आनंद झाला आहे तें काय सांगूं ! ताई, तुला हें सारें शहाणपण कुणी शिक-वलें ? पण मीं किती वेडा, अशा गोष्टी कोणी शिकवून किती शिकवणार आणि शिकणार ? तें अंगचेंच लागतें. असेल ताईवर देवाचीच कृपा ! माई, तूं म्हणालीस कीं बाबा हिला सगळे गुन्हे माफ करतात. पण मला वाटतें यांत बाबांपेक्षा ताईचाच गुण अधिक असेल खचित. तिच्या हातून गुन्हाच घडत नसला तर बाबा तिला माफ तें काय करणार ? "

**माई**—" पण प्रभाकर, तुझ्या हातून तरी खरोखर असा काय गुन्हा घडला होता, यांनी तुझ्यावर इतकी आग पाखडायला ? बरें, नाही म्हणावें तर तूं दिवाणसाहेबांबद्दल कागाळ्या करीत होतास तशा करायला ही देखील कांही कसी करीत नाही. अगदीं सरळ उघड उघड बोलते, दिवाणसाहेबांविरुद्ध."

**प्रभा.**—" माई, खरोखरच मीं भाग्याचा. कारण मीं करीत होतों तें सत्कृत्य होतें याचा हा मला अप्रत्यक्ष पुरावाच मिळाला. मी ताईकडे पाहिलें म्हणजे ती मला सद्गुणांची पुतळीच वाटते. तिच्या डोळ्यांत सत्य, औदार्य आणि धैर्य यांचें तेज भरून वाहतें आहे असें मला दिसतें.

वास्तविक आम्ही मुलांनी आमच्या जनकाचें वैर किंवा शत्रुत्व करण्याला कांहीच कारण नाही. आणि त्यांना आवडत नाही असें आम्ही जें कांही करतों हें देखील त्यांचें शत्रुत्व नाही. पण जगांत सुडाची म्हणून कोणी देवता असावी यांत शंका नाही. म्हणूनच ती बापाच्या हातून होणाऱ्या वाईट गोष्टीचा निषेध प्रत्यक्ष त्याच्या मुलांच्या प्रवृत्तींनी व कृत्यांनी करविते. बाबा माझ्यावर वाटेल तितके रागावोत, पण निदान ताईवर रागावत नाहीत ही त्या देवतेचीच योजना असावी. बाबांचें ताईवरचें प्रेम हें त्यांना सुख देत असलें तरी, तिचीं मतें त्यांना उपेक्षणीय वाटावीं हीच बाबांना ईश्वरी शिक्षा!"

**विम.**—"पण दादा! आता या असल्या नसत्या गोष्टी बोलत बसण्याची का वेळ आहे! बाबा आज नाही उद्यां शुद्धीवर येतील. तेव्हा, किंवा ते असेच अर्धवट भ्रमांतच राहिले तरी तुझा पुढचा बेत काय ठरला आहे!"

**प्रभा.**—"ताई, माझ्यासारख्याचा बेत म्हणजे रानडुकराची मुसंडी. बारा वर्षांपूर्वी इथे संस्थानच्या अधिकाऱ्यांविरुध्द चळवळ केली तेव्हा डावी उजवीकडे पाहिलें नाही. धरणें आलें तेव्हा निघून पळून जायचें ठरविलें. तें इकडे तिकडे न बघतां अमलांत आणलें. बारा वर्षें या गांवाकडे लक्ष द्यायचें नाही अशी शपथ घेतली. ती कशी पाळली तें पाहिलेंतच. परत यावें असें ठरविलें तो सरळ उठलों आणि येथे येऊन पोंचलों. आणि आता ठरविलें आहे कीं, सरळ प्रगट होऊन नव्या संस्थानिकांपुढे जाऊन उभें राहायचें, आणि त्यांना म्हणायचें कीं माझा न्याय करा! मग जें काय नशिबांत असेल तें होईल. तुम्ही दोघी पाहतांच कीं, मला तुम्हां दोघीं-शिवाय या जगांत पाश असा कांही एक नाही. डोक्यांत प्रत्येक वेळीं जी कल्पना वावरत असेल ती अनुभवांत आणण्याशिवाय दुसरी हौस नाही. माई, तूं फिरून भेटलीस. ताई लहानाची मोठी झालेली पाहिली. आता मला उद्यां कैदेंत जाऊन फिरून तेथून अंदमानला जावें लागलें तरी त्याचें मला वाईट वाटणार नाही. ताई मनाची किती निश्चयी, खंबीर आणि शहाणी आहे हें मला तिचे डोळेच सांगतात. येऊनजाऊन दुःखाल

विचाराचा आळा न घालणारी अशी वेडी, माई, तूंच एकटी मला दिसतेस. तुझ्या मनाला कधीं दुःखाचा कांटाहि बोचूं नये अशा स्थितींत तुला दैवाने ठेवावी, अशी तुझी योग्यता आहे. पण दैव जर इतकें विवेकी व न्यायी असतें तर त्याला जगानें दैव न म्हणतां धर्म म्हटलें असतें! असो, चला, आतां उशीर नाही का झाला! जा तुम्ही बाबांकडे पाहा. मी आतां खुशाल झोंप घेणार!"

**विम**—"दादा, ठीक आहे. मींहि उद्या याच विचाराला लागतें कीं, तूं केव्हा कुठे प्रगट व्हावें! कारण तूं प्रकट झालास म्हणजे पुढची वाट दिसूं लागेल. हा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ आता संपविलाच पाहिजे!"

प्रकरण तेरावें

# "अन् या कार्ट्याला माझा भाऊ करणार तुम्ही!"

तिसरे प्रहरीं भाऊसाहेबांची झोंप झाली असें पाहून विमल त्यांच्या बिछान्याशीं आली आणि म्हणाली "बाबा, चहा आणूं का थोडा करून? रोजची वेळ झालीच आहे बहुतेक." याला भाऊसाहेबांनी हुंकार दिला. दहा मिनिटांत चहा येऊन घेऊन झाल्यावर, ती म्हणाली—"पलंग थोडासा खिडकीच्या उजेडाशीं सरकवून घेऊं का बाबा? म्हणजे उशीवर डोकें ठेवून तुम्हांला वर्तमानपत्रें चाळतां येतील कांही वेळ?"

भाऊसाहेबांना ही कल्पना पसंत पडली. दौलती आणि विमल दोघांनी हात लावून पलंग सोईचा करून घेतला. विमलने खाकेंतून वर्तमानपत्रांचा भारा व हातांतून बापाचा चष्मा आणून तो पलंगाशेजारीं एक खुर्ची ओढून तिजवर ठेवला. दौलतीने यजमानाच्या हातांत एक चिरूट देऊन काडी ओढून त्याच्या तोंडाशीं धरली. भाऊसाहेबांनी तो पेटवून दोन झुरके घेतले व म्हणाले—

**भाऊ.**—"बाळ विमल, माझ्याने नाही वाचवत वर्तमानपत्रें पडून पडून. तूंच माझ्याजवळ बसून चाळ तीं. आणि सांग मला त्यांतलें थोडें थोडें म्हणजे झालें."

**विम.**—"पण बाबा, तुम्हांला आतां बरें वाटतें ना पूर्वीपेक्षां?"

**भाऊ.**—"बाळ, मला आतां कसचें बरें वाटणार आणि काय? तुझें बरें असलें म्हणजे झालें."

**विम.**—"कां बरें बाबा, असें बोलतां उदासवाणें? प्रकृति बिघडली ती कांही माझी नाही बिघडली. तुमची! म्हणून तसें विचारलें. तर तुम्ही आपलें भलतेंच विचारतां उलट!

**भाऊ.**—"अग तसें नव्हे. प्रकृति बिघडली माझीच. पण या वयाला येऊन पोचल्यावर आतां ती बिघडली आणि सुधारली दोनहि सारखींच!

विमल, तुला खरेंच सांगूं का ? मी आतां फार दिवस जगत नाही. म्हणून एक गोष्ट तुला विचारावी असें मनांत येतें. विचारूं का ? " " तें म्हटलें म्हणजे असें, कीं यापुढें तुझें संरक्षण कोण करील ? "

**विम.**—" तें कां ? तुम्ही असतांना ती काळजी मला तर नाहीच, पण तुम्हांला तरी कां वाटावी ? "

**भाऊ**—" अग, मी जीवंत आहें तोंपर्यंतचें नाही बोलत. नंतरचेंच बोलतों ! "

**विम.**—" अस्सें होय ? तरी बरेंच, नंतरचें नंतर, पाहून घेऊं."

**भाऊ**—" पण मला वाटतें, त्या गोष्टीला आता फार दिवस नाहीत. मी दिवसानुदिवस क्षीण होत चाललों आहें. म्हणून वाटतें कीं, माझ्या हाताने तुझें एकदा लग्न करून द्यावें."

भाऊसाहेबांनी हा आज भलताच प्रश्न काढलेला पाहून विमल आश्चर्यानें क्षणभर स्तब्धच झाली. पण तेवढ्यांत प्रसंगावधान संभाळून ती म्हणाली—

**विम.**—" बाबा, हा मात्र तुम्ही भलताच विषय काढलात हां ! तुम्ही पूर्वी एकदादोनदां तो ओझरता काढला होतात तेव्हा तुम्हांला मी काय म्हणालें तेंच माझें उत्तर आजहि समजा ! "

**भाऊ.**—" पूर्वी म्हणालीस ? काय बरें ? चांगलेसें आठवत नाही. सांग एकदां पुन्हां काय म्हणालीस तें ! अग, आतां म्हातारपणीं आमची आठवण म्हणजे नुसता बुरणूस ! आंत दाभण खुपसून ठेवले आहेत तितकाच वेळ तें राहायचें. ते बाहेर निघाले कीं जागेची खूण सुद्धा बुजून पार ! "

**विम**—" सांगतें हवें तर पुन्हा. माझा निश्चय असा आहे कीं, माझा प्रभाकर दादा माझ्यापेक्षां बारा वर्षांनी वडील आहे. त्याचें लग्न झाल्या-शिवाय माझ्या लग्नाची गोष्ट तुम्हीं काढूं नये. "

**भाऊ**—" अग, त्याचें लग्न मीं केलें का नसतें ? तो इथून निघून गेला तेव्हा चांगला बावीस वर्षांचा होता. तरी पण जेव्हा म्हणून त्याच्या लग्ना-च्या गोष्टी आम्ही घरांत बोलाव्या तेव्हा याने हळूच बाजूला तिच्याजवळ म्हणावें कीं " बाबांना सांग कीं माझ्या लग्नाचा विचार करूं नका. मला अजून इतर पुष्कळ कामें करायाचीं आहेत." आणि कामें काय केलीन हें दिस-

तच आहे. लग्न केलें असतें तर, बायकोच्या प्रेमानें काळजीनें तरी धाडसी कामांत पडताना, आणि माझ्यावर हा असा प्रसंग येताना. " आपल्या बापाच्या प्रेमाखातर किंवा त्याच्या काळजीमुळें असल्या धाडसी कामांत पडताना " असें मला म्हणतां आलें असतें, तर मला किती बरें वाटलें असतें ! पण या नव्या पिढींत असलें सुख कोणत्या बापाला मिळणार ! असले हे नव्या पिढीचे मुलगे !"

**विम—**" आणि मुलीहि ! असें नाही म्हटलेंत तें कांहें मी समजलें !

**भाऊ—**" तेंहि मी म्हणेन, पण मुलींच्या प्रेमाचा अनुभव मला जसा आला तसा मुलग्याच्या प्रेमाचा आला नाही. मग मीं दोघांची बरोबरी कशी करूं ? "

**विम.—**" बाबा, मी तेव्हा दहाच वर्षांची होतें. माझ्या लग्नाचा तेव्हा प्रश्नच नव्हता. पण आतां मी त्या वेळच्या दादाच्या वयाची झालें. आणि माझ्या लग्नाची गोष्ट आज तुम्ही काढली तेव्हा मीहि नाही का म्हटलें कीं, मी आतांच लग्न करून घ्यायला तयार नाही म्हणून ? "

**भाऊ.—**" पण तूं आपल्या भावाच्या लग्नाचें निमित्त तरी सांगितलेंस. त्याला नव्हतें तसलें कांही निमित्त ! "

**विम.—**" पण मग माझें तरी निमित्त बरोबर आहे ना बाबा ? "

**भाऊ.—**" वाहवाग पोरी ! मला पकडूं बघतेस का शब्दांत ? 'तुला सांगायला निमित्त तरी होतें' इतकेंच मी म्हटलें. म्हणजे तुझें निमित्त योग्य आहे असें मी कुठें म्हणतों ? तुझ्या दादाला लग्न थांबवायला त्याचा थोरला भाऊ नव्हता एखादा बिनलग्नाचा ! "

**विम.—**" पण थोरला भाऊ काय आणि हातांत घेतलेलें एखादें आवडतें काम काय ? दोहोंवरचें प्रेम सारखेंच कां असणार नाही ? तुम्हाला संस्थानच्या अधिकाऱ्यांचा जीव आणि अब्रू प्रिय वाटत होतीं. तशीं प्रभाकर दादाला संस्थानच्या प्रजाजनांचे प्राण व अब्रू प्रिय वाटत होतीं. इतकाच फरक. जुनी पिढी काय, नवी पिढी काय, प्रत्येकाला अशा प्रेमाचा म्हणून एक एक कांही तरी विषय असतोच ! "

भाऊ.—" बरें तसें का होईना ? म्हणजे, तुझ्या भावाला नाही मीं दोष देत असें का होईना ! पण आता जी गोष्ट हातची नाही ती बाजूला ठेवून, जी हातची आहे तिच्यापुरतेंच बोलूं. प्रभाकर आणि तूं दोघांचेंहि लग्न करून देणें हें माझें कर्तव्य. पण आता त्याची आशा कुठे आहे परत यायची ? म्हणून तूं तरी मला होकार दे, म्हणजे माझ्या कोणा मित्रांना सांगून तुझ्याकरिता स्थळ पाहवून करून टाकीन तुझें लग्न, आणि होईन म्हणतों तुझ्याबद्दल निष्काळजी."

विम.—" बाबा, तुमचें सांगून झालें ना ? आता माझें मीं सांगत्यें तें ऐका. तुमच्या कुणा तरी तिऱ्हाईत स्नेह्यांनी माझ्याकरिता स्थळ पाहायचें असें का आता राहिलें आहे माझें वय लहान ? लोकांचीं लग्नें जुळवून देण्याइतकी झालें आहे मी मोठी ! तेव्हा आता माझी काळजी सोडून द्या तुम्ही कशी ! माझ्यापेक्षा लहान वयाच्या मुली आईबाप मरून पोरक्या होतात. त्यांची काळजी देव करतो तो माझीहि नाही का करणार ? शिवाय मला माझी माई आहेना, देवाच्या खालोखाल ? तुम्हाला न वाटो तिची किंमत ! पण मला वाटते खरी. जगाच्या राहाटीप्रमाणे तुमचें माझ्यावरचें छत्र गेलें तरी माझी माई आहे तोंपर्यंत मला कशाचीहि काळजी नाही. तुम्ही अगदी निर्धास्त असा. आणि तिच्यावर नाही नाही ते संशय घेऊन तिला दुःख देऊन जीव नकोसा करून टाकतां तेवढें न केलेंत, तर ती बिचारी मला आणखी चार दिवस अधिक लाभेल! उरली गोष्ट दादाची. मागे एकदा तो आल्याचें स्वप्न मला पडल्याचें मीं नाही का सांगितलें, बाबा, तुम्हाला ?"

भाऊ.—" होय बाळ, सांगितलेंस. मग त्याचें काय ? तूं बोललीसुद्धा असशील त्याच्याशीं ?"

विम.—" हो, बोललें तर! मीं म्हणालें, दादा, स्वप्नांत असें दर्शन देऊन मायापाशांत घालतोंस तो प्रत्यक्षच कां येऊन भेटेनास ? आणि आम्हा सर्वांची काळजी एकदम दूर करीनास ?"

भाऊ.—" मग, त्यावर तो काय म्हणाला ?"

विमल—" तो म्हणाला, हो येईनहि. पण बाबांचा राग विनाकारण झाला

आहे तो जाईल तर ! मी आलों आणि बाबा माझ्यावर पूर्वीसारखे रागावले तर मलाहि राग येईल. म्हणून तूंच विचारून घे त्यांना आधी, मी परत आलों तर ते काय करतील तें. नाही तर मी आपला आहें तिथेच बरा आहे नव्हे का !"

**भाऊ.**—" तो या मृत्यु लोकांतून बोलल्यासारखा बोलला कीं एखाद्या परलोकांतून ! "

**विमल**—"छेः हो ! अगदी मृत्युलोकांतून ! फार काय तुम्ही आम्ही आता एकमेकांजवळ बसून बोलतों आहों नाही ? इतक्याजवळून. मला भास झाला कीं जसे कांही त्याने माझे हात धरून माझ्या डोळ्यांकडे अगदी निरखून बघितलें. आणि प्रेमाने माझे गालगुच्चेहि घेतलेन, अगदी लहानपणीं घेत होता तसे ! येईल का हो, माझा दादा परतून, बाबा ! मला वाटतें, बाबा, तुम्ही प्रयत्न केलात तर तुम्हालाहि तो स्वप्नांत दिसेल !"

या प्रेमळ वर्णनाचा परिणाम भाऊसाहेबांच्याहि कठोर मनावर झाल्याशिवाय राहिला नाही. त्यांना मुलाची आठवण होऊन गहिवर आलासा दिसला. पण तो आता परत येणें शक्य नाही, म्हणून मुलीचाहि तो लोभ सुटावा या हेतूने विषय निकालांत काढण्याकरिता, किंवा त्याला वेगळें वळण देण्याकरिता, ते म्हणाले—

**भाऊ.**—" बाळ, प्रभाकर परत आला तर तो तुझ्यासारखा मलाहि हवा आहे. पण जन्मठेपेचे कैदी परत येत नाहीत. तेव्हा निपुत्रिकपणाच्या भावनेने मरण्यापेक्षा निदान दत्तक मुलगा घेऊन मग मरावें असें मी ठरविलें होतें. सुभेदार आपला मुलगा बाजीराव मला दत्तक द्यायला तयार आहेत. तेव्हा त्यांना आज उद्या होय म्हणतों आणि दत्तविधान करून टाकतों झालें. तुझें स्वप्न कसलें खरें होणार ! मग तुझी आहेना संमति निदान याला तरी !"

हें संभाषण या मुद्द्यावर यायला आणि सुभेदार थेट ओटीवर यायला गांठ पडली. आज त्यांच्याबरोबर त्यांचा मुलगा बाजीराव हाहि होता. ते दोघेहि एकदम भाऊसाहेबांच्या खोलींतच आले. अर्थात् त्यांना खुर्च्या देणें भाग पडलें त्या दौलतीने आणून दिल्या. ते बसल्यावर भाऊसाहेब

त्यांच्याकडे तोंड व्हावें म्हणून कुशीला वळून म्हणाले "आलांत, सुभेदार वेळेवर आलांत."

सुभेदार लाघवीपणाने हंसत हंसत म्हणाले—

**सुभे.**—" तें कसें काय साहेब? एरवीं, व्हावयाचें असलें म्हणजे असेच योग जमतात म्हणा!"

**भाऊ.**—" तुमचा मुलगा दत्तक घ्यावा असा विचार मी हळूहळू मनांत करतोंच आहें. ज्योतिष्याने भविष्य सांगितलेंच आहे. तें खोटें कसें होणार? आणि मीहि प्रकृतीने क्षीण होत चाललों आहें. पण हें पाहा, आमच्या विमलताईला अलीकडे स्वप्नें पडूं लागलीं आहेत म्हणे, कीं आमचा प्रभाकर येणार! तो येणार असला तर ठीकच आहे. मग दत्तक कशाला?"

सुभेदारांच्या कानावर ही धक्का देणारी गोष्ट आज नव्यानेच आदळली. विमलहि जवळच उभी होती. तेव्हा बापलेकींच्या मनावर एकदमच परिणाम करण्याची संधि साधलीशी वाटून ते वादाला सरसावले व म्हणाले—

**सुभे.**—" आपले चिरंजीव आले तर देवानेच केली म्हणेन, लाख गोष्टींतली गोष्ट! आम्हीसुद्धा तेंच म्हणतों. ईश्वराजवळ तेंच मागतों. आपण आणि आम्ही एकाच घराण्यांतलेना! दोन शाखा दोहोंकडे बरोबर वेगळ्या वाढत गेल्या तर घराण्याचें त्यांत कल्याणच आहे. पण दुर्दैवाने त्यांच्या येण्याला स्वप्नांचाच आधार! मला आश्चर्य इतकेंच वाटतें कीं विमलताईसाहेब इतक्या शिकल्यासुधारलेल्या, त्यांना स्वप्नें कशीं पडतात?"

हें बोलणें ऐकून विमलला हंसूं आवरेना. ती म्हणाली—

**विम.**—" तरी बरें सुभेदारसाहेब! असें नाही म्हटलेंत कीं मी शिकलीसुधारलेली म्हणून मला झोंप तरी कशी येते? पण येते खरी! आणि स्वप्नेंहि पडतात खरीं! आणि त्यांत प्रभाकर दादा आला बोलला असा स्पष्ट भास होतो खरा. मी बाबांना खोटें कशाला सांगूं? तुम्हाला स्वप्नें पडलीं तरी त्यांत माझा दादा तुम्हाला कसा दिसेल? तुम्हाला दिसले तर दिवाणसाहेब, शिरस्तेदारसाहेब, एजंटसाहेब हे दिसायचे!"

**सुभे.**—" हें पाहा, ताई, आपल्या वडिलांचें हित आपणाला कळतें तसें

मला कसें कळणार ? हें तर उघडच आहे. पण दत्तकाच्या कामांत पाहण्याची दृष्टि पुरुषांची वेगळी व स्त्रियांची वेगळी असते त्याला काय करणार ! "

**विम.**—" होय. आणि त्यांतूनहि ज्यांना आपला मुलगा श्रीमंताच्या मांडीवर द्यायचा असेल त्या पुरुषांची दृष्टि तर त्याहून वेगळी असणार ! "

हीं निंदा ऐकून स्वाभिमानाला धक्का बसल्याचा आव आणणें सुभेदारांना प्राप्तच होतें. तेव्हा ते मुलग्याचा हात धरून उठूं लागले व म्हणाले, " चला, पोटचा गोळा गमवायला तयार झालों तर ही संभावना ! मग इथें कशाला राहा ? "

केवळ वापाखातर सुभेदारांचें थोडेसें समाधान करावें अशा बुद्धीनें विमल म्हणाली—

**विम.**—" अहो सुभेदारसाहेब, मीं म्हटलें तें अगदी तुम्हाला उद्देशून असेंच नव्हे कांही. जगाची रीत सांगितली. श्रीमंतांच्या घरीं दत्तक होऊन मुलगा जात असला तरी केवळ स्वाभिमानामुळे दत्तक न देणारे बाप, आणि दत्तक जात नाही म्हणणारे मुलगे मीं पाहिले आहेत. त्यांतलीच तुमची गोष्ट असून केवळ आमच्या कल्याणाकरिता तुम्ही आपला मुलगा द्यायला तयार झालां हें मला नाही का माहीत ! दैवांत असेल तर होऊन जाईल दत्तविधान. "

इतकें बोलून सुभेदारांची शोभा झालीच, पण आता थोडी त्यांच्या मुलाचीहि शोभा करावी आणि ती भाऊसाहेबांना ऐकवावी या हेतूने विमलनें संभाषण मुद्दाम लांबविलें. ती म्हणाली—

**विम.**—" सुभेदारसाहेबांचा बाजीराव, बाबा, तुम्ही याला पूर्वी पाहिला होतात का ? आज आलाच आहे तो. इकडे वळून बघा जरा. पण मला वाटतें, सुभेदारसाहेब ! तुमचा बाजीराव आमच्या घरीं पूर्वी एकदा एकटाच आला होतासें वाटतें मला ! "

**सुभे.**—" तो केव्हा बरें ? "

**विमल**—" सुमारें सहा महिने झाले असतील. "

**सुभे.**—" असें ! तेव्हा बोलला का तो कांही तुमच्याबरोबर ? "

**विमल**—" हो, बोलला कीं ! धीट आहे तो. आमच्या घरीं थोडें

सुतारकाम चाललें होतें. सुतारांनी भुसकटाची धुमी लावून ठेवली होती तंबाखू ओढण्याकरिता. धुमींतून धूर उंच आकाशांत जात होता तें पाहिलें, आणि मला हा काय म्हणतो "हा येवढ्याशा भुशाचा जर इतका उंच धूर जातो तर तुमचें हें सगळें घर पेटलें आगीनें तर त्याचा धूर किती उंच जाईल?"

सुभेदारांनी लाजेनें व रागानें ओठ चावला. पण वेळ मारून नेण्यासाठी ते म्हणाले—

**सुभे.**—"असेल असेल. तसेंहि म्हणाला असेल हा तुम्हाला. गुलामाला गणिताचा नाद आहे लहानपणापासून. त्रैराशिकें सोडवितो. देवानें बुद्धि त्याला फार चांगली दिली आहे."

विमल आता स्वतः बाजीरावालाच बोलूं लावण्याच्या हेतूनें बाजीरावाकडे वळून म्हणाली—

**विम.**—"बाळ, काय नांव तुझें?"

बाजीरावानें तोंड वांकडें करून उत्तर दिलें "बॅ- बॅ–जीराव."

**विम.**—"काय शिकत असतोंस शाळेंत?"

बाजीराव हेल काढून म्हणाला "मीं नाहीं कधी शाळेंत जाणार जा!"

लगेच सुभेदार मध्ये तोंड घालून म्हणाले—

**सुभे.**—"खरें बोलतो तो अगदीं. परंपरेचा तो अगदी हाडवैरी आहे. उठलेंसुटलें मूल आपलें शाळेंत जातें म्हणजे काय? घरच्या घरीं शिक्षण कसें काय होईल याची कधी कुणी चौकशी केली आहे का? म्हणून मीं त्याला शाळेंत घातला नाहीं. आणि जा म्हटलें कुणी तर हा स्पष्ट सांगतो त्याला 'मी जात नाहीं जा' म्हणून!"

**विम.**—"काय रे बाजीराव, तूं येतोंस का आमच्या घरीं राहायाला बाबांचा मुलगा होऊन?"

फिरून तोंड वांकडें करून बाजीराव म्हणाला "नको रे बाबा दोन बाप."

लगेच सुभेदारांनी मध्ये तोंड घातलें आणि ते डोळे मिचकावीत म्हणाले—

**सुभे.**—येवढेंसेसें पोर. पण पाहा स्वाभिमान कसा अगदी जळजळीत आहे तो या वयांत!" विमल म्हणाली, "अगदी बापापेक्षाहि मुलगा चढ आहे–नुसत्या गणितांतच नव्हे कांहीं."

सुभेदार लगट करण्याच्या हेतूने म्हणाले “ बाळ, उद्यापासून हे भाऊसाहेबच तुझे बाबा होणार बरें. ”

शहाणा बाजीराव म्हणाला–“ मग बाबा तूं रे कधी मरणार? ”

पण सुभेदारांचें प्रसंगावधान या बिकट प्रसंगालाहि पुरून उरलें. ते लगेच म्हणाले—

**सुभे.**—“ पाहून घ्या याचें तत्त्वज्ञान. या वयांत मरणाची गोष्ट बोलायची झाली तर थोर माणसेंहि भितात कचरतात. पण आमचा बाजीराव लहानपणापासूनच अगदी धीट. तो पुरुष आहे तरी ‘ मेल्या ’ ही शिवी त्याला अगदी बायकासारखी आवडती आहे. कारण मरणाची मुळी भीतिच नाही. नाही तर इतर मुलें पाहा. मरण तर राहिलेंच ,पण नुसत्या बागुलबुवालाहि भितात. चळचळा कांपतात.”

**विम.**—“ मला वाटतें सुभेदारसाहेब, हा इतका धीट आहे तर उद्या मोठा झाला म्हणजे दरोडे खुशाल घालील–नाही म्हटलें देशाकरिता. कारण धीट आहे. ”

**सुभे.**—“ नाही तर खूनहि करील-संस्थानच्या प्रजेकरिता-संस्थानी अधिकाऱ्यांचे-प्रभाकराने केलाच तसा-नाही, म्हटलें प्रभाकरावर आरोप आला तसा.”

सुभेदार स्वार्थामुळे लघळपणा करीत असले तरी हुषार होते. आपल्या मुलाची कुचेष्टा विमलेने आरंभिली, तेव्हा तिचा परत आहेर करण्याची संधि ते कां गमावतील ! त्या भरांत त्यांनी प्रभाकराला पुढे ओढून दरवड्यास खून उभा केला. पण प्रभाकराने केला तो प्रत्यक्ष खून नसून खुनाचा प्रयत्न होता, आणि तोहि पुनः आरोपांतच होता हें चटदिशीं लक्षांत येऊन, त्यांनी आपलें उत्तर सावरून घेतलें. पण “ तुमच्या पायाखाली काय जळतें आहे तें आधी पाहा, मग माझ्या वाटेला जा ” असें दर्शविण्याकरिता त्यांनी जो घाव घातला तो विमलच्या वर्मावर बसण्याइतका साधार नव्हता तरी समर्पक होता यांत शंका नाही. पण तो घाव बसलाच नाही असें भासविण्याकरिता ती पुढे म्हणाली—

**विम.**—“ बाजीराव, तूं या आजोबांच्या मांडीवर बसतोस का?” मुलगा म्हणाला “मी नाही जा. आजोबाच हवे तर बसूं देत माझ्या मांडीवर !”

फिरून सुभेदार म्हणाले "पाहा पाहा. याला जर मरणाची भीति वाटत नाही तर लहानथोर हा भेद तरी यांच्याजवळ कुठून येणार! एका धीटपणाचींच हीं सारीं लक्षणें."

इकडे हें भाषण सुरू असतां बाजीराव बसल्या जागीं तोंडें वेडींवांकडीं करीत होता. तो कुणाला वेडावून दाखवीत होता असें नव्हे. तर बाळग्रहानें झपाटलेल्या मुलांना तोंडें वेडींवांकडीं करणें, उगीच डोळे मिचकावणें, तोंडांतून जीभ बाहेर काढून डावी उजवीकडे उगीच फिरविणें, आणि त्या फिरतींत जें काय सांपडेल तें चाटणें, इत्यादि संवयी जडतात, तशाच बाजीरावाला जडल्या होत्या. अपस्माराच्या झटक्यांत त्याच्या तोंडाची जेवणी किंचित् तिरकस झाली होती. आणि लहानपणीं देवी आल्या त्यांचे वण त्याच्या तांबूस चेहऱ्यावर, राजापुरी तांब्याच्या अंगावरच्या ठोक्यांसारखे, दिसत असून शिवाय डाव्या डोळ्यांत देवी उठून फूल पडलें होतें.

विमलनें आपल्या चढाईचा हल्ला चालू ठेवून म्हटलें—

विम.—"कां हो सुभेदारसाहेब, हा मुलगा अशीं तोंडें वेडींवांकडीं कां करतो?"

त्यावर सुभेदारांचें उत्तर तयारच होतें. ते म्हणाले—

सुभे—."फिरून सांगतों ताईसाहेब, हा कुणाकडे पाहून तोंडें वेडींवांकडीं करण्याला भिईल तर ना! धीटपणा, निस्पृहता याचें याला जसें कांही बाळकडूच मिळालें आहे!!"

बाजीराव आपल्या आंगरख्याच्या बाहीनें नाकतोंड पुशीत होता तें पाहून विमल म्हणाली,

विम.—"त्याचा हा नवा आंगरखा फार खराब होतो त्याला एखादा हातरुमाल देत जा विजारींत खोवून तोंड पुसायला.

लगेच सुभेदार म्हणाले—

सुभे.—"अहो, हात रुमालांना काय तोटा! पण आमच्या बाजीरावाला लहानपणापासून छानछोकीचा नटण्यामुरडण्याचा फार तिटकारा म्हणून!"

पण आतां ही अप्रतिष्ठा पुरे झाली असें वाटून प्रसंग आवरता घेण्याकरिता सुभेदार मुलाचा हात धरून उठले आणि म्हणाले, "येतों आतां भाऊसाहेब, वेळ बराच झाला. दत्तकाचा मुहूर्त उद्यां परवां आहे, हें सांगण्याकरितां आलों होतों सहज. तों ताईसाहेबांचीहि गांठ पडली, चांगलेंच झालें."

पण ताईसाहेबांनी त्याचा पिच्छा अजून सोडला नव्हता. इतक्या अवगुणांच्या भरतीला बाजीरावांत अधाशीपणा, हावरेपणा असणारच या खात्रीने विमल म्हणाली—

विम.- "थांबा जरा.हां! येवढा तुमचा सोन्यासारखा मुलगा चालत आमच्या घरीं आला, आणि उद्यांपरवां दत्तविधान झालें तर तो माझा भाऊच नाही का व्हायचा ? तेव्हा जरा थांबा, त्याला कांहीं खाऊ दिल्याशिवाय मी कसा जाऊं देऊं ? "

असें म्हणून ती चटदिशीं माजघरांत गेली व फडताळांतून एक साखरेचें गाढवाचें चित्र घेऊन बाहेर आली. पण तें एकदम बाजीरावाच्या हातांत न देतां तें दूर धरून तिने त्याला दाखविलें मात्र, तोंच त्या मुलानें बापाचा हात सोडून चार पावलें धावत जाऊन त्या चित्रावर उडी घातली, आणि ते हिसकावून घेऊन " बाबा गाढव ! बाबा गाढव " असें आनंदाने ओरडून त्याने त्या चित्राचा कान तोडून तोंडांत चावला देखील. विमल लगेच हंसून म्हणाली,

विम.—" सुभेदारसाहेब, तुम्ही मवाशीं सांगितलें तेंच खरें. मुलगा अगदी धीट आहे. कशाला भ्यायचा नाही."

मुलाने केलेलें प्रदर्शन पाहून घरांतून बाहेर पडतांना सुभेदार शरमेने मनांत किती चूर झाले असतील याचें वर्णन कोण करील !

भाऊसाहेब हा सर्व प्रकार निमूटपणें पाहात होते, त्यांना उद्देशून विमल जरा रागाने म्हणाली,

" बाबा, अन् या कार्ट्याला का माझा भाऊ करणार तुम्ही ! "

———

## प्रकरण चौदावें

# प्रभाकराचा नृसिंहावतार

विमलने तीव्र भावनापूर्ण व मर्मभेदक असा जो प्रश्न भाऊसाहेबांना केला त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. ते म्हणाले—

भाऊ.—"बाळ, तूं म्हणतेस तेंच बरोबर आहे. मला तरी दत्तक घेऊन काय करायचें आहे? तूं माझा मुलगाच नव्हे तर काय? आणि खरोखरच, तुझ्या सांगण्याप्रमाणे, आज उद्या प्रभाकराचें चिंतन मनांत करतों. पाहावें मलाहि तुझ्यासारखें त्याचें स्वप्न पडतें का तें?"

हें ऐकून आपण बापाचें मन दोनहि कामांत बरेंच वळविलें असें वाटून विमलला समाधान झालें. पण दुर्दैवाने तें समाधान फार काळ टिकूं शकलें नाही. त्याच रात्रीं दिवाणसाहेबांकडून एक घोडेस्वार ताबडतोबीचा म्हणून एक लखोटा भाऊसाहेबांच्या नांवचा घेऊन आला. अर्थात् तो वाचण्याचें काम विमलकडेच आलें. लखोटा फोडून तिनें पत्र काढून मोठ्याने वाचलें.

पत्र वाचून झाल्याबरोबर भाऊसाहेबांच्या मनाने उलट उचल खाल्ली. ते विमलला उद्देशून म्हणाले—"पाहिलेंसना, विमलताई, दत्तक घेणें किती आवश्यक आहे तें! दिवाणसाहेबांचा स्नेह, सुभेदारांची स्वार्थत्यागाची तयारी, आणि ज्योतिषीबुवांचें भविष्य, सर्वच गोष्टी दत्तकाला अनुकूल आहेत. तेव्हा उद्या संध्याकाळीं दत्तविधानाचा बेत ठरविलाच पाहिजे नव्हे का?"

विमलने मनांत विचार केला. आपल्या बापाची दत्तक घेण्याची लहर आता कांही केल्या थांबत नाही. आणि ती थांबावयाची तर त्याला एकच उपाय म्हणजे प्रभाकराने प्रकट होणें. तेव्हा या प्रकट होण्यालाहि ही योग्य संधिच होय. पण ती गोष्ट व्हावयाचीच तर मुळमुळींत गुळमुळीत अशा रीतीने न होतां, चांगली दणदणीत रीतीने तरी कां करूं नये? या गुप्त विचाराने ती बापाला म्हणाली—

विम.—“बाबा, मी कांही तुमच्या इच्छेविरुद्ध नाही. प्रभाकर दादा फार तर स्वप्नांत दर्शन देतो, पण प्रत्यक्ष प्रकट होत नाही. तेव्हा घराण्याच्या व तैनातीच्या दृष्टीने तुम्ही योजलें तें बरोबरच म्हटलें पाहिजे. ठीक आहे, पाठवा निरोप दिवाणसाहेबांना आणि सुभेदारांना कीं दत्त-विधानाचें उद्याचे ठरलें म्हणून!”

इकडे त्या रात्रीं भाऊसाहेबांना झोंप लागल्यावर परसांतल्या बंगलींत प्रभाकर, माईसाहेब व विमल या तिघांचें खलबत सुरू झालें. माईसाहेब अगदी गोंधळून गेल्या. बिचारीच्या डोळ्यांचें पाणी खळेना व काय सल्ला द्यावा हें तिला कळेना. तिच्या दृष्टीने अडचण ही कीं, प्रभाकर प्रकट झाल्याशिवाय दत्तक थांबत नाही; आणि तो प्रकट झाला म्हणजे सरकार त्याला पकडून काळे पाण्यावर पाठविणार! बरें, प्रकट न व्हावें तर गुप्त तरी किती दिवस राहतां येईल? फक्त प्रभाकर व विमल या दोघांच्याहि मनांत गोंधळ असा कांहीच नव्हता. प्रकट होऊनच प्रकरणाचा निकाल करून घ्यावयाचा असें दोघांनीहि निश्चयाने ठरविलें होतें. म्हणून दत्तविधान होण्या-पूर्वी, पण ती घालमेल चालू असतांच, प्रकट व्हावें म्हणजे त्यांत जरा मौज होईल असेंहि त्यांनी ठरविलें!

पण इतरांना दर्शन देण्यापूर्वी प्रभाकराने शक्य तर आपल्या बापाला एकदा खास दर्शन द्यावें हें बरें नव्हे का? एकदम दर्शन दिल्याने इतरांच्या मनाला आश्चर्य वाटेल, पण घातक असा धक्का बसणार नाही. भाऊसाहेबांना मात्र तसा धक्का कदाचित् बसेल. म्हणून इतर कांही युक्तीने त्यांचें मन पुत्रदर्शनाला तयार करीत करीत तें दर्शन घडवावें हें बरें म्हणून त्याचाहि विचार झाला.

दुसरे दिवशीं तिसरे प्रहरीं मोठ्या दिवाणखान्यांत दत्तविधानाची तयारी सुरू झाली. या दिवाणखान्यांत मांडण्याकरितां भाऊसाहेबांच्या खोलींतलें कांही सामान न्यावयाचें होतें. त्याकरितां त्यांच्या पलंगाची जागा विमलने अशी बदलली कीं, त्यामुळे बरोबर त्यांच्या समोर भिंतीला टांगलेला मोठा आरसा आला. आणि नेमकें त्या आरशासमोर पलंगापलीकडे माजघराचें एका कडेचें दार येत होतें. त्या दारावर भाऊसाहेबांना वारा लागूं नये म्हणून पडदा टाकण्यांत आला होता. या दाराकडे डसें करून व आरशाकडे पाट करून भाऊसाहेब पलंगा-

वर निजले होते. जवळ विमल मधून मधून येऊन बसे व त्या उभयतांचें संभाषण चाले. भाऊसाहेब तोंडांत चिरूट घेऊन जो धूर सोडीत, तो वाटोळ्या गिरक्या घेत घेत वर जाऊन तक्तपोशीला भिडत असे. धूर तोंडांतून निघालेला व आपण लीलेने तो गिरक्या घेत वर चढत चाललेला पाहिल्याशिवाय, तंबाखू ओढणारांना आपण तंबाखू ओढली असें वाटतच नाहीं. त्या धुरांत त्यांना काय दिसतें हें ईश्वराला माहींत. कांहींना त्या धुरांत ईश्वर दिसत असला तर असेलहि. पण ईश्वर ढग व धुके निर्माण करितो, आणि आपणहि तंबाखूंतून ढग व धुकें निर्माण करितों यामुळे ईश्वराचे आपण प्रतिपक्षी असेंहि तंबाखू ओढणारांनीं कां म्हणूं नये ! असल्या तत्त्वज्ञानात्मक गूढ विचारांचें मनन तंबाखू ओढणारा प्रायः केव्हा डोळे मिटून तर केव्हा उघडून करीत असतो. भाऊसाहेब डोळे मिटीत तेव्हा त्यांच्या अंतःचक्षूंना काय दिसत असेल हें माहीत नाहीं. पण आज डोळे उघडून त्यांनी समोर पाहिलें म्हणजे त्यांना आपला एक जोडीदार त्यांच्यासारखाच चिरूट ओढीत धूर सोडीत पलंगावर पहुडलेला दिसे येवढें मात्र खरें. आरशांत दिसत असलेल्या या आपल्या प्रतिबिंबाकडे ते पाहत असतां विमल जवळ येऊन बसली. तेव्हा तिला ते म्हणाले, "बाळ, काल रात्रीं तुझ्या सांगण्याप्रमाणे प्रभाकर मनांत आणीत होतों; पण तो मला स्वप्नांत कांहीं दिसला नाही, तुला दिसला तसा."

त्यावर विमल म्हणालीः—

**विम.**—"स्वप्नें रात्रींचींच पडतात असें नाहीं. दिवसाहि तीं पडूं शकतात, बाबा ! आणि तंबाखू न ओढणाऱ्यापेक्षा ओढणाऱ्यालाच दिवसाचीं स्वप्नें पडण्याचा संभव अधिक असतो. धुराच्या जाळ्यांची मदत कल्पनाशक्तीला होत असते म्हणतात तें खरें का हो, बाबा !"

असें विचारून ती हसली. पण उत्तराकरिता न थांबता ती उभ्या उभ्या आंत जाऊन थोड्या वेळाने बाहेर येऊन पुनः बापाशेजारी बसली आणि म्हणालीः—

**विम.**—"बाबा, इतक्या वर्षांनी तुम्हाला प्रभाकर दादाचा चेहरा चांगला आठवतो का हो ?"

**भाऊ.**—"हो आठवतो का म्हणजे काय ? प्रत्यक्ष मुलाचा चेहरा कोण विसरेल कितीहि काळ लोटला म्हणून ?"

**विम.**—"पण तो येथून गेला तेव्हां प्रभाकरदादाला किंचित् मिसूर फुटलेली असावी. आता तुम्हाला भेटावयाला यायच्या वेळीं त्याच्या जटा वाढल्या असल्या, दाढी वाढली असली तरी तुम्ही त्याला ओळखाल ?"

**भाऊ,**—"हो, म्हणून काय झालें ?"

या भाऊसाहेबांच्या उत्तराबरोबर समोरच्या आरशांत भाऊसाहेबांना दिसत असलेला पडदा दूर झाला, व त्या ठिकाणीं एक जटाधारी दाढीवाला तरुण मनुष्य प्रभाकराच्या उंचीचा आंगलटीचा ठेवणीचा माजघराच्या दारांत उभा आहे असें त्यांना दिसलें. भाऊसाहेबांना श्रावणी अमावास्येच्या रात्रीं जी मनुष्याकृति घराच्या मागील दारीं दिसली, तीच ही आता माजघराच्या दारांत त्यांना दिसली. पण द्विरुक्तीने आश्चर्य थोडें कमी होतें म्हणतात. भाऊसाहेबांचेंहि तसेंच झालें. म्हणून ते त्या रात्रींसारखें एकदम ओरडले किंचाळले नाहीत. पण "आं ! विमल, हें काय मीं बघतों आहें ?" असें म्हणून ते अंथरुणावरून उठण्याचा प्रयत्न करणार तों ती मनुष्याकृति बाजूला झाली.

विमलहि बापाबरोबरच त्या आरशांत पाहत होती. तिला ती मनुष्याकृति पाहून आश्चर्य तर वाटलेंच नाही. पण उलट ती थोडी हंसतच होती. ती बापाला म्हणाली:—

**विम.**—"बाबा, अंथरुणावरून असें एकदम उठण्याची घालमेल तुमच्या काळजाला बरी नाही असें डॉक्टरांनी तुम्हाला सांगितलें आहे ना ? काय दिसलें तुम्हाला आरशांत, तुम्ही पाहून दचकलां तें ?"

**भाऊ.**—"अग, माझ्याबरोबर तुलाहि समोरचा आरसा दिसतोच आहे. आणि त्यांत माझ्या उशाकडून पडणारें सगळें प्रतिबिंब मला दिसलें तें तसें तुलाहि दिसलेंच असेल. मग मला काय विचारतेस काय दिसलें म्हणून ?"

विम.—" मला काय दिसलें तें मी ओळखलेंहि. म्हणून मला आश्चर्य वाटलें नाहीं. पण तुम्हाला काय दिसलें ? "

ती आकृति अदृश्य होतांच भाऊसाहेब पुनः पूर्वीसारखे अंथरुणावर पडले. तों पुनः एकदां दारावरचा पडदा बाजूला होऊन तीच आकृति आरशांत भाऊसाहेबांना दिसली.

ही आकृति पाहण्याची त्यांची ही तिसरी खेपा! म्हणून दुसऱ्या खेपे-प्रमाणे " आं ! हें काय दिसतें आरशांत " असेहि उद्गार त्यांच्या तोंडून निघाले नाहीत. उठून बसण्याचाहि त्यांनी प्रयत्न केला नाहीं. पण म्हणाले—

भाऊ.—" विमल, बघना, बघ नीट. मला मनुष्याकृति दिसते आरशांत, कीं तो माझा भ्रम आहे ? मला एकट्याला दिसत असेल तर तो भ्रम. पण मला आणि तुला दोघांनाहि सारखेंच दिसत असेल तर तो माझा भ्रम नाही. माजघरच्या दारांत खरोखरच कोणी तरी उभें आहे. "

बापानें निर्भय व्हावें याकरितां विमल त्याला ऐकूं जाईल असें मोठ्यांदा हसूं लागली आणि म्हणालीः—

विम.—" बाबा, कांहीं थोड्या वेळापूर्वी तुम्हाला मी विचारलें तें आठवतें का ? कीं बारा वर्षांनंतर तुम्ही प्रभाकराला ओळखाल का म्हणून ? आणि जटा वाढल्या असल्या तरी ? अन् दाढी वाढली असली तरी ? तुम्ही होय म्हणालां, ओळखीन म्हणाला, म्हणून तुमची परीक्षा केली. तो दिसला तो कोण ओळखला नाहीत का ? आपला प्रभाकर दादा ! "

भाऊ.—" अरे होय कीं ! प्रभाकरासारखाच चेहरा डोळे आहेत खरे. अग, पण हीच आकृति मला त्या रात्रीं दिसली नव्हती का गेल्या अमावास्येच्या रात्रीं ? "

विम.—" होय, असें असून तुम्ही उगीच त्याला गुप्त पोलीस म्हटलें. आणि माझ्या माईची निंदा करून त्याला आणखीहि जें कांहीं तुम्ही म्हटलें त्याचा उच्चारहि नको. पण ही तुमची समजूत अगदीं चुकीची होती. ती दूर करण्याचा प्रयत्न आम्ही करणार होतों, तोंच तुम्ही बेशुद्ध पडलां. मग आम्हीं काय करणार ? "

भाऊ.—" मग मला आता तरी सांगना, कीं मला वाटतो तसा तो

प्रभाकर आहे! कीं त्याचें सोंग आहे! कीं वेषांतर केलेला कोणी गुप्त पोलीस आहे!"

विम.—"मी तुम्हांला कशाला भ्रमांत ठेवूं! आणखी थोड्याच वेळांत आणखी पक्की खूण पटण्यासारखा तो तुम्हांला दिसेल.

हें बोलणें होत आहे तों आरशांत दिसणारी आकृति अदृश्य झाली. विमल म्हणाली—"मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' इतकेंच नव्हे, तर खरोखर प्रत्ययालाहि येतें कित्येक वेळां. आता मीं जरा खुलासा करून सांगतें ऐका. कांही दिवसांपूर्वीं प्रभाकरदादानेच आईला एक पत्र पाठविलें होतें, इकडे येण्याची सूचना देण्याचें. तें खरोखर नेहमीसारखें आधी तुमच्याच हातीं येऊन पडावयाचें. पण योग असा कीं, त्याच दिवशीं पोस्टाच्या शिपायाला आमच्या घरच्या मागच्या रस्त्यानें आधीं जाण्याची लहर आली, पत्रें वांटीत! पत्रांत पत्र दिसलें माईच्या नांवाचें. तें त्यानें तिलाच दिलें. तें सहज तुम्हांला कळलें. त्याचा तुम्ही विनाकारण किती तरी गवगवा केलात. मग अमावास्येच्या रात्रीं पाठोपाठ स्वतः प्रभाकर दादाच आला, मागील दारानें घरांत. आम्हीच त्याला तिकडून आंत घेतला. तों फिरून योगायोग असा कीं, तुम्हीहि अवचित तेथेच नेमके आलां, त्याच वेळीं कंदील काठी घेऊन, गुप्त पोलीस शोधावयाला! मिळून दादाने तुम्हाला न कळत घरीं यावयाचें त्याचा हा असा विपरीत प्रकार झाला. तुमचें मन हळूहळू त्याच्याबद्दल शुद्ध व्हावें, आणि मग त्यानें तुमच्या नजरेला पडावें असा आमचा बेत होता. त्याची मजल ही येथवर अशी आली. पण आता यापुढे आम्ही लपवालपवी कांहीच करीत नाही. हा पाहा दादाच जशाचा तसा तुमच्या भेटीला आणि तुमचा आशीर्वाद मागण्याला येतो आहे."

त्याप्रमाणे प्रभाकर आंत आला, आणि त्यानें आपल्या बापाचे पाय घट्ट धरले. त्याच्या चेहऱ्याकडे पुनः पुनः पाहूनहि प्रथम भाऊसाहेबांची खात्री होईना. पण त्याचें रूप आणि त्याचा आवाज यांची ओळख ते कसे विसरणार! शिवाय हें स्वप्नप्रदर्शन नव्हतें किंवा आरशांतलेंहि नव्हतें, अगदीं प्र यक्ष होतें. शेवटीं पितृवात्सल्याचा जोर झाला, व प्रभाकराचा हात आपल्या हातांत घेऊन भाऊसाहेब गहिंवरून म्हणाले, "प्रभाकर, हा तुझ्या आईच्या पुण्याईचा

आणि तुझ्या बहिणीच्या प्रेमाचा प्रभाव आहे. तूं आलास ये. मात्र आता तुझें पुढे काय होणार याचीच मला काळजी वाटते. तूं आलास खरा.. पण तो कायमचा घरीं राहावयाला आलास कीं नुसता भेटून चटका लावून जावयाला आलास, कांही कळत नाही! माझें मन पुनः भ्रमानें घेरलें; माझें डोकें इतकें हलकें झालें आहे कीं, थोड्याशा क्षोभानेंहि मला घेरी येते."

प्रभा.—"बाबा, तुमचा आशीर्वाद असेल तर माझें कसेंहि निभावून जाईल. पण प्रथम मला हें सांगा कीं, माईसंबंधानें तुम्ही जो विनाकारण संशय घेतलात तो आता तरी गेला ना तुमच्या मनांतून? मी काय पुरुष मनुष्य आहे. दोन धक्के देईन दोन घेईन. माझें लग्न नाही संसार नाही. पण आमची माई गरीब गाय आहे, प्रेमळ आहे, पापभीरु आहे. तुम्हाला तिचा संशय आला असें कळल्यापासून ती कशी अगदी मनांत पिचते आहे. बिचारीला अन्न गोड लागत नाही. तिला माझी एक काळजी आहेच अन् शिवाय ही. काय बरें करावें तिनें?"

हे शब्द ऐकून भाऊसाहेबांना मनांतून फार वाईट वाटलें. प्रेम म्हणतात तें या पतिपत्नींत नव्हतें, तरी तिच्याबद्दल भाऊसाहेबांना आदर असे. म्हणून, तिला आपण इतका धडधडीत अन्याय केला कीं, पूर्वी आपल्या मुलीनें आपले कान उपटले, तसे आज मुलगाहि केवळ न्यायबुद्धीनें उपटीत आहे; आणि ते उपटून घेण्याइतके आपण अविचारी व नादान ठरलों; या विचारानें त्यांच्या मनाला इतकें वाईट वाटलें कीं, ते स्फुंदून स्फुंदून रडूं लागले, आणि त्या दुःखावेगांतच त्यांना पुनः जोराचा भ्रमाचा झटका आला.

इकडे बाहेर दत्तविधानाच्या तयारीची घालमेल सुरू होती. ही तयारी दिवाणसाहेबांच्या हुकुमानें होत होती. कारण भाऊसाहेबांच्या संमतीच्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन सुभेदारांनी दत्तविधानाच्या तयारीचें घोडें दामटावयाला सुरुवात केली होती. या तयारीला ताबडतोब मनाई करावी असें एक वेळ विमलच्या मनांत आलें. आणि स्वतः प्रभाकर प्रगट होऊन ओसरीवर उभा राहिला असता, तर आंत परवानगीशिवाय

पाऊल घालण्याची कोणाची प्राज्ञा होती ? पण प्रकट व्हावयाचें तें ज़रा मौज करून दणदणीतपणानें व्हावें असें भावा–बहिणींनी ठरविलें होतें. म्हणून ही दत्तकाची तयारी तशीच चालू राहूं देण्यांत मनांतून त्यांना एक प्रकारची गंमतच वाटे.

दत्तविधानाकरिता भाऊसाहेबांच्यातर्फे आमंत्रणें कोणासच केलेलीं नव्हतीं. पण ती सर्व उणीव सुभेदारांनी भरून काढली होती. त्यांनी आपल्या पुढ्यांतले बहुतेक पुंड बोलावले होते. खुद्द दिवाणसाहेबांना अगत्याचें आमंत्रण होतें. ते येणार म्हणून त्यांच्याकरिता वेगळा लोड गादी मांडली होती. समारंभाकरिता पानसुपारी पेढे फुलें यांची तजवीज भाऊसाहेबांच्या घरून कांहीच झाली नव्हती. ती सर्व सुभेदारांनीच केली. ज्याला दत्तक घ्यावयाचा त्याची तयारी कांहीच नाही, आणि ज्याचा द्यावयाचा त्यानेच ती सगळी संभाळली. याचा अर्थ उघड होता व तो सुभेदाराला लाजिरवाणा असाच होता. पण सुभेदाराच्या स्वार्थाने त्याची लाज मारून टाकली होती. एखाद्याच्या घरीं माणूस मेला असला म्हणजे खुद्द घरचीं माणसें गप्प बसलेलीं असतात, आणि बाहेरचींच घरांत वावरत असतात. तसाच कांहीसा प्रकार आज भाऊसाहेबांच्या घरीं चालू असलेला बाहेरच्या पाहणाराला दिसला. भाऊसाहेब पायावर उभे असते तर ते स्वतः घालमेलींत दिसते, किंवा दत्तविधान रहित केलें असा ताठ निरोप पाठवून घरांत कोणाला पाऊल घालूं देते ना. पण आज ते पडले शरपंजरीं व भ्रमाने घेरलेले. दत्तविधान करण्याची सक्ति त्यांच्यावर बाहेरच्या माणसांकडून होत होती. घरचीं माणसें मनांतून नको म्हणत होतीं. पण त्यांना समारंभाची तयारी कांही एका कारणासाठी बाहेरून चालू ठेवावयाची होती !

ठरल्या वेळेच्या आधी सुभेदार आपले गण घेऊन आले. दोन माणसें विड्याचीं तबकें, फुलें घेऊन आलीं. एकाने साखरपुडे करून आणले होते. गांवचा फोटोग्राफर आपलीं सर्व आयुधें घेऊन आला असून त्याने त्यांची मांडामांड सुरू केली. इतक्यांत दिवाणसाहेबांची स्वारीहि गाडींतून आली. त्यांचा सत्कार परस्पर सुभेदारांनीच केला. भाऊसाहेब आजारी म्हणून त्यांना आयत्या वेळीं उठवून बसवावयाचें त्याप्रमाणे

सुभेदारांच्याच माणसांनी उठवून बसविलें. मात्र त्यांना संभाळण्याकरितां म्हणून दौलती तक्क्या धरून जवळच मागे उभा राहिला. बाहेरच्या बायकांना आमंत्रणें नव्हतींच; व घरच्या बायका तरी दिवाणखान्यांत कशाला येतील? एका दाराजवळ एक पडदा टाकून त्या त्यांतून पाहत होत्या.

प्रथम कांही तरी प्रस्तावना हवीच म्हणून दिवाणसाहेबांनी भाऊसाहेबांच्या प्रकृतीची चौकशी केली. त्याला भाऊसाहेब भ्रमिष्ट माणसाप्रमाणे एखादा शब्द सरळ तर एखादा विचूक अशीं उत्तरें देत. तरी दिवाणसाहेबांनी आपणच होऊन दत्तविधानाची उघड प्रस्तावना केली. ते म्हणाले—

**दिवा.**—"आपणाला मी पत्रांत लिहिलें तें अगदीं मनापासून लिहिलें. आणि तुम्ही त्याला मान देऊन दत्तविधानाचा निश्चय केला हें फार चांगलें झालें. नव्या कारकीर्दींत दत्तक संस्थेवर कटाक्ष किती आहे हें तुम्हांला माहीत नाही. तथापि, हें दत्तविधान प्रत्यक्ष झाल्याचा विश्वसनीय पुरावा असणें इष्ट आहे म्हणून मीं यजमानसाहेबांच्या गैरमर्जीची पर्वा न करतां येथे आलों. तेव्हा आतां होऊं द्या समारंभ."

भाऊसाहेबांच्या तोंडून भ्रमिष्टाप्रमाणे एकदां हं एकदां अंहं असे शब्द निघत होते. पण त्याकडे कोणाचें लक्षच नव्हतें. समारंभाला धार्मिक विधीचें स्वरूप नव्हतें. म्हणजे पुण्याहवाचन, होमहवन कांही व्हावयाचें नव्हतें. फक्त मुलगा मांडीवर देण्याचा लौकिक शरीरदान समारंभ व्हावयाचा होता. सुभेदार उठून उभे राहिले. त्यांनी बाजीरावालाहि हाताला धरून उभें केलें. आणि उपरण्याचा पदर डोळ्याला लावून रडूं आल्याचा व कंठ सद्गदित झाल्याचा बहाणा करून म्हणाले—

**सुभे.**—"येऊन-जाऊन मला या जगांत डबीर घराण्याचें कल्याण पाहायाचें. दुसरें कर्तव्य मी ओळखीत नाही. भाऊसाहेबांना दुर्दैवानें आता तैनात चालवायाला पुत्र नाही—

असें ऐकतांच भाऊसाहेब हातवारे करून माना हालवून त्या शब्दांना नकार देऊं लागले. या नकाराचा अर्थ आपल्याला हवा असाच करून सुभेदार म्हणाले, "पहा पहा, भाऊसाहेबहि मी म्हणतों तेंच म्हणत आहेत. तैनात चालवायला पुत्र नाही."—

त्यावरोबर माजघरांतून एका स्त्रीचा आवाज मोठ्याने खणखणीत ऐकूं आला. ती म्हणाली.—

"भाऊसाहेबांच्या म्हणण्याचा अर्थ तसा नाही. आपल्याला तैनात चालवावयाला मुलगा नाहीं हें जें सुभेदार म्हणतात तें खरें नाही असा त्यांच्या नकाराचा अर्थ आहे, समजलां!"

सुभेदार थोडे दचकले. पण तसेंच पुढें रेटून म्हणाले, "कसेंहि असो. भाऊसाहेबांनी माझा मुलगा बाजीराव आपल्या मांडीवर दत्तक घेण्याला मागितला. तो देण्याचें पूर्वीच कबूल केलें होतें. आणि आता हा पहा सर्वांच्यादेखत मी त्याला भाऊसाहेबांच्या मांडीवर दत्तक म्हणून देत आहें."

असें म्हणून सुभेदारांनी मोठ्याने गळा काढला. तरी पण दुःखाचें असलें तरी आपण करीत आहों तें महत्कर्तव्यच जसें कांही, अशा अर्थाने ते बाजीरावाला उचलून घेऊन भाऊसाहेबांच्या अगदी जवळ गेले; व त्यांनी बाजीरावाला भाऊसाहेबांच्या मांडीवर दडपून बसविण्याचा प्रयत्न केला. चटदिशीं उडी मारून मांडीवर जाऊन बसावें इतका बाजीराव चपळ नव्हता. दत्तक होऊन मिळणाऱ्या वैभवाची श्रीमंतीची कल्पना त्याच्या बापाला होती तशी ती स्वतः त्याला नव्हती. त्याची हालचाल बापाच्या हाताच्या सूत्राने चालू होती. बरें, भाऊसाहेबांनी हात किंवा मांडी पुढे करावी ती तेहि पुढे करीनात. त्यांच्या तोंडून शब्द निघत नव्हता पण नकारदर्शक मान डोलत होती. तेव्हा आंतून एका स्त्रीचा आवाज पुनः ऐकूं आला. ती म्हणाली—

"खबरदार, मुलगा माझ्या बापाच्या मांडीवर घाल तर. माझा भाऊ अजून चांगला जिवंत आहे. तैनातीची तुम्हाला मुळीच काळजी नको. घ्या आपल्या मुलाला मागे बऱ्या बोलाने. भाऊसाहेब भ्रमांत आहेत. म्हणून त्यांच्याकरिता मी त्यांची मुलगी तुम्हाला सांगतें कीं, बाबांना मुलगा दत्तक घ्यावयाचा नाही!"

आतां प्रकरण तेजाला आलें. सुभेदार म्हणाले, "या कामांत बायकांनी बोलण्याचा कांही एक अधिकार नाही. त्यांनी माजघरापुरतें पाहावें. भाऊसाहेबांनी मला बाजीराव दत्तक मागितला आहे. मीं त्याचें वाग्दान पूर्वीच

केलें आहे. आता हें प्रत्यक्ष शरीरदान करीत आहें. आणि दिवाणसाहेबांसह-वर्तमान येथे जमले ते सर्व याचे साक्षीदार आहेत."

असें म्हणून सुभेदारांनी पुनः लगट करून मुलाला भाऊसाहेबांच्या मांडीवर बसविण्याचा प्रयत्न केला. पण एखादी वीज कडकडून आवाज व्हावा तसा कोणा पुरुष मनुष्याच्या रागाच्या आवाजाचा कडकडाट झाला. भाऊ-साहेबांनी आपली मांडी मागे ओढून घेतली. त्याबरोबर तिजवर बसूं पहाणारा बाजीराव कोलमडून खाली धाडकन पडला, आणि दारावरचा पडदा बाजूला सारून प्रभाकर उडी मारून दंड थोपटून जमलेल्या मंडळींत येऊन उभा राहिला आणि म्हणाला—

" सुभेदारसाहेब, एवढा गळा काढून रडतां कां? मुलगा दत्तक द्यावा लागतो असा बहाणा करूनच ना? हा पहा, तुमचें रडणें थांबविण्याकरितां मी स्वतः आलों अस्मानांतून धावून! मी प्रभाकर! भाऊसाहेबांचा औरस मुलगा! तैनतीचा धनी! पोटच्या पोराला विकून दुसऱ्याच्या दौलतीचा अभिलाष धरून, स्वतःचें पोट जाळण्याची तुम्हांला इच्छा असेल तर दुसरा एखादा निपुत्रिक श्रीमंत गांठा जा! माझे वडील निपुत्रिक नाहीत! मी कुठे अंदमानांत गेलों नाही किंवा मेलों नाही. तुम्हा सर्वांच्या उरावर नाचण्याकरितां हा परत आलों आहें. आणि ईश्वराच्या घरीं न्याय असतो कीं नाही हें बारा वर्षांच्या तपश्चर्येनंतर अजूनहि पाहणार आहें. सुभेदारसाहेबांप्रमाणे या दुष्ट हरामखोर दिवाणसाहेबांनाहि मी हेंच बजावतों. चला, माझ्या घरांतून निघून चालते व्हा. न गेला तर शोभा होईल. एके-काला गचांड्या मारून घालवून देईन."

ही गर्जना ऐकून सभा उठली. सर्व सामान जिथल्या तिथेंच पडलें. दिवाणसाहेबांसह ज्याने त्याने आपापली छत्री काठी सांवरून बाहेर पडून आपल्या घराची वाट धरली. दिवाणखाना रिकामा होतांच प्रभाकर बापाच्या पायावर डोकें ठेवून म्हणाला, " बाबा, तुमच्या डोक्याला फार त्रास झाला. मला क्षमा करा!"

---

## प्रकरण पंधरावें

# न्यायदेवतेचा निद्राभंग

दत्तविधानाला आलेली सर्व मंडळी अशा रीतीने घराबाहेर गेल्यावर प्रभाकर व विमल यांनी माई साहेबांशीं सहविचार केला. माईसाहेब म्हणाल्या,

" बाळ प्रभाकर, तूं माझ्यावरचें हें दत्तकाचें संकट निस्तरलेंस. पण आता तुझें पुढ कसें होईल ? "

प्रभाकर हंसून म्हणाला, " दत्तकाचें संकट कसचें टाळलें ! आयता तुला बाळंतपणाशिवाय चालताबोलता मुलगा मिळत होता. तो मिळूं दिला नाही हा तुझा मीं अपराधच केला नाही काग माई ! "

विमलहि खोखो हंसली आणि म्हणाली, "होय रे होय ! मुलगा चालता होता आणि बोलताहि होता. पण कसा चालत होता आणि कसा बोलत होता तो पाहिलासना ग, माई ! जन्मभर तुला मुलगाच्या मुलगा होऊन शिवाय वरती करमणूकहि झाली असती हंसायला ! "

माई—" हो, मला त्याला हसायला आणि लोकांनी मला हंसायला ! "

विम.—" लोकांना हंसायला काय झालें ? पण मुलगा तर मिळालाना सई! बिनश्रमाने आणि बिनखर्चाने! आमच्या माईला एक सोडून दोन मुलगे!"

माई—" आणि तूं नाही का एक तिसरा ! पण आता तुम्ही माझी चेष्टा करीत बसणार कीं पुढचा विचार करणार ! "

प्रभा.—" पुढचा विचार काय उघड आहे. सरकार मला पकडून नेणार हें मला इकडे येण्यापूर्वींच कळलें होतें. त्यांनी वाटेल तेव्हा पकडून न्यावें. माझी तयारीच आहे. "

विमल म्हणाली, " तसें नाही, दादा ! सरकार तुला पकडून नेणार हें ठरलेलेंच असलें तरी त्यांनी पकडून नेण्याची वाट तूं पाहूं नये. मला वाटतें, तूं आपण होऊन जावें हें अधिक बरें. त्याला वेगळा अर्थ आहे. "

प्रभा.—" मग काय दिवाणसाहेबांच्या घरीं जाऊं कीं कोतवालीवर

जाऊं म्हणतेस? मला जायला काय? पण त्यांत कमीपणा वाटतो. कोतवालीच्या लोकांची काय योग्यता? आणि दिवाणसाहेब डोळ्यांना दिसले कीं कदाचित् देहभान विसरून मीं त्यांच्या अंगावर हातहि टाकायचा! इतके ते मला नीच अधम वाटतात."

**विम**—"तूं आपण होऊन हजर हो. पण दिवाणसाहेबांकडे जाऊं नको आणि कोतवालीवरहि जाऊं नको. पूर्वी मनांत योजल्याप्रमाणे एकदम सरळ उठून राजेसाहेबांच्याकडे जा, आणि म्हण कीं, "मीं हा जातीने हजर झालों आहें. माझा न्याय करा. माझा न्याय होईपर्यंत मीं अटकेंत राहावयाला तयार आहें."

**प्रभा.**—"हां हां, ही युक्ति ठीक आहे."

**विम.**—"आणि जाणार तोहि आताच्या आताच जा. कारण दिवाणसाहेब येथून रागारागाने गेले आहेत तरी ते यजमानसाहेबांकडे जाऊन, त्यांचे कान भरून, त्यांचा हुकूम मिळवून मग तुला धरणें पाठविणार. या गोष्टीला कांही तरी वेळ लागेल. त्याऐवजीं तूं आताच जाऊन राजेसाहेबांपुढे उभा राहिलास तर अधिक बरें नाही काय?"

**प्रभा.**—"पसंत. मला हें अगदी पसंत आहे. मीं निघूं तर!"

**माई**—"पण आधी घरांत चल, फराळ कर. असाच्या असा मीं तुला जाऊं द्यावयाची नाही, कांही केल्या! अशा या उतावळ्या स्वभावानेच तुझ्यावर संकटें येतात."

माईसाहेबांची ही सूचना विमललाहि पसंत पडली. ती म्हणाली, "चल घरांत, मलाहि भूक लागली आहे. तूं अन् मी बसून फराळ करूं पोटभर. दत्तविधानाचे पेढे मिळावयाचे सुभेदारसाहेबांकडून ते बुडाले. तेव्हा आता घरचें तरी खाऊन घेऊं!"

इतकें बोलणें झाल्यावर सर्व मंडळी घरांत गेली. कांही वेळाने विमल आणि प्रभाकर भाऊसाहेबांच्या बिछान्याशीं आलीं. त्यांना झोप लागली होती. म्हणून त्यांना उठवूं नये असें ठरलें. फक्त प्रभाकराने पुत्रधर्माला जागून बापाच्या पायाला हात लावून नमस्कार केला आणि "ताई, मी जातों, थेट राजे-

साहेबांची गांठ घेतों. मग काय व्हावयाचें तें होवो. तूं आहेसच माईला आणि बाबांना संभाळायला" असें म्हणून तो घराबाहेर पडला.

* * *

राजे नवलराय संध्याकाळचा फेरफटका पुरा करून कपडे बदलून बाहेरच्या दालनांत येऊन स्वस्थ बसले होते. तों खालून जमादार सांगत आला कीं, "कोणी एक मनुष्य महाराजांची भेट घेण्याकरितां आला आहे. आज्ञा होईल तर वर पाठवून देतों."

प्रभाकर वर आला तो आंतल्या बाजूला दाराच्याच शेजारीं उभा राहिला. त्याने एकवार लवून नमस्कार केला. तो राजेसाहेबांनी तितकाच लवून घेतला, व ते म्हणाले, "असे उभे कां! पलीकडे ती खुर्ची आहे, तिजवर बसा."

**प्रभा.**—"मला खुर्चीवर बसण्याची परवानगी दिली हा आपला थोरपणा आहे. पण या क्षणीं आपणासमोर खुर्चीवर बसण्याला मीं अपात्र आहें असें मला वाटतें."

**नव.**—"तें कां बरं? उलट मला कोणी भेटावयाला आला असतां मीं त्याला खुर्ची दिली नाही बसावयाला, आणि मीं मात्र बसून राहिलों, तर मी तो त्याचा अपमान करतों असें मलाहि वाटतें. त्याला काय करावें? तुम्ही 'या क्षणीं' खुर्चीवर बसण्याला मीं अपात्र आहें असें म्हणालां, त्याचा अर्थ मी नाही समजलों कांही!"

**प्रभा.**—"मीं महाराजांपुढे उभा आहें तो सरकारानें ज्याच्यावर तोहमत ठेवली आहे असा एक गुन्हेगार–नव्हे पण आरोपी–आहे."

**नव.**—"याचाहि अर्थ मला नीटसा कळला नाहीं.

**प्रभा.**—"सरकाराच्या दृष्टीने मी कांही अपराध केलेला आहें. पण माझ्या दृष्टीने मीं तो केलेला नाही."

**नव.**—"मग अशा मतभेदाचा निकाल करण्याकरितां न्यायकचेऱ्या काढलेल्या आहेतच. तो मतभेद घेऊन येऊन मला भेटून तुम्ही काय करणार?"

**प्रभा.**—"न्याय मागणार!"

नव.—"मग न्यायच मागावयाला आलां आहां तर खुर्चीवर बसावयाला तुम्हाला कांहीएक हरकत नाही. जो स्वतःला निरपराधी समजतो, तो त्या क्षणीं स्वतंत्रच आहे. आणि जो प्रजाजन असा स्वतंत्र आहे, तो माणुसकीच्या हक्काच्या दृष्टीने राजाच्या बरोबरीचा आहे असें मी मानतों. म्हणून म्हणतों खुर्चीवर बसा, आणि कशा कामीं काय न्याय मागतां तें स्वस्थपणाने सांगा!"

इतका स्पष्ट खुलासा झाला तरी प्रभाकर खुर्चीवर बसेना. तेव्हा राजेसाहेब म्हणाले, "तुमचें कर्तव्य खुर्चीवर न बसण्याचें असेल तर मला माझेंहि कर्तव्य केलें पाहिजे. मीहि उभा राहतों. आणि दोघेहि उभ्यानेच बोलूं."

गोष्ट इतक्या निकरावर आलेली पाहून प्रभाकर खुर्चीवर बसला. मग संभाषण सुरू झालें. प्रभाकर म्हणाला—

प्रभा.—"माझी हकीकत थोडक्यांत अशी आहे. मीं आपल्या या राजधानीचाच रहिवाशी. माझें नांव प्रभाकर. भाऊसाहेब डबीर म्हणून या संस्थानाचे एक तैनातदार आहेत. त्यांचा मी मुलगा. बारा वर्षांपूर्वी माझ्यावर सरकाराकडून एक खटला भरण्यांत आला होता."

नव.—"त्याचें स्वरूप काय होतें?"

प्रभा.—"राजद्रोह आणि खुनाचा आरोप असे सजोड आरोप मजवर ठेवण्यांत आले होते म्हणतात."

नव.—"राजद्रोहाचें कृत्य कोणाचें?"

प्रभा.—"संस्थानी सरकार व ब्रिटिश सरकार यांची बदनामी करण्यासारखे जाहीरनामे लिहून भिंतीवरून मी चिकटविले असें सरकारचें म्हणणें."

नव.—"आणि खून कोणाचा?"

प्रभा.—"दिवाणसाहेबांचा व कदाचित् पोलिटिकल एजंटाचा."

नव.—"आणि हे दोनहि आरोप खोटे होते असें तुमचें म्हणणें? बरें मग त्या आरोपांचें काय झालें?"

प्रभा.—"माझ्या पश्चात् त्या आरोपांची चौकशी झाली व मला जन्मठेपेची शिक्षा झाली."

नव.—“ चौकशी तुमच्या पश्चात् काय म्हणून ? आणि तुम्हाला जन्मठेपेची शिक्षा होऊन तुम्ही मोकळे कसें ? ”

प्रभा.—“ माझ्या पश्चात् इनसाफ होण्याचें कारण मी पकडण्यापूर्वी या राज्यांतून निघून मोंगलाईत गेलों. ”

नव.—“ हे गुन्हे केले नाहीत, तुम्ही निर्दोषी होता, आरोप खोटे होते, असें तुमचें म्हणणें होतें तर तुम्ही फरारी कां झालां ? न्यायासनासमोर हजर राहून तुम्ही आपली बाजू कां मांडली नाही ? आपलें समर्थन कां केलें नाही ? फरारी होऊन आपणावरचा वहीम—अंदेशा—तुम्ही उलट बळकटच केला कीं नाही ?”

प्रभा.—“ तें खरें आहे. पण आपणाला विश्वास पटेल तर सांगतों कीं, त्या न्यायासनाकडून त्या कारकीर्दीत मला न्याय मिळण्याची आशाच वाटत नव्हती. म्हणून कालहरण करण्याकरितां फरारी झालों.”

नव.—“ बरें, तुम्ही बारा वर्षांपूर्वी फरारी झालां. मग परत यावें असा तुमचा निश्चय केव्हा व कां झाला ? ”

प्रभा.—“ मी मोंगलाईत असतांना आपण कच्ची मुखत्यारी घेतांना जें भाषण केलें तें मला वाचावयाला मिळालें त्याच दिवशीं. ”

नव.—“ मीं त्या भाषणांत काय म्हटलें होतें ? ”

प्रभा.—“ गेल्या बारा वर्षांतल्या कारभाराची तपासणी करीन म्हणून!”

नव.—“ मी बोलल्याप्रमाणे या कामीं करीनच असें कशावरून ? ”

प्रभा.—“ मनुष्य बोलतो त्यावर प्रथमदर्शनीं विश्वास ठेवणें यांत तरी कांही चूक नाही असें आपणहि कबूल कराल. त्याउपर फसणें ही नशिबाची गोष्ट आहे. आपण संस्थानाचे राजे आहां. मर्जीला येईल तसें करा!”

नव.—“बरें, तुम्ही आपण होऊन हजर झाला हा भलेपणा लक्षांत घेऊन, फेरचौकशीच्या भानगडींत न पडतां, मी जर फिरून तुम्हाला फरारी होण्याची संधि दिली तर ती तुम्ही घ्यावी हें अधिक बरें नाही काय ? ”

प्रभा.—“ मला पकडणें न पकडणें हें जसें आपल्या हातचें आहे, तसेंच यापुढे गुप्त न राहतां प्रकट रीतीने वागणें वावरणें हें माझ्याहि हातचें आहे. मला फरारीच राहावयाचें असतें तर मी मोंगलाईतून परत तरी

कां आलों असतों ? मला न पकडतां मोकळाच राहूं दिलात तरी या पुढे मला त्यापासून सुख लागणार नाही ! माझा न्याय होऊन मी निरपराधी होतों असें ठरेल तरच सुख लागेल. "

नव.—" पण फेरचौकशी न होतां केवळ तुमच्या शब्दावर विश्वास ठेवून मी तुम्हाला मोकळा सोडणें, आणि चौकशी होऊन निरपराधी ठरून तुम्ही मोकळे सुटणें, दोहोंची फलश्रुति तुमच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने सारखीच नाही काय ! "

प्रभा.—" नाही. फेरचौकशी न होतां मीं मोकळा झालों तर लोक समजतील कीं मी दयेची याचना करून माफी मिळवून मोकळा झालों. मला माफी नको, न्याय पाहिजे. आणि न्याय याचा अर्थ मी जसा खरा, तसे माझी प्रतिपक्षी दिवाणसाहेब हे खोटे, असें उघड सिद्ध झालें पाहिजे. बारा वर्षांनी परत येऊन मीं इनसाफ मागणें हें द्राविडी प्राणायामासारखें दिसतें खरें. पण कोणी सरळ घास घेऊं नच दिला तर द्राविडी प्राणायामाने तो घेतला पाहिजे, त्याला काय करणार ? दिवाणसाहेबांसंबंधाने मला किती तरी माहिती आहे. आणि ती ऐकण्याची आपली इच्छा असली तर मीं सांगूं शकेन."

नव.—" नाही. कोणाहि विरुद्ध एकतर्फी कागाळ्या ऐकणें हें रास्त नव्हे. तशा मी ऐकत नसतों. शिवाय या प्रकरणांत न्यायदानाचा संबंध आहे, म्हणून मला विशेष जपलें पाहिजे. ठीक आहे, हें तुमचें प्रकरण मीं उद्या हातीं घेतों. तुम्हाला बोलावीन तेव्हा फिरून या. प्रकरणाचा अखेर निकाल लागेपर्यंत तुम्ही राजधानी सोडून कोठें बाहेर जाणार नाही याविषयी माझी खात्री आहे. म्हणून तशी सूचना देऊन मीं तुमचा अपमान करूं इच्छित नाही."

इतकें बोलणें होत आहे तोंवर बराच अंधार पडत चालला, असें पाहून जमादाराने मोठा प्रकाश देणारा दिवा आणून ठेवला. त्या उजेडाने राजेसाहेब व प्रभाकर हे एकमेकांकडे पाहून दोघेहि आपापल्या ठिकाणीं किंचित् दचकले. प्रभाकर उठून निघाला असें पाहून राजेसाहेब त्याला म्हणाले—

नव.—" थांबा हां जरा दोन मिनिटें. मला तुम्हाला आणखी कांही विचारावयाचें आहे. "

प्रभा.—" काय वाटेल तें महाराजांनी अवश्य विचारावें. खरें तेंच सांगेन. "

नव.—" मला वाटतें, तुम्हाला मी पूर्वी कोठे तरी पाहिलें असावें, होय का ? "

प्रभा.—" मी उलट तसें कसें म्हणावें ? पण महाराजांनाहि मी कोठे तरी पूर्वी पाहिलें असावें असें वाटतें. बोलल्याची क्षमा व्हावी."

नव.—" पण तुमच्या वेषांत थोडा फरक झाला आहे."

प्रभा.—" आणि महाराजांना मी जेव्हा पाहिलेंसें वाटतें तेव्हा आपलाहि वेष किंचित् वेगळा होता. "

नव.—" मी तुम्हाला पाहिलें तेव्हा तुम्हाला दाढी होती. "

प्रभा.—" होय, पण ती खरी तरी होती. आणि क्षमा असेल तर बोलतों—"

नव.—" बेलाशक बोला. त्यांत क्षमा कसची ! आपण फार तर एकमेकांना ओळखी पटवितों आहों. "

प्रभा.—" महाराजांनी मात्र त्या वेळीं दाढी कृत्रिम लावली होती असें वाटतें. म्हणजे महाराजांना त्या रात्रीं पाहिलें तेंच खरें असेल तर ! आमच्या घरीं मागील दारीं !"

नव.—" कोणत्या दिवशीं ?

प्रभा.—" गेल्या अमावास्येच्याच दिवशीं !"

नव.—" होय. तुम्ही दिली ती खूण बरोबर आहे. तो घस्तीला जाण्याचा माझा पहिलाच दिवस होता. म्हणून वेषांतर बरोबर साधलें नसावें. बरें, आता क्षमा करा असें तुम्हाला म्हणण्याची माझी पाळी आली."

प्रभा.—" कां बरें ? "

नव.—" कारण आता तुमच्या घरगुती गोष्टी बोलण्यांत येणार म्हणून ! त्या वेळीं त्या ठिकाणीं जो प्रकार घडला तो जरा चमत्कारिक वाटला. त्या ठिकाणीं एक वृद्ध गृहस्थ आणि दोघी स्त्रिया होत्या.—"

प्रभा.—" होय. ते वृद्ध गृहस्थ माझे वडील आणि त्या स्त्रियांपैकीं एक जण तरुण होती ती माझी धाकटी बहीण, व थोडी प्रौढ होती ती

माझी सावत्र आई. आपण प्रकार पाहिला तो असा कीं, माझ्या वडिलांना वयामुळें भ्रम झाला आहे. त्यांच्यामागे गुप्त पोलीस लागले आहेत असें त्यांना वाटत असतें. आणि त्यांना शोधावयालाच म्हणून त्या दिवशीं त्या वेळीं माझे वडील कंदील घेऊन परसांत गेले. आणि योग असा कीं, मी बारा वर्षांनी परत घरीं गुप्तपणानें यावयाचें म्हणून आईला कळवून आलों तो नेमका त्याच वेळीं! बाबांना यांतलें कांहीच ठाऊक नव्हतें. आणि माझा तो तसा वैराग्याचा वेष! तेव्हा मीच त्यांना गुप्त पोलीस वाटलों. यामुळे मेंदूला धक्का बसून ते बेशुद्ध पडले."

नव.—" तुमच्या बहिणीनें मात्र त्या वेळीं फार प्रसंगावधान दाखविलें, शाबास आहे तिची. तिने मला घराबाहेर जावयाला सांगितलें तें योग्य होतें, पण तसें सांगावयाला तिला धैर्य कसें झालें, याचेंच मला आश्चर्य वाटतें. मीं तर त्यांचा रुबाब पाहून थक्कच झालों."

प्रभा.—"ती तशी धीटच आहे.शिक्षणानें,सद्गुणीपणानें व आत्मविश्वासाने तिला धीट बनविलें आहे. शिवाय न्यायाला व हक्काला ती जपणारी आहे, कोणाच्याहि!तिचें नांवच निघालें म्हणून तिचें वर्णन परक्या मनुष्यापुढेहि केल्याशिवाय माझ्यानें राहवत नाही. माझ्या प्रेमामुळे ती आजवर अविवाहित राहिली. माझ्या अभावीं माझी म्हणजे मुलग्याची जागा घेऊन तिनें माझ्या बाबांची वृद्धपणांत सर्व प्रकारची शुश्रूषा केली. पण ती प्रेमळ आहे तितकी स्वाभिमानीहि आहे. तिच्या संमतीनेंच मीं आपणाकडे समक्ष येऊन हजर होण्याचें ठरविलें. आणि मला खात्री आहे कीं, मला न्याय मिळण्याच्या कामीं माझ्या वडिलांपेक्षा माझी बहीणच अधिक तजवीज करील."

नव.—" असो. तुम्ही आतां जा. योग्य मार्गानें तुम्हांला फेरचौकशीकरितां जो काय अर्ज करावयाचा असेल तो करा. किंवा सरकारी हुकूम होईल तेव्हा त्याप्रमाणें हजर राहा."

इतकें बोलून राजेसाहेबांनीं प्रभाकराला निरोप दिला व तोहि लवून नमस्कार करून जिना उतरून निघून गेला.

प्रभाकर गेल्यावर लवकरच मनोहर वर आला. तो आज मोठ्या खुषींत होता. आंत येतांच तो एखादी शिकार मारून आल्याच्या ऐटीनें म्हणाला,

"तुम्ही परवां मला त्या रात्रीच्या प्रकरणांतली माहिती काढायला सांगितली होती ना! आणि त्या सुंदर तरुण स्त्रीची ? ती सर्व माहिती काढून आलों. उगीच नाही म्हटलें 'खासगी' कारभारी."

हें ऐकून महाराजांना हसूं आलें तें कांही केल्या थांबेना ! ते म्हणाले, "अरे जा! शेवटीं कारभारी तो कारभारी आणि राजा तो राजा.राजा म्हणजे देवाचा अंश. आणि देव हा सर्वज्ञच असतो. उगीच आपली तुझी परीक्षा पाहायला माहिती काढून ये म्हणून सांगितलें होतें झालें. तुझी शिळी माहिती ऐकण्याची आपली तर मुळीच इच्छा नाही."

मनोहर चकित झाला.माहिती शिळी कशी? आपला मित्र उगीच आपली थट्टा करतो आहे असें समजून तो त्या रात्रीच्या प्रसंगाची, भाऊसाहेब डबीरांच्या सर्व कुटुंबाची, प्रभाकराची व विमलची हकीकत सांगूं लागला. पण मनोहराने बोलावें त्याच्या पुढचें स्वतः नवलरायानेच नक्की सांगावें असें होऊं लागलें. शेवटीं मनोहर म्हणाला, "लवकरच हा प्रभाकर तुमच्या दृष्टीस पडेल." तेव्हा नवलरायाहि त्याचे पाठीवर थाप मारून हंसून म्हणाले, "बाबा मनोहरा, राजे लोकांचें सामर्थ्य तुला कुठें आहे माहीत? ते भविष्य-काळाचा भूतकाळहि करूं शकतात !" मनोहर आश्चर्य वाटून म्हणाला, "म्हणजे काय तें मीं नाही समजलों." महाराज म्हणाले, "अरे, ज्याच्या विषयी तो माझ्या दृष्टीला लवकरच पडेल असें तूं म्हणालास. तो गुन्हेगार आपल्या पायांनी नुकताच येऊन मला भेटूनहि गेला !"

मनो.—"आणि तो आता कोठे आहे ?" मनोहर आश्चर्याने म्हणाला.

नव.—"गेला परत आपल्या घरीं ?"

मनो.—"आणि तुम्ही त्याला तसाच मोकळा सोडून दिलात? तो शिक्षा झालेला गुन्हेगार आहे असें कळूनहि ?"

नव.—"कां बरें? जो इतक्या वर्षांनी आपण होऊन परत आला तो काय पुनः फरारी होईल? पळून जाईल ? तो बोलला तें सर्व सुसंगत संभावितपणाचें दिसलें. म्हणून त्याला मीं जाऊं दिला. विश्वासाने, आपल्या इच्छेने, आपल्या पायांनी मजकडे न्याय मागावयाला जो मनुष्य आला, त्याचा विश्वासघात करून मीं त्याला अटक करावी हें योग्य झालें असतें काय?"

**मनो.**—" अटकच काय? पण त्याला पकडून हातांत बेड्या ठोकून काढण्या लावून तुरुंगाच्या कोठडींत परस्पर पाठविला असतात तरी योग्य दिसलें असतें इतका त्याचा गुन्हा मोठा आहे, माझ्या दृष्टीने नव्हे, लोकांच्या दृष्टीने."

**नव.**—" हें पाहा, नुसतें गुन्ह्याचें स्वरूपच पाहावयाचें तर हातकड्या घातल्यावर लाथाबुक्या मारीत चाबकाने झोडपीत असें सुध्दा आणखी कां नाही म्हटलेंस ! जनरीतीप्रमाणे, म्हणजे सामान्य सरकारी रीतीप्रमाणे, तें शोभलेंहि असतें. पण त्याला जर पळूनच जावयाचें असेल तर तो स्वतः मजपर्यंत येऊन हकीकत सांगता तरी कां, याचा कांहीं विचार, भल्या गृहस्था !

**मनो.**—बरें पण, आता यापुढे तरी त्याला अटक करावी याला तुमची हरकत नाही ना ! "

**नव.**—"माझी हरकत असण्याचें कारण? खुशाल अटक करा. पण जामीन मिळाला तर जामिनावर सोडावयाला काय हरकत !"

**मनो.**—आहे, त्याला हरकत आहे. मला जी एक भविष्याची दृष्टि लाभली आहे ती तुम्हाला नाही. तेव्हा सर्व गोष्टी यासंबंधांत यापुढे माझ्याच धोरणाने चालूं देत. हा तरुण गुन्हेगार केवळ आपल्या बापाचा मुलगा असता तर त्याला तुम्ही जामिनावर सोडा असें मी म्हटलें असतें. पण तो आपल्या बहिणीचा भाऊ आहे म्हणूनच तो अटकेंत राहिला पाहिजे!"

**नव.**—"वाः, तूं तर अगदी उखाण्यांनीच बोलतो आहेस आज ! "

**मनो.**—" उखाण्यांनी मी बोलतों असें तुम्ही माझें वर्णन केलें त्याने माझ्या भविष्य दृष्टीचेंच समर्थन झालें. पुढे होणाऱ्या गोष्टींना आधी वाचा फुटत असते असें म्हणतात तें कांही अगदीच खोटें नसेल ! यजमानसाहेब ! उखाणे घेण्याचीहि वेळ पुढे येईल, कदाचित् याच प्रकरणांतून. पण अलीकडच्या प्रौढ वधू व घोडनवरे यांना उखाणे घेणें तेवढेसें आवडत नाही म्हणून थोडी पंचाईत."

**नव.**—"हें काय बडबडतो आहेस, मनोहर, तें तुझें तुलाच ठाऊक. भविष्य-

वाद्यांची भाषा बरळणें हीच असते असें म्हणतातच म्हणा ! पण आता मुद्दयाचें असें सांग कीं, या तरुण गुन्हेगाराला अटक केव्हा कशी करावयाची ?"

**मनो.**—"तो येथे होता तेव्हाच तुम्ही त्याला अटक केली असती तर उत्तम झालें असतें. पण आता बहुधा दिवाणसाहेबच या प्रकरणीं लक्ष घालूं लागतील, आणि पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट या नात्यानें त्यांनीच त्याला अटक करण्याचा हुकूम द्यावा हें बरें. दिवाणसाहेब तुमच्या भेटीला आले तर एक गोष्ट करा. ती ही कीं, प्रभाकर डबीर याला अटक करण्यासंबंधानें दिवाणसाहेब गोष्ट काढतील तेव्हा तो पूर्वीं येऊन तुम्हाला भेटल्याचें कांहींच त्यांना दर्शवूं नका. आणि जसें कांहीं सर्व प्रकरण दिवाणसाहेबच उपस्थित करीत आहेत, आणि तें त्यांचें त्यांनीच सर्व हवें तसें तडीला लावावें, असें बोलण्याचा झोक ठेवा. लक्षांत ठेवा कीं, या प्रकरणीं आता दिवाणसाहेबांचे गुप्त रिपोर्ट वर पो. एजंटसाहेबांकडे जाण्यास सुरवात होणार. त्यांत तुमच्या बदनामीलाहि सुरवात होणार आहे. भावी वधूवर लक्ष ठेवून न्यायाच्या कामांत तुम्ही गैरवाका ढवळाढवळ करतां अशी बतावणी व कांगावा वर होण्याचा रंग आहे. म्हणून सावध राहिलें पाहिजे."

**नव.**—"तर मग हीं सगळीं कारस्थानी तंत्रें तुझीं तूंच संभाळ कसा ! दिवाणसाहेब आले म्हणजे तूंच त्यांच्याशीं काय बोलावयाचें तें बोल. मी मधून मधून फक्त हुंकार देत जाईन. लहानपणीं तुझी माझी आई आपणाला गोष्टी सांगत होती तेव्हा देत असें तसा. मग तर झालें ना ?"

**मनो.**—"संस्थानिकाला शोभेल असेंच हें वर्तन दिसेल."

**नव.**—"आणि कायद्याचें ज्ञान नसणाऱ्या अज्ञान मनुष्याला असेंहि कां म्हणेनास ?"

**मनो.**—"तुमची निंदा करण्याकरितां म्हणावयाचें असेल तर तें वर्णन पुरें पडणार नाही. कारण अजून ज्या संस्थानिकाला पक्की मुखत्यारीहि मिळावयाची आहे, त्याला फौजदारी कायद्याचें सर्व ज्ञान कसें असणार ? पण हें राहूं दे."

---

### प्रकरण सोळावें

# माशाने माणिक गिळलें !

भाऊसाहेबांच्या घरचा दत्तविधानाच्या खेळाचा पट अशा आकस्मिक रीतीने पण बिनतोड उधळला गेला कीं, दिवाणसाहेब सत्ताधीश होते तरी त्यांना आपला अपमान पदरांत गुंडाळून घेऊनच निघून जावें लागलें. सुभेदार हे प्रसंगावधानी युक्तीबाज होते तरी, प्रभाकर प्रकट झाल्याने दत्तकाचा व्यूह कायमचा पुरा ढासळला या निराशेने त्यांची सगळी बुद्धि गारठून थिजून गेली. यामुळे तोंडांत मारल्यासारखें होऊन त्यांनाहि डबीरांच्या वाड्यांतून पाय काढावा लागला. कदाचित् जागच्या जागींच सूड उगवून कांही थैमान घालावयाचें मनांत येतें तर तें त्यांतल्या त्यांत दिवाणसाहेबांनाच शक्य होतें. कारण ते पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट होते. यामुळे त्यांना प्रभाकराला जागच्या जागीं अटक करतां आली असती. पण प्रभाकर तापट स्वभावाचा व जिवावर उदार झालेला पैलवान गडी ! तो आधी दिवाणसाहेबांना लाथा मारून त्यांची बत्तिशीहि रंगवावयाचा, व मग काय होईल तें पाहूं असें म्हणावयाचा ! पापकर्म करणारें मन आधीच आपोआप निमेअधिक निर्बल झालेलें असतें. त्यामुळे दिवाणसाहेबांचा राजकीय सत्तेचा अहंकार प्रभाकराच्या तेजापुढे फिकाच पडला. आणि गुन्हेगार म्हणून प्रभाकराला पकडण्याऐवजी, त्यांच्या मनानें स्वतः त्यांनाच गुन्हेगार ठरवून परक्याच्या घरांतून ओढून नेलें ! पानविड्याची तयारी करून बरोबर आलेल्या कारकून मंडळींचें मन दिवाणसाहेब किंवा सुभेदार यांच्यापेक्षा अधिक निष्काळजी होतें. ते बोलूनचालून तमासगीर ! यामुळे कोणी मनांतून दिवाणसाहेबांच्या फजितीची चेष्टा करीत, तर कोणी प्रभाकर प्रकट झाल्याचें आश्चर्य करीत, घरोघर निघून गेले.

सुभेदार स्वतःच्या घरीं परत न जातां दिवाणसाहेबांच्याबरोबर त्यांच्या घरीं गेले. दोघेहि माडीवर जाऊन पुढचा दरवाजा बंद करून आरामखुर्ची-

वर पाय घेऊन अर्धा तास बसले तरी कोणाच्याहि तोंडून शब्द निघेना. दोघांचेंहि लक्ष प्रभाकराकडेच लागलें होतें. पण प्रत्येकाचें निरनिराळ्या दृष्टीने. दिवाणसाहेबांच्या लक्षांत दत्तविधान फिस्कटल्याचा चमत्कार भरून राहण्याचें कांहीच कारण नव्हतें; पण त्यांचें लक्ष प्रभाकर प्रकट झाल्याने, त्याला पुनः पकडून तुरुंगांत कसा डांबावा या विचाराने मग्न झालें होतें. सुभेदारांना प्रभाकर हा राजाचा गुन्हेगार यापेक्षा आपला वैरी असाच अधिक भासत होता. शिवाय दत्तविधान फिस्कटलें तर फिस्कटो, पण तें घडवून आणण्याकरितां आपण मारवाड्याकडून प्रॉमिसरी लिहून देऊन, पांच हजार रुपये कर्ज काढून, दिवाणसाहेबांच्या पदरांत ओतलें त्याचें काय होणार हाच विचार सुभेदारांच्या मनांत गोंधळ घालीत होता !

शेवटीं दिवाणसाहेबांनीच प्रथम विचारांना पाट फोडला. स्वतःच्या फजीतीचें कांहीच नाही, व सांत्वन करावायला हवें असेल तर तें सुभेदारांचें, अशा ऐटीने ते म्हणाले,—"जाऊ द्या कीं सुभेदार ! अहो, विचार कसला करीत बसलां आहां ? धीर सोडूं नका. मी दिवाण आहे तोंपर्यंत तुमचें दत्तविधान केव्हाना केव्हा तरी घडून येईलच. आता आधी प्रभाकराचा समंध पुनः डोकावूं लागला, त्याला पक्का गाडून टाकण्याच्या मार्गाला लागतों. फक्त त्याची शिक्षा त्याला ऐकवावयाची. पंधरा दिवसांचे आंत प्रभाकर अंदमानाची वाट धरतो कीं नाही पाहा ! आता प्रथम यजमानसाहेबांकडे जाऊन सर्व हकीकत त्यांच्या कानावर घालतों; आणि पडल्या फळाची आज्ञा घेऊन आधीं प्रभाकराला तुरुंगांत पोंचवितों म्हणजे झालें."

पण या गोष्टीला सुभेदाराकडून चटदिशीं होकार येईना. दिवाणसाहेबांनी योजली ती गोष्ट व्हावी असेंच त्यांचेंहि मत होतें. पण ती गोष्ट होण्यापूर्वी दुसरी एक गोष्ट घडवून आणणें त्यांना अधिक अगत्याचें वाटत होतें. ती म्हणजे दिवाणसाहेबांच्या पदरांत ओतलेले पांच हजार रुपये त्यांजकडून परत घेणें. म्हणून ते म्हणाले:—"होईल कीं, सर्व कांही होईल. आपणासारखे सर्वसत्ताधीश करणार झाल्यावर नाही होणार असें काय आहे ? पण तूर्त तरी दत्तविधान थांबलें हें खरें. म्हणून पुनः तो योग घडून येईपर्यंत सर्वच बाजूंनी पूर्वीची स्थिति प्राप्त झाली आहे असें मानणें योग्य नाही काय ?"

दिवा.—“ म्हणजे याचा अर्थ मी नाही समजलों नीट, सुभेदार ! ”

सुभे.—“ अर्थ हा कीं, आपण दत्तविधानाकरिता आपल्या वाड्यांतून बाहेर पडण्यापूर्वी, मी मारवाड्याला प्रॉ. नोट देऊन पांच हजार रुपये आणून आपणाला दिले. ते त्याचे त्याला परत देऊन प्रॉ. नोट सोडवून आणली म्हणजे नाही का पहिली स्थिति होती तशी पुनः आली ? प्रभाकर तुरुंगांत पक्का जाईल, मग फिरून भाऊसाहेब शुद्धीवर नीट येतील, मग आपण त्यांना पूर्वीप्रमाणे पत्र लिहून दत्तक घेण्याविषयी त्यांचें मन वळवाल, आणि फिरून त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या बोलावण्या-वरून आपण दत्तविधानाकरिता घरांतून बाहेर पडूं, तेव्हा नवी स्थिति उत्पन्न होईल. आणि तेव्हा पूर्वीसारखे पांच हजार रुपये मारवाड्या-कडून आणून आपणाला देईनच. पण माझें म्हणणें इतकेंच कीं, झाला हा अध्याय निष्फळ म्हणून पुरा झाला असा शेरा मारूं या.”

दिवा.—“ छेः छेः, सुभेदारसाहेब, ही निराशा तुम्हाला शोभत नाही. तुमच्यासारख्या उमद्या धाडसी स्वभावाच्या माणसाने अशी कच खावी म्हणजे काय ! ”

सुभे.—“ दिवाणसाहेब, या कामीं आशा धरूनच मी उद्योगाला लागलों होतों. आणि आशा होती म्हणूनच प्रॉ. नोट लिहून देऊन पांच हजार रुपयांना मारवाड्याकडे माझी मान अडकविण्याचें धाडस केलें. आणि पुनः तसाच प्रसंग आला व तशी आशा दिसली, तर तसेंच धाडस करण्याला मागे घेणार नाही. पण आज दत्तविधान संशयित आणि रुपये मात्र गेले असें झालें नाही काय!”

दिवा.—“ दत्तविधान संशयित कां म्हणतां ? पुढे ढकललें गेलें इतकेंच म्हणा ! आणि रुपये गेले असें तरी कां म्हणतां ? त्यांनी आपलें कार्य केलें असेंच म्हणा. भाऊसाहेबांना मीं चांगलें खरमरीत पत्र लिहिलें म्हणून तर ते, प्रभाकर परत आला असतांहि, दत्तक घ्यावयाला तयार झाले. तुमचे रुपये पटण्यापूर्वी मीं तें पत्र त्यांना लिहिलें कीं नाही ? आधी रुपये मोजा मग पत्र लिहीन, असें म्हणून मला तुम्हाला अडवितां आलें असतें ! पण मीं तसें अडविलें का तुम्हाला सांगा बरें! मी तुमच्यावर तसा विश्वास टाकलाच कीं नाही! मग आता तुम्हीहि माझ्यावर तसा विश्वास कां टाकू नये! आता पूर्वीसारखें

पत्र पुनः लिहावें लागलें, पोलिटिकल एजंटाकडे पुनः पूर्वीसारखी कांही कारवाई करावी लागली, तर त्याकरिता पुनः निराळे पांच हजार रुपये तुमचेजवळ मी मागणार नाही असें वाटेल तर आश्वासन देतों ! पण त्या पहिल्या पांच हजार रुपयांचें काम झालें नाही, त्यांचा मोदबला तुम्हाला मिळाला नाही, असें तुम्हाला कसें म्हणतां येईल बरें ! "

सुभे.—" हें काय बरें असें बोलतां दिवाणसाहेब, न समजल्या-सारखें ? आपले उपकार मला केव्हाहि मान्यच आहेत. पण आजपासून रुपये परत देण्याचा मारवाड्याचा तगादा माझ्यामागे लागेल. दत्तविधान केल्यावर भाऊसाहेबांच्या घरांत मला वावरावयाला सांपडूं लागेल, आणि मग मी या नाही त्या रीतीने पांच हजार रुपये काढून घेईन, अशी जी आशा वाटत होती, ती आज निष्फळ ठरलीच कीं नाही ! माझी घरची गरिबी तुम्ही जाणतांच. ते पांच हजार रुपये फेडावयाला पांच हजार केसहि नाहीत या माझ्या टक्कल पडलेल्या डोक्यावर ! प्रॉ. नोटीला मुदत नसते. दत्तकाची कारवाई पुनः सजलीच तरी ती पुनः पायावर उभी राहावयाला किती तरी दिवस लागतील ! प्रभाकर तुरुंगांत परत गेला असें घेऊन चाललों तरी, प्रत्यक्ष दत्तविधानाला किती दिवस लागतील, कोणाला ठाऊक ? आणि त्याआधीच मारवाड्याने मला तगादा सुरू केला तर माझें कसें होईल ? बरें, आपण म्हणतां त्याप्रमाणे प्रभाकर पंधरा दिव-सांत परत तुरुंगांत गेला असें म्हटलें तरी, भाऊसाहेबांच्या जिवाची काय शाश्वती सांगावी ? प्रभाकर तुरुंगांत गेला तरी इतक्या वर्षांनी फिरून तो त्यांच्या नजरेला जिवंत पडला यामुळे त्यांची वृत्ति बदलली, आणि आता दत्तक घ्यावयाचाच नाही असें त्यांनी ठरविलें, तर काय करा ? आणि भाऊसाहेब जर मेले तर मग बोलावयासच नको ! त्यांची बायको सर्वस्वी त्यांच्या जहांबाज मुलीच्या हातांत. ती कसची दत्तक घेऊं देते ? तात्पर्य, राशिचक्र एका घराने बदललें म्हणजे मनुष्याच्या ग्रहांचीं सर्व स्थानें बदलतात, किंवा एखादें मोहरें अभावित पुढे आलें म्हणजे बुद्धिबळाच्या डावांत ज्याप्रमाणे नवी घटना होऊन जुने जोर व मारे ढिले पडतात, त्याप्रमाणे या दत्तकाचें आता होणार असें माझें मन मला सांगतें.

म्हणून कृपा करा, आणि ते पांच हजार रुपये अजून आपल्या पेटींतच आहेत तेवढे परत द्या. इतकीच माझी नम्र विनंति आहे आपल्या पायापाशीं."

दिवा.—"सुभेदार, तुमच्यासारख्या लोकांना आपला स्वार्थ तेवढा दिसतो. इतरांनी तुमच्याकरिता काय मेहनत केली हें दिसत नाही. तुम्ही मजकडे आणून दिलेल्या पांच हजार रुपयांना, ते आणून देण्यापूर्वीच किती तोंडें फुटलीं होतीं हें तुम्हाला काय माहीत! ते सर्व पैसे मीच प्रथम आपल्या पदरचे खर्चेले.वर पो.एजंटाचे कचेरींत मला दरबारखर्च किती कसा करावा लागला, हें तुम्हाला माहीत आहे काय? कोठून असणार! दरबारखर्चाची रीतच गुप्त असते. फार काय, मारवाड्यानें तुमच्याकरिता पांच हजार रुपये आणून दिले त्याचें कटमितीचें दोन वर्षांचें व्याज आणि कमिशन हीं मी त्याला माझ्या पदरचीं आधीं रोख दिलीं, तीं मला कोण परत देणार? आणि तुम्ही आपले पांच हजारच्या पांच हजार परत मागतां यांत तुम्ही थोडा तरी विचार केला काय? शिवाय माझ्या पदवीचा व माझ्या अधिकाराचा मनुष्य! काय अडलें हो माझें तुमचा मुलगा दत्तक न गेला तर? मित्रकार्याला तरी कांहीं मर्यादा आहेच कीं नाही? मी संस्थान–कचेरींतले कागद तुमच्याकरिता रंगविले,व शेवटीं भाऊसाहेबांना स्वदस्तुरचें पत्र लिहिलें, तें काय तुमचा नोकर म्हणून? आणि दत्तविधान पार पडलें असतें, आणि तुमच्या बाजीरावाचा अन् तुमचा हात भाऊसाहेबांच्या संपत्तींत कोपरापर्यंत घुसला असता —आणि अजूनहि न घुसेल कशावरून–तर मला काय तुम्ही देणार होतां त्यांतलें काढून? तात्पर्य काय कीं, रुपये परत मागण्याच्या भरीला तुम्ही पडूं नये हें चांगलें. फसलेलें दत्तविधान पुनः उभें करण्याला यापुढे जे श्रम आम्हा कुणाला पडतील ते सर्व आम्ही फुकट करूं. त्याकरिता दत्तक होईपर्यंत कांही मागणार नाही. बरें, राहूं द्या ती बाब! तुम्हा–आम्हाला मिळून आता प्रभाकराकडे पाहिलें पाहिजे. हा पाहा, मी चाललों यजमानसाहेबांकडे प्रभाकराला कैद करण्याची परवानगी मागावयाला. परवानगी कसली म्हणा! नुसतें आपले कानावर घालावयाचें म्हणजे सुनावणी करावयाची. बाकी यांतला खरा अधिकार माझ्याच हातीं आहे."

दिवाणसाहेबांनी पांच हजारांच्या बाबतींत हायकोर्टाचा निवाडा दिल्या

सारखाच निकाल सांगून टाकला. तथापि पुनः एकदा प्रयत्न करून पाहावा म्हणून सुभेदार म्हणाले—

**सुभे.**—"असें कसें बरें म्हणतां दिवाणसाहेब ! मूळची बोली अशी होती कीं, दत्तविधान पुरें पार पाडून त्याचा दाखला दरबारीं कागदपत्रांत नोंदला गेला म्हणजे मग रक्कम आपल्याला द्यावयाची. पण आपण नाखूष दिसलां, आपला हातपाय हालेना, तेव्हा मी आगाऊच रक्कम रोख मोजली. ही माझी चूकच झाली म्हणावयाची ! मी गरीब म्हणून माझ्यावर आपण अविश्वास दाखवावा, आणि एवढी रक्कम स्वाधीन करून मीं आपणावर विश्वास टाकला त्याचा आपण असा घात करावा, हें योग्य आहे काय ! "

सुभेदारांनी उकरून काढलेला प्रश्न दिवाणसाहेबांना मोठा गैरसोयीचा वाटत होता. तोंडाने जरी ते "पंधरा दिवसांत दत्तविधानाचा योग पुनः जुळवून आणतों " असें धिटाईने सांगत होते, तरी बदललेल्या परिस्थितींत तें खरोखर कसें अशक्यप्राय आहे हें त्यांचें त्यांना मनांतून कळतच होतें. तेव्हा अंगाला येऊन चिकटणारी ही अडचण कशी तरी झाडून टाकलीच पाहिजे असा निश्चय त्यांनी केला. आणि जालीम हत्यार कोणावर उपसावयाचें तर त्याला आधीं तितक्या बेताच्या रागाचा आव आणला पाहिजे, म्हणून दिवाणसाहेब उसळले, आराम-खुर्चीवरून उठून उभे राहिले, व दिवाणखान्यांत फेऱ्याहि घालूं लागले. आणि सुभेदारांच्या अंगावर जाऊन म्हणाले "तर तर, मीं तुमचा विश्वासघात केला नव्हे का ? अहो, तुमच्यासारख्यांची रीत आम्हाला पुरी माहिती असते, म्हणून अशी ही सावधगिरी ठेवावीच लागते. दत्तविधान होऊन भाऊसाहेबांचा विश्वास संपादून त्यांच्या किल्ल्या स्वाधीन करून घेऊन त्यांच्या पैशाच्या कुरणांत तुम्ही चरूं लागला असतां, म्हणजे मग शिताफीने कशी पाठ फिरवून मला गुंगारा दिला असतात ! मला हें पुरें माहीत होतें म्हणूनच आधी रक्कम वसूल केली. काम नाजूक आणि गुप्त. मी किंवा एजंटसाहेबांचे शिरस्तेदार यांना थोडीच फिर्याद करतां येत होती तुमच्यावर ठरलेल्या पैशा-बद्दल ! वकिलानेहि वकीलपत्राच्या बक्षिसाचा दावा लावणें गैर दिसतें; मग

आम्ही तर बोलूनचालून अधिकारी. बरें, रक्कम दिलीत ती तरी मारवाड्याचीच कीं नाहीं? घरची काढून थोडीच दिलीत! आणि घरची काढून द्यावयाला घरावर कौलें तरी आहेत का तुमच्या, पांच हजार? मारवाडी रक्कम परत मागावयाला लागला तर तुमच्या काखा आहेतच वर! तो काय घेणार घेऊन तुमचें? दिवाणी तुरुंगांत बसविलें तर तुमच्या पोटगीची रक्कम त्यालाच आधी कोर्टांत भरावी लागणार! नाही तर लाहा घ्याल झालें! त्यालाहि तुमची तयारी आहेच! आजवर तुमच्यापायीं थोडे का लोक बुडाले? दत्तविधानाने मिळणारें मोठें घबाड दिसत होतें तुमच्या डोळ्यापुढे, म्हणून घालीत होतां माझ्या दारीं हेलपाटे. एरवीं तुमच्यासारख्याला माझ्या घरीं तरी येण्याचें काय कारण? तात्पर्य, थोडक्यांत सगळें सांगितलें तुम्हाला. तुमची रक्कम परत मिळणार नाही. तुमचा मार्ग तुम्हाला मोकळा आहे."

दिवाणसाहेबांनी केलेली ही निर्भर्त्सना ऐकून सुभेदारांना फार वाईट वाटलें. पण करतो काय बिचारा? तेव्हा दांत–ओठ चावून अखेरचें अस्त्र म्हणून ते म्हणाले, "दिवाणसाहेब, आपण येथवर मजल न्याल असें वाटलें नव्हतें. असो. आपली मर्जी. पण याचा परिणाम नीट होणार नाही इतकेंच मी सांगतों."

असली धमकी म्हणजे युद्धाचें तें आव्हानच! सुभेदारांना तोडून काढावयाला दिवाणसाहेबांना तें आयतेंच उपयोगीं पडलें. त्याचें निमित्त करून दिवाणसाहेब कडाडून म्हणाले, "बरं! बरं पाहून घेऊं! काय परिणाम-बिरिणाम व्हावयाचे ते. माझ्यासारख्याला धमकी द्यावयाला तुम्हाला लाज कशी वाटत नाही? चला निघा पाहूं माझ्या घरांतून आधी! नाही तर मला पहारेवाल्यालाच बोलवावें लागेल, तुम्हाला धक्के मारून घालून द्यावयाला!"

बिचारे सुभेदार काय करतात? त्यांनी आपल्या उपरण्याची चुंबळ सोडली, तें झटकून खांद्यावर टाकलें. कोपऱ्यांत ठेवलेली काठी उचलून घेतली आणि खाली पाहत तडक जिन्याचा रस्ता गांठला!

* * *

सुभेदार गेल्याबरोबर दिवाणसाहेबांनी पोषाक केला व ते महाराज नवलराय यांच्या भेटीला गेले. दिवाणसाहेब वर येतांच महाराजांनीच पहिला नमस्कार केला. उलट दिवाणसाहेबांनी कोपरापासून तर नमस्कार केलाच पण कंबरेपासून सगळें शरीर वांकविलें !

यजमानसाहेबांनी शेजारच्या खुर्चीकडे हात दाखवून बसा, असें म्हटल्यावर सर्वजण आपापल्या खुर्चीवर बसले. दिवाणसाहेब यजमानसाहेबांपासून चार हात लांब होते तरी दरबारी संवयीप्रमाण ते उपरण्याचा पदर तोंडाजवळ नेऊन हळूच अदबीने म्हणाले, "आज एक चमत्कारिक गोष्टी घडली आहे राजधानींत. ती महाराजांच्या कानावर घालून हुकूम घेण्याकरिता मुद्दाम येऊन महाराजांना तसदी दिली या वेळीं."

महाराज म्हणाले, "मग त्यांत तसदी कसली ? जरूरीचेंच कांही काम असेल म्हणूनच आला असाल विचारा—सांगावयाला. मनोहरपंत, नीट ऐकून समजून ध्या दिवाणसाहेब काय म्हणतात तें."

इतकें बोलून महाराजांनी दिवाणसाहेब आणि प्रायव्हेट सेक्रेटरीसाहेब यांचीं तोंडें जोडून देऊन, दिवाणसाहेब पुढे काय बोलणार याची कल्पना नसल्यासारखें मोठ्या उत्सुकतेचा आव आणून ते ऐकत बसले.

दिवाणसाहेब म्हणाले, "कैक वर्षांपूर्वी गुन्हा करून फरारी झालेला एक भयंकर गुन्हेगार आज नवलपुरांत प्रकट झाला आहे. त्याच्या गैरहजेरींत त्याचा इनसाफ होऊन त्याला शिक्षाहि फर्मावली गेली. पण तो पळून गेल्यामुळे त्याला तुरुंगांत पाठवितां आलें नाही."

मनो.—"मग आता त्याचें काय करण्याचें योजिलें आहे ?"

दिवा.—"तावडतोब त्याला पकडावयाचें आणि तुरुंगांत पाठवावयाचें. त्याला महाराजांची परवानगी—"

मनो.—"छेः छेः त्याला महाराजांच्या परवानगीचें काय कारण ? आपण पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट आहांच. द्या तावडतोब हुकूम कोतवालाला गुन्हेगाराला पकडावयाचा. आणि गुन्हेगार जरासा भयंकर स्वरूपाचा दिसतो नाही ? तेव्हा त्याला हातकड्या घातल्यात तरी हरकत नाही. आणि त्याला कुठे कैदेंत ठेवणार ?"

दिवा.—"पोलीस हेडक्वार्टराच्या कच्च्या कैद्यांच्या कोठडींत."

मनो.—"छेः छेः, तेवढें मात्र करूं नका. तुम्हाला माहीतच आहे कीं, त्याचे साथीदार त्याच्यासारखेच मवाली गुंड या शहरांत आहेत. तेव्हा ते रात्रीचा हल्ला करून त्याला एखादे वेळीं सोडवूनहि न्यावयाचे."

दिवा.—"मग त्याला कोठे ठेवावा?"

मनो.—"आपण बसलों आहोंत येथून समोरच सरकारी पागेजवळ जी चिरेबंद बंदिस्त खोली आहे, तींत त्याला ठेवा. कारण पोलीस हेडक्वार्टरपेक्षांहि इथे बंदोबस्ताला जवान अधिक आहेत. जवळच सरकारवाड्याच्या पहाऱ्याचे लोक आहेत. वेळ पडली तर दौडत पाठवायला स्वार हाताशीं आहेत. आणि राजवाड्याच्या नगारखान्याखाली बंदुकांचा गंज आहे."

प्रभाकराला ठेवण्याला ही जागा दिवाणसाहेबांना पसंत नव्हती. कारण तो तुरुंगांत असतां त्याचा छळ करण्याचें मनांत आलें तर पोलीस–कचेरीची जागा अधिक सोयीची होती. जवळ आसपास लोकवस्ती नाही. आणि आरडाओरड झाली तरी ती लोकांना ऐकूं जायची नाही. रात्रीं अपरात्रींसुद्धा खुशाल दिवाणसाहेबांच्या हस्तकांना प्रवेश मिळण्यासारखी ती जागा होती. पण मनोहराने उलट दाखविलेले फायदेहि दिवाणसाहेबांना उघड नाकबूल करवेनात. तेव्हा मनांतून नाखूष असतांहि त्यांना राजवाड्याजवळच्या जागेलाच होकार द्यावा लागला. "कैद्याला छळायला अधिक सोयीची जागा" यापेक्षा "संरक्षणाला सरकारला अधिक सोयीची जागा" या मुद्द्याला अधिक महत्त्व सहजच प्राप्त झालें.

मनो.—"बरें, गुन्हेगाराला अटकेंत ठेवल्यावर मग काय करायचें योजिलें आहे, दिवाणसाहेब?"

दिवा.—"पुढचें काम अगदीच सोपें आहे. न्यायकोर्टाने त्याला दिलेली शिक्षा वाचून दाखवावयाची आणि तुरुंग वॉरंट देऊन बंदोबस्ताने त्याला खालसांतल्या मॅजिस्ट्रेटाकडे रवाना करावयाचा. म्हणजे चालला मुंबईला आणि तिथून अंदमानाला!"

मनो.—"आहे, मार्ग सरळ दिसतो. त्याचें पाहूं मागाहून. कायदा असेल

तसें होईलच. तूर्त त्याला पकडून ठरल्या जागीं तुरुंगांतील कच्च्या कैद्यासारखा ठेवा म्हणजे झालें."

"पण भयंकर गुन्हेगारानें गुन्हा कोणता केला होता याची कांहीं माहिती कळेल का ?" असें महाराजांनी अगदीं सहज विचारल्यासारखा प्रश्न मध्येच टाकला.

पण त्यानें दिवाणसाहेब थोडे चकमकल्यासारखे झाले. गुन्हेगार भयंकर म्हणून म्हटलें तर त्याच्या गुन्ह्याचें वर्णन भय वाटण्यासारखें असें थोडें तरी करतां आलें पाहिजे. पण राजद्रोहाहून अधिक भयंकर असें काय असणार ? या समजुतीनें दिवाणसाहेब अगदी खोल गंभीर आवाज काढून म्हणाले, "प्रत्यक्ष राजद्रोह आणि खुनाचा कट ! जाहिरनाम्यांत क्रांतिकारक मतांचा-च पुरस्कार होता."

नव.—"आणि खून करण्याचा प्रयत्न कुणासंबंधानें ?"

दिवा.—"खून माझा आणि माझ्या पाठीमागें सत्ताधारी असलेल्या पोलिटिकल एजंट साहेबांचा."

नव.—"जाहिरनाम्यांत तुमचा खून कां करावा याचीं कांहीं कारणें सांगितलीं होतीं का दिवाणसाहेब ?"

दिवा.—"माझ्यावर पुष्कळसे खोटे आरोप केले होते त्या जाहिर-नाम्यांत."

नव.—"पण ते आरोप खरे असल्याचा पुरावा काय दिलान गुन्हेगारानें ?"

दिवा.—"पुरावा कसचा देतो ! खटला भरून आम्ही त्याला पकडायला वारंट पाठविलें तेव्हां शिपाई दिसतांच मागच्या दारानें पळून जाऊन फरारी होऊन बसला."

नव.—"मिळून काय ? त्यानें तुमच्यावर केलेल्या आरोपांची चवकशी झाली नाहीं, आणि तुम्ही त्याच्यावर केलेल्या आरोपांची चवकशी झाली नाहीं !"

दिवा.—"त्याच्यावरच्या आरोपांची चवकशी झाली होती. त्याच्या साथीदार गुन्हेगाराची कबुली जबाबवजा साक्ष होऊन, कोर्टानें खुनाच्या कटाचा गुन्हा शाबीत धरला आणि दोघांनाहि शिक्षा दिली."

नव.—" बरें, तो साथीदार गुन्हेगार अजून तुरुंगांत असेलच, आपल्या किंवा ब्रिटिश सरकारच्या ?"

दिवा.—" नाही. कांहीं दिवस कैद भोगल्यावर साथीदाराने माफी मागितली, त्यावरून त्याला सोडून देण्यांत आला."

नव.—" मिळून तुमच्या या गुन्हेगाराचा फरारीपणा हीच एक मुळांत गोष्ट खरी ! आणि पक्की चौकशी अशी कशाचीच झाली नाही ! तें कांही असो. दिवाणसाहेब गुन्हेगाराला अटक करण्याची परवानगी मागायला आले आहेत ती त्यांना मागण्याचें कारणच नाही. कां कीं, ते सर्व अधिकार त्यांना आहेतच. तथापि मीहि सांगतों कीं, त्यांनी गुन्हेगाराला ताबडतोब अटक करावी, आणि मनोहरपंत, तुम्ही सुचविल्याप्रमाणें या वाड्यासमोरच्या कोठींत आणून बंदींत ठेवावा. दिवाण साहेब, जा लवकर वारंट लिहून ताबडतोब पाठवा, आणि फौजदारांना दवडा."

दिवा.—" गुन्हेगार या गांवचाच रहिवासी आणि तैनातदार भाऊसाहेब डबीर यांचा मुलगा आहे हें महाराजांना "—दिवाणसाहेबांना ही माहिती आपण होऊन कां द्यावीशी वाटली ठाऊक नाही. पण ती गोष्ट काढतांच महाराज घाईने म्हणाले—" दिवाणसाहेब कशाला सांगतां ही माहिती आताच? गुन्हेगार तो गुन्हेगार. मग तो कोणीहि कोणाचाहि असो. आपण आता वेळ गमावू नका. त्याला फिरून पळून जाण्याची बुद्धि झाली तर! न्यायाच्या कामांत दिरंगाई नको." असें म्हणून महाराज स्वतःच उठले. त्याबरोबर मनोहर व दिवाणसाहेब हेहि उठले.

दिवाणसाहेबांना थोडा अधिक पाल्हाळ करून तो भयंकर गुन्हेगार आणि त्याच्या गुन्ह्याचा भयंकरपणा या दोहोंचें वर्णन करावें अशी मनांतून इच्छा होती. पण महाराजांनी निरोपच दिला तेव्हा ते नमस्कार करून निघाले. आणि बाहेर पडतांच त्यांनी फौजदारांना घरीं येऊन भेटण्याबद्दल निरोप पाठविला.

———

## प्रकरण सतरावें

# भावाच्या सुटकेचा उद्योग

रात्रीं सुमारें नऊ वाजतां शहरचा कोतवाल बरोबर पांच पोलीस जवानांची तुकडी घेऊन भाऊसाहेबांच्या घरीं आला. आणि त्याने जरा चढ्या आवाजाने 'प्रभाकरपंत डबीर आहेत का घरांत!' असा जाहीर सवाल केला. महाराज नवलराय याना भेटून प्रभाकर घरीं आला व तेथे झालेलें त्यांचें बोलणें त्याने आपल्या वहिणीला सांगितलें. तेव्हा लवकरच दिवाणसाहेबांकडून पकडवारंट येणार असा अंदाज त्यानी ठरविलाच होता. यामुळे फौजदारसाहेबांच्या सवालाला जबाब मिळण्याला उशीर लागला नाही. प्रभाकर माजघरांतून बाहेर ओटीवर आला तो हातांत आपलें करज्यांचें गांठोडें घेऊनच आला, आणि म्हणाला "हा मी प्रभाकर डबीर येथे हजर आहें. तुमचा काय हुकूम असेल तो लेखी दाखवा." फौजदारांनी वारंट दाखविलें आणि शिपायांना प्रभाकराला पकडण्याविषयीं खूण केली. त्यानी पुढे होऊन प्रभाकराचा हात धरला आणि बरोबर आणलेल्या हातकड्या पुढे केल्या. त्याबरोबर प्रभाकर ओरडून म्हणाला, "काय हो फौजदार साहेब, मी काय चोर दरोडेखोर आहें म्हणून हातकड्या घालतां? मी पूर्वी फरारी झालों, तो तुमच्या देवालाहि सापडलें नाही, व पुढेहि सांपडलों नसतों. पण न्याय मिळविण्याकरिता मीं आपण होऊन हजर झालों तो काय पुन्हा फरारी होण्याकरिता?" त्यावर फौजदार जरा गुर्मीतच म्हणाले, "खबरदार! जास्त बोलण्याचें कारण नाही. आमचा हुकूम आम्हाला बजावलाच पाहिजे. तुम्हाला काय तक्रार वगैरे करावयाची असेल तर ती वर दिवाणसाहेबांकडे खुशाल करा. तूर्त आम्ही सांगूं तसें तुम्हांला वागायला पाहिजे."

"पण हातकड्या घालाव्या असें वारंटांत लिहिलेलें नाही!"

"पण आम्हांला दिवाणसाहेबांचा तसा तोंडीं हुकूम आहे. तो आम्ही बजावणारच."

इतक्यांत विमल बाहेर आली होती, ती पुढे होऊन म्हणाली, "दादा, उगीच कशाला यांच्या तोंडाला लागतोस? ते पांच जवान सशस्त्र. तूं एकटा एक निःशस्त्र. असें असतां त्या इतक्याना तूं एकटा भारी आहेस असें वाटत असेल, म्हणून ठेवीत असतील ते अशी सावधगिरी! त्याना त्यांचा हुकूम कळतो. तसा मलाहि थोडाबहुत कायदा कळतो. लवकरच होईल त्याची शहानिशा. तूं कांहीं न बोलतां त्यांच्या स्वाधीन हो कसा! उगीच बाबांच्या कानावर यांतले कांहीं शब्द गेले तर आणखी जोराचा झटका त्याना यावयाचा!"

विमल बोलली त्याचा परिणाम होऊन पुढें पोलीसहि कांहीं बोलले नाहींत; व प्रभाकरहि शांत होऊन आपल्याशीं हसत व पोलिसाना तुच्छपणें लेखून हात पुढें करून गप्प राहिला. विमलचें वजन नवलपुरांत किती होतें हें फौजदारसाहेबांना माहीत असल्याने तिच्या भाषणावर त्यानी कांहींच प्रत्युत्तर केलें नाहीं. हातकड्या घालून होतात, तोंच माईसाहेब माजघरांतून ओटीवर आल्या. त्यांच्याकडे पाहून कड्या घातलेले हात वर उचलून प्रभाकराने नमस्कार केला, आणि तो म्हणाला, "माई, तूं कांहीं एक काळजी करूं नकोस. थोडेच दिवसांत मी सुटून परत येईन तुझ्या भेटीला. मी सोक्षमोक्ष करून घेण्याकरिताच आलों हें तुला माहीत आहे ना? तो लवकरच होईल. कारण माझी साडेसाती संपली, आणि ती दिवाण-साहेबांच्या मागें लागली असें समज." असें बोलून तो आपण होऊन दर-वाज्याकडे निघाला. तेव्हा पोलीस शिपाई व फौजदारहि त्याच्याबरोबर निघाले.

प्रभाकराने कितीहि धैर्याने व आश्वासनपूर्वक आईला धीर दिला तरी हातकड्या घातलेल्या हातानीं मुलाने नमस्कार केलेला पाहून तिला गहिं-वर आवरेना. ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. पण विमलने तिचा हात धरून तिला घरांत नेलें व म्हणाली, "माई, तूं अगदीं काळजी करूं नको. दादा खास सुटून लवकर परत येणार! तो येईपर्यंत कोणीकडून तरी बाबांच्या प्रकृतीला आपणाला जपलें पाहिजे. तें काम तुलाच आता अधिक अंगावर घेऊन केलें पाहिजे. कारण यापुढे दादाच्या बचावाची तजवीज करायला मला लागलें पाहिजे."

* * *

रात्रीं सुमारें दहा वाजता सरकारवाड्यांतला एक शिपाई एक मोहोरबंद पत्र घेऊन भाऊसाहेबांच्या वाड्यांत आला व तें त्यानें विमलच्या स्वाधीन केलें. पत्रांत खालीलप्रमाणे मजकूर होता.

"श्री. विमलाबाई डबीर यांस—सा. न. वि. वि. आपल्या बंधूंना कांहीं वेळापूर्वी दिवाणसाहेबांच्या वारंटावरून अटक करण्यांत आली आहे. त्यांची चौकशी इनसाफ काय व्हावयाचा तो पुढे सरकारी रीतीप्रमाणें होईलच. पण तूर्त आपल्या बंधूंविषयीं आपणास इतर रीतीनें तरी काळजी वाटूं नये, म्हणून मी खासगी रीतीनें आपणास इतकेंच कळवितों कीं, त्यांना सरकारवाड्यासमोरच्याच खास पागेनजीक एका चांगल्या कोठींत बंदोबस्तानें ठेवण्यांत आलें आहे. त्यांस आपणाला भेटावयाचें असल्यास माझे परवानगीनें उद्यां सकाळीं नऊ वाजतां भेटतां येईल. तूर्त बंधूकरिता आपणास कांहीं कपडे वगैरे देण्याचे असल्यास या शिपायाजवळ द्यावे म्हणजे ते त्यास पोचते होतील. त्यांचेकरिता लांकडी चारपाई (पलंग) व बिछाना यांची व्यवस्था इकडेच करण्यांत आली आहे. ती करण्याचें आपणास कारण नाहीं. इतर जिन्नस काय लागतील तें त्यांस आपण उद्यां सकाळच्या भेटींत समक्ष विचारावें. कळावें."

मनोहर कृष्ण उकिडवे,
[ नि.॥ श्रीमंत सरकार नवलराय, संस्थानाधिपति,
संस्थान नवलपूर. ]

ता. क.—हें पत्र मीं आपणास खाजगी नात्यानेंच लिहिलें आहे असें समजावें व तें कोणास कळूं नये. सहीखाली मीं माझा हुद्दा लिहिला तो केवळ, आपणास मी माहीत नसल्यानें, मी कोण हें कळविण्याकरिताच लिहिला आहे. तथापि आपणाला आणखी कांहीं माहिती वगैरे लागल्यास ती मला विचारावी. कळविण्यासारखी असेल ती कळवीन.

म. कृ. उ.

या पत्रानें विमलला फारच बरें वाटलें. कारण वेळ रात्रीची. फौजदार प्रभाकराला कोठें नेऊन ठेवणार वगैरेची कांहीं माहिती नाहीं; व अशा अवेळीं सरकारी रीत्या कोणास विचारण्याची सोय नाहीं. पण या पत्रानें

ती सर्व काळजी परस्पर दूर झाली. इतकेंच नव्हे तर पुढील खटपटीचाहि मार्ग सहजासहजीं कळला. लगेच विमलने तें पत्र आंत नेऊन आईला वाचून दाखविलें. एक रजई व फिल्टरचें पाणी भरलेला एक तांब्या तिने पत्र आणणाऱ्या शिपायाजवळ दिला, आणि मनोहरपंत दुसरे दिवशीं सकाळीं कोठे केव्हा भेटतील याची माहिती विचारून घेऊन तिने शिपायाची रवानगी केली.

सकाळीं आठ वाजता स्नान वगैरे करून घरचा तांगा जोडून एक छत्री व पत्रव्यवहाराची कातडी पिशवी घेऊन विमल मनोहरपंताच्या घरीं गेली व त्याला भेटली. तेव्हा त्यांचें खालीलप्रमाणे संभाषण झालें.

**विम.**—" आपण काल रात्रीं आपण होऊन चिट्टी पाठविली व माझे भावाविषयीं जरूर ती माहिती दिली, यामुळे आमची केवढी काळजी दूर झाली याची कल्पना आपणाला नसेल. म्हणून मीं त्याबद्दल प्रथम आपले आभार मानतें."

**मनो.**—"कल्पना नसेल असें कां म्हणतां ? ती कल्पना मला करतां न आली तर मला मनुष्यस्वभावाचें सामान्यहि ज्ञान नाही असेंच ठरणार नाही काय ! असो. मी चिठी पाठविली याबद्दल आभार मानण्याचें कांहीच कारण नाही. तूर्त माझें कर्तव्य मीं केलें. न्यायमनसुफी काय असेल ती रीतीप्रमाणें होईलच. त्यांत माझा कांहीच संबंध येऊं शकत नाही. त्याची माहिती किंवा अंदाज मजपेक्षां आपणालाच अधिक असणार. आपण हायकोर्ट वकीलीची परीक्षा पास झालां आहां असें मीं ऐकलें तें खरें काय ?"

विमल हंसून म्हणाली "होय, तें खरें आहे. पण मीं सनद काढली नाही, व अजून कोर्टाचें एकहि काम कधीं चालविलें नाही. मग माझ्या भावाच्याच खटल्यांत माझें पहिलेंच वकील-पत्र दाखल व्हावें असा ईश्वरी योग असेल तर तसेंहि होईल."

**मनो.**—" आपण सनद काढली नाही तर ती एखाददुसऱ्या दिवसांत कशी मिळणार? शिवाय इतर कोणी वकील आपणाला मिळतीलच. येवढ्याकरिता सनद काढण्याचें तरी काय कारण?"

**विम**—" कारण हेंच कीं, नवलपूर संस्थानचा एकहि वकील माझ्या भावाचें वकील-पत्र घेईल असें मला वाटत नाही. या खटल्याला राजद्रोहाचें

स्वरूप, आणि प्रतिपक्षी या नात्याचा प्रत्यक्ष दिवाण साहेबांचा संबंध! संस्थानचे वकील म्हणजे दिवाणसाहेबांच्या ताटाखालचीं मांजरें. ताटाबाहेर पडेल तें शीत खाऊन, आशाळभूतपणानें दुसऱ्या शिताकरिता जेवणाराच्या तोंडाकडे पाहायचीं. आतां मी सनद काढावयाची तर वास्तविक ती मला आजच्या आजहि मिळाली पाहिजे. कारण प्लॅटफॉर्म तिकिटाच्या यंत्राच्या तोंडांत आणेली टाकली कीं तिकीट तयार. तसें मी पांचशें रुपये भरले कीं दिवाणसाहेबांनी मला बसल्या बैठकीला तांबडा चांद लावून सहीशिक्का करून सनदेचा कागद माझ्या स्वाधीन करायला पाहिजे. पण प्रत्यक्ष काय होतें तें पाहावयाचेंच आहे. या खटल्याच्या कामांत दिवाणसाहेबांच्या सरळ स्वभावाची परीक्षाच आहे."

हें ऐकून मनोहरपंताच्या मनांत कसला तरी एक विचार येऊन त्यानें न कळत आपले दोन्ही ओंठ आंत घेऊन दाबले व म्हणाला, " पण दिवाणसाहेबांनी बेकायदा वर्तन केलें तर खुद्द यजमानसाहेब आहेतच कीं वर अपिलाला ! "

विमल किंचित् हंसून म्हणाली—" होय. पण वर सरकार पक्की मुखत्यारी द्यायला तयार असतां यांनी मुद्दाम कच्ची मागून घेतली. तेव्हा यांच्या अधिकाराची मर्यादा तरी किती आहे हें लोकांना नक्की काय कळणार ! "

तिला यापेक्षा थोडी अधिक टीका करतां आली असती. पण हा प्रसंग नव्हे असें जाणून तिनेंहि मुद्दाम जीभ आवरली. आणि संभाषण संपविण्याकरिता पुनः एक वेळ आभार मानून उभी राहून नमस्कार करून जाऊं लागली. तेव्हा मनोहर म्हणाला, "आपण माझे आभार मानण्याचें खरोखरच कारण नाही. मीं फक्त आपलें कर्तव्य केलें व पुढेंहि करणार आहें. तें असें कीं, मीं डॉक्टर म्हणून संस्थानांतील कच्च्या पक्क्या सर्व तुरुंगांच्या जेलरचा वैद्यकीय अधिकार यजमानसाहेबांनी मला दिला आहे. मात्र कालच्या पत्रांत मी तो आपणाला कळविला नाही. कारण तो अधिकार या नात्याची जाणीव मनांत ठेवली असतां मला आपण होऊन तुम्हांला

तसें पत्र लिहितां आलें नसतें. पण राजाचा मित्र म्हटला म्हणजे त्याला सर्व सरकारी काम करूनच्या करून पुन्हा खासगीच्या खासगी म्हणतां येतें."

तेव्हा विमल उघडपणें हंसून म्हणाली, "तरी काय झालें ! माझे आभारहि खासगी समजा म्हणजे झालें. शिवाय मग आपणाला आणखी विनंति करावीशी वाटते ती अशी कीं, या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत आपण तुरुंगाचे डाक्तर या नात्यानेंहि माझ्याशीं वागा. म्हणजे मी नागरिक स्त्री किंवा वकील कोणत्याहि नात्यानें आपणाला मला माझ्या भावाविषयीं हक्कानें व उघड सल्लामसलत विचारतां येईल. तथापि केवळ न्यायाच्या बुद्धीनेच आपणाला काय मदत देतां येईल ती द्यावी."

"ठीक आहे." असें म्हणून मनोहर विमलबरोबरच पायऱ्या उतरून दरवाज्यापर्यंत तिला पोचवावयाला गेला. ती बाहेर पडतांना तिला नमस्कार करून तो परतला. पण परत फिरतांना त्यानें खिशांतून एक पाकीट काढून तिला दिलें; त्यांत प्रभाकराला भेटण्याची परवानगी कोठीच्या दारावर दाखविण्याची होती.

"अग बाई, होय कीं," विमल खजिल होऊन म्हणाली, "मी आपणाशीं बोलण्यांत मुद्द्याचीच गोष्ट विसरूनच गेले ! मग आतां पहा बरें! आपण घेतां या काळजीबद्दल आपले मी आभार मानणेंच योग्य आहे कीं नाही !" इतकें बोलून ती टांग्यांत बसली व "थेट सरकारी खास पागेकडे चल" असें तिनें टांगेवाल्याला सांगितलें.

विमलला कोठींत जातांच प्रभाकराला भेटण्याची परवानगी मिळाली. इतकेंच नव्हे तर, आपण नऊ वाजता येणार अशा आगाऊ झालेल्या एखाद्या सूचनेवरून, पहारेकरी आपली वाटच पाहात बसला होता कीं काय असाहि तिला भास झाला. आंत गेली तों प्रभाकर तोंड धुवून स्वस्थ मांडी घालून बसला होता. त्याला काय हवें काय नको तें तिनें विचारून घेतलें. आणि म्हणाली, "दादा, मी आता तुझ्या बचावाच्या कामाला लागणार तेव्हा तुला काय सूचना वगैरे करावयाच्या असल्या तर कर !"

पण प्रभाकर सूचना काय करणार ? खरें बोलावयाचें म्हणजे तो कायद्याच्या व दरबारच्या व्यवहारांत नुसता ठोंब्या होता. त्याच्या मनाची जात

विमलच्या मनासारखोच शुद्ध व उमदी. पण त्याची निमी अधिक बुद्धि काढून घेऊन देवानें ती त्याच्या पाठच्या बहिणीच्या बुद्धीच्या भरीलाच जणूं घातली होती. म्हणून तो तिला म्हणाला " ताई, सरकारी काम कशाशीं खातात हें मला माहीत नाही. तूं आहेस म्हणे बारिस्टर. मग मला काय विचारतीस ? वकीलपत्र पुढे आण एक सोडून चार सह्या देतों. दिवाणसाहेब समोर आले तर एक सोडून चार वेळा त्यांच्या थोतुखांत भडकावतों व त्यांना लबाड म्हणतों. जबाबाला उभा कर कोणाच्याहि पुढें, तेथे कोणाच्या बापाला न भितां खरें तेंच एक सोडून चार वेळ सांगतों. आणि याहि उपर अन्यायानें मी शिक्षा भोगावी असेंच ईश्वराच्या मनांत असलें तर एकदां सोडून चारदां फांशीं जातों."

अशा आडमुठ्याशीं विमल काय बोलणार ? त्याल हां हां म्हणतांच तिला पुरेवाट झाली. तो बचावाचो म्हणून कांही युक्ति सांगेल ही आशा व्यर्थ होती. पण जवळपास आपलें भाषण ऐकायला कोणी नाही असें पाहून विमलनें त्याची म्हणून हकीकत होती ती पुनः सर्व ऐकून घेतली. आणि म्हणाली "धैर्य धर म्हणून तुला कोणी शिकवायला नकोच म्हणा. पण सरकारतर्फे कोणी जबानी वगैरे घ्यायला आलें, किंवा इतर रीतीनें कोणी कांही माहिती काढून घेण्याचा प्रयत्न केला, तर कोणाशीं कांहीच बोलूं नको. मला काय सांगावयाचें तें मी कोर्टांतच सांगेन असें उत्तर दे. येवढी खबरदारी अवश्य घे" इतकें सांगून व तें त्याला पुनःपुनः बजावून विमल आपल्या भावाचा निरोप घेऊन बाहेर पडली.

दोन प्रहरीं दिवाणसाहेब कचेरींत आल्यावर ती कचेरीला गेली. तिनें आपल्या नावाचें कार्ड आंत पाठविलें. आंतून बराच वेळ उत्तर आलें नाही. तेव्हां तिनें फिरून आठवणीकरितां म्हणून दुसरें कार्ड पाठविलें. तेव्हां तिला आंत बोलावण्यांत आलें. ती जाऊन बेलाशक खुर्चीवर बसली. तरी दिवाणसाहेब वर मान करून बघेनात. मात्र हातांतील कागद चाळतां चाळतां, चोरून पाहावें त्याप्रमाणें, ते मधूनमधून तिच्या तोंडाकडे पाहात होते. या गोष्टीचा राग येऊन ती म्हणाली—

विम.—" मीं सरकारी कामाकरिता आपणालाच भेटायला आलें आहें."

दिवा.—" काय ? सरकारी काम ? मजकडे काम ? तुमचें काम ?"

विम.—" होय. मला वकिलीच्या सनदेचा अर्ज करावयाचा आहे आणि वरिष्ठ कोर्टाच्या सनदेकरितां लागणारे फीचे रुपये पांचशें मी बरोबर आणले आहेत. तेव्हा रुपये जमा करून घेऊन तावडतोब मला सनद देण्याचा हुकूम व्हावा."

पण विमल बोलली तो मजकूर लक्षांतच भरत नाहीं अशा थाटानें दिवाणसाहेब म्हणाले—" काय वकिलीची सनद ? आणि स्त्रियांना ?"

विम.—" कां बरें ? मी वकिलीची परीक्षा पास झालें आहे."

दिवा.—" या संस्थानची परीक्षा ?"

विम.—" या संस्थानांत वकिलीची परीक्षा नाही हें आपणाला माहीतच आहे. मी खालसा हायकोर्टाची परीक्षा दिली आहे."

दिवा.—" मग खालसा हायकोर्टाची सनद मिळेल ती घ्या."

विम.—" पण त्याच परीक्षेवर संस्थानची सनदहि मिळूं शकते."

दिवा.—" होय, दिली तर मिळते कीं !"

विम.—" मग मला ती देण्याला अडचण कोणती ?"

दिवा.—" तुम्ही स्त्री आहां आणि हें संस्थान आहे ही !"

विम.—" मग संस्थानांतल्या स्त्रिया आणि खालसांतल्या स्त्रिया या काय वेगवेगळ्या जातीच्या असतात वाटतें ?"

दिवा.— " अहो, स्त्रीजात येथून तेथून सारी एकच—"

विम.—"म्हणजे फक्त 'हराम' येवढा शेवटचा शब्द मात्र आपण उच्चारला नाही. बाकी श्लोक"—

दिवा.—" छेः छेः स्त्रियांच्या तोंडावर तसें कसें म्हणावें ?"

विम.—" म्हणजे मागें म्हणायला हरकत नाही असेंच ना ? पण स्त्रीजातीबद्दल आपणाला कांहीहि वाटो, माझ्या सनदेच्या अर्जाचें काय ?"

दिवा—" तेंच मी बोलून पुरें करणार होतों. इतक्यांत तुम्ही बोलला ! स्त्रिया येथून तेथून एकच, पण संस्थानांत स्त्रियांना वकिलीची सनद मिळण्याला अजून चारदोन पिढ्या गेल्या पाहिजेत !"

विम.—" पण देऊं नये असा नियम तर या पिढींत नाही ना ?"

दिवा.—" नियम—हं ! 'नियम' ! संस्थानांत नियम नसतात, फक्त अधिकारी असतात ! "

विम.—" म्हणून अशा एका अधिकाऱ्याकडेच मी सनद मागायला आलें आहें ! "

दिवा.—"पण त्याला वाटलें तर तो देईल ! स्त्रियांना न्यायाच्या कामांत लुडबुड करायला देऊन संस्थानी प्रजेच्या न्यायाच्या ताटांत माती कालवावी कीं काय ? "

विम.—" ती माती कालविण्याचा मक्ता फक्त पुरुषांकरितांच राखून ठेवावा असें आपलें मत दिसतें ! असो. लहान मुलांना मातीचा खेळ आवडतो. पण त्यांनाहि तो किती करूं द्यावयाचा याला सीमा असणारच ! आपण मला सनद देत नसाल तर नका देऊं. पण माझ्या अर्जावर तसा शेरा तरी ? "

दिवा.—"एखादी गोष्ट नाही म्हणण्याच्या अधिकारांत तसें उत्तर लिहून न देण्याचाहि अधिकार येतोच !"

विम.—" समजलें मी, ठीक आहे." असें बोलून फणफणूनच विमल उठली.

घरीं येऊन विमलेने मनोहरपंतांना खालीलप्रमाणे पत्र पाठविलें.

"सा. न. वि. वि.—

आपल्या भेटींत अंदाज करून बोलल्याप्रमाणे दिवाणसाहेबांच्या सरळस्वभावाची परीक्षा व्हावयाची ती झाली. सनदेची फी रु. पांचशें घेऊन गेलें असता, मी स्त्री म्हणून मला सनद देतां येत नाही असें त्यांनी सांगितलें. अर्थात् वरिष्ठ अधिकारी या नात्यानें मला खुद्द यजमानसाहेबांची भेट घ्यावयाची आहे. तरी त्यांना भेटण्याची परवानगी मिळवून भेटीची वेळहि ठरवून मला कळविण्याची कृपा करावी. सकाळच्या भेटींत आपण सांगितल्यावरून हें पत्र खासगी नात्यानेंच आपणास लिहिलें आहे. कळावें. "

पत्रास उत्तर सुमारें दीड तासाने खालीलप्रमाणें आलें. " उद्यां

सकाळीं नऊ वाजता सरकारवाड्यांत श्रीमंत यजमानसाहेब आपली गांठ घेऊं शकतील.”

त्याप्रमाणे दुसरें दिवशीं सकाळीं विमल आपला नेहमीचा फिरावयास जाण्याच्या वेळचा साधा पोषाख करून राजवाड्याकडे निघाली.

* * *

विमल ही नवलपूरच्या राजधानीच्या शहरांत आज इतकीं वर्षे राहिलेली. पण जाणतेपणीं अशी ती राजवाड्यांत आज प्रथमच जाणार होती. लहानपणीं ती आपल्या वडिलांबरोबर राजवाड्यांत पोलिटिकल एजंट साहेबांच्या गार्डनपार्टीच्या वेळीं किंवा इतर मुलांमुलींबरोबर एखाद्या बक्षीससमारंभाला गेली असेल. पण जुने महाराज जिवंत असेपर्यंत राजवाड्यांत जाऊन स्त्रियांनी महाराजांच्या नजरेस पडणें सुरक्षित नाही म्हणून, आणि ते वारल्यानंतर राजवाड्यांत राणी वगैरे कोणी स्त्री नाही, स्त्रियांचा खास दरबार नाही, धार्मिक समारंभ किंवा हळदकुंकू नाही म्हणून प्रौढ मुलींपासून वर कोणाहि स्त्रियांना राजवाड्याकडे जाण्याचें कारणच उरलें नव्हतें. आता दिवाणसाहेबच केव्हा केव्हा, नागरिक स्त्रियांचा घोळका जमवून दृष्टीस पडण्याच्या हेतूने निमित्त काढून सरकारी खर्चाने एखादा मिश्र समारंभ करीत. पण आपल्या घरच्या बायका समारंभाला न नेल्या म्हणून दिवाणसाहेबांची जी इतराजी होणार तिला भिणाऱ्या कांही भ्याड सरकारी नोकरांखेरीज, इतर कोणीहि आपल्या बायका अशा समारंभास होतां होईतों पाठवीत नसत. कारण अशा समारंभाचे वेळीं माऱ्याच्या जागीं बसून हातांत बायनॉक्यूलर घेऊन दिवाणसाहेब येणाऱ्या जाणाऱ्या स्त्रियांचे चेहरे न्याहाळीत बसत ही गोष्ट लोकांना माहीत झाली होती. आणि गांवच्या स्त्रियांची अब्रू बचावण्याचें वकील-पत्र प्रभाकर डबीर व त्याचे एकदोन समवयस्क मित्र यांनी आपणाकडे घेतलें असल्यामुळे, त्यांनी चारदोन वेळ ही गोष्ट दिवाणसाहेबांना जाणवून उघडकीला आणली होती.

त्यांनी असें करावें की शेजारच्या वाड्याच्या उंच गच्चीवर बसावें, जवळ खडे जमवून ठेवावे, आणि दिवाणसाहेबांनी हातांत बायनॉक्युलर घेतली

कीं त्यांच्या अंगावर अचूक खडा फेकावा. प्रथम प्रथम दिवाणसाहेबांना मुलांची शंका आली नाही. गच्चीवरच्या भिंतीवर बसलेल्या पारव्यांच्या हालचालीने खडे पडत असतील असें त्यांना वाटलें. पण पुढें पुढें आपण हातांत बायनॉक्युलर घेऊन स्त्रियांवर रोखून पाहण्याकरितां ती सरसावणें, आणि पटकन एकदोन खडे अंगावर पडणें, यांच्या अचूक साहचर्याकडे त्यांचें लक्ष वेधलें. अंदाजाने चौकशी करतां हीं मुलें शेजारच्या वाड्यांत जमून ही गोष्ट करतात हें त्याना समजलें. पण परक्याच्या घरांत त्यांना बंदी करतां येईना. तेव्हां त्यांनी आपलीच माऱ्याची जागा बदलली.

असो, संस्थानच्या गादीवरचा राजा सद्गुणी आहे, विवाहित आहे, फिरून त्याची स्त्री सद्गुणी व हौशी आहे, असा सुंदर योग जमून आला म्हणजे राजधानीच्या स्त्रियांना राजवाडा हें आपलें माहेर घर वाटतें. आणि वाड्यांत जाण्यायेण्याची रीत व रीघ पडून, दरबारचें गृहस्थाश्रमी सौभाग्यसंपन्न स्वरूप सार्थ होतें. जुन्या काळीं खरोखरच कांही संस्थानी दरबारांतून राजसत्तेच्या जोडीला गृहस्थाश्रमाचें स्वरूप आणून देणारे संस्थानिक होऊन गेले. गृहस्थाश्रमाचीं मुख्य कर्तव्यें व भूषणें दोन. एक अतिथिसत्कार व पाहुणचार; आणि दुसरें आपणाहून गरीब स्थितीतील आप्ताचा व नागरिकाचा परामर्ष. हीं कर्तव्यें जाणणाऱ्या व तीं हौसेने पाळणाऱ्या संस्थानिकांच्या वाड्यांत कुटुंबवत्सल गरीब स्त्री–पुरुषांचे कांहीना कांही निमित्ताने जाणें येणें घडे. वर्षांतून सणावारीं पंक्तीचीं जेवणें, सरकारी श्रावण्या, उत्सव या प्रसंगीं प्रजाजनांतील लोकांना पाहून पाहून निमंत्रणें होत. प्रजाजनांच्या घरीं कार्य निघालें म्हणजे सरकारी अहेर जात. राजघराण्यांत लग्नें–मुंजी निघाल्या म्हणजे त्याबरोबर अनेक प्रजाजनांच्या घरचीं असलीं कार्यें सरकारी खर्चाने होत. राजस्त्रियाहि या कामीं आपल्या प्रेमळ दाक्षिण्य बुद्धीची हौस अशीच पुरवून घेत. पण तसा प्रकार नवलपुरांत आज कैक वर्षांपासून दुर्दैवाने बंद पडला होता. आणि विमलहि आज राजवाड्याकडे निघाली ती केवळ सरकारी कामाच्या निमित्ताने; अविवाहित अशा संस्थानिकाकडे; वकिलीच्या सनदेकरितां अपील अर्ज घेऊन!

---

## प्रकरण अठरावें

# मनोहराची नाजुक कारवाई

ज्या दिवशीं महाराज नवलराय यांनी घरतींत पाहिलेला प्रकार मनोहराला कळवून, त्या म्हणजे भाऊसाहेबांच्या घरच्या मंडळीबद्दल चौकशी करावयाला सांगितलें, त्या दिवशीं प्रथमच मनोहराला अशी शंका आली कीं, त्या घरांत पाहिलेल्या धीट तरुण स्त्रीनें आपल्या राजमित्राचें मन आकर्षित करून घेतलें असावें. फोटोची छाया एकदा क्षणार्धांत काचेवर पडली कीं ती जशी तेथें कायम चिकटून बसते, त्याप्रमाणे मनुष्यमात्राच्या परस्पर चित्ताकर्षणासंबंधानेहि असतें. पहिला आघात किंवा हल्ला ही निम्मी लढाई, आणि पहिली लढाई हें निम्में युद्ध, अशी जी इंग्रजींत एक म्हण आहे, तीच लाक्षणिक अर्थानें, मनुष्यांच्या परस्परांविषयीच्या ग्रहाला लागू पडते. नवळरायाला श्रावण वद्य अमावास्येच्या रात्रीं, कंदिलांच्या अंधुक प्रकाशांत, दुरून विमलचें दर्शन दोन–तीन मिनिटेंच काय घडलें तेवढें! त्या अल्प काळांत आणखी इतर तीन मनुष्येंहि वेगवेगळ्या कारणांनी चित्ताला आकर्षक होणारीं अशीं त्यांच्या डोळ्यांपुढे नव्हतीं का? तथापि वीज चमकल्यासारखें विमलचें दर्शन, आणि विशेषतः तिने नवलरायाला दटावून पण मोठ्या सभ्य व गंभीरपणानें उच्चारलेले चारच शब्द, यांनी मिळून त्याच्या मनावर विमलचें जें चित्र उमटविलें, तेंच इतकें पक्कें झालें होतें कीं, तें पाहण्याकरितां तेव्हापासून त्याची दृष्टि मधून मधून अंतर्मुख होई.

मनोहरानें ही गोष्ट पहिल्या झटक्याला ताडली, व तिला उद्देशून त्यानें आपल्या मित्राची थोडी थट्टाहि केली, हें पूर्वी एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे. आणि तेव्हापासून या दोघांहि मित्रांच्या मनांत विमलची मूर्ति खेळूं लागली. पण ती निरनिराळ्या नात्यांनी. त्या पहिल्याच भेटींत जसा विमलच्या दर्शनानें व बुद्धिप्रभावानें नवलरायाच्या मनावर प्रेमाचा प्रहार न कळत केला, तसाच त्याच्याशीं आलेल्या या विष-

यावरील पहिल्याच भाषणांत मनोहराच्याहि मनांत अशा कल्पनेची स्फूर्ति झाली कीं, नवलरायाचें प्रेम त्याने वर्णन केलेल्या मुलीवर बसलें आहे. आणि पुढील चौकशींत त्याचा ग्रह पक्का झाला कीं, या स्त्रीशींच नवलरायाचें लग्न होणें इष्ट आहे. इतकेंच नव्हे तर शुद्ध मनःस्फूर्तीच्या आधारावर त्याला असेंहि वाटूं लागलें कीं, योगहि तसाच दिसतो. योग म्हणजे तो योगच, आणि स्फूर्ति म्हणजे ती स्फूर्तिच! योग आणि स्फूर्ति या गोष्टी स्वतःप्रमाणच असतात. म्हणजे त्यासंबंधाने जर कोणी का असा प्रश्न ' केला तर फक्त 'म्हणून' याखेरीज त्याला दुसरें कांही उत्तर देतां येत नाही !

नवलराय हा मोठा सावध असल्यामुळे, आपल्या मनांत झांकलेली प्रेमजन्याची गोष्ट जिवाच्या स्नेह्याजवळहि बाहेर काढून बोलत नसे. तथापि नवलराय याच्या मनांतील विमलविषयक गुप्त प्रेमाचें स्पंदन, आणि मनोहराच्या मनांतील नवलरायाविषयक मित्रप्रेमाचें स्पंदन, हीं अगदी एकाच अस्सल जातीचीं व तुल्य–समान–गुणांचीं असल्यामुळे, विद्युत्संदेशाप्रमाणे या दोहोंचा जाव न कळत एकमेकांना मिळत असे.

मनोहराने जी गोष्ट इष्ट म्हणून मनाने ठरविली तिला तोंड कसें पडेल याची त्याला प्रथम कांही कल्पना होईना. पण लवकरच त्याच्या लक्षांत हें आलें कीं, विमलचा भाऊ फरारी होता तो परत येऊन हजर झाला त्याअर्थी त्याच्या प्रकरणाचा कांही तरी सोक्षमोक्ष आतां झालाच पाहिजे. आणि त्या प्रकरणाच्या वाटींत तिचा संबंध अधिक येणारच. कारण त्या भाऊसाहेबांच्या घरांत सुशिक्षित, समंजस, व बुद्धिमान अशी एक विमलच दिसत होती. हा अंदाज लवकरच खरा ठरला. आणि जेव्हा विमल त्याला अभावितपणें समक्ष भेटण्यालाच आली तेव्हा आपला सर्व कयास बरोबर ठरणार असें वाटून, त्याच्या मनाने त्याला शाबासकीहि दिली. गोष्टी मागून गोष्टी जुळतच चालल्या. कारण विमलला सनद न देण्याची बुद्धि दिवाणसाहेबांना कां व्हावी ! ती झाली तेव्हा अर्थात् विमलला नवलराय महाराजांची गांठ घेणें प्राप्तच झालें. आणि महाराजांच्या भेटीची परवानगी काढून वेळ कळवा अशी चिठी जेव्हा विमलकडून त्याला आली, तेव्हा सहजच मनोहराला आनंदाचें भरतें आलें.

त्याने बहुधा ब्रह्मदेवाला नवसाहि केला असेल मनांत कीं, "देवा, तूं आपल्या जागीं बसल्याबसल्या सगळ्या जगांतील तरुण स्त्रीपुरुषांच्या (आणि पुनर्विवाहाची चाल पडल्यापासून प्रौढहि स्त्रीपुरुषांच्या) नांवाच्या गवताच्या जुड्या बांधून टाकतोस, आणि त्यांच्या लग्नचिठ्या लिहितोस, तशीच एक जुडी नवलराय आणि विमल यांच्या नांवची बांधून टाकशील, आणि त्यांच्या नांवची लग्नचिठी तुझ्या विश्वकर्मा नांवाच्या छापखान्यांत छापशील तर मी–" पण ब्रह्मदेवाला काय पदार्थ आवडतो याची पक्की माहिती आम्हाला नसल्याने, त्याने ब्रह्मदेवाला नवसफेड कोणत्या रीतीने कबूल केली हें सांगतां येत नाही. मात्र मित्रप्रेमाकरिता त्याने स्वतः आपल्या अंगचें चार तोळे मांसहि काढून दिलें असतें यांत शंका नाही!

असो. उद्या सकाळीं आपला मित्र नवलराय, आणि आपण आपल्या मनानें त्याजकरिता नियोजित केलेली वधू विमल, यांची गांठ पडणार, आणि त्या प्रसंगीं आपणाला हजर राहावयास सांपडणार, या आनंदाने मनोहराला रात्रीं झोपहि आली नाही. दुसरे दिवशीं सकाळीं आठाच्या ठोक्याबरोबर नवलराय घोडदौड करून परत येतो तोंच, मनोहराची स्वारी राजवाड्यांत जाऊन बसली. आणि त्याने नवलरायांचें स्वागत नेहमीहून थोड्या अधिक उत्साहपूर्ण शब्दांनी केलें. तसेंच त्या रात्रीं दर्शन घडलेली स्त्री आज एका अकल्पित रीतीने आपल्याच वाड्यांत येऊन आपणाला भेटणार ही माहिती मनोहराकडून समजल्यामुळे, नवलरायाच्या मनांतहि आदल्या रात्रीं झोप लागण्यापूर्वी काय काय विचार आले असतील याची कल्पना वाचकांना सहजच करतां येईल.

इतकें निश्चित वाटतें कीं संधिप्रकाशांत फोटो काढल्याप्रमाणे कंदिलाच्या अंधुक उजेडांत विमलचें जें छायाचित्र त्याच्या मनावर त्या अमावस्येच्या काळोख्या रात्रीं पडलें, त्या छायाचित्राला अधिक उठाव व स्पष्टता यावी याकरिता, तो आपल्या स्मृतींत भावना मिसळून त्यांच्या रसायनाने मनाच्या 'फोटोग्राफिक प्लेट'ला वरचेवर डूब देत होता.

आणि सकाळीं उठून घोडदौड घेत असतां त्याबरोबरच त्याचा अमूर्त मनोरथहि दौडत असावा यांत काय संशय !

घोडदौडीहून परत आल्यावर, कपडे बदलून क्षणभर विश्रांति घेऊन बाहेर दिवाणखान्यांत येऊन बसेपर्यंतच्या थोड्या अवधींत, नवलरायाच्या अंतरंगांतलीं त्यांचींच दोन मनें एकमेकांशीं खालीलप्रमाणे संभाषण करीत होतीं.

**१ मन**—जो तो आपल्या घरचा शेर म्हणजे सिंह किंवा राजा असतो. तिने त्या रात्रीं दटावून मला बिनमुरवतखोरपणाने मागच्या पायीं परतविलें त्याचा मोबदला आज मी घेतला तर ? ती आज आली म्हणजे भेटायला वेळ नाही असें सांगून परत पाठविली तर ?

**२ मन**—काय बिशाद तुझी ? ती आपल्याच काय पण तुझ्याहि घरीं शेरच ठरेल. ती होऊन परत जाऊं लागली तर युक्त्या-प्रयुक्त्या करून तूंच तिला थांबवून घेशील.

**१ मन**—बरें, आली तर घेईन भेट. पण सनद न देऊन तिचा पाण-उतारा केला तर ?

**२ मन**—तो अन्याय होईल. ती फुकट सनद नाही मागत. रक्ताचें पाणी करून बुद्धिबळावर वकिलीची परीक्षा पास झाली. घसघशीत पांचशें रुपये टिचून सनद मागणार ! आणि संकटांत पडलेल्या भावाच्या बचावा-करिता ! तूं कोणत्या तोंडाने सनद नाकारशील ?

**१ मन**—ती येऊन बसली तरी मी तिच्याकडे वर डोळे करून न बघितलें म्हणजे झालें.

२ मन—वधू-वरपरीक्षेच्या भेटींत खाली मान घालून बसेल, वर डोळे करून न पाहील, ती वधू ! हाच का तुझा पुरुषार्थ ? देव आपल्या पायांनी भेटीला आला तर, अभाग्या, डोळे भरून दर्शन घेण्याचें सोडून तूं काय मिळविणार ? विनयालाहि कांही मर्यादा हवी ?

१ मन—बरें, असेंच तर ! तिच्याशीं बोलणें-चालणें हाच संभावित-पणा ! हेंच दाक्षिण्य ! मग तिला मनमुराद बोलवूनच घेतो तर !

२ मन—वीण्याच्या जोडतारा अशाच जुळतां जुळतां एकरूप होतात,

सुरेल लागतात. बाबा, ही देवाची घटना आहे. आणि, खुळ्या, त्यांत तुझें जन्माचें कल्याण आहे.—

पण आंतल्या गांठीचे लोक, कांहीं कांहीं तरुणसुद्धा, आपल्या मनाचा ठाव बाहेर दुसऱ्याला फारसा देत नसतात. म्हणून मनोहराने केलेलें उत्साहपूर्ण स्वागत सहेतुक आहे असें ओळखून नवलरायानेंहि नेहमीपेक्षा अधिक साधेपणाने व उपेक्षेच्या स्वरानेंच त्याला उत्तर दिलें.

नंतर चहा वर आला तेव्हा बोलण्यांत बोलणें काढून तें आपल्या वळणावर कसें आणावें याचा विचार करीत असतां मनोहर म्हणाला—

**मनो.**—"काय राजेसाहेब, केवळ नोकरांच्या हातचा चहा पिण्याचें आमच्या वरचें हें संकट केव्हा नाहींसें होणार कांही सांगाल का ?"

**नव.**—"काय, नोकरांच्या हातचा चहा पिण्याला संकट म्हणतोस, मनोहर ?"

**मनो.**—"होय तर काय ! त्या चहांत दूध–साखरेबरोबर आणखी जें काय पडायचें असतें तें नोकराने केलेल्या चहांत पडत नाही, नवलराय !"

नवलराय वेड पांघरून म्हणाला "म्हणजे चुलीवरचीं जळमटें वाटतें! लेकुरवाळी लग्नाची बायको घरीं असल्याशिवाय, तीं जळमटें चहांत कशीं पडणार? तिने चहा चुलीवर ठेवावा, पण एका मुलाचें रडणें थांबविण्यांत चहावर झांकण ठेवायचें विसरावें ! आणि दुसऱ्या मुलाचें रडणें थांबविण्याच्या गर्दींत तिने चहा गाळण्यांतून ओतायचाच विसरावें ! असें झालें म्हणजे दूध–साखरेशिवाय चहांत आणखी काय पडायचें तें आपोआप पडतें कीं, मनोहर! बिचारे नोकर! त्यांना चहा करायचा म्हणजे चहाच करायचा ! याहून दुसरें व्यवधान नसल्याने, त्यांनी केलेल्या चहांत कुठून चुलीवरचीं जळमटें मिळणार ? बरें, चुकून एखादे वेळीं तीं पडलेलीं आढळलीं, तर त्याचें त्यालाच मरणप्राय दुःख होऊन तोच आपण होऊन तावडतोब दुसरा चहा करून देतो. मिळून नोकराच्या हातून चहांत चुलीवरचीं जळमटें मिळण्याची निराशाच म्हणेनास ? पण मनोहर, तुझें जर त्यांशिवाय चालतच नसलें, म्हणजे तुझ्या डॉक्टरी चहाच्या प्रिस्क्रिप्शनमध्ये चुलीवरचीं जळमटें अवश्य असलीं–तर बाबा आपलें लग्न लवकर करून टाकून लेकुरवाळाहि हो कसा !"

मनोहराने अधिक स्पष्टपणा स्वीकारला.

**मनो.**—" राजेसाहेब, चहांत जळमटें पडलेलीं मलाहि आवडत नाहीत तुमच्याप्रमाणेच. पण पुरुषाच्या हातचा चहा तुम्ही किती दिवस घेणार म्हणतों ? "

**नव.**—" वा:, वाड्यांतले पुरुष नोकर टाकून मुद्दाम स्वयंपाकिणीला वर बोलावून चहा करून वर आणून द्यायला सांगूं म्हणतोस ! ठीक ! मी असें केलें तर ते नोकर लोकच मनांत मला काय म्हणतील ? याचा कांही विचार ? आणि तूंहि ! "

मनोहराने आता आंगलगट करूनच हल्ला चढविला.

**मनो.**—"स्वयंपाकिणीच्या हातच्या चहाचें मीं नाही बोललों, महाराज! आम्हाला खास आमच्या वहिनीसाहेबांच्या हातचा चहा प्यावा अशी इच्छा उत्पन्न होऊं लागली आहे."

**नव.**—" अस्स ! सरळ वाटेवर येऊन बोल ! पण तुझी वहिनी म्हणजे बाबा ती या संस्थानाची राणी ! ती इतक्या लवकर उठून चहा करून आणून देणार ? आणि तो करून आणून दिलानच, तर ती मला एकट्याला देईल. राजाची राणी ही पडदानशीन सनातनी स्त्री असावी लागते ! तिने आपलें दर्शन लोकांना—तुझ्यासारख्या माझ्या मित्रालाहि देऊन पडद्याबाहेर आपली अब्रू घालवावी कीं काय ? मग ती पडद्याच्या आंत कांहीहि करो ! आम्हा राजमित्रांचीं लग्नें करून देऊन " वहिनी " च्या हातचा चहा पिण्याची आकांक्षा तुमची फोलच ठरणार ! तुम्ही गरीब लोक. तुमच्यासारख्या ब्रह्मचाऱ्यांनी लग्नें केलीं तर वहिनींच्या हातचा चहा पिण्याची आमच्यासारख्या संस्थानिकांची हौस फिटेल कदाचित्. मग आहे का कांही विचार तसा यंदाच्या लग्नसराईत ? शिवाय श्रीमंत गरीब, संस्थानिक नागरिक हें तुझें माझें नातें सोडलें तर, तूं माझा वडील भाऊ मी धाकटा भाऊ—आपली आई असती तर तिने कुणाचें लग्न आधी केलें असतें सांग पाहूं ?"

**मनो.**—" आईची गोष्ट काढलीस म्हणून सांगतोंच, कीं मी वडील असलों तरी तिने माझ्या आधी तुझेंच लग्न करण्याचा आग्रह धरला असता !

कां म्हणशील तर तुला राजपद मिळाल्यामुळे तुझ्या-माझ्यामधलें वडील-कीचें नातें उलट झालें आहे. आता तूंच वडील भाऊ मीं धाकटा भाऊ! तें कांही नाही. मला वाटतें यजमानसाहेब, आपली आता पहिली गोष्ट म्हटली म्हणजे आपला विवाह उरकून घ्यावा म्हणजे तें सर्वांनाच बरें!"

नव.—सर्वांना म्हणजे कोणा-कोणाला तें सांगना! माझी समजूत होती कीं माझा विवाह होणें ही फक्त माझ्याच सुखाची गोष्ट असणार. त्यांत लोकांचा काय संबंध?

मनो.—"कां नाही संबंध? क्रमानें घ्या सांगतों. ज्या गृहस्थाची मुलगी तुमची बायको होणार तो एक बाप तरी आनंदसमुद्रांत—"

नव.—"किंवा दुःखसमुद्रांत बुडणार? कीं गटकळ्या खाणार? कीं पोहणार? कीं तीरावर स्नान करणार? हें नाही सांगितलेंस. तें सांगायला हवें! कारण मुलगी संस्थानची राणी झाली म्हणजे बापाला या साऱ्याहि गोष्टी संभवत असतील! आणि न्यायशास्त्रानेच बोलावयाचें तर प्रकरणपूर्तते-करिता आणखी एक पांचवा प्रकार उरला तोहि सांगतों."

मनो.—"तो कोणता?"

नव.—"राजजामाताचा संबंध हा समुद्राच्या पाण्याप्रमाणे कडू, खारट, म्हणून तो सोडून देऊन स्नानहि नाही तर फक्त दुरून नमस्कार करावयाचा! ज्या बापांनी आजवर आपल्या मुली संस्थानिकांना दिल्या त्यांना हे सगळे प्रकार अनुभवाला आलेले आहेत. कोणाला जन्माचें दारिद्र्य फिटल्याचा आनंद लाभला, तर कोणाला जन्माची जिवंत बेअब्रू गळीं पडली म्हणून दुःखानें देशत्याग करावा लागला."

मनो.—"पण तुमच्याशीं सासऱ्याचा संबंध येणाऱ्या सुदैवी गृहस्थाला आनंद व सुखच जन्मभर लाभणार, अशी माझी खात्री आहे आणि म्हणूनच बोलतों."

नव.—"माझ्या स्नेह्याने मला भलेपणाचें सर्टिफिकीट न द्यावें तर दुसरा कोण देणार? पण माझी बायको कशी निघेल याची खातरजमा माझा मित्र झाला तरी कशी करणार? ती चांगली निघाली तर ठीकच. नाही तर? मग मी स्वभावानें मूळचा कितीहि चांगला असलों तरी

मला वाईट व्हावें लागणार नाही कशावरून? सासरा आला तर काय दोन दिवसांचा पाहुणा! आणि तो कधी न आला तरी तें भागण्यासारखेंहि आहे. पण माझी बायकोच वाईट स्वभावाची किंवा दुर्गुणी निघाली तर? मग तुला माहीतच असेल संस्थानी नवरा-बायकोंत काय प्रकार होतात ते!"

**मनो.**—" काय तें सांगाना तुम्हीच!"

**नव.**—" बाहेरून देखावा राजाराणीच्या खबुतरी जोड्याचा! पण आंत प्रकार कैकाड्यांच्या जोडाजोडीचा! सार्वजनिक समारंभाला सजोड आमंत्रण असलें म्हणजे नाइलाजच! म्हणून मग आगाशींत मोटार आली कीं, एका दालनांतून राजेसाहेब, दुसऱ्यांतून राणीसाहेब नटूनथटून रंगभूमी-वर सूत्रधार-नटीसारखा प्रवेश करून शेजारीं शेजारीं बसायचीं! समारंभांतील भाषणांत "मी व आमच्या राणीसाहेब" "मी व आमच्या राणीसाहेब" असे राजेसाहेबांच्या तोंडून हटकून मुद्दाम चारदोन वेळा उद्गार निघावया-चेच. पण परत आगाशींत मोटार थांबवून वेगळ्या 'वुइंगांतू'न पडद्यांत 'निष्क्रमण' झालें उभयतांचें, म्हणजे फिरून तसला दुसरा योग येईपर्यंत गांठ पडते आहे कशाला एकमेकांची!"

**मनो.**—" हा झाला एक प्रकार. पण त्यांत बाहेरून उभय पक्षीं जाहीर अब्रू संभाळण्याचा प्रयत्न तरी आहे!"

**नव.**—" पण व्यक्तिशः सुख? राणीसाहेब कधी आवडीचे दोन जिन्नस करून राजेसाहेबांना आग्रहाने खाऊं घालीत आहेत, कीं पंक्तीला दोघें बसून हास्यविनोद करीत जेवीत आहेत, कीं सुखदुःखाच्या गोष्टी एकत्र बसून बोलत, कीं राज्यप्रपंचांत लक्ष घालीत आहेत—नांव नाही अगदी त्याचें! आधी एकमेकांकडचा राबताच एकमेकांना बंद! चुकून गांठ पडलीच तर एकमेकांवर खेकसावें, उणेंदुणें काढावें, स्वतः रडावें नाही तर दुसऱ्याला रडवावें. आणि तें पाहून नोकरांनी बाजूला जाऊन तोंड दाबून फिदीफिदी हंसावें! आपला दिवाणखाना हा आपला किल्ला बनवून त्यांत राणीसाहेबांनी आपल्या प्रेमाचे भिक्षुक, नाही तर आवडते हुजऱ्ये, नाही तर प्रेमाचे डॉक्टर, नाही तर गाणार वाजविणार साजिंदे घेऊन बसावें! आणि राजे-

साहेबांनीहि आपल्या दालनांत प्रेमाचे स्त्रीपुरुष संवगडी घेऊन मौजेने काळ काढावा! राजाराणींच्या दरम्यान केवळ जिभाच नाहीत, तर चाबूकहि कडाडतील! आणि लाल दारूच्या ग्लासाप्रमाणे रक्ताळलेल्या जखमाहि वाहवतील! प्रेमळ सद्गुणी राजाराणीची गांठ पडणें म्हणजे तो एक अपूर्व योग आहे. तेव्हा माझी स्तुति तूं मित्र म्हणून कितीहि केलीस, तरी तशीच स्तुति करण्याला पात्र अशी माझी वधू तुला हटकून कशी मिळणार ! म्हणून लग्नच न केलेलें बरें नव्हे का ! ”

**मनो.**—“ काय हें विक्षिप्तपणाचें बोलणें ! “ कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढे बिळें करिल घूस ! ” हा मोरोपंती आर्याचरण तूं मी मिळून लहानपणीं शाळेंत पाठ केला तो, महाराज, आपणाला आठवतोना ! ”

**नव.**—“ होय.आणि त्या प्रश्नाचें उत्तर म्हणून तेव्हाच गमतीने मी एक आर्या रचली होती तीहि तुला आठवत असेल !”

मनोहर हंसून म्हणाला, “ ती मी कशी विसरेन ! तुमची ती आर्या अशी होती — “ चार चरण तीक्ष्ण नखें तरि कितिशी काढि मृत्तिका घूस ! ”

“ संसाराची माती करि दुचरण गृहिणिचीच धुसपूस ! ”

दोघेहि खो खो करून मुरकुंडी वळेपर्यंत हंसले !

**नव.**—“ मग झालें तर ! राज्य संभाळूं कीं बायको संभाळूं असें व्हायची वेळ आली म्हणजे मग एकहि संभाळवत नाही. याकरिता दोनहि सोडून देऊन तपश्चर्येकरिता क्षेत्राकडे धाव घ्यावी लागणार. त्यापेक्षा स्वतःच्या व्यक्तीचें सुख सोडून देऊन राज्य संभाळावें, व होईल तितकें सुख प्रजेलाच द्यावें हें बरें नाही का ! ”

**मनो.**—अहो, पण विवाहाच्या कारभारांत यश लाभणें हें जसे दैवाधीन तसेच संस्थानाच्या राज्यकारभारांत यश लाभणें हेंहि दैवाधीनच नाही काय ! नवरा दुर्गुणी किंवा मेषपात्र म्हणूनच का राजांच्या राण्या बिघडतात ! नाही मुळींच नाही ! मी असे राजे पाहिले आहेत सद्गुणी व पुरुषार्थसंपन्न कीं, अशा नरांच्या जोडीला संस्थानी श्रीमंतीची जोड मिळूनहि त्यांच्या पदरीं कुलक्षण कुलटा पडाव्या. यावरून ईश्वराच्या घरीं न्याय नाही असें म्हणावेसें वाटतें. पण जसे बायकोचें तसेच राज्य-

कारभाराचें ! राजा कितीहि न्यायबुद्धीने किंवा निःस्वार्थीपणाने वागला तरी त्याच्या राज्यकारभाराला नांव ठेवणारे लोक नेहमी तयारच असतात. तुम्हाला अजून भ्रम आहे कीं, संस्थानिक मनाने चांगला असला म्हणजे त्याचा राज्यकारभारहि चांगला अशी कीर्ति त्याला हटकून लाभेल म्हणून ! "यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः" हा न्यायच आहे. म्हणजे तात्पर्य काय ! प्रवृत्तिपर राहणें हाच पुरुषार्थ. सद्भार्या आणि सत्कीर्ति हीं दोनहि मिळविण्याची उमेद व आशा तुम्ही न धराल तर तुमचा जन्म व्यर्थ असें मी म्हणेन. स्त्रीजातीला अन्याय आणि त्याबरोबर स्वतःलाहि अन्याय असा तुम्ही सजोड अन्याय करतां असें मी तरी म्हणेन."

नव.—" बरें बाबा, तूं म्हणशील तें खरें. पण कच्च्या मुखत्यारीचा संस्थानिक मी म्हणजे गादीवरचा पोरका पोर ! माझी वधू पसंत करायचा अधिकार मला नाही असें वरून पोलिटिकल एजंटाकडून लिहून यायचें. आम्ही राजेलोक संस्थानिक पडलों. आमच्या लग्नाला नाही म्हटलें तरी राजकीय स्वरूप असायचेंच. उद्या एखाद्या गरीबाची, संस्थानाच्या शत्रूची, ब्रिटिश इलाख्यांत तीव्र राजकीय चळवळ करणाऱ्या देशभक्ताची, मुलगी तिच्या गुणाकरिता मला पसंत झाली तरी काय उपयोग ? पो. एजंट त्याला खो घालणार ! मी उद्या लग्नाला तयार झालों तर देवक ठेवण्याची सुपारी एजंटसाहेबांनी दिली पाहिजे ! आणि कच्चया मुखत्यारींत लग्नखर्चहि त्यांनीच मंजूर केला पाहिजे ! असलें आमचें हें संस्थानिकांचें परतंत्र जिणें ! म्हणून म्हणतों या लग्नाच्या भानगडींतच न पडलेलें बरें नव्हे का ?"

मनो.—भलतेंच कांही तरी ! ज्या संस्थानिकांचें लग्न तो अल्पवयी म्हणजे अठरा वर्षांच्या आंत व मुखत्यारी मिळण्याच्या आधी होतें त्याच्या लग्नाला या अडचणी येतात खऱ्या. पण तुमच्या लग्नाला त्या कांही खास येणाऱ्या नाहीत. उगीच कां मला इकडून तिकडून अडवीत बसलां आहां !

नव.—" बरें राहिलें. पण वधूला अजून ठिकाणा नाही. मी किंवा तूं कोणीच माझ्याकरिता अद्यापि एखादीहि वधू पाहिली नाही; आणि उगीच आधी हा वाद कां !"

मनो.—" तसें असल्याशिवाय उगीच लग्नाची गोष्ट काढून तुमच्याशीं वाद घालून वेळ दवडावयाला मी काय वेडा आहें ? तुमची भावी वधू मी तर पाहिलीच आहे, पण माझ्याहि आधीं तिला तुम्ही पाहिली आहे. लक्षांत ठेवा !"

नव.—" अरे कधी ? आणि ती कोण ?—"

इतक्यांत खालून पहारेवाल्याने एक छापील व्हिजिटिंग कार्ड रुप्याच्या छोट्या तबकांत घालून वर आणून महाराजांच्या पुढे केलें व तो त्याच पावलीं मागे गेला. तें कार्ड त्यांनी हातांत घेतांच समोरच्या घड्याळांत घण घण असे नवाचे ठोके पडले. ती संधि साधून मनोहर जागचा उठून उसळून म्हणाला "सत्य सत्य त्रिवार सत्य ! नव्हे तीन त्रिवार सत्य ! महाराजसाहेब आपल्या प्रश्नांचें उत्तर त्या व्हिजिटिंग कार्डांत आहे म्हटलें !"

नव.—" काय आहेस रे तूं " महाराज मनोहराच्या पाठीवर थाप मारून म्हणाले.

मनो.—" मूर्ख कीं शहाणा म्हणायचें बाकी ठेवलेंत तेंच बरें केलेंत. कारण तें लवकरच ठरेल. "

मनोहराने या प्रकरणीं खरोखरीच एखाद्या हिप्नोटायझरप्रमाणे आत्मविश्वास दाखविला. विमल ही आपल्या राजमित्राला सर्वस्वी योग्य वधू आहे या कल्पनेने त्याच्या मनांत जें एकदा ठाणें धरलें तें कांही केल्या हलेचना. उलट तें दृढच होत गेलें. मित्रामित्रांत लग्नाविषयीं अशा गोष्टी नेहमीच बोलल्या जातात, त्यांत कांही विशेष नाही. पण मनोहर बोलत होता तें कांही विनोदाच्या वाऱ्यावर उडविण्याकरिता बोलत नव्हता. मनांतली खरी इच्छा आणि संभवनीयतेवर दृढ विश्वास, यांच्या दुहेरी बळावरच तो आपल्या मित्राला ती कल्पना सुचवीत होता. हिप्नोटायझर हा आपल्यासमोरील वशीभूत माणसाला प्रथम चाचपडत अडखळत पण मागाहून ठासून व आज्ञा केल्याप्रमाणे " तूं अमुक आहेस " व " तूं अमुक करशील किंवा कर " असेंहि सांगतो; त्याप्रमाणे मनोहर हळूहळू बोलूं लागला होता; व त्याच क्रमाने महाराज नवलराय यांच्या मनाची कमान ढिली होत चालली होती. मात्र प्रयोगाचा शेवट अद्यापि दिसावयाचा होता.

---

प्रकरण एकोणिसावें

# आता कथानक धावूं लागलें !

महाराज नवलराय व विमल यांची ही गाठ कांही सहज व कांही मनोहराच्या प्रयत्नाने पडली. तींत या तिघांची दृष्टि परस्पर कशी होती हें वाचकांना न सांगतांहि समजण्यासारखें आहे. स्वतः विमलच्या मनांत, राजेसाहेब हे आपल्या सनदेच्या अर्जाला मंजुरी देणारे वरिष्ठ अधिकारी. याहून, या क्षणीं, त्यांच्याविषयी दुसरी कांहीच भावना नव्हती. श्रावणी अमावास्येच्या दिवशीं घराच्या मागील दारीं वेषांतराने आलेली, व आपण दटावून मागे परतविलेली, ती हीच व्यक्ति अशी ओळख तिला नवलरायाकडे पाहून बहुधा पटली नसावी. प्रभाकराला जी पटली ती तरी नवलरायांनीच त्या दिवसाची आठवण करून ओळख दिल्याने झाली कीं नाही ? या वेळीं नवलरायाशीं झालेलें विमलचें संभाषण अगदी जुजबी होतें. तसेच स्त्रीसहजधर्मामुळे विमलेने नवलरायाच्या चेहऱ्याकडे प्रभाकराइतकेंहि न्याहाळून पाहणें शक्य नव्हतें.

उलट नवलराय याच्या मनाची स्थिति मात्र वेगळी होती. विमलचें वेषांतर नसल्यामुळे तिच्या चेहऱ्याची ओळख त्याला पक्की होती. प्रथम पाहिल्यापासून तो चेहरा त्याच्या मनःचक्षूपुढे किती तरी वेळा येऊन गेला होता. आणि त्याच्या मनांत तिजविषयी कोणत्या भावना प्रकट झाल्य होत्या याचें दिग्दर्शन आम्ही पूर्वी केलेंच आहे. परंतु आधीच सावध व प्रसंग पाहून वागणारा असाच तो असल्यामुळे, आपल्या भेटीला आलेल्या विमलकडे आपण एका अर्जदाराकडे, फारच तर स्त्रीअर्जदाराकडे, पण सभ्य अधिकाऱ्याच्या दृष्टीने, पाहत आहों याहून नवलरायाने अधिक कांही दिसूं दिलें नाही.

मनोहराच्या मनांत मात्र त्याचें नाजूक मित्रविषयक कारस्थान सुरूच होतें. विमल ही वकिली सनदेचा अपील अर्ज घेऊन आली होती, हा विषय माहीत असतांहि, तो तें विसरून गेला होता; आणि आपल्या मित्र-

प्रेमाचे मनोरथ सफळ होतील काय या आशेने तो त्या दोघांच्या हाल-चालीकडे व चेहऱ्याकडे कौतुकाने पाहत होता ! पण त्या दोघांपैकीं एकाचें मन शुद्ध व दुसऱ्याचें सावध असें असल्यामुळे, त्या दोघांकडून मनो-रथाला विशेष वाढती गति मिळेल अशी मदत त्याला या प्रसंगीं झाली नाही. तथापि चित्रकार हा आपण चित्रांत रंगविलेल्या निरनिराळ्या आकृतींकडे सापेक्ष दृष्टीने पाहत असतो; किंवा शिल्पकार हा आपण तयार केलेल्या सुंदर इमारतीच्या लाकडी नमुन्याचे तुकडे एकमेकांना जोडून पाहून आनंद मानीत असतो त्याप्रमाणे, शरीराने दूर असलेल्या या तरुण स्त्री-पुरुषांना आपल्या मनाच्या बैठकीवर किंवा सिंहासनावर बसवून, मनोहर हा "त्यांचें विवाहमंगलच जणुं काय आपण पाहत आहों" अशा रीतीनें मनांत गर्क झाला होता. जुन्या बालविवाहाच्या काळीं, लग्न म्हणजे काय हें न कळणारीं बाल-वधूवरें एकत्र आणून, स्वतः त्यांचें त्यांना न वाटणारें कौतुक हें, एक प्रकारची आत्मौपम्य बुद्धि स्वतःची भरीला घालून, प्रौढ लोक अनुभवीत. तसाच कांहीसा प्रकार मनोहराचा या वेळीं झाला होता. म्हणून एका दृष्टीने त्याला वाटे कीं, वकिलीच्या सनदेचा विषय संभाषण लांबवि-ण्याला अपुरा पडला, तर आणखी अवांतर विषय काढून तें लांबवावें !

पण भूमिकेनुरूप शिष्टाचार हा प्रत्येकाला पाळावाच लागतो. यामुळे ही वरील प्रकारची ब्रह्मदेवाची, किंवा हौशी सनातनी वऱ्हाडयांची, भूमिका टाकून देऊन, चाणाक्ष व समयज्ञ अशा खासगी कारभाऱ्याची किंवा प्रायव्हेट सेक्रेटरीची भूमिकाच या वेळीं मनोहराला अधिक संभाळावी लागली. ही भूमिका म्हणजे अशी—"यजमानांना कोणीहि भेटावयाला आला असतां ती भेट संपविण्याचा इशारा तांतडीने द्यावा ! यजमानांना दुसरें कांही काम नसेना का, पण ते भेटीस आलेल्या मनुष्याशीं इतका वेळ बोलले, हाच मोठा उपकार झाला ! या संभाषणाच्या वेळेंत त्यांचीं इतर महत्त्वाचीं कामें बिघडण्याचा काय घातपात झाला असेल तो सोसूं झालें ! पण आता तरी तो थांबविलाच पाहिजे ! आपले यजमान उदार मनाचे असले तरी वेळ खर्चण्याच्या औदार्याला कांही सीमा हवीच कीं नाही? आणि भिडस्तपणा मोडण्याचें पाप त्याला करवत नसेल तर तें करण्याचें आपल्या नशिबीं

प्रायव्हेट सेक्रेटरी झालों तेव्हाच आलें !" अशा जाणिवेच्या थाटानें यजमानाला वेळेचें अतिक्रमण झाल्याचा इशारा द्यावा हें एक नोकराचें ठरीव काम असतें. आंतून नवलरायाशीं आपले संबंध मित्राचे किंवा भावाचे असले तरी, बाहेर आपणाला नोकर या नात्यानेच वागणें योग्य, हें तो किती जाणून होता, हें आम्ही एका प्रकरणांत वाचकांस सांगितलेंच आहे. म्हणून त्याच भावनेनें,मित्रप्रेमापेक्षा दरबारी रीत हीच त्याने या वेळीं अधिक प्रभावी होऊं दिली. आणि सनदेचें व इकडलें तिकडलें थोडेसें संभाषण होताच, तें आता पुरे असें जाणविण्याकरिता, सुमारें दहा मिनिटांतच तो स्वतःच्या खुर्चीवरून उठला.

या दहा मिनिटांत काय संभाषण झालें,हें सर्व आम्ही सांगत बसत नाही. इतकेंच सांगतों कीं, विमल आत आल्याबरोबर मनोहर उठून बाहेर जाऊं लागला. तेव्हा तिनेच त्याला बसण्याची व आपल्या कामांत मदत करण्याची सूचना केली. मनोहर म्हणाला " वकिलाला पडवकील कशाला !" विमल म्हणाली " आधी वकील तर होऊं द्या मग पडवकील हा शब्द खरा होईल." मग वकिलीची परीक्षा, सनदेची वहिवाट वगैरेंबद्दल चार शब्द झाले. त्यांत संस्थानी कारभार हा खालसांतील कारभारापेक्षा अधिक ढिला व जुलमी हें दर्शविणें विमलला ओघानेच प्राप्त झालें. मग आजवर सनद कां काढली नाही असा मुद्दा निघाला. तेव्हा आपणाला आई–बापाच्या सेवेकरिता गांवांतच राहावयाचें, पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणीं जावयाचें नाही, ज्ञानाकरिता, हौसेकरिता परीक्षा दिली, द्रव्यलोभाने नाही, व आजहि सनद घेण्याचें कारण तरी भावावर आलेला प्रसंग—या गोष्टी विमलला सांगाव्या लागल्या. त्याचा परिणाम, तिच्या चारित्र्याच्या दृष्टीनें, नवलरायाच्या मनावर काय झाला असेल हें वाचकांनी आपल्याच मनाने ठरवावें. असो. दरबारी रीतीप्रमाणे अर्जदाराला अर्ज बहाल करावयाचा असला तरी समक्ष भेटींत तसें सांगत नाहीत. जणुं काय अर्जदार हर्षवायु होऊन तेथेंच पायाशीं पडून मेला तर !] म्हणून 'मागाहून कळवूं' असें म्हणतात. तेंच उत्तर नवलरायाने विमलला दिलें व त्याला मनोहराने नुसता होकार भरला. मग अवांतर एखादा विषय

अगदीच न बोलणें हें स्त्रीदाक्षिण्याला शोभत नाही म्हणून, नवलरायाने सहज प्रश्न केला कीं, "तुमच्या वकिलीचा अभ्यास किती दिवसांत झाला ?" त्यावर तिने "अवघ्या एक वर्षांत" असें म्हटल्याबरोबर,आपणा स्वतःहून अधिक बुद्धिवान अशा स्त्रीशीं बोलत आहों ही खात्री पटून तो मनांत चूरच झाला. कारण पूर्वी राजकुमार कॉलेजांत असतांना कायद्याचा अभ्यास किती कठीण असतो हें नवलरायाला कळून आलेंच होतें ! मग 'नेहमी उद्योग काय करतां ?' असा प्रश्न सहजच आला. तेव्हा तिकडूनहि विमलच्या मनाची सुसंस्कृति, शिक्षणप्रेम, आणि परोपकारबुद्धि हीं न सांगतां समजून आलीं. तेव्हा सहज नवलरायच्या तोंडून शब्द गेले कीं "या गांवचीं लहान मुलें मोठीं भाग्याचीं दिसतात!" हें ऐकताच मनोहराचें मन हंसून त्याला म्हणालें, "पाहा, तुझ्या गळाच्या तोंडाशीं मासा खेळूं लागला रे लागला !' या विचाराने उमटणारें हास्य लपविण्याकरिता खिडकीशीं जाऊन कांही तरी पाहण्याचा बहाणा करून त्याला परत येऊन बसावें लागलें. मग विमलच्या शिक्षणसंस्थेला संस्थानी सरकाराकडून कांही मदत मिळते का ? असें नवलरायाने विचारलें तेव्हा तिने सांगितलें कीं, "स्त्रीशिक्षणाच्या संस्थेला सरकारी मदत म्हणजे सुशील शिक्षकिणीवर ती एक आपत्तिच होय. मात्र हीं लहान मुलें मीं माझीं म्हणतें तीं संस्थानी सरकारानेहि आपलीं म्हटलीं तर मला त्यांत आनंदच होईल." पण हें बोलत असतां तीं दोघे एकमेकांकडे पाहत आहेत, याचा फायदा घेऊन मनोहर म्हणाला, "आपलेपणाचे डोळे दोन पण दृष्टि एक होईल तेव्हाच तें घडावयाचें !" पण लगेच या कोटींतील गर्भित नाजूकपणा छपविण्याकरिता तो अडखळत मिस्कीलपणाने म्हणाला, "मौज हीच वाटते कीं, मुलांची काळजी लेकुरवाळ्या आईबापांपेक्षा कित्येक वेळा अविवाहितांनाच ती अधिक वाटते !" पण मनोहराचें हें बोलणें उगीच कांही तरी आहे असें भासविण्याकरिता नवलराय म्हणाले, "अविवाहितांच्या मनांत मुलांच्या शिक्षणाविषयींचें जें प्रेम असतें तें विवाहितांच्या मनांतील अपत्यप्रेमाहून अधिक असेल तर तसें घडेलहि !"

मग आपण फजीत झालों नाहीं हें दाखविण्याकरिता मनोहराने एक नवाच प्रश्न काढला. तो म्हणाला, "आमच्या गांवांत मुलींची एक शाळा आहे. पण बरेच दिवस ती ओसाड पडलेली पाहतों. मग काय शिक्षिकिणी मिळत नाहीत म्हणून ? संस्थानच्या बजे-टांत मास्तरणींच्या पगारावर रक्कम तर टाकलेली दिसते. किंवा असेंहि कदाचित् असेल कीं, मास्तरणी पगार घेत असतील पण इतरच कांहीं उद्योग करीत असतील." विमलला मनोहराचें हें बोलणें आवडलें नाही.ती म्हणाली, "याचें खरें कारण सांगावयाला मला संकोच वाटतो. पण योग्य पगार दिला असता शिक्षकिणी मिळत नाहीत, किंवा पगार तेवढा घेऊन बेमानी-पणाने त्या इतर काम करतात, हे दोनहि आरोप खरे नाहीत. मास्तरिणी न टिकण्याचें कारण दुसरेंच आहे. लागोपाठ पूर्वीच्या दोन मास्तरिणी, संध्याकाळीं रजेचा जरूरीचा रिपोर्ट पाठवून, आपली अब्रू बचावण्याकरिता रातोरात गांव सोडून निघून गेल्या. आणि तिकडून त्यांनी राजीनामेच पाठविले ! आणि रिकामी जागा भरण्याकरिता परवा शिक्षणाधिकाऱ्यांनी वर्तमानपत्रांत जाहिरात दिली तींत असें लिहिलें होतें कीं, "अर्जाबरोबर अर्जदारणीने आपला पत्ता व फोटो पाठवावा." मी बोललें यांत अतिप्रसंग असेल; पण गरीब सुशील मास्तरिणींवर यांनी केले ते भलते आरोप मी कसे ऐकून घेऊं ?"

झालें ! मनोहराने मध्ये तोंड घातलें तों त्याच्या तोंडांत बरोबर चपराक बसली ! मनोहर सहज म्हणून बोलावयास गेला, पण त्यामुळे विमलचे अंगीं असलेला स्त्रीजातिविषयींचा अभिमान सहजच प्रज्वलित झाला. आणि मग या तेजांत ते दोघेहि दिपून गेल्यामुळे बोलणें थांबलें; व विमलहि 'मी येतें तर' असें म्हणून उभी राहिली, आणि नमस्कार झाल्यावर मनोहर तिला पोंचविण्याकरिता जिना उतरून गेला.

हा लहानसा संभाषणाचा प्रसंग. पण तेवढ्यांत विमलच्या अंगचे अनेक गुण नवलरायाच्या अनुभवाला इतके आले कीं, तिच्याविषयींच्या प्रेमभावनेंत आदरबुद्धीची भर पडून त्याला, आपण संस्थानिक असलों तरी मनुष्य या नात्याने तिच्याहून किती कमी योग्यतेचें

आहों, हें मनावर बिंबलें ! मनोहर खालून वर येईपर्यंत तो बसल्या जागीं खिळून राहिला; व दिवाणखान्याच्या तक्तपोशीवर त्याची दृष्टि खिळून राहिली. मग तेथे कोणतीं चित्रें त्याला दिसत होतीं हें कोणी सांगावें ?

त्या दिवशीं तिसरे प्रहरीं संस्थानाच्या वकिलीची सनद एका मोहोरबंद पाकिटांत घातलेली विमलकडे तिच्या घरीं रवाना झाली. यापूर्वी दिवाणसाहेब रीतीप्रमाणे प्रकरणाची सुनावणी करण्याला राजवाडयांत गेले. तेव्हा सनदेच्या विषयाची चर्चा ते व यजमानसाहेब यांच्या दरम्यान झाली हें सांगावयास नकोच. दिवाणसाहेबांनी कायद्याची भाषा काढली, तेव्हा "स्त्रियांना सनद देण्याची वहिवाट नसली तरी ती देऊं नये असा कायदा आहे काय ?" असें विचारून नवलरायाने त्यांना मोडून काढलें. तरी दिवाणसाहेब म्हणालेच, "स्त्रिया वकिली करूं लागल्या म्हणजे न्यायाचें खोबरें झाल्याशिवाय राहावयाचें नाही." त्यावर महाराज म्हणाले, "न्यायकोर्टांत स्त्रिया वकील म्हणून न आल्या तरी साक्षीदार म्हणून येऊ शकतील कीं नाही ? आणि स्त्रीदर्शनाने मोहून जाऊन स्त्री साक्षीदाराची जबानी खरी असें न्यायाधीश म्हणेल असें मानलें तर पंचाईत होईल ! पण त्याहून अधिक पंचाईत दोन स्त्रिया परस्पर विरुद्ध साक्ष देणाऱ्या आल्या, तर होणार नाही काय ? तसेच वादी व प्रतिवादी या स्त्रिया असल्या तरीहि तीच गोष्ट व्हावयाची. कारण जी स्त्री अधिक सुरूप व लोभवश होण्यासारखी तिच्याच बाजूचा न्याय व्हावयाचा !" या समर्पक युक्तिवादाला दिवाणसाहेब कसें उत्तर देणार ! महाराज असेंहि म्हणाले कीं, "अन्याय व्हावयाचाच तर स्त्रीदर्शनाइतकीच लांचलुचपत, मित्रांची भीड, आप्तांचा ऋणानुबंध हीं प्रभावी मोहनास्त्रें नाहीत काय ?" ते म्हणाले, "मला न्यायदानाचा अजून अनुभव नाही म्हणून तुम्हाला विचारलें." त्याचा सरळच रोख असा होता कीं, "या मोहनास्त्रांचा प्रभाव तुमच्यावर अनेक वेळां झालेला असेल, मग येऊन जाऊन स्त्रिया वकील होण्यावरच उगीच येवढा कटाक्ष कां ?" पण महत्त्वाचीं कारणें आधी सांगून क्षुल्लक कारणें शेवटीं सांगून, जणुं कांही आपण त्यावर भर देतों असा बहाणा करणें, हा थट्टेचा एक प्रकार असतो. त्याप्रमाणे महा-

राजांनी शेवटीं दोन कारणें सांगितलीं. ते म्हणाले, "ज्या स्त्रीला खालसांतील हायकोर्ट सनद देतें, तिला संस्थानी दरबाराने सनद देत नाही म्हणणें हा ब्रिटिश सरकाराचा अपमान होईल कीं नाही सांगा !" हें कारण महाराजांनी खऱ्या मनाने पुढे आणलें नसलें तरी दिवाणसाहेबांच्या मनावर मात्र त्याचा फार परिणाम झाला. आणि सर्वांच्या शेवटीं जशी कांही टवाळी करावी अशा स्वराने महाराज म्हणाले, "अहो, सनदेचे पांचशें रुपये मिळतात ते उगीच कां बुडवा !" संस्थानाचें उत्पन्न बुडूं नये अशाविषयी दिवाणसाहेब फार दक्ष असतात असा टोला पूर्वी एकदा महाराजांनी त्यांना दिला होता. दहा हजारांचा ऐवज पोलिटिकल एजंटाच्या मडमेला द्यायला काढला; पण जिन्नस घालून रुप्याचें तबक द्यावयाचें तें अगदी लहान असावें अशी दिवाणसाहेबांची सूचना आधारभूत घेऊन, रुप्याच्या तबकासकट सगळा अहेराचा ऐवज देण्याचें रहित करून, त्यांनी दिवाणसाहेबांची थट्टा पूर्वी केली होती, हें एका प्रकरणांत वाचकांनी वाचलेंच आहे. विमल स्त्री म्हणून तिला सनद देऊं नये या दिवाणसाहेबांच्या मोठ्या मुत्सद्देगिरीच्या धोरणाची फजिती या वेळीं त्यांनी पांचशें रुपयांचें आमिष दाखवून केली !

प्रभाकराला कोणत्या जागीं कैदेंत ठेवावें येथपासून मतभेदाला सुरुवात झाली होती. वकिलीची सनद ही त्याचीच दुसरी पायरी. पण दैवयोगाने तिसरी पायरीदेखील आजच रचली जाण्याचा योग आला. तो असा.

दत्तविधान उधळलें त्या क्षणापासून प्रभाकर परत आल्याचा बोभाटा गांवभर झाला. दिवाणसाहेब दत्तविधानाला निघाले तेव्हाच, आज कांही अपूर्व आहे असें लोकांना वाटलेंच होतें. एक वेळ गळ्यांत घंटा घातलेला हत्ती रस्त्यांतून न कळत जाऊं शकेल; पण दिवाणसाहेबांची स्वारी निघाली कीं, तो रस्ता गजबजून जावयाचा. दत्तविधानाच्या वेळीं डबिरांच्या घराबाहेर बरीच गर्दी झाली होती. आणि प्रभाकराने शेवटीं येवढा उंच सूर काढून सर्वांना चालते व्हा म्हणून सांगितलें. तें या जमावाने ऐकलें. आणि त्या पाठोपाठ तोंडें खाली घालून गेलेले दिवाणासुद्धा सर्व लोक त्यांनी पाहिले. अर्ध्या घटकेंत गांवभर पुकारा झाला, त्यांत दत्तक फसला हा थट्टेचा म्हणून विषय झाला तरी, प्रभाकर परत आल्याच्या

बातमीने सगळ्या गांवाला आनंद झाला. कारण तो तसाच लोकप्रिय होता. तो गुंड असला तरी परोपकारी गुंड, सत्प्रवृत्तीचा गुंड, न्यायाला मदत करणारा गुंड, अधिकाऱ्यांचीं बिंगं उघडीं करणारा गुंड, आणि सर्वांत मोठी गोष्ट ही कीं, गांवच्या पोरीबाळींची अब्रू वांचविणारा गुंड अशी त्याची ख्याति होती. त्याची स्वारी रस्त्यातून निघाली म्हणजे चार संवगडी बरोबर असावयाचेच. सर्वांच्या अंगांत तालमीच्या मातीने रंगलेले मुंडेछाट सदरे, डोक्यावर ठेवून दिलेल्या वाकड्या टोप्या, हातांत छड्या, आणि पिंढऱ्या उघड्या पडतील इतके उंच मारलेले धोतराचे काचे, असें हें टोळकें रस्त्यांतून निघालें म्हणजे सर्व लोक आदराने त्यांच्याकडे पाहत व अधिकाऱ्यांना नाहीत इतके मुजरे त्यांना झडत. बँड वाजवीत व बूट खडखडावीत पोलिसांची सबंध तुकडी रस्त्यांतून चालली तरी तिचा दरारा लोकांना जितका वाटे त्याहून, प्रभाकर व त्याची तालीमबाज चौकडी यांचा अधिक वाटे. तो फरारी झाला तेंव्हा प्रथम चार दिवस अज्ञानाने लोकमत त्याविषयीं किंचित् कलुषित झालें होतें, पण लवकरच तें निवळलें. पहिली चौकशी झाली ती प्रभाकराच्या गैरहजेरींत आणि गुळाचा गणपति गुळाचा नैवेद्य अशी. पण पुढे साथीदार म्हणून शिक्षा केलेला विनायक लोंढे हा माफी मागून सुटून बाहेर आला. तेव्हा खरी हकीकत आपोआप बाहेर पडूं लागली. तेव्हापासून लोक प्रभाकराची मोठ्या उत्कंठेने वाट पाहत राहिले होते. आणि आता तो अशा अभावित रीतीने फार दिवसांनी प्रकटच झाल्यामुळे त्याच्या प्रेमाने लोक बेहोष झाले. त्याचें आता काय होणार हाच विषय ज्याच्या त्याच्या तोंडीं. विनायक लोंढे हा अलीकडे नवलपूरला येऊं लागल्यापासून त्याच्या पश्चात्तापाचा हृद्रोग बळावला होता. म्हणून प्रभाकर परत आला व त्याला फिरून अटक होऊन तो कैदेंत गेला, हें कळतांच त्याने या कामीं न्याय मिळविण्याचा निश्चयच केला! न्यायमुनसफीचें काम हवें तसें कांही व्हावयाचें तर खुद्द संस्थानिकाची गाठ घेणें अवश्य. पण बन्या (म्हणजे विनायक लोंढे) याला दरबारांत कोण विचारणार! म्हणून त्याने खालसांतील शिकलेल्या मतप्रसाराच्या साधनांचा उपयोग करून ताबडतोब दौंडी पिटवून जाहीर सभा भरविली. नगरश्रेठ

धीरजलाल यांना अध्यक्ष केले. आपल्या खोट्या साक्षीचा पाढा सभेंत सर्व वाचून दाखविला; आणि महाराजांकडे शिष्टमंडळ नेण्याचा ठराव करून घेतला.

विमलच्या सनदेसंबंधाने महाराज व दिवाणसाहेब यांचें संभाषण होत आहे हें याच सुमाराला शिष्टमंडळ भेटीला आल्याची वर वर्दी गेली. अर्थात् पहिलें प्रकरण संपलें तरी या करतांहि दिवाणसाहेबांना थांबवून घ्यावयाला हवेंच होतें. शिष्टमंडळ वर आल्यावर नगरशेट धीरजलाल यांनी सभेचा ठराव वाचून दाखविला आणि तोंडीं विनंति केली कीं, प्रभाकराचें हें प्रकरण जुनें शिळें झालें आहे, तेव्हा तें सर्व मिटवून मूठमाती देऊन टाकावें, म्हणजे शहरच्या लोकांना फार बरें वाटेल. ज्यांना कायद्याचें ज्ञान नसतें त्यांना कोणतीहि विनंति करणें अवघड वाटत नाही. आणि कायदा झाला तरी असा कोणता कीं जो संस्थानिक राजी झाला तर दडपून टाकू शकत नाही ? अशीच साऱ्या संस्थानी प्रजेची समजूत असते. पण महाराजांची भावना तशी नव्हती. म्हणून त्यांनी थोडा वेळ, हें प्रकरण माहीत नाही अशा झोकानें, दिवाणसाहेबांकडून लोकांसमक्ष समजून घेतलें. त्यामुळे दिवाणसाहेबांना हुरूप येऊन ते आपण होऊन म्हणाले, "इन्साफ एक वेळ झाला, तो पुनः होत नसतो,आणि न्यायाचीं प्रकरणें अशीं दडपून संपवून टाकतां येत नाहीत." त्याबरोबर विनायक गरम होऊन म्हणाला "झाला तो इन्साफ कसला? ती न्यायाची थट्टा ! न्यायदेवतेची विटंबना !" तेव्हा महाराजांनी सहजच विचारलें कीं, हे गृहस्थ कोण ? तेव्हा तोच "साथी म्हणून शिक्षा झालेला साक्षीदार व माफीच्या निमित्तानें बंधमुक्त झालेला कैदी " अशी माहिती देण्यांत आली. महाराज म्हणाले, "मग काय? ज्या एका साक्षीवर विश्वास ठेऊन डबिरांना शिक्षा झाली ती साक्षच खोटी व बनावट होती ! आणि स्वतः साक्षीदारच मी खोटी साक्ष दिली असें आपल्या तोंडानें सांगतो ?" विनायक म्हणाला " होय महाराज, दुर्दैवानें तशी वस्तुस्थिति आहे खरी ! " महाराज म्हणाले, " मग तुम्ही कटाच्या खटल्यांतून माफी मागून सुटलां तरी आता खोटी साक्ष दिल्याबद्दल तुमच्यावर खटला होईल त्याची वाट ?" विनायक म्हणाला, " खोट्या साक्षीचा खटला होऊन

शिक्षा होईल तर तेंच माझें खरें प्रायश्चित. पण प्रभाकराची सुटका झाली पाहिजे."

नंतर गुन्हेगाराच्या, म्हणजे ज्याच्यावर फौजदारी फिर्याद झाली त्याच्या, गैरहजेरींत इन्साफ होऊंच शकत नाही असा मुद्दा विनायकानें मांडला. कारण त्यानें बी. ए. झाल्यानंतर कायद्याचा थोडा तरी अभ्यास केला होता. पण दिवाणसाहेब पडले अनुभविक न्यायाधीश! त्यांनीं आपल्या 'मतलब-सिंधू'तील उलट आधार सांगितला. पण अशा भानगडीच्या प्रकरणाचा निर्णय अशा खासगी बैठकींत करतां किंवा सांगतां येत नाही, म्हणून शेवटीं महाराजांनी आपल्या 'अज्ञानसिंधू'चा आधार देऊन "ठीक आहे मी करतों विचार" असें थाटाचें पण पोकळ उत्तर देऊन नगरशेट व इतर मंडळी यांना लावून दिलें. मग ते दिवाणसाहेबांना म्हणाले, "कायहो दिवाणसाहेब! तुम्ही तर या खटल्यांतील फिर्यादीच. मला न्यायकोर्टांत अधिकार असला तरी कायद्याचें ज्ञान नाही. आणि हें प्रकरण तर असें दिसतें कीं, यांत सगळ्या गांवाचा जिव्हाळ्याचा संबंध. तेव्हा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे वर पोलिटिकल एजंट साहेबाला लिहून खालसांतील एकदा चांगला वकीलच स्पेशल पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणून बोलवावा. त्यानें झाला इन्साफ हाच पुरे असें सांगितलें तर कामच झालें. आणि नवा इन्साफ होणें जरूर असा सल्ला त्यानें दिला तर तिकडूनच एखादा स्पेशल न्यायाधीश बोलावूं म्हणजे झालें!"

कायद्याच्या प्रश्नावर असा स्वतंत्र सल्ला घेण्याचा बूट महाराजांनी काढतांच दिवाणसाहेबांच्या मनानें कच खाल्ली, व त्यांना दहशत बसली. पण महाराज बोलले तें रीतीचेंच असल्यामुळे 'जसें आपल्या मर्जीस येईल तसें करावें' इतकेंच म्हणून ते दुमुखलेले असे जिना उतरले.

घरीं येताच त्यांनी तावडतोब एक लांबलचक पत्र पोलिटिकल एजंट-साहेबांच्या शिरस्तेदाराच्या नांवानें स्वहस्तें लिहिलें; आणि लगेच आपल्या विश्वासू जमादाराला हांक मारून तें मोहरबंद करून आपल्या टेबलाच्या कुलपी-खणात ठेऊन दिलें. मग जमादाराला तोंडीं हुकूम दिला कीं, "जिल्ह्याचे

गांवी उद्या सकाळच्या दहाच्या गाडीने तुला शिरस्तेदारांच्या नांवचें एक पत्र घेऊन जावयाचें आहे, त्याची तयारी करून ठेव."

पण पत्रें लिहिलीं म्हणून तीं सर्व त्यांच्या मुकामाला पोंचतातच असें कुठे आहे? सरकारी टपाल खात्याने 'डेडलेटर ऑफिस' म्हणून एक कचेरी ठेवली आहे. त्यांत 'मृत 'पत्रें जाऊन पडतात व तेथून त्यांचा बटवडा होतो किंवा शेवटीं नाश होतो. या कचेरीचा व्यवहार पाहावयास सापडणारे लोक असें सांगतात कीं, 'डेडलेटरा'चा म्हणजे 'मृतपत्रा'चा इतिहास फार मनोरंजक असतो. पत्रालाहि मृत्यु असतो! आणि त्याचीं कारणें सांगावयाचीं तर, मनुष्यमात्राच्या अनवधानतेचें, गाफीलपणाचें, मूर्खपणाचें, भोळ्या समजुतीचे, खोटया अहंकाराचे, व शेवटीं अज्ञानाचे जितके म्हणून प्रकार असूं शकतात त्या सर्वांची जंत्रीच करून मांडावी लागेल.या सर्व उपाधी असून त्या पत्ररूपी जीवाला त्याचा इष्ट मोक्ष मिळण्याच्या आड येतात. चौऱ्यायशी जन्म फिरल्यानंतर तरी जीवाला मनुष्य जन्म हटकून मिळतो.पण चौऱ्यायशी ठिकाणीं पत्ते बदलून व निराशा आणि अस्वीकाराचा अपमान याच्या दुःखाचे छाप व ठसे अंगभर सोसून, जेव्हा दमून भागून पत्र 'मृतपत्रां'च्या कचेरींत जातें, तेव्हा तें मृतप्राय होतें, आणि ठराविक अवधीनंतर तें आता पूर्ण मेलें असें समजून जिवंतपणींच त्याचा दहनविधि होतो ! [ मुसलमानांनी मुसलमानांना ऊर्दू लिपींत लिहिलेल्या पत्रांचा दहनविधि हा धर्मविरुद्ध असल्यामुळे त्यांचा दफनविधि करण्यांत यावा असा ठराव असेंब्लींत येणार आहे म्हणतात. पण तूर्त तरी त्यांचाहि दहनविधि होतो.] किंवा एखाद्या कागद तयार करण्याच्या कारखान्यांत तें पत्र गेल्यास त्यावर समंत्रक शुद्धोदकाचें सिंचन होऊन त्याला देहांतर करतां येतें.

असो. अशा रीतीने कांही पत्रांना रीतसर यथाकाल मृत्यु येतो, तथापि कांही पत्रांना मृत्यु न येता कांही तरी अपघात होतो. त्याचा एक प्रकार असा कीं, मालकाचा पत्ता लिहून प्रवासाला पाठविलेलें पत्र, वाटेवर कोणत्या मधल्याहि ठराविक मुक्कामाला न पोंचतां, तिसऱ्याच्याच हातीं लागतें आणि अपमृत्यु टळला म्हणजे जीवाला अधिक आयुष्य लाभतें असें

म्हणतात त्याप्रमाणे, अशा रीतीने भलत्याच्याच हातांत पडलेलें एखादें पत्र विशेष काळजीने संभाळलें जातें! त्याला ठेवणीच्या दप्तरांत किंवा खासगी कपाटाच्या चोरखणांत सुरक्षित जागा मिळते! आणि पुढे केव्हां त्याचा कोणी अपहार करील किंवा नाश होईल म्हणून त्याच्या लिंगदेहाचें सूक्ष्म शरीराचें छायाचित्र घेऊन संभाळण्यांत येतें. बिचाऱ्या पत्राची अशीं उलटसुलट केवढीं तरी स्थित्यंतरें!

---

## प्रकरण विसावें

# माशाचें पोट चिरणारी सुरी !

असो, दिवाणसाहेबांनी पो. एजंटसाहेबांच्या शिरस्तेदाराला जें पत्र पाठविण्याकरिता खास जासूदाच्या हातीं दिलें म्हणून मागील प्रकरणांत सांगितलें त्याला असाच अपघात झाला. त्याचा प्रकार असा. या जासुदाला वाटखर्ची देऊन दिवाणसाहेबांनी "पत्र नीट संभाळ आणि शिरस्तेदार-साहेबांच्या हातीं दे" असें बजावून रवाना केलें. तें पत्र त्याने आपल्या बंडीच्या खिशांत नीट ठेवलें. आणि प्रवास पुरा करून यायला दोनतीन दिवस लागणार म्हणून थोडे खाण्याचे पदार्थ आणि धोतर–पांघरूण घेण्या-करिता तो आपल्या घरीं निघाला. वाटेवर सुभेदारसाहेबांचें घर लागलें. त्यांच्या दारांत सुभेदारसाहेबच स्वतः उभे ! त्यांना पाहून जासुदाने रामराम केला. सुभेदार हे दिवाणसाहेबांच्या घरीं दिवसांतून एकदोनदा तरी जाणारे, त्यांच्या घरीं खाणारे पिणारे, ख्यालीखुशालींत सामील होणारे, जिवलग दोस्त! आपणा-ला धन्याने मोठ्या महत्त्वाच्या व विश्वासाच्या कामगिरीवर धाडलें आहे याविषयी वाटणारा गर्व बोलून दाखवायला, त्याला घरच्यासारखा मनुष्य व दिवाणसाहेबांचा परममित्र भेटल्यामुळे, उभें राहून त्याच्याशीं दोन शब्द बोलावे असें त्याला सहजच वाटलें.

सुभेदारांनी त्याला सहज म्हटलें, "पण काय रे, तूं कुठं चालला आहेस, सुभान्या ! जरा गर्दीत दिसलास म्हणून विचारलें."

सुभान्या म्हणाला "लई जोखमदारीच्या कामावर! ह्य पत्रावरची मोहोरा बगा जाड लाखेन केल्याती ! ताबडतोब जिल्ह्याला जायचा आणि एजंटसाहेबां-च्या शिरस्तेदारसाहेबांना हें पतर द्यायचा हुकूम झालाया मला धनीसाबांचा !"

असें म्हणून जासुदाने आपण होऊन बंडीच्या खिशांतलें मोहोरबंद पत्र काढलें आणि सुभेदारसाहेबांच्या हातीं दिलें. तें क्षणभर उलथून–पालथून पाहिल्यावर सुभेदारांच्या मनांत कसलीशी कल्पना आली, व ती अकल्पित

रीतीने आल्यामुळे त्यांना विजेचा धक्का बसावा असा बसून शरीर खरोखरच हललें. तो लखोटा तसाच हातांत धरून ते म्हणाले, "पण काय रे, आगगाडीच्या टेमाला अजून किती तरी उशीर आहे ! मलाहि पण जिल्ह्यालाच जायचें आहे पुढच्या गाडीनें, डि० कोर्टांतल्या कांही कामाकरिता. काम दोन पैसे मिळण्याचें आहे. एका श्रीमंत पक्षकाराची व एका मोठ्या वकिलाची गांठ घालून देऊन शिफारस करायचें काम आलें आहे माझ्याकडे. तूं माझ्याबरोबरच येत असलास तर माझ्या सेकंड क्लासच्या तिकिटाबरोबरच तुझेंहि नोकराचें म्हणून तिकीट काढीन. सहजा-सहजीं बरेंच झालें नाही का ? तुला गरीबाला दोन रुपये मिळाले तर ! तुझी राहण्याजेवणाचीसुद्धा सोय मला करतां येईल !"

जासुदाच्या तोंडाला पाणी सुटलें. सुभेदार फुकट तिकीट काढतील तर दिवाणसाहेबांनी दिलेल्या वाटखर्चीच्या रकमेंतले दोन रुपये उरतील, ते सहज न कळत खिशांत टाकतां येतील. या विचाराने तो आनंदून म्हणाला "जशी आपली मर्जी, सुभेदारसाब. आपण माझ्या गरी-बाच्या हिताला सदा जपतांच नव्ह का ? पण घरीं जाऊन बेगी बेगी येऊं म्हणतां ? जातों, दोन घास खाऊन कांबरूण घेऊनशान येतो बगा याच पावलीं."

"अरे, दोन घासच खायचे तर घरींच कशाला जायला पाहिजे ? मीं आता बसणारच आहे जेवायला. तुझेंहि पान सांगेन घालायला बाहेर पड-वींत माझ्याचबरोबर. म्हणजे गाडी बोलावली आहे त्यांतूनच जाऊं दोघे-मिळून स्टेशनावर."

"जेवलों बी असतों हतच. पण दोन दिस परगांवाला जायचं तवा कारभारणीला सांगाया होव. आणि कांबरूण धोतर बी घ्याया होव. मिळून काय जाया होवच, तवा दोन घास बी खाऊन घेईन. आपलं जेवाण व्हत तवर आलोच बगा मीं बिगी बिगी !"

असें म्हणून सुभेदारसाहेबांच्या हातांत दिलेलं पत्र परत घेण्याकरिता त्याने दोन हातांची ओंजळ पसरली. पण सुभेदारांच्या मनांत तें पत्र त्याला परत देण्याचें नव्हतें. म्हणून त्यांनी तें त्याच्यादेखत आपल्या शॉर्ट कोटा-

च्या खिशांत घातलें, आणि त्याला म्हणाले, "काय वेडा आहेस रे, सुभान्या ! असलें महत्त्वाचें पत्र अशा घाईत घरीं कशाला नेतोस ? घरीं मुलेंबिलें खिशांत हात घालून खेळायला घेऊन फाडायचीं, तांबडया लाखेचा चांद पाहून ! निदान तें घाण तरी व्हायचेंच. राहूंदे तें मजजवळच. आगगाडींतून जिल्ह्याला उतरलों म्हणजे आधी तुला तांग्यांतून शिरस्तेदार-साहेबांच्या घरीं पोचवीन आणि मग पुढे जाईन. नाही तर या खेपेला मीहि त्यांच्याचकडे उतरेन. मला कायमचें पाहुणचाराचें आमंत्रणच आहे त्याचें." इतकें बोलून ते इकडे तिकडे कानोसा घेतल्यासारखें करून हलक्या गुप्त गोष्टी बोलण्याच्या आवाजांत म्हणाले, "अरे, हें पत्र माझ्याच कामाचें आहे समजलास ! तें दत्तविधान त्या दिवशीं उधळलें, त्याच्याच बाबतींतलें आहे हें पत्र शिरस्तेदारसाहेबांना. आणि त्यांतलेंच थोडसें काम माझेंहि आहे जिल्ह्याला. हें पत्र अगदीं प्रवासी ट्रंकच्या कुलपाच्या खणांत गेलें म्हणून समज. जा, लवकर जा. आणि जेऊन धोतर–बितर काय घेऊन यायचें असेल तें घेऊन ये. तांगा तयार आहे. उगीच उशीर मात्र करूं नको हां ! गाडी चुकेल." असें बोलून उत्तराची वाट न बघतां ते तडक घरांत निघून गेलेहि. बिचारा जासूद ! एवढया मातबर माणसावर, त्यांतूनहि आपल्या धन्याच्या जिगरदोस्तावर व रोज हाताळण्याच्या त्यांच्या हस्तकावर, तो बिचारा अविश्वास कसा दाखविणार ? सुभेदारांच्या कृपेने दोन रुपये मिळण्याचा योग त्याच्या डोक्यांत होता तोच बळावून तो तसाच मागे वळला आणि जेऊन घेऊन कारभारणीचा निरोप घेण्याकरिता आपल्या घराकडे निघाला.

सुभेदार चाणाक्ष होता. त्याच्या लक्षांत हें तेव्हाच आलें कीं या मोहोर-बंद पाकिटांत फार महत्त्वाचा असा कांही तरी मजकूर असणारच. तो दत्तक–प्रकरणीं किंवा प्रभाकर–प्रकरणीं किंवा दोनहि प्रकरणीं असेल. तरी तो काय तो अवश्य पाहावा. मोहोर फोडून पाकीट उघडावें, आणि फिरून वेगळ्या पाकिटांत घालून त्यावर आपल्या हाताने दिवाणसाहेबांसारखें अक्षर काढून भली थोरली लाखेची चकती लावून तें स्वतःच नेऊन शिरस्तेदारांना पोंचवावें. दिवाणसाहेबांचा व आपला स्नेह किती दाट आहे हें

शिरस्तेदारांना माहीतच आहे. सगळेच आपण एका बैठकीला बसणारे; तेव्हा त्याना संशय येणार नाही. आणि घाईने पत्र देऊन आपणाला दिवाणसाहेबांनी मुद्दाम रवाना केलें, व बरोबर त्यांनी आपला खास पट्टेवाला दिला अशी थाप मारली म्हणजे सगळें कांही संपादून जाईल. असा विचार करून त्यांनी आपली ट्रंक भरली, व बिछाना बांधला. घरांत जेवण्याच्या तयारीची गोष्ट त्यांनी पट्टेवाल्याला सांगितली ती निवळ थाप होती. पण असल्या घाईचें काम जेवणाकरिता थांबून बिघडविणाराहि तो गृहस्थ नव्हता. त्याने घरच्या कुणबिणीला चौकांतून तांगा आणावयाला सांगितलें, व खिशांतलें पाकीट हाताळीत तो माडीवर गेला.

तांग्यांत बसायला सुमारें अर्धा तास होता. त्याने माडीवरचें दार बंद केलें. एक कोरें पाकीट, लाख, सील, मेणबत्तीचा दिवा इतकें सामान त्याने आणून जवळ ठेवलें आणि कातरी घेऊन पाकिटाची एका बाजूची शीर बरोबर नाजूक हाताने कापून त्याने आंतलें पत्र काढलें व वाचलें. तें वाचून तो क्षणभर स्तंभितच झाला. विशेषतः त्यांतला पांच हजार रुपयांचा उल्लेख वाचून, आणि आपल्याला शिवी देऊन तुच्छतेने उल्लेख केलेला पाहून त्याला सहजच फार राग आला. लगेच स्वार्थस्फूर्तीने व सूडाच्या भावनेने त्याच्या तोंडून खालील स्वगत भाषण केल्यासारखे उद्गार निघाले. "दत्तक फिसकटला हें माझें दुर्दैव खरेंच. पण याचें दुःख या चंडाळाला कांहीच नाहीं. आणि आपल्या बापाचा माल म्हणून येवढी पांच हजारांची रक्कम मात्र गडप करायची याची तयारी! उद्या मारवाडी माझ्या बोकांडीं बसणार! ठीक आहे. दत्तक हुकला तर हुकूं दे. पण या पत्राच्या बळावर म्हणावें लेका आता तुला ते हरामाचे पांच हजार ओकायला न लावीन तर नांवचा सुभेदारच नव्हे."

इकडून तांगा व तिकडून जासूद एकदमच दाराशीं आले. तेव्हा सुभेदारांनी आपलें सामान खाली आणवून तांग्यांत ठेवून ते स्वतः मागच्या बाजूला चढून बसले व पुढच्या बाजूला त्यांनी जासुदाला बसवून घेतलें. स्टेशनावर बूकिंग ऑफिसर्शी जाऊन त्यांनी आपल्याकरिता अवघ्या चार मैलांवरच्या पुढच्या स्टेशनाचें दुसऱ्या वर्गाचें तिकीट काढलें, आणि जासुदा-

करिता जिल्ह्याचें तिसऱ्या वर्गाचें काढलें. त्याच्याच हातून आपलें सामान प्लॅटफॉर्मवर नेऊन सगळ्यांत पुढच्या सेकंड क्लासाच्या डब्यांत नेऊन ठेवलें. आणि ऐसपैस जागेचें निमित्त करून त्यांनी जासुदाला सगळ्यांत मागच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत बसविलें. आणि "आता खुशाल झोप घे. आणि मीहि पण झोप घेतों माझ्या डब्यांत" असें सांगून निघून गेले. नंतर गाडी सुटण्याला तीन मिनिटें आहेत तों हळूच हमाला-कडून आपलें सामान उतरवून, पुढे पाठवून, इंजिनाच्या बाजूनें प्लॅटफॉर्मच्या एका फाटकांतून बाहेर पडले व गाडी सुटण्याची वाट भिंतीआडून पाहत उभे राहिले. गाडी सुटली व शेवटच्या डब्यांत जासूद खिडकीकडे पाठ वळवून चंची सोडून तंबाखू खात बसला आहे असें पाहून ते आपल्याशीं मोठ्यानें हंसले. आणि टांग्यांत सामान घालून परत घरीं निघून गेले.

घरीं तासभर स्वस्थ बसून सुभेदारांनी मनाशीं कयास केला. आणि निश्चय ठरल्याबरोबर ते उठून पोशाक करून खिशांत पत्र घालून प्रायव्हेट सेक्रेटरी मनोहरपंत यांच्या घरीं गेले. मनोहरपंत वाड्यांत जाण्याच्या बेतांत होते; परंतु सुभेदार आलेच म्हणून मनोहरपंतांनी त्यांना वर बोलावलें. दोघांची ही प्रत्यक्ष अशी पहिलीच भेट होती. सुभेदारांनी वांकून, जमिनीला हात लावून, नमस्कार केला आणि डोळ्यांत अश्रु आणून ते म्हणाले, "कृत-कर्माचा पश्चात्ताप झालेला हा एक मनुष्य आपल्यापुढे उभा आहे. याला आपण पदरांत घ्यावे."

**मनो.**—"तुमचें दुःख वर्णन करण्यापूर्वी तुह्मी आपलें नांव मला सांगितलें असतें तर बरें होतें. हकीकत मागाहून कळो; पण मनुष्य कोण हें तरी आधी कळलें पाहिजे ना ?"

**सुभे.**—"होय, ती माझी चूक आहे. माझ्या भावनेच्या भरांत मी शिष्टाचार विसरलों खरा. मला सुभेदार म्हणतात.मी या गांवचाच रहिवाशी आणि संस्थानाच्या तैनातदार डबीर–घराण्यांतला एक गोत्रज आहे. माझें नांव आपल्या कानावर कदाचित् आलें असेल."

दत्तकाची हकीकत सगळ्या गांवभर झालेली. तेव्हा मनोहरपंताला ती कळली असल्यास आणि तिच्यांतील मुख्य व्यक्ति म्हणून सुभेदार यांचें नांवहि

त्याला कळलें असल्यास काय नवल! ती हकीकत किंवा तें नांव हीं भलेपणाचीं नव्हतीं; पण या विशेष ज्ञानाची ओळख न देतां पण किंचित् हंसून मनोहरपंत म्हणाले, " अस्सें अस्सें, एकूण सुभेदार ते तुम्हीच! पण तुम्ही दुष्कर्म म्हणालां तें काय ? व तुम्हाला पदरांत घेणारा मी कोण ? व कशाकरिता? याचा मला कांहीच बोध झाला नाही. तरी तें थोडें समजून सांगाल तर बरें."

सुभेदार म्हणाले, " भाऊसाहेब डबीर यांना आपला मुलगा दत्तक देण्याची बुद्धि मला झाली. पण तसे करणें एकंदरीने ईश्वराच्याघरीं रुजू नव्हतें."

**मनो.**—" कां बरें! हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे दत्तक देणें घेणें ही गोष्ट सद्धर्माचीच नव्हे काय? सद्धर्माची गोष्ट ईश्वराच्या घरीं रुजू कां नसावी ?"

**सुभे.**—" इतक्याचकरिता कीं, भाऊसाहेबांचा मुलगा जिवंत असता दत्तक देण्याची खटपट माझे हातून झाली."

**मनो.**—" मी ती हकीकत थोडी परस्पर ऐकिली आहे; पण हेंहि ऐकिलें आहे कीं, मुलगा दत्तक म्हणून मांडीवर देण्याकरिता उचलून उभा करीपर्यंत भाऊसाहेबांचा मुलगा जिवंत होता किंवा परतून येण्यासारखा होता ही गोष्ट तुम्हाला कांही माहीत नव्हती."

**सुभे.**—" होय. स्वतः प्रभाकरपंत माजघरांतून ओटीवर येईपर्यंत तो कोठे आहे याची मला कल्पनाच नव्हती हें खरें आहे. तरी पण न मेलेल्या माणसाविषयी तो मेला किंवा घराला जन्मभर मुकला अशी अज्ञानाने चुकून कल्पना झाली तरी तोहि हातून गुन्हाच झाला असें वाटतें. कारण तो मेला अशी कल्पना करण्यापेक्षा तो जिवंत आहे अशीच कल्पना करून तो केव्हा तरी परत येऊन घरचा धनी होईल म्हणून दत्तकाची खटपट करू नये अशी कल्पना मनाला सुचविणें हें माणुसकीला अधिक शोभणारें नव्हतें काय? पण देवाने माझी चूक मला लाजविण्यासारख्या रीतीने बिनतोड गळ्यांत घातली. म्हणूनच वाटतें कीं, ईश्वराच्या घरीं माझा दत्तकाचा प्रयत्न रुजूं नव्हता. शिवाय या खटपटींत माझे हकनाक पांच हजार रुपये बुडाले. हा ईश्वराने मला दंडच केला."

**मनो.**—" ते कसे बुडाले!"

**सुभे.**—" दत्तक घेण्याविषयी भाऊसाहेबांचें मन वळविण्याकरिता आणि या खटपटींत पोलिटिकल एजंटसाहेबाचे शिरस्तेदार सामील करून घेण्याकरिता फी म्हणून दिवाणसाहेबांनी ती रक्कम मजकडून आगाऊ घेतली. "

**मनो.**—" मग आता दत्तक फिसकटल्यावर तरी तुमची हानि लक्षांत घेऊन ते पैसे त्यांनी तुम्हाला परत द्यावे. "

**सुभे.**—" माशाने गिळलेलें माणिक हातीं कसें लागणार ! "

**मनो.**—" हो. तेंहि खरेंच. पण माणिक गिळणारा मासा स्वतःच धीवराच्या जाळ्यांत केव्हा केव्हा सांपडतो, आणि तो चिरला गेला म्हणजे माणिक परत मिळतें. "

**सुभे.**—" आपण बोललां तें जगांतील सर्वसामान्य न्यायाचें म्हणूनहि बोललां असाल, पण या घटकेला तें ईश्वराच्या स्फूर्तीनेंच बोललां असाल असेंच वाटतें. मासा चिरला म्हणजे पोटांतून माणिक निघेल. पण मोटा मासा जाळ्यांत धरून वर काढावयाचा तर दोहोंऐवजीं चार हात तरी लागतात. तरी आपलीहि मला थोडी मदत होईल तर माणिक परत मिळवावयास मला थोडा धीर येईल. "मासा पकडण्याचें जाळें आणि त्याचें पोट चिरण्याची सुरी हीं दोनहि या लहानशा पाकिटांत आहेत. कशी तीं आपण पहा. म्हणजे हा धीवराचा धंदा माझ्याबरोबर करण्याला आपणालाहि हौस वाटेल. " असें म्हणून सुभेदारांनी खिशांतील पत्र काढून तें मनोहरपंतांच्या हातांत टाकलें. त्यांना प्रथम कांहीच कल्पना होईना. पत्र उलथें करून पाहिलें तों पाकिटावर पत्त्यादाखल शिरस्तेदारांचें नांव आणि पाठविणार म्हणून दिवाण-साहेबांचें नांव. म्हणून तें आश्चर्याने सुभेदाराला म्हणाले, ' हें पत्र माझें नाही. तें मी घेऊन काय करूं ! आणि सगळ्या गोष्टींतली गोष्ट, हें पत्र तुमच्या हातीं कसें आलें' ! "

**सुभे.**—" तें मीच कशाला सांगूं ! तोंड चिरलेल्या पाकिटांत पत्र आहे तें काढून वाचा. म्हणजे सर्व मजकूर आपल्या लक्षांत येईलच. "

मनोहरपंतांनी पाकिट फोडून सर्व पत्र सावकाश आपल्या मनाशीं वाचलें.

पत्र खालीलप्रमाणे होतें:—

" सा. न. वि. वि. आपण नवलपुरास येऊन गेलां. त्यानंतर अनेक अकल्पित व उद्वेगकारक प्रकार घडले व आणखी घडण्याचा बराच संभव दिसतो. नवीन महाराजांनी आपल्या कच्च्या मुखत्यारीचा दुरुपयोग करण्याला प्रारंभ केला आहे. भाऊसाहेबांच्या मांडीवर सुभेदारांचा मुलगा दत्तक देण्याचें ठरून दत्तविधान आता प्रत्यक्ष होणार इतक्यांत काय झालें असें तुम्हाला वाटतें ? स्वतः प्रभाकर अवचित पुढे आला व त्योन तुमच्या—माझ्यासकट सर्वांना वाटेल त्या शिव्या देऊन दत्तविधान उधळून लावलें. आणि आता सुभेदार पांच हजार रुपये मला परत मागूं लागले आहेत. ते आता परत देणें शक्य आहे काय ? याचा आपणच विचार करा ! दत्तविधानाचा, म्हणजे ते यापुढे संस्थानांत बेकायदा ठरविण्याचा कायदा, नवे यजमानसाहेब करण्याच्या विचारांत असल्याचें आपणास माहीत आहेच. त्यापूर्वी हें दत्तविधान उरकण्याकरिता मी व आपण किती खटपट केली हें आपण जाणतच आहां. पण त्या लेका सुभेदाराचें नशीबच फुटकें त्याला काय करणार ? आता तर प्रभाकर डबीर प्रकट झाला इतकेंच नव्हे तर त्याचा खटला फिरून उघड चालावा अशी खटपट सुरू झाली आहे. प्रभाकराला मी पकडून तुरुंगांत ठेवलाच आहे. आणि नुसतें तुरुंगवॉरंट देऊन त्याला जिल्हा तुरुंगांत व तेथून मुंबईहून सरळ अंदमानाकडे पाठवावा असा माझा विचार होता. पण पूर्वीच्या खटल्यांतला समाईक आरोपी व साक्षीदार बन्या हा आता उलटला असून पूर्वीचे सगळे बनावट प्रकार तो छातीठोकपणें उघडकीला आणणार असें दिसतें.

"ही नवी बनावट सर्व अकल्पित एकदम झाली. ती कशी म्हणाल तर मी स्पष्ट सांगतों कीं, हा सर्व कोणी तरी डोकें खाजवून बुद्धि चालवून केलेला कट आहे. एरवीं प्रभाकराला दत्तविधानाची बातमी वेळेवर समजावी कशी ! आणि इतकीं वर्षं फरारी होता तो जमिनींतून वर आल्यासारखा

आयत्या वेळीं प्रकट व्हावा कसा? हा सर्व कट त्या नव्या आलेल्या प्रायव्हेट सेक्रेटरीचा आहे. महाराज व तो लहानपणचे 'लंगोट मित्र' आहेत म्हणतात. त्याच्या आईची म्हणे होती खासगी झाकली खाणावळ! आणि आमचे महाराज होते तींत फुकट जेऊन उष्टीं काढण्याची नोकरी करीत! मग वाढप्या जर संस्थानिक झाला तर त्याचा यजमान हा निदान त्याचा प्रायव्हेट सेक्रेटरी तरी झालाच पाहिजे! उद्या माझ्या जागीं तो दिवाणहि होण्याचा संभव आहे! पण तूर्त अंतर्खासगीचा मालक खरा. तो महाराजांना हातांतल्या बाहुलीसारखा खेळवतो. पण दुसरी एक चालती-बोलती खरीखुरी जिवंत बाहुली या प्रकरणाच्या मुळाशीं आहे. ती म्हणजे प्रभाकर डबीराची बहीण विमलाबाई. तुम्ही मागे आमच्या घरीं मेजवानीला आलां होतां तेव्हा, येवढ्या वयापर्यंत अविवाहित राहिलेले आमचे यजमान व ही घोडनवरी यांचा जोडा आम्ही तोंडानें जमवून दिला होता हें तुम्हाला स्मरतच असेल.पण तेंच आता खरें ठरण्याचा योग दिसतो! पण महाराज व प्राय. सेक्रेटरीसाहेब दोघेहि तरुण पिढीचे सुधारक वीर! इंग्लंड–अमेरिकेला जाऊन नव्या कल्पना घेऊन आलेले ! तेव्हा लग्नविधि व एकपतित्व ही चाल वेडगळ, बिलकुल हिंदु व रानटी! म्हणून विमलाबाईशीं समाईक लग्नाच्या कराराने उभयतांनी राहण्याचें ठरविलें असण्याचाहि संभव आहे ! विमलाबाई वकिलीच्या परीक्षा पास झाल्या आहेत. त्यांना वकिलीची सनद देऊन महाराजांनी संस्थानांत नवा प्रघात पाडलाच. त्या म्हणे आपल्या भावाचा मुकदमा आरोपीतर्फे चालविणार. मग फक्त एकच गोष्ट उरली. प्रायव्हेट सेक्रेटरी, साहेबांना या मुकदम्यांत सरकारी वकील नेमणें हो. ते डाक्तरी विद्या शिकून आलेले आहेत म्हणतात. पण असें कोणतें काम सरकारी आहे—निदान संस्थानांत तरी–कीं जें कोणताहि मनुष्य करूं शकणार नाही? किंवा कामावरच नेमलें तर तें करण्याचा आव आणणार नाही? आपल्याइकडील एका मोठ्या संस्थानांत परदेशाहून जाऊन-शिकून आलेल्या असें नाही हो मी ।म्हटलें—साहेबी टोपी घालणाऱ्यइसमांना मोठ्या नोकरीच्या जागा देण्याचें वेड कसें किती आहे हें

प्रसिद्धच आहे. आणि दुसऱ्या एका मोठ्या संस्थानांत पदवीधर डाक्तर अकाउंटंट–जनरलाचें काम करीत आहेत! तात्पर्य डाक्तर मनोहरपंत उकिडवे प्राय. सेक्रेटरी हे सरकारी वकीलहि का न व्हावे! मग प्रभाकरावरील खटल्याला कौटुंबिक स्वरूप कसें सुंदर येईल आणि न्याय घरगुती कसा होईल तें पाहालच! एक प्रेमपात्र न्यायाधीश, दुसरें प्रेमपात्र सरकारी वकील, व तिसरें प्रेमपात्र आरोपीचा वकील. आणि राजशालक आरोपी! प्रभाकर ज्या दिवशीं कैदेतून मोकळा होईल त्या रात्रीं मला नवलपुरांतून पाय काढावा लागेल हें निश्चित आहे. संस्थान व संस्थानिक मरोत वा वाटेल तो गोंधळ घालोत. मला आपल्या प्राणरक्षणापुरतें पाहिलें पाहिजे.

"तेव्हा आता मुद्दा असा कीं तुमची शिरस्तेदारीची सारी बुद्धि सारी पुण्याई या अवघड प्रसंगांत माझें रक्षण करण्यास धाव घेणार कीं नाही? पोलिटिकल एजंटसाहेब आहेत आयरिशमन म्हणून लहरी आणि त्यांच्या मडमसाहेब आहेत इंग्रज म्हणून कावेबाज! एजंटसाहेबांच्या मनावर यजमानसाहेबांच्या एक प्रकारच्या दिलदारीचा ग्रह फार चांगला झालेला आहे. आणि मडमसाहेब मजवर अशाकरितां रागावल्या आहेत कीं, कच्च्या मुखत्यारांचा एवढा समारंभ त्यांच्या नवऱ्याच्या हातून झाला त्याचें स्मृतिचिन्ह म्हणून, त्यांचें मन जडलेल्या कोणत्याच वस्तु त्यांना नजर करविण्याची करामत मला साधली नाही! तात्पर्य, सर्वच बाजूंनी दिवाणगिरीची इमारत माझ्या अंगावर कोसळून पडण्याचा रंग दिसतो, एजंटसाहेब बदलून जावयाचे ते जाऊन नवे आले असते, तर अधिक बरें झालें असतें. पण त्यालाहि माशी शिंकली. खटला चालावयाचेंच ठरलें तर स्पेशल न्यायाधीश नेमण्याचा तरी आग्रह धरा; व सरकारची बाजू घेण्याकरिता ज्याच्यावर डोळे मिटून विश्वास टाकावा अशा एखाद्या उत्कर्षेच्छु महत्त्वाकांक्षी मेपपात्र न्यायाधिशाचें नांव आठवून सुचवा. मी आपल्या स्वार्थानें लावून बोलतो असें नव्हे; पण शिरस्तेदार म्हणजेच एजंट असा जो आजवरचा आपला लौकिक आहे तो या वेळीं खरा करून दाखवा. इतकीच संकटांत सांपडलेल्या या दासाची आपल्या चरणाशीं विनंति आहे."

हें पत्र वाचून होत असता मनोहराला वाटणारें आश्चर्य त्याच्या डोळ्यांत

व भिवयांच्या हालचालींवरुन सहज दिसून येत होतें; व तें वाचून संपतांच "कोण हा अधम मनुष्य. नव्हे राक्षस !" असे उद्गार त्याच्या तोंडांतून एकदम बाहेर पडले. नंतर सुभेदारांना उद्देशून तो म्हणाला,

"सुभेदार, तुम्ही हें पत्र कसें मिळविलें ! "

त्यावर सुभेदारांनी सर्व हकीकत सांगितली. तेव्हा मनोहरपंत म्हणाले, "ठीकच आहे. मनुष्यें संकटांत सांपडलीं म्हणजे कित्येकांची मति मूढ होते तर कित्येकांची मति स्फूर्ति पावते. तुमचा प्रकार दुसरा दिसतो. असो. आता या पत्राचें तुम्ही काय करणार ? "

" जसें आपण सांगाल तसें. "

मनोहरपंतांनी क्षणभर विचार केला व म्हणाले. "पत्राचा फोटो घण्याला अजून चांगला प्रकाश आहे. मीं याचा फोटो काढतों. तोंवर तुम्ही बसा." असें म्हणून त्यांनी गच्चीवर जाऊन कॅमेरा उभा केला, पत्र समोर फळ्यावर लावून त्याचा फोटो घेतला, पाठोपाठ कांचेला रसायनाची डुब देऊन त्याची एक प्रतहि काढली. ती सुभेदारांचे हातीं दिली व म्हणाले— सुभेदार माशाचें पोट चिरुन माणिक बाहेर काढायला तुम्हाला सुरी हवी होती ती ही खरीच मिळाली. मात्र प्राप्तीचा अर्धा वांटा म्हणून अस्सल पत्र मी ठेवून घेतो, आणि फोटोची प्रत तुम्ही ठेवून घ्या. ही प्रत दाखवून धमकी दिलीत कीं, तुमचें पांच हजार रुपये दिवाणसाहेबांच्या पेटींतून उडी मारुन बाहेर पडलेच समजा. पत्रांत तुमच्याप्रमाणेच आमच्यासंबंधींहि मजकूर आहे तो तुम्ही वाचलाच. तेव्हा हें अस्सल पत्र मी ठेवून घेतो. आणि चला आता दोघे मिळूनच माशाचें पोट चिरावयाला जाऊ."

## प्रकरण एकविसावें

# मेरीचा सुव–र–राज्याला विरोध!

दिवाणसाहेबानीं शिरस्तेदारसाहेबाना पाठविलेल्या पत्राची काय वाट लागली हें पूर्वीं सांगून झालें. पण सगळ्याच पत्रांना असे अपघात होत नसतात. कारण महाराज नवलराय यानीं खुद्द पोलिटिकल एजंट (रॉबर्ट मॅक्‌स्विनी) साहेबाना जें पत्र पाठविलें तें त्याना नेमकें पोचलें व त्याचा योग्य तो परिणामहि झाला. हें पत्र खालीं लिहिल्याप्रमाणें होतें:—

"सलाम दिगर, माझ्या संस्थानांत एक जुने प्रकरण नव्या रूपाने पुढें आलें आहे. त्याला राजद्रोह आणि खुनाच्या कटाचा प्रयत्न असें सजोड स्वरूप आहे. सुमारें १२ वर्षांपूर्वी माझे दत्तक वडील यांचे कारकीर्दींत हें प्रकरण उद्भवलें. हल्लीचे दिवाणसाहेब हेच त्यावेळीं दिवाणपदावर होते. प्रकरण थोडक्यांत असें होतें कीं, माझ्या राजधानींतील एक तरुण, प्रभाकर डबीर या नांवाचा, याने संस्थानाविरुद्ध राजद्रोही जाहीरनामे लिहून लावले आणि दिवाणसाहेबांच्या खुनाचा कट केला असा त्याजवर आरोप होता. परंतु तो पकडण्याच्या आधीं फरारी झाला, आणि त्याच्या एका साथीदाराने आपला गुन्हा कबूल करून कोर्टांत तशी जबानी दिली. तिजवरून न्यायकोर्टानें खटला शाबीत धरून दोघांनाही बारा वर्षें काळेपाण्याची शिक्षा दिली. पण मुख्य आरोपीच्या गैरहजेरींतच हा खटला चालला यामुळे त्याला समक्ष शिक्षा सांगून काळेपाण्यावर पाठवितां आलें नाही. दुसऱ्या आरोपीला शिक्षा काळेपाण्याची झाली तरी कांही काळ त्याला संस्थानाच्या तुरुंगांतच ठेवण्यांत आलें, व पुढे त्याची माफी लिहून घेऊन त्याला सोडून देण्यांत आलें. अशा रीतीने हे प्रकरण त्या वेळीं संपवून सर्व कागद दप्तरांत दाखल झाले. पण सदर मुख्य आरोपी प्रभाकर डबीर हा नुकताच आपल्या आपण नवलपुरांत प्रगट झाला. तेव्हा रीतीप्रमाणे वारंट काढून त्याला पकडून हल्ली कच्च्या कैदेंत ठेवलेला आहे. त्याचा इन्साफ कोणत्या रीतीने व्हावयाचा हा

प्रश्न उपस्थित झालेला असून कायद्याच्या दृष्टीनें तो बराचसा विवादितसा दिसतो. मला स्वतः सेशन जज्जाचा अधिकार आहे; तथापि या खटल्यांत विशेष कारणाकरिता मी न्यायाधीश म्हणून बसूं इच्छित नाही. तरी आपणाला अशी विनंति आहे कीं, आपण ब्रिटिश मुलखांतील एखादा न्यायाधीश, ज्याची कायद्याचे ज्ञानाबद्दल व निःपक्षपातीपणाबद्दल प्रसिद्धी असेल असा, सरकारची परवानगी घेऊन पाठवावा. त्याला सेशन जज्जाचे अधिकार मी येथील नेमणुकीने देईन. आपण शिफारस कराल तो पगारही देईन. तसेंच त्याच्या आधीं सरकारतर्फे एखादा हुषार वकिलहि पाठवावा. संस्थानांत सरकारी वकील आहे. परंतु या कामीं तो फारसा उपयोगी पडणार नाही. निदान माझ्या सांगीने किंवा भिडेने त्याने कांही केलें किंवा कांही न केलें असा संशय कोणाला येऊं नये, याकरिता खालसांतील स्वतंत्र वकीलहि मला हवा आहे. तरी यावेळीं न्यायाच्या कामीं हें साहाय्य मला आपण कराल अशी आशा आहे.

" कच्च्या मुखत्यारीच्या वेळीं ज्या चौकशी वगैरे करिता मी पक्की मुखत्यारी स्वीकारली नाही, ती आता बहुधा संपली आहे. तरी यापुढे मी आपणाला लिहितांच आपण पक्या मुखत्यारीचा औपचारिक खलिता माझे नावें पाठवावा. त्या मुखत्यारीचाहि लहानसा समारंभ रीतीप्रमाणें होईल व पूर्वीच्या प्रसंगाप्रमाणें याहि वेळीं आपण येथे येण्याची कृपा कराल अशी मला आशा आहे. आपली जिल्ह्यांतून बदली व्हावयाची होती ती आज इतके दिवस लांबली हाहि एकप्रकारचा योगच दिसतो. म्हणून माझीं वरील कार्यें आपल्या हातून पार पडेपर्यंत आणखीहि ती मुदत लांबेल अशी आशा मी कां करू नये ! "

हें पत्र वाचून एजंटसाहेबाना आश्चर्य वाटलें. एक तर या जुन्या खटल्याची त्याला मुळींच दाद नव्हती. दुसरें असें कीं, स्वतःला सेशन जज्जाचा अधिकार असतां तो उपयोगांत न आणतां स्वतंत्र न्यायाधीश व सरकारतर्फे फिर्यादीचें काम चालविणारा वकील यांची मागणी संस्थानिक करतो ही गोष्ट तर विशेष आश्चर्यकारक होती ! महाराज नवलराय यांच्यासंबंधाने एजंटसाहेबांचा ग्रह अनुकूल पण सावधगिरीचा होता हें

पूर्वीच्या एका प्रकरणांत त्यानें सरकाराकडे लिहिलेलें पत्र दिलें आहे त्यावरून कळून आलेंच असेल. पण आतांच्या या नवलरायाच्या वागणुकीनें एजंटसाहेबांचा ग्रह अधिकच अनुकूल झाला. हातीं अधिकार असतां तो न्यायाच्या बुद्धीनें न चालविणें यांत सात्विक आत्मनियमन उघडच दिसतें. शिवाय एजंटसाहेब हा आयरिशमन असल्यामुळें राजकीय काविळीचा रोग त्याच्या डोळ्याला झालेला नव्हता. त्याला सरळ गोष्टी सरळ दिसत. त्यानें, ही सर्व बातमी नवलाची वाटून, आपल्या मडमेला आंतून हांक मारून आणलें, व तिला ही सर्व हकिगत सांगून आमच्या शिरस्तेदार साहेबांच्या स्वभावाचा आणखी एक मासला तुला दाखवितों, इथेंच कांहीं वेळ बैस, असें म्हणून शिपाया हातीं निरोप पाठवून त्यांनी शिरस्तेदारांना बोलावून आणलें. तेव्हा त्या दोघांमध्यें खालील आशयाचें संभाषण झालें.

पो. ए.—"शिरस्तेदार, नवलपूरच्या महाराजांचें हें पत्र पाहिलेत काय? यावर तुमचा सल्ला काय आहे!"

शिर.—"आपल्या मर्जीला येईल त्याप्रमाणें खुशाल करावें."

पो. ए.—"मी तुम्हाला सल्ला विचारला. परवानगी विचारलेली नाही. संस्थानिकाचा हा कांही तरी कपटाचा डाव असावा. एरवीं त्याचा अधिकार त्यानें चालविण्याला कोणती हरकत?"

शिर.—"मलाहि तसेंच वाटतें. कदाचित् स्वतःचें कायद्याचें अज्ञान झांकण्याचा संस्थानिकाचा हा प्रयत्न असेल. तरी सरकारी न्यायाधीश देऊं नये. म्हणजे यांना कायद्याचें ज्ञान किती अल्प आहे हें कळून येईल. व पक्की मुखत्यारी मागतील त्या वेळीं त्या गोष्टीचा विचार करण्यास बरें पडेल."

पो. ए.—"पण तुम्हाला असें नाही का वाटत कीं, हातीं अधिकार असता तो न चालविणारा असा हा बहुधा पहिलाच संस्थानिक असावा?"

शिर.—"तेंहि खरेंच आहे. उलट नसलेले अधिकार गाजवून त्याचें पुढें काय करावें अशी अडचण सरकारला उत्पन्न करणारे संस्थानिक पुष्कळच आहेत!"

पो.ए.—"हातचा अधिकार न चालविणें हें तुम्ही कशाचें लक्षण समजतां?"

शिर—"भ्याडपणाचें, अज्ञानाचें, किंवा कपटाचें!"

पो. ए.—" केवळ न्यायबुद्धीच्या विशेष प्रेमामुळें अशी गोष्ट होणारच नाही असें तुम्हांला वाटतें ?"

शिर—" संस्थानें व न्यायबुद्धी या दोन गोष्टी कोणी कधीं एकत्र पाहिल्या किंवा ऐकिल्या आहेत काय ? "

पो. ए.—" पण काय हो, जर हा खटला स्वत: चालविण्याला संस्थानिक नाखूष असले, तर सेशन जज्जाचा अधिकार दिवाणसाहेबांनाच देण्याला काय हरकत ? त्यांना कायदा चांगला कळतो. "

शिर—" होय, ही योजना फार चांगली होईल."

पो. ए.—" आणि ते न्यायाचें कामहि चांगलें करतील ? "

शिर—" यांत काय संशय ! "

पो. ए—" पण त्यांच्या हातून झालें तरी न्याय कसा होणार ? संस्थानें व न्याय यांची जोडी कधींच जमत नाही असें तुम्ही नुकतेंच म्हणाला ना ?

शिरस्तेदारानी तोंडांतल्या तोंडांत आपली जीभ चावली. पण म्हणाले, "हां, असें तर खरेंच! पण मी बोललों तें संस्थानांतल्या संस्थानिकासंबंधाने."

पो. ए—" मग संस्थानांतले संस्थानिक तेवढे वाईट आणि दिवाण तेवढे चांगले असतात असें कां तुमचें म्हणणें ? "

शिर.—" हो, माणसावर कोठेंहि थोडेसें अवलंबून असतेंच."

पो. ए.—" म्हणजे दिवाण हीं माणसें आणि संस्थानिक हे कोण ? नवलपूरच्या हल्लींच्या संस्थानिकांच्या हातून अन्याय झाल्याचा बोभाटा आपणांकडे कधीं आल्याचें तुम्हांला स्मरतें काय ? "

शिर.—" संस्थानची प्रजाच भित्री असते. तिच्या हातून वरपर्यंत बोभाटा कसला पोचविला जातो? ते असेच अन्यायांत खितपत राहावयाचे"

हें उत्तर ऐकून एजंटसाहेब मोठ्याने हसले, व त्यांनी आपल्या टेबलाच्या उजव्या खणाचें कुलूप काढून ज्याच्यावर ' गुप्त माहितीकरितां ' अशी चिठ्ठी चिकटवली होती तें फाईल काढून शिरस्तेदारांचे हातीं दिलें. आणि त्यांना म्हणाले, " यांत एकजात दिवाणसाहेबांविरुद्ध सर्व तऱ्हेच्या आरोपांचे नवलपूरच्या प्रजेकडून आलेले पंचवीस अर्ज आहेत. त्यांचें काय रावयाचें ?"

फिरून शिरस्तेदारसाहेबांना तोंडांत जीभ चावावी लागली. पण ते म्हणाले, 'संस्थानी प्रजा, जो दिवाण येतो त्याच्या जाण्याची किंवा मरण्याची, जशी, कांही घटका घालून बसलेली असते !"

पो. ए.—पण तुम्ही आतां इतक्यांतच संस्थानी प्रजा भित्री असते असें म्हणलां ना ?"

फिरून शिरस्तेदारांना जीभ चावावी लागली. पण ते म्हणाले "संस्थानी-प्रजा भित्री काय अन् धीट काय, मूर्ख एवढें खरें; पण दिवाणसाहेब आज दिवाणगिरीवर चौदा वर्षे आहेतच कीं नाहीत ! ते भले असल्याशिवाय इतकीं वर्षे या कामावर कसे टिकतील ?"

पो. ए.—" पण या चौदा वर्षांत पहिलीं दोन वर्षे जुने महा-राज सर्व कामांत त्यांचे बडे दोस्त होते; आणि पुढे बारा वर्षे संस्थानच्या गादीवर कोणी राजा म्हणजे धनीच नव्हता. बरें, पण काय हो शिरस्तेदार-साहेब, दिवाणसाहेबांचा व तुमचा स्नेह कसा काय आहे ?"

शिर—"आमचा कसचा स्नेह ! संस्थानच्या वार्षिक भेटीला या कचेरी-च्या स्वारीबरोबर वर्षांतून एखाद दुसरा दिवस नवलपुराला जातो, तितकाच काय तो संबंध."

पो. ए.—" पण नवलपुरांत नुकतेंच दत्तक प्रकरण झालें त्यांत दिवाण साहेबांबरोबर तुमचाहि कांही संबंध आला होता म्हणतात ! "

असें म्हणून एजंटसाहेबांनी त्या फाइलींतला शेवटचा अर्ज शिरस्तेदारांना दाखविला. तो पाहून शिरस्तेदारसाहेबांनी मान खाली घातली. तेव्हा एजंटसाहेब म्हणाले, "दिवाणसाहेबाबरोबर तुमचीहि बडतर्फीची पाळी न आली म्हणजे तुम्ही मिळविली असें समजा. मी तर महाराज नवलराय यांनी मागितल्याप्रमाणे त्यांना स्वतंत्र न्यायाधीश व वकील देतोंच; पण या एकंदर प्रकरणांत काय काय बाहेर निघतें त्याकडेहि माझें लक्ष राहील. तुमचा सल्ला समजला. जा आतां " असें म्हणून त्यांनी शिरस्तेदारांना रजा दिली.

हा सर्व प्रकार चालला असतांना साहेबाची मडम ( मेरी मॅकस्विनी ), आपण या दोघांचें संभाषण ऐकत नाही, आपल्याच कामांत आपलें लक्ष गुंतलें आहे, असा बाहणा करून लोकरींच्या सुताचा चेंडू आणि हस्तिदंती सुया घेऊन

पायमोजे विणीत बसली होती. शिरस्तेदार जातांच एजंटसाहेबांनी मडमसाहेबांना हाक मारली;व त्या खुर्ची ओढून घेऊन जवळ येऊन बसल्यावर ते त्यांना म्हणाले, "ऐकलस का मेरी, कसा आमचा शिरस्तेदार बोलत होता राघूसारखा तें !"

मेरी—"छे रे, मला कांहीच ऐकूं आलें नाही, रॉबी !"

पो. ए.—"तर तर ! दोन्ही कान उघडे ठेवून शिवाय शरीरांतून आणखी दोन कान उसने घेऊन तूं आमचें सर्व बोलणें ऐकत होतीस हें काय मला माहीत नाही ! अन् न ऐकल्याचा बहाणा मात्र खूब केलास !"

मेरी—"मग तुझ्यासारख्या पोलिटिकल एजंटाची बायको होऊन इतकें साधेंहि कपट करावयाला मी न शिकावें म्हणतोस कीं काय !"

पो. ए.—"बरें ऐकलेंस तर ऐकलेंस, पण या कामीं तूं सल्ला काय देतेस ?"

मेरी—"मी काय तुझी पगारी शिरस्तेदार आहे वाटतें, सत्तेचा सल्ला विचारायला ? तो न जुमानायला ? आणि वरती असें बोलून घ्यायला ?"

पो. ए.—"अग, त्याला बोललों तें उगीच नव्हे. अशा माणसाच्या सल्ल्यावर मी अवलंबून राहीन असें वाटतें, का तुला ? पण नवलपुरांत नुकत्याच घडलेल्या दत्तकप्रकरणांत त्याने दिवाणसाहेबांबरोबर लाच खाल्ला हें त्याला जाणवावयाचें होतें माझ्या मनांत. म्हणूनच बोलावला व त्याची एक नवी गम्मत तुला दाखविली ! दिवाणसाहेब कसे आहेत तें तुला माहीतच आहे !"

मेरी—"त्याचें नांवहि काढूं नको माझ्या जवळ ! तो पुरा नादान दिवाण आहे हें मला पक्कें माहीत आहे, मागच्या समारंभापासून."

पो. ए.—"आता राहिला स्वतः संस्थानिक. त्याच्याबद्दल तुझें मत काय आहे ?"

मेरी—"पण तुझें तर ऐकूं दे मत आधी !"

पो. ए.—"त्याच्याविषयीं माझ्या मनांत फार चांगला ग्रह झाला आहे. तो किती न्यायी व सरळ मनाचा आहे, हें या फौजदारी प्रकरणांत उघड झालें आहे. आणि लवकरच तो आपल्या प्रजेला स्वराज्याचे हक्क देणार आहे अशी बातमी मला कळली आहे. हिंदुस्थानच्या संस्थानी राजकारणांत स्वराज्याचा हा नवा मनूच अवतरणार, असें म्हटलें पाहिजे नव्हे का ?"

मेरी तुच्छतेने हंसून म्हणाली—“काय म्हटलेंस रॉबी! स्व–राज्य सु–वर राज्य? होय होय ‘सुवर’ राज्य खरेंच! मागें मुखत्यारीच्या प्रसंगीं आपण नवलपूरला गेलों तेव्हा आमच्या मोटारीपुढे शहरच्या तोंडाशीं दोन तीन सुवर आले होते ना मरायला! तुझ्या चातुर्यामुळे थोडक्यांत बचावले बिचारें! सुवर–र–र राज्य म्हणजेहि या संस्थानी प्रजारूपी सुवरांचें मरणच! म्हणून मला वाटतें कीं या सुवरांना त्या सुवर राज्यापासूनहि तूं तसेंच बचावावेस!”

पो. ए.—“मेरी, जें अन्न माणूस खातें त्याचें नांव त्याच्या तोंडाला यावें हें ठीकच आहे. म्हणूनच तूं स्वराज्य शब्दाची अशी थट्टा केलीस! पण मला तर संस्थानी प्रजेला–संस्थानी प्रजेलाचसें काय एकंदर हिंदी प्रजेला–स्वराज्याचे हक्क मिळणें हा देखावा मोठा अद्‌भुतरम्य वाटतो. स्वातंत्र्य म्हटलें कीं माझ्या अंतरंगांतून आनंदाच्या लहरी येतात.”

मेरी—(मोठ्याने हंसून म्हणाली) “ठीकच आहे. कां न येतील बाबा आनंदाच्या लहरी तुला!”

पो. ए.—“असे का म्हणतेस? मला कांहीतरी लावून बोलायचं दिसतें आहे, तुझ्या मनांत!”

मेरी—“तूं पडलास आयर्लंडचा सुपुत्र! तुला ब्रिटिश साम्राज्य-विध्वंसक स्वातंत्र्यच स्वप्नांतहि दिसावयाचें! मला तर सुवर राज्याचें नांव ऐकून रागच येतो.”

पो. ए.—“ठीकच आहे! कां न येईल राग, बाई, तुला.”

मेरी—“असें कां म्हणतोस? तुलाहि कांही लावून बोलायचें आहे मला असें दिसतें. मग बोल ना!”

पो. ए.—“अग, स्वातंत्र्याचा राग तुला यायचाच. कारण तूं पडलीस इंग्लंडची सुपुत्री! साम्राज्याच्या तंबूची मेख! साम्राज्याच्या प्रजेला स्वराज्य देण्याची गोष्ट निघाली कीं तुम्हा अस्सल निळ्या रक्ताच्या इंग्रजांचा प्राण निघतो बाहेर जायला जसा कांही शरीरांतून!”

मेरी—“कां न निघेल? आम्हा इंग्रजांना साम्राज्य स्थापायाला किती

पैसा खर्च करावा लागला आणि किती प्राण खर्ची घालावे लागले आहेत, आहे कां ठाऊक ! ”

प्रो. ए.—“ आहे ठाऊक सर्व कांही ! साम्राज्य स्थापनेच्या लढायांत इंग्रजांपेक्षा आयरिश शिपायांचेच प्राण अधिक खर्ची पडले आहेत. आणि खर्चाचें म्हणशील तर येवढें हिंदुस्थान तुम्हा इंग्रजांनी आपल्या हाताखाली घातलें, त्या उलाढालीचा खर्च सगळा हिंदुस्थानावरच नाही कां बसविलात ! ज्याला गोळी घालून मारायचें त्याच्याच हातून त्याला पुरण्याकरितां आधीं खड्डा खणवून घ्यायचा, ही तुम्हा इंग्रजांची साम्राज्य नीति ! तुम्हा इंग्रजांची आणि आम्हा आयरिशांची साम्राज्यांतली कामगिरी कशी झाली तें सांगू कां मेरी ?”

मेरी—“ सांगना, रॉबी.”

पो. ए.—“ ऐक तर. हिंदुस्थानांत झालेल्या जुन्या काळच्या एका युद्धांत एक बळकट किल्ला हल्ला करून घेण्याचा सेनापतीकडून हुकूम झाला. हल्ला करणाऱ्या पलटणींत इंग्रज स्कॉच व आयरिश अशा तीन कंपन्या होत्या. पैकी आयरिश कंपनीने पुढे होऊन तटाला भोक पाडून आंत प्रवेश केला, तेव्हा कंपनींतला एकूण एक शिपाई गारद झाला ! पण त्यामुळे स्कॉच कंपनीला आंत प्रवेश मिळून तिने किल्ल्याचें रक्षण करणारे सर्व लोक पकडून कैदी केले ! मागाहून इंग्रज कंपनी आंत शिरली. तिच्यांतील शिपायांनी या कैद केलेल्या व मरून पडलेल्या लोकांचे खिसेना खिसे चाचपून त्यांतला सर्व ऐवज लांबवून त्याचें ओझें हलकें केलें ! ”आपल्या जातीचें हें वर्णन ऐकून मेरीने रागावल्याचा बहाणा केला. नवऱ्याच्या तोंडावर हातांतला पंखा मारून त्याची जळती सिगारेट खाली पाडली !

भांडण तेजाला आलें. पण तें प्रेमळ नवराबायकोचें होतें ! हिंदुस्थानामध्ये नोकरींत ज्यांना जन्म घालवावा लागतो त्या युरोपियन लोकांना, वयाने बरोबरीच्या व सुशिक्षित हौशी गृहिणी स्त्रिया, या भूलोकावरच्या देवदूतांसारख्या वाटतात. उजाड रानांतला तो शाखापल्लवयुक्त आम्रवृक्षच ! एकलकोंडेपणांतला तो नित्य जागता प्रतिध्वनिच ! रिकामपणीच चार गोष्टी काढून चर्चा करायला, हास्यविनोद व करमणूक करायला, दोघांनाहि सारखेंच हवें

असतें. या गरजेमुळे व प्रेमामुळे एकमेकांना टाकून बोलूनहि न रागावयाला तीं दोघें शिकलेलींच असतात. असो, प्रेमकलह चालविण्याच्या उद्देशाने मेरी पुढे म्हणाली—

मेरी—"आमच्यासारख्या स्थितप्रज्ञ शांत विचारी इंग्रजांच्या हातीं साम्राज्य आलें म्हणून तर तें इतके दिवस टिकलें आहे! पाऱ्यासारख्या चंचल भावनांच्या तुम्हा आयरिश लोकांच्या हातीं तें असतें तर केव्हाच सांडून लवंडून गेलें असतें! पण, रॉबी, तूं आयरिश असलास तरी इंग्रजी साम्राज्याचा म्हणजे पर्यायाने निळ्या रक्ताच्या खानदानी कॉन्झरनेटिव्ह इंग्रजाचा पगारी 'नोकर' आहेस हें नीट लक्षांत ठेव.'

पो. ए.—माय डार्लिंग. हें तू मला असें बजावावयाला का हवें? तुझ्या आंगच्या पारदर्शक श्वेतवर्णांमधून, तुझ्या नसांतून खेळणाऱ्या निळ्या सुंदर रसप्रवाहाला मोहून जाऊन तुझ्याशीं मी लग्न केलें तेव्हाच तुझा आणि तुझ्या साम्राज्याचा दास झालों!"

मेरी—"झालें तर मग, प्रजास्वातंत्र्याची गोष्ट सुद्धा तुला बोलतां कामा नये. त्यांतूनहि हिंदुस्थानांत! आणि त्यांतूनहि संस्थानी प्रजेबद्दल!"

पो. ए.—"पण आता ही सुधारलेल्या जगांतली गुलामगिरी आहे! म्हणजे ईश्वरनियतींत जसें मनुष्याला इच्छास्वातंत्र्य म्हणून कांही असतेंच, त्याप्रमाणे साम्राज्यशाहीच्या धोरणांतच आम्हा सिव्हिल सर्वंटांना आजकाल बुद्धिस्वातंत्र्य मिळालें आहे. हिंदुस्थानच्या लोकांना स्वराज्य देण्याची जी भाषा आज प्रचलित आहे ती आम्ही सिव्हिल सर्वंटानी बोलणें, हें साम्राज्य सरकारच्या धोरणाशीं आतां विसंगत नाहीं. आणि विसंगत असलें तरी तें दासधर्माचें उल्लंघन मानलें जात नाही."

मेरी—"आहे. अजून शुद्धीवर राहून बोलतो आहेस म्हणून बरें! पण स्वराज्य देण्याची "भाषा बोलण्या" पर्यंतच ती मजल जावयाची आहे हें लक्षांत राहूं दे! नवलपूरच्या संस्थानिकाने वाटेल तर प्रजेला स्वराज्य देण्याची भाषा बोलावी—खुशाल भाषा बोलावी!"

पो. ए.—पण नवलपूरचा संस्थानिक तुझ्या इंग्रज लोकांसारखा कपटी

भोंदू मानभावी दिसत नाही. तो बोलेल तें खरें करील अशी त्याची वृत्ति दिसते ! ”

**मेरी**—“ तसें असेल तर त्याला आळा घालून ताळ्यावर आणणें हें पो. एजंट म्हणून तुझें कर्तव्य नाही काय ? ज्या संस्थानांवर आपल्या भावी हिंदी राज्य घटनेच्या सुरक्षिततेची सर्व भिस्त, त्यांत अशी ढिलाई-उदार मतांचा असा गोंधळ—माजूं दिला कीं, संपलेंच ! संस्थानांतलें मोहक स्वराज्याचें चित्र पाहिल्यानंतर आमच्या कृपण राज्यावर ब्रिटिश प्रजा कशी संतुष्ट राहील ? त्या संस्थानी अंधारांतला तो बाऊ, त्या जादूच्या कपाटांतल्या तो प्रेताच्या हाडांचा सांगाडा, आहे तसाच जतन करून ठेवला पाहिजे ? आज संस्थानें आहेत, म्हणून तुम्हां सिव्हिल सर्वंटांना, सरकारी शिस्तीच्या कोटा—पाटलोणींतले हातपाय पसरायला थोडी तरी मोकळी जागा सांपडते! विलायतेहून बडा पाहुणा आला घरीं, पाहूणचार भोगावयाला, तर तो परस्पर भागवून घ्यावयाला सोय आहे, ती घालवून तुम्ही उद्यां काय करणार रे ? तुमच्या शिकारीची हौस मग कोण पुरविल ? बिचारे वाघ अजून संस्थानी जंगलांतच अधिक पैदा होतात, आणि संस्थानी प्रजेच्या रक्तावर चांगले पोसले जातात. एखाद्या संस्थानांत जातिवंत जंगल नसलें, तरी शिकारखान्यांतले पाळीव वाघ तरी वेळेवर रानांत तेवढ्यापुरते सोडून देतां येतात ! आणि जशी तुम्हा साहेब व्यक्तींची सर्व प्रकारची नड संस्थानिक काढून देतात तशीच साम्राज्यसरकाराची ! उद्या संस्थानांत स्वराज्य झालें तर रंगरूट भरती कुठून कराल ? तुमचें कर्ज कोण लाखानी कोटींनी खरेदी करील ! कायदे कौन्सिलांत लोकमतावर जड दडपण टाकून तुमची फत्ते कोण करील ? तुमच्या एक दिवसाच्या भेटीकरिता संस्थानिक लाखों रुपये खर्चून मयसभा व इंद्रलोक निर्माण करतात तें मग होईल काय ? तुमच्या सत्काराकरिता आजच्यासारखे हत्तीच्या ओझ्याचे पुष्पहार तर राहोतच, पण वाळल्या फुलाचें थोटूकहि मिळणार नाही ! ”

**पो. ए.**—“आह्मां पुरुषांच्या हानीचीं उदाहरणें दिलींस मेरी, पण तुम्हा मडमांचीहि तशीच हानि होणारी आहे नाही का ? संस्थानांत स्वराज्य अवतरलें म्हणजे ! तुझें हें भयप्रद संकटांचें वर्णन पुरें कर ! आम्हा सिव्हिल

सर्व्हंटांना–निदान आमच्यापैकीं कांही थोड्यांना तरी–नवें जग दिसूं लागलें आहे. तुम्हा इंग्रजांचें साम्राज्य चार दिवस अधिक जगायला पाहिजे असेल, तें कोयत्यानें कापून किंवा हातोड्यानें फुटून जायला नको असेल, तर निदान अंतर्गत स्वराज्यदानासारखा खरा उपाय दुसरा नाहीं. हिंदुस्थानांतलीं सहा–सातशें संस्थानें बेजबाबदार राज्यपद्धतीनें गांजलीं आहेत ! या देशाच्या सुंदर शरीरावर हीं जुलमी संस्थानें फोड्यांच्या वणाप्रमाणें खळग्याप्रमाणें वाईट दिसतात. प्रजेला स्वराज्य देऊन तीं सुधारलीं पाहिजेत, आणि ही कुरूपता काढून टाकली पाहिजे ! ”

**मेरी**—“ तूं उपमा दिलीस तीच तुला बाधक होते आहे.फोड्यांचे व्रण व खळगे कधीं बुजून जाऊं शकतात का वेड्या ! आणि हे कुरूप संस्थानी व्रण आहेत म्हणून, त्यांच्या तुलनेनें, आमच्या खालसांतल्या राज्यकारभाराची सुरूपता प्रगट होते. काय बिशाद आहे संस्थानिक लोक आमच्या मर्जी-विरुद्ध आपल्या प्रजेला स्वराज्य देतील !”

**पो. ए.**—“ तें काय म्हणून ? त्यांना त्या बाबतींत तहानी स्वतंत्र्य आहे!

**मेरी**—“ कशाला बोलतोस तहाच्या गोष्टी ! तह म्हणजे कागदाचे कपटे ! टेबलावर पडलेलें तें ए. पी. निकलसनचें ताजें पुस्तक ‘Scraps of Paper’ हें वाच! इंग्लंडच्या राणीची झाली बादशाहीण ! पण संस्थानां-संबंधी Dynasty ( राजघराणें ) हा शब्द जाऊन त्याचे जागीं Family ( कुटुंब ) हा शब्द आला ! असेंच बाकी सर्व समज !

असें म्हणून दोघेंहि हंसत उठलीं. मेरी म्हणाली “ जाऊं दे ना ! लोकांचें भांडण भांडून आपणाला काय करायचें आहे ? मला आता टेनीस खेळायला क्लबांत जायचें आहे. तेव्हा माझे बूट, माझी शाल, माझी बॅट, आणि माझी स्मेलिंग सॉल्टची बाटली घेऊन चल मजबरोबर! अजून इंग्रज साम्राज्यशाही नष्ट झाली नाही तोंवर माझ्या आयरिश प्रजाजनाला राबवून तरी घेऊं!”

पोलिटिकल एजंट म्हणाला “ ठीकच आहे. जन्माची चूक जन्मांतच निस्तरावी लागते. घेतों आपलें सामान. चलावें बाईसाहेब. आस्ते कदम ! ”

## प्रकरण बाविसावें

# न्हाव्याच्या घोंगडींतली शकुनवंती !

मनोहरपंताने सुभेदारांना घेऊन एकदम दिवाणसाहेबांचें घर गांठलें. माडीवर दिवाणसाहेब एकटेच बसलेले पाहून, आणि " बरें झालें आपणाला आता एकान्त मिळेल ! " असें म्हणून त्याने पहारेवाल्याला हाक मारली. आणि तो त्याला म्हणाला, " दिवाणसाहेब महत्त्वाच्या कामांत आहेत ! आम्ही खाली येईपर्यंत खबरदार कुणाला वर सोडशील तर ! "

ही शिरजोरी पाहून दिवाणसाहेब रागाने म्हणाले, "काय हो, माझ्या घरीं येऊन माझ्या नोकरांना हुकूम सोडतां याचा काय अर्थ ?" मनोहर म्हणाला, " लवकरच अर्थ कळेल. सोक्षमोक्षाच्या प्रसंगीं शिष्टाचार कोण पाळतो ? "

**दि.**—" सोक्षमोक्ष कसला ? "

**मनो.**—" तुमच्या कारकीर्दीचा आणि प्रजाजनांच्या दुःखाचा ! हं इकडे पाहा, हे सुभेदारसाहेब आपले जिगरदोस्त, त्यांच्याकडून पांच हजार रुपये हरामाचे घेतलेत, ते त्यांचे त्यांना या क्षणीं परत द्या पाहूं. "

**दि.**—" कोण म्हणतो पांच हजार घेतले म्हणून ? "

लगेच मनोहराने फोटोचे कागद पुढे करून दिवाणसाहेबांना दाखविले व म्हणाला, " हे तुमचेच शब्द आणि हें तुमचेंच अक्षर !"

शिरस्तेदारांना आपण लिहिलेलें हें पत्र पाहतांच दिवाणसाहेब काळे ठिक्कर पडले! पण वेगळी ऐट आणून म्हणाले " मी व सुभेदार काय तें पाहून घेऊं. त्यांत तुमचा काय संबंध ? "

**मनो.**—" माझा संबंध इतकाच कीं, या क्षणीं पांच हजार परत झाले नाहीत, तर लांचलुचपत केल्याची तुमच्यावरची फौजदारीची सरकारी फिर्याद माझे खिशांत आहे; आणि त्याबरोबर महाराजांच्या सहीचें बिनजामिनाचें वॉरंट ! हातकड्या पडतील, शोभा होईल ! "

दिवाणसाहेब गांगरले, स्तंभित झाले. लगेच त्यांनी किल्ली लावून सेफ उघडली आणि पांच हजारांच्या नोटा काढून सुभेदारांच्या हातांत टाकल्या! त्याबरोबर मनोहर म्हणाला, " काय सुभेदार ? माशाने गिळलेलें माणिक तुमचें तुम्हाला परत मिळालें कीं नाही ? " नंतर दिवाणसाहेबांकडे वळून तो म्हणाला, " आता दुसरें प्रकरण. या पत्रांत तुम्ही महाराजांची व माझी बदनामी केली आहे. त्याचें काय करणार ? "

दि.—"माझें पत्र खासगी होतें. तें तुम्ही चोरलें व फोडलें. त्यांतील मजकुराने बदनामी झाली तर तिला तुमचे तुम्हीच जबाबदार आहां!"

हे शब्द ऐकतांच मनोहराने खिशांतून सहाबारी पिस्तुल काढलें व दरडावून म्हणाला "ठीक आहे, अधमपणा करूनच्या करून वर शिरजोरी! दिवाणसाहेब, ऐका तर. मी जबाबदारी कशी पार पाडतों ती. महाराजांच्या अपमानाचा सूड खुनाने केला तरी तें योग्यच होईल. पण महाराज सज्जन आहेत, दयाळू आहेत, म्हणून मी या क्षणीं त्यांना स्मरून हात आवरता घेतों. पण सांगतों त्याप्रमाणे न कराल तर मात्र परिणाम वाईट होतील. "

मनोहराचे दरडावणीचे शब्द आणि टेबलावर ठेवलेलें प्रत्यक्ष पिस्तूल पाहून दिवाणसाहेबांनी नांगी टाकली, व भेदरून जाऊन हात जोडून ते म्हणाले, "आपण सांगाल तें करीन." मनोहर म्हणाला, " ठीक आहे, महाराजांच्या वतीने माझा तुम्हाला हुकूम आहे तो ऐका. आताच्या आता दिवाणगिरीचा राजीनामा सही करून माझ्या हातांत टाका. आज रात्रीच्या गाडीने अंगावरच्या वस्त्रानिशीं तुम्हाला नवलपूर सोडून मोंगलाईत निघून गेलें पाहिजे. तुमच्या घरांतली सर्व चीजवस्त सरकारजमा झाली आहे. आज रात्रींच घरावर सरकारी पहारा गुप्त रीतीने बसणार आहे. आणि तुम्ही इकडे तिकडे कांही कराल तर तें टेबलावरचें पिस्तूल आपलें काम करील. तुमच्या बारा वर्षांच्या जुलमी कारभाराचें याच रीतीने प्रायश्चित्त देण्याचें ठरलें आहे. तुम्हाला घरांतून बाहेर काढीन तेव्हाच मी घरांतून बाहेर पडेन! "

दुसरे दिवशीं, दिवाणसाहेबांच्या घराला मोठें थोरलें कुलूप पडलें आहे,

व दारापुढे संगिनीचा पहारा उभा आहे, हें पाहून नगरचे लोक आश्चर्य-चकित झाले ! जो तो वाटेल तो तर्क करूं लागला. पण लोकांचे सर्व गैर-समज दूर व्हावे याकरितां, राजीनामा देऊन दिवाणसाहेब फरारी झाल्याची तेवढी बातमी लिहून त्याचीं हस्तपत्रकें मनोहराने गांवभर वांटविलीं.

झाल्या प्रकारचा खुलासा महाराजांजवळ करण्यांत मनोहराला मुळीच श्रम पडले नाहीत. दिवाणसाहेब खटल्याला भिऊन आपखुषीने राजीनामा देऊन फरारी झाले, व स्पेशल प्रॉसिक्यूटर किंवा स्पेशल न्यायाधीश पाठविण्याचें कारण नाही, याविषयीची तार पो. एजंटाकडे तावडतोब धाडण्यांत आली. दिवाणसाहेबांच्या घरांतील सर्व मिळकत सरकारी कचे-रींत नेऊन पक्की जमा करण्यांत आली. आणि प्रभाकराची बंधमुक्तता करण्यांत आली !

महाराज मनोहराला इतकेंच म्हणाले, "मनोहर, तूं अमेरिकेंतले धाडसी प्रकार चांगलेच शिकून आलास म्हणावयाचा ! " त्यावर मनोहर इतकेंच म्हणाला, "मनुष्याला अपमानाच्या प्रतिकाराची बुद्धि सर्व कांही शिकविते. त्याला अमेरिकेलाच जावें लागत नाही. झाल्या प्रकारांत कांही अमेरिकन असेल तर तें फक्त माझें 'सहाबारी पिस्तूल'. जसा देव तशी त्याची पूजा आणि त्याला नैवेद्य. माझ्या पिस्तुलांत गोळ्यादेखील भरलेल्या नव्हत्या ! पण नुसत्या दहशतीने आपलें काम केलें. केवळ कागद रंगवून व चिताड करून दिवाणसाहेबांना घालवावयाला तुम्हाला सहा महिनेहि पुरले नसते. तें काम मी नुसत्या तोंडच्या फुंकराने दहा मिनिटांत केलें ना ! "

विजेच्या दोन तारा जोडल्याबरोबर हाताला धक्का बसतो. त्याप्रमाणे 'दिवाणसाहेब' आणि 'पळून गेले' हे शब्द एकत्र केले असतां कोणत्याहि संस्थानी प्रजाजनाच्या मनाला आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय राहणें शक्य नाही. 'दिवाणसाहेब' हा शब्दच अशा दुर्दम संस्कारांनी निगडित होऊन राहिलेला आहे.गादीवरचा राजा अधिकारसंपन्न पण मूर्ख असला तर हा त्याची खुषमस्करी करून प्रजेला छळतो. तो अज्ञान असला तर पो. एजंटसाहेबाची खुषमस्करी करून त्याला व प्रजेला दोघांनाहि छळतो. तो सज्ञान व मुखत्यार असून स्वतंत्र बुद्धीचा असला तर त्याच्या खोट्या

वहाड्या सरकारकडे कळवून मुख्यतः राजाला छळतो. आणि हें सर्व करीत असतां स्वतःचा मानमरातब व मोठा पगार यांची चैन चालवितो. सर्वांची सत्ता बळकावणें सोपें; पण सर्वांचीं मनें संभाळून त्यांचें हित करणें व निस्वार्थी राहणें कठीण!

नवलपूरचे दिवाणसाहेब हे एखाद्या वृक्षावरच्या समंधासारखे प्रजेला झाले होते! मग, एखाद्या वडा-पिंपळावरचा समंध एखाद्या रात्रीं अवचित निघून गेला, किंवा त्याने गति घेतली, असें गांवच्या लोकांना अनुभवाला आलें तर त्यांना किती आनंद होईल! समंधाने कांहीं न केलें तरी त्या वृक्षाच्या आसपासच्या आवारांत फिरकण्याला लोक भितात. त्याला ठरलेला नैवेद्य दिलाच पाहिजे. तें चुकलें कीं तावडींत सांपडेल त्याच्या मानगुटीला तो बसावयाचा! पण नित्य नैवेद्य खाणाऱ्या समंधाने आवारांतील प्रजेचें कोणत्याहि संकटापासून रक्षण केलें, किंवा रोगराई थांबविली, किंवा दरोडा परतविला, असें कोणीं ऐकलें आहे काय? तीच गोष्ट संस्थानांतील दिवाणांची!

असो. बारा वर्षांनी संसारांतलीं युगें बदलतात. नवलपुरांत बारा वर्षांपूर्वी प्रभाकर फरारी होऊन जें उदासपणाचें व भीतीचें युग अवतरलें होतें, तें दिवाणसाहेबांच्या फरारीपणाने संपून, त्याच्या जागीं आशा व उल्हास यांचें युग अवतरलें. दिवाणसाहेबांनी आपलें तोंड काळें केल्यामुळें संस्थानच्या लोकांचें तोंड उजळ व प्रसन्न झालें. शेतांतून बुजगावण्याच्या रूपाने ठेवलेलें, पांढरा रंग दिलेलें, काळें-मडकें काढून टाकलें म्हणजे पाखरें उडून येऊन जवळच्या झाडावर बसतात, भेटी-परतभेटी देतात, निर्भयपणें खालीं उतरून उन्हांत बागडतात, आणि आनंदाने गाणीं गातात. त्याप्रमाणे दिवाणसाहेबांचें अभद्र बुजगावणें नाहींसें झाल्यामुळे प्रजेला आपण फार दिवसांनी एकदम निर्भय झालों असें वाटलें. यांतच नव्या यजमानसाहेबांविषयी वाटणाऱ्या अननुभूत प्रेमामुळे उल्हासाची भर पडली. नगरांत नवचैतन्य नांदूं लागलें.

दुसरे दिवशीं नवलपुरांत सगळ्यांच्या तोंडीं तोच विषय! या समंधाला गाडणारा मांत्रिक कोण असावा याविषयी जो तो आपापल्या बुद्धीप्रमाणे तर्क करूं लागला! कोणी तें श्रेय नवलराय महाराजांना दिलें, कोणी ते

प्रभाकराला दिलें. पण उद्या उभा राहणारा प्रभाकरावरचा खटला, त्यांत होणारी आपली साक्ष, व तींत होणारी आपली बेअब्रू, हेंच दिवाणसाहेबांना पळून जाण्याला खरें कारण होतें असाहि कांही थोड्या जाणत्या लोकांचा तर्क झाला असल्यास नवल नाही.

कसेंहि असलें तरी शाळेंत गेलेल्या मुलांना अवचित सुटी मिळावी म्हणजे त्यांचा आनंद दुणावतो, त्याप्रमाणे नवलपूरच्या प्रजेला आनंदाचें भरतें आलें. जीव गुदमरविणारा तोंडावरचा हात एकदम निघावा त्याप्रमाणे हें झालें. साऱ्या प्रजेने मोकळ्या हवेचा श्वास जोराने आंत घेतला व तिच्या तोंडावर प्रसन्नता आली.

पण सुख हेंहि दुःखाप्रमाणे एकटें कधीच येत नाही. बरोबर जिवलग स्नेही-सोबती घेऊन येतें.

राजेसाहेबांनी पक्की मुखत्यारी घेण्याचें ठरविलें. मात्र ही मुखत्यारी जशी एकीकडे सरकाराकडून आपणाला घ्यावयाची त्याचप्रमाणे दुसरीकडे ती आपल्या प्रजेला द्यावयाची असा 'पक्की मुखत्यारी' याचा त्यांचा अर्थ होता. राज्याचे सर्व अधिकार प्रजेचे. तिने त्यांतील वाटतील ते आपणाकडे ठेवावे, वाटतील ते संस्थानिकाकडे द्यावे, व ते संस्थानिकाने प्रजाप्रतिनिधी म्हणवून चालवावे, अशी नवलराय याची उपपत्ति होती. आणि हा कार्यक्रम कसा पार पाडावयाचा याविषयीं मनोहराचा सल्ला घेण्याकरितां त्याला बोलावणें पाठवून त्याची वाट पाहत महाराज मागच्या गच्चीवर बसले होते.

आज स्वस्थपणामुळे महाराजांना श्मश्रू करवून घेण्याची इच्छा झाली. महाराज नवलराय हे स्वतःची नोकरी होईल तेवढी स्वतःच करावी या मताचे होते. विलायतेहून परत येतांना त्यांनी श्मश्रू करण्याचें सर्व साहित्य विकत आणलें होतें. तें आपल्या हाताने दाढी तर करीतच, पण मागेपुढे आरसे ठेऊन पोलादी कैचीनें आपले केस आपणच कापीत. अगदीच जरूर पडेल तेव्हां न्हाव्याला बोलावीत. कच्या मुखत्यारीपासून तो योग आला नव्हता. पण आज त्यांच्या तळहाताला फोड झाल्यामुळे आपली श्मश्रू आपल्या हाताने करतां येणें त्यांना शक्य नव्हतें. म्हणून त्यांनी न्हाव्याला बोलावणें पाठविलें. तो आला तेव्हां, संस्थानांतील भावी

नियोजित राजकीय सुधारणांच्या गोष्टी मनोहराशीं महाराज बोलत होते. न्हावी आल्याने त्याला खळ पडला. शिवाय नामु न्हावी आज नेहमींहून वेगळा दिसत होता. यामुळे दोघांचेंहि लक्ष त्याच्याकडेच गेलें. प्रत्येक संस्थानिकाच्या नोकरीला तैनातदार न्हावी असतातच. नामु तैनातदारच होता. पण महाराजांच्या कच्च्या मुखत्यारीपूर्वी तो जो साध्या पोषाखाने हजामत करावयास येई तो तसा आज न येतां, तैनातदारीचा पोषाख घालून मातबर सरंजाम घेऊन आला होता! पूर्वी त्याची कारागिरीची पेटी साधी होती, पण आज तिजवर जरतारी आच्छादन चढविलें होतें. त्याने पाण्याची वाटी काढली, ती जुनाट पण चांदीची निघाली. महाराजांच्या अंगावर केस न पडण्याकरितां त्याने झगा टाकला तो रेशमी किरमिजी रंगाचा जुनाट होता. आणि त्याने नेहमीच्या एका मुजऱ्याऐवजी आज महाराजांना तीन मुजरे केले!

महाराजांना या गोष्टींचें थोडें नवल वाटलें. म्हणून ते त्याला म्हणाले, "काय नामूबुवा! आज तुमचें नांव तरी नामूच आहे कीं दुसरें कांहीं?"

नामु म्हणाला, "त्ये कस म्हटल सरकार?" नवलराय म्हणाले, "नाहीं म्हटलें, तुम्ही आज हजामतीचा सरंजाम आणला तो सगळा नवाच दिसतो, म्हणून विचारलें."

नामु म्हणाला, "सरकार, सरंजाम नवा त्योच जुना. त्येची आज तिसरी पिढी तरी असल बघा. अन नाव बदलायच म्हणाला तर त्येच अस. येवढी राज्याची मुखत्यारी दिली आपणाला साहेबान, पण म्हारांजांच नांव दुसर न्हाइ ठेवल. मग मज गरीबाच नांव दुसर कोण ठेवणार? म्हंजी जुन्या तैनातीचीची नोकरी करणाराच! जस आपल राज्य अखंड तशीच माझी तैनात! डोईवदल कुणाचा बी व्होवो, यजमानाचा न्हाई तर तैनातदाराचा, राज्य तें राज्य अन तैनात ती तैनात!"

नवलराय म्हणाले, "पण तुम्ही आणलेला हजामतीचा सरंजाम नवा दिसला म्हणून विचारलें."

नामू—"न्हाई सरकार. आज त्यो आणला म्हून नवा, पण त्यो जुनाच हाय. ह्ये सायमान या गादीच्या जुन्या महाराजांच्या येळीं व्हत

त्ये म्या तसच जतन करून ठ्येवल व्हत सरकार, तवापासून. आपणाला नुसत गादीवर बसवल तवाबी मी त्ये नाही बाहेर काढल आपल्या हजामतीला. पण आपणाला कची मुखत्यारी मिळाली नव्ह, तवापासून आज सरकारांनी पहिल्यानदाच मला गाढीच्याला हटकल हजामत कराया. आपणास्नी मुखत्यारी मिळाली तवा आता त्ये जुन सामान काढाया व्होव."

नवलराय—"अरे मग तुझे वस्तरेहि असतील तेच जुने! पण ते गंजले बिजलेले नाहीतना ? नाही तर माझी हनुवटी खरवडून रक्त काढशील. माझ्या मुखत्यारीच्या समारंभांत तोंडाला गुलाल लागला नव्हता तो आज रक्ताच्या रूपाने लागावयाचा ! "

नामू—" अस कस व्हइल सरकार ? मी ह्ये जुन वस्तर काढून मधून मधून त्येना धार लावून त्येल चोपडून ठेवीत व्हतोंना, आपल्या मुखत्यारीची वाट बघत ! "

नवल.—" पण काय हो नामूबुवा ! वस्तऱ्याचें पातें धार लावून लावून केव्हा तरी झिजून जात असेल ना सगळेच्या सगळें ? "

नामू—"हां सरकार. त्ये एक झिजल ह्यंजी फेकून देतों उकिरड्यावर, अन् नव पात इकत घेऊन बसवतों—पण जुन्याच मुठींत. "

नवल.—" म्हणजे तैनातदार बाप न्हावी जाऊन मुलगा हजामत करायला लागला तर जुनी तैनातदार मूठ कायमच असेंचना ?"

नामू हंसून म्हणाला, " व्हय सरकार, माझ्या बासारखा अन् माझ्यासारखा आमचा वस्तराबी हयेच ना तैनातदार! संस्थानच्या गादीचा नोकर! अन् आमच्या घरण्याचा देव ! वाहतों ना मी त्येच्यावर गंध फूल,दसऱ्याच्या दिवशीं. "

नवल.—"पण वस्तऱ्याच्या एका पात्यांतून दुसरें पातें कांही निघत नाही आपोआप. म्हणून दत्तक घेऊन बसवावें लागतें म्हणावयाचें बाहेरचें, तेंहि निपुत्रिक राजाच्या दत्तकासारखें. आणि नामूबुवा, स्वतः तुमच्या तैनातदार न्हाव्याच्या घराण्यांतहि असाच दत्तक घ्यावा लागत असेल नाही केव्हा केव्हा, औरस मुलगा नसला म्हणजे ? "

**नामू—**"छेः सरकार, गरीबांना पोटच्या पोरांना न्हाई पडत तोटा. गरीबाळाच खंडीभर लेकर. देवाच्या घरीं न्यायच हाये तसा सरकार. त्यो अस ना अस देतोच ज्याला त्याला. शिरीमंतांची गोष्ट न्यारी सरकार! त्ये दत्तक बित्तक त्येनाच घ्यावे लागतात. अन् त्येबी रास्तच हाय सरकार."

नवलराय कौतुकाने हंसून म्हणाले, "तें कस कस सांगा पाहूं, नामूबुवा!"

**नामू—**" ह्मंजे त्ये अस बघा, सरकार, शिरीमंतांना सदाच पोटचीं पोरं होत गेलीं तर मग त्येची श्रीमंती सदा त्येंच्या घराण्यांत न्हाती नव्ह! मग ती गरीबांना कधी बी न्हाई मिळायची. म्हनूनशेनी शिरीमंतांना देव पोटचीं पोर न्हाई येत बिनखोट. तवा चट्ट घ्येत्यात गरीबाची मुल दत्तक. 'परक्याच पोर आल भरी, पण घर तर न्हायल घरच्या घरीं' अस म्हणतातना सरकार!"

नामू न्हावी अशा रीतीने हजामत करतां करतां दत्तकमीमांसाहि करीत होता. पण त्या भोळ्याच्या लक्षांत हें आलें नाही कीं, ज्याची हजामत आपण करतों आहों तो आपला नवा धनीदेखील असाच, म्हणजे गरीब परक्याचा पोर! संस्थानच्या 'भरी' येऊन फुकट्या श्रीमंतीचा मालक झाला आहे! पण ही मीमांसा करतांना गरीबाचा उणेपणा काढण्यापेक्षा देवाच्या न्यायबुद्धीचें कौतुक करण्याचाच नामू न्हाव्याचा खरा इरादा होता. जगांत, निदान हिंदु समाजांत, श्रीमंतगरीबांत संपत्तीची यथान्याय वांटणी विभागणी, एकाच कुळांत का होईना, होण्याचा एक मार्ग दत्तक संस्था होऊं शकते, हा अर्थशास्त्रीय सिद्धान्त अडाणी नामू न्हावी न जाणतां प्रतिपादीत होता.

असो. हजामत करतांना न्हावी हे गोष्टीवेल्हाळ होतात हा सगळ्या देशांतला अनुभवच आहे. पण सगळ्या देशांतल्या लोकांचा असाहि अनुभव आहे कीं, हजामत होत असतां वर्तमानपत्रें वाचण्यापेक्षा हजामाशीं गप्पा मारण्यांत, त्यांच्या गप्पा ऐकण्यांत, अधिक करमणूक असते. अरेबियन नाइटमधील एक न्हावी हजामत मध्येच थांबवून आपलें यंत्र उभें करून सूर्याचा वेध घेत असे हें, वाचक हो, तुम्ही वाचलेंच असेल. बिचारा नामू न्हावी इतका शास्त्रकोविद किंवा आंबटशोकी नव्हता. पण

न कळतां तत्त्वज्ञानी होता खरा. नामू न्हाव्याचा गोष्टीवेल्हाळपणा पाहून त्याला बोलायला लावलें तर तो वाटेल तें सांगेल, बोलेल, असें दिसल्यावरून मनोहर नवलरायाला हळूच इंग्रजींत म्हणाला—

"अरे, त्याला जुन्या कारकीर्दीतल्या बऱ्याच गमती माहीत असतील. विचारना कांही." तेव्हा नवलरायानी नामू न्हाव्याला विचारण्याचें ठरविलें.

महाराज म्हणाले, "नामूबुबा, तुम्ही आमच्या वडिलांचे मोठे आवडते न्हावी होता म्हणे."

नामू—"त्ये म्यां काय सांगाव सरकार आपल्या तोंडान ! महाराजांनीच काय पण दिवाणसाब्रांनीहि एक दिवस बी माझ्याशिवाय कुणा दुसऱ्याकडून हजामत करून घेतली नाही. आपल्या हातान आपली हजामत करून शिरिमंतांनी गरीब न्हाव्यांच्या पोटावर पाय आणण्याच वंगाळ दिस अलीकडच आल सरकार."

नामू बोलला सगळ्या नव्या युगाला उद्देशून. पण तें अप्रत्यक्ष लागत होतें नवलराय व मनोहर या दोघांनाहि. हें जाणून थट्टेच्या स्वराने मनोहर म्हणाला, "अहो नामूबुवा ! नव्या सुधारल्या श्रीमंतांनी आपली हजामत आपल्या हाताने केली तरी तुमच्या तैनातीची रक्कम तर कांही कमी होत नाही? जुन्या काळचे यजमान तीच तैनात देऊन रोज तुम्हाला राबवीत होतेना? नुसती हजामतच नव्हे तर आंगभर मालीस करवून ! आणि फिरून राजाच्या न्हाव्याने इतर लोकांची हजामत करावयाची नाही असाहि निर्बंध होता ! तुम्ही आता मोकळ्या वेळांत वाटेल त्याच्या हजामती करावयाला सलून उघडा, म्हणजे तैनात राहून वर आणखी मिळकत होईल.आणि आमचे महाराजहि इतक्या थोर मनाचे आहेत कीं, राजा व प्रजा हा भेद करण्याची त्यांची इच्छा नाही.तुम्ही सलून काढून खासगी हजामती करण्याला आमचे महाराज तुम्हाला बंदी करणार नाहीत. एकच वस्तारा राजाच्या व प्रजेच्या डोक्यावरून फिरला म्हणजे राजा व प्रजा यांच्यांत खरी समता आली असेंहि आमचे महाराज म्हणतील ! पण तुम्हा तैनातदार न्हाव्याचा तैनाती वस्तारा राजघराण्याच्या डोक्यावर तेवढा फिरावयाचा असें तुम्हीच बंधन घालणार

म्हणून इलाज नाही !" मनोहर हें जें बोलला त्याचें मर्म नामू न्हाव्याला कळण्यासारखें नव्हतें.

असो. नामू न्हाव्याला गोष्टीवेल्हाळ बनविल्यावर त्याने जुन्या राजवटींतल्या अनुभवाच्या गोष्टी सांगितल्या. त्या ऐकून नवलराय व मनोहर दोघेहि खूप हंसत होते. नामू न्हावी भोळा होता. आपण गोष्टी सांगतों यांत जुने महाराज, दिवाणसाहेब व त्यांचा परिवार, त्यांचीं अमानुष कृत्यें, त्यांचीं व्यसनें, यासंबंधी कांही कांही गुप्त गोष्टींचा सुगावा आपण न कळत कसा लावून देत आहों हें त्याच्या लक्षांत येत नव्हतें. आपण बोलतों त्यांत इतरांचा कमीपणा नसून आपली तेवढी प्रौढी आहे अशा भावनेने तो बोलत होता. पण ऐकणोर अधिक मर्मज्ञ होते. कांही वेळाने या गोष्टी पुऱ्या झाल्यावर नामू न्हाव्याने हजामतीकरिता मांडलेल्या सगळ्या वस्तू जेथल्या तेथें परत ठेवल्या. श्रीमंतांच्या घरच्या उपाध्यांना होमहवन पुण्याहवाचन वगैरे प्रसंगीं मांडामांड करण्याची जितकी यातायात पडते, तितकी संस्थानिकांची हजामत करण्याच्या प्रसंगीं त्यांच्या न्हाव्यांनाहि पडते.

नामू न्हावी आपली धोकटी घेऊन तीन मुजरे करून खाली निघून गेल्यावर, हातरुमालाने अंगावर पडलेले केस झटकून काढीत असतां महाराज म्हणाले, " मनोहर, पाहिलास का माझ्या संस्थानांतला दरबारी न्हावी कसा आहे तो ? इतिहास, अर्थशास्त्र, सगळें कांही त्याला येतें."

मनो.—" मग त्याला आपला दिवाण नेमायचा विचार कराना ? जुने दिवाणसाहेब नुकतेच जाऊन जागा आयती मोकळीच झाली आहे. आणि दिवाण नाही तरी निदान माझ्या जागीं प्रायव्हेट सेक्रेटरी !"

मनोहरच्या विनोदमिश्रित गंभीरपणाचीच ऐट आणून महाराज म्हणाले, "हां, दिवाण कांहीं नाही म्हणा, पण कदाचित् प्रायव्हेट सेक्रेटरी नेमण्याला हरकत नाही ? "

मनो.—" ती कशी ?"

नवल.—" ती अशी. तूं माझा प्रायव्हेट सेक्रेटरी झाल्यापासून माझीं

विक्षिप्तपणाचीं म्हणून जीं मतें तुला वाटतात त्यावर टीका करण्याच्या रूपाने तूं माझी उलटीसुलटी हजामतच चालविली आहेस कीं नाही ? फरक असेल तर इतकाच कीं, तूं माझ्या डोक्याच्या आंतल्या अंगाची हजामत करतोस, तो तो डोक्याच्या बाहेरच्या अंगाची करतो."

मनो.—"अस्सं, मघाशीं बोलतांना तुमच्या समतेच्या वेडावर टीका केली त्याकरिता मला हजाम बनवून बदला घेतलात असें दिसतें ! पण खरेंच सांगतों, नामू न्हाव्याच्या वस्तरा–पुराणाने तुमच्या वरच्या माझ्या अलीकडच्या टीकेचें समर्थनच झालें."

नवल.—"राहूंद्या म्हटल त्या गप्पा ! मला नामू न्हाव्याच्या धोकटींत राजकारणांतली शकुनवंतीच मिळाली."

मनो.—"ती कशी ?"

नवल.—"वस्ताऱ्याचें पातें झिजून गेलें म्हणजे तें फेकून देऊन नवें घ्यावें लागतें, असें नाही का नामू म्हणाला ? झालें तर. संस्थानी राज्यकारभाराची पद्धत जुनी निरुपयोगी झाली म्हणजे तीहि तशीच फेकून देऊन तिच्या जागीं नवी अमलांत आणली पाहिजे, असें मी जें तुला नेहमी म्हणतों तेंच नामू न्हाव्याने सांगितलें."

मनो.—"पण तुमच्याप्रमाणे मलाहि त्या न्हाव्याच्या धोकटींतल्या शकुनवंतीने माझ्या प्रश्नाचें उत्तर मिळालें."

नवल.—"ते कसें—?"

मनो.—"राज्यपद्धति बदलावयाची म्हणजे राजपदाचा नायनाट करावयाला हवा असें तुम्ही म्हणतां; पण राजपद कायम ठेवावें आणि फक्त कारभार सुधारावा असें मी म्हणतों नव्हे का ? नामू न्हावी वस्ताऱ्याचें पातें बदलतो पण मूठ कायम ठेवतो, असें म्हणाला तें ऐकलेंतना ? झालें तर, राजपद ही तैनातदार राजनापिताच्या वस्ताऱ्याची मूठ, आणि कारभाराची पद्धति किंवा व्यक्तिशः कारभारीही त्या मुठींत बसविण्याची पाती."

याप्रमाणे त्या दोघांचें बराच वेळ उलटसुलट बोलणें झाल्यावर असें ठरविण्यांत आलें कीं, स्वराज्यदानाच्या हेतूला उद्देशून महाराजांनी एक जाहीरनामा प्रसिद्ध करावा. त्यानंतर प्रजाप्रतिनिधींची सभा भरवून सर्वांचें

म्हणणें व सूचना ऐकून घ्याव्या. आणि शेवटीं महाराजांनी नव्या राज्य घटनेची योजना निश्चित करून ती अमलांत आणावी.

मनोहर अमेरिकेंतील लोकशाहीचा कारभार पाहून विटून आला होता. नवलराय संस्थानिकांचीं चरित्रें पाहून व ऐकून विटला होता. तथापि प्रजेचें हित व्हावें अशीच दोघांनाहि खरी इच्छा असल्यामुळे आपण तो हेतु सिद्धीस जाण्यासारखीच कांही तरी योजना तयार करूं असा दोघांनाहि विश्वास वाटत होता.

## प्रकरण तेविसावें

# नवलरायाचा नवलकारक जाहीरनामा

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे मनाशीं योजना ठरवून महाराज नवलराय यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला तो खालीलप्रमाणे होता.

" परम प्रिय नागरिक प्रजाजनबंधु यांस—

"तुम्हाला माहीत आहेच कीं, कांही दिवसांपूर्वी ब्रिटिश सरकाराने मला मुखत्यारी दिली. ती घेतांना मीं होऊनच या मुखत्यारीचें वर्णन 'कच्ची' या शब्दाने केलें होतें. हल्ली मी 'पक्की' मुखत्यारी घेण्याचा विचार केला आहे. पण ती मला साम्राज्य-सरकाराकडून मिळावयाची नाही; तर माझ्या राज्यांतल्या जनतेकडूनच मिळावयाची आहे. या राज्याचा जो खरा धनी तोच ती मुखत्यारी मला देऊं शकेल. त्यांत साम्राज्य-सरकाराचा कांही संबंध येऊं शकत नाही. आणि मी राज्यांतील जनतेकडून ती मागावी या गोष्टीला सरकाराची कांही हरकत नाही असें पोलिटिकल एजंटसाहेबांकडून लिहूनहि आलें आहे.

" ज्या मूळ संपादकाने हें राज्य मिळविलें, त्याने तें कोणताहि पराक्रम करून मिळविलेलें नव्हतें. तर आपणाहून वरिष्ठ अशा तत्कालीन राजाची खुषमस्करी करून व त्याच्या व्यसनांत सामील होऊन व मदत करून ! ती व्यसनपरंपरा गत महाराजांपर्यंत अखंड चालू होती. आणि गेल्या सात पिढ्यांत या राज्यांतील किती घराण्यांतील स्त्रियांची अब्रू राजपुरुषांकडून मलीन केली गेली असेल हें मनांत आणतांना मला पराकाष्ठेचें दुःख होतें. मी अज्ञानदशेंत असतांना, केवळ एक सगोत्र म्हणून, मला गादीवर बसविण्यांत आलें. त्यांत दत्तविधानाचा कांहीएक संबंध नव्हता. कारण माझे जनक आईबाप दोघेहि मृत असल्यामुळे मला कायदेशीर दत्तक देण्यास कोणीच नव्हता. झालें तें दत्तविधान केवळ औपचारिक होतें. पण अज्ञानदशेंतील इतरांची चूक आता सज्ञान झाल्यावर दुरुस्त करण्याचें

मी मनांत आणलें आहे. ही दुरुस्ती करावयाची म्हणजे सर्व राजसत्ता जनतेला अर्पण करून, ती मला जे अधिकार आपल्या इच्छेने देईल तेच तेवढे स्वीकारणें हें होय.

"जुन्या काळीं राज्य हें देवाब्राह्मणांचें असें म्हणण्याची रीत होती. त्याचा खरा अर्थ न लक्षांत घेतल्याने अनेक विपरीत सिद्धान्त निर्माण झाले. 'राज्य देवाचें' हें खरें; पण या अर्थाने कीं, त्याची उत्पत्ति, स्थिति व लय हीं तीनहि देवाधीन अशीं मानावीं. राजाने सुविनीत राहावें. आणि राज्याच्या उत्पन्नातला यथान्याय कांही अंश धर्मतत्त्वें व नीति यांच्या रक्षणाकडे व शिक्षणाकडे नियमितपणें खर्च करीत जावा. 'राज्य ब्राह्मणांचें' याचा अर्थ इतकाच कीं, राज्यांतले निःस्वार्थी व ज्ञानी लोक यांची सल्लामसलत घेऊन राजाने आपला राज्यकारभार करावा. या खऱ्या अर्थानेच मीहि हें राज्य देवाब्राह्मणांचें आहे असें समजतों.

"राज्य देवाचें म्हटलें तरी तो कांही त्याचा प्रत्यक्ष उपभोग घेत नाही. साधा नैवेद्यसुद्धा जो देव आपला आपण खात नाही तो राज्य कसें घेणार व भोगणार ! नैवेद्य देवाचा पण उपभोग भक्तांचा ! देवाला मधाचा अभिषेक केला तर आपल्याच तोंडांत पडणारें तीर्थ गोड होतें ! देवाला वाहिलेल्या फुलांचा वास देव घेत नाही तो आपणच घेतों ! त्याच रीतीने देवाचें म्हणून देवाला राज्य वाहिलें तर त्याचा उपभोग जनताच घेणार. ब्राह्मणांचें राज्य म्हटलें तरी तेंच. आधी ब्राह्मणाला देण्याचीं दानें म्हणून धर्मग्रंथांत सांगितलीं आहेत. त्यांत राज्य हें सांगितलेलें नाही. आणि असलें दान देणाराने दिलें तर तें दान घेणाऱ्या ब्राह्मणाला पाप लागावयाचें! शिवाजीमहाराजांनी राज्याची सनद रामदासांच्या झोळींत टाकली, व रामदासांनी प्रसाद म्हणून तीच सनद परत शिवाजीच्या हातांत दिली! देवाब्राह्मणांचें राज्य हें राज्यांतल्या प्रजेनेच उपभोगावयाचें आहे. तो उपभोग तिला मिळेल याविषयी जो जामीन त्याचें नांव राजा.

"राजधर्म व प्रजाधर्म यांचें समीकरण अबाधित आहे. पण आजवर या राज्यांत प्रजाधर्म याचा अर्थ प्रजेने एकांतिक राजनिष्ठा ठेवावी, आणि राजधर्म याचा अर्थ राजाने स्वतःला ईश्वराचा प्रतिनिधि समजून

स्वच्छेने अनियंत्रित अधिकाराने राज्यसुख भोगावें, असा केला जात असे. तो अर्थ आजपासून मी बदलणार.

"स्वतः मी संस्थानाच्या राजघराण्याच्या कुलगोत्रांत जन्मलों याहून संस्थानाचा राजा होण्याला मला अधिक हक्क पोंचत नाही. माझे आईबाप अत्यंत धर्मनिष्ठ व सच्छील होते. त्यांनी अत्यंत गरीब स्थितींत पण मोठ्या अब्रूने जन्म घालविला. त्यांचा वारस म्हणून मी त्यांच्या गुणांच्याबरोबर त्यांच्या निर्धनतेचाहि स्वीकार केला पाहिजे. म्हणून यापुढें राज्यांतील जनता जो खर्च आपल्या इच्छेने मला तोडून देईल, त्यांत मी समाधान मानीन; आणि माझ्या बुद्धियोगाला योग्य असें राज्यकारभाराचें काम करून त्याचा मोबदला देऊन त्यांचा अनृणी होईन.

"म्हणून माझी जनतेला या जाहीरनाम्याच्या द्वारें अशी प्रार्थना आहे कीं, मी एक दरबार भरविणार आहें त्यांत हजर राहण्याकरिता जनतेने आपल्या पसंतीचे प्रतिनिधि निश्चित करून, त्यांच्या द्वारें माझ्या मुखत्यारीचीं कलमें काय तीं मला कळविण्यांत यावीं, म्हणजे त्याप्रमाणे यापुढे मी कारभार करीन."

* * * *

हा जाहीरनामा सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा होता असें अलंकारिक भाषेने तर म्हणतां येईलच; पण महाराजांच्या आज्ञेवरून खरोखरच तो सोनेरी शाईनेच छापून वांटण्यांत आला होता.

हा अपूर्व जाहीरनामा वाचून प्रजाजनांना फारच विस्मय वाटला. स्वराज्य काय व कसें हवें हें सुचविण्याचें, इतकेंच नव्हे तर तें प्रत्यक्ष स्वाधीन करून घेण्याच्या तयारीचें, निमंत्रण प्रजेला खुद्द राजाकडून !

श्रीगुरुचरित्रांत असें सांगितलें आहे कीं, दत्तमहाराजांच्या कृपेने, एका साठ वर्षांच्या वृद्ध स्त्रीला गर्भ राहिला ! बिचारी मोठ्या घोटाळ्यांत पडली. तिने गर्भिणीचें चरित्र इतर स्त्रियांसंबंधाने पाहिलें होतें. तथापि आपण स्वतः गर्भवतीच आहों, किंवा कांही रोग आपणाला झाला आहे, हें तिला नीट कळेना. इतर कोणा मैत्रिणींना विचारण्याची तिला लाज वाटूं लागली. कारण त्यांनी सल्ला देण्याचें बाजूलाच राहील, पण आधीं त्यांच्यापैकीं कोणी थट्टा करूनच जीव खातील, तर कोणी "म्हातारी

कपटाने ढोंग करते " असें म्हणून निंदा करूं लागतील ही भीति! साठ वर्षांचें वय झालें म्हणून स्त्रीचा पुत्रवती होण्याचा जन्मसिद्ध हक्क कसा जातो! पण कोणतीहि चांगलीदेखील गोष्ट होण्याला योग्य उचित असा कांही काळ असतो. तो निघून गेल्यावर अवेळीं ती गोष्ट घडली म्हणजे तिचें कौतुक होण्यापेक्षा थट्टा होण्याचाच संभव अधिक. 'म्हातारी'ला डोहाळे लागून अोकारी सुरू झाली तर तिला औषधपाणी देतांना, तिने पोटावर घड्याविड्या घातल्या आहेत कीं काय हें मैत्रिणी सहज हळूच चाचपून पाहावयाच्या!

नवलपूरच्या महाराजांनी प्रसिद्ध केलेला जाहीरनामा वाचून कांही सरळ वृत्तीच्या ध्येयवादी लोकांना फार आनंद झाला! पण सर्वांचेंच मन असें नसतें. संशयी लोकांना पहिली शंका ही आली कीं, महाराजांच्या मनांत प्रजेला खरोखरच स्वराज्य दान करावयाचें आहे कीं त्यांनी प्रजेची ही थट्टा आरंभली आहे? आणि दुसरी शंका अशी कीं, प्रजेला स्वराज्य हवें असें महाराजांनी जें गृहीत धरलेलें दिसतें तें तरी खरें कशावरून? म्हणून रस्त्यावर कोणी कोणाला भेटला कीं खालील प्रकारचे उलटसुलट उद्गार संभाषणांतून ऐकूं येऊं लागले.

" म्हणे प्रजेला स्वराज्य देणार! उद्या सकाळीं सूर्य उगवतो का हें दिसायला पश्चिमेकडे तोंड करा!"

" न घडणारी गोष्ट खरी; पण ती कधी घडूंच नये असें तरी काय म्हणून मानावें?"

" का हो, स्वराज्याचा दगड स्वाधीन करून घ्यायला केळीच्या पानाच्या पिशव्या झाल्या का शिवून तयार?"

" केळीच्या पिशव्या काय म्हणून, लोखंडी पेट्या तयार आहेत. स्वराज्य आलें कीं एकदम सेफमध्ये दाखल. मग कोण हिसकावून घेतो पाहूं!"

" किती धुतलें तरी गाढवाचें घोडें होऊं शकेल काय? अहो, प्रजा ती प्रजा आणि राजा तो राजा."

" काय सांगतां! विनायक आणि वानर हे मूळांत मळलेल्या शाडूच्या

एकाच ढिगांतले दोन गोळे! त्यांतलें हवें तें एक चित्र गरजेप्रमाणे मोडून त्यांतूनच दुसरें करतां येतें."

"स्वराज्याचे अधिकार राजा एक वेळ देईल. पण ते बजवावयाला प्रजेंत ज्ञान, निःस्वार्थी उद्योग व उत्साह लागतो तो कोठून आणावा!"

"गरजेने सर्व कांही येतें. सकाळीं उठल्यावर शुचिर्भूत होण्याला जे अनेक विधि करावयाचे असतात ते आपले आपण करतों कीं राजाचे अधिकारी! माझे दांत घासायला जर राजाचा अधिकारी हात पुढे करील तर त्याचे दात पाडायला माझा हात पुढे नाही का होणार! करायला मर्यादा नसेल, पण करवून घ्यायला मर्यादा आहेच!" इत्यादि इत्यादि.

बन्या ऊर्फ विनायक लोंढे याने आपली रजा फुकट न घालवितां,संस्थानाच्या प्रजेच्या हिताचें कांही काम करावें असें ठरविलें होतें. पण काम करण्याचा विचार मनांत येतांच त्याला पहिली अडचण ही दिसली कीं, या प्रजेला आपलें हित कशांत आहे हें स्पष्ट कळत नाही. आणि कळलें तरी तें बोलून दाखविण्याचें तिला धैर्य नाही. राजनिष्ठेच्या प्राचीन परंपरागत अतिशयोक्तीच्या उज्ज्वल कल्पनेपासून तों तात्पुरत्या क्षुद्र लाभाला बळी पडणाऱ्या हीन स्वार्थबुद्धीपर्यंत, सर्वच आपल्या परीने प्रगतीला वैरी! संस्थान सुधारणा करण्याच्या दृष्टीने लोकमत अजमावण्याकरिता बन्या जेव्हा आपल्या ओळखीच्या अशा जुन्या पिढींतील लोकांकडे जाऊन बोलूं लागला, तेव्हा त्याला या वैऱ्यांचे मासलेवाईक नमुने पाहावयाला सांपडले. आणि नवीन पिढीच्या लोकांकडे जाऊन जेव्हा तो बोलूं लागला तेव्हा संस्थानसुधारणेला घातक असा दुसराच एक नमुना त्याला दिसून आला तो, कम्युनिझमचें एखादें चोपडें वाचल्याने ज्याला तांबड्याशिवाय जगांत दुसरा रंगच दिसत नाही अशा माथेफिरू तरुणांचा. जुन्या पिढीला फाजील राजनिष्ठेमुळे सुधारणा नको! आणि नव्या पिढीला राजाच नको, संस्थानच नको, म्हणून सुधारणाहि नको.

जुन्या पिढीला वाटे कीं, "राज्यकारभारांत सुधारणा सुचविणें हें देवघरांत जोडे घालून जाण्यासारखें उन्मत्तपणाचें होईल. राजाने राजधर्म कसा पाळावा याची प्रेरणा देवाकडूनच झाली पाहिजे.गंगोत्रीच्या कुंडांतून आपोआप पाणी

वाहून येईल तीच गंगा! यात्रेकरूंना तीर्थाचा तुटवडा पडतो म्हणून तेथे पंप लावून का कोणी पाण्याचा पुरवठा करण्याचें मनांत आणील? तान्ह्या मुलाला भूक लागली हें आईने ओळखण्याचें आहे. मुलाने सांगण्याचें कारण नाहीं. संस्थानाच्या राजाला मुळांत प्रजेने कांही राजा केलेलें नाही! तो आपल्या पराक्रमाने राजा झाला. आणि पराक्रम यशस्वी होणें हें देवाच्या मर्जीवर अवलंबून असल्यामुळे, तें राजपद त्याला देवाने दिलें असेंच म्हणावें लागतें. म्हणून प्रजेने कारभाराचे अधिकार हक्काने मागणें म्हणजे तें राजाच्या हक्कांचा अपहार करण्याची बुद्धि धरणें ठरेल! राजाला जर प्रजेला अधिकार द्यावेसे वाटलें तर तें मात्र सात्त्विक दान ठरेल, व त्यायोगाने त्याला पुण्यहि लागेल. पण दान हें दात्याने आत्मस्फूर्तीने द्यावयाचें असतें. आपण होऊन त्याची याचना करील तो भिकारी, आणि बळजबरीने हरण करूं पाहील तो चोर, दरवडेखोर! खरा प्रजाधर्म म्हणजे प्रजेचें कल्याण करण्याची बुद्धि राजाला व्हावी, म्हणजे ईश्वराने द्यावी, अशी प्रार्थना करीत बसणें हाच होय"!

दुसरे पक्षीं बन्याची गांठ एका नवजवानाशीं पडली। तेव्हा त्यानेहि आपलें मत संस्थानांत सुधारणा होण्याविरुद्ध दिलें! याचें नांव कॉम्रेड डंखी. हें नांव पडण्याचें कारण असें कीं त्याच्या भाषणांत नेहमी असें येई कीं, जुनीं राज्यें, रियासती, जमीनदाऱ्या, सावकार व श्रीमान लोक हे एका झडपेच्या पेंचांत, कुस्तींतील डंखी मारल्याप्रमाणें, उखडून टाकले पाहिजेत. कोणी डंखी म्हणजे विंचवाची नांगी असाहि अर्थ करीत. हा भाई नवलपूरचा रहिवाशीहि नव्हता, मग प्रजाजन कोठून असणार? वॉंडरिंग ज्यूप्रमाणे तो एक फिरता नागरिक होता! याच्या अंगावरील पोषाक मातबर लोकरी परदेशी कापडाचा असून, डोक्यावरील कोल्ह्याच्या कापडाची टोपी लष्करी टोपीप्रमाणे तिरकस ठेविलेली असे. याला चुकून कोणी श्रीमंताचा उनाड पोरगा म्हणण्याचाहि संभव होता. रशियन कम्यूनिझमचें चिन्ह किंवा बिरुद जें लाल निशाण तें एखाद्या शोभिवंत पदकाप्रमाणे त्याने टांचणीने आपल्या छातीवर चिकटविलें होतें. त्याच्या तोंडांतील सिगरेटने ओठांशीं काटकोन न करतां पंचेचाळीस अंशांचा कोन

केला होता. तिच्यांतून निघणारा धूर कानाच्या बाजूने वर कुरळत जाऊन वाट काढी. कॉ. डंखो यांचें बिऱ्हाड, विंचवाच्या बिऱ्हाडासारखें, त्याच्या पाठीवर अगदी चुटपुटतें होतें.

असो. दरबार भरावयाचा त्यांत महाराजांनी हजर राहावें कीं नाही हा प्रश्न निघाला. या सभेला स्वतः महाराजांनी हजर राहू नये असें मनोहराचें म्हणणें होतें. पण महाराज म्हणाले, " तें काय म्हणून ! सभेंत भाग घेण्याचा हक्क प्रजाजनांना आहे तो स्वतः राजाला मात्र नाही ! नसावा " ?

**मनो.**—" तुम्हाला हक्क नाही कोणीं म्हटलें ? पण तुमच्या भिडेमुळे सभेंत लोकांना मन मोकळें करून बोलतां येणार नाही, तुमच्यादेखत ! "

**नव.**—" ज्यांना राजादेखतां मन मोकळें करून बोलतां येत नाही त्यांनी राजाचें राज्य म्हणजे स्वराज्य मिळविण्याची महत्त्वाकांक्षा कां धरावी ? "

**मनो.**—" वः, तुमची बेअदबी होऊ नये अशीच त्यांना इच्छा आहे. तुम्ही समक्ष असलां तर कदाचित् ती व्हावयाची ! "

**नव.**—" इच्छा आहे तर बेअदबी करू नये म्हणजे झालें. "

**मनो.**—" पण ते सर्वच तुमच्या आमच्यासारखे सुशिक्षित नाहीत. "

**नव.**—" अदबी संभाळणें, बेअदबी न करणें, याला शिक्षण लागत नाही, सौजन्य लागतें. घरीं सासऱ्याची किंवा नवऱ्याची बेअदबी न करतां जन्म घालविणाऱ्या स्त्रिया सर्व सुशिक्षितच असतात वाटतें ? उलट सुशिक्षित झाले म्हणून लोक एकमेकांची किती अदबी संभाळतात हें आपणाला, हल्ली कित्येक वर्तमानपत्रांत,वाचावयाला मिळतेंच! दुसरें असें कीं, माझ्या पश्चात् मात्र त्यांनी माझी बेअदबी करावी हें बरें का ! अप्रिय बोलण्याची मनांत इच्छा आहे, त्याविषयी कदर वाटत नाही, पण तसें बोलण्याला मात्र अंगीं धैर्य नाही. असे लोक स्वराज्य कसें मिळविणार व चालविणार ? हल्ली संस्थानी राजकारणांत रूढ झालेला "मूलभूत हक्क" हा शब्द तूं ऐकलाच आहेस ! न्याय मागण्याचा मूलभूत हक्क जसा प्रजेला आहे, तसाच प्रजेकडून बेअदबी न व्हावी हा मूलभूत हक्क राजालाहि आहेच ! अर्थात् सत्य बोलावें, अवश्य तर अप्रियहि बोलावें, पण कोणाची बेअदबी न करतां बोलावें, औचित्य आणि सदभिरुचि यांच्या योग्य मर्यादा संभाळून बोलावें, हेंच तर माणसाने प्रथम

शिकलें पाहिजे. तें मूलभूत कर्तव्य. आमचे दिवाणसाहेब माझ्यापासून चार हात अंतरावरून बोलत असले तरी तोंडाला पदर लावून बोलत! माहीत आहेना ! ”

**मनो.—**“ पण तसें बोलतांना त्यांच्या मनांत तुमच्याविषयीं द्वेष कसा जळत असे हेंहि माहीत आहेना ? ”

**नव.—**“होय. म्हणूनच मी म्हणतों कीं मनांत द्वेष नसावा, आणि थुंकी न उडावी या मिषानें तोंडाला पदर लावून मर्यादा संभाळण्याचा बहाणाहि कोणी करूं नये ! प्रजेला जें कांहीं माझ्या तोंडावर बोलून मागतां येणार नाहीं तें मी तिला कधींहि देणार नाहीं !”

या उत्तरानें मनोहर कुंठित झाला, पण इतकी थट्टा करून झाल्या-वर महाराजांनी त्याला असें आश्वासन दिलें कीं ‘मी दरबारांत प्रास्ताविक भाषण करीन व नंतर निघून जाईन; मागें तुमची सभा तुम्ही चालवावी.’

ठरल्याप्रमाणे सभा भरली. मोठ्या दिवाणखान्यांत चौफेर शुभ्र एक-रंगी बैठक अंथरली होती. महाराजांकरिता वेगळी गादी व लोडतक्ये ठेवले होते. नेहमीच्या नियमाविरुद्ध, महाराजांच्या डाव्या अंगाला दरबाराचे मुख्य मुख्य अधिकारी, तैनातदार, नोकर, सनदी वकील हे बसले होते. आणि उजव्या अंगाला प्रजाजनांच्या सभेंत निवडलेले प्रतिनिधि बसले होते. नेहमीच्या क्रमाची ही उलटापालट महाराजांच्या आज्ञेनें मुद्दाम करण्यांत आली होती. मेळ्यांत अग्रस्थानीं, नवलपूरचे नगरशेठ हे बसले असून जवळच पण एका स्वतंत्र जागीं विमलहि बसली होती. सभेंत इतर स्त्रिया कोणी नव्हत्या. प्रभाकरालाहि लोकांनी निवडलें होतें, पण तो दरबाराच्या वेळीं आंबराई-जवळच्या तालमींत आपले मित्र घेऊन हास्यविनोद करीत, व तांबड्या मातीनें मळलेल्या एकमेकांच्या पाठी चोळीत, बसला होता. “दादा, चल-तोस का सभेला ?” असें घरून निघतांना विमलनें त्याला विचारलें. पण तो म्हणाला “:ती सभाबिभा काय ती तुझी तूंच संभाळ कशी ती ! मी पडलों रानटी माणूस. सभेंत कसें बोलावें हें जसें मला कळत नाहीं तसेंच सभेंत न बोलतां गप्प कसें बसावें हेंहि मला कळत नाहीं. आपली बजरंग बलीची सेवा हीच आमची सभा आणि हेंच माझें स्वराज्य. मला

कोणी राज्य दिलें तरी नको. मी फक्त प्रजेचा बिनपगारी कोतवाल होऊं इच्छितों. राजाच्या पगारी कोतवालाच्या हातून ज्या अन्यायाचा प्रतिकार होत नाही त्याचा प्रतिकार करणें हें माझें जन्माचें काम म्हणून मीं ठरवून घेतलें आहे. तें मी आणि माझे सवंगडी करीत राहणार! तूं सभेला जा आणि प्रजेची वकिली करायची ती कर! नव्या कारकीर्दींत माझ्या कोतवालीचें काम न पडलें तर मला देवच पावला."

सभेच्या कामाला सुरुवात करतांना महाराजांनी उभे राहून खालील भाषण तोंडी केलें. ते म्हणाले, "सज्जन प्रजाजन हो, माझ्या कच्चया मुखत्यारीचा समारंभ पूर्वी झाला तो आपण पाहिलाच. आज माझ्या पक्क्या मुखत्यारीचा समारंभ आहे असेंच मी समजतों. पण माझी पक्की मुखत्यारी म्हणजे संस्थानाच्या प्रजेला स्वराज्यदान. त्याची तयारी मनानें करूनच आज ही सभा भरवली आहे. आपण योग्य वाटेल तें मागावें व मला योग्य वाटेल तें मीं द्यावें असा अधिकार निर्देश केला तरी, या मागण्यांत व या देण्यांत फारशी तफावत पडूं नये अशी माझी इच्छा आहे. माझ्या प्रजेच्या शहाणपणावर व सौजन्यावर माझा विश्वास आहे!"

इतकें बोलून महाराज निघून गेले व पुढे चर्चा सुरू झाली. विमललाच सर्वांनी एकमतानें अध्यक्षस्थान दिलें. स्वराज्य हवें म्हणजे काय व कसे हवें हें सांगण्याचा पहिला मान नगरशेठना सहजच मिळाला. ते म्हणाले—"आहे तें आपलेंच राज्य आहे नव्हे का? सुखानें ज्यानें त्यानें आपापला धंदा करावा, आणि राजेसाहेबांना आयुष्य चिंतावें अन् दुसरें काय? दिवाणसाहेबांच्या कारकीर्दींत दुकानपट्टी बसली ती उठवावी. दुकानदार लोक आपल्या दुकानापुढे पडव्या काढतात, मालाची गर्दी झाली म्हणजे चार हमालांना बसायला सावलीची जागा होते त्यांत! त्या काढायचा हुकूम झाला आहे तो रद्द व्हावा. तसेच आमच्यासारखे चार लोक सोन्या–रुप्याचा व्यापार करतात. त्यानें गांव श्रीमंत होतो परस्पर. तेव्हा त्या जिनसावरची जकात उठवावी. आणि ती हिशेबी वसूल करायला कठिणहि नाही का जात? आणखी एकच. म्हणजे

कोडतांत हुकुमनामे मिळतात त्यांची अंमलबजावणी जरा लवकर व्हावी. हेंच स्वराज्य. आहे काय अन् नाही काय !"

लगेच कॉ. डंखी हे कडकडून उठले. त्यांनी आपले खिशांतले हात बाहेर काढून हातवारे करून वरच्या तिसऱ्या सप्तकांत बोलायला सुरुवात केली. ते म्हणाले "हा कसला दरबार आणि ही कसली सभा! स्वराज्याच्या चर्चेचा हा नुसता पोरखेळ आहे. नाटक आहे. थट्टा आहे. गरीब दरिद्री दुबळ्या प्रजाजनांच्या काळजांतील रक्ताच्या पुराने न्हालेल्या या नरकमय पापभूमींतून, श्रीमंती भांडवलशाहीच्या या मूळ पीठाच्या म्हणजे राजधानीच्या हद्दींतून, बाहेर चला. आणि स्वराज्याची चर्चा करायची तर, ज्या शेतजमिनींत पावसाच्या बरोबरीने शेतकऱ्यांच्या अंगांतला घाम आणि डोळ्यांतले अश्रु सांडून जमीन भिजली आहे तींत बसा, आणि तोंड उघडा. म्हणजे त्या अभागी भूमींतून उष्ण वाफा निघतील त्या तुमच्या तोंडून स्वराज्याचा खरा अर्थ बाहेर काढतील. शेतकऱ्यांचा नांगर, जो आज नापिकी कोरड्या जमिनींत फिरून सावकारा-इनामदाराकरिता कडब्याची काडी उगवतो, तो या नगरशेठजीच्या हवेलीवर आणि राजेसाहेबांच्या सिंहासनाच्या जागेवरून फिरेल, तेव्हाच खरें स्वराज्य लाभेल. कोणा बापजाद्यानें राज्य मिळविलें, आणि तें म्हणे पिढ्यान् पिढ्या त्याच्या आयदी वंशजांनी नुसत्या टिवल्याबावल्या करीत, माणुसकीचा खून होण्यासारखे प्रजेवर अन्याय करीत, सुखाने खात बसावें ! तुमची राजभक्ति म्हणजे तो नुसता नागडा स्वार्थ आहे. तुमच्या डोळ्यांत राजपदावर चैनींत लोळणाऱ्या एका व्यक्तीची बाहुली नाचते. पण दुसरीकडे उपाशीं मरणाऱ्या, पाठपोट एक झालेल्या, गोठ्यांतल्या गुरांच्या दावणीला आपली मान गुंतवणाऱ्या, सहस्रावधि लोकांकडे पाहावयाचें झालें म्हणजे तुमचे डोळे फुटतात ! राजासकट राजनिष्ठ भाटांची आणि कोयत्याहतोड्याची गांठ पडेल तेव्हाच खरें स्वराज्य लाभेल !" इतकें बोलून त्याचा घसा बसला व खोकला आवरेना म्हणून कॉमरेड डंखी यांनी आपल्या खिशांतून रुप्याची सिगारेट केस काढून तिच्यांतली एक सिगारेट घेऊन काडी ओढून ती जागच्या जागेवर शिलगावलीहि !

या अद्‌भुत तांडव नृत्याने सगळी सभा हदरली. जो तो एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागला. दक्षयज्ञाचा विध्वंस करणारा वीरभद्र आज नवलपुरांत अवतरला असें पुराण ऐकलेल्या भाविक लोकांना वाटलें. कांहींनी दांतओठ चावले. कांहींच्या हाताच्या आपोआप मुठी वळल्या! अस्फुट अशा शब्दांची गलबल माजली. पण लगेच विमल उठून उभी राहिली आणि शांत गंभीर आवाजाने म्हणाली, "आतां जे गृहस्थ बोलले त्यांनी आधि आपली सिगारेट विझवून खिशांत घालावी. तरच सभेचें काम पुढे चालू होईल."

पण नुसत्या भाषणांत अशा रीतीने वेळ घालवूं नये म्हणून मनोहर पुढे येऊन महाराजांतर्फे एकेक सूचना सभेच्या पसंतीकरिता मांडूं लागला.

मनो.—महाराजांचें म्हणणें असें आहे कीं, "मी लवकरच नदीकांठच्या आंबराईतील उंचवट्यावर बांधलेल्या झोपडीवजा सुंदर घरांत जाऊन राहणार आहे. म्हणून हा राजवाडा प्रजाजनानी आपल्या ताब्यांत घ्यावा, व त्याचें काय वाटेल तें करावें."

डंखी—तो पाडून जमीनदोस्त करावा तरच गरीबांच्या डोळ्यांचें समाधान होईल. त्यावर गाढवाचा नांगर फिरवावा"!

बन्या—"तो फिरवावयाचा होईल तेव्हा आपण फिरवा म्हणजे चांगला फिरेल व गाढवाचा फिरविल्याचें श्रेय येईल. तोंपर्यंत वाडा आहे तसाच ठेवावा, व त्यास दरसाल रंगसफेती हल्लीसारखी द्यावी. 'राजाचा त्याग तोच प्रजेचा भोग' या न्यायाने, वाडा प्रजेच्या उपयोगी पडावा म्हणजे झालें. आणि तो उपयोग असा कीं, वाड्यांत जुन्या नव्या पिढ्यांच्या मोठेपणाच्या ज्या खुणा जुन्या असतील किंवा नव्या बनवितां येतील त्यांचें संग्रहालय करावें. आणि महाराजांनी दर आठवड्यांतून एक दिवस दरबारच्या दिवाणखान्यांत प्रजाप्रतिनिधींसह बसून प्रजेचीं सुखदुःखें ऐकत जावीं."

इतकें झाल्यावर त्या वेळचें सभेचें काम दोन प्रहरपर्यंत तहकूब करण्यांत आलें.

---

## प्रकरण चोविसावें

# स्वराज्यदानाचा नजराणा

दोन प्रहरीं फिरून दरबार आणि संस्थानसुधारणेची चर्चा सुरू झाली. दरबारांत स्वतः महाराज नाहीत यामुळे दरबारी सभाजनांची संख्या बरीच घटली होती. तथापि कागदावर मांडलेला कार्यक्रम पुरा करणें अवश्यच होतें. म्हणून मनोहर हातांत टिपणें घेऊन विमलच्या परवानगीने बोलू लागला.

**मनो.**—"महाराजांचें म्हणणें असें आहे कीं, राजवाड्यांतील सर्व जवाहीर व राजभोगोपयोगी वस्तु या जाहीर लिलावाने विकून, येईल ती रकम व्याजीं लावून, व्याजाचा उपयोग स्त्रियांकरिता शिक्षणगृहें, आरोग्यगृहें व प्रसूतिगृहें यांकडे करण्यांत यावा."

**नगरशेठ**—"जवाहीर लिलावाने विकावयाचें तर दोन अटी घालाव्या. संस्थानाबाहेरच्या कोणाहि मनुष्याला लिलावांत बोलण्याची परवानगी देऊं नये. आणि संस्थानांतल्या गिऱ्हाइकाकडून जी चढांत चढी मागणी होईल ती मंजूर व्हावी. तीनवार बसल्या बैठकीला व्हावे."

**बन्या**—"माझी या सूचनेला हरकत आहे. संस्थानच्या बाहेरच्या लोकांना लिलावांत बोलूं दिलेंच पाहिजे. तरच किंमत जास्त येईल. नाही तर ती सगळी नगरशेटजींचीच धन थोड्या किंमतींत होईल."

**डंखी**—"जवाहिराचा लिलाव करून निरनिराळीं गृहें स्त्रियांच्या उपयोगाकरितां काढून चालवावीं. पण त्यांत श्रीमंत व पांढरपेशे यांच्या स्त्रियांना मज्जाव असावा."

**बन्या**—"जवाहीर विकून व्यवस्था महाराजांनी सुचविल्याप्रमाणें करावी. पण श्रीमंत किंवा पांढरपेशे यांच्या स्त्रियांना मज्जाव न ठेवतां इतकाच निर्बंध ठेवावा कीं, असेल ती जागा आधीं गरीब स्त्रियांना द्यावी व मग उरेल ती इतरांना."

**मनो.**—" महाराजांची अशी सूचना आहे कीं, राजवाड्यांतल्या देवांचें दर्शन सभामंडपांत थोड्या अंतरावरून सर्व जातींच्या लोकांना समान हक्कानें घडावें. कथाकीर्तनांतहि असेंच असावें. पण प्रत्यक्ष देवघराच्या गाभाऱ्यांत अधिकृत व शुचिर्भूत पुजाऱ्याखेरीज कोणीच प्रवेश करूं नये. देवाला पुष्पादि भोग चढवावयाचे ते पुजाऱ्याच्या हातून चढवावे."

**डंखी**—" देव उचलून नदींत फेकून द्यावे व देवघर जमीनदोस्त करून धर्मोपासनेची खूणहि तेथे राहूं देऊं नये. धर्म हा समाजाला कलंक आहे. गरीबांना धर्मच नाडतो."

**नगरशेठ**—" देव, देवघर आणि नित्यनैमित्तिक सर्व पूर्वीसारखें चाललें पाहिजे. अस्पृश्यांवरचा बहिष्कार आहे तसाच रहावा. महाराजांना होत नसेल तर मीं देवस्थान संभाळून त्याचा खर्च चालवायला तयार आहे."

**बन्या**—" नगरशेठजींचा थोडा गैरसमज आहे. महाराजांकडून संस्थान-च्या पैशांतून देवस्थानचा खर्च चालण्याला हरकत नाही. फक्त स्पृश्यास्पृश्य-भेदाला त्यांची हरकत आहे."

**मनो.**—" महाराजांचें म्हणणें असें आहे कीं, संस्थानाच्या घराण्यांतील कोणाहि पूर्वजाच्या श्राद्धपक्षाला किंवा उत्सवाला फाजील खर्च होऊं नये!"

**डंखी**—" उत्तम, बहुत उत्तम. सर्व जुन्या पिढ्यांचे लोक गाढव होते. कारण ते भांडवलशाहीचे उपासक होते."

**बन्या**—" मग गाढवापासून डंखीसारख्या प्रजेचा जन्म व्हावा हें आश्चर्य नव्हे काय ?"

**विमल**—" हीं उत्तरें प्रत्युत्तरें सभ्यतेला सोडून आहेत. महाराजांची सूचना तत्त्वतः ठीक आहे. मग मला वाटतें कीं, राजघराणें व प्रजाजन यांच्या जुन्या पिढ्यांपैकीं जे लोक चांगले व चिरस्मरणीय होऊन गेले, त्या सर्वांचें स्मरण करण्याकरिता, वर्षांतून एक दिवस ठरवून, त्यांच्या उत्सवाकरितां संस्थानचा खर्चहि ठरवून द्यावा. मनुष्यमात्रांतला मोठेपणा हा केव्हाहि कोठेहि उपासनीयच होय. फक्त हा मोठेपणा श्रीमंताप्रमाणें गरीबांतहि असतो हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. संस्थानसंरक्षणाच्या कामीं राजघराण्याच्या पुरुषा-प्रमाणें प्रजाजनांतले शूर वीर मुत्सद्दी हेहि उपयोगी पडले असतीलच."

**मनो.**—"महाराजांचें म्हणणें असें आहे कीं, मला स्वतःला तनखा द्यावयाचा तो प्रजेने ठरवून द्यावा. जो ठरेल त्याकरितां इतर नोकरांप्रमाणें दिवसाच्या कामाचा सर्व वेळ मी कारभार पहाण्याला खर्च करीन."

**नगरशेठ**—"घरच्या मालकाला तनखा ठरवून द्यावा म्हणजे काय हें कांहीं आपणाला कळतच नाही! मी घरीं पावशेराचाहि भात खात नाही. डोक्यावरच्या चिंधीला जरतारीचा स्पर्श कधीं करूं दिला नाही. पण मला अमूक खर्च तोडून घे असें कोण म्हणणार?"

डंखी—"कोण म्हणणार! 'प्रजा म्हणणार. चुकलों, प्रजा नव्हे लोकशाही म्हणणार. जुन्या अन्यायांची भरपाई व्हावयाची तर महाराजांनीहि स्वतः हातांत कुदळ फावडें घेऊन मजुरी करायला बाहेर पडलें पाहिजे."

बन्या—"ओहो! काय अक्कल पण! स्वतः डंखी यांचे हात पहा! त्या हातांनी कुदळफावडें तर राहोच, पण लेखणीनेहि घट्टा पडलेला दिसत नाही. हात पाहून तो बांगड्या भरण्याला किती नाजूक चांगला आहे असें वाटून कासार मात्र बहुत खूष होईल."

विमल—"फिरून ही भाषाहि असभ्यच. प्रश्न इतकाच आहे कीं, राजेसाहेब तनखा ठरवून मागतात तो किती द्यावयाचा!"

या प्रश्नावर कोणाचेंच मत कोणाशीं जुळेना. एकानें महाराजांना घोड्याचे दोनतीन रथ द्यावे असें म्हटलें, त्यावर कॉ. डंखी यांचा एक सोबती ओरडून म्हणाला, "तें काय नाय! म्हाराजांना मोटारच द्याया व्होवी. न्हाईतर सत्याग्रह कराया अमी लोक मोटारपुढे कसे आडवे पडणार?"

शेवटीं आंकडा ठरलाच नाही. तेव्हा विमल म्हणाली "ज्यांनी आपण होऊन राजवाडा टाकून आमराईतली झोपडी हें आपलें घर म्हणून ठरविलें, ज्यांनी राजवाड्यांतलें जवाहीर विकायला काढलें, त्यांच्या सुजाणपणावर आपण ही गोष्ट सोपविली तर योग्य तो तनखा तेच ठरवून घेणार नाहीत काय?"

**मनो.**—"महाराजांचें असें म्हणणें आहे कीं, प्रजाजनांनीं परस्पर नीट वागण्याचें ठरविल्यास पोलीस खर्च बराच वांचवितां येईल."

पण पोलीस कमी केले तर आपलें संरक्षण कसें होणार या भीतीनें सर्वांनी गिल्ला करून सांगितलें कीं, हा खर्च मुळीच कमीं करूं नये.

मग प्रश्न निघाला खातेवार कारभाराचा. तेव्हां बन्या म्हणाला—"महाराजांचें उदार धोरण आमच्या लक्षांत आलें. प्रजा तयार असेल तर तिनें आपल्या पसंतीप्रमाणें खातेवार मुखत्यार नेमून त्यांच्याकडून कारभार घ्यावा, आणि ते नापसंत ठरतील तेव्हा त्यांना कामावरून दूर करावें. याहून अधिक काय कोणाला देतां किंवा कोणाला मागतां येणार ? पण या संस्थानच्या प्रजेला आजवर असें जुलमाने ताब्यांत ठेवून वागविण्यांत आलें आहे कीं, राज्यकारभार म्हणजे काय आणि तो कशाशीं खातात याची कल्पनाहि त्यांना नाही. तेव्हा खातेवार कारभार करायला हरघडी मुखत्यार नेमणें व तो काढून टाकणें हा अधिकार प्रजेला दिला तरी तो तिला वापरतां येणार नाही."

**मनो.**—"मग अधिकारी वर्ग प्रजेला बेजबाबदारच राहावा तर ?"

बन्या.—"तें काय म्हणून ? राजपदावर असणाऱ्या राजारूपी कुलमुखत्याराला हे अधिकारी नेमतां व काढतां यावे म्हणजे झालें. आधुनिक काळीं लोकसत्ताक राज्यपद्धतींत जिला प्रधान–मंडळाची 'जबाबदारी' म्हणतात ती फुकट आहे! प्रधानपद ज्याला मिळतें त्याला तो एक हंगामी मक्ता असें वाटतें. या मक्तयाच्या मुदतींत त्यानें आपला नादानपणा कितीहि सिद्ध केला, सरकारचा व प्रजेचा पैसा हस्तें परहस्तें कितीहि लुबाडला, तरी त्याला ठरल्या मुदतींत काढावयाला कोण महत्प्रयास पडतात! आणि काढलाच तर तो म्हणतो 'मग त्यांत काय झालें ! माझा व इतरांचा फार तर मतभेद झाला असें म्हणतां येईल.' या मतभेदाच्या पारिभाषिक नांवाखाली त्याला आपल्या बडतर्फीला सौम्य स्वरूप देतां येतें. केव्हा तरी कमी होणारच असें समजून, अधिकाराच्या साधेल त्या मुदतींत, तो पगार लांचलुचपत इत्यादि मार्गांनी इतका पैसा मिळवितो कीं, पुढे जन्मभर त्यावर त्याला सुखांत लोळतांच न आलें तरी, स्वतंत्रपणें वाटेल तर दुसरा एखादा धंदा करून जगतां येतें. ही कसली जबाबदारी ? नांव मोठें पण दर्शन खोटें."

**विम.**—"मग जबाबदारी अंगीं लावली जाण्याचा दुसरा एखादा मार्ग तुम्ही सुचवितां काय ?"

बन्या—"मला एक मार्ग सुचतो तो सांगतों. केवळ अधिकाऱ्याचें धोरण प्रजेला नापसंत झालें, किंवा तें खरोखरच प्रामाणिकपणाच्या चुकीचें ठरलें, तर त्याला कांही शासन होऊं नये हें ठीक आहे. पण कारभाराच्या धोरणाची सूक्ष्म चौकशी केली, तर तींत प्रधानादि अधिकाऱ्यांचे व्यक्तिमनोगत नैतिक दोष आढळून येऊं शकतात. कोणाचें धोरण द्रव्यलोभाने, कोणाचें द्वेषाने, कोणाचें जातिमत्सराने, कोणाचें स्त्री-प्रेमाने बनलेलें हें तर आढळतेंच. पण फाजील अहंकाराचा, गर्वाचा, नैतिक दोषहि त्या धोरणाच्या मुळाशीं आढळून येऊं शकेल. या दोषाने केलेलें अपकृत्य हा जर सामान्य प्रजाजनामध्ये गुन्हा ठरतो, व तो फौजदारी न्यायमुनसुफीला पात्र होतो, तर अशा गुन्ह्याबद्दल अधिकारी—कोणताहि अधिकारी—मग तो राजाने नेमलेला असो, लोकनियुक्त असा—गुन्हेगार म्हणून चौकशीला पात्र ठरला पाहिजे. आज अधिकाऱ्यांना ही दहशत मुळीच नाही. अधिकार म्हणजे तें एक वज्रकवच असें ठरतें. वास्तविक हातीं अधिकार म्हणून त्याची दहशत जशी लोकांना, तशी लोकांची दहशत अधिकाऱ्यालाहि पाहिजे. खालसांत अधिकारी फार तर बडतर्फ होतात; पण नैतिक दोषांनी अपकृत्यें घडणाऱ्या, व तीं करणाऱ्या, किती अधिकाऱ्यांचा इनसाफ आजवर झाला आहे ? एका अधिकाऱ्याला तुरुंगवास घडेल तर बाकीचे दहा सावध होतील. अधिकारी हा प्रजेच्या मताने नेमला जाण्याच्या किंवा बडतर्फ होण्याच्या हक्कापेक्षा, प्रजाजनाच्या साध्या फिर्यादीनेहि अधिकाऱ्याच्या कृत्यांचा इनसाफ व्हावा हा अधिकार किंवा हक्क मीं अधिक महत्त्वाचा मानतों. आमच्या माजी दिवाणांना बडतर्फी ही शिक्षा कसली ! ते पळून गेले नसते तरी त्यांचें काय झालें असतें ! जुन्या इतिहासांत राजे-लोक स्वतः जुलमी व स्वतंत्र असले तरी त्यांच्या प्रधानावर फौजदारी खटले होत व त्यांना शिरच्छेदाइतक्या प्रखर शिक्षा देत. आज सोव्हिएट रशियांत तोच प्रकार दिसतो व तोच बरोबर आहे."

बन्याचें हें बोलणें कॉमरेड डंखी याला फारच पटलें. तो ओरडून म्हणाला—"बस बस. अगदी बरोबर ! या शतकांतल्या रशियाने अठराव्या

शतकांतल्या फ्रेंच राज्यक्रांतीचें अनुकरण करून रक्ताच्या नद्या वाहविल्या व तोडलेल्या डोक्यांचे ढीग रचले. म्हणूनच सोव्हिएटला आपलें बस्तान बसवितां आलें. नाही तर आपल्या फ्रेंच लोकशाहींतली प्रधान-मंडळाची जबाबदारी पाहा! दगडावर टेकलेल्या लांब फळीच्या दोन टोकांवर बसून 'मी खाली तूं वर, तूं खाली मी वर' असा खेळ खेळत रमणाऱ्या पोरांप्रमाणे फ्रेंच लोकसभेंतून प्रधानकीचा खेळ आज चालतो !

पण दरबाराची ही नवलकथा यापुढे लांबविण्याचें कारण नाही. आणखी कांही वेळ अशीच चर्चा चालून सभा संपली. तात्पर्य, "माझ्या औदार्याच्या तोडीला तोड देणारें स्वराज्याचें ज्ञान प्रजाजन दाखवितील" ही नवलरायाची अपेक्षा फसली. दरबारी चर्चेला अवघ्या दोनतीन माणसांच्या संभाषणाचें स्वरूप आलें. पण त्यांत आश्चर्य कसलें ? आमच्या सर्वपक्षीय परिषदा किंवा मोठमोठीं संमेलनें पाहिलीं तरी त्यांतहि असा कांहीसा प्रकार दिसून येतोच कीं नाही ? योजना व वादविवाद यांची तालीम पांचपन्नास वर्षें केलेल्या खालसा प्रजाजनांतहि खऱ्या तज्ज्ञांची वाण जर इतकी भासते, तर आमच्या बिचाऱ्या नवलपूर संस्थानांत ती भासल्यास काय नवल? महाराजांची म्हणून योजना मनोहराने पुढे मांडावी, तिला नकार कोणीच देऊं नये, फक्त एकट्या बन्याने कांही सुलट व एकटया कॉ. डंखीने कांही उलट बोलावें, असें होऊन चर्चेच्या सूच-नांची यादी लवकरच खलास झाली. तेव्हा किल्ली संपलेल्या फोनोग्राफ-सारखी दरबाराची स्थिति पाहून विमलने शहाणपणाने कार्यक्रम संपवून सभा बरखास्त केली.

महाराजांचें गुणवर्णन यथेच्छ करीत लोक आपापल्या घरीं गेले. पण झाल्या चर्चेतून काय निष्पन्न झालें याची नक्की कल्पना येण्याइतके राजकारणज्ञ लोक संस्थानांत कितीसे असणार ? परसांतल्या विहिरीचें घाणेरडें पाणी काटवटींत घेऊन चुळक्याने स्नान करणाऱ्या चांडाळाला, एकदम हरिद्वार-च्या गंगाप्रवाहांत नेऊन बसविलें तर कसें वाटेल ? आजवर संस्थानिकांच्या ऐश्वर्याचा, सत्तामदाचा व सुखोपभोगाचा रणगाडा ओढीत राहण्याचें दुःखच ज्या प्रजाजनांनी भोगलें, त्यांना केवळ मानेवरचें जूं निघाल्याचाहि

आनंद इतका अपूर्व होता कीं, त्याच्या भरांत, यापुढे मिळणाऱ्या स्वराज्य-रूपी स्वातंत्र्याच्या कोणत्या कुरणांत जाऊन चरावें याचा निर्णय त्यांना लवकर करतां येईना !

सभेचा वृत्तान्त सांगण्याकरिता मनोहर महाराजांकडे गेला. तो हंसतोसा पाहून महाराज म्हणाले, "का रे बाबा हंसतोससा ?"

मनो.—"हंसूं नको तर काय करूं ? कागदी घोडा थयथय नाचलेला पाहिला म्हणजे हंसूं येणारच कोणालाहि ! दरबार भरवून तुम्हाला काय मिळालें ? तुम्ही संपूर्ण स्वराज्य द्यायला काढलेंत. सही केलेला कोरा चेक प्रजाजनांनी आपल्या हाताने भरण्याकरिता त्यांच्यापुढे टाकलात. पण त्यांना चेक हाताने कसा भरावा हें तर माहीत नाहीच, पण त्यांत भरण्याच्या इष्टांकाचा उच्चारहि त्यांच्या तोंडून निघेना. संस्थानी प्रजेचें अज्ञान उघडें करून तुम्ही त्यांची फुकट फजिती मात्र केलीत. वर देणारा ईश्वर सिद्ध झाला तरी "वरहि वरायास पाहिजे समज !" तो समज कोठला आणावयाचा ? स्वराज्य देण्याच्या आधी स्वराज्य कसें व काय मागावयाचें हें शिकविण्याची शाळा घातली पाहिजे या देशांत. तें न करतां एकदम स्वराज्यच द्यायला काढलेंत, तें घेणाराने कसें घ्यावें ? भूक लागण्याच्या आधी कोणालाहि पानावर बसविलें म्हणजे असेंच व्हावयाचें."

नवल.—"स्वातंत्र्याची भूक मनुष्यमात्राच्या पोटांत नेहमीच जागृत असते !"

मनो.—"ठीक आहे. मग फार तर त्याच्यापुढे पान वाढून ठेवावें. पण काटे चमचे सुऱ्या ठेवल्या कीं तो गोंधळूनच जाणार ! चमचा घशांत जायचा, काट्याने जीभ चिरायची, आणि सुरीने ओठ कापायचे. हाताने पोटभर जेवणें हें सुराज्य. तसेच जेवणाच्या पदार्थासंबंधाने, पाहुण्याला तर राहोच, पण घरच्या यजमानालाहि आज काय पदार्थ करूं असें कोणी विचारीत नाही; मग कसा करू हें तर नाहीच नाही."

नवल.—"पण इच्छाभोजन ही गोष्टच जगांत नाही म्हणतोस कीं काय ?"

मनो.—"इच्छाभोजन देणें हा आढयतेचा, संपन्नतच्या गर्वाचा, एक

लहरी प्रकार आहे इतकेंच. उलट यजमानाच्या पोटच्या पोराचें मांस रांधून मागण्यापर्यंत इच्छाभोजनाची मागणी गेलेली शिवलीलामृतांत आपण वाचतोंचना? 'माझ्यासारखा दाता जगांत झाला नाही' या गर्वाच्या भावनेने इच्छाभोजन देणारा जगाला आव्हान करतो. आणि खादाडपणांतले जे कसलेले पैलवान मल्ल असतात तेच त्या आव्हानाचा स्वीकार करतात. तात्पर्य, या अहंकाराच्या युद्धांत सात्विक भावनाच नाही. तुम्ही स्वराज्याचे अधिकार काय हवे ते मागा, हें तुम्ही जाहीरनाम्यांत प्रजेला केलेलें आव्हान कांहींसें असेंच नव्हतें काय? तें करतांना तुम्ही प्रजेची सत्पात्रता काय पाहिली? आपणायोग्य असे अधिकार काय हवे हें मागण्याचें ज्ञान तुमच्या प्रजाजनांना नाही हें सिद्ध झालेंच. उलट कॉमरेड डंखी याचे प्रलाप तुम्ही ऐकलेंत तर स्वराज्याच्या इच्छाभोजनाचें आव्हान परत घ्यावें असें तुम्हालाहि वाटलें असतें. तात्पर्य, आपला हा लहरीपणा पुरे झाला, महाराज!"

नवल.—"असो, लहरीपणा हा सौम्य शब्द वापरूनच माझी निंदा थांबवितोस हें माझें भाग्यच म्हणावयाचें. पण मनोहर, धन्य आहे तुम्हा लोकांची! मी इतका जपून वागतों तरी माझ्यावर लहरीपणाचा आक्षेप आपला ठेवलेलाच! सांग बरें, मी आतापर्यंत काय लहरीपणा केला तो! मी स्वतः लग्न केलें नसेल अजून; पण मी कांही विजातीय पशुपक्ष्यांचीं लग्नें लावून मिश्र प्रजा बनविण्याचे प्रयोग सुरू केले नाहीत! मी स्वतः साधा पोषाख करीत असेन; पण गाढवांच्या गळ्यांत रत्नांच्या माळा आणि पाठीवर जरतारी झुली घालून, त्यांवर अंतःपुरांतल्या राजस्त्रिया उघड्यानागड्या बसवून, त्यांची मिरवणूक राजधानींतून काढलेली नाही! मी दिवाणसाहेबांना लवून नमस्कार करीत असेन; पण माझ्या खुषमस्कऱ्यांकडून माझ्या समक्ष त्यांची आईमाई उद्धरून त्यांच्या बदनामीच्या लावण्या म्हणविल्या नाहीत! मी कोणाच्या अंगावर रागावून जात नाही हें राजाला न शोभण्यासारखें असेल खरें; पण दिवाणखान्याच्या बैठकीवर चावरें कुत्रें किंवा वाघाचीं पिलें बसवून कोणी भेटायला आला तर त्यांच्याकडून त्याला ओरबाडवीत तरी नाही! मीं स्वतः परस्त्रीकडे पाहत नाही हें माझ्या राजेपणाला शोभत नसेल

कदाचित्; पण मी मोटारींतून गुंड बसवून त्यांच्या करवीं रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या सुंदर स्त्रिया जबरीने पळवून त्या भ्रष्ट करून रानांत सोडून तरी देत नाही! मीं स्वतःवर प्रजेचा पैसा फार खर्चीत नसेन; पण कबूतरांचीं लग्नें लावण्याला लाखों रुपये तरी उधळीत नाही. मीं स्वतः केव्हा केव्हा उपोषणें करो; पण सज्जन शाकाहारी पाहुण्यांना जेवावयाला बोलावून त्यांना न कळेल अशा रीतीने गोमांस खायला घालून दुष्टपणाने तें उघडकीस आणून वरती बेशरमपणें खो खो करून हंसत तरी नाही! माझ्याकरितां नोकरानेहि श्रम केले तर त्याला मोबदला न द्यावा तो देत असेन;पण मी त्याची बायको पळवून गवगवा झाला म्हणजे 'तिची किंमत किती पाठवूं' म्हणून अपमानकारक निरोप तरी त्याला धाडीत नाही!

"लहरीपणाच्या माझ्यावरील आरोपाला हें उत्तर पुरें होईल. असो. माझ्या प्रजाजनाना स्वराज्य कसें हवें तें सांगतां न आलें म्हणून मी त्यांना दोष देत नाही; पण त्याना तें विचारण्याबद्दल तूं मलाहि लहरी म्हणूं नको. त्यांचें अज्ञान प्रकट करण्याचा किंवा त्यांना लाजविण्याचा माझा हेतु नव्हता. उलट ' हवें तें मागा ' असें आव्हान करण्यांत माझा अहंकार किंवा आढ्यता ही कारणीभूत होती हेंहि तुझें म्हणणें बरोबर नाही. कारण राज्यावरील स्वत्वबुद्धीच्या निवृत्तीचा पुरावा मला एरवीं कसा देतां आला असता? कोणीहि सत्ताधारी या स्वत्वनिवृत्तीला मनांतून खरा तयार झाला म्हणजे त्याचें कर्तव्य संपतें. राजे-लोक, संस्थानिक यांना हें कळत नाही कीं, प्रजेला स्वराज्य देण्याला तयार होणें हीच पदभ्रष्ट न होण्याची उत्तम जामिनकी आहे. मीं तर बोलून चालून राजपद बुडवावयालाहि तयार आहे हें तूं जाणतोसच. राज्य देऊन टाकण्यापेक्षा तें घेऊन चांगलें चालविणें हेंच कठिण आहे. स्वराज्य नाही तोंपर्यंत तें मिळविण्याला जितके श्रम खर्चीं पडतात, तितके श्रम तें मिळाल्यावर त्याचें सुराज्य करण्याकरितां लोक खर्चतील तर पृथ्वीचें नंदनवन होईल. पण नाही त्याची हाव धरणें हा जसा प्रजेतील मनुष्यधर्म आहे, त्याप्रमाणे स्वार्थ सिद्ध असतां त्याच्या त्यागाला तयार होणें हाच मी राजधर्म समजतों."

आपण होऊन आरंभलेलें सत्कार्य शेवटास नेऊन फलद्रूप करणें महाराजां-

ना प्राप्तच नव्हे तर हौस वाटण्यासारखेंहि होतें. प्रजाजनानें नजराणा पुढें करावा, राजानें त्याला फक्त हस्तस्पर्श करून नजराणा करणाराला देणगी म्हणून तोच परत करावा, याच्या उलट प्रकार या दरबारांत घडला. प्रजेला राजा मानून तिला महाराजांनी स्वराज्याचा नजराणा दिला. पण तिनें तो राजालाच परत केला ! अर्थात् काय द्यावें, काय राखून ठेवावें, याचा निर्णय करण्याची जबाबदारी फिरून महाराजांवरच पडली. तो निर्णय करण्याकरितां त्यांनी मनोहराला बोलावून घेतलें होतें. पण तो म्हणाला, 'या निर्णयाचें काम करण्याला सभेच्या अध्यक्षीणबाई अवश्य हव्या.' ही परस्पर झालेली, पण मनांतून प्रिय असलेली, सूचना महाराजांनी तत्काल मान्य केली. आणि 'उद्या सकाळीं नऊ वाजतां प्रभाकरासह बिमला बाईसाहेबांना राजवाड्यांत घेऊन येण्याकरिता तूं स्वतः माझा खास रथ घेऊन जा' असें सांगून महाराजांनी त्याची रवानगी केली.

* * * * *

मनोहर दुसरे दिवशीं सकाळी भाऊसाहेबांच्या घरीं जातो तों भाऊसाहेब अंथरुणावर उठून बसले होते. उजव्या बाजूला विमल संत्र्याच्या फोडी सोलून त्यांचे हातांत देत होती, डाव्या बाजूला प्रभाकर पडलें-सवरलें पुसून काढायला हातरुमाल घेऊन सज्ज बसला होता. आणि माईसाहेबहि सोवळ्यांत म्हणून बैठक सोडून दूर-अर्ध्या दाराच्या आड अर्ध्या दाराच्या बाहेर-अशा पतिराजाचे कुटुंबवत्सलतेचें हें अभिनव कुतूहल पाहत उभ्या होत्या.

मनोहरपंत आंत जातांच हा सुंदर चित्रपट अर्थातच थोडा गुंडाळून घ्यावा लागला. माईसाहेब आंत गेल्या, विमल व प्रभाकर दोघेहि उठून उभे राहिले, आणि ' इथेच बसून क्षणभर बोलूं ' असें मनोहरानें म्हटल्यामुळे त्यांनी खुर्ची ओढून पुढे ठेवली. तिजवर बसल्यावर विमलनें मनोहरांची ओळख भाऊसाहेबांना करून दिली. प्रभाकर खरोखर निरपराधी, त्याला निर्दोषी म्हणून कायमचा बंधमुक्त करण्यांत आलें होतें, व चौकशीला भिऊन दिवाणसाहेबांनी रात्रीं तोंड काळें करून पलायन केलें, या गोष्टी यापूर्वी परोपरीनें विमलच्या प्रेमळ भाषणांनी ऐकून म्हातारा निम्मा-अधिक बरा झालाच होता. आणि या सगळ्या गोष्टीला थोडेबहुत कारणीभूत आपल्या

भेटीला आलेले मनोहरपंत हे होते, ही माहिती मिळाल्यामुळे भाऊसाहेब प्रसन्नमुख होऊन त्यांनी दोन दोन वेळां वर हात उचलून त्याला नमस्कार केला.

मनो.—"भाऊसाहेब, आपण भाग्यवान आहां. प्रभाकरपंत व विमलाबाई अशीं अलौकिक दोन रत्नें आपल्या पोटीं आलीं. तेव्हा आपण धन्य आहां."

भाऊ.—"खरें आहे. पण रत्नें जींत निपजतात, त्या मातीवाळूच्या खाणीला स्वतःला त्याची जाणीव कोठे असते! रत्नांचा शोध दुसऱ्यांनीच करावा लागतो. त्यांचें तेज दुसऱ्यांनीच प्रकट करावें लागतें."

"आणि मग तरी त्या खाणीची कीर्ति 'हिऱ्यांची खाण' म्हणून जी होते ती तरी यथार्थ असतेना?" मनोहर म्हणाला.

मनोहराच्या या स्तुतिपाठाला लाजून विमल म्हणाली, "बाबा, हे दरबारी लोक. लोकांना हरभऱ्याच्या झाडावर चढविण्याच्या कामीं मोठे कुशल असतात." आणि आपली स्तुती कानांनी ऐकली तिचें हें असें निराकरण करून विषयच बदलावा म्हणून ती म्हणाली, "पण प्रायव्हेट सेक्रेटरी साहेबांनी कां येणें केलें तें कळलें नाही अजून."

मनो.—"निरोप्याने निरोप न सांगून कसें चालेल? मला महाराजांनीच इकडे आपणा उभयतांना राजवाड्यांत बोलवायला रथ देऊन पाठविलें आहे."

"कशाला?" विमलनें खऱ्याखुऱ्या आश्चर्यानें विचारलें.

मनोहर म्हणाला, "प्रभाकरपंताना अशा करतां कीं, त्यांच्या संबंधाच्या बारा वर्षांतल्या, इथून जाण्यापूर्वी पासून परत येईपर्यंतच्या, सर्व अद्भुत गोष्टी महाराजांना स्वस्थपणें साविस्तर ऐकायच्या आहेत; आणि आपणाला अशा करतां कीं, सभेंत झालेल्या भाषणांच्या सूचनांचा निष्कर्ष काढून पुढील राज्यपद्धतीची कांही रूपरेखा आपल्या सल्ल्याने आखावी—अशी महाराजाची इच्छा आहे."

दोन्ही हेतु सरळ, स्पष्ट व स्वाभाविक यामुळे कोणालाच आढेवेढे घेता येईनात. मग मनोहर नको नको म्हणत असतां त्याला चहा देऊन झाल्यावर तीं तिघे रथांत बसून राजवाड्याकडे निघालीं.

---

## प्रकरण पंचविसावें

# पाळीव पोपटाला स्वातंत्र्यदान

दरबार संपला त्या रात्रीं बराच पाऊस पडून हवा थंडगार झाली. दुसरे दिवशीं सकाळीं पाहावें तिकडे रम्य प्रसन्नता खेळत होती. निरभ्र आभाळांतील बालरवीचें सौम्य तेज प्राणिमात्राला सुखवीत व आनंदवीत होतें. राजवाड्याभोंवतालच्या बागेंत, वृक्षांच्या राईंतून व वेलींच्या गुंफांतून, पक्षी मनःपूत संचार करीत होते. त्यांचीं अस्फुट संभाषणें व प्रश्नोत्तरें परस्पर सुरू असून, प्रेमपाशांत सापडलेले त्यांतले कोणी भावगीतें, व एकाकी वृत्तीचे कोणी स्वातंत्र्य गीतें, गात असावे असें वाटे!

आठ सवाआठ वाजण्याची वेळ. नवलराय आपल्या खासगी दिवाणखान्यांत येरझारा घालीत होता. मधून मधून कांहीं सुचल्या आठवल्यासारखें करून तो इकडची वस्तु तिकडे, तिकडची इकडे करून ठेवी. दिवाणखान्यातल्या समग्र मांडणावळीकडे, एकदा दालनाच्या या टोंकाशीं उभा राहून तर एकदा त्या टोंकाशीं उभा राहून पाही. पण तो हें स्वतःच्या हौसेकरिता पाहत नसून, त्याच्या त्या कोणा पाहणाराच्या डोळ्याला देखावा कसा दिसेल याविषयी त्याचे विचार चालू असावे. तो वांकडी मान करून पाही, पण ती दुसऱ्या कोणाच्या चौकस दृष्टीनें. स्वतःच्या अभिरुचीनें मांडणावळ मांडणें सोपें. पण दुसऱ्याच्या अभिरुचीची कल्पना मनानें करून, तिला अनुसरून मांडणावळ झाली आहे की नाही याची कल्पना करावयाची हें काम जरा कठिणच नव्हे काय! असो; अखेर झाली ती मांडणावळ अशी होती.

दालनाच्या मध्यभागीं एक मोठें वाटोळें शिशवी टेबल. त्यावर बारीक कशिदा काढलेली तलम चादर. ती सरकूं नये म्हणून त्याच्या चारहि टोंकांना लटकावलेले जड शोभिवंत कांचेचे गोळे. टेबलाच्या एका अंगाला

रुप्याचें उंची कारागिरीचें पुडेदार कलमदान. जवळ सर्व प्रकारचें लिहि-ण्याचें सामान. सोनेरी चौकटींत घातलेलें सचित्र कॅलेंडर. टेबलाच्या मध्यभागीं सुगंधी ताज्या सोनचाफ्याच्या फुलांचा गुच्छ खोवलेलें जुनाट जड चिनी फ्लॉवरपॉट. टेबलासमोर एका अंगच्या भिंतीच्या मध्यभागीं टांगलेल्या 'आई' च्या तसबिरीवर देशी गुलाबाच्या फुलांचा पायघोळ हार. तसबिरीच्या पायाशीं चंदनी लाकडाच्या चौपाई-वर सोनेरी मुलाम्याच्या कमळाच्या छिद्रांतून शिलगावून ठेवलेल्या हातभर लांब लांबत्या बारीक सुगंधी उदबत्त्या. वाटोळ्या टेबलाभोंवती मांडलेल्या मखमली गादीच्या पांच खुर्च्या. दालनाच्या दोहों अंगच्या खिडक्या उघड्या असल्याने त्यांतून वाहणारा शीतळ वारा. आणि खिडक्यांशीं येऊन भिडल्याप्रमाणे आंतील मनुष्याला बसल्या ठिकाणीं दर्शन देणारें सुंदर सृष्टिसौंदर्य.

या पांच खुर्च्यांपैकीं, आतां एकीवर, मग दुसरीवर, याप्रमाणें आळीपाळीने पांचहि खुर्च्यांवर एकेकदा बसून नवलरायाने समोरचा देखावा कसा काय दिसतो तें नीट पाहिलें. कदाचित् या खुर्च्यांवर बसणारीं इतर माणसें आल्यावर कोणाला कोठें बसवावें याचा विचार तो मनाशीं करीत असावा. आधीं सामानावर धुरळा नव्हताच म्हणा. तरी गड्याला मुद्दाम हाक मारून त्याने त्याला सर्व सामान पुनः एकवार चटदिशीं पुसून घ्यावयाला सांगितलें. त्याला पोषाखाच्या छानछोकीचा किंवा आरशांत वरचेवर आपलें तोंड पाहून साफ करण्याचा नाद नव्हता. पण आज इकडे तिकडे न्याहाळून अंगांतील सदरा झटकून, डोक्यावरील टोपी नीट करून, त्याने एकवार ओझरतें आरशांत डोकावलेंहि!

आज नवलरायाच्या भेटीला कोण येणार होतें याची कल्पना वाचकांना आलेलीच आहे. पूर्वी एकदा विमल येऊन बाहेरच्या दालनांत त्याला भेटली होती. पण सनद मागण्याकरिता आलेली अर्जदारीण म्हणून ! मध्यं-तरीं किती तरी गोष्टी घडल्या, व आज फिरून ती जी भेटीला येणार तिचा दर्जा व मान कितीतरी वाढला होता ! अर्जदारीण कोणीकडे व प्रजा परिषदेच्या अध्यक्षीण बाई कोणीकडे ! महाराजांच्या बरोबरीचा तिचा

मान ! अनेक कामांत विमलचें बुद्धितेज प्रगट होऊन तिची छाप नवलरायाला गांगरून टाकण्याइतकी त्याच्यावर पडली होती.

स्वाभिमानाला योग्य इतका अहंकार त्याच्यामध्येहि होता; पण प्रेमाचें बीज मनांत रुजलें म्हणजे मग वाढत्या प्रेमवृक्षाचीं मुळें त्या अहंकाराचा सर्व ओलावा हळूहळू शोषून घेतात. त्याप्रमाणे विमलसंबंधाने तरी नवलरायाचा अहंकार, किंबहुना स्वाभिमानहि, नष्ट होऊन तो मनाने तिच्या आधीन झाला होता. अशी ती आपली प्रणयदेवता घरी भेटीला येणार यामुळे त्या भेटींत तिच्याशीं काय बोलावें, कसें बोलावें, या विचारानें तो सहजच गोंधळून गेला होता.

पण भेटींत बोलण्याचा मुख्य विषय ठरलेलाच होता, फक्त त्या विषयाला काय फाटे फोडतां येतील हें वेगळें. म्हणून पावणेनऊ वाजले असें पाहून नवलरायाने प्रजापरिषदेच्या हकीकतीचे कागद हातांत घेतले व ते चाळीत टेबलाजवळच्या एका खुर्चीवर तो बसला. पण त्याचें सर्व लक्ष कागदांतील शब्दांपेक्षां विमल ज्या आपल्या रथांत बसून येणार त्याच्या चाकांच्या शब्दाकडेच अधिक होतें. नवाच्या ठोक्याबरोबर सरकारी रथ आगाशींत येऊन थांबला. त्यांतून मनोहर विमल व प्रभाकर हीं उतरून जिना चढून वर आलीं. नवलराय उठून उभा राहून त्याने सर्वांचें स्वागत केलें. खुर्च्यांवर बसताना नवलरायासमोर विमल आणि मनोहरासमोर प्रभाकर बसावे अशी योजना मनोहराने, चपळतेनें पण कोणाच्या लक्षांत न येऊं देतां, केली.

आज नवलरायानेच आपण होऊन बोलण्याला सुरुवात केली. तो म्हणाला " विमलाबाई, प्रभाकरपंत, तुमच्याशीं मला पूर्वी जें मोकळ्या मनाने बोलतां येत नव्हतें तें आज बोलतां येणें शक्य झालें याबद्दल मला फार फार आनंद होतो. पूर्वी न्यायविषयक राजकर्तव्याने माझी दातखिळी बसली होती असें म्हटलें तरी चालेल! मीं आपल्या रीतीने गुप्त चौकशी केली तींत, प्रभाकरपंत, तुमच्यावरचे सर्व आरोप खोटे बनावट असल्याचें मला कळलेंच होतें. पण या प्रकरणाला जें तोंड पाडायला पाहिजे होतें तें तुम्ही धैर्याने नवलपुराला परत आल्यानेच पडलें. तुम्हाला तुरुंगांत ठेवण्याचा शिष्टाचार मला कायद्याच्या दृष्टीने अपरिहार्य होता. आणि फेरचौकशीचा

आग्रह तर नुसता न्यायाचाच होता असें नाही; तर दिवाणसाहेबांनी कोर्टांत फिर्यादी साक्षीदार म्हणून तोंड उघडतांच त्यांचे दांत त्यांच्या घशांत पडण्याचा त्यांत योग होता यामुळे, तुमचा तुरुंगवास चार दिवस लांबला तरी चालेल असें मीं मनानें ठरविलें. पण हें अग्निदिव्य करण्याला दिवाणसाहेब थांबले नाहीत, पळून गेले, मोगलाईत गेले, यामुळे न्यायाचा खरा प्रकार काय होता याविषयीं तुमच्या माझ्या शत्रूलाहि शंका घेण्याला जागा उरली नाही. आज स्वतंत्र नागरिक या नात्यानें मी तुमचें स्वागत तर करतोंच, पण माजी कारकीर्दीच्या बिकट प्रसंगीं तुम्हीं नागर स्त्रियांच्या अब्रूरक्षणाचें काम हातावर शीर घेऊन केलें याबद्दल मीं तुम्हाला धन्यवाद द्यावे तितके थोडेच होतील. ”

नंतर प्रथम प्रभाकराची हकीकत मूळपासून विचारून घेण्याला नवलरायानें सुरुवात केली. ती सांगतांना फटकळ तोंडाच्या व मनाच्या प्रभाकरानें जुन्या कारकीर्दीतील दुष्कृत्यांचें असें शब्दचित्र रंगविलें कीं, मधून मधून नवल-रायाला उद्वेगाने व विमलला स्त्रीलज्जेने खाली मान घालावी लागली पण फरारी झाल्यानंतर मोगलाईतले आपले अनुभव प्रभाकराने सांगितले तेव्हा अद्भुतरस चांगलाच रंगला. आणि नवलराय व मनोहर यांचेबरोबर विमलहि मोकळ्या मनानें मोठ्यानें हंसत होती.

प्रभाकराची हकीकत सांगून संपल्यावर मग महाराज जागचे उठून प्रभा-कराजवळ गेले, व त्याचे खांद्यावर हात ठेवून म्हणाले “ राजसत्तेला आधार-स्तंभ वाटेल तितके मिळतात. केवळ पैसाहि तें काम करतो. पण प्रजाजनांची अब्रू राजाविरुद्ध त्याला प्रतिकार करून संभाळण्याचें काम आत्मस्फूर्तीने व धडाडीनें अंगावर घेणारे तुमच्यासारखे लोक यांना जनतेने बक्षीस काय द्यावें ! ”

“ बक्षीस! ” प्रभाकर हसून म्हणाला “ हंः बक्षीस कोण लेक मागतो ! पण माझ्यासारखा एखादा परका मनुष्य केवळ या आपल्या नागरिक–भगिनी म्हणून त्यांची अब्रू संभाळण्याकरिता जितका स्वार्थ-त्याग करण्याला तयार होतो, तितका स्वतःच्या मुलीबाळींकरिता करण्याला प्रतिष्ठित म्हणविणारे नागरिक तयार होत नाहीत हें आश्चर्य नव्हे

काय ! माझ्यावर आरोप आणण्यांत आला तो अर्थातच खोटा होता. पण, महाराज, मी असा वाईट माणूस आहें कीं, जर का एखाद्या कुलस्त्रीची अब्रू घेतांना एखादा राजाधिकारी मला दिसला तर त्याचा खून माझ्या हातून होणार नाहीच असें मात्र मला सांगवत नाही."

शेवटीं प्रभाकराने तालमीची वेळ झाली म्हणून जाण्याविषयी परवानगी मागितली. पण महाराजांनी ती दिली नाही. महाराज म्हणाले "मग स्वराज्य घटनेच्या कामीं आम्हांला तुम्ही कांहीच मदत करणार नाही तर ! " प्रभाकर हसून म्हणाला—

" ती घटनाविटना कांही आपल्याला कळत नाही, तें सगळें इकडे विचारा !! " असें म्हणून त्याने आपल्या बहिणीकडे बोट केलें. आणि पुढे तो म्हणाला " इला पुरुष बनवून एखादें राज्य तिच्या हातीं देवाने दिलें असतें तर तिने स्वराज्यच्या स्वराज्य आणि सुराज्यच्या सुराज्य दोनहि खाशीं संभाळलीं असतीं."

मनोहर असली संधि दवडणार ! तो म्हणाला "राज्यकारभार हातीं यायला कोणाला पुरुषाचा जन्मच कशाला हवा ! आजपर्यंत स्त्रियांनीहि राज्यें चालवून कीर्ति मिळविलेली आहे. आता त्यांत आपळपोटेपणा आहे असें वाटलेंच, तर त्यांनी त्या कीर्तीचा लाभ देऊन कोणा भाग्यवान पुरुषांना सहकारी अंशभागी करावें म्हणजे झालें." नाजुकपणाकडे झुकणाऱ्या या संभाषणाचें मर्म लक्षांत येण्याइतका आपला भाऊ मार्मिक नाही हें ध्यानांत आणून विमल किंचित् विरमली !

महाराज पुढे कांही तरी बोलावें म्हणून म्हणाले, "विमलाबाई, प्रभाकरपंतासारखा भाऊ तुम्हांला लाभला या तुमच्या सद्भाग्याची वाखाणणी कोण किती करील ! अशा रीतीने सुशिक्षण, चारित्र्य, मातृपितृप्रेम, बंधुप्रेम या सर्व गुणांनी आमच्यापेक्षा वरिष्ठ अशा तुम्हाशीं यापूर्वी अधिक मोकळेपणाने मला बोलतां न येण्याला, हें न्यायदानाचें प्रकरण कारण झालें त्याबद्दल मला क्षमा कराल ना !"

या विनयाने विमल भारून जाऊन तिला काय उत्तर द्यावें हें सुचेना. ती इतकेंच म्हणाली कीं, "त्यांत क्षमा कशाबद्दल ! मोठेपणाच्या अडचणी

गैरसोयी कोणाला कधीं चुकल्या आहेत? "जया अंगीं मोठेपण तया यातना कठिण" असें तुकारामाने म्हटलेंच आहे." तेव्हा मनोहर म्हणाला, आणि शेक्सपीअरहि तेंच म्हणतो 'Uneasy lies the head that wears a crown.' तरी, आमच्या महाराजांनी संस्थानच्या तिजोरींतला राजमुकुट डोक्यावर कधी घातला नाही! इतकेंच काय पण तो बाहेरहि कधी दृष्टीसमोर काढूं दिला नाही."

**नवल.**—"आणि आज तुम्हा दोघांनी माझी स्वराज्यदानाची योजना मंजूर केली म्हणजे तो मुकुट कायमचा बाहेर काढून जवाहिऱ्यांकडे मोडीलाच घालणार आहें मी! तो नुसत्या आपल्या वजनानेहि डोकें दुखायला लावण्याइतका जड आहे. मग आपल्या राजकीय पापाच्या व्याधीने तो शहाण्या राजाला वेडहि लावायचा!"

**मनो.**—"पण, महाराज, बर्कची कोटी आठवते आपणाला?"

**नवल.**—"ती कोणती?"

**मनो.**—"What is majesty but a jest when deprived of its externals" Majesty या शब्दातली M and Y हीं आद्यंत अक्षरें काढून घेतलीं म्हणजे राजपद ही निवळ थट्टा उरते!

**नवल.**—बर्कचें म्हणणें बरोबर आहे. पण जे राजे तसे असतील त्यांच्या पुरतें. मी नांवाने राजा असलों तरी केवळ त्या पदाच्या जोरावर विभूतिमत्वाचा हक्क सांगणारा नाही. उलट माझ्या अंगीं जर कांही खरेंच मोठेपण असेल तर तें राजमुकुट फेकून देऊनहि दिसून येईल!

**विमल**—महाराजांनी राजमुकुट जवाहिऱ्याकडे मोडीला घालण्याचा हेतु दरबारांत जाहीर करविला तेव्हाच तें दिसून आलें आहेच कीं! बर्कचें सुभाषित महाराजांनी आधींच खोटें पाडलें आहे! राजाच्या मुकुटापेक्षा त्याच्या मेंदूचेंच मूल्य अधिक असावें. नेपोलिअन बोनापार्टचा राजमुकुट लाथाडणाऱ्या त्याच्या शत्रूंनी, त्याचा मेंदु काढून घेऊन ती एक अद्भुत वस्तु म्हणून अजबखान्यांत ठेवलीं असें मीं नुकतेंच कोठें वाचलें आहे!"

**मनो.**—"पण राजमुकुट हें राजचिन्ह आहे. तें मोडीला घालणें म्हणजे राजपदाचा उघड नाश करणें नव्हे काय?"

नवल—" पण तितकी मोठी मनाची तयारी झाल्याशिवाय, प्रजा मागेल तें देण्याची माझी जाहीरनाम्यांतली प्रतिज्ञा कशी सफळ होणार? "

विमल—" महाराज म्हणतात तेंच बरोबर आहे. आमच्या स्वयंपाक घरांतला बायकी न्यायहि असाच आहे."

मनो—" तो कसा ? "

विमल—" पाहुणा जेवायला बोलावला तर तो पुरे म्हणेपर्यंत वाढण्याची सुगृहीणींची तयारी हवी. तो बहुधा चार घांसाइतकें पानांत पडतांच पुरेपुरे म्हणतो हें निराळें; पण वाढणारणीचें ताट पूर्ण भरलेलें असेंच स्वयंपाकघरांतून बाहेर यायला पाहिजे. " आणखी थोडें वाढा " हे शब्द पाहुण्याला उच्चारायला लावणारी ती गृहिणी कसली ! ती खाणावळीणच म्हणावी " !

मनो—"पण राजपदाचा नाश करण्याचा राजालाहि अधिकार नाही, त्याचें काय ?"

नवल—"तें काय म्हणून ? मिळकतीचा नाश करण्याच्या हक्काशिवाय तिच्यावरील स्वामित्वाच्या हक्काची पूर्णताच होत नाही."

मनो—"पण राजपद हें दुलग आहे. प्रजेला तें राखायचें असेल तर, तें बुडविण्याचा राजालाहि अधिकार नाही !"

नवल—" तें पद प्रजेने वाटेल तर खुशाल राखावें. पण मग मला राजा निवडण्याचा हक्क आपणाकडे घ्यावा ! "

मनो—" असो काय चाखावें अन् काय राखावें याचें शहाणपण स्त्रियांइतकें पुरुषांना असत नाही हें मला मान्य आहे. जेवणाराची तृप्ति करून शिवाय भरलेलें ताट परत स्वयंपाकघरांत नेणाऱ्या गृहीणीप्रमाणे, प्रजेला काय द्यावें व राजाकडे काय ठेवावें याचा निर्णय आतां विमला-बाईनीच करावा ! सभेच्या अध्यक्षीणबाई या नात्याने प्रजेचें मुख होण्याचा मान त्यांना लाभलाच आहे. आणि महाराजांनीहि आपलें मुख त्यांना अर्पण केलें–अर्थात् आपल्यातर्फे बोलण्याचा अधिकार त्याना दिला–म्हणजे दोन पक्षांची तोंडमिळवणी कशी करावी हें त्याच उत्तम रीतीने ठरवितील."

नवल.—" पसंत आहे कल्पना मला. या प्रजाजनांच्या मुखाप्रमाणे

माझेंहि मुख, म्हणजे प्रतिनिधी, विमलाबाई होतील तर तो अधिकार मी त्यांना आनंदाने देईन. शिवाय आणखीहि एक औचित्य आहे त्यांत."

मनो.—"तें काय बुवा ? आज आपणाला बऱ्याच गोष्टी आठवूं लागल्या तर !"

नवल.—"स्वराज्यप्राप्तीच्या दृष्टीने माझ्या राज्यांतल्या प्रजेला आज हा वसंतागमच होय. आणि वसंत प्राप्त झाला म्हणजे अरुणोदय जाहीर करण्याची कामगिरी कोंबड्याकडून जाऊन ती कोकिळांकडे येते हें प्रसिद्धच आहे नव्हे का !"

मनो.—"भले ! जाहीरनाम्याप्रमाणें सर्वस्व देण्याचा उदारपणा सर्व तुमचा; आणि उद्या योजनेंत दिसून येणारा राखून ठेवण्याचा कृपणपणा सर्व विमलाबाईंचा, असा स्वार्थी धूर्त डाव दिसतो महाराज आपला !"

नवल—"मनोहर, मला कोणीं उदार न म्हटलें तरी चालेल, पण उदारपणाचा आव आणणारा कृपण म्हणजे ढोंगी अप्रामाणिक असें मला कोणी म्हणूं नये, इतकीच माझी आकांक्षा आहे. माझ्या त्यागाची परीक्षा घेण्याला कोणी सिद्ध होईल तर मी ती देऊं शकेन. राजमुगुट मोडीला घालायला तयार असल्याचें आतांच मी बोललों.या बसल्या बैठकीला, मनोहर तूं किंवा विमलाबाई, स्वराज्यदानाची जी कोणती योजना प्रजेच्या इच्छेनुरूप कागदावर लिहितील तिजवर मी सही करीन.पैकीं तूं मनोहर कृपणांतला कृपण ! तेव्हा तूं कांहीं न देतां सगळेंच राखून ठेवशील हं दिसतच आहे. विमलाबाई तुझ्यापेक्षा पुष्कळच अधिक उदार आहेत. त्या प्रजेला कांही तरी हक्क खास देतील. तुमची भीति मला वाटते, म्हणूनच ! एरवीं स्वराज्याची योजना कागदावर मांडायला तुम्ही दोघे मोकळ्या मनाने संमति द्याल तर, माझ्या मनांत प्रजेला किती काय द्यावयाचें आहे हें तुम्हाला बसल्या बैठकीला कळेल. आणि त्याची थोडीशी लाक्षणिक पण दृश्य कल्पना तुम्हाला यावी म्हणून—"

इतकें म्हणून महाराज खुर्चीवरून उठले, खिडकीशीं टांगलेल्या पितळी पिंजऱ्याचें दार त्यांनी उघडून वर उचललें, त्यांतील पंचरंगी पोपट काढून हातावर घेतला, हार घातलेल्या 'आई'च्या तसबिरीकडे एकवार पाहिलें, आणि

पोपटाला मुठींत धरून त्यांनी खिडकींतून बाहेर उडून जाण्याकरितां फेकून दिलें.

सर्व गोष्टी अभावितपणें एका क्षणांत घडल्यामुळे, इतर मंडळींना कौतुकास्पद नजरेने नवलरायाकडे पहाण्याशिवाय दुसरें काय करतां येणार होतें?

पण प्रभाकराला इतक्या वेळांत या क्षणीं मात्र वाचा फुटली. तो आपल्या उजव्या हाताने डाव्या हातावर मोठ्याने टाळी वाजवून आनंदाची गर्जना करून म्हणाला, " वाहवा, बहाद्दर, महाराज, आपलें अंतःकरण खऱ्या राजाला शोभेल असें आहे.स्वराज्यदानाच्या वल्गना करतांना शेजारीं पिंजऱ्यांत आवडता म्हणून पोपट कोंडून ठेवणें हा ढोंगीपणाचा पुरावाच ठरला असता. जो यःकश्चित पोपटाला स्वातंत्र्य देत नाही तो प्रजेला काय देणार हें दिसतेंच आहे, असे मी तरी मनांत म्हटलें असतें."

मनोहर म्हणाला " विमलाबाई, आमच्या महाराजांना त्यांच्या स्वातंत्र्यप्रियतेंत तुमचा भाऊ हा चांगलाच जोडीदार शोभतो खरा!" महाराज म्हणाले–' विक्षिप्तपणांत ' असें तुला मनांतून म्हणायचें असेल. पण बोलण्याला थोडी मुरड घातलीस इतकीच कृपा आम्हा दोघांवर ! "

पण दोघांहि मित्रांना सावरून घ्यावें म्हणून विमल म्हणाली " असा स्वभावभेद मित्रामित्रांमध्ये चांगला शोभतो. माझ्या दादाला कोणी विक्षिप्त म्हटलें म्हणजे मी त्याचा अर्थ लोकोत्तर असाच करतें. लोकोत्तर अशीं मोठीं कार्यें हातून व्हावयाचीं तर स्वभावांत असा थोडासा विक्षिप्तपणा असल्याशिवाय चालत नाही. अगदी सरळ रेघेपेक्षां किंचित् वक्ररेषा ( कर्व्ह ) हीच सौंदर्य प्रगट करावयाला अधिक उपयोगी पडते म्हणतात !',

मनोहर किंचित् खेददर्शक स्वराने म्हणाला "आपल्या आईने फार दिवस संभाळून तुमच्या स्वाधीन केलेला पोपट, महाराज, तुम्ही असा सोडून द्याल असें मला वाटलें नव्हतें."

नवल—" अरे, मनोहर, प्रेमाचा मोह म्हणतात तो हाच. आजपर्यंत त्या पोपटाकडे पाहून मला आपल्या आईचें स्मरण होई म्हणून तो मी ठेवला होता हें खरें. पण आजच सकाळीं मनांत असें आलें कीं, बंद केलेल्या पिंजऱ्यांतील पोपटाकडे पाहून मला जशी आईची आठवण होऊं

शकेल, तशीच पिंजरा रिकामा पाहूनहि कां न व्हावी? भोगाप्रमाणे त्यागहि जर सत्स्फूर्तीच्या कामीं उपयोगी पडण्यासारखा असला, तर त्यांतल्या त्यांत त्यागाचा अवलंब करणेंच अधिक श्रेयस्कर नाही काय? आमच्या आईचें पोपटावर प्रेम नव्हतें असें मीं कसें म्हणूं? त्याला दाणापाणी घातल्याशिवाय तिने स्वतः अन्नग्रहण कधींहि केलें नाही हें मला माहीत आहे. पण तिनें त्याजवरील आपल्या प्रेमाचा मोबदला त्याच्या बंदिवासाने घेतलाच कीं नाही? पाळीव प्राण्यावर प्रेम करावें व आपण तें करतोंहि. पण त्या प्राण्याप्राण्यांत फरक असतो कीं नाही? पायाने लाथाडलें तरी मांजर दूर होत नाही. अशा कोडग्याला पिंजरा कोण करील? तो प्रेमाचा विषय पळून जाण्याची भीति नाही; पण पोपट हाहि प्रेमाचा-विषय असला तरी तो पळून जातो. आपल्या प्रेमापेक्षा त्याला त्याचें स्वातंत्र्य अधिक प्रिय असतें म्हणून आपण त्याला बंदिवान करून ठेवतों ना? पण हा काय न्याय झाला?"

इतक्यांत अशी मौज झाली कीं, नवलरायाने बाहेर सोडून दिलेला पोपट खिडकींतून परत आंत आला; मात्र तो पुन्हा पिंजऱ्यांत न शिरता फुलांचा हार घातलेल्या तसबिरीच्या चौकटीवर येऊन बसला. आणि 'नवल नवल' असा शब्द करूं लागला. सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. पोपट उडून प्रथम दूरच्या झाडावर जाऊन पुढे आणखी कोठे तरी निघून जाईल, पण फिरून परत येणार नाही, अशी त्यांची खात्री मनांतून होती. म्हणून झाला प्रकार पाहतां त्याचा अर्थ काय करावा हें त्यांना समजेना. तेव्हा प्रचीतीच पाहावी म्हणून, नवलरायाने तसबिरीशीं जाऊन पोपटाला हातावर ठेवलें, व त्याला कुरवाळून त्याचें चुंबन घेतलें. मग उघड्या दारांतून त्याला पिंजऱ्यांत कोंडला तर तो जातो कीं काय हें पाहावें म्हणून नवलराय पिंजऱ्याशीं गेला. पण पोपटाने सर्कशींतील श्वापदाप्रमाणें आंत प्रवेश तर केला नाहीच, पण आपले पंख जोराने फडफडावीत चोचीने नवलरायाचे हाताला घट्ट धरलें, मात्र कडकडून चावा घेतला नाही. हें पाहून सर्व जण कौतुकाने हसूं लागले. प्रभाकर उसळून टाळी वाजवून म्हणाला, "जीते रहो पठ्ठे, स्वातंत्र्यप्रेम, ऋणानुबंध आणि कृतज्ञता यांचा तूं चांगलाच मेळ घात-

लास," मनोहर हसून म्हणाला. "पण त्याला मनुष्याचा सहवास प्रिय असेल तर त्याने पिंजऱ्यांतच राहणें इष्ट रे बाबा ! नाही तर मांजर मटकावील त्याची वाट काय ? पिंजऱ्यांत पोपटाला ठेवणें ही कैदशी दिसतें, पण खरोखर तें त्याचें प्रेमपूर्वक संरक्षणच होय."

इतक्यांत खरोखरच अशी मौज झाली कीं, नवलरायाच्या सवईचें पाळीव मांजर दिवाणखान्यांत आलें. त्याबरोबर पोपटाला पाहून मांजर व मांजराला पाहून पोपट दोघेंहि कावरींबावरीं झालीं ! आता पुढे काय प्रकार होतो हें पाहण्याला सर्वजण उत्सुक होऊन तटस्थ बसले. कधी हातीं न लागणारा मासाचा गोळा पाहून मांजराने नवलरायाच्या हाताकडे उडी घेण्याची तयारी केली; पण तें पाहून पोपटहि हातावरून उडून दिवाणखान्यांतल्या उंच आढ्यावर जाऊन बसला व 'नवल नवल' असा शब्द करू लागला. कोणाला वाटेल आपण कशी मांजराची फजिती केली या जाणीवेने तो आनंदला असावा ! मांजर फजीत व हताश होऊन नवलरायाच्या तोंडाकडे पाहूं लागलें. त्याबरोबर नवलरायाने उठून तो पितळी पिंजराच कडीतून काढून, खिडकीशीं जाऊन, बाहेर फेकून दिला. आणि तो म्हणाला "मनोहर, पूर्वी मीं पोपटाला बाहेर सोडून दिलें असतां फिरून तो आंत आला असें पाहून, त्याला स्वातंत्र्य आवडतच नाही अशी खोटी कल्पना मीं केली. आणि फिरून कोंडण्याकरिता त्याला पिंजऱ्याच्या दाराशीं नेण्याचा मोह मला झाला. आता पिंजराच हा असा फेकून दिल्याने त्याच्या व माझ्या मोहाला जागाच उरली नाही ना ! बोल, आता संस्थानी प्रजेला स्वातंत्र्य देण्याची माझी भाषा ही खरी मनापासून आहे कीं वरपांगीं ढोंगीपणाची आहे ?" मनोहर निरुत्तरच झाला.

## प्रकरण सत्तिसावें

# ‘ सत्य संकल्पाचा दाता भगवान ! ’

महाराज विमलला उद्देशून म्हणाले, “ विमलाबाई, आमच्या मनोहराला असें वाटतें कीं, स्वराज्यदानाचा जाहिरनामा मीं काढला, स्वराज्यनिर्णयाकरिता दरबार भरविला, आणि सभेच्या रीतीने राजकीय सुधारणांची चर्चा करविली, हा सगळा शुद्ध लहरीपणाचा खेळ मीं केला ! कपट किंवा ढोंग इतकें कठोर नांव त्याला तो देत नाही हा त्याचा माझ्यावर फक्त मित्रप्रेमामुळे उपकार आहे इतकेंच. पण तुम्हाला तरी तसें वाटत नाही ना ? या कामीं मीं तुमच्या प्रेमळ—नव्हे चुकलों—प्रांजळ उद्गाराचा भुकेला आहे.” मनोहर म्हणाला—“कां बरें मीं तसें म्हणू नये ? या बसल्या बैठकीलाच पहाना, प्रांजळ अन् प्रेमळ या शब्दांची अदलाबदल, महाराज, तुम्ही कशी शिताफीने केली ती ! तुम्हा राजे लोकांच्या भाषेवर कोणी विश्वास ठेवावा!” विमल प्रौढपणाने हंसून म्हणाली–“मनोहर पंताच्याहि प्रेमळपणामुळेच त्यांच्या शब्दांत प्रांजळपणा नसतो.”

इतक्यांत प्रभाकराला जांभई आली. ती आपणाला समजली असें भासविण्याकरिता मनोहराने हाताने चिटकी वाजवून तोंडाने मोठ्याने कृष्ण कृष्ण असेंहि म्हटलें ! आणि प्रभाकराला उद्देशून तो म्हणाला, “ प्रभाकरपंत, तुम्ही तालमीकडे जाण्याची परवानगी मघाशींच मागितली होती. चला, मीच तुम्हाला पोचवून येतों.महाराज राज्याचे धनी; ते प्रजेला राज्य वाटून देणार, आणि विमलताई प्रजाप्रतिनिधि म्हणून त्या तें वांटून घेणार! यांत तुमचा आमचा काय संबंध ? प्रजेची कोतवाली प्रेमाखातर करणारे तुम्ही ‘ फुकट फौजदार, ’ आणि राजमित्राची खासगी चिटणिशी प्रेमाखातर करणारा मी ‘ फुकट प्रायव्हेट सेक्रेटरी ’! आपल्याला प्रेमाच्या आनंदाखेरीज या राज्याच्या वांटणींत दुसरा कांही स्वार्थ नाही

म्हणून लाभहि नाहीं. चला तर आपण आपला वेळ या रुक्ष कारभारांत फुकट कां दवडा ! तुम्हाला तालमीकडे पोंचवीन, आणि परत येतांना तसाच तार ऑफिसांत जाऊन एक जरूरीची तार करावयाची आहे पो. एजंटसाहेबांना, तीहि करून येईन म्हणतों. ”

असें म्हणून स्वतः मनोहर व त्याच्या सूचनेवरून प्रभाकर दोघेहि उठले, व जिन्याकडे जाऊं लागले. महाराज हंसून म्हणाले—“ आयत्या वेळीं दगा देणें हेंच प्रायव्हेट सेक्रेटरींचें ब्रीद. तें तूं न पाळशील तर प्रा. सेक्रेटरी कसला ! येथे बसून आम्हाला चर्चेंत मदत करावयाचें सोडून चाललास कोठे ?” मनोहर तोंड मागें फिरवून हंसून म्हणाला “ज्याचें काम त्यालाच कळतें. माझें काम मी करतों. आपलें आपण करा. मी योग्य वेळेवर पुन्हां हजर होईनच. ”

कोण द्वाड खट्याळ माणूस तरी, हा मनोहर ! नवलराय व विमल या दोघांनाच एकत्र बसलेलीं सोडून, प्रभाकरालाहि बरोबर घेऊन, निघून गेला. आणि निदान पाऊण तास तरी तो परत येण्याचा संभव नाहीं. कारण तार ऑफिस साडेदहा वाजल्याशिवाय उघडत नसतें म्हणे.! बरें तर बरें, उरल्या दोघांना भरपूर बोलावयाला संस्थानी प्रजेला स्वराज्यदान हा व्यापक विषय होता.नाहीं तर त्या बिचाऱ्यांनी काय करावें ? एकमेकांविषयीं आदरबुद्धीने मनें इतकीं काठोकाठ भरून गेलेलीं कीं, किंचित बेसावधपणा झाला तर प्रणय-भावनेने आर्द्र झालेला एखादा उद्गार किंवा शब्द तोंडांतून निघून जावयाचा. आणि या सावधपणाने खरोखरच त्या दोघांमध्ये प्रथम कांहीं वेळ अबोले-पणाचें स्वरूप आलें होतें. बरें, न बोलतां त्या दोघांनी एकमेकांकडे पाहावें तरी पंचाईत, न पाहावें तरी पंचाईतच. पाहावें तर डोळे जिभेपेक्षां अधिक बोलतात. न पाहावें तर मुद्दाम नजर चुकविल्यासारखें होतें. वर पाहावें तर अंतःकरण उघडें पडतें. खाली मान घालावी तर भित्रेपणा प्रकट होतो. टेबलावरच्या पदार्थांतहि असें कांहीं नव्हतें कीं, त्यांचा चाळा हाताने करून तो पाहण्याच्या निमित्ताने डोळे खाली करतां येतील व लक्ष दुसरीकडे गुंतलें आहे असें भासवितां येईल. प्रत्येकाची इच्छा हीच कीं दुसरा आधी कांहीं बोलेल, मग आपण बोलावें. पण दोनच माणसें हजर असतां दोघांनीहि

ह्याच एक विचार केला तर संभाषण सुरू कसें होणार! शेवटीं विमलला बोलावणें पाठवून आपण आणविलें, तेव्हा अडचणी सोसून सर्व चुका पदरांत घेऊनहि, संभाषणाला प्रारंभ आपणच केला पाहिजे असें ध्यानांत येऊन नवलराय म्हणाला—"विमलाबाई, मग तुम्ही आता आपला सल्ला देणार ना?"

विमल—"मला सुचेल तें मी सांगतें. पण राजकारणाचा अनुभव मला नाही. यामुळे मी सुचवीन तें बरोबर असेल कीं नाही याविषयींचा आत्मविश्वास वाटत नाही.आपली गोष्ट किती झाली तरी वेगळी आहे."

नवल.—"ती वेगळी कशी?"

विमल—"कांही नाही तरी माझ्यापेक्षा चारदोन पावसाळे आपण जास्त पाहिले आहेत."

नवल.—"शहाणपण वयावर अवलंबून असतें तर, वयाचीं वर्षें व शहाणपण यांचें कोष्टकच मुलांच्या उजळणींत घालण्यांत आलें असतें."

विमल—"पण वय सोडून दिलें तरी राजपदाच अधिकारी यों नात्याने माझ्यापेक्षा आपला अनुभव अधिक आहे कीं नाही?"

नवल.—"तेंहि मला मान्य नाही. कारण राजपदावरील जीवन हें चौकटींत बसविलेल्या चित्राप्रमाणे आहे. त्याला चौफेर इतके तणावे असतात कीं त्याची चलनवलनाची सर्व शक्ति नष्ट होते. उलट, विमलाबाई, तुमच्यासारख्या स्त्रींचें जीवन सुपीक जमिनींत स्वतंत्रपणें वाढणाऱ्या लतावृक्षांसारखे आहे. आंत जिकडे बुद्धीला व भावनेला जीवनाचा ओलावा मिळेल तिकडे तुमच्या अंतःकरणाच्या मुळ्या वाट काढतील; आणि बाहेर जिकडे निरोगी उन्हाची ऊब मिळेल तिकडे तुमच्या सत्प्रवृत्तीचे अंकुर धाव घेऊ शकतील. मी तुमच्या घरगुती गोष्टींचा उल्लेख करू नये, पण तुमचे आईबाप व भाऊ या तीन स्वभावाच्या तीन माणसांच्या कुटुंबांत तुम्ही जो सुंदर मेळ यशस्वी रीतीने घातला त्यावरून एखादें राज्य चालवून त्यांतील अनेक विरोधी वर्गांच्या हितांची तोंडमिळवणी करण्याची मुत्सद्देगिरी तुमच्या अंगीं आहे असें कोणीहि म्हणेल."

विमल—"इतर कोणी तसे म्हणो बिचारे; पण श्रेयाचा तेवढा मोठा वांटा आपणाकडे घेण्याला मीं तयार झालें पाहिजेना! कारण माझ्यां

कुटुंबांतील तीन माणसांचे स्वभाव तीन प्रकारचे असले तरी, तीं माझ्या-वर आपापल्या परीने किती प्रेम करतात याची पूर्ण कल्पना आपणाला कदाचित् नसेल. या प्रेमामुळेच त्यांचें मधुर मीलन मला करतां येतें. आणि आपणापुढे असलेल्या राजकारणी विषयांत झालें तरी तेंच एक मर्म आहे. आपल्या प्रजेंतील सर्व वर्गांचें प्रेम आपणावर आज पूर्ण आहे. उलट त्यांच्याकरिता सर्व त्यागाकरिता आपणहि तयार आहां. अशी तयारी दोहो अंगें आहे ती टिकली तर, आपल्या नवळ-पूर संस्थानांत स्वराज्य व सुराज्य यांचा सुंदर मेळ पडेल. राज्यघटनेंत काय आहे ! स्निग्ध सुगंधी मेणाचा गोळा हातांशीं तयार असल्यावर निर-निराळ्या छापांतून निरनिराळीं चित्रें बनविणें हें सोपें काम आहे. रुचि-वैचित्र्याच्या समाधानाकरिताच निरनिराळे छाप करावयाचे म्हणून ते वरचे वर बदलूंहि शकतात ! "

नवल.—" मग आजच्या ताज्या व्यवहाराकरिता आपण स्वराज्य-दानाच्या कोणत्या नमुन्याची शिफारस मला लिहून देतां !"

विमल—या नमुन्याची दहापांचच अंगें आहेत, व तीं मी डोळे मिटून तोंडानेहि आपणाला सांगूं शकेन."

" मग सांगा, तर पाहूं" असें नवलरायाने म्हटल्यामुळे, विमल डोळ्यांवर हात ठेवून तोंडाने बोलूं लागली. तें नवलराय एका कागदावर टिपूनच घेऊं लागला. पूर्वी प्रज्ञा--प्रतिभामंडित व्यासापुढे गणपति हा लघुलेखकाचें काम करण्याला बसल्याचें आपण पुराणांत वाचतों. पण आज सरस्वतीच्या मुखकमलांतून बाहेर पडणारे उद्गार गण-पति ( राजा ) लघुलेखक म्हणून टिपून घेत होता असें म्हणावेसें वाटणार नाही काय ! आणि खरोखरच महत्त्वाचा मजकूर आठवून जुळवून सांगावयाचा असतो तेव्हा सांगणारापेक्षा लिहिणाराचें काम अधिक लवकर उरकतें. अर्थात् हा जो वेळ मधून मधून मिळे त्यांत विमलच्या मिटलेल्या डोळ्यांचा फायदा घेऊन, नवलरायाला तिच्या चेहऱ्याकडे स्वस्थपणें पाहतां येई. आणि हें करीत असतां तिच्या बुद्धिमत्तेचें कौतुक अधिक करावें कीं, तिच्या चित्ताकर्षक रूपाचें कौतुक अधिक करावें, असा विचार त्याच्या मनांत प्रतिक्षणीं

येत होता. असो. सर्व मुद्दे टिपून झाल्यावर नवलरायाने तो कागद तिला वाचून दाखविला. ती सुमारें वीस कलमांची यादी होती. हीं कलमें सांगून झाल्यावर विमलने डोळ्यांवरचा हात काढला. पण आता नवलरायाने मात्र तिच्या तोंडाकडे लावलेली दृष्टि खाली केली नाही. त्याच्या तोंडावरील आश्चर्याचे स्मित प्रांजलपणाने प्रकट करण्याला तो किंचित् लडिवाळपणाने म्हणाला, "देवाला माहीत तुम्हाला हें सारें कसे सुचलें व एकामागून जुळून सांगायलाहि सुचलें तें." पण सकारणता हें आश्चर्यावर, अद्भुततेच्या बुद्धीवर, रामबाण औषध ठरतें हें माहीत असल्याने विमलहि किंचित् लडिवाळपणाने म्हणाली. "इश्श, यांत देव तो कशाला यावयाला पाहिजे ! त्याचा कांही यांत मला आयत्या वेळीं संदेश आला नाही. किंवा दिव्य प्रेरणा झाली नाही. वाचून थोडेंबहुत लक्षांत होतें तेंच इकडून तिकडून जरा जुळवून सांगितलें झालें. पण म्हणते, आपल्या राजकुमार कॉलेजाच्या अभ्यासक्रमांतहि असला विषय असेलच ठेवलेला."

"विमलाबाई," नवलराय खेददर्शक स्वराने म्हणाला. "काय सांगूं तुम्हाला ! राजकुमार कॉलेजांत राजकारण शिकवितात. पण त्याच्या अभ्यासाचा मूर्धाभिषिक्त ग्रंथ मॅकिव्हेलीचा 'प्रिन्स'! साम्राज्यशाहीच्या शाळेंत पढविलेली आम्ही मुले म्हणजे राजकुमार ! आम्हाला खरा राजधर्म, खरें प्रजावात्सल्य कोण व कां शिकविणार ! तुमची गोष्ट वेगळी. तुम्ही राजकारण वाचलें तें स्वतःच्या आवडीने, स्वतंत्र बुद्धीने. लोकांविषयी तुमच्या मनांत उपजत औदार्य ! 'प्रजे'विषयी स्त्रियांच्या हृदयांत नैसर्गिकच वात्सल्य असतें. म्हणून तुम्ही प्रजेच्या कल्याणाच्या दृष्टीने विचार केला, आणि वाचलें त्यांतून प्रजाहितपर अशाच योग्य राजधर्माची कल्पना मनाशी बांधली. मात्र तुम्ही राज्यघटनेचीं जीं कलमें सांगितली तो "लोकशाहीचा विजय" असा शेरा त्यावर कोणी आधुनिक नवजवान मारणार नाही हें मात्र ध्यानांत ठेवा."

विमल म्हणाली—"आहे माहीत मला नवजवानांची विचारसरणी. त्यांचे एक प्रतिनिधी डॉ. डंखी हे होतेना दरबारच्याच सभेंत ! आणि तेथे

ते काय तारे तोंडीत होते हें आलें असेलच आपल्या कानावर. अविचाराने वाटेल तें भलतें बोलण्याची संवयच पडली आहे या नवजवानांना ! त्यांच्या मानसिक औदार्याची झडप, त्यांचा धीटपणा, यांचे मीं कौतुकच करितें. पण ते जरा सबुरीनें घेतील तर लोकांवर उपकार करतील. सद् भावनेच्या दारूचा स्फोट मनांत झाल्यासारखें ते बोलतात हें खरें, पण दारूच्या गुत्त्यांतून बाहेर पडून बोलावें असेच शब्द त्यांच्या तोंडून निघतात हेंहि खरें. प्रतिभेचें रत्न झालें तरी तें प्रज्ञेच्या सहाणेवर घासून काढावें तेव्हांच त्यांत रम्य तेज भरतें हें नव जवानांच्या लक्षांत येईल तर बरें होईल. राजांचा नादानपणा त्यांना दिसतो आणि तो खराहि आहे. पण लोकशाहीनेहि : आपला नादानपणा युरोप–अमेरिकेंत इतका जगजाहीर केला आहे कीं, हा घातक खेळ आतां पुरे करावा, निदान त्याला आळा घालावा असें तिकडच्या शहाण्या लोकांना वाटूं लागलें आहे. मीं सांगून आपण उतरून घेतलेल्या कलमांत लोकशाहीचें उत्तान व आजकालचें 'पेटंट' ठराविक स्वरूप नसेल. पण राजधर्माचा व प्रजाहिताचा त्यांत उत्तम मेळ आहे असें माझ्या तरी अल्पबुद्धीला वाटतें."

नवलराय म्हणाला,–"मग मला तरी आणखी अधिक काय हवें आहे ! असो, तर आता माझ्या संस्थानच्या प्रजेच्या अधिकृत प्रतिनिधी म्हणून या मसुद्यावर सहीदाखल आपण आपलें नांव लिहा ना !"

"हो, त्याला काय हरकत ?" असें म्हणून विमलने तो कागद नवलरायाचे हातून घेऊन त्यावर सही केली. लगेच नवलरायानेंहि तो परत घेऊन त्या सहीशेजारीं आपली सही घातली ! आता नवलरायाचा हर्ष तोंडावर दिसू लागला. त्याच भरांत तो म्हणाला " पण हीं तहाचीं कलमें अमलांत येण्याला आता तुम्ही आम्ही मिळूनच व्यक्तिशः परस्पर जामीन ठरतों ! तेव्हा या कागदावरील सह्यांप्रमाणे तुमचें आमचें साहचर्यहि अखंड राहिलें पाहिजे नव्हे का ? मीं संस्थानिकच, प्रजेचा कारभारी, म्हणून नवलपूर सोडून जाऊंच शकत नाही. पण यापुढे तुम्हालाहि तेंच बंधन पाळलें पाहिजे बरें, ध्यानांत ठेवा. जामीन लायक पण हजर नसेल तर जामीनकी कशी उगवावयाची ! मी यापुढें

राजवाडा सोडून नदीकांठच्या आमराईत बांधलेल्या झोपडींत जाऊन राहणार आहें. त्या शेजारीं तुम्हालाहि वाटेल तर तशीच एक झोपडी बांधून देतां येईल."

आतां मात्र विमलला नवलरायाच्या अंतस्थ गूढ भावनेचें प्रथमच ओझरतें दर्शन झालें. पण खरेंच बोलावयाचें तर, राजपदस्थ, सुंदर, उदार, सुविचारी, सुशिक्षित, असा हा तरुण पुरुष पाहून विमलच्याहि मनांत तशाच प्रकारची भावना जन्मली नसेल असें तरी कोणी कां समजावें ?

श्रीमंती किंवा राजपद यांनी मोहून लोभावून जाणारी ती प्राकृत स्त्री नव्हती. पण अलीकडील प्रभाकर प्रकरण सुरू झाल्यापासून नवलरायाचें जें उमदें चारित्र्य, विशेषतः राजपद लाभलें असतांहि त्याच्या त्यागाची तयारी, तिने पाहिली त्याने तिच्या मनाचें आकर्षण केलें असल्यास काय नवल ! विमल मर्यादशील असली तरी सौभाग्याकांक्षिणी होती.

प्रणयभावना लपविण्यांत स्त्रियांना कोणीहि हार जाऊं शकणार नाही त्याप्रमाणे, आमराईतील झोपडीशेजारीं दुसरी झोपडी बांधून देण्याच्या नाजूक कल्पनेचा हल्ला नवलरायावर परतविण्याकरिता, ती हंसून म्हणाली " आपली कल्पना थोडी चुकली बरं का ! परराष्ट्रीय वकिलांच्या नात्यानेच आपण या तहावर सह्या केल्या. मग परराष्ट्रीय वकील कोठे तरी असे एकमेकांच्या शेजाराला राहतात का ! मित्र म्हणविणारीं राष्ट्रेंहि मनांतून शत्रू, निदान साशंक व सावध, असतात. एका राष्ट्राच्या वकीलाच्या गोटांत चाललेली कारवाई दुसऱ्याच्या नजरेस न पडावी याकरिता वकिलातीचे गोट दूरदूरच बांधतात व पाहेरेहि ठेवून संभाळतात नाही का ?"

या उत्तराने नवलराय किंचित् घोटाळला. पण आता तो थोडथोडा धीट होऊं लागला होता. यामुळे विमलची कोटी परतविण्याकरिता तो म्हणाला, " छेः छेः तुम्हाला परराष्ट्रीय राजकारणाचें खरें रहस्यच ठाऊक नाही ! मनांतून सावधपणा असला तरी, आपलें शत्रुत्व तर नाहीच ; नाही पण साशंकताहि नाही असा बहाणा पुरा पाडण्याकरिता, कित्येक ठिकाणीं राष्ट्राचे वकील, अँबॅसेडर कौंसल, दोन वेगळ्या वकिलातीच्या इमारतींत न राहतां, एकाच इमारतींत राहून एकत्र जेवणखाणहि करतात. म्हणून झोपडीशेजारी

दुसरी झोपडी बांधण्याची सूचना हवीतर परत घेतों. आणि एकाच झोपडीचा आश्रय आपण दोघां वकिलांनी करावा असेंच सुचवितों. राष्ट्राराष्ट्रांत झालें तरी विश्वासानेच विश्वास, स्नेहानेच स्नेह, व प्रेमानेच प्रेम वाढतें कीं नाही ! नवलपूर संस्थानची प्रजा व राजा यांच्या तहाचीं कलमें अबाधितपणें अमलांत यावीं, परस्पर जामीन वेळेवर हाताला यावे, याकरिता मी सुचविलें हें इष्ट नाही काय ? माझ्या नशिबांत लिहिलें आहे तेंच अकल्पित रीतीने, ईश्वरा, घडून येणार काय"।

विमलला यावर उत्तर सुचेना ! प्रथम तिने फक्त स्त्रीधर्मानुरूप लाजून खाली मान घातली. पण तिचाहि बुद्धियोग जबरदस्त होता. म्हणून नवलरायाच्या शेवटच्या शब्दांतूनच उलट प्रश्नाची उपज घेऊन ती किंचित् आश्चर्य दर्शवून म्हणाली–"महाराज, आपण म्हणाला त्याप्रमाणे खरोखरच का आपला नशीबावर विश्वास आहे? आणि आपल्या नशिबांत काय लिहिलें आहे हें तरी ऐकूं द्या! संस्थानिकाचा नवलाचा नमुना अशी आपली कीर्ति होण्याचें जर आपल्या पत्रिकेंत लिहिलें असेल, तर तें मात्र खरें झाल्याचा योग दिसतो. कारण प्रजाप्रेमाच्या दृष्टीने खरोखरच आपण नवलाचे वाटतां. या शहराचें नांव नवलपूर हें मुळांत कोणी कां ठेवलें माहीत नाही. पण कित्येक वेळां मनुष्याच्या मोठेपणीं प्रकट होणारे गुण, आणि त्यांचा मागमूस नसतां केवळ आवडीने पाळण्यांतील मूल म्हणून ठेवलेलें त्याचें नांव, यांचा नवलकारक मेळ पडतो. तसेंच या शहराचें होणार !"

नवलराय मोठ्या उत्साहाने म्हणाला, "विमलाबाई, जन्मपत्रिकेंत शाब्दिक कोट्या नसतात. पण योग लिहिलेले असतात. माझ्या पत्रिकेंत लिहिलेल्या योगांपैकीं दोन तर इतके तंतोतंत अनुभवाला आले कीं, इजा बिजा तिजा या ग्राम्य न्यायाप्रमाणें कां होईना, त्यांत लिहिलेला तिसराहि योग खरा ठरणार असें वाटत होतें. तो कसा अनुभवाला येणार याची कल्पना मला परवां परवांपर्यंत नव्हती. पण तुमचे प्रभाकरपंत तुमच्या घरीं गुप्त वेषाने प्रवेश करीत होते त्याच ठिकाणीं, त्याच क्षणीं, मीहि गुप्तपणाने, वेषांतराने, तुमचें प्रथम दर्शन घेतलें. तेव्हा ताबडतोब निघून

जा म्हणून तुम्हीं मला दटावून सांगितलें तें आठवतें ना ! त्या तुमच्या प्रथम दर्शनाने व तेजस्वी वर्तनाने पत्रिकेंतील तिसराहि योग घडून येणार असें माझें मन मला सांगूं लागलें. हें पहा, दाखवितोंच तुम्हाला माझी पत्रिका, म्हणजे नशीबावरील माझा विश्वास योग्य कीं अयोग्य हें कळून येईल." असें म्हणून नवलरायाने उठून कपाटाचें कुलूप काढून त्यांतून आपली पत्रिका आणून ती विमल पुढे उघडून ठेवली. ती वाचावी कीं न वाचावी असा संशय तिला पडला. पण न वाचणें हें उद्दामपणाचें दिसेल म्हणून, व थोड्याशा कौतुक बुद्धीनेहि, तिनें ती वाचली. पत्रिकेंतील मजकूर असा होता.—"बाळपणी मातृवियोग घडेल; पण तें दुःख एका मातृतुल्य स्त्रीमुळें भरून निघेल. रंकाचा राव होईल असा बलिष्ठ राजयोग. पण भोगापेक्षा त्यागाचीच वृत्ति अधिक प्रबळ. मातृपितृप्रेमी विमल चारित्र्याच्या विदुषी स्त्रीशीं अद्भुत रीतीने भेटीचा योग येऊन तिच्याशीं विवाह होईल; व जन्मभर तिजकडून उत्तम सौख्य मिळून अंगीकृत कार्यांत साहाय्य लाभेल."

पत्रिकेतला हा शेरा विशेषतः विमल हा शब्द वाचून खरोखरच विमल चपापली. शाई कागदावरून पाहतां पंचवीस वर्षांपूर्वी लिहिल्यासारखी पत्रिका जुनी दिसतच होती. आजच्या अकल्पित प्रसंगाकरितां तो मुद्दाम खोटी बनावट केली असें मानण्याचें कांहीच कारण नव्हतें. बरें पत्रिका खरी म्हणावी, तर त्यांतला उल्लेख ( नांव सोडून दिलें तरी ) वर्णन व परिस्थिति यांच्यामुळे आपणाला चिकटावयाला येऊं पाहातो ! तो झाडून टाकता आला तर पहावा म्हणून विमल हंसून मुद्दाम किंचित् नाक मुरडल्यासारखें करून म्हणाली, "लाक्षणिक दुटप्पी भाषा योजणें हीच ज्योतिषांची खरी विद्या आहे. फलज्योतिषाच्या लोकभ्रमाची बाधा मीं आपणाला सहसा होऊं देत नाही. तरी पण विषय निघालाच म्हणून मीं एक गोष्ट विचारतें हो !"

नवलराय उत्सुकतेने म्हणाला, "अवश्य विचारा. मींहि प्रायः तर्कबुद्धीलाच ज्योतिषापेक्षा अधिक मानतो. पण न्यायाधीशाला आपणापुढे आलेल्या सर्व पुराव्याचा विचार करावाच लागतो नव्हे का ?"

विमल म्हणाली—" मला विचारावयाचें तें इतकेंच कीं, " रंकाचा राव होईल असा बलिष्ठ राजयोग पण भोगापेक्षा त्यागाची वृत्ति प्रबल," हें ज्योतिषाचें भाकीत आपल्या संबंधांत खरें ठरल्याचें सर्टिफिकीट मीं खऱ्या मानानें देईन. पण मातृवियोग घडेल आणि तें दुःख एका मातृतुल्य स्त्रीमुळे भरून निघेल या भविष्याचें काय झालें? हा पुष्पहार घातलेली तसबीर मागच्या बाजूस दिसते ही कुणाची! आपल्या जनक आईची ! कीं तिची जागा केवळ प्रेमानें घेणाऱ्या त्या दुसऱ्या स्त्रीची? या तसबिरींतील चेहऱ्यांत खरोखरच तेजस्वीपणाची व सद्गुणांची जादु ओतप्रोत भरली आहे."

हा प्रश्न ऐकून त्याचें उत्तर देण्याला नवलरायाला जणुं काय स्फुरणच चढलें. विमलने तसबिरीवर दृष्टि ठेवलेली असतांच, नवलराय त्या तसबिरीपुढे जाऊन उभा राहिला. तसबिरीच्या चौकटीच्या खालच्या टोकावर डोकें ठेवून, तीन वार प्रणाम करून, विमलकडे तोंड फिरवून तो म्हणाला, " विमलाबाई, पत्रिकेंतील माझ्या राजयोगाप्रमाणेच मातृसुखाचेंहि भविष्य शब्दशः खरें ठरलें. माझी जन्मदात्री आई माझ्या बाळपणांत वारली. तिची मला आठवण आहे ती फार अभिमानाची आहे. पण लवकरच तिला मृत्यूनें गांठलें तेव्हा तिनें मला या तसबिरींतील माझ्या दुसऱ्या आईच्या ओटींत घातलें. तेथपासून या माउलीनें माझें नुसतें मुलासारखें पालनपोषण केलें इतकेंच नव्हे, तर माझ्या भावी राजपदाचें तिला आगाऊ स्वप्न पडावें त्याप्रमाणें थोरपणा, स्वाभिमान, श्रीमंतीचा त्याग-मिश्रित उपभोग या सर्व गुणांचें शिक्षण तिनें मला अगदी आस्थापूर्वक दिलें. माझें खरें राजकुमार कॉलेज म्हणजे या महानुभाव स्त्रीच्या घरीं घालविलेले दिवस. हीच मनोहराची जन्मदात्री. आणि बाहेरून तो माझ्याशीं प्रायव्हेट सेक्रेटरीचें नातें ठेवतो, तरी मनोमन तो माझा वडील भाऊ आहे. जन्मदात्री नसलेल्या स्त्रीवरहि प्रत्यक्ष आईप्रमाणें प्रेम कसें करतां येतें याचा अनुभव, विमलाबाई, जो स्वतः तुम्हाला आहे तोच मला आहे. तुम्ही व मी सहानुभवी आहों म्हणून जन्मभर असे सहानुभवीच राहावें अशी माझी इच्छा आहे. "

इतकें बोलून नवलराय फिरून विमलसमोरच्या खुर्चीवर पूर्वीच्या जागीं येऊन बसला. टेबलावर दृष्टिसमोर नवलरायाची पत्रिका मांडून तिजवर हात

ठेवून विमल पुनः पुनः ती मनांत वाचीत होती. असें पाहून नवलराय तिला म्हणाला "विमलाबाई, बोलाना आता! पत्रिकेंतलीं दोन भविष्यें खरीं झाल्यावर आता तिसरेंहि होईल कीं नाही? आणि तें करणें तुमच्या हातीं आहे. मनुष्यामध्ये उपजत विश्वासाच्या अशा कांही कांही गोष्टी असतात. माझा जन्मापासून असा विश्वासच आहे कीं, माझ्या आयुष्याची होडी, कोणा तरी सत्प्रवृत्त निःस्वार्थी प्रेमळ अशा स्त्रीच्या स्फूर्तीच्या अनुकूल वाऱ्यावरच, चालायची आहे. आयुष्याच्या पूर्वभागांत त्या माउलीनें तो माझा विश्वास खरा केला. आणि"–इतकें बोलतांच नवलरायाच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. त्याच भावनेच्या उद्वेगांत त्यानें आपलें डोकें विमलच्या उपळ्या हातावर टेकलें आणि त्याच्या डोळ्यांतून वाहाणाऱ्या अश्रूंनी तिचे हात व त्याखाली पत्रिकेच्या कागदाचा कोपरा ओला केला.

प्रेमळ कृतज्ञतेचा हा देखावा पाहून विमलचें अंतःकरण उचंबळून आलें. तिच्याहि डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. तिनें नवलरायाच्या मस्तकाखालून आपले हात हळूच काढून घेतले व म्हणाली—"महाराज, पत्रिका भिजेल ना?" नवलराय मान वर उचलून म्हणाला, "माझ्या पत्रिकापूजनाला याहून अधिक मंगल असा अभिषेक दुसरा कोणता मी करणार!" आणि तिच्याहि गालावरील अश्रूंचे ओघळ पाहून म्हणाला "पण तुमच्याहि डोळ्यांतून पत्रिकेवर मंगल अभिषेकाचे चार थेंब पडलेलेच दिसतात. एकूण माझ्या अंतःकरणानें आपला गुप्त संदेश तुम्हाला कळविला आणि पटविलाहि असें दिसतें. माझें तिसरेंहि भविष्य खरें ठरणार तर! आता मात्र मीं धन्य झालों खरा!"

हें शेवटचें संभाषण सुरू असतांच मनोहर केव्हा वर आला तें या दोघांना कळलेंहि नाही. विमलच्या हातावर नवलरायाचें डोकें टेकलेलें पाहून तो किंचित् आड झाला, पण नवलरायाच्या धन्यतेच्या उद्गारांनी संभाषण संपलें असें वाटून तो पुढे आला, आणि टाळी वाजवून म्हणाला "काय, महाराज, आतां मुखत्यारी कच्ची कीं पक्की!"

या प्रश्नाचें मर्म नवलरायच विमल दोघांनाहि कळलें. विमल सहजच थोडी लाजली. नवलराय म्हणाला "बाबा, ही सर्व प्रायव्हेट सेक्रेटरीची कारवाई. वडील भावानें धाकट्याचें हित किती कसें पाहावें याला सीमा कशी असणार!"

---

प्रकरण सत्ताविसावें

# संस्थानी स्वराज्याची पहिली मजल

विमलसंबंधीची प्रेमाकांक्षा सफळ झाल्यामुळे नवलरायानें तर स्वतःविषयी धन्यतेचे उद्गार काढलेच; पण मनोहरालाहि वेगळ्या दृष्टीने तितक्याच यथार्थतेने ते स्वतःविषयी काढतां आले असते. कारण संसारांत धन्यता वाटण्यासारख्या ज्या कांही गोष्टी असतात त्यांत, स्वतःला अनुरूप अशी वधू मिळणें याबरोबरीनेच, तुल्यगुण अशा इतर वधूवरांचीं लग्नें जुळवून आणण्याचें श्रेय लाभणें याचाहि समावेश करतां येईल. 'समानयन् तुल्यगुणं वधूवरं चिरस्य वाच्यं न गतः प्रजापतिः' असें कालिदासानें म्हटलेंच आहे. हें काम ब्रह्मदेवालाहि अवघड मग माणसांचा काय पाड? असो. नवलरायाने प्रजेला स्वराज्यदान देण्याची तयारी केली त्याच्या तोलाचा मोबदला, आपणहि त्याला विमलसारखी वधू मिळवून देऊन, दिला असें मनोहराला वाटलें. पण ही जाणीव दिसूं न देतां तो नवलरायाला म्हणाला "महाराज, माझ्या बंधुप्रेमाची स्तुति तुम्ही आता कां न कराल? पण ती सर्वस्वी स्वार्थमूलक आहे. पण तुम्ही प्रजाप्रेमाची योजना पक्की करणार होतां तिचें काय झालें? का तिचा स्वतःच्या कार्यसाधनांत विसर पडला?"

नवल.—"वाःवाः, तें काय म्हणून? ती योजना मीं आपल्या हातानें कागदावर प्रत्यक्ष लिहिली आहे तीच पाहा म्हणजे कळेल. आणि फिरून ती इतकी पक्की कीं, तिच्यावर मीं राजा म्हणून व विमलाबाई प्रजाप्रतिनिधी म्हणून, आम्हा दोघांनी त्या कागदावर आपल्या सह्या केल्या आहेत. तूं वाचच ना तो कागद एकदा सर्व, म्हणजे तुलाहि आमची योजना कळेल."

असें म्हणून नवलरायानें कागद मनोहराच्या हातांत दिला. तो मनोहरानें मोठ्यानें वाचला. कागदांत लिहिलेल्या राज्यघटनेचीं कलमें खालीलप्रमाणे होतीं:—

**कलम**—"(१) संस्थानसंरक्षणाची जबाबदारी अखेर मुख्यतः राजावर असते त्याअर्थी, जोखमीच्या कामांत अखेरची हुकमतहि राजाकडेच राहिली पाहिजे. याच्याउलट इतर कामांत ती राजाने वरिष्ठ प्रजाप्रतिनिधींच्या अंगावरच टाकली पाहिजे.

(२) हे प्रतिनिधि राजानेच आपल्या पसंतीने नेमावे, मात्र ते राज्यकारभारांत कार्यकुशल असे पाहून नेमावे. पण वरील गुणापेक्षाहि त्यांच्या निःस्वार्थीपणालाच केव्हाहि अधिक महत्त्व द्यावें.

(३) हे प्रतिनिधि प्रथम बिनपगारी नेमावे, व त्यांना मोबदला द्यावयाचा तर ते सेवानिवृत्त होतांना, त्यांची कामगिरी व त्यांजविषयीं लोकमत पाहून, मग बक्षीस म्हणून तो द्यावा.

(४) प्रजाजनांपैकीं जो कोणी एखादें राज्यकारभाराचें काम अंगावर घेऊन करून दाखवूं म्हणेल त्याला तें करण्याला केव्हाहि अवश्य संधि द्यावी. मात्र हें काम निर्वेतन करणें ही त्याच्या सार्वजनिक हितबुद्धीची कसोटी समजावी.

(५) प्रत्येक खात्यांतील कारकूनकडांत तज्ज्ञ अनुभवी अशीं मुख्य दोनतीन माणसें तरी नित्याचा कार्यव्यवहार संभाळण्याला ठेवावीं.

(६) लांचलुचपत व जुलूमजबरदस्ती यांची चौकशी साध्या फिर्यादीवरहि करावी. आणि गुन्हेगारास, त्याला आठवण राहील व लोकांना दहशत बसेल असें, कडक शासन करावें.

(७) न्यायदानाचे कामीं अखेर निकाल राजाने आपल्या हातीं ठेवावा. पण खालचे अधिकारी आपापले अधिकार बजावीत असतां त्यांत यत्किंचित्‌हि ढवळाढवळ करूं नये.

(८) दर तीन महिन्यांनी चार दिवस दरबार भरवून, राजाने जाहीर निमंत्रणाने ज्या कोणास कांही तक्रार सांगावयाची असेल ती सांगण्याकरिता बोलवावें; आणि खातेवार अधिकारी हजर ठेवून त्यांच्या समक्ष कागदपत्र पाहून चौकशी करावी.

(९) कायद्याच्या आधाराशिवाय कोणाचेंहि व्यक्तिस्वातंत्र्य, धर्म, रूढि, खासगी व्यवहार, मालमत्ता यांजमध्ये राजाने हात घालूं नये.

( १० ) कायदा करणें किंवा कर बसविणें हें लोकमत अजमावल्या-शिवाय करूं नये.

( ११ ) पंचायतपद्धतीने निकालांत काढतां येईल तितका सर्व कारभार त्या पद्धतीनेच करावा.

( १२ ) सरकारी पैशांतून कोणत्याहि धर्मकृत्याला किंवा देवस्थानाला किंवा उत्सवांना मदत करूं नये. शक्य असेल तितका पैसा लोकशिक्षणावर खर्चावा.

( १३ ) दर तीन वर्षांनी राज्याबाहेरचा एखादा तज्ज्ञ विद्वान हिशेबी अनुभवी मनुष्य आणवून त्याजकडून सरकारी हिशेब, जमाखर्च व कारभार यांची चांचणी घ्यावी व तपासणी करवावी.

(१४) राजाने स्वतःला संस्थानाचा नोकरच समजून खर्चाकरिता तनखा ठरवून घ्यावा; व त्यांतच आपल्या कुटुंबाचा खर्च व नैमित्तिक खर्च चालवावे.

(१५) राजाच्या वडील मुलाखेरीज राजघराण्यांतल्या इतर कोणालाहि बेगळा तनखा ठरवून देऊं नये.

(१६) दरबार किंवा संस्थान हें राजव्यक्तीहून वेगळें असें मानून त्याच्या संरक्षणाकरिता, मामुली राज्यकारभाकरिता व योग्य इतमामाकरिता खर्च ठरवून द्यावा.

(१७) राजाने दरपांच वर्षांनी राजपदाचा राजीनामा द्यावा, व प्रजेने पुनः त्याची अगर इतर कोणाची नेमणूक त्याचे जागीं करावी.

(१८) ही निवडणूक करण्याकरिता राज्यांतलि फक्त पन्नास संभावित लोकांची यादी पंचायतीमार्फत आणवून ठेवलेली असावी.

(१९) या पन्नास लोकांनाच लोकमत प्रकट करण्याचा अधिकार असावा. नवीन कायदे, करपट्टी, लोकहिताच्या योजना यांजविषयी वर्षांतून एकदा या मंडळाच्या द्वारें लोकमत अजमावावें.

(२०) राजाने राजपदावर असतां खासगी व्यापारधंदा किंवा द्रव्योत्पा-दनाचा इतर कोणताहि उद्योग करूं नये. तसेंच लोकसभेच्या संमतीशिवाय संस्थानाच्या हद्दीच्या बाहेर खासगी स्वतःची अशी कोणत्याहि प्रकारची मिळकत संस्थानिकाने संपादूं नये."

योजना वाचून मनोहराने मान डोलविली आणि म्हणाला "आहे. योजना तुमच्या संकल्पानुरूप उदार अशीच आहे! प्रार्थना इतकीच कीं, ही योजना अमलांत आणवून घेऊन सुराज्य भोगण्याची अक्कल व पात्रता मात्र ईश्वर या संस्थानच्या प्रजेला देवो!"

नव.—" मनोहर, प्रजेच्या पात्रतेसंबंधी तूं नेहमी असा साशंक दिसतोस तो कां?

मनो.—" युरोप अमेरिकेंत तसा अनुभव आलेला दिसतो म्हणून. महाराज, तुम्ही स्वतःच्यापुरता निःस्वार्थीपणाचा निर्वाळा द्याल. पण, समजा, उद्या तुमचा मुलगा राजा झाला तर त्याच्या निःस्वार्थीपणाचा निर्वाळा तुम्ही द्याल काय? तसेंच प्रजेचेंहि आहे. कोणत्याहि राष्ट्रांतील प्रजेची स्वराज्याची मागणी स्वार्थपर असते. स्वराज्य मोक्षाकरिता मिळवावयाचें नसतें हें कबूल; तें इहलैकिक अभ्युदयाकरिता उत्कर्षाकरिताच मिळवावयाचें असतें. पण राजसत्ता जी थोडी कोणाच्या हातीं येईल ती आपण एखादा राजा असल्यासारखीच, सामान्य प्रजाजन स्वार्थी बुद्धीने उपभोगतो व जुलूम करून वापरतो. स्वार्थ व लोभ हा राजाच्या रूपाने फक्त एका तोंडाने खातो, तर प्रजेच्या म्हणजे लोकांच्या तोंडाने तो शेंकडों मुखांनी खातो. म्हणून वाटतें एक तोंड खातें तेंच बरें."

नवल.—" नाही, मला नाही तसें वाटत. जनतेने शंभर तोंडांनी खाल्लें तरी, स्वतः जें धन उत्पन्न करून कराच्या रूपाने राजाला देते, त्यांतलेच ती खाते. उलट राजा हा आपल्या श्रमाने कितीसें धन उत्पन्न करतो? करपट्टी देण्याच्या पात्रतेवरच जर मतदारी अवलंबून ठेवली, तर मला वाटतें राजाचें नांव मतदाराच्या पटांत दाखलसुद्धा होणार नाही! तात्पर्य, माझें म्हणणें इतकेंच कीं, प्रजेने सर्व मिळवावें आणि राजा होऊन बसणाराने तें सर्व आपल्या एकट्याच्या इच्छेने खर्च करावें किंवा खावें, हा श्रमविभाग अन्यायाचाच नव्हे का?"

विमल—" एकट्याची इच्छासुद्धा न्यायाची होईल. पण तो एकटा स्वतःच्या व्यक्तीच्या दृष्टीने निःस्वार्थी असला पाहिजे" चूक ही मनुष्याच्या हातून होणारच. राजशाहींत राजांच्या हातून चुक

होतात तशा लोकशाहींत लोकप्रतिनिधींच्याहि हातून होतील. पण केव्हाहि स्वार्थानेंच कारभार खरा बिनसतो तसा अज्ञानाने नाही. आजपर्यंत राजांना संधि मिळाली तशी लोकांनाहि मिळाली पाहिजे नव्हे का ? स्वार्थ-विरहित स्वामित्व राजे लोक संभाळतील तर लोक तें त्यांना खुषीने देतील. राज्यकारभाराची रिकामी दगदग खरोखर कोणाला हवी ? निःस्वार्थी कर्तव्यनिष्ठ अशा आगगाडीच्या ड्रायव्हरावर किंवा आगबोटीच्या कप्ताना-वर भरंवसा टाकून, हजारों लोक आनंदाने खेळ खेळत प्रवास करतात. तो निःस्वार्थीपणा व ती कर्तव्यनिष्ठा राजेलोकांनी आजवर दाखविली असती तर लोकशाहीचा बंडखोर झेंडा कधीच उभारला गेला नसता ! पण महाराजांनी निःस्वार्थीपणा स्वीकारल्यामुळे मी या राज्यघटनेंत पूर्ण सर्वांगीण लोकशाही निर्माण न करता, मर्यादित राजसत्तेची योजना ठेवली आहे. लोकशाहीसंबंधाने महाराजांइतकों दुर्दम विश्वास माझ्या मनांत नसला तरी, मनोहरपंत, तुमच्याइतका अविश्वासाहि पण नाही."

**मनो.**—"म्हणजे तुम्हां दोघांची जोडी या राज्याच्या कारभाराला बळकट ब्रेक असलेल्या मोटारीसारखी होणार तर ! चला, मोटारींत बसून स्वस्थ झोंप घेण्याची आपली आयती सोय झाली."

नवल.—"तर तर ! तुला मी गप्प बसूं देईन तेव्हा मग झोंप ! दिवाण-पद रिकामें झालें आहे तें यापुढे तुलाच संभाळलें पाहिजे. आम्हा दोघांनी घटना निर्माण करण्याचे श्रम घेतले, तिची अंमलबजावणी करण्याचे श्रम तुला घेतले पाहिजेत. बारा वर्षांच्या जुलुमानंतर मी नेमलेला नवा दिवाण कसा भला आहे हें लोकांना दिसून तरी येईल. पण मनोहर, तूं पगार किती घेणार ?"

**मनो.**—"ज्या मानाने राजाला तनखा त्या मानाने दिवाणाला! राजा फकीर मग दिवाणाला पगाराची कां फिकीर? तरी तुम्ही लग्न करून संसार थाटणार म्हणून तुम्हाला कांही तरी लागेल. मी आजन्म अविवाहित राहण्याचा निश्चय केलेला असल्यामुळे मला एकट्याला काय लागणार ! वहिनीच्या हातचा सुग्रासच रोज खाऊं म्हणजे झालें ! मला भाऊ म्हणणारे महाराज, आणि भाऊजी म्हणणाऱ्या राणीसाहेब, यांची कृपा आणि त्यांचें प्रेम हाच

पगार मला अखंड मिळाला म्हणजे मी खुषीने दिवाणगिरी करीन. मात्र मलाहि एक खास मदतनीस हवा. तो विनायकराव लोंढे यालाच नेमण्याची परवानगी द्या म्हणजे झालें. त्यानेंहि आपलें जनताप्रेम चांगलेंच प्रकट केलें आहे. तो घरचा सुखवस्तु आहे. तो प्रजेचें काम फुकट व मोठ्या हौसेने करील. दिवाणाला फौजदार तसाच लागतो. त्याला आपले बलभीम सेवक प्रभाकरपंत ठीक आहेत. येऊन-जाऊन सुभेदाराचें काय करावयाचें इतकाच प्रश्न उरला."

त्यावर विमल हंसून म्हणाली "बिचाऱ्याची दत्तकाच्या प्रकरणांत फजिती झाली. निराशा झाली. तेव्हा पळून गेलेल्या माजी दिवाणसाहेबांची दहा-पंधरा हजारांची मिळकत ट्रंकापेट्या भरून राजवाड्याच्या पाहाऱ्यांत आणून ठेवली आहे. ती तशीच सुभेदारांना द्यावी म्हणजे झालें. मात्र माणूस लफंग्या व बखेडे-खोर आहे म्हणून त्याला या संस्थानांतून निघून कांही दिवस बाहेर जाण्याचा कानमंत्र सांगावा म्हणजे झालें. तो सुखाने निघून जाईल." इतकें बोलून विमल हंसून म्हणाली "सुभेदारसाहेब माझे नातेवाईक आहेत. तेव्हा त्यांच्या हिताला मला जपलेंच पाहिजे!"

"नाही" मनोहर म्हणाला "तेवढेंच नाही कांही! दिवाणसाहेबांनी शिरस्तेदारांना लिहिलेलें पत्र वाटेंत पकडून, सुभेदारांनी अकलेची हुषारी दाखविली खरी. त्या पत्राने आपणाकडून बरेंच काम केलें. परक्याने तोंडीं केलेल्या शेंकडों आरोपांपेक्षा मनुष्याने आपल्या हाताने लिहिलेलें अक्षरच त्याला खरें मारतें. मी दिवाणसाहेबांना दहशत घातली ती घातली नसती तरी तें पत्र पाहून त्या रात्रीं त्यांनी आपण होऊनच पोबारा केला असता."

"असो" महाराज म्हणाले, "मनोहर, सर्व कांही आता ज्याच्या त्याच्या मनासारखें झालें."

**मनो.**—"पण, महाराज, आपल्या या नव्या घटनेला आणि योजनेला, खालसातींतले व इतर संस्थानांतले बुद्धिःलब्धप्रतिष्ठित लोक, काय नांव देतील हें आहे का माहीत?"

**नवल.**—"त्यांनी ठेवलेल्या नांवाशीं आपल्याला काय कर्तव्य आहे? पण त्याविषयी तुझी कल्पना तरी काय आहे तें ऐकूं दे."

मनो.—" ते नांव देतील तें नवलकारकच असेल. म्हणतील, हा एक नवलपुरांतला गद्धेपंचविशीचा खेळ आहे!"

नवल.—" म्हणजे काय बुवा?"

मनो.—" नवे संस्थानिक, नव्या राणीसाहेब, नवे दिवाण, नवे नायब दिवाण, नवे पोलिससाहेब, सगळेच तिशी–पंचविशींतले नवजवान 'उल्लू-मशालजी.' त्यांनी केलेला हा लोकशाहीचा खेळ! पंचविशीच्या भरांत केलेलीं कृत्यें गाढवपणाचींच असावयाचीं! म्हणूनच गद्धेपंचविशी ही म्हण पडली."

नवल.—" तरी तूं एक गाढव आमच्या सर्वांच्या जोडीला आहेस म्हणून बरें. पण भल्या माणसा, आमचा बचाव तूं करावा तें सोडून निंदकांचें समर्थन केल्यासारखें बोलतोस, आश्चर्य म्हणावयाचें! असो. वाढलेल्या दाढींतच राजकारणी शहाणपणा असेल, तर मी खोटी पांढरी दाढी लावून दरबारांत बसत जाईन म्हणजे झालें."

मनो.—"पण पांढरी दाढी म्हातारपणची खूण म्हणून शेजारीं बसणाऱ्या राणीसाहेबांना आवडणार नाही त्याची वाट? कदाचित् काळी चालेल. पण ती लावून नगरांत घस्त घालण्याची लहर तुम्हाला येऊं लागली म्हणजे राणीमागून राणी पटकावून घरीं आणाल! तें तर आद्य राणी-साहेबांना मुळींच आवडणार नाही! तात्पर्य, आपण या दाढीच्या भानगडींत मुळींच पडूं नये हें बरें. तरुणांना नांवें ठेवण्याचा जन्मसिद्ध हक्क वृद्धांना असतो, तो त्यांचा काढून घेऊन त्यांना दुःखी कां करा? म्हणोत बिचारे संस्थानी स्वराज्याला गद्धेपंचविशीचा खेळ! आपण योजलेला स्वराज्यदानाचा खेळ कदाचित् फसण्याचा संभव असला तरी तो उमदा आहे, तुम्हा आम्हा सर्वांना भूषणास्पद आहे, हें मीहि प्रांजलपणें कबूल करतों. तेव्हा होऊंच द्या त्याला सुरुवात?"

नवल.—" मी तरी तेंच म्हणतों. तेव्हा प्रथम तूं ही नवी राज्यघटना जाहीरनाम्याच्या रूपाने ताबडतोब प्रसिद्ध कर. मी लवकरच माझ्या नव्या खासगी घरांत जाऊन राहणार हें लोकांना कळलेंच आहे. आणि मी स्वतःला किती अल्प तनखा ठरवून घेतला हेंहि प्रजाजनांना लवकरच कळेल.

माझी स्वराज्यदानाची कल्पना यशस्वी करण्याला तूं आणि विमलाबाई यांची मदत झाली याबद्दल खरोखरच मी ऋणी आहें."

इतकें बोलणें झाल्यावर महाराजांनी विमलला निरोप दिला व तिला घरापर्यंत रथांतून पोंचविण्याबद्दल मनोहराला सुचविलें. तीहि महाराजांना वांकड्या नजरेचा एक नमस्कार करून जिना उतरूं लागली!

दुसरे दिवशीं सकाळीं मनोहर भाऊसाहेबांच्या घरीं गेला. त्यांची प्रकृति आणखीहि थोडी सुधारून ते चांगले बोलूं लागले होते. मनोहरपंत आले. म्हणून भाऊसाहेबांनी प्रभाकराला आणि विमलला जवळ येऊन बसण्याला हाक मारली. पैकीं प्रभाकर आला. पण विमल मात्र आली नाही. कांही वेळ थांबून मनोहरानें बोलणें काढलें. तो म्हणाला, "भाऊसाहेब, आज मी आपणाकडे एका महत्त्वाच्या कामाकरिता आलों आहें."

भाऊ.—" तें काय?"

मनो.—" प्रथम आपल्या परवानगीने आपणाला एक प्रश्न विचारतों. विचारूं का?"

भाऊ.—" हो हो, अवश्य विचारा. त्याला परवानगी कशाला?"

मनो.—" संस्थानाचे अत्यंत राजनिष्ठ प्रजाजन अशी आपली ख्याती आहे!"

भाऊ.—" ख्याती कसली? पण माझ्या मनाने मीं अत्यंत राजनिष्ठ आहें असें मला वाटतें खरें!"

मनो.—" जुने दिवाणसाहेब व जुने राजेसाहेब यांची कोणतीहि आज्ञा, केवळ राजनिष्ठेच्या भावनेने, आपण वंद्य मानीत होतां असें लोक सांगतात तें खरें का? राजनिष्ठा हा गुण भूषणास्पद यांत शंकाच नाही. आणि मी विचारतों तेंहि खऱ्या मनानेच किंबहुना कौतुकबुद्धीने असेंहि समजा."

भाऊ.—" त्यांतलें खरें असें आहे, मनोहरपंत, आम्ही जुन्या काळचीं माणसें! धोपट मार्गी! राजा म्हटला म्हणजे तो आम्हाला देवासारखा वाटावयाचा. आणि दिवाणसाहेब हे उपदेव पण देवाच्याच कोटींतले. तेव्हा

त्यांचे हुकूम निष्ठापूर्वक पाळणें हें कर्तव्यच असें आम्ही मानावें हें स्वाभाविक नव्हे का ! ”

**मनो.**—“ मीं त्याबद्दल आपणाला मुळीच दोष देत नाही. पण आणखी एक प्रश्न असा कीं, आपली राजनिष्ठा केवळ व्यक्तिगत नसून तत्त्वतः गादीसंबंधाची अधिकारासंबंधाची असते असेंच समजावयाचेंना ! ”

भाऊसाहेब मोठ्याने हंसून म्हणाले “अहो, हें सांगायला कशाला पाहिजे? गादीवर विद्यमान असेल तो राजा! एक राजव्यक्ति गत झाली तर गादी जशी बुडत नाही तशीच आमची राजनिष्ठा ! ”

**मनो.**—“ तर मग नवलपूर संस्थानाच्या जुन्या महाराजांच्या आज्ञेला आपण मान देत होतां तोच आताच्या नव्या नवलराय महाराजांच्या आज्ञेलाहि यालच ! ”

भाऊसाहेब मनापासून अगत्यवाद दर्शवून म्हणाले —“ हो ! हो ! हो ! तें सांगायला कशाला पाहिजे ! ”

**मनो.**—“तर मग नव्या महाराजांनी नेमलेला नवा दिवाण या नात्यानें, महाराजांची आज्ञा नव्हे पण नम्र विनंति म्हणून आपणाला कळवितों कीं, राजपदाचा अर्धा हिस्सा महाराजांनी, आपली सुरूप सद्गुणसंपन्न कन्या विमलाबाई यांना, देण्याचें ठरविलें आहे त्याला आपण मान्यता द्यावी. ”।

म्हातारा गोंधळांत पडला.हा कूट प्रश्न त्याच्या मठ्ठ मेंदूत एकदम शिरेना. तो म्हणाला “ मनोहरपंत, क्षमा करा, पण जरा आणखी समजावून सांगाल तर या जरठावर कृपा होईल!”

**मनोहर**—“ ठीक आहे. सरळच सांगतों. महाराजांनी आपला विवाह करण्याचें योजिलें असून विमलाबाईंना राज्ञीपद द्यावें असेंहि आणखी योजिलें आहे. आता मुलीला मागणी घालण्याची रीत आपणांत नाही.उलट आपली मुलगी राजाला देऊं करणें हें साहसाचें व पायरीला पाय लावण्यासारखें दिसावयाचें.पण या दोनही अडचणी सक्तपणें संभाळल्या गेल्या तर,राजे लोकांना अविवाहित राहण्याचाच प्रसंग यावयाचा! म्हणून ही रूढि मोडण्याचा विचार करूनच महाराजांनी मला आपणाकडे पाठविलें आहे. विमलाबाईंचे वडील या नात्याने, त्यांना राणीपद मिळण्याहून अधिक सद्भाग्य आणखी कोणतें, आपण

झालें तरी, मनाने चिंताल? म्हणून आपण होकार दिला म्हणजे झालें. बाकी-ची सर्व सिद्धता आहेच."

म्हताऱ्याला राजाज्ञेचा अर्थ आता चांगलाच कळला. त्याची राजनिष्ठा चांगलीच फळाला आली! त्याचें हृदय उचंबळून आलें. त्याने एकदम मोठ्याने विमलला हाक मारली. आजपर्यंत बापाची हाक ऐकून तिजबरोबर तिने ओ दिली नाही असा बहुधा हा आजचाच पहिला प्रसंग होता. पण ती एकदम बाहेर कशी येणार! मनोहरपंतांनी येणें केलें असें पाहतांच, त्याचा अर्थ समजून, ती घरांत गेली आणि माईसाहेबांच्या गळां पडून गहिंवरली. "विमल, बाळ काय झालं ग? डोळ्यांतून अश्रु ढाळतांना तुला मी आज पहिल्यानेच पाहतें." असें माईसाहेबांनी विचारलें.

मुलीला आपल्या दुःखाप्रमाणे आपलें सुखहि मोकळ्या मनाने सांगण्याचें जगांत एकच स्थान म्हणजे ती आई. यामुळे विमलने राजवाड्यांत घडलेला सर्व वृत्तान्त माईसाहेबांना सांगितला. तो ऐकून त्यांना-हि भरतें येऊन त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले. त्यांनी सनातनी स्त्रीबुध्दीप्रमाणे, मुलीच्या डोक्यावर बोटें मोडून 'इडापिडा टळो' असे उद्गार काढले आणि खरोखरच मीठमिरच्या आणून विमलवरून उतरून त्या चुंलींत टाकून तिची दृष्टहि काढली!

इतक्यांत भाऊसाहेबांनी तिला पुनः हाक मारली, व तिला बोलावण्या-करिता प्रभाकरहि माजघरांत आला. तेव्हा विमल व माईसाहेब दोघीजणी बाहेर आल्या. भाऊसाहेबांनी विमलला जवळ बोलावून घेऊन आपल्या शेजारीं बसवून घेतलें; व तिच्या पाठीवरून हात फिरवून ते म्हणाले "बाळ, तुला न विचारतां गोष्ट केली अशी आजच ही पहिली बरं का!"

विमल म्हणाली "म्हणजे? ती काय केलीत बाबा?" भाऊसाहेब म्हणाले "म्हातारपणीं वरशोधनाची उठाठेव करण्याचे माझे श्रम आयते वांचले. स्वतः महाराजांनीच तुला या राज्याची अर्धी मालकीण करावयाचें योजून मला तशी आज्ञा केली. आणि मी तुला न विचारतां त्यांना होय म्हटलें. तुझा रुकार मिळतांच महाराजांना निरोप कळवीन, म्हणजे तेच आपल्या

घरीं चहा घ्यायला येतील. माझा सर्वतोपरी साहाय्यकारी होण्याचेंच ईश्वराने ठरविलें असावें असें दिसतें."

इतकें बोलून भाऊसाहेब माईसाहेबांना उद्देशून म्हणाले "ऐकलं का ! आपल्या मुलीला आपली संमति हवी असेल म्हणून ती बोलत नाही !"

इतक्या प्रेमाचा शब्द नवऱ्याचे तोंडून फारा दिवसांनी ऐकायला सांपडला यामुळे माईसाहेबांनी, सदरेवर मोठ्याने न बोलण्याची, मर्यादा जन्मांत आज प्रथमच उल्लंघिली. आणि सर्वांना ऐकूं जाईल अशा आवाजाने त्या म्हणाल्या "आपण दिली तीच माझी आणि तिचीहि संमति बरं का! तिचे गुण आहेतच तसे. ती राजाची राणी होणार असें भाकीत मी मनाने पूर्वीच करून ठेवलें होतें."

भाऊसाहेब हंसून म्हणाले, "मोठी ज्योतिषीणच पडलीस कीं नाही तुझें भाकीत खरें ठरायला !"

माईसाहेब किंचित् थट्टेच्या स्वराने म्हणाल्या, "मी कशीहि वेडी–वांकडी ज्योतिषीण असलें तरी आपणाला दत्तकाचें भविष्य सांगणाऱ्या ज्योतिष्यापेक्षा पुष्कळ बरी! पण आता उगीच वेळ गमावूं नये. महाराजांना घरीं आणण्याला स्वतः प्रभाकरालाच राजवाड्यांत पाठवावा."

प्रभाकरहि आनंदाने कपडे घालून मनोहरपंताबरोबर महाराजांना बोलावण्याकरिता निघून गेला. ते गेल्यावर घरांत काय धांदल उडाली असेल तिचें वर्णन कोण करूं शकेल ! भाऊसाहेब तर अंथरुणावरच बसून होते. पण माईसाहेबांनी गड्या–कुणबिणींना हाका मारून बैठकी ठाकठीक केल्या, लोढ–तक्ये ठेवले, टेबलावरून रुमाल पसरले, तसबिरींवरून, कपाटांच्या भिंगांवरून फडकीं फिरविलीं, उदबत्त्या लावून ठेवल्या. विमल फारशी हालचाल करीत नव्हती. उलट ती आपल्या आईला म्हणाली "माई, कशाला घेतेस इतके श्रम ! त्यांना छानछुकीची फारशी हौस मनांतून नाही. बाबा अन् तूं नेहमीच घर साफसूफ ठेवतां तितकें पाहूनच ते वाखाणणी करतील कीं नाही पाहा तरी !"

माईसाहेबांनी हळूच विमलचा गालगुच्चा घेतला आणि म्हणाल्या, "बरं, बरं. लागलीस का इतक्यांतच जावयांची शिफारस करायला ! तुला बाई

सगळं कांही माफ होईल. पण सासुरवाडीच्या इतर माणसांची खोड काढण्याकडेच जावयांची बारीक नजर नेहमी जाते. चल जाऊं दे मला. ते आत्ता येतील. राजेसाहेबांच्या चहापाण्याची व्यवस्था मला करूं दे कशी."

भाऊसाहेबांनी बसल्या बसल्या कपडे बदलले, व अंगावर शाल घेतली. विमलने बाहेरून साफसुफीची उपेक्षाबुद्धि दाखविली खरी.परंतु तीहि चटकन मागील दारीं गेली, व अंग धुऊन घेऊन, नवें लुगडें नेसून, केस साफ करून, रेखीव कुंकू लावून, घुवट हातरुमाल कंबरेला खोवून,व गळ्यांतील एकदाणी ठाकठीक करून,वर्तमानपत्र डोळ्यापुढे धरून खुर्चीवर बसली. मग तीं काय वाचीत होती, कीं मानसिक गौरीहराची पूजा करीत होती, तें देव जाणे!

सुमारें अर्ध्या तासाने दाराशीं रथ आला. त्यांतून उतरून महाराज, मनोहर व प्रभाकर सर्वजण आंत आले. सर्वजण भाऊसाहेबांच्या पलंगासमोर खुर्च्यांवर बसले. विमल पलंगाच्या बाजूला खेटून खुर्चीवर बसली. माईसाहेब आपल्या ठरीव जागेवर म्हणजे माजघराच्या दारांत उभ्या होत्या.

भाऊसाहेब म्हणाले "मला उठून उभा राहून महाराजांचें स्वागत करतां आलें नाही याबद्दल क्षमा व्हावी."

नवल.—"त्यांत क्षमा कसली! आपण फार आजारी होतां म्हणे. उठून बसतां आलें ही तरी प्रकृतींत सुधारणाच म्हणावयाची!"

इतकें बोलून नवलराय गुण घेण्याच्या नजरेने चोहोकडे पाहूं लागला. आणि घरांतील नीटनेटकेपणा व स्वच्छता पाहून त्याच्या मनावर झालेला अनुकूल ग्रह तोंडावर स्पष्टपणें दिसून येऊं लागला.

ती संधि साधून मनोहर म्हणाला, "महाराजांनी या वाड्याचा पुढचा हा भाग कधीं पाहिलाच नव्हता. मागील बागेचा दरवाजा व त्यांतून मागील दारचें तुळशीकट्याचें अंगण येवढींच मात्र एक वेळ पाहिलीं होतीं."

हें ऐकून भाऊसाहेबांखेरीज सर्वजण हंसूं लागलीं, कारण श्रावण वद्य अमावास्येच्या रात्रीचा सर्व प्रकार या इतर सर्वांना तपशीलवार कळला होता. म्हणून भाऊसाहेब गोंधळून जाऊन म्हणाले,

"माझ्या नाही लक्षांत हें कसें केव्हा घडलें तें." तेव्हा प्रभाकर पुढे होऊन त्याने त्या रात्रीची सर्व अद्भुत हकीकत उच्चारली.

भाऊसाहेब म्हणाले, " अस्सें! वेषांतर करून आलेल्या महाराजांना मी तेव्हा ओळखलें नाही हा कांहीं खरा दोष माझा नाही. पण त्याहिबद्दल महाराजांनी मला क्षमा केली पाहिजे ! "

मनोहर हंसून म्हणाला " बरोबरच आहे. तांब्याचें भांडें आणि मातीचें भांडें हीं एकमेकांवर आपटलीं तर मातीच्याच भांड्याने फुटलें पाहिजे! एक सासरा होणें म्हणजे न केलेल्या शंभर चुका पदरांत घेण्यास तयार होणें आहे. पण हें अप्रिय बोलणें राहूं द्या. प्रभाकरपंत, आता चहाच्या मधुपर्काची तयारी होऊं द्या ना ! "

भाऊसाहेब म्हणाले " काय, नुसत्या चहाचाच मधुपर्क ! "

मनोहर म्हणाला " या नव्या युगांतल्या जावयांना त्या मधुपर्काशिवाय दुसरा कोणताच गोड लागत नाहीं त्याला काय करणार ! असो. अहो आज पुढच्या दाराने दिवसा आले म्हणून भावी जावयांना हा चहाचा तरी मधुपर्क मिळाला. पण त्या रात्रीं प्रभाकरपंत घरांत आल्यावर त्यांची व वेषांतरित महाराजांची अवचित गांठ पडली असती, तर कोणता मधुपर्क मिळाला असता कोणी सांगावें ? पण साहसाशिवाय श्री नाही हें ठरलेलेंच आहे म्हणा! यापुढे मात्र महाराज वेषांतर करून रात्रीं अपरात्रीं नगरांत संचाराला जाणार नाहीत यातिषयी विमलाबाई सावधागिरी घेतीलच. तें आपण कशाला बोला!"

"ठीकच आहे." महाराज म्हणाले, "आता स्वराज्यदान देऊन लोकसभा मीं निर्माण केली तेव्हा प्रजेचीं सुखदुःखें उघड्या सभेंत भरदिवसा मला कळतील. मग रात्रीं घस्तीला जाण्याचें काय कारण? त्या दिवशींहि तसला चमत्कारिक प्रसंग यायला कदाचित् अमावास्येचा मुहूर्त कारण झाला असेल कोणी सांगावें !"

"झालें यावरून पाहतां मीं तर त्या अमावास्येच्या मुहूर्ताला नांवें ठेवणार नाही." मनोहर एखाद्या तत्त्ववेत्त्याचा आव आणून म्हणाला, "पौर्णिमेपेक्षा अमावास्येलाच समुद्राला भरतीची जोरगत येते म्हणतात. अमावास्येलाच सूर्यचंद्रांचें समुद्रावरील आकर्षणबळ परमोच्च कोटीला जातें. "

विमलने या वावदुकांचीं तोंडें बंद करण्याकरिताच कीं काय चटदिशी

पुढे होऊन चहादाणींतून चहा ओतून सर्वांपुढे ठेवला. माईसाहेबांनीहि इतर पदार्थांच्या बशा आणून पुढे केल्या. खाऊनपिऊन झाल्यावर अत्तरगुलाब होतो इतक्यांत महाराजांच्या नावची एक तार शिपायानें आणून दिली. ती फोडून पाहतां मि. मॅक्स्विनी पो. एजंट यांची होती. तींत असे शब्द होतेः—

("Congratulations to you on your double success. Wonder Prince must indeed be called the first Indian Raja who nobly conceived and courageously carried out the plan of giving an honest constitution to the government of his state people. God's blessings on your chosen partner, who will remain, I hope, a perpetual inspiration for good to you throughout your self-denying administration.")

"आपल्या दुहेरी विजयाबद्दल आपलें अभिनंदन करतों. आपल्या संस्थानांतील प्रजेला उदार मनानें राज्यघटना बहाल करून, ती धैर्यानें अमलांत आणणारे तुम्ही पहिलेच हिंदी संस्थानिक मला दिसतां; तेव्हा तुम्हांला नवलराय हें नांव शोभतें खरेंच. तुमच्या नियोजित सहधर्मचारिणीला ईश्वराचे शतशः धन्यवाद असोत. त्यांच्याकडून, तुमच्या निःस्वार्थी कारभारांत, निरंतर अशीच सन्मार्गाची प्रेरणा होत जावो !"

मनोहर म्हणाला "पो०एजंटाच्या आशीर्वादानें महाराजांचें स्वराज्यदान शास्त्रोक्त झालें. आता, भाऊसाहेब, आपलें कन्यादान तेवढे वेदोक्त आशीर्वादानें सशास्त्र होण्याचें उरलें."

भाऊसाहेब म्हणाले "ईश्वराच्या कृपेनें तेंहि लवकरच होऊन जाईल! देवाला महापूजेकरिता 'भोग' चढविणाऱ्या उपासकाला परत प्रसाद म्हणून कांही तरी मिळतोच. नव्या महाराजांनी संस्थानी प्रजेला जनताजनार्दन मानून स्वराज्याचा मौल्यवान भोग अर्पण केला. त्याकरिता उलट त्याच जनताजनार्दनाचा प्रसाद म्हणून, माझी प्रिय कन्या विमल ही, महाराजांना मी आनंदानें अर्पण करतों. देव दोघांनाहि कीर्ति, यश व उदंड आयुष्य देवो !"

समाप्त.

24
4
ε